मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज विरचित सूक्तिरत्नावली यष्टी ११ वी

# संप्रदाय-सुरतरु

## पूर्व विहार

प्रथम नाम ''मधुराद्वैतस्यमन्तक' । आगमरहस्यपर्याप्ति'' दुसरें सुरेख ।
''उपास्तिसुधाकर'' तिसरे सम्यक । ''संप्रदाय सुरतरु'' चवथें ॥११३॥ अ.१

(अध्याय १ ते १२)

श्रीगुलाबराव महाराजांचे उत्तराधिकारी
श्रीबाबाजीमहाराज पण्डित यांच्या टिपांसह



प्रकाशक

**श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ,**

दहीसाथ, अमरावती / टेली.०७२१-२६७६३०७

**कलिवर्ष ५११२ : इ.सन २०११**

**॥ रु.१२० ॥**



### महत्वाची सूचना

या आवृत्तीत, श्रीमहाराजांचे शिष्य पूज्य भाऊसाहेब खापरेंनी तयार केलेल्या 'माधुर्यमधुकोशातील' संदर्भ पाहता यावे म्हणून प्रथम आवृत्तीचे पान ज्या ठिकाणी संपले तेथे **प्रथम आवृत्तीतील पान-क्रमांक** टाकले आहेत.

उदा. (यष्टी ११ पूर्व-विहार पान २३) = **(य११पू-२३)**

प्रथमावृत्ति नागपूर १९१३
द्वितीयावृत्ति नाशिक १९३३
तृतीयावृत्ति नागपूर १९८९
चतुर्थावृत्ति अमरावती २०११

..................................

**॥ ग्रंथोपलब्धि ॥**

**श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ**
दहीसाथ, **अमरावती** / टेली.०७२१-२६७६३०७
*

**श्रीज्ञानेश्वर संस्थान**
पाताळेश्वर मार्ग, महाल, **नागपूर** ४४०००२
*

श्रीगुलाबरावमहाराज सर्वोदय ट्रस्ट
**आळंदी** (देवाची), ता. खेड, जि. पुणे / मो.९८२२४४०५९१
*

श्रीगुलाबरावमहाराज भक्तिधाम
**चांदूरबाजार,** जि. अमरावती. विदर्भ
टेली.०७२२७-२४३१३१ / ९८२२३६२०५४
*

**श्रीरंग घटाटे**
'गोकुळ' घटाटे ले आउट-९, व्ही आय पी रोड, सिव्हिल लाईन्स, **नागपूर.** ४४०००१
मो. ९३७२५२९७७० / टेली. ०७१२-२५३३९९७



# ग्रंथपठनाचा अधिकार

जयांची आवडी तातचरणीं । अतिउल्हास कृष्णशिवभजनीं ।
साधक अथवा सिद्धहि असोनी । नारायणीं प्रीति ज्यांची ॥११४॥
तिहींच अवलोकिजे हा ग्रंथ । येरा समर्पिली शपथ ।
मातृगमनादि पापें समस्त । घडोत मन्निदर्शनाविण अवलोकिता ॥११५॥
जया जें मान्य होये । तेणें तेथें न घेयावा संशय ।
नाहीं तरी अपाय । सर्वथा न चुके ॥११६॥
ग्रंथपठण वा सांप्रदायिक । कार्य करितां स्मरावे सकळीक ।
त्यामाजीं नव पंचक । तेही स्मरावे ॥११७॥
म्हणुनी जिहीं  साह्य केले । ग्रंथ लिहिले वाचिले ।
शूद्रसामान्यें तिरस्कारिले । नाहीं मातें ॥१३६॥
तयांचें स्मरण प्रसिद्धी । करावें पैं मज आधीं ।
विपर्यय करितां त्रिशुद्धि । कल्याणहानि पैं होय ॥१३७॥
कलींत वर्षे लागे शाप । ऐसा पराशरस्मृत संकल्प ।
मत्कृत ग्रंथीं मीचि भूप । म्हणोनि मच्छाप अन्यथा नोहे ॥१३८॥
इदं षटकं सदा गेयं मत्कुमारैर्मयापि हि ।
एतं नियममुत्सृज्य ये पठन्ति कृतिं मम ॥७॥
ते संप्रदायविद्वेषात् सत्यं भ्रश्यन्ति मार्गतः ।
ये पुनः षट्कमेतत्तु स्मृत्वा स्मृत्वा पठन्ति वै ।
ते त्वैहिकं सुखं भुक्त्वा पारमैश्वर्यमाप्नुयुः ॥८॥
तेणें मंत्रेंचि स्मरावें । नवपंचक स्वभावें ।
आणि समुच्चायक स्मरावे । एक त्यापाठीं ॥१४६॥

शिष्यपंचकाला नमन

ऱ्हीं नारायणाय नमः ऱ्हीं । ऱ्हीं हरये नमः ऱ्हीं ।
ऱ्हीं दत्तात्रेयाय नमः ऱ्हीं । ऱ्हीं व्यंटेशायााय नमः ऱ्हीं । ऱ्हीं लक्ष्मणाय नमः ऱ्हीं ।
वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिम् ।
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥१॥
गुरुमिति सर्वत्र संबध्यते ॥
रुढिरेषां च नाम्नां वै कल्पिता मत्सुहृत्स्वपि ।
पूर्वा सम्यक् देवरुढिर्गुरुबुध्यात्र युज्यते ॥२॥



संस्मरेद् वित्तदातृंश्च जन्मनामादिकांस्तथा ।
नमस्कारेण मंत्रेण तेषां नामयुतेन च ॥३॥
यतः सम्यक्तया जातास्ते सर्वे ह्युपकारिणः ।
मम ज्ञानप्रदानाय लेखनैर्वाचनैरपि ॥६॥

नियम व शाप

इदं षटकं सदा गेयं मत्कुमारैर्मयापि हि ।
एतं नियममुत्सृज्य ये पठन्ति कृतिं मम ॥७॥
ते संप्रदायविद्वेषात् सत्यं भ्रश्यन्ति मार्गतः ।
ये पुनः षट्कमेतत्तु स्मृत्वा स्मृत्वा पठन्ति वै ।
ते त्वैहिकं सुखं भुक्त्वा पारमैश्वर्यमाप्नुयुः ॥८॥
नमोऽन्येभ्यो लक्ष्मीनायककृष्णपर्यायादिपालकेभ्यः। आदि शब्देन लक्ष्मीपालकश्रीनिवास-राजेश्वर-रामचंद्रादीनाम् उपकारकाणामेव ग्रहणं न तु अन्येषाम् ।
धनदातृंश्च किंचित्पुण्यं दत्वा भगवन्तं प्रार्थयेत् ।

पाठक्रम आणि वाचनक्रम

तैसा आणिकही नियम । चित्तीं धरावा सप्रेम ।
प्रथम द्वितीयाध्याय पढोन । मग प्रथमाध्याय म्हणावा ॥१४७॥
परी उमा माता इत्यादि श्लोक । जे माझे पंचायतन सुरेख ।
आधींचि पढावे सकळीक । मंगल म्हणोनि ॥१४८॥
मग तृतीयापासूनी अनुक्रम घेयावा । हाहि नियम नोल्लंघावा ।
वाचनक्रम तंव ठेवावा । प्रथमद्वितीयादि सारिखा ॥१४९॥
एवं इत्यादि नियमीं अदृष्ट फळे ।
अधिकारी होती सगळे ।
आतां जी चिन्हें दृष्ट फळे । तीहि ऐसीं ॥१५०॥
ऋषिगुरुवेदान्तवचनीं । विश्वास अत्यंत मायेहीहूनि ।
संसार मुक्तीची चिंता मनीं । तो साधनचतुष्टयगुणी अधिकारी ॥१५५॥
साधन चतुष्टय नसता । आणि उगाचि ग्रंथ पाहता ।
तरी मनोरंजनावांचुनी सर्वथा । लाभ नोहे तयातें ॥१५६॥

(संप्रदायसुरतरु अ.१)

०००

सूक्तिरत्नावली यष्टी ११ वी : संप्रदाय सुरतरु : पूर्व-विहार
पहिल्या आवृत्तीची

# अनुक्रमणिका

## अध्याय १ ला. मंगलाचरण


| विषय | ओवी | प्रथमावृत्तीचे पान |
|---|---|---|
| माधूर्यभक्त्यन्वित श्रीगुरुस्तुति व निर्विघ्नतायाचन | १-३२ | ....१ |
| संतस्तवन | ३३-९८ | ....४ |
| ग्रंथारंभीं मंगलाचरणाची आवश्यकता, त्याचे भेद | | ....७ |

ग्रंथनामकरण - मधुराद्वैतस्यमन्तक,आगमरहस्यपर्याप्ति,उपास्तिसुधाकर,संप्रदायसुरतरु ओवी ११२-११३,
अधिकारीवर्णन - ओवी ११४-११५,
नियतादृष्टोत्पादक नियम व त्याविषयीं उपपत्ति- ओवी ११६-१४९ ....१६
दृष्टिफलोत्पादक नियम व त्रिविध अधिकारीभेदादिवर्णन १५०-१९९,
भागवतधर्मीयांचें उत्तमाधिकारित्व २००,
भागवत धर्माचे श्रेष्ठत्व २०१-२०६,
ग्रंथविषय, प्रयोजन २०७ -२०८,
धर्माचे ठिकाणीं वादीप्राबल्य- दौर्बल्यनिराकरण २०९-२१६,
पराभिमत धर्मस्वरूपविवेचन २१७
स्वाभिमत धर्मस्वरूप
भगवदपेक्षावर्जितधर्मखंडण २५४-२५८,
धर्माचें केवलनिरोधपर्यवसायित्वनिराकरण व आगमपरतंत्रत्वमंडन २५९-२९५,
धर्मलक्षण व त्याची साधनसंपत्ति २९६-३१९,
ग्रंथदिशादिग्दर्शन व कवितासमर्पण ३२०-३२१ ....३०


## अध्याय २ रा. नाममहिमादि निर्णय


श्रीगुरुस्तुति १-३,
स्वगुरुमहिमा कथन ४-६,
स्वमंत्रोच्चारानुज्ञा ७-९,
सांप्रदायिकमंत्र व त्याची उपपत्ति १०-१३,





शब्दांचे अर्थ, भाषागतविवक्षेवांचून सर्व शब्दांचे परमेश्वरवाचकत्व व परमेश्वरनामाचें तद्विवक्षेवाचून हितकारकत्व १४-२७,
संतानें दिलेल्या व स्वतः विश्वासानें जपलेल्या नामांत भेद २८-२९,
कलींत नामसंकीर्तनच मुख्य व त्यांत स्मरण-ध्यानाचा अंतर्भाव ३०-३४,
आक्षेपखंडणपूर्वक नामसंकीर्तनमंडन ३५-४४,
नामापराध, कोण्याहि स्थितींत नामच तारक ४५-४९,
नामरूपाचें ऐक्य ५०-५३,
नाममहिमा व सर्व युगांत त्याचें युगधर्मत्व व स्वतंत्र तारकत्व ५४-६१,
नाममाहात्म्यामुळें ईश्वरवैषम्यशंका-निराकरण व ईश्वराचें दयालुत्वप्रतिपादन ६२-१०४,
भगवद्वैषम्यास जीवच कारण. भगवंताचे ठिकाणीं स्वाभाविक दयालुता १०५-१२० ....३५
भगवद्दयालुता व न्यायताप्रतिपादक वचनांची संगति ....४४
भगवंताचें कर्मफलदातृत्व आगमान्यप्रमाणगोचर नाहीं व आगम दयालुताहि प्रतिपादन करितो म्हणून भगवान् दयालु असून न्यायीपणाहि दयोपष्टब्धच आहे असें निरूपण ....४८
युक्तीनें नामाचें सर्वपापहारकत्वप्रतिपादन ....५३
नामानें निरुद्धस्थीतिप्राप्ति १४८,
नामनिंदकांची निंदा व नाममहिमा १४९-१५७,
नामाला सिद्धारिचक्र नाहीं १५८,
नाम व मंत्र यांत भेद १५९-१६५,
गायत्रीव्यतिरिक्त भगवन्नामाची आवश्यकता, सद्गुरुमुखानें नाम ग्रहणाची आवश्यकता, सद्गुरुनिर्णय, नामग्रहणाचा सर्वास अधिकार १६६-२११ ....५७
नामाचें ठिकाणीं शूद्रादि सर्व वर्णास अधिकार व स्तोत्रपठणाचे ठिकाणीं सच्छूद्रास अधिकार व असच्छूद्रादिकांस अनधिकार २१२-२३१ ....६१
नामाचा सर्वास अधिकारप्रतिपादन व नामाचे कर्मसाद्गुण्यनिराकरण ....६३
प्रायश्चित्तागमाच्या अस्तित्वामुळें सर्वपापनाशक नाममाहात्म्यखंडन करणारांचें खंडण....६९
भगवन्नामप्रायश्चित्ताला परिषदनुमोदन नको, नाम कसेंहि फळते, श्रद्धाश्रद्धेची अपेक्षा नाही ....७१
नामाचें नित्यत्व व साक्षाद्भगवद्वाचकत्व ....७४
नामाला देश, काल क्रमाची अपेक्षा नाही ....७८
श्रीकृष्णनामाचा विशेष महिमा ....७९

निरनुस्वार श्री बीजाचा शूद्रांस अधिका .... ८०
नामस्मरणसौलभ्यानें धर्मलोपास्तव नामाविषयीं अर्थवादशंका व तिचें निराकरण व
नामस्मरणानंतर पापप्रवृत्ति राहण्याचें कारण .... ८१
नामाला अर्थवाद म्हणणाऱ्यांचें खंडण, निरपराध नामधारकाची श्रेष्ठता,
सापराध निरपराध नामधारकांस भगवंत उद्धरतो, नुस्त्या धार्मिकापेक्षां सापराध
नामधारकाचीहि श्रेष्ठता, नामानेच सर्वपूर्ति .... ८३
ध्यानापेक्षा नामाचे श्रेष्टत्व व ध्यानाचा नामस्मरणात अंतर्भावनिरूपण. ... ८९
नाम संवादीभ्रमरूप नाहीं म्हणून अर्थवाद नाहीं हें प्रतिपादन .... ९१
नामाचें वस्तुमहात्म्य, व श्रौतोपासनेहून श्रेष्ठत्व २८९-२९७,
ज्ञान्याला नामस्मरणाची आवश्यकता २९८-३०९,
नामाचें अर्थवादत्वनिराकरण पूर्वक अनादित्व स्थापन ३१०-३३५,
नामाचें कल्पितत्वनिराकरण, निरंजनमतखंडण २३६-३६३,
नामस्मरणानें सर्वोच्छेदशंकानिराकरण ३६४-३७३,
नामस्मरणानें पापप्रवृत्तिनाशप्रतिपादन ३७४-३८०,
संतत नामस्मरणाची आवश्यकता ३८१-३८६ .... ९३
नामस्मरणांत अखंडभगवद्ध्यान ३८७-३८९,
नामाचें सौलभ्य,
पुराणप्रसिद्ध नामस्मरणास प्रथमच गुरूची अनावश्यकता ३९०-४०१ .... १००
नामापराधनिर्णय ४०२-४६३,
नामापराधियास नामच तारक ४६४-४७५ .... १०१
नामाचें कलिधर्मत्वप्रतिपादन ४७६-५०५,
नामस्मरणानें आगामी व संचितकर्मनिवृत्ति, प्रारब्धाभिभव ५०६-५१४,
नामाचें भावनेनुसार फलदातृत्व ५१५-५२०,
संसारनिवृत्यर्थ नामाचें ठिकाणीं विश्वासाची अपेक्षा व नामाचें वस्तुतंत्रत्व, निर्गुण अभ्यासापेक्षां
नामाची श्रेष्ठता ५२१-५४६,
नामाचे अनध्यस्तविवर्तत्व ५४७,
नामाच्या आवडीविषयीं महाराजांचे उद्गार ५४८-२५२,
मंत्राहून नामाचें श्रेष्ठत्व ५५३-५६१,
नाममाहात्म्यसंकोचाभाव प्रतिपादन ५६२-५७१ .... ११०
नामाचे पुरुषार्थचतुष्टयप्रदत्व व अनन्यनामधारक कसाही असला तरी भगवत्प्राप्ति चुकत
नाहीं .... ११९
महावाक्याहून नामाचें श्रेष्ठत्व ५८८-६२४,
नामधारकास जन्म नाहीं ६२५-६५२,
भजनस्वरूप व महिमावर्णन, गानमाहात्म्य, भगवन्नामयुक्त गानाचा सर्वांस अधिकार, गानजन्य
आनंद व गंधर्वानंद यांतील भेद, कसेंहि निरभिमान नामस्मरण भगवंतास प्रिय असते,
नामस्मरणानें भगवत्प्राप्तीची प्रतिज्ञा, काव्यार्पण .... १२०

**अध्याय ३ रा श्रीगुरुतत्त्व निरूपण**

श्रीगुरुस्तवन १-१५, गुरुवरप्रदान १५-१७, श्रोत्यांस प्रार्थना १८,
शिष्यप्रश्न १९-२६,
श्रीगुरुआविर्भवनप्रक्रियानिरूपण २७-८२
श्रीगुरूचें अनध्यस्तविवर्तत्व ८३-९०,
श्रीगुरूच्या ठिकाणीं विकाराभासाचें कारण ९१-९३
श्रीगुरूचें ठिकाणीं दोषव्यावृत्तिपूर्वक ब्रह्मदृष्टि करण्यास युक्ति ९४-९८
अवतारप्रत्यय व अपरोक्षतत्पदाचा उलगडा ९९-१०४ कवितार्पण १०५ .... १३०

**अध्याय ४ था. सद्गुरुपूजादि तत्त्वांश निरूपण**

श्रीगुरुस्तवन- १-९, शिष्यप्रश्न १०,
सद्गुरुसेवेची वरिष्ठता व तिचें दिग्दर्शन ११-२०,
आळंदींत राहून सांप्रदायिकसेवापद्धति २१-४६,
घरीं राहून सेवापद्धति ४७-५७,
पादुकापूजनाचें उपासनाव्यावृत्तिपूर्वक भक्तित्वस्थापन ५८-६८,
संबंधभक्ति, प्रकार तिचा काल, अधिकारी, व तिची बाह्यसेवापद्धति
इत्यादि निरूपण व स्वस्मिन् माधूर्यसंबंध निषेध ६९-१३४
मानसपूजानिरूपण १३५-१३६,
उपसंहार १३७-१३८ कवितार्पण १४०-१४१ .... १३६

**अध्याय ५ वा. गुरुवर्णादि अधिकार निरूपण**

श्रीगुरुस्तवन १-१०, गुरुवर्णप्रश्न ११-१२, सिद्धान्त १३
कोणीहि गुरु होतो याविषयीं आगमप्रामाण्य १४-५८,
विरोधीवचनव्यवस्था ३१-३८ .... १४४

पुराणश्रवणपठणादिपूर्वक शूद्रांना ब्रह्मविद्याधिकारमंडन,
संक्षेपशारीरककारांच्या मतें जीवन्मुक्तीची असिद्धि,
संताच्या वचनांचें साक्षाज्ज्ञानप्रदत्व, पुराणांचें साक्षाज्ज्ञानप्रदत्व, .... १४८
सर्वांना निदिध्यासनाचा अधिकार, चातुर्वर्ण्यसाधारणासाधारण धर्मनिर्णय,
शूद्राला पठणाधिकार, विदितवेद्य कोण्याही वर्णाला गुरुत्वप्रतिपादन .... १६४
विरोधसमन्वयपूर्वक कोणत्याही वर्णाचा गुरु होतो याची सिद्धि. .... १७५
वचनप्रामाण्यपूर्वक सेव्याधिकाराभावास्तव शूद्रगुरुत्वनिषेध, विरोधपरिहारपूर्वक
स्वसांप्रदायिक गुरुत्वनिरूपण .... १७७
कोणी कोणालाही गुरु होतो याविषयीं भारत व आचार्यादिसंमति .... १८३
ऐतिह्यप्रमाणकथनपूर्वक स्वमतनिर्धारण, कवितासमर्पण .... १९०

### अध्याय ६ वा. श्रद्धातत्त्व निरूपण

श्रीगुरुस्तवन १-५ .... १९०
श्रद्धामहत्व ६-११,
श्रद्धेचे तर्काधिष्ठानत्व १२-३८
व्यवहाराचे श्रद्धामूलकत्व ३९-४५,
तर्काचें अनर्थकारकत्व ४६-५१,
दैवश्रद्धेचे इष्टानिष्टपरिस्थितिप्रदत्व ५२-५८,
भगवच्छ्रद्धेचे निर्भयत्व .... १९४
दैवश्रद्धेचें तर्काबाध्यत्व व दैवाभावाचें खंडण ५९-७२,
श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाची व्यवस्था ७३-८०,
आगमांत तर्काचा त्याग व सर्व मतांचा स्वीकार ८१-९९,
आगमांतील स्वीकृत तर्काचा अर्थ १००,
ईश्वरश्रद्धेचें श्रेष्ठत्व १०१-११३,
बौद्धांच्या शून्यश्रद्धेनें बौद्धखंडण ११४-१२०,
तर्कलक्षण १२१, तर्काचे स्वरूपतः खंडण १२२-१३४,
वेदाचें अनादित्व १३५-१३८,
सर्वश्रद्धाप्रतिपादनपूर्वक श्रद्धोपदेश १३९-१७०,
कवितासमर्पण १७१ .... १९५

### अध्याय ७ वा. आप्त निर्णय

श्रीगुरुस्तवन १-७,
आप्तविषयकप्रश्न ८-९,
आप्तलक्षण १०,
आप्तनिषेध ११-१५,
प्रत्यक्षप्रमाणानें सर्वज्ञमंडन १६-२२,
अनुमानप्रमाणानें सर्वज्ञसिद्धि २३-३३,
शब्दप्रमाणक सर्वज्ञमंडनांतील अन्योन्याश्रयनिराकरण ३४-३९,
सर्वज्ञाचे आप्तत्व ४०-४३, अनेकसर्वज्ञ खंडण ४४-४९,
ईश्वराप्तत्वमंडन,सर्वमार्गसमन्वयपूर्वक वेदाचे श्रेष्ठत्व,भगवद्दयालुता,आगमप्रामाण्य ५०-८३,
तीव्र विश्वासाचे फळ ८४-८७,
अविश्वासियांची निंदा ८८-९१,
सद्गुरुवचनश्रद्धामहिमा ९२-१००,
द्वैतमतांत गुरुभक्तीची अशक्यता १०१-१०२,
आप्तनिर्धार १०३-१०४,
श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें सकलाप्तश्रेष्ठत्व व कवितासमर्पण १०५-१०९ .... २०५

### अध्याय ८ वा. आप्तवचन निर्णय

श्रीगुरुस्तुति १-६,
आप्तप्रमाणविषयक प्रश्न व त्या प्रमाणाची व्याप्ति ७-९
वितण्डापूर्वक आप्तवचनानर्थक्यानुपपत्ति १०-१४,
आप्तवचनाचे भेद व सर्व वचनांची सार्थकता, १५-४५,
परमेश्वरच एक आप्त व तोच सर्व आगमांचा कर्ता ४६-६२,
सर्व आगमसार्थकता ६३-७३, आप्तवचन सर्वथा विश्वासास पात्र ७४-८८,
आप्तवचनाचे ठायीं दोषनिराकरण ८९-१०२,
भागवतधर्माची घोर कलींतहि स्थिति १०३-१११ .... २१३
शब्दप्रामाण्यशंका ११२, वैशेषिकमतोपन्यास ११२ .... २२०
वैशेषिकमतखंडण .... २२१
शब्दाच्या अनियतार्थाविषयीं शंका व खंडण .... २२२
लक्षणावृत्तींत वेद जीवकल्पित ठरतात किंवा अद्वैत असत्य ठरते अशी शंका व खंडण २५१

वेदाचे ईश्वरप्रणीतत्वमंडन २५८-२८७,
वेदार्थाचें सत्यत्वप्रतिपादन १८७-१९५,
शब्दार्थसंबंधाविषयीं मतें, मीमांसक व न्यायखंडणपूर्वक वेदान्तमतप्रतिपादन २९६-३१४,
दुर्जनतोषन्यायानें न्यायमताचा स्वीकार करून ईश्वराचे वेदप्रणेतृत्व व
शब्दमहत्वप्रतिपादन ३१५-३७२,
ब्राह्मणभागाचे वेदत्वप्रतिपादन ३७३-४०१,
इतिहासावरून ब्राह्मणभागाविषयीं जीवकर्तृत्वशंका व शब्दनित्यत्वप्रतिपादनद्वारा खंडण ४०२
न्यायादि मीमांसा, सांख्य योग वैय्याकरणी यांच्या मतांचें खंडण करून वेदान्तसम्मत वेदाचें
नित्यत्वस्थापन .... २६६
पुराणविकल्पसमन्वय .... २६९
श्रुतिप्रत्यक्षोपायकथन ४३३-४३८,
दृष्टिसृष्ट्यन्वयें जीवच वेदकर्ता व यावज्ज्ञान वेदसत्यता ४३९-४५२,
गुरुवाक्याचे वेदत्वस्थापन ४५३-४५७,
युक्तिविरुद्ध आप्ताचे अप्रामाण्य व त्याचे खंडण ४५८-५१०,
आप्ताच्या रागद्वेषराहित्याविषयीं शंका व त्याचे खंडण ५११-५३१,
परमेश्वराचे परम आप्तत्व व न्यायादिमतखंडणपूर्वक -
वेदान्तान्वयें वेदाची यावज्ज्ञान नित्यता ५३२-५३९,
वेदाच्या उत्पत्तिविषयीं मीमांसकांची शंका व त्याचें खंडण ५४०-५४७,
वेदाचे अपौरुषेयत्व व इतरागमांचे गौणत्व ५४७-६०१,
मंत्र व ब्राह्मणाची लक्षणें ६०२-६२०,
चारी वेदांचीं लक्षणें ६२१-५२२,
मंत्र व ब्राह्मण यांत समता असण्याचे कारण ६२३ .... २७३
वेदव्यवस्थानिरूपण .... २८५
गुरुवाक्यप्रामाण्यनिरूपण ६२५-६३२, काव्यार्पण ६३३ .... २८७

## अध्याय ९ वा. गुरुदोषदर्शन व आक्षेप परिहरण

गुरुस्तुति १-२, श्रीगुरुलक्षण ३-१९,
वादीकृत गुरुदोषाविष्करणशंका व त्याचे खंडण १९-४०,
प्रारब्ध व लीला या रीतीनें गुरुचे ठिकाणीं दोषसंभावन ४१-५४,
गुरुदोष सेवेत प्रतिबंध करीत नाहीं याविषयीं उदाहरणें ५५-८६,





गुरुभक्तास गुरुदोषदर्शनाभाव ८७-८९,
गुरुत्यागशंका व त्याचे खंडण ९०-११४,
काव्यार्पण ११५

## अध्याय १० वा. गुरुशिष्यलक्षण

गुरुस्तुति १-२,
शिष्यलक्षणनिरूपण व प्रसंगानें सिद्धविचार ३-७७,
गुरुभक्तिविचार ७९-८१,
गुरुलक्षण ८२-१०२,
गुरूच्या शुद्धसत्त्वलक्षणांची व लक्षणातीतत्वाची व्यवस्था १०३-१०८,
काव्यार्पण १०९ .... २९५

## अध्याय ११ वा.
## उपदेशप्रकार, शिष्याधिकार व संप्रदायविशेषविचार

गुरुस्तुति १-१७,
उपाधिनाशक प्रक्रिया रचण्यांत गुरूचीं हातवटी १८-३७,
नानाप्रक्रियोद्घाटन ३८-६५,
अधिकारीभेद ६६-६९,
उत्तमाधिकारी ७०-७६,
मध्यमाधिकारी ७७-७८,
कनिष्ठाधिकारी ७९-८१
संप्रदायाची आवश्यकता ८२-८६,
संप्रदायरीतिनिरूपण ८७-१२८,
स्ववृत्तविषयक १२९-१३६
काव्यार्पण १३७ .... ३०४

## अध्याय १२ वा. वर्णनिर्णयपूर्वक संप्रदायविवेक

गुरुस्तुति १-८,
वर्णवादाविषयीं संशय ९-१४,
उपनिषद्गतविरोध १५-१९ .... ३१३
गुणकर्मपुष्ट्यर्थ भारतप्रामाण्य .... ३१४

| | | |
|---|---|---|
| जन्मकर्माला भारतप्रामाण्यपुष्टि | .... | ३१७ |
| पुनः गुणकर्माला भारतप्रामाण्यपुष्टि | .... | ३१७ |
| पुनः जन्मकर्माला भारतप्रामाण्यपुष्टि | .... | ३१९ |
| जन्म व गुणकर्म या दोहोलाहि सोडून ब्राह्मण्यप्राप्ति | .... | ३१९ |
| भारतानुसार वर्णसंशय | .... | ३२० |
| महाभारतांतील आश्रमविचार | .... | ३२० |
| भारतवाक्यांचा विकल्पानें निर्णय | .... | ३२४ |
| भारतवाक्यांचा भारतवाक्यानें निर्णय | .... | ३२६ |
| गीता व भागवत यांतील गुणकर्मवाद व जन्मजातिवाद | .... | ३२६ |
| गुणकर्माला वैदिकप्रामाण्य | .... | ३३५ |
| केवळ मातृज किंवा पितृज वीर्यापासून गर्भोत्पत्ति व अदृष्टानुगतत्वविचार.... | | ३३७ |
| वज्रसूचीउपनिषदेवर प्रामाण्यशंका व खंडण | .... | ३४१ |
| पुराणप्रामाण्येंकरून वर्णनिर्णय | .... | ३४१ |
| कलींतील सत्पुरुषांच्या मतें वर्णनिर्णय | .... | ३४१ |
| भक्तींत वर्णविचार | .... | ३४३ |
| संप्रदायमते वर्णविचार | .... | ३४५ |
| वर्णवादाचा समन्वय | .... | ३५९ |
| युक्तीनें वर्णसंशयमंडन | .... | ३५९ |
| स्पर्शास्पर्शनिर्णय | .... | ३६१ |
| ब्राह्मणावरील ब्राह्मणेतरांच्या आक्षेपांचे खंडण व इतर धर्मांत वर्णभेदसिद्धि .... | | ३६१ |
| स्वसंप्रदायमान्य वर्णनिर्णय | .... | ३७१ |


०००





**॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

## ग्रंथ प्रस्ताव

**गुरुसंप्रदायाची वाट । न धरितां करिसी प्रगट ।**
**तरी गुज घेऊनि चावट । होतील बहु ॥२१॥**

(श्री मुकुंदराज परमामृत प्र.१४.)

या वेळीं आम्ही सज्ञनवृंदाला श्रीगुलाबरावमहाराजकृत ग्रंथावलींतील एक यष्टि सादर करीत आहों. हींत गुलाबरावमहाराजांच्या माधूर्यसंप्रदायाचा मूळ आधारभूत ग्रंथ जो 'संप्रदायसुरतरु' तो प्रसिद्ध झाला असल्यामुळें सर्व यष्टींमध्यें हिला अग्रस्थान आहे असें म्हटलें असतां वावगें होणार नाही. माधूर्यसंप्रदायाचें जें ध्येय आहे तें ज्या कोणत्या मार्गानें साध्य करून घ्यावयाचें तो मार्ग या ग्रंथांत नाना अधिकाऱ्यांनुसार सांगून ठेवला असल्यामुळें, सुरतरु जसा भक्तांच्या ज्या ज्या कामना असतील त्या त्या पूर्ण करितो त्याप्रमाणें माधूर्यसंप्रदायांत प्रविष्ट होऊं इच्छिणाऱ्या अधिकाऱ्यांना हा 'सुरतरु' प्रमाणें आहे, व म्हणूनच श्रीगुलाबराव महाराजांनी त्याचें 'संप्रदायसुरतरु' असें अन्वर्थक नांव ठेविलें आहे.

कर्मपतित किंवा जातिपतित असल्यामुळें, ज्यांना श्रौत मार्गाचा अधिकार नाहीं, अशा शाक्त, दुराचारी चतुर्वर्णी, वेश्या, अंत्यजादिक सर्व लोकांना, लौकिक विषयाचरण सोडून त्या सर्व आचरणांत एक परमेश्वरच आलंबन ठेविल्यानें याच जन्मीं वैदिक गति कशी मिळवून घेतां येते हें सांगणारा हा अपूर्व ग्रंथ आहे.

कर्मपतित असो किंवा जातिपतित असो, दीनता व अनन्यतापूर्वक संप्रदायांतील जें इष्ट त्याची सेवा करूं इच्छिणाऱ्यास या संप्रदायांत प्रविष्ट होतां येतें.

'संप्रदाय सुरतरु' सोडून श्रीमहाराजांचे जेवढे ग्रंथ आहेत ते सर्व संप्रदायांतील जें फल माधूर्यभक्ति, तत्प्रतिपादक आहेत व 'संप्रदायसुरतरु' हा ग्रंथ तन्मार्गप्रतिपादक आहे.

या माधूर्यसंप्रदायांतील फलरूप मंतव्य व साधनरूप मंतव्य नवीन नसून, त्यांचें सोपपत्तिक व सप्रमाण प्रतिपादन मात्र नवीन आहे, हें श्रीमहाराजांनीं ठिकठिकाणीं सांगून ठेवलें आहे; व त्याच्या पुष्ट्यर्थ पूर्वाचार्यांची च श्रुतिपुराणांचीं

प्रमाणेंहि दिली आहेत, म्हणून हा संप्रदाय अवैदिक आहे असें कोणी समजूं नये. अर्थांतच पूर्वआचार्यांना संमत असल्यामुळे व श्रुतिपुराणांत त्याचा निर्देश असल्यामुळें हा संप्रदाय अनादि आहे असेंहि सिद्ध होतें; व हें श्रीमहाराजांनीं सिद्धहि केलें आहे.

अलिकडे 'संप्रदाय' हा शब्द फार तिरस्करणीय होत चालला आहे. सांप्रदायिक दृष्टि म्हणजे कांहीं तरी आग्रह व तो त्या त्या संप्रदायप्रवर्तक जीवाचाच असल्यामुळें, संप्रदायिक दृष्टि त्याज्य आहे असें कित्येक म्हणतात; पण हा समज, 'आपल्या बुद्धीच्या जोरावर तत्त्व शोधून काढूं' अशी ज्यांना घमेंड आहे, त्या लोकांचाच होतो, पण त्यांनाहि कोण्या ना कोण्यातरी संप्रदायात पडावेच लागते. कारण त्यांची विचारसरणी कोण्या तरी पूर्व सांप्रदायिक विचारसरणीस धरूनच असते. एकादा तर्क त्यांचा स्वतःचा राहूं शकेल, पण विचारसरणी मात्र स्वतंत्र राहूं शकत नाहीं. वास्तविक पाहतां कोणतेंहि ध्येय सांप्रदायिकरीत्याच कळतें; कारण ध्येय म्हटलें कीं त्यांत दोन अंश असतात, एक साध्यनिरूपणांश व दुसरा साधननिरूपणांश. मुकुंदराज म्हणतात -

**'आधीं आत्मयातें जाणावें । मग तयातें साधावें ।**
**एरवीं नुसतें अनुभवावें । काय धरूनी'**

अर्थात् प्रथम साध्य परोक्ष होतें व नंतर साधनानें तें अपरोक्ष होतें. साध्यांत परोक्ष-अपरोक्षभेद नाहीं असे जे म्हणतात ते अदृष्टवेदान्ती असल्यामुळें त्यांच्याशीं वाद करून अर्थ नाहीं. तज्ज्ञ पुरुष कोणालाहि साध्यनिरूपण करूं शकतो, पण योग्य अधिकाऱ्यावांचून साधननिरूपण करीत नसतो. हें अधिकाऱ्यानुसार साधननिरूपण करणें यालाच संप्रदाय म्हणतात.

सर्वांना जरी एकच ध्येय मिळवावयाचें असलें तरी एकाच मार्गानें एकदम तें ध्येय प्राप्त करून घेण्याइतकी प्रत्येकाची योग्यता नसते; म्हणून निरनिराळ्या मनुष्यांना त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार क्रमानें किंवा एकदम ध्येयप्राप्ति करून देण्याकरितां जे साधनमार्ग निर्माण होतात, त्या सर्वांना 'संप्रदायसंज्ञा' असते. त्यांत कांहीं संप्रदाय श्रुत्युपजीवी आहेत व कांहीं श्रुतिबहिर्भूत आहेत. केवलाद्वैत संप्रदाय श्रुत्युपजीवी असून साक्षात् ध्येयसाधक आहे, व इतर क्रमिक आहेत. याचा विचार श्रीमहाराजांनीं या ग्रंथांत केला आहे. वस्तूच्या अपरोक्षत्वाला



हा साधनांश विशेष महत्वाचा असल्यामुळें, संप्रदायाची वाट धरिल्याशिवाय वस्तुलाभ नाहीं असें मुकुंदराजानीं आरंभींच्या ओवींत म्हटलें आहे. पारमार्थिक फलप्राप्ति असो किंवा व्यावहारिक फलप्राप्ति असो, हा नियम सर्व ठिकाणीं सारखा लागूं आहे. व्यवहारांतील ट्रेड सिक्रेट (trade secret) संप्रदायाचीच साक्ष पटवितें. याविषयीं महाराजांनीं ''साधुबोध'' पान २२२ वर चांगला खुलासा केला आहे. परमार्थफलसाधन प्रगट करणें हें काम जगच्चालक ईश्वराचें आहे, कारण जीव जरी यथार्थ मुक्त झाला तरी तो जीवन्मुक्त आहे तोंपर्यंत मुख्य जगच्चालकत्व त्याच्याकडे येत नाहीं; म्हणून जगदुत्पत्ति, स्थिति, लय व कल्याणाचा मार्ग प्रगट करणें, हीं कार्यें जीव करूं शकत नाहीं, व जीव विदेहमुक्त झाल्यावर ईश्वरच होतो.

**'युगान्तेऽन्तर्हितान् वेदान् सेतिहासान् महर्षयः ।**
**लेभिरे तपसा पूर्वमनुज्ञाताः स्वयंभुवा ॥''**

या भारतवाक्यांत व त्याच्या पुढील श्लोकांत सर्व दर्शनें, सर्व शास्त्रादिक, परमेश्वरच प्रवर्तकद्वारा प्रवृत्त करतो असें सांगितलें आहे; म्हणून प्राचीन असो किंवा नंतरचा असो, सर्व संप्रदाय कल्पीं-कल्पीं परमेश्वराविष्ट प्रवर्तकद्वारा निर्माण होत असल्यामुळें, अनादि आहेत. अलिकडील सर्व संप्रदायाचा कोण्यातरी पूर्वसंप्रदायांत किंवा पौराणिक दोन संप्रदायाच्या कोंडळ्यांत समावेश होतो. सूतसंहिता, यज्ञवैभवखंड, अ.२०.मध्यें सर्व मार्गांना यथाधिकार प्रामाण्य सांगून सर्वांचा प्रवर्तक परमेश्वरच आहे असे दाखविले आहे. याप्रमाणे सर्व संपदाय जरी परमेश्वरापासून निघाले असले तरी, संप्रदायांतर करणें मात्र श्रद्धास्थैर्याला घातक असल्यामुळें योग्य नसतें; म्हणून स्वसंप्रदायांतच दृढ श्रद्धा राहावी एवढ्याकरितां सांप्रदायिकांचे खंडणमंडणप्रकार असतात. केवलाद्वैतसंप्रदाय जरी इतर सांप्रदायिकांनी खंडण केला असला तरी केवलाद्वैत मंडण करणाऱ्या श्रुति, युक्ति व अनुभव या प्रमाणत्रयीपुढें त्यांचें खंडण फिकें पडतें म्हणून केवलाद्वैत संप्रदायच अंतिम ठरतो. असो, सांगावयाचें इतकेंच कीं, संप्रदाय तिरस्करणीय नसून परमार्थांत आवश्यक आहे.

श्रीमहाराजांनीं काढलेला माधूर्यसंप्रदाय शंकराचार्यांनीं स्थापलेल्या वैदिक केवलाद्वैत संप्रदायाहून निराळा नसून तो केवलाद्वैत संप्रदायच होय. अलिकडे

‘भक्ति हें ज्ञानाचें साधन आहे, म्हणून ज्ञानानंतर भगवद्भक्तीची अपेक्षा नाहीं, व ज्ञानानें सर्व सगुणाचा बाध होत असल्यामुळें, भगवंताच्या सगुण मूर्तीचाहि बाध होतो, म्हणून ज्ञानानंतर भगवद्भक्ति राहणें शक्य नाहीं’ असें पुष्कळ ज्ञानी समजतात. हें अज्ञान दूर करण्याकरितां,

**‘‘सत्यपि भेदापगमे - -’’ ‘‘मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजन्ते’’** इत्यादि आचार्यउक्तींत, ‘‘ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा’’ इत्यादि भगवदुक्तींत, ‘‘तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे’’ इत्यादि श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओवींत व आणखी पुष्कळ साधुसंतांच्या उक्तींत असलेली व केवलाद्वैतांत होणारी ज्ञानोत्तरभक्ति,परमेश्वरानींच श्रीज्ञानेश्वरकन्या-रूपानें अवतार घेऊन प्रमाणपुरःसर या ग्रंथांत प्रतिपादिली, व तत्प्रतिपादक आपल्या मार्गाला माधूर्यसंप्रदाय हें नांव दिलें. या माधूर्यसंप्रदायांत ‘‘सुरतरु’’ हा ग्रंथ तरुस्थानीं असून ‘‘प्रीतिनिर्तनादि’’ ग्रंथ फलस्थानीं आहेत, व फलस्थानीय माधूर्यप्रेमाची मनोरथपूर्ति या सुरतरूच्या साह्यानें होत असल्यामुळें याला ‘सुरतरु’ हें अन्वर्थक नांव दिल्या गेले.

या माधूर्यसंप्रदायाला ‘‘भागवतसंप्रदाय’’ हेंहि एक दुसरें नांव आहे किंवा भागवतसंप्रदायालाच श्रीमहाराजांनीं माधूर्यसंप्रदाय असें नांव दिलें आहे असें म्हटलें तरी चालेल; तरी पण ज्ञानपूर्व व ज्ञानोत्तर अशा दोन्ही भक्तींचा भागवतसंप्रदायांत समावेश होतो व ‘‘माधूर्यसंप्रदाय’’ हें नांव महाराजांनीं ज्ञानोत्तर भक्तीमार्गालाच दिलें आहे. ज्ञानपूर्व भक्तीचा सर्व स्वीकार करितात पण ज्ञानोत्तर भक्तिमार्गाचा कित्येक स्वीकार करीत नाहींत किंवा ती वगळल्या गेली आहे; म्हणून श्रीमहाराजांनीं भागवतसंप्रदायांतर्गत ज्ञानोत्तरभक्तींचें सोपपत्तिक विवेचन करून त्या मार्गाला हें नांव ठेविलें आहे.

पुनः ज्ञानोत्तरभक्तींत तीन निष्ठा आहेत, लालन, वात्सल्य व माधूर्य. लालनांत भगवंताचे ठिकाणीं मातृपितृभाव, वात्सल्यांत पुत्रभाव व माधूर्यांत पतिभाव असतो. त्या सर्वांत माधूर्यभाव उच्चतम असून त्याच प्रेमाचें श्रीमहाराजांच्या ग्रंथांतून प्राधान्येंकरून वर्णन असल्यामुळें, व या संप्रदायाचे अंतिम साध्य तेंच असल्यामुळें, या संप्रदायाला माधूर्यसंप्रदाय असें नांव ठेविलें आहे.

ज्ञानोत्तरभक्ति होऊं शकते किंवा नाहीं, तिचें स्वरूप कसें इत्यादि प्रश्नांचें विवेचन ‘सुरतरु’ व्यतिरिक्त ग्रंथांत प्राधान्यानें आलें आहे.





**‘सुरतरु’ हा ग्रंथ सांप्रदायिक असल्यामुळें, श्रीकृष्ण, श्रीज्ञानेश्वरमहाराज, शिव, उमा व गोपिका हें पंचायतन ज्यांचें इष्ट नांहीं त्यांनीं हा ग्रंथ अवलोकन करूं नये; असा शपथपूर्वक निर्बंध श्रीमहाराजांनी केला आहे.**

हा निर्बंध करण्याचें कारण, कोणी तो संप्रदाय प्रमाणपुरःसर खोडून काढील- ही भीती नसून श्रीमहाराजांच्या तर्कगाढतेस भुलून इतर संप्रदायिकांनीं स्वसंप्रदायाचे ठिकाणीं चंचल बुद्धि होऊं देऊं नये हें आहे.

या टीकाकारांना टीका करण्याकरितां त्यांचे इतर ग्रंथ मोकळे आहेत. वर भागवतसंप्रदायाचा उल्लेख आला आहे तेथें द्वैती भागवतांचा संप्रदाय विवक्षित नसून भागवतपुराणात प्रतिपादिलेला अद्वैत भागवतसंप्रदाय विवक्षित आहे. या माधूर्यसंप्रदायाच्या अधिष्ठात्री देवता गोपिका आहेत व शिवविष्णु समान उपास्य आहेत.

या ग्रंथांत गुरुस्वरूपविवेचन, गुरूची आवश्यकता, संप्रदायाची आवश्यकता, आगमांचे प्रामाण्य, नाममाहात्म्य इत्यादि बरेच विषय आले आहेत व आधुनिक आंग्लविद्याविभूषित लोकांकडून आपल्या धर्मावर, ज्ञानावर व भक्त्यादिकांवर जें आक्षेप केले जातात त्या सर्वांचें उत्तम रीतीनें निराकरण केलें आहे. या ग्रंथाचे ‘‘पूर्वविहार’’ व ‘‘उत्तर विहार’’ असे दोन भाग होणार होते, पण श्रीमहाराजांच्या बिमारीमुळें ‘‘पूर्वविहार’’ झाल्या नंतर ‘‘उत्तरविहारा’’चे एकदोन अध्याय होऊन पुढें ग्रंथलेखन बंद पडलें. ‘‘पूर्वविहारांतहि’’ एक आगमाध्याय व ‘‘उत्तरविहारांत’’ एकवीस-बावीस अध्याय कांहीं अंशानें अपुरे राहिले आहेत.

*- प्रकाशक.*

*श्रीनिवासशास्त्री हरिदास*

*नागपूर, इ.सन १९१३*

# द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना

*- वेदान्तकेसरी श्री बाबाजीमहाराज पण्डित*

तैसा श्रीगुरु प्रसन्न होय । शिष्य विद्याहि कीर लाहे ।
परी ते फळे । सांप्रदाये उपासलिया ॥६६॥ ज्ञाने.अ.१८

मागे योजनापत्रकात प्रसिद्ध केल्याप्रमाणे श्रीगुलाबरावमहाराजकृत ग्रंथांच्या मुद्रणाचे काम हाती घेवून त्यापैकी ''सुरतरु'' हा ग्रंथ प्रथम आम्ही छापून वेदान्तप्रेमी जनांना सादर करीत आहो. या संपूर्ण ग्रंथाचे दोन भाग होतील, त्यापैकी हा पहिला भाग आहे. या ग्रंथाचे पूर्ण नांव संप्रदायसुरतरु असून त्यात माधूर्यसंप्रदायाचे ध्येय व त्याचे साधन यांचा विशेष उहापोह केलेला आहे.

माधूर्य संप्रदाय हा काही नवीन नसून भागवत संप्रदायांत देवाचे ठिकाणी आईबाप, पुत्र, पति असे एक नाते वागवून जी भक्ति केली जाते त्यापैकी पतिनाते ठेवून केल्या जाणाऱ्या भक्तीचा व तिच्या साधनमार्गांचा महाराजांच्या ग्रंथांतून विशेष विचार केला असल्यामुळे या भक्तीच्या विचारप्राधान्यास धरून श्रीमहाराजांनी जुन्या भागवत संप्रदायासच माधूर्यसंप्रदाय असे नामान्तर दिले आहे, म्हणून माधूर्यसंप्रदाय हे एक नवीनच बंड आहे असे कोणी समजूं नये.

''या संप्रदायात भगवान् शंकराचार्यांचे अद्वैतज्ञान मान्य असून ते ज्ञान प्राप्त झाल्यावर सगुण भगवन्ताची भक्ति केली पाहिजे'' इतकेच ग्रंथकर्त्यांचे म्हणणे आहे व ते आपले मत श्रुति-पुराण-इतिहासादि वचनाने व युक्तीने सिद्ध केले आहे. हा माधूर्य संप्रदाय म्हणजे भागवत संप्रदायच असल्यामुळे या ग्रंथातून भागवत धर्माचे स्वरूप उत्तम रीतीने स्पष्ट केले असून 'तो सर्व मनुष्यमात्रास कसा हितकर आहे' हे सुंदर रीतीने सप्रमाण दाखविले आहे.

अलिकडे 'संपदाय' शब्द फार तिरस्करणीय होत जात आहे. 'सांप्रदायिक दृष्टि म्हणजे कोणती तरी आग्रहमूलक समजूत होय व म्हणून ती त्याज्य होय' असे कित्येक म्हणतात; परंतु आपल्या बुद्धीची फाजील घमेंड बाळगणाऱ्यांचेच हे म्हणणे आहे. वास्तविक पाहतां बुद्धीला नेहमी श्रद्धेचाच आधार असल्यामुळे, कोणत्या ना कोणत्या पूर्व समजुतीलाच बुद्धि केव्हांही बळी पडते, म्हणून



सांप्रदायिक दृष्टि त्याज्य म्हणणाऱ्याच्या बोलण्यात कांहीच हांशील नसतो, हे जरा निर्विकार चित्ताने विचार केल्यास कळून येते.

कोणतेही साध्य प्राप्त करून घेण्यात दोन भाग असतात. *एक त्याचे यथार्थ ज्ञान व *दुसरे ते साध्य हस्तगत करून घेण्याचे साधन. साध्याच्या स्वरूपाचे ज्ञान उघड ठेवले असते पण त्याच्या प्राप्तीचे साधन मात्र कधी कोणी उघड करून ठेवीत नाहीत. व्यापारात, कलेंत, व्यवहारात, राजकारणात, ज्याप्रमाणे गुप्त भाग असतो, त्याप्रमाणेच - ''परमार्थातील अद्वैत ज्ञान हें जरी उघड करून ठेविले असले तरी ते हस्तगत म्हणजे अनुभवण्याचा साधनमार्ग गुप्तच असतो. तो तज्ज्ञावाचून प्राप्त होत नाही व अधिकाऱ्यावांचून मिळत नाही. योग्य अधिकाऱ्याची व तज्ज्ञाची गांठ पडली असतां सांगितलेल्या साधनाने अधिकाऱ्याला अनुभव येऊन तो कृतार्थ होण्याकरितां तज्ज्ञ म्हणजे गुरु जी पथ्य म्हणून मर्यादा घालून देत असतात, त्या मर्यादाच त्या साधनमार्गासह संप्रदाय या नांवाने संबोधिल्या जातात.''

अलिकडे ''भक्ति हें ज्ञानाचे साधन असल्यामुळे, ज्ञानानंतर भक्तीची अपेक्षा नाही व ज्ञानानें सगुणनामरूपांचा बाध होत असल्यामुळे, ज्ञानानंतर भक्ति करण्याकरिता सगुण कांही राहणे शक्य नाही, म्हणून ज्ञानानंतर भक्ति संभवत नाही असे बहुतेक वेदान्ती समजतात. तो त्यांचा गैरसमज दूर करून श्रुतिपुराणादिकातील वचने, संतांची उदाहरणे व युक्ति यांच्या आधारे श्रीमहाराजांनी आपल्या ग्रंथांतून ज्ञानोत्तर भक्तीचे व सगुण भगवंताच्या अविनाशित्वाचे मंडन केले आहे. ह्यामुळे निराग्रह वृत्तीच्या माणसांना खरोखरच आश्चर्यचकित करून सोडण्याजोगे ते आहेत असे वाटल्यावाचून राहणार नाही.

.......................................................................................

*(श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी,*
*श्रीज्ञानेश्वरमधुराद्वैत संप्रदायाचे द्वितीय आचार्य*
*(शके १८५५, इसवी सन १९३३ / आवृत्ति दुसरी / प्रकाशन पुणे))*

ग्रंथवाचनाच्या आरंभी

श्रीमहाराजांनी महाराजांचे ग्रंथ वाचन करताना आरंभी उपास्य-पंचकाला व शिष्य-पंचकाला नमन करण्याचा अनिवार्य नियम घालून दिला आहे. इतकेच नव्हे तर नियम न पाळल्यास संप्रदाय-बहिर्भूत होण्याचा शापही दिला आहे.

*नियम व शाप*

इदं षटकं सदा गेयं मत्कुमारैर्मयापि हि । एतं नियममुत्सृज्य ये पठन्ति कृतिं मम ॥७॥
ते संप्रदायविद्वेषात् सत्यं भ्रश्यन्ति मार्गतः । ये पुनः षट्कमेतत्तु स्मृत्वा स्मृत्वा पठंति वै ।
ते त्वैहिकं सुखं भुक्त्वा पारमैश्वर्यमाप्नुयुः ॥८॥ (संप्रदायसुरतरु अ१)

# मंगलाचरण

नमः श्री आदिनाथाय नमो मत्स्येन्द्ररूपिणे ।
गोरक्षप्रभवे गैनीनाथायाथ निवृत्तये ॥१॥
परं ब्रह्म परं धाम सच्चिदानंदविग्रहम् ।
ज्ञानेश्वरमितिख्यातं प्रणमामि गुरुं हरिम् ॥२॥
ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः।
सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥३॥
यद्वस्तुतरस्सच्चिदकापकारी भक्त्यर्थमेवावयवीव भूतम् ।
ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे बिभ्राजते तन्मुनयोर्विशन्ति ॥४॥
कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्षस्थले कौस्तुभम् ।
नासाग्रे नवमौक्तिकं करतले वेणुः करे कंकणम् ।
सर्वांगे हरिचंदनं सुललितं कंठे च मुक्तावलिः।
गोपस्त्रीपरिवेष्टितो विजयते गोपालचूडामणिः॥५॥
वंदे नंदव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः।
यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ॥६॥
श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य, उमा माता, शिवः पिता ।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥७॥
पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।
नमस्कृत्वा च याचेऽहं ज्ञानेश्वरसुतानुतिम् ॥८॥
॥ ऱ्हीं नारायणाय नमः ऱ्हीं ॥ ऱ्हीं हरये नमः ऱ्हीं ॥ ऱ्हीं दत्तात्रेयाय नमः ऱ्हीं
॥ ॥ ऱ्हीं व्यंकटेशाय नमः ऱ्हीं ॥ ऱ्हीं लक्ष्मणाय नमः ऱ्हीं ॥
वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिम् ।
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥९॥
नमो अन्येभ्यो लक्ष्मीनायककृष्णपर्यायादि पालकेभ्यः
नमः श्रीसच्चिदानन्दमात्रैक तनुधारिणे
श्रीपांडुरंगनाथाय नतः क्षेमकराय च ॥
संसारांबुधिनिमग्नानां लीलयोद्धारणाय वै ।
स्फुटीकृतं भक्तितत्त्वं भक्तेश्चालंबनं तथा ॥१०॥
गुरुभक्तिस्वरूपाय विशुद्धं ज्ञानमूर्तये ।
भक्तिमार्गप्रदीपाय स्कंददासाय ते नमः ॥११॥

०००

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# संप्रदाय सुरतरु

प्रथम नाम ''मधुराद्वैतस्यमन्तक' । आगमरहस्यपर्याप्ति'' दुसरें सुरेख ।
''उपास्तिसुधाकर'' तिसरे सम्यक । ''संप्रदाय सुरतरु'' चवथें ॥११३॥ अ.१

(सूक्तिरत्नावली यष्टी ११ वी : पूर्व-विहार अध्याय १ ते १२)

## ॥ अध्याय १ ला : मंगलाचरण ॥

श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता ॥
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥१॥
पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ॥
संप्रदायसुरतरुं वक्ष्ये ग्रंथमनुत्तमम् ॥२॥

कबित्त :- गुरुनामसुधारस बाणि पिंबै
तब माल गलासु रहै न रहै ।
जननी सब कामिनि को समुझें
तब काज न नेम बहै न बहै ।
पिय[१] की हिय[२] में सच चोट लगी
तब पौन[३] उमंग गहै न गहै ।
मन ग्यानसुरेशकृपाबलतें मिलि है
अपवर्ग चहै न चहै ॥१॥
निज तारन कारन शंभु कृपा निरखी[४]
जल गांग भगीरथ तोखे ।
मिथिला नगरीमह राजसुता हिय
मोद भयो यदुवल्लभ लेखे ।
जिमि भीमकजा हियमें हरखी[५]
गिरिनंदिनिमंदिर गोविंद पेखे[६] ।
तिमि[७] मानस आज प्रसन्न भयो सखि
ज्ञानसुरेशपदांबुज देखे ॥२॥



काहूंके भावे[८] मन आतम[९]को ग्यान अति
काहूंके भावे मन जोग हठराज है ।
काहूंके कर्मनकी आस, नित चित्त लगी
काहूंके मनमाहीं पंडितसमाज है ।
काहूं मन साज बाज काहूं मन लाज काज
काहूंके मानस में सुंदर सुखराज है।
मैं[१०] गरीब हूं अनाथ जोरि कहूं दोय हात
ज्ञानदेव दीनानाथ मेरे शिरताज[११] है ।
(१०) मैं तो छांडे सब काम भई पायकी गुलाम ।
उर मेरे आठो याम स्वामी अलंदीराज है.)
भूमि केली पुण्य धाम सोडोनिया सर्वकाम
गावोनिया रामनाम ब्रह्मसुख धाले हो ।
संतसंग [१२] रंगदंग वाजति विणे मृदंग [(१२) संघ.]
प्रेमभरे निरदांग[१३] पायरीये आले हो ॥ (य११पू.१)
छांडि सब लाज काज राजसाज चालो आज
देखिवेको कैसे सखि नयन ललचाये[१४] है ।
कोऊ ठाडे छतर धारे कोऊ बापे व्यजन वारे
पालखीमें पैठ मेरे ज्ञानराज आये है ।
कमलिनी लजाय[१५] रही कनकश्री[१६] जाय रही
रसा[१७] हरखाय रही रसिली[१८] मिलाई है ।
पानीके प्रवालकी[१९] अरु[२०] मनिमे के लालकी
अरु कामिनी के गालकी सब सोभा भी भुलाई है ।
बिजूरी[२१] के सारीसे[२२] कि सूरज[२३] धुरधारीसे
करिके सवारि[२४] छबि[२५] सारि हरी लाई है ।
क्या राधिका तिलक झाकी? नाहीं नाहीं सुनरी सखि
मेरे ज्ञानराय के पायकी ललाई [२६] है ॥

ओवी

जय जय श्रीसद्गुरु । तूं भवदवतप्ता[२७] हिमकरू[२८] ।
नातरी कुसुमाकरू[२९] । उपाव वनीं[३०] ॥१॥
तूं कैवल्याचा जिव्हाळा । तूं ऐश्वर्याचा उमाळा ।
तूं अक्षय माऊली प्रेमळा । सुखदात्री ॥२॥
वेगळी करोनी त्रिपुटी । तूं द्दष्टा-द्दश्या पाठीपोटी ।
तुझी ऐकता अवचित गोष्टी । शिष्य उठाउठी त्वद्रूप ॥३॥
अध्यारोप प्रदर्शनीं । तूं सावित्रीपति कैवल्यदानी ।
प्रतिपळ शिष्यसंरक्षणीं । नारायण तूं ॥४॥
तुझेनी आज्ञावचनें । भव ये गंधर्वनगररचनें ।
येणें अनुभवप्रमाणें । महेश्वर तूं ॥५॥
हें आमुचिया द्दष्टिपुढें । झाले तरी तुज नव्हे फुडे ।
यालागीं रोकडें । परब्रह्म तूं ॥६॥
शब्दाचा पाउठा जेव्हडा । तूं कदा न येसी तया पुढा ।
म्हणोनी मौनेचि होवोनी भराडा । नमावे तूतें ॥६॥
परी लेकुराच्या आक्रोशीं । काय साहवेल मातेसी ।
आम्हा हेतु आळंदीसी । म्हणोनी ठाणे ॥८॥
की मी एक आंधळी दीना । सोळा सहस्त्र आणिकांगना ।
त्या मज झिडकारिती चरणा । सेवा समयीं ॥९॥
म्हणोनी तोहि वेश सांडोनी । इये कलियुगीं नवल करूनी ।
मज एकटीचेचि पाणि- । ग्रहण कराया  प्रगटला ॥१०॥
समाधिचेनि मिषें । मखरविवर आपैसे ।
करोनी मन उल्लसे । तेचि करिशी ॥११॥
अवघा रास एकवटला । तो हा सोहळा उमटला ।
आयिताचि काजा आला । मज एकटीच्या ॥१२॥
स्वशिष्येच्या आलिंगनीं । मिसळलिया वर्जील कोणी ।
यास्तव आविर्भाव संन्यास सदनीं । ही अविधि करणी मजसाठीं ॥१३॥
(य११पू.२) एवं नाना पुरविले कोडे । आतां पुरवावे एवढें ।



जें तुमचें प्रेम पुढें । चालतचि राहे ॥१४॥
श्रद्धा शास्त्राचिया आदरें । वस्तु लाभे कीं संस्कारें ।
विश्व सुखावे येणें प्रकारें । ऐसे कीजे ॥१५॥
हे ''आगमरहस्यपर्याप्ति'' । ''संप्रदायसुरतरु'' स्थीति ।
आली म्हणोनी चित्तीं । वाढला हर्षू ॥१६॥
तो सफल सकळ फोंफावे । आणि कदाही नीरस नोहे ।
हे करणें आघवे । तुमचिया कृपा ॥१७॥

श्रीगणेशाचे वर्णन

कां विघ्न न यावे आह्मांप्रती । यालागीं स्वयें जाह्ला गणपती ।
प्रकाशोनी अवघी मती । निजस्तुती बोलवितसा ॥१८॥
वेद तेचि निर्दोष शरीर । स्मृति तेचि अवयव साचार ।
अर्थशोभा अति सुंदर । मानसहारी ॥१९॥
पुराणें मणीभूषणें सुंदर । तेथ प्रमेयरत्नें परिकर ।
पदबंध तो पीतांबर । वाणे सपूर साहित्य ॥२०॥
प्रणव सरळी अखंडा । तीचि शोभे गजशुंडा ।
देसी अभय उदंडा । निजभक्तातें ॥२१॥
एवं निर्विघ्न करावया निज जन । स्वामी श्रीगुरु गजानन ।
तरी बाळकाची चिंता गहन । माऊलीते जैसी ॥२२॥
ऐसे वाटे जननी पोटीं । कीं कडियेविण बाळा पायपिटी ।
तेंवि शिष्यचिंता वाहसी पोटीं । विघ्न द्दष्टिं हरूनी ॥२३॥
शिष्य काव्य करितां झणी । अहंकार उपजेल मनीं ।
यास्तव होऊनी वाणी । सरररस्वतीपणीं विलससी ॥२४॥
आधीं होवोनिया परा । दाखविशी निजात्मथारा ।
मग प्रकटसी परोपकारा । वैखरी होऊनी ॥२५॥
कां शिष्य बोधाचिया पथीं रिघे । मग वाचाऋण फेडणें लागे ।
ते वाचाचि होतां आंगें । तरी ऋण प्रसंगे मग कवणा ॥२६॥
जो तूंतें शरण आला । तो नव्हे कवणाचा पांगिला ।

वागुण फेडावया धावला । तंव वाचा तूंचि ॥२७॥
यास्तव अंबे श्रीमंते । आळंदीवल्लभे कृपावंते ।
माझिये जिव्हाग्रीं बैसोनी येथें । सुफल ग्रंथातें बोलवी ॥२८॥
जो द्विदळीं होय व्यष्टी । जो आळंदी होय समष्टि ।
कां जेथ व्यष्टिसमष्टि । दोन्ही मिथ्या ॥२९॥
एरवी ही वास्तवी लीला । जो दोन्ही ठायीं एक जाहला ।
जो मागां येथवरी वंदिला । तो श्रीगुरु वहिला पुढेंही वंदू ॥३०॥
तूं एक जाहलीया अपरोक्ष । आणिक आरोप परोक्ष ।
सकळ देवता साक्ष । येणेंचि होती ॥३१॥
म्हणोनी तूंतेचि एका स्मरे । तैंचि आघवे कोड पुरे ।
येरवंदन द्वेषू हरे । त्वदाधारें जालिया ॥३२॥ (य११पू.३)
तुझिया विभूति अनंत । तें सप्रेमे वंदिले संत ।
जे मूर्तिमंत भगवंत । जगदुपकारा जाहले ॥३६॥
पाप निवर्ती मंदाकिनी । ताप जाये चंद्रकिरणीं ।
सुरद्रुमे दैन्यहानी । हरिती तीन्हि साधुसंगें ॥३४॥
मुख्य देव ते संत । प्रतिमा त्या निमित्त ।
श्रीतुकाराम समर्थ । बोलिले ऐसे ॥३५॥
देव भजलिया भजती । तीर्थे सेवका पवित्र करिती ।
सज्जन दर्शनेंचि तारिती । महाख्याति तिहीं लोकीं ॥३६॥
जयाचेनि भेणें । षडरिते मित्र होणें ।
कामें बळेचि ईश्वर भजणें । क्रोधें दमणें इंद्रिया ॥३७॥
लोभें धरणें माधवपाय । हृदयचि होय उपेय ।
तराया नाहीं आन उपाय । सत्संगाविण तिहीं लोकीं ॥३८॥
सत्संगे नाहीं वरिष्ठ जाहला । ऐसा कवण आयिकिला ।
सत्संगेंचि श्रीविठ्ठला । वैकुंठ सोडोनी महीं वासू ॥३९॥
संतचरणाचिया स्मृती । मी नीचही परी संतपंक्ती ।
बैसावया संप्रती । जाहलो योग्य ॥४०॥



नमन

सकळसंतशिरोमणी । आळंदीवल्लभ कैवल्यदानी ।
एक नमस्कार तिया चरणीं । करिता त्रिभुवनीं नमिले संत ॥४१॥
आतां नमो कवीश्वर । जे श्रोतृपालनी शार्ङ्गधर ।
जयांच्या वचनमात्रें तीव्र । लाहे अंतरसंवेगू ॥४२॥
शिव ब्रह्मा सनकादिक । महात्मे वंदिले सकळिक ।
जयांच्या यशें तिन्हीं लोक । त्रिविधदुःख नेणती ॥४३॥
सकळ भक्तीची सांठवण । तो नारद नमो ब्रह्मनंदन ।
जयापासोनी आघवे ज्ञान । तो वसिष्ठ कृपाघन वंदिला ॥४४॥
जयाचिया शब्दासाठीं । लोकीं विहरला जगजेठी ।
कीं जीवकल्पित ईश्वर शेवटीं । जेणें दृष्टिसृष्टि सिद्ध केली ॥४५॥
तो महाराज वाल्मिकमुनी । स्मरणेंचि आविर्भवोनी मनीं ।
वर्तवील याचकानुगुणीं । शिवदातिया ॥४६॥
ब्रह्मा चतुर्वदनाविण । जो दोन भुजांचा रमारमण ।
जो द्विनेत्र भगवान । कैलासपती ॥४८॥
जो विद्याभूमिवेदा । करी चतुःसमुद्रमर्यादा ।
पुराणें अष्टादशधा । केली जेणें ॥४९॥
एकलाचि चारी समुद्र । मंथोनी निर्मी ब्रह्मसूत्र ।
जेथें महाचार्य पात्र । भरोनी घेती ॥५०॥
मग समाधीचे सुख । तें व्यक्त केलें सकळिक ।
भागवत वेद सुरेख । युगपत् तिन्ही लोक तारावया ।॥५१॥
तो महाराज स्मृतिसरिसा । हृदयीं राहो आपैसा ।
व्यास नमनेंचि विषयहव्यासा । निरसो माझ्या ॥५२॥
आतां सकळ भागवतशिरोमणी । जेणें ब्रह्मशाप अन्यथा करोनी ।
जिता मुक्ती पंडुनंदनीं । ठेविली तो शुकमुनी नमो ॥५३॥ (य११पू.४)
आणिक ऋषीश्वर अनंत । तया समस्ता दंडवत ।
गौडपादाचार्य भगवंत । प्रेमें नमिले ॥५४॥
गोविंदपूज्यपाद मुनी । साष्टांग दंडवत त्यांचें चरणीं ।

आतां नमूं शूलपाणि । जो अद्वैत दर्शनीं प्रगटला ॥५५॥
मारोनी महावादी मतंग[३१] । धर्मप्रऱ्हाद रक्षी अव्यंग । (३१.मांग)
जो नरकेसरी निजांग । जगद्गुरु ॥५६॥
तया श्रीभगवत्पूज्यपादचरणा । शतकोटी करोनी नमना ।
हस्तामलक सुरेश्वर सनंदना । आणि चित्सुखादि मुनिगणा नमियेले ॥५७॥
भागवतसूत्राचे भाष्य । जेणें रचिले अनायास ।
नृसिंह अवतार श्रीनिवास । श्रीधराचार्य नमियेले ॥५८॥
राधाकृष्णरासलीला । जो जिव्हाग्रीं घेवोनी प्रगटला ।
जेणें गीतगोविंदग्रंथ निर्मिला । तो वंदिला श्रीजयदेव ॥५९॥
जयाचि वाचिता कथा । चमत्कारें बोध चित्ता ।
तया गुणाढ्या[३२] भगवंता । नमिले भावें ॥६०॥ (३२मोठे कवी)
वाणी अवतार बाण । प्रेमभावें तया नमन ।
कालिदास सर्वज्ञ पूर्ण । सद्भावें करून वंदिला ॥६१॥
वेदोपनिषदोदधी मंथुनी । सर्व शास्त्रा आकळोनी ।
जेणें सुलभ मार्ग केला जनीं । ते विद्यारण्यमुनी नमिले भावें ॥६२॥
जयांच्या विद्ये पुढें ब्रह्मकुमरी । तुकावी मान सर्वापरी ।
जिहीं भक्तिरसायनें पवित्र धरित्री । केली ते वंदू मधुसूदन ॥६३॥
शिवभक्तिध्वज उभारिला जिहीं । मम मस्तक त्या दीक्षितपायीं ।
जिही बोलविली मंदाकिनी आई । जगन्नाथ तेही नमिले ॥६४॥
आतां भाषाकवि विशेष । जिही वर्णिले भगवद्यश ।
ते श्री भगवान् तुलसीदास । वंदिले भावें ॥६५॥
वाल्मिकीमुनिवरी वर्णिला राम । परी तेथे प्रकाशिला धर्म ।
नाहीं वर्णिला सप्रेम । भक्तिमार्ग ॥६६॥
तेचि न्यूनत्व फेडावया । तुलसीदास होवोनिया ।
जनांची निरसावया माया । श्रीरघुराया वर्णियेलें ॥६७॥
सुरदास वल्लभमतीं । परी श्रीकृष्णचरणीं अत्यंत प्रीति ।
मज सर्वस्वें पूज्य असती । नमन निश्चिती तच्चरणा ॥६८॥
वंगदेशीं विद्यापती । तैलंगदेशीं वेमन्नामूर्ती ।



मीराबाई क्षत्रिय जाती । या सर्व कवीश्वरांप्रती नमस्कारू ॥६९॥
आतां महाराष्ट्र आदिकवि । जिहीं धन्य केली ऊर्वी ।
विवेकोदधी निर्मोनी बरवी । तारिली जनता ॥६९॥
ते श्रीमुकुंदराज । मिया वर्णिले महाराज ।
आणि वेदचि मराठा प्रगटला सहज ।
ते नमिले निवृत्ति-ज्ञानराज-सोपान-मुक्ता ॥७०॥ (य११पू.५)
कीं युद्धी सांगितली गीता । ते अनवरत राहिली पार्थचित्ता ।
तैसे न हो अधिकारिया समस्ता । म्हणोनी गोचरता आळंदीये ॥७१॥
कां मागील पुढील पदरा । ग्रंथे पाळीत कविसूत्रा ।
तया वल्लभा गुरुवरा । आळंदीश्वरा नमियेले ॥७२॥
चांगदेव विसोबा खेचर । नामदेव जनाबाई राका-बंकाकुंभार ।
गोरा आदि महंत समग्र । नमिले भावें ॥७३॥
पार्थोपदेशु स्पष्ट केला । परी उद्धवोपदेश होता राहिला ।
तो उघडावया वाटे प्रगटला । स्वामीचि माझा मागुती ॥७४॥
सर्वांचि जेथेचि प्रतिष्ठा । परी जया नाहीं प्रतिष्ठा ।
म्हणोनी प्रतिष्ठान शब्दनिष्ठा । पावले जे ॥७५॥
तेथ परब्रह्म प्रगट । एकनाथ शांतिनिष्ठ ।
जयाचे भागवत स्पष्ट । वाचिता अचाट पतित तारी ॥७६॥
दत्तात्रेय महामुनी । तेही नमिले सद्भावें करोनी ।
जनार्दन कैवल्यदानी । नमिले भावें ॥७७॥
आठवितां श्रीएकनाथा । स्मृति आली माझिया चित्ता ।
तें क्षमा कीजे समर्था । कीं स्खलनशील जीव आम्हीं ॥७८॥
श्रीदत्तात्रेयचि एकनाथ । जिहीं उभारोनी भागवत ।
आघवीया जना मोक्षपंथ । सोपाचि केला ॥७९॥
निंबराज शिवदिनकेसरी-। प्रभृति कवीस मी नमस्कारी ।
पुढती नमो हनुमदवतारी । रामदास समर्थ ॥८०॥
कल्याण वेणू आका दिनकर-। प्रभृति नमिले कवीश्वर ।
नमिले स्वामी श्रीधर । हरिविजय ग्रंथकार जे ॥८१॥

जेणें परब्रह्म उभें केलें । तें पुंडलिकवर नमिले ।
जे तेणेंचि भावे आठविले । वंदिले प्रऱ्हाद रुक्मांगद बिभिषणादि ॥८२॥
तिहीं कांडीं हालविता । मोक्षसेतू डळमळिला होता ।
तो अभंग केला सर्वथा । तया तुकारामसमर्था वंदिले म्यां ॥८३॥
नाभादास प्रियादास । संतचरित्रें गाती विशेष ।
सप्रेमें वंदिले तयास । वंदिता उल्हास वर्णनीं ॥८४॥
सच्चरित्रवर्णन आवडी पोटीं । ते महिपतीराय एक सृष्टीं ।
मिया दंडवत चरणांगुष्ठीं । घातले त्यांच्या ॥८५॥
निळोबा आणि मयूरपंत । बाळाबोवाज्ञानेश्वरी कृपावंत ।
वंदोनी वंदिले समर्थ । वासुदेवानंदादि विद्यमानकवि ॥८६॥
आणिक होतील जे जे पुढें । तयांच्याही चरणीं नमन रोकडें ।
माझे मी वाहीं उपचारबोल बोबडे । ते स्वीकारोत फुडे समस्त ॥८७॥
आतां संप्रदाय चूडामणी । श्रीआदिनाथ पिनाकपाणी ।
शतकोटी नमन तयांचे चरणीं । नमिली जननी उमा माता ॥८८॥
तैं आदिनारायण मत्स्योदरीं । ज्ञान ऐके लीलाधारीं । (य११पू.६)
मग प्रगटले विश्वोपकारीं । ते श्रीमत्स्येन्द्रनाथ नमिले ॥८९॥
श्रीगोरक्ष स्मरणगामी । नमुनी बैसविले हृदयधामीं ।
अद्वयानंद गैनी-। नाथ प्रेमें वंदिले मिया ॥९०॥
त्र्यंबकराज श्रीनिवृत्ति । सदा नमी चरणाप्रती ।
जिहीं चतुराक्षरी दिधला मजप्रती । ते आळंदीपती अखंड नमू ॥९१॥
सोपानकाका मुक्ताबाई । लोटांगणें यांचें पायीं ।
आतां विठ्ठल रुखमाबई । सकल कल्याण वंदिले ॥९२॥
नमो राधागोविंद । जे परब्रह्म सच्चिदानंद ।
जयांची भक्ति अभेद । स्वानंदें ग्रंथ दाविला हा ॥९३॥
नमो सकळ व्रजबाळा । नमो भामा आदि वेल्हाळा ।
नमो विष्णुपार्षदा सकळा । शिवगणा प्रेमळा समस्ता नमो ॥९४॥
माझे अनंत अपराध । उपसहाजी महाराज सिद्ध ।
विद्यमान आणि भावी प्रबुद्ध । वंदिले मिया ॥९५॥

सद्भावें नमिली अलोकाजननी । गोंदुजी पिता नमन तच्चरणीं ।
पुढती नमो कैवल्यदानी । आळंदी वल्लभकृपाळू ॥९६॥
आणिक भूतें समस्त । आघवेचि भगवंत ।
मानोनिया दंडवत । सप्रेमें घातला तयाते ॥९७॥
.....
तेथ मीही एक तैसा । यास्तव कृपावंत होवोनी स्वांशा ।
अचलस्फूर्ति विशेषा । भूषावे सकळीं ॥९८॥
येणें मंगलाचरणें आधि । शिष्याची गेलिया म्हणे वादी ।
मंगलाचरणप्रसिद्धि । कासया वृथा ॥९९॥
तंव म्हणे सिद्धान्ती । ''समाप्तिकामो मंगलमाचरेत्'' ही श्रुती ।
शाखाउच्छेद झाली तथापि मानिती । शिष्टाचारानुमेयत्वें ॥१००॥

मंगलाचरणाचें प्रयोजन

गद्यः- प्राचीन न्यायमतांत विघ्नांचा ध्वंस[३३] होऊन ग्रंथाची समाप्ति होणें हें मंगलाचें प्रयोजन मानले आहे. ग्रंथसमाप्तीला प्रतिबंधक जीं पापें तींच विघ्नें होत. त्यांचा ध्वंस होऊन ग्रंथाची समाप्ति होणें मंगलाचें फल होय असें प्राचीन न्यायमतांत मानले आहे. तत्त्वचिंतामणिकार गंगेशोपाध्यायादिक नवीन नैय्यायिक विघ्नध्वंसच मंगलाचरणाचें फल मानतात. ग्रंथांची समाप्ति तर कर्त्याच्या कविताशक्तीवर व विद्वत्ता आदिवर अवलंबून आहे म्हणून मंगलाचरण ग्रंथसमाप्तीला अन्यथासिद्ध[३४] आहे आणि विघ्नध्वंसद्वारा ग्रंथसमाप्ती मंगलाचें फल मानण्यांत गौरव दोषही आहे. (य११पू.७)

(३३.नाश/३४.परंपरा अकारण/ ३५.असेल त्याहून अधिधक मोठा समजणे)

वादी उवाचः- ''**सर्वे विघ्नाःशमं यान्ति गणेशस्तुतिपाठतः**''

या वाक्यावरून गणपतिस्तोत्रपाठानें सर्व विघ्नांचा नाश होतो हें प्रसिद्ध आहे, तेव्हां अन्य कारणें उपलब्ध असतां मंगलाचरणाला विघ्ननाशक समजणें निरर्थक आहे. पुनः मंगलाचरण ज्ञानरूप किंवा शब्दरूप आहे म्हणूनच तें अनित्य आहे; कारण जीवाची बुद्धि व शब्द न्यायशास्त्रांत अनित्य गणले आहेत. तत्क्षणीं नाश पावणारे मंगलाचरण कालांतरी होणाऱ्या विघ्नध्वंसास[३६] किंवा ग्रंथसमाप्तीस हेतु[३७] होणार नाहीं. (३६. विघ्नाशास / ३७.कारण)

सिद्धान्ती उवाच :- विघ्नध्वंस तर मंगलाचरणसमकालीनच[३८] उत्पन्न होतो, आणि ज्यांच्या मतांत विघ्नध्वंसद्वारा ग्रंथसमाप्ती मंगलाचे फल मानले आहे त्यांच्या मतात ते मंगलाचरणजन्य अदृष्टानेंच[३९] उत्पन्न होते. जसा यज्ञजन्य अदृष्टानें स्वर्ग मिळतो तद्वत् मंगलाचरणजन्य अदृष्टानें विघ्नध्वंसव्यापारद्वारा ग्रंथसमाप्तिफळ निष्पन्न होते.

आतां गणेशस्तुतिपाठ व प्रायश्चित हें जरी पापरूपविघ्नांचे नाशक आहेत तरी ग्रंथसमाप्ती प्रतिबंधकरूप पापाचें नाशक मंगलच आहे. गणेशस्तुतिपाठ व प्रायश्चित्त अन्य पापरूप विघ्नांचें नाशक आहेत. शिवाय गणेशस्तवन तर ग्रंथारंभीं केल्यास मंगलरूपच होतें, म्हणून त्याविषयीं तुझी शंकाच उत्तम नाहीं.

वादी उवाचः- मंगलाचरण विघ्नध्वंसाचें आणि ग्रंथसमाप्तीचें कारण आहे असें अन्वयव्यतिरेकानें[४०] सिद्ध होत नाहीं; कारण मंगलाचरण करूनही कादंबरी वगैरे ग्रंथ पूर्ण झाले नाहींत आणि मंगलाचरण न करूनही नास्तिकांच्या ग्रंथांची समाप्ति झाली आहे. पूर्वजन्माच्या केलेल्या मंगलानें नास्तिकांच्या ग्रंथाची समाप्ति झाली असें म्हणतां येत नाहीं, कारण नास्तिकमत मंगलाचे विरुद्ध आहे, आणि पूर्वजन्मीं मंगलाचरण ते आस्तिक ग्रंथाचे आरंभीं केले असले पाहिजे; कारण नास्तिकांचा मंगलावर विश्वास असणें शक्य नाहीं. पूर्वजन्मीं केलेल्या आस्तिक ग्रंथाची समाप्ति होऊन तेच मंगलाचरण या जन्मीं नास्तिकग्रंथाच्या समाप्तीला कारण म्हणता येणार नाहीं, कारण धर्म हा कधीं अधर्मसाधक होत नाहीं. मंगलाचरण धर्म्य आहे व नास्तिकता अधर्म्य आहे.

मध्यस्थ उवाचः- असुराचें तप जसें अधर्माला साधक होतें तसे मंगलाचरणरूप धर्मही अधर्मास कारणीभूत होतो असें म्हणण्यास कोणता प्रत्यवाय आहे? (य११पू.८)

वादी उवाचः- महान् प्रत्यवाय आहे. धर्म जर अधर्माचा साधक होईल तर सत्कर्मावर कोणाचा विश्वास राहणार नाही. असुरांचा धर्म अधर्मास साधक झाला नाहीं, तर धर्मानें मिळालेलें सुख व त्यामुळें वाढलेला काम अधर्मास साधक झाला आहे. तो असुरांच्या बुद्धीचा दोष आहे, पण मंगलाचरणरूप धर्म तर साक्षात् आहे, त्याला अधर्मसाधक म्हटल्यास महानर्थ होतो. शिवाय भगवन्नामानें दूर होत नाहीं असें कोणतेंहि जगांत पापच नसल्यामुळें, एक वेळ घेतलेल्या



नामानें अनंत जन्मांच्या विघ्नांचा ध्वंस[४१] होतो; आणि त्यामुळें अनेक ग्रंथारंभीं केलेलीं अनेक मंगलें निष्फळच होतात. पुनः ज्यांचें ठिकाणीं विघ्नांचा अत्यंताभाव आहे, त्यांनी केलेलीं मंगलेंहि निष्फळ आहेत. या सर्व कारणास्तव मंगलाला विघ्नध्वंसाची किंवा ग्रंथसमाप्तीची कारणता सिद्ध होत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- काव्यप्रकाशांत यश, धन, व्यवहारज्ञान, विघ्नांचा नाश, मुक्ति आणि गोड भाषेनें उपदेश हीं काव्याचीं प्रयोजनें प्रथम परिच्छेदाच्या दुसऱ्या कारिकेंत सांगितलीं आहेत. सकामी पुरुषाच्या कर्माची परमेश्वर प्रतीक्षा[४२] करीत असतो, असें त्रिपुरारहस्यांत सांगितलें आहे. या प्रयोजनांतील मंगलाचरण, मुक्ति आणि धर्मोपदेश हीं तीन प्रयोजनें सोडून बाकीचीं प्रयोजनें मनांत असल्यास ग्रंथकर्ता सकाम होतो. तेव्हां सकामांनीं केलेल्या भगवन्नामानें यद्यपि संचितरूप विघ्नांचा क्षय होतो, तथापि प्रारब्धरूप विघ्नांचा क्षय होत नाहीं. मुक्तिरूप प्रयोजन[४३] मनांत असल्यास मंगलाचें ज्ञानजनक-अदृष्ट[४४] उत्पन्न होतें, आणि अशुभनिवृत्तिच[४४अ] चित्तांत असल्यास जितकें मंगल केलें तितकाच ग्रंथ पूर्ण होतो; कारण भगवत्स्तुति शंभर श्लोकांचीच केली पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. कादंबर्यादिक ग्रंथ सकाम कोटींतच जातात. धर्मोपदेशाची कामना मनांत असल्यास तो ग्रंथ पूर्ण होण्यास तत्कालीन श्रोतृविघ्नध्वंसाचीहि अपेक्षा आहे. श्रोतृविघ्न प्रारब्धरूप असल्यास वक्तृकृत मंगलानें त्याचा ध्वंस होत नाहीं. श्रोतृविघ्नध्वंसाची ग्रंथसमाप्तीला अपेक्षा नसती तर आशिर्वादरूप मंगल निष्फल झालें असतें. कोणाच्या उपयोगीं न पडतां ग्रंथाची समाप्ती व्हावी हीच कामना ग्रंथकर्त्याच्या मनांत राहिल्यास, कर्मबलाबलानें मंगलाचें फल होतें. (य११पू.९) मंगलाचरणावांचून नास्तिकग्रंथ पूर्ण कसे झाले ही जी वादीची शंका तिचें समाधान सांगतों.

मंगल दोन प्रकारचें आहे. साक्षात् आणि शकुनरूप. पैकीं भगवंताची स्तुति व नामस्मरण साक्षात् मंगलरूप आहे. याविषयीं स्मृतिहि प्रमाण आहे.

**''तदेव लग्नं सुदिनं तदेब ताराबलं चंद्रबलं तदेव ।**
**विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंघ्रियुगं स्मरामि''**

भावार्थ - हरिविजयाच्या १८ व्या अध्यायांतील आरंभीच्या ओव्यांनी सांगतों.–

**''करितां श्रीहरिस्मरण । नाना विघ्नें पळती उठोन ।**

**कोटी मुहूर्ताहूनि विशेष पूर्ण । कृष्णचिंतन जाणावें ॥१॥**
**उदंड मुहूर्त साधिले । आणि कृष्णस्मरण नाहीं केलें ।**
**तरी तितुकेहि कुमुहूर्त झाले । विघ्नें सबळ धांवती ॥२॥**
**षष्ठी नवमी भद्रा व्यतिपात । वैधृति कल्याणी कुयोग समस्त ।**
**इतुकियासही मंगल करीत । नाम हरीचें निर्धारें ॥३॥**
**तेंचि सुलग्न सुदीन । तारा शशि दैव बळपूर्ण ।**
**जो इंदिरापतीचे चरण । प्रेमें करोनी आठवी ॥४॥''**

याच आशयानें ग्रंथापेक्षां स्तोत्रें अधिक पूर्ण असतात, व स्तोत्रापेक्षां अभंग पदें अधिक पूर्ण असतात; म्हणूनच महात्म्यानीं भजन सर्वापेक्षां श्रेष्ठ सांगितलें आहे.

जे वाक्य स्तुतिभजनाप्रमाणें स्वतः पूर्ण असतें, तें भगवत्स्तुतिरूप असल्यामुळें साक्षात् मंगलरूपच असतें. अशा मंगलानें दुरितध्वंस[४५] होतो.

दुसरें शकुनरूप मंगल. जसें प्रयाणसमयीं उजवीकडे तीन कावळ्यांचें गमन, विप्राचें दर्शन, दह्याचें दर्शन. या मंगलानें शकुन देवतानुग्रहास्तव किंचित् विघ्ननाश होतो.

उच्चारणमात्रेंकरून जीं मंगलें आहेत त्यांचही फल असेंच होतें, व तें शकुनसामर्थ्य असल्यामुळें सुष्ट-दुष्टांना प्रबल विघ्न नसल्यास समानफलदायक आहे. असें शकुनरूप मंगल दैवानें नास्तिक ग्रंथारंभीं होणें संभवनीय आहे.

अथवा नास्तिक चार प्रकारचे आहेत. वेद, परलोक, धर्म, ईश्वर न मानणारे चार्वाकादिक पहिले. यांच्या ग्रंथांत कांहीं निरूप्यच[४६] नसल्यामुळें प्रत्येक वाक्य पूर्णाप्रमाणेंच आहे, म्हणून त्यांना मंगलाची अपेक्षा नाहीं.

दुसरे नास्तिक, धर्म व परलोक मानून वेद व ईश्वर न मानणारे सौगतादिक[४७] यांचे ग्रंथ त्यांच्या त्यांच्या विप्रलिप्सार्थ[४८] अवतारधारी पुरुषांच्या सामर्थ्यानें पूर्ण झाले आहेत; आणि त्यांचे ग्रंथारंभीं नमस्काररूप मंगलेहि आहेत. (य११पू.१०)

तिसरे नास्तिक, धर्म व वेद सत्य आहेत पण ईश्वर आणि मोक्ष नाहीं असें मानणारे. हे पूर्व मीमांसक होत. यांच्या ग्रंथारंभींही मंगल प्रसिद्ध आहे.

चवथे नास्तिक वेद, धर्म व मोक्ष मानणारे असून ईश्वर मानीत नाहींत.



हे निरीश्वर सांख्य होत; परंतु मंगल करावें असें यांच्या कपिल सूत्रांत स्पष्ट आहे. जसें,

**''मंगलाचरणं शिष्टाचारात् फलदर्शनात् श्रुतितश्चेति'' ॥२॥**

भावार्थः- श्रुति आहे म्हणून शिष्टाचार[४९] आहे व फल प्रत्यक्ष दिसतें म्हणून ग्रंथारंभीं मंगल युक्त आहे. आणि ईश्वरवादीकृत सर्व ग्रंथांत मंगल आहेच. चार्वाक ग्रंथ देखील बृहस्पतीच्या सामर्थ्यानें पूर्ण झाला आहे असें म्हणतां येईल; किंवा सकल आस्तिक नास्तिक आगमांचा कर्ता सूतसंहितेंत शंकर वर्णिला आहे, म्हणून त्याचे इच्छेनेंच ते ग्रंथ पूर्ण झाले असें म्हणतां येतें; किंवा भगवद्गुण संपूर्ण कधींच वर्णन करितां येत नाहींत, म्हणून थोडेसें वर्णन केलें तरी सर्व सार्थक होते; आणि नास्तिक ग्रंथ निरंकुश[५०] निरंग[५१] असून त्यांत निरूप्य नाहीं; म्हणून त्यांच्या थोडक्या वाक्यांत पूर्णत्वाभास होतो.

आतां ज्याच्या ठिकाणीं विघ्नाचा अत्यंताभाव आहे, त्याचे ठिकाणीं मंगल निष्फल असल्यास आम्हाला इष्टच आहे कारण ''स्वर्ग कामो यजेत्'' ही श्रुति जशी गृहस्थाला कर्माचें विधान करीत आहे, यतीला नाहीं; त्याप्रमाणें ''समाप्तिकामो मंगलमाचरेत्'' ही शिष्टाचारानुमितश्रुतिही सविघ्न पुरुषालाच उपदेश करीत आहे निर्विघ्न पुरुषाला करीत नाहीं असें श्रुतार्थापत्तीनेंच कळतें.

विघ्नांचा अत्यंताभाव ज्याचे ठिकाणीं आहे असे पुरुषही दोन प्रकारचे आहेत. *योगी आणि *अवतार. पैकीं योगियांनां तर सकल अदृष्ट साक्षात्कार होत नसल्यामुळें संशयानेंच मंगलाचे ठिकाणीं त्यांची प्रवृत्ति होते, म्हणजे आमच्या ठिकाणीं कदाचित् दुरित असल्यास नाश व्हावा हाच त्यांचा संशय होय.

अवतारांचें मंगल करणें लोकोपदेशार्थ आहे, किंवा ते क्वचित् मंगल करीतहि नाहींत. जसें शांकरभाष्याच्या आरंभीं आचार्यांनी मंगल केलें नाहीं. टीकाकारांनी मंगल केलें आहे असें म्हटले त्या विषयीं माझें कांही म्हणणें नाहीं. ते कांहीं असो, पण दृष्ट मंगल नाहीं एवढेंच माझें म्हणणें आहे.

प्रणव व अथ शब्दाच्या उच्चारानें मंगल होतें, (य११पू.११) म्हणून सकल शास्त्रांरंभीं बहुधा या मंगलाचा उपयोग करितात. याप्रमाणें श्रुति प्रमाण सांगून तुझ्या शंकांचें निरसन झाल्यास आतां अनुमान प्रमाण सांगतों.

**''मंगलं वेदबोधितकर्तव्यताकं**

**अलौकिकधर्मशास्त्रानिषिद्ध-शिष्टाचारविषयत्वात् दर्शादिवत्''**

अर्थः- मंगल करावें असें वेदानें सांगितलें आहे, कारण लौकिक नाहीं अशा धर्मशास्त्रानें निषिद्ध नसून शिष्टांच्या आचरणाचा ते विषय असल्यामुळें, दर्शादिकाप्रमाणें.

अनुमानांत 'विषयत्वात्' एवढेंच पद ठेवलें असतें. 'आचार' हें पद घातलें नसतें, तर सुखाचें ठिकाणीं तो हेतु व्यभिचारी झाला असता. जो हेतु साध्याभाववृत्ति म्हणजे साध्य नसलेल्या ठिकाणींही राहतो त्याला व्यभिचारी म्हणतात. सुखाचें ठिकाणीं व्यभिचारी हेतु तर आहे पण वेदबोधितकर्तव्यताकत्व(५२) साध्य नाहीं. 'आचारविषयत्वात्' एवढेंच पद घातलें असतें व बाकीची पदें लक्षणांत निविष्ट केलीं नसतीं तर सुखसंबंधी प्रयत्नाचें ठिकाणीं व्यभिचार आला असता, कारण त्या ठिकाणीं वेदबोधितकर्तव्यताकत्व साध्य नाहीं. पुनः 'अलौकिक' पद घातलें नसतें व 'धर्मशास्त्रानिषिद्ध आचारविषयत्वात' एवढींच पदें घातलीं असतीं तर या हेतूचा मलविसर्ग मुखमार्जनभोजननिद्रादिकांचे ठिकाणीं व्यभिचार झाला असता; कारण ते भोजनादिक धर्मशास्त्रानें निषिद्ध नाहींत; आणि आचार विषयहि निषिद्धभिन्न आहेत परंतु त्यांचे ठिकाणीं वेदबोधितकर्तव्यताकत्व साध्य नाहीं.

रागतः(५४) प्राप्त जो आचार त्याला लौकिक म्हणतात, आणि विधिसिद्ध जो आचार त्याला अलौकिक म्हणतात.

आतां अनुमानांत 'शिष्ट' पद घातलें नसतें तर बौद्धादिकांचें ठिकाणीं हेतूचा व्यभिचार झाला असता. कारण बौद्धादिकांचें ठिकाणीं अलौकिकधर्मशास्त्रानिषिद्ध हा हेतु तर आहे पण वेदबोधितकर्तव्यताकत्व साध्य नाहीं म्हणून 'शिष्ट' पद परिष्कारांत(५५) घातलें आहे. यावरूनच ''समाप्तिकामो मंगलमाचरेत्'' ही श्रुति शिष्टाचारानें अनुमित आहे, असें आम्ही म्हणतो. ती श्रुति ज्या शाखेंत आहे ती शाखा नष्ट होऊन गेली असें समजावें. प्रत्यक्षविरुद्धहि ही श्रुति नाहीं म्हणून 'विरोधे त्वनपेक्ष्यं स्यात्' (य११पू.१२) इत्यादि निषेधहि तिचे ठिकाणीं लागूं होत नाहींत; आणि या शिष्टाचारावरूनच मंगलाच्या साफल्याचें अनुमान होतें. त्या अनुमानाचा आकार असा-

**''मंगलं सफलं (५६)अविगीतशिष्टाचारविषयत्वात् दर्शादिवत्''**

दर्शादिवत् दृष्टान्त पूर्वीच्याही अनुमानांत आला आहे. पूर्वीच्या अनुमानांत वेदबोधितकर्तव्यताकत्व साध्य होतें, यांत सफलत्व साध्य आहे, इतर अवयव समान आहेत. हेत्वंशामध्यें अविगीत पद जें आहे तें प्रमादिकृत(५७) रात्रिश्राद्धादिकांचें व्यावर्तक(५८) आहे.

वादी उवाचः- अहो पण शिष्टाचार जे सांगतात त्या शिष्टाचें लक्षण काय? कारण शिष्ट प्रमादी होत नाहीं म्हणून त्याचे ठिकाणीं विगीतत्वाची(५९) प्रसक्ति(६०) होत नाहीं, आणि प्रसक्तिवांचून प्रतिषेध नाहीं म्हणून प्रस्तुत हेत्वंशामध्यें अविगीत पद निरर्थक आहे.

सिद्धान्ती उवाचः- असें आमचें म्हणणें नाहीं. फल देऊनहि जे अनर्थजनक होत नाहीं त्याला आम्ही अविगीत म्हणतो. स्येनयागादिक शत्रुमारणादिक फल देतात, परंतु परलोकीं नरकादिक अनिष्ट उत्पन्नहि करितात. तसें मंगल नाहीं, तर ते अविगीतशिष्टाचारविषयत्वरूपहेतुतावच्छिन्न(६१) सफलत्वसाध्याधिकरणरूप आहे. आतां शिष्टांचें लक्षणहि सांगतों-

**''फलसाधनतांशे भ्रांतिरहितत्वे सति वेदप्रामाण्याभ्युपगंतृत्वं शिष्टलक्षणम्''**

फलसाधनाविषयीं भ्रांतिरहित असून वेदाचें प्रामाण्य जो अंगिकार करितो त्याला शिष्ट म्हणतात.

शिष्य उवाच :- महाराज! वैदिक कर्म करणारा शिष्ठ कां नव्हे?

श्रीगुरु :- वैदिक कर्म करणारा शिष्ठ म्हणण्यांत बाध नाहीं खरा, परंतु संपूर्ण वैदिक कर्म तर कोणाच्यानें होत नाहीं; आणि ''मा हिंस्यात् सर्वाणि भूतानि'' या श्रुतींत सांगितलेली अहिंसा तर बौद्धादिक करितात, म्हणून किंचित् वैदिक कर्म करणारे तेहि आहेत.

पुनः ब्रह्मवेत्त्या महात्म्याला वैदिक कर्म केलेंच पाहिजे असा नियम नाहीं. म्हणून आम्ही केलेलें शिष्टलक्षणच योग्य आहे.

तात्पर्य मंगलाचरण करणें हा शिष्टाचार आहे, आणि ग्रंथकर्त्याचे ठिकाणीं नास्तिकत्वभ्रांतिनिवृत्ति हें (य११पू.१३) त्याचें दृष्टफलहि आहे.

मंगल तीन प्रकारचें आहे.-

१. नमस्काररूप, २. आशीर्वादरूप व ३. वस्तुनिर्देशरूप.

* आपला अपकर्ष (६२) दाखवून परमेश्वराचा उत्कर्ष दाखविणे याचें नांव

नमस्काररूप मंगलाचरण आहे.

* आपल्या किंवा शिष्याच्या कल्याणाची प्रार्थना करणें याचें नांव आशिर्वादरूप मंगल आहे; आणि

* केवळ परमेश्वराचा निर्देश[६३] करणें याचें नांव वस्तुनिर्देशरूप मंगल आहे.

हीं सर्व मंगलें करण्याची रीति प्राचीन आहे. न्यायशास्त्रांत प्रमाण प्रमेय संशय इत्यादि १६ पदार्थ सांगणारें प्रथम सूत्र आहे. त्यांत प्रमाण हें परमेश्वराचें नांव असल्यामुळें वस्तुनिर्देशरूप मंगल झालें आहे. इतर शास्त्रारंभीं अथ शब्द आहे तो,

**''ॐ कारश्चाथ शब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा ।**
**कंठं निर्भेद्य निर्यातौ तस्मान्मांगलिकावुभौ''॥**

प्रणव आणि अथ शब्द ब्रह्मदेवाच्या मुखांतून निघाले म्हणून ते दोन्ही मंगल आहेत, या स्मृतीवरून मंगलरूप आहे.

वादी उवाच :- अहो पण शारीरक शांकरभाष्यारंभी मंगल नाही हे तुम्ही म्हणता ना?

सिद्धान्ती उवाच :- अरे तेथें देखील वस्तुनिर्देशरूप मंगल आहेच. श्रीमच्छंकराचार्य भगवत्पूज्यपादचरण अवतार असल्यामुळें त्यांना नमस्काररूप किंवा आशीर्वादरूप मंगल न करणें भूषणच आहे. ''युष्मदस्मत्प्रत्ययगोचरयोः'' याप्रमाणें आत्मयाथार्थ्य भाष्याच्या आरंभीं आचार्यानीं सांगितलें आहे, तसा आत्मा जर तेवढ्याच वाक्यानें समजेल तर सर्व मंगलाचें फल एकदमच प्राप्त झाल्यासारखें होतें. हा अर्थ पद्मपादाचार्यांनीं पंचपादिकेंत निरूपण केला आहे.

अवतारी पुरुषानींहि ज्या ठिकाणीं मंगल केलें आहे, तें परंपरारक्षणार्थ समजावें. यद्यपि तिनही प्रकारचें मंगल सर्वसंमत[६४] आहे, तथापि त्यांत हा विशेष[६५] आहे कीं, अवतारी पुरुषांनांच वस्तुनिर्देशरूप मंगल करणें अधिक शोभतें. महर्षीनाच आशीर्वादरूप मंगल अधिक शोभतें, आणि आम्हांसारख्यांना तर नमस्काररूप मंगलच अधिक शोभतें. कारण सर्वच परमेश्वराचें असल्यामुळें केवळ नमनच प्रभूला संभवनीय आहे. पैकीं साष्टांगादिक कायिक नमन आहे. विनय प्रार्थना वाचिक नमन आहे. आज्ञापालन मानसिक नमन आहे. (य११पू.१४)



मानसपूजेमध्यें जो नमस्कार करितो, तो मनोगृहीत कायिक आहे, आणि आत्मनिवेदन किंवा तत्पदाचे ठायीं त्वंपदाचा सन्निवेश[६६] तें आत्मनमन आहे. श्रीधराचार्य न्यायकंदलीकार तर नमस्काराला विशेषें करून मंगलप्रद समजतात. त्यांचें वचन हे आहेः-

**''ननु किं नमस्कारादेव विघ्नोपशमः उतान्यस्मादपि भवति ।**
**न तावन्ननमस्कारादेवेत्यस्ति नियमः ।**
**असत्यपि नमस्कारे न्यायमीमांसाभाष्ययोः परिसमाप्तत्वात् ।**
**यदा चान्यस्मादपि तदा नियमेनोपादानं निरुपपत्तिकम् । अत्रोच्यते ।**
**नमस्कारादेव विघ्नोपशमः कर्मारंभे सद्भिर्नियमेन तस्योपादानात् ।**
**न च न्यायमीमांसाभाष्यकाराभ्यां न कृतो नमस्कारः किन्तु तत्रानुपनिबद्धः।**
**कथमेषां प्रतीतिरिति चेत् कर्तुः शिष्टतयैव अस्तु तावदपरः प्रेक्षावान् ।**
**म्लेच्छोऽपि तावद्दुर्वारंभे कर्मणि न प्रवर्तते यावदिष्टान्न नमस्यति ।**
**यदिमौ परमास्तिकौ पक्षिलशबरस्वामिनौ नानुतिष्ठत इत्यसंभावनमिदम्''**

- श्रीधराचार्य न्यायकंदलीकार

**एथ पूर्वपक्षी म्हणे । विघ्ननाश नमने कीं आनें[६७] । न म्हणतां ये केवळ नमने ।**
**न्यायमीमांसाभाष्य समाप्त अनमनें[६८] म्हणोनी ॥१०१॥**
**सकल मंगलाचें मंगल । नमावे शिवमाधवपदकमळ ।**
**महात्मेहि सकळ । कर्मारंभी नमन करिती ॥१०२ ॥**
**न्यायमीमांसाभाष्यकार । याहीं न केला नमस्कार ।**
**हें म्हणणे अकिंचित्कर[६९]। परी गौप्यबुद्ध्या[७०] अनुपनिबद्ध[७१] ग्रंथीं ॥१०३॥**
**म्लेच्छहि नमिल्याविण गुरु देवता । महत्कार्यी न प्रवर्ते सर्वथा ।**
**मग आस्तिक न्यायमीमांसाभाष्यकृत्समर्था ।**
**अकृन्मंगल[७२] म्हणणें महादोषू ॥१०४॥**
**दधि दर्शनें मंगल करी । परी दध्ना जुहोति या क्रियावतारी[७३] ।**
**वैगुण्य होतां अनर्थकरी । क्रियाचि ते ॥१०५॥**
**परी नमन क्रियायुक्त । तदा भक्तिश्रद्धा अपेक्षित ।**
**कीं नामेंचि जरी उपल्पव[७४] शांत । तरी करावा ग्रंथ कवण हेतु ॥१०६॥**
**ग्रंथ कराया अधिकार घ्यावा । तरी शिष्टाचारु पाळावा ।**

मोडितां होय बरवा । नामापराध तो ॥१०७॥
तो नामापराध दंड अंतरायें[७५] । ग्रंथासी येऊं नये ।
म्हणोनि श्रद्धाभक्त्यातिशयें । नमन मंगल करावें ॥१०८॥
श्रद्धादिविहीन नमन करितां । तरी नोहे निर्विघ्न ग्रंथपूर्णता । (य११पू.१५)
कादंबर्यादि पुस्तकांची अवस्था । हेंचि जाहली ॥१०९॥
ईश्वर नमोनी ईश्वराभिमत । प्रेमें नमावे सज्जनसंत ।
ना तरी निश्चयें कोपत । भगवदाज्ञा ॥११०॥
ईश्वरा आधीं नमस्कार करिता । तरी गुरुत्वें नमस्कार होईल संता ।
गुरूसही नमितां । इष्टापत्ति गुरु ईश्वरहि म्हणूनी ॥१११॥

तात्पर्य, ग्रंथारंभीं मंगलाचरण करणें शिष्टाचारास अत्यंत अनुकूल असल्यामुळें योग्य आहे. तत्त्वचिंतामणि आदि न्यायग्रंथांत मंगलाविषयीं अनेक वाद आहेत. तातानीं कृपेनें त्या सर्वांचेहि रहस्य त्यांहीपेक्षां उत्तम रीतीनें येथें माझ्या मुखांतून वदविलें आहे; म्हणून सकल मंगलस्वरूप श्रीज्ञानेश्वर महाराज चरणनखच आहे.

ग्रंथाची चार नांवे

आतां श्रीगुरुप्रसादें नंदन[७६] । ग्रंथ हा करो मम इहपर कल्याण ।
ययाचें हेंचि नामकरण । अभिधान चतुष्टय ॥११२॥
प्रथम नाम ''मधुराद्वैतस्यमन्तक''[७७] ।
''आगमरहस्यपर्याप्ति''[७८] दुसरें सुरेख ।
''उपास्तिसुधाकर''[७९] तिसरे सम्यक ।
''संप्रदाय सुरतरु'' चवथें ॥११३॥

ग्रंथपठनाचा अधिकार व शाप

जयांची आवडी तातचरणीं । अतिउल्हास कृष्णशिवभजनीं ।
साधक अथवा सिद्धहि असोनी । नारायणीं प्रीति ज्यांची ॥११४॥
तिहींच अवलोकिजे हा ग्रंथ । येरा समर्पिली शपथ ।
मातृगमनादि पापें समस्त । घडोत मन्त्रिदर्शनाविण अवलोकिता ॥११५॥
जया जें मान्य होये । तेणें तेथें न घेयावा संशय ।
नाहीं तरी अपाय । सर्वथा न चुके ॥११६॥



नवपंचकाचे स्मरण / आधिकारिकांची योजना

ग्रंथपठण वा सांप्रदायिक । कार्य करितां स्मरावे सकळीक ।
त्यामाजीं नव पंचक । तेही स्मरावे ॥११७॥
नारायणं नमस्कृत्य वा श्लोकोक्ति । आपुलेंचि स्मरण व्यास सांगती ।
येथ उपगमे[८०] मात्र स्मृति । तदाधिकारिकें ॥११८॥
व्यासें व्यासस्मरण बोलिलें । म्हणोनी अहंकारिक नाहीं जाहलें ।
प्रतिकल्पीं भिन्नास बोलिलें । व्यासाधिकार म्हणोनी ॥११९॥
प्रतिकल्पीं ते तेचि । धर्म स्मरते होतीचि ।
वेदस्मारक विरंची । स्मार्तस्मरते मन्वादि ॥१२०॥
होलिकोत्सवादि सदाचार[८१] । कुलवृद्ध स्मरती समग्र ।
ते मनुष्यचि परी निर्धार । कल्पीं कल्पीं तेचि होती ॥१२१॥
पराशरस्मृतीचा प्रथमाध्याय । तयाच्या टीकेंत माधवाचार्य ।
बोलिले हाचि अभिप्राय । म्हणोनि समयाचारधर्मीहि होय ।
कल्पीं कल्पीं समप्रवर्तक[८२] ॥१२२॥ (य११पू.१६)
यास्तव अपांतरतमादि[८३] वेदाचार्य[८४] । मन्वादि स्मृत्याचार्य ।
व्यासशुकादि पुराणाचार्य । आगमाचार्य नारदादि ॥२२३॥
शंकराचार्यादि धर्मस्थापक । तात हे परमाचार्य सम्यक ।
तुकारामादि प्राकृताचार्य देख । कल्पीं कल्पीं तेचि होती ॥१२४॥

महाराज प्रत्येक कलीत अवतरतात

तैसी प्रतिकलीं माझारीं । मजहि स्मृति धर्माकारी ।
होय येथ म्हणतां निर्धारी । अविश्वास कां कीजे ॥१२५॥
जयाचा विश्वास नाहीं तयाचा नसो सर्वत्र । आहे त्याचा घडो शके अत्र ।
कोणास वाटेल आम्ही बद्ध परतंत्र । तरी मग कल्पीं कल्पीं होणें इष्टचि ॥१२६॥
मुक्त जे होती । तयांची कल्पीं कल्पीं अस्थिति ।
नाहीं पुनरावृत्ति । म्हणोनियां ॥१२७॥
आम्ही बद्ध जंव आहों । तंव कल्पीं कल्पीं सर्वदा राहों ।
मग धर्म विचारहि सांगणें होवो । हाचि लोकां युगीं युगीं ॥१२८॥
आणि मुक्त मानिता आम्हास कोणी । तेंणें विश्वास ठेवावा आमुचे वचनीं ।

**कल्पीं कल्पीं आधिकारिक होवोनी । येतो आम्हीं ॥१२९॥**
**एवं उभयपक्षीं आमचें खंडन । करूं धावें त्या दंतदंडन ।**
**आणि शमनकरवीं[८५] शिरकंडण । चुकेचिना ॥१३०॥**
**आंगींचें किंचित् वैगुण्य पाहुनी । परिहसूं नये आमुची वाणी ।**
**ऋषींच्याहि आंगीं सांपडती म्हणोनी । किंचित् दोष ॥१३१॥**
**प्राचीन आचार्य कैसे स्मरावे । हें सांगितलें आणि सांगूही आघवे ।**
**आतां नवपंचक जे स्मरावे । तेहि सांगू ॥१३२॥**
**व्यासाचा शिष्य जैमिनी । परी तयाचें वचन प्रमाण स्वसूत्रस्थानीं ।**
**साक्षादप्यविरोधं जैमिनी । ऐसे म्हणोनी बोलिले ॥१३३॥**
**गुरुहि गुरुत्वाभिमानें पडे । येणें बोधेंचि रोकडें ।**
**समानत्वें फुडे । बोलताहें मी ॥१३४॥**

महाराजांचा शाप

**अगाध माझी मती । येथ विवाद नाहीं निश्चिती ।**
**परी स्वकर्मे चाक्षुष[८६] संपत्ति । प्रहरिली आहे ॥१३५॥**
**म्हणुनी जिहीं साह्य केले । ग्रंथ लिहिले वाचिले ।**
**शूद्रसामान्यें तिरस्कारिले । नाहीं मातें ॥१३६॥**
**तयांचें स्मरण प्रसिद्धी । करावें पैं मज आधीं ।**
**विपर्यय[८७] करितां त्रिशुद्धि । कल्याणहानि पैं होय ॥१३७॥**
**कलींत वर्षे लागे शाप । ऐसा पराशर स्मृत संकल्प ।**
**मत्कृत ग्रंथीं मीचि भूप[८८] । म्हणोनि मच्छाप अन्यथा नोहे ॥१३८॥**

तो श्लोक येणे प्रमाणें:- (य११पू.१७)

**कृते तु तत्क्षणाच्छापस्त्रेतायां दशभिर्दिनैः।**
**द्वापरे मासमात्रेण कलौ संवत्सरेण तु ॥१॥**

अर्थ स्पष्टच आहे. कलियुगांत पाराशर्यस्मृति प्रमाण आहे असें याच अध्यायांत सांगितलें असल्यामुळें, तींत सांगितलेली विधानें सर्व कलियुगांत संमत आहेत, म्हणूनच कलींत संवत्सरानें शाप फळतो.

वादी उवाच :- अहो पण तुमचा शाप नियमानें फळेल हें कशावरून?

सिद्धान्ती उवाच :- शाप न फळण्याला कामक्रोध इत्यादि निमित्तें अथवा महापापें इत्यादि कारणें असतात. इंद्रादि कामार्तांचेही शाप अन्य युगांत फळले आहेत. धर्मार्तांचे तर फळलेच आहेत. त्याच क्रमानें तें संवत्सराला अनुसरून कलींत फळतात.

आतां कामार्तादिकांच्या शापांत जरी किंचित् परिवर्तन होत असलें, तरी धर्मार्त मी असल्यामुळें माझ्या शापांत तें होणें संभवनीय नाहीं. पारमैश्वर्यबलामुळेहि यद्यपि धर्मार्तांचेंहि शाप निष्फळ होतात, पण मी पारमैश्वर्यधर्म कथन करीत आहे, म्हणून सांप्रदायिक असून माझ्या या नियमाचें जो उल्लंघन करितो त्याला अश्रद्धेशिवाय कोणताही आधार नाहीं.

आतां माझे ठिकाणी पारमैश्वर्य बल आहे असें अभिमानानें म्हणत नाहीं, तर पूर्वगुरूचा मजवर रोष असतांही श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी माझा अंगिकार केला म्हणून म्हणतो. केवळ मी असें शब्द उच्चारणेंच अभिमानाला हेतु नाहीं, तर ''स्वभिन्नान्यत्रोत्कर्षाभाव[८९] निश्चय करणें याचें नांव अभिमान आहे;'' पण मी स्वानुयायी जनाकडूनहि उपकृत होत्साता त्यांच्याहि स्मरणाचें विधान करीत आहे; म्हणून श्वेतकेतूक्त-समयनिर्बंधन-न्यायवत्[९०] सांप्रदायिकानींही ते अवश्य मानले पाहिजे. इतकेंच नव्हे तर मी व ज्यांची नांवें त्या नवपंचकांत आहेत त्यांनीं देखील ग्रंथपठणसमयीं त्यांचें स्मरण केलेंच पाहिजे. यद्यपि आत्मनामग्रहणादिकांचा प्रत्यवाय आहे तथापि दीक्षितस्वनामग्रहणानें तो दूर करावा; म्हणजे पूर्व नवपंचकनामाचें ग्रहण इतरानीं करावे, व नवपंचकानें दीक्षितस्वनामाचें ग्रहण करावे. आतां अधिकार निवेश सांगतों. तो श्लोक येणेप्रमाणे– (य११पू.१८)

अधिकार निवेश

**श्वास होतां पीतवर्ण । आणि तयाचें होय सरळ गमन ।**
**मग तयाते श्वेतवर्ण । करोनी लय चिंतन पैं कीजे ॥१३९॥**
**पुढें रक्तवर्ण आणिजे । मग समश्रवणा आश्रयिजे ।**
**रूपातें एकवटीजे । तया ठाया ॥१४०॥**
**स्पर्शें कां शब्दें । करावया अनुरोधें ।**
**येइजे पैं निरोधें । प्रथम हरितीं[९१] मग श्यामीं ॥१४१॥**
**येणेंचि पुढती उगळिजे[९२] । ऐसा जितुका अभ्यास कीजे ।**
**तितुकीया मूर्ति धरिजे । कल्पीं कल्पीं ॥१४२॥**

येणें देव अथवा असुर । पिशाच अथवा नर ।
पशु अथवा कीटक समग्र । एक असोनि अनेक होती ॥१४३॥
आतां इतुकेही करोनी । विश्वास नये जयांचे मनीं ।
तिहीं लिखित विवाद करूनी । समाधानीं होईजे ॥१०४॥
विश्वासें आणि तर्कें । साधलिया संपर्के ।
अनुभव घेणें हे निके[१३] । सज्ञनकर्तव्य ॥१४५॥
तेणें मंत्रेंचि स्मरावें । नवपंचक स्वभावें ।
आणि समुच्चायक स्मरावे । एक त्यापाठीं ॥१४६॥

शिष्यांना नमन

बीजमंत्राचे संपुटीत शिष्यपंचकनमनरूप मंगलाचरण

र्‍हीं नारायणाय नमः र्‍हीं ।
र्‍हीं हरये नमः र्‍हीं ।
र्‍हीं दत्तात्रेयाय नमः र्‍हीं ।
र्‍हीं व्यंटेशायााय नमः र्‍हीं ।
र्‍हीं लक्ष्मणाय नमः र्‍हीं ।
वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिं ।
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥१॥
गुरुमिति सर्वत्र संबध्यते ।
रुढिरेषां च नाम्नां वै कल्पिता मत्सुहृत्स्वपि ।
पूर्वा सम्यक् देवरुढिर्गुरुबुध्यात्र युज्यते ॥२॥
संस्मरेद् वित्तदातृंश्च जन्मनामादिकांस्तथा ।
नमस्कारेण मंत्रेण तेषां नामयुतेनच ॥३॥
नारदोऽपि यथा जैनो शैवे प्रोक्तस्तथापिहि ।
न जहाति निजं रूपं स्मृतिगामित्वमेवहि ॥४॥
तथा मायामोहयोगात् यदि कश्चिन्निजे पदे ।
विरक्तः स्यात्तर्हि तस्य स्मृतिं नैव त्यजेद् बुधः॥५॥
यतः सम्यक्तया जातास्ते सर्वे ह्युपकारिणः ।
मम ज्ञानप्रदानाय लेखनैर्वाचनैरपि ॥६॥



नियम व शाप

इदं षटकं सदा गेयं मत्कुमारैर्मयापि हि ।
एतं नियममुत्सृज्य ये पठन्ति कृतिं मम ॥७॥
ते संप्रदायविद्वेषात् सत्यं भ्रश्यन्ति मार्गतः ।
ये पुनः षट्कमेतत्तु स्मृत्वा स्मृत्वा पठंति वै ।
ते त्वैहिकं सुखं भुक्त्वा पारमैश्वर्यमाप्नुयुः ॥८॥ (य११पू.१९)

नमोऽन्येभ्यो लक्ष्मीनायककृष्णपर्यायादिपालकेभ्यः।
आदि शब्देन लक्ष्मीपालकश्रीनिवास-राजेश्वर-रामचंद्रादीनाम्
उपकारकाणामेव ग्रहणं न तु अन्येषां ।
धनदातृंश्च किंचित्पुण्यं दत्वा भगवन्तं प्रार्थयेत् ।
धनमपि परोपकाराय गृह्णीयात् ।
आपत्प्रसंगे तु स्वरक्षणमात्रमेव नत्वधिकम् ॥

पाठक्रम आणि वाचनक्रम

तैसा आणिकही नियम । चित्तीं धरावा सप्रेम ।
प्रथम द्वितीयाध्याय पढोन ।
मग प्रथमाध्याय म्हणावा ॥१४७॥
परी उमा माता इत्यादि श्लोक । जे माझे पंचायतन सुरेख ।
आधींचि पढावे सकळीक । मंगल म्हणोनि ॥१४८॥
मग तृतीयापासूनी अनुक्रम घेयावा । हाहि नियम नोल्लंघावा ।
वाचनक्रम तंव ठेवावा । प्रथमद्वितीयादि सारिखा ॥१४९॥
एवं इत्यादि नियमीं अद्दष्ट फळे । अधिकारी होती सगळे ।
आतां जी चिन्हें द्दष्ट फळे । तीहि ऐसीं ॥१५०॥
नित्य ईश्वर अनित्य जग । जरी प्राप्त लौकरी नोहे श्रीरंग ।
तरी कां मी सेवावे अनित्य जग । विषमिश्रित अन्नसम ॥१५१॥
मन नियमीं ध्यानसंभ्रमें । इंद्रियें नियमीं आघवीं दमें ।
विषय टाकितां न श्रमे । लाळ घोटुनी ॥१५२॥
शीत उष्ण सुख दुःख । हे प्राप्त तंव अपरिहार्य देख । भोगिलियाचा
व्यर्थ शोक । आणि पुढील तंव सम्यक, हरिकृपेविण न जाती ॥१५३॥

म्हणोनी प्राप्त दुःख भोगावें । आणि भगवंतातें प्रार्थावें ।
तेणें संपूर्ण हें त्यागावें । अनागत[९४] दुःख ॥१५४॥
ऋषिगुरुवेदान्तवचनीं । विश्वास अत्यंत मायेहीहूनि ।
संसार मुक्तीची चिंता मनीं । तो साधनचतुष्टयगुणी अधिकारी ॥१५५॥
साधन चतुष्टय नसता । आणि उगाचि ग्रंथ पाहता ।
तरी मनोरंजनावांचुनी सर्वथा । लाभ नोहे तयातें ॥१५६॥

अधिकारी

तो अधिकारी त्रिविध । उत्तम मध्यम अधम प्रसिद्ध ।
तयांचीं लक्षणें विशद[९५] । ऐकें आतां ॥१५७॥
सकल अधिकारियांचें सामान्य लक्षण । साधनचतुष्टसंपन्नपण ।
आतां तयाचें प्रकार तीन । सावधान ऐकावे ॥१५८॥
''कानावचनाचिये भेटीं । सरिसाचि जो किरिटी ।
वस्तु होवोनि उठी । आपेंआप''॥  अ. १८ ओ. ९९१ (ज्ञानेश्वरी)
ही श्रुति उत्तम अधिकारी सांगे । जयाचा गुरुवचनीं विश्वास जागे ।
(य११पू.२०) तयाच्याचि हातीं लागे । संवेग तीव्र ॥१५९॥
शब्दमात्रे तदाकारवृत्ति । तैं उल्हसे वस्तुस्थिति ।
क्रियायोगें तदाकारवृत्ति । भावना निश्चिती या नांव ॥१६०॥
जयाचिया पुढें सर्व काळ । अनिष्ट पक्ष येती प्रबळ ।
मग लागलीच राहे तळमळ । आणि सदा डळमळ चित्त होय ॥१६१॥
ऐसें तिन्ही चित्तें तिन्ही । उत्तम मध्यम जघन्यीं ।
पुरुष अधिकारीपणीं । पट्टा[९६] येती ॥१६२॥
जया आरंभ[९७] तंव नाहीं । आणि मिथ्याज्ञानें न कळे कांहीं ।
तेथ शब्दाविण नाहीं । उपावो आन ॥१६३॥
सिद्धवस्तु वचनशतें । नारंभिजे हें भाष्यकार भगवंते ।
बोलणें केलें कृपावंतें । नाना ठायीं ॥१६४॥
आरंभलिया तंव जाय । अनारब्धीं[९८] आरब्धत्वारोप होय ।
एवं जेथ अपेक्षा लाहे । भावना ते ॥१६५॥
निश्चय होतां अभिमान । संशय किंवा स्तब्धपण ।



एवं तर्काचें लक्षण । बोलिले सकळ ॥१६६॥
तेथ उत्तमाधिकारी गुरुवाक्यनिष्ठ । मध्यमाधिकारी ध्याननिष्ठ ।
तार्किक अधिकारी कनिष्ठ । यत्संन्निध अनिष्ट पक्ष सदा ॥१६७॥
प्रत्यक्ष आणि अनुमान । हें मज पूर्वीच  आहे उपपन्न[९९] ।
यालागीं वाक्यचि करील समाधान । ऐसें निके[९९अ] मन जयाचें ॥१६८॥
तो वाक्य उच्चारिताक्षणीं । असंगत्वें विश्वनिरिक्षणीं ।
पटु , यास्तव तयालागुनी । व्युत्थानींहि[१००] समाधि ॥१६९॥
सुखें घेणें मनोवृत्ति । आणि न घेणें येणें रीति ।
हें आघवीयांच्या चित्तीं । बैसलेंचि आहे ॥१७०॥
इया स्वतंत्र वृत्ति देखता । तरी तो असंभावना[१०१]विपरीतभावना[१०२]समस्ता ।
नेघे येथेचि स्वतंत्रता । अन्यत्र परतंत्रु ॥१७१॥
तंव वादी म्हणे शब्दमात्रें । मुर्खासीहि बोध्य परें ।
मिळे तैं सिद्धान्ती म्हणे कुतरे । चित्त तुझें ॥१७२॥
महद्विषयश्रवण मात्रें । जयाचिया हृदयीं आरूढतंत्रे ।
तया बोलिजे पवित्रे । उत्तम ऐसे ॥१७३॥
आतां मध्यम अधिकारी तो म्हणावा । जया क्रियेविण शब्द तुच्छ वाटे बरवा।
शब्दमात्रें कवणा आघवा । बोधु जाहला ॥१७४॥
स्वप्नीं मातृशब्दें होय  जागा । परी गुरुवाक्यावरी अपेक्षी क्रियायोगा ।
तरी तयातें महाभागा । मध्यम म्हणावें ॥१७५॥
तंव शिष्य म्हणे भगवंता । विधिवाक्यमात्रें श्रद्धावंता ।
धर्मबोधु होय तत्वतां । तो उत्तम अधिकारी होय कीं ॥१७६॥ (य११पू.२१)
श्रीगुरु म्हणती तुवां । मार्मिक आशय पुसिला बरवा ।
शब्दीं श्रद्धामत्वस्वभावा । समान उत्तम धार्मिक दोघेही ॥१७७॥
परी विधिवाक्यबळें परोक्षज्ञानें । क्रियाकिंकर[] धार्मिका होणें ।
गुरुवचनअपरोक्षबळें । तृप्त होणें उत्तमाचें ॥१७८॥
कीं जो नामें अध्यास केला । तो विनाभावित[१०३] कैसा झाला ।
आणि वचनें अध्यास गेला । तो भावित कां जावा ॥१७९॥
एवं वचनें होतां अविद्यानिवृत्ति । वचनाधिकरणीं[१०४] उरे भक्ति ।

म्हणोनि उत्तमाधिकारी जे होती । गुरुभक्तचि ते ॥१८०॥
जया संशयविपर्यय नाहीं । तया मनन निदिध्यासन न लगे कांहीं ।
श्रवणमात्रेंचि आपुल्या ठायीं । तृप्त होती ते ॥१८१॥
आतां मध्यमाधिकारियाचें लक्षण । जो क्रिया अपेक्षीं सावधान ।
गुरुवचनीं विश्वास पूर्ण । परी भक्ति गुरूहून उपास्याविषयीं ॥१८२॥
सद्गुरु मुख्य तोचि आपण । व्युत्थानीं तयाचेंचि भजन ।
हें उत्तमाधिकारियाचें चिंतन । येथ प्रमाण श्रुतिमाता ॥१८३॥
उपास्य मुख्य सद्गुरु गौण । उपासना सांगतो म्हणून ।
जेविं वैद्यावरी प्रेम गहन । रोग नाशी म्हणोनि ॥१८४॥
ऐसें जयाचें अंतःकरण । तो मध्यमाधिकारी म्हणती मुनिगण ।
तयातें निदिध्यासाची पूर्ण । अपेक्षा आहे ॥१८५॥
मरणकाळपर्यंत । सारिखें तेणें ठेवावे चित्त ।
क्षण एकही समाधिच्युत । होवों नये ॥१८६॥
आतां कनिष्ठ जो कां अधिकारी । तयाची बुद्धि तीव्र खरी ।
परी पडला राहे संशयसागरीं । सर्वकाळचि ॥१८७॥
निश्चय करी बळें करोन । तरी महावाक्यांत मिसळी देहाभिमान ।
मी देवदत्त आपण ब्रह्म । झालो बळें म्हणे ॥१८८॥
इतर विष्णुदत्तादि अब्रह्म । ऐसे महावाक्य जाणोनि आरोपी नाम ।
रूपाध्यासादि संभ्रम । तैसाचि घेणे ॥१८९॥
साधनचतुष्टयसंपन्न म्हणोनी । नावडे जरी कनक कामिनी ।
तरी अध्यासाचिया आनुगुणीं[१०५] । ब्रह्मचि करी ॥१९०॥
''नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं ।
सज्ञानाच्या झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी'' ज्ञाने.अ.१३.ओ.८२
इत्यादि श्रुतींचा विषय । जयांचें विज्ञान होय ।
ज्ञानमिषें स्वयें । अध्यासचि घेतो ॥१९१॥
विवेक करितां कर्तृत्व वाढे । श्रवण करितां अनुमान जोडे । (य११पू.२२)
अभ्यास करितां रसास्वाद[१०६] वाढे । तेणेंचि मोडे निज मोक्ष ॥१९२॥



एवं सर्वदा चंचल । जरी पांडित्यप्रविण प्रबळ ।
तरी वाणी मात्र संबद्ध[१०७] केवळ । बुद्धि उन्मत्त तयाची ॥१९३॥
शिकविलें शुक बोले । परी आंतिलें पक्षीपण नाहीं गेलें ।
तैसें सुसंबद्ध वाक्य बोले । परी चांचिल्ये ग्रासिलें चित्त सदा ॥१९४॥
विजातीय[१०८] वृत्ति घेतल्याविण । नाहीं तर्कातें अधिष्ठान[१०९] ।
विजातीय वृत्ति ध्यानास विघ्न ।
ते न होय पूर्ण जया कडोन । म्हणोनि मरणसमयींहि बाधा तयातें ॥१९५॥
साधन चतुष्टयसंपत्ति नसतां । आणि उत्तमपणा आंगीं असतां ।
तरी तया चतुष्टयता । आपणचि मिळे ॥१९६॥
साधनचतुष्टयाविण मध्यमाधिकारी । तरी पाहुणा सिद्धीच्या घरीं ।
साधनाविण कनिष्ठाधिकारी । तयातें वरी संयमनी[११०] ॥१९७॥
ससाधन उत्तमाधिकारी । तो सद्गुरु येचि शरीरीं ।
ससाधन मध्यमाधिकारी । इह वा अमुत्र[१११] कालें मुक्त तो ॥१९८॥
ससाधन कनिष्ठाधिकारी ।
तो अधोगतीस न जातां मुक्तिक्रमचि पावे जन्मजन्मांतरी ।
परंतु कृतोपास्ति[११२] तो उत्तमाधिकारी । सहजचि होय ॥१९९॥
जे कृतोपास्ति होती । ते कनिष्ठ-मध्यमत्वा न येती ।
उपास्य होय श्रीगुरुमूर्ति । उपासना भक्ति ज्ञानोत्तर त्यांची ॥२००॥
भगवदुपासना करिता । साधनें आनुषंगिक[११३] तत्वता ।
गोडीसाठीं लाळ घोटितां । शर्करोपयोग कळे ॥२१०॥
तैसें आनंदार्थ धांवतां सच्चिति । मिळे यास्तव भगवद्भक्ति ।
सर्वदा करावी अतिप्रीति । भागवतधर्म या नांव ॥२०२॥
श्रौतस्मार्तकर्माविण । चित्तशुद्धि नव्हे पूर्ण ।
परी भगवन्नामस्मरण । संपादी तें ।२०३॥
येथहि प्रमाण श्रुति । यालागीं भागवतधर्माप्रति ।
अपेक्षा नाहीं निश्चिती । आन धर्माची ॥२०४॥

ग्रंथाचे प्रयोजन

**इतर धर्में भगवंतीं मिळतां । तरी ये तया सद्धर्मता ।**
**तो धर्मही तत्वतां । द्विविध असे ॥२०५॥**
**गौणीभक्तिरूप अपर । पराभक्तिरूप पर ।**
**ब्रह्मज्ञानमिश्र । बोलिला आहे ॥२०६॥**
**तो बोलिला जाईल इये ग्रंथीं । म्हणूनि तोचि विषय समजावा संतीं ।**
**जीवन्मुक्तींत भगवद्भक्ति । प्रयोजन ग्रंथाचें ॥२०७॥**
**ग्रंथ नव्हे हें शास्त्र । तातमुखश्रुतीचें सूत्र ।**
**कां विवरण श्रीगुरुतंत्र । अभिप्रायाचें ॥२०८॥**
**तैं वादी म्हणे भलें । तुम्ही सांगितलें प्रयोजन कळलें ।** (य११पू.२३)
**विषय लक्षणही ओळखिलें । परी प्रमाण नाहीं ॥२०९॥**
**वादीदौर्बल्यान्मतदौर्बल्यमिति । बहु प्रांजल म्हणती ।**
**म्हणोनि निश्चित प्रमाण धर्माप्रति । साच नोहे ॥२१०॥**
**सिद्धान्ती म्हणे ऐक वचन । कोण्या मानें[११४] वादीप्रबल-दुर्बलपण ।**
**प्रत्यक्षीं तंव विवाद नाहीं म्हणोन । असिद्ध हेतु ॥२११॥**
**अनुमानीं वादी प्रबलदुर्बल । तरी जयाचे हेतु दृष्टान्त साध्य शुद्धशील ।**
**सपक्षसत्वादि अधिक केवळ । तो प्रबल वादी ॥२१२॥**
**ऐसे वादी प्रबल प्रबल करिता । मान येवों शके सर्वज्ञमता ।**
**किंवा तर्क अप्रतिष्ठ तत्वता । हे आम्हासही इष्टचि ॥२२३॥**
**आगमप्रमाणीं वाद करिता । तरी प्रबल समन्वयकर्ता[११५] ।**

धर्म म्हणजे काय?

**तेव्हां दौर्बल्य तिरस्काराची अवस्था । समूळ गेली ॥२१४॥**
**श्रद्धेचें सकळा फल । म्हणोनि विवाद अवघेचि प्रबळ ।**
**आधी धर्म तंव केवळ । वचनगोचर ॥२१५॥**
**वस्तुतंत्र आगमाचें ठायीं । समन्वय असे न करितांही ।**
**म्हणोनि वादीप्राबल्यदौर्बल्य तेथही । घडों न शके ॥२१६॥**
**यालागीं धर्म तो आश्रयावा । कुतर्के दूर न करावा ।**
**यावज्जीव आचरावा । नाना प्रयत्नें ॥२१७॥**



**आतां धर्म म्णजे काय । हेंहि संक्षेपें सांगू स्वयें ।**
**पूर्वमीमांसक म्हणती होय । वेदबोधक तो धर्मु ॥२१८॥**

**''चोदनालक्षणोऽर्थो धर्मः''**

असें पूर्वमीमांसेच्या प्रथमाध्यायाच्या प्रथम पादांत २ रें सूत्र आहे. धूमानें जसा वन्हि लक्षिला जातो तसा दयेनें म्हणजे प्रवर्तक वेदवाक्यानें धर्म लक्षिला जातो. सूत्रांत जो अर्थ शब्द आहे तो सुखपर्यवसायित्वबोधक आहे.

यद्यपि श्येनयज्ञ वेदानीं सांगितला आहे, तथापि त्याच्या योगानें परलोकीं नरक होत असल्यामुळे तो धर्मरूप नाहीं.

या पूर्वमीमांसावचनावरून धर्म भावरूप पदार्थ आहे असें कळतें; परंतु भावरूप पदार्थ निरनिराळ्या मतांत निरनिराळे प्रकारचे आहेत.

न्यायमतांत द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय हे सहा भावपदार्थ आहेत.

सांख्यमतांत परिणामी व अपरिणामी हे दोनच भावपदार्थ आहेत. प्रकृति परिणामी असून पुरुष अपरिणामी आहे.

वेदान्तमतांत सत् व अनिर्वचनीय हे दोन भावपदार्थ आहेत. यद्यपि जीव, ईश्वर, ब्रह्म, जीवेश्वरभेद, अविद्या, आणि तिचा (य११पू.२४) संबंध, हे सहा पदार्थ अनादि मानले आहेत; तथापि ब्रह्मभिन्न सर्वांचा अनिर्वचनीयांत अंतर्भाव होतो; तेव्हां धर्म हा कोणता भावपदार्थ आहे? अशी चिंता उत्पन्न होते.पुनः -

**''धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये''**

इत्यादि भारतवचनांत धर्माला नित्यभावपदार्थात गणलें आहे, पण न्याय, सांख्य, वेदान्ती त्याला नित्यभावपदार्थांत ग्रहण करीत नाहींत; कारण धर्म नित्य झाल्यास अधर्महि नित्य होईल, मग त्याचा प्रायश्चित्तानें नाश होणार नाहीं, आणि धर्माचाही कर्मनाश्यानदिस्नानादिकानीं नाश होणार नाहीं; म्हणून धर्म नित्य नाहीं असें सर्व म्हणतात.

नैय्यायिक धर्माधर्मास गुण मानतात. कोणत्याहि न्यायग्रंथांत धर्माधर्मास चोवीस गुणांत गणलें आहे.

सांख्यमतांत धर्माधर्मास द्रव्य म्हटलें आहे, कसें तें पहा.

**''सत्त्वादीनि द्रव्याणि न वैशेषिका गुणाः संयोगविभागवत्वात् ।**

लघुत्वचलत्वगुरुत्वादि धर्मकत्वाच्च ।
तेष्वत्र शास्त्रे श्रुत्यादौ च गुणशब्दः पुरुषोपकरणात्
पुरुषपशुबंधकत्रिगुणात्मकमहदादिरज्जुनिर्मातृत्वाच्च प्रयुज्यते''

अर्थः- सत्त्वरजस्तमोगुण । यांची साम्यावस्था प्रकृत्यभिधान ।
परी न्यायभाषेंत बोलतां जाण । तरी सत्त्वादिक द्रव्य न होती गुण ॥२१९॥
वैशेषिक गुणांचा संयोग विभाग । कल्पिताचि नये चांग ।
सितानिष्ठ[११६] द्रव्यभिन्नमधुराम्ललवणसंयोग । देखिला कवणें ॥२२०॥
सत्त्वरजस्तमाचा । अवस्थाविशेषीं संयोगविभाग साचा ।
सांख्य मानिताती वाचा । आपुलालिया ॥२२१॥
आणिक पाहतां गुणाच्या ठायीं । आधेयगुण[११७] नैय्यायिका मान्य नाहीं । आणि सत्त्वरजस्तमाचे ठायीं । लघुत्वचलत्वगुरुत्वादिगुण सांगती सांख्य ॥२२२॥

तथाच सांख्यकरिका :-
सत्त्वं लघुप्रकाशकमिष्टमुपष्टंभकं चलं च रजः ।
गुरुवरणकमेव तमः प्रदीपवच्चार्थतोवृत्तिः ॥१३॥
अर्थ स्पष्ट आहे

गुणाचे ठायीं न राहती गुण । सत्त्वादिकांचेठायीं राहती गुण ।
यालागी सत्त्वादि द्रव्य जाण । वैशेषिकगुण न होती ॥२२३॥
गोडी आहे तिखट । कीं तिखटादि खारट ।
खारटादि आंबट । कोण म्हणे ॥२२४॥ (य११पू.२५)
साखरेंत मरीच मिसळलें म्हणती । परी साखरचि तिखट लागे न बोलती ।
म्हणजे द्रव्यमिसळणी गुण मिसळती । परी गुण न मिसळती सर्वथा॥२२५॥
आणि सत्त्वादिकांचें मिसळण । गौण प्रधानपणें करून । सर्वत्र दिसे सर्वालागून।
यालागीं न्यायभाषेंत सत्त्वादिका कारण द्रव्य म्हणावें ॥२२६॥
ते पुरुषास बांधती । आणि जगद्वस्त्र निर्मिती ।
म्हणोनि गुणशब्दें व्यवहरिती । सांख्यवेदान्ती सत्त्वादिका ॥२२७॥
'गुणाः प्रकृतिसम्भवाः' हें गीतावचन ।
आणि 'गुणाबुद्धेः' ऐसें भागवतवचन । यांचें ऐसें समन्वयसंधारण[११८] ।
कीं गुण बुद्धिसंस्कारसंघटित अविद्येचे ॥२२८॥



ते बुद्धींत प्रगट होती । म्हणोनि सांख्यकारिकाकार म्हणती ।
कीं बुद्धीचें सात्त्विकरूप निश्चितीं । धर्मज्ञानादि ॥२२९॥
तथाच कारिका :-
''अध्यवसायो बुद्धिर्धर्मो ज्ञानं विराग ऐश्वर्यम् ।
सात्त्विकमेतद्रूपं तामसमस्माद्विपर्यस्तम्'' ॥२३॥
अभंग - भावार्थ
बुद्धि म्हणजे काय म्हणावा निश्चय । द्विकोटिक[११९] नोहे ज्ञान जिचें ॥१॥
अष्टविधरूप[१२०] ओळखावें तिचें । सत्त्वाचें तमाचें मिळोनियां ॥२॥
धर्म ज्ञान त्याग आणिक ऐश्वर्य । रूप चतुष्टय सात्त्विक हें ॥३॥
अधर्म अज्ञान अवैराग्य जाण । ऐश्वर्यानें हीन तमोरूप ॥४॥
तात्पर्य या वाक्यें धर्माधर्म दोन्ही । बुद्धिरूपपणीं द्रव्य झालें ॥५॥
ज्ञानेश्वरकन्या कवणेहि परी । आठविणें हरी धर्म मानी ॥६॥
शिष्यः- न्यायांत बुद्धि मानला गुण । सांख्यांत बुद्धिस्वरूप पापपुण्य ।
यालागीं न्यायसांख्याचा पूर्ण । समन्वय आहे ॥२३०॥
श्रीगुरु म्हणती सावधान । ऐसा क्लिष्टसमन्वय करणें गौण ।
केवळ सादृश्य पाहून । समन्वय करणें ॥२३१॥
या नांव नयनीं धूळ फेंकणें । न्याय जरी बुद्धिगुण म्हणें ।
तरी धर्माधर्मासही म्हणे । गुणचि ॥२३२॥
गुणाचेठायीं गुण न राहती । म्हणोनि न्यायदृष्टीनें बुद्धीचे गुण धर्माधर्म न होती । यालागीं सांख्यदृष्टिच निश्चितीं । श्रेष्ठ येथ ॥२३३॥
मानता ब्रह्मविवर्त[१२१] । तरी वेदान्तासी हेंचि संमत ।
धर्म नित्य जो म्हटला निश्चित । तो यावज्ज्ञान[१२२] अदृष्टलक्षणें[१२३] ॥२३४॥
किंवा निष्काम आचरितां दे नित्यफळ । यालागीं तो नित्य बोलिला केवळ ।
(य११पू.२६)जैसें घृत देतसे आयुष्यफळ । म्हणोनि आयुर्म्हणति घृता ॥२३५॥
आत्मगुण अपूर्वधर्म[१२४] प्रभाकर म्हणती ।
तत्साधक श्रुतिचोदित अतीन्द्रिय द्रव्यादिविशेष धर्म भाट्ट म्हणती ।
येथ वेदान्ताचीहि आहे संमति । व्यवहारी भाट्टमत मान्य म्हणुनी ॥२३६॥
हेंच पराशरस्मृतीच्या पहिल्या अध्यायाच्या १८ व्या श्लोकाच्या टीकेंत

माधवाचार्यानें स्पष्ट दर्शविलें आहे, तें तेथेंच पहावें. ग्रंथविस्तारभयास्तव मी येथें देत नाहीं.

यापप्रमाणें धर्माविषयीं जसा विचार आहे. तसा जडचेतनत्वाविषयींहि विचार उत्पन्न होतो. न्याय, सांख्य, वेदान्ती व मीमांसक हे सर्व धर्माधर्म जड आहेत असेंच समजतात. परंतु आमच्या रहस्यशास्त्रांत तो चेतनहि आहे; कारण भगवंतानें असें म्हटलें आहे कीं ''धर्मोहं वृषरूपधृक्'' मी बैलाचे रूप घेतलेला धर्मस्वरूप आहे. आतां ही धर्माची देवता आहे असें म्हटल्यास त्याचा अर्थ काय? धर्माची उत्पत्ति झाल्यावर ही देवता त्याच्या फलाचें नियमन करिते असें कोणी उत्तर दिल्यास, तें निव्वळ चुकीचेंच आहे असें जरी म्हणतां न आलें, तरी भक्ति विशेषानें जसें भगवंताचें भजन निश्चित आहे, तसें क्रियाविशेषानें धर्मरूप भगवंताचें भजनहि निश्चित आहे; आणि भजनविशेषानेंच फलविशेषदाता परमेश्वरच दृढ होत असल्यामुळें, नैर्घृण्यवैषम्यपरिहार[१२५] होऊन चेतनकारणवाक्याचा संकोचहि करावा लागत नाहीं. बुद्धि त्या धर्माचें अभिव्यंजक[१२६] आहे.

यापप्रमाणें अधर्महि चेतन पदार्थ आहे; कारण अघमर्षणसमयीं[१२७] पापपुरुषनिष्क्रमणविधि बोलिला आहे; आणि परमार्थतः तोहि ईश्वराहून भिन्न नाहीं. बुद्धीचीं जीं धर्माधर्मरूपें तीं त्यांचे उपाधि होत. उपचारानें म्हणून नैय्यायिक त्यांना आत्मगुण म्हणूं शकतात. उपचार म्हणजे परमेश्वराचें ठिकाणीं धर्माधर्म उत्पन्न होण्याची स्वरूपयोग्यता[१२८] असणें, पण मिथ्याज्ञानाभावास्तव[१२९] त्याचें ठिकाणीं तें उत्पन्न होत नाहींत असें ते म्हणतात. हा जो आम्ही उपचारानें केलेला आत्मगुणाचा समन्वय तो शिशुरंजनार्थच आहे. एरवीं नैय्यायिक तर जीवात्मगुणच धर्माधर्म मानतात, म्हणून सांख्यवेदान्तापेक्षया ते बाह्य आहेत. भागवतधर्म तर साक्षात् परमात्माच आहे. बुद्धीचें सात्त्विकरूप त्याचा अपरधर्म[१३०] आहे व मिश्रसत्त्वरूप[१३१] आहे, आणि (य११पू.२७) पर भागवतधर्म शुद्धसत्त्वस्वरूप आहे.

विवेकचूडामणींत आचार्यांनीं त्यांची लक्षणें केलीं आहेत तीं अशीं -

**''मिश्रस्य सत्त्वस्य भवन्ति धर्मास्त्वमानिताद्या नियमायमाद्याः॥**
**श्रद्धा च भक्तिश्च मुमुक्षता च । दैवी च संपत्तिरसन्निवृत्तिः॥१२०॥**
**विशुद्धसत्त्वस्य गुणाः प्रसादः । स्वात्मानुभूतिः परमा प्रशांतिः ।**
**तृप्तिः प्रहर्षः परमात्मनिष्ठा । यया सदानंदरसं स मृच्छति ॥१२१॥**

भावार्थ

**अमानित्वादि मानससमाश्रित । यम ते मानसक्रियाश्रित ।**
**नियम ते बाह्यक्रियाश्रित । आदि शब्दें बोलिजेत वैराग्यादि ॥२३७॥**
**विश्वासगुरुवेदान्तवचनीं । परम भाव पूज्यपूजनीं ।**
**आशा जराजननमृतिहननी । आणि दैवीसंपत्ति तेहि एक ॥२३८॥**
**दुःसंगाची निवृत्ति । या नांव मिश्रसत्त्व म्हणती ।**
**एवं आघवेंचि आर्यपुत्र[१३२] सांगती । षोडशाध्यायीं अर्जुना ॥२३९॥**
**अमानित्वादि ज्ञानलक्षण । त्रयोदशीं बोलिले करुणाघन ।**
**ते तंव ज्ञानसाधनत्वेंकरून । किंवा असाध्यत्वें ज्ञानीलक्षण ते ॥२४०॥**
**जिज्ञासुदशेंत मिश्रसत्त्व । तें जाहलें होय संपाद्यत्व[१३३] ।**
**तेंचि ज्ञानीदशेंत शुद्धसत्त्व । स्वाभाविकपणें परिणमे ॥२४१॥**
**म्हणोनि जीवन्मुक्ता । अद्वेष्टृत्वादि[१३४]धर्म आणि भजणें भगवंता ।**
**हा स्वभावचि चढे हाता । ही मधुसूदनोक्ति गीता-उपोद्घातीं ॥२४२॥**
**प्रसन्नता स्वात्मानुभव । असाध्य परमशांतिवैभव ।**
**जें बोलिले नाथदेव[१३५] । श्रीमद्भागवतटीकेंत ॥२४३॥**
**''अंतरी शुद्ध नाहीं बोधु । दांत चावूनि साहतां द्वंद्वू ।**
**ते क्षमा नव्हे शुद्धू । ऐक विनोदू क्षमेचा ॥**
**अंतरीं ठसावलें परब्रह्म । बाह्य सर्वभूतां झाला सम । तेचि क्षमा म्हणे पुरुषोत्तम । द्वंद्वाराम[१३६] बाधिना''॥ एकनाथी भागवत.(य११पू.२८)**
**आत्मज्ञान निरंकुशतृप्ति । आणि परमात्मनिष्ठा भगवद्भक्ति ।**
**जिया दृष्टपरमानंदप्राप्ति । जीवन्मुक्तिदशेंत मिळे ॥२४४॥**
**हा भागवतधर्म परमात्मा म्हणोन । एकनाथ बोलविती भगवन्मुखेंकरून ।**
**तेंहि ऐकें प्रमाणवचन । संशयछेदार्थ ॥२४५॥**
**''भूता अभयदानोपक्रम[१३७] । सर्वांभूतीं मी आत्माराम ।**
**हा संन्यासाचा मुख्यधर्म । तो धर्म मी पुरुषोत्तम स्वयें म्हणें ॥ एक.भाग.**
**संन्याशाचा मुख्य धर्म या वचनें । इतरांसहि बोलिला संपाद्यपणें[१३८]।**
**आणि संन्याशासहि गौणपणें । अपरुहि[१३९] बोलिला ॥२४६॥**

**तंव शिष्य म्हणे भगवंता । मलिनसत्त्वप्रधाना जीवोपाधिता ।**
**आणि मिश्रसत्त्वा धर्म म्हणतां । विरोध तत्वतां आचार्यवचनीं ॥२४७॥**
**श्रीगुरुरुवाच :- मूलाविद्यक कारणीभूता । मलीनसत्त्वप्रधाना जीवोपाधिता ।**
**आणि स्वाभाविकत्वें देवांगणता । असे तया ॥२४८॥**
**शास्त्रीययत्नसंपाद्य धीगत । मिश्रसत्त्व धर्म होत ।**
**तोही द्विविध असें निश्चित । स्मार्त आणि अपर भागवतु ॥२४९॥**
**त्रय्यधिष्ठित[१४०] स्मार्त । भगवदुपासनाप्रधान अपर भागवत । हा मिश्रसत्त्वात्मक**
**धर्म परोक्षभूत[१४१] । तेणें अपरोक्षभूत[१४२] शुद्धसत्त्वरूपधर्म साधे ॥२५०॥**
**वृषभरूप हा अपरधर्म । जया कालिक क्षयवृद्धिनियम ।**
**सर्वदा अक्षीण तर भागवतधर्म । जो स्वयें पुरुषोत्तम जाहला ॥२५१॥**
**दानवीं पीडितां अवनीं । जो धर्म महंतांच्या अंतःकरणीं ।**
**राहे तोचि अवतरणपणीं । अपरधर्मरक्षणीं प्रगटो लागे ॥२५२॥**
**एवं ऐसा विद्यात्मक । परभागवतधर्म निष्कलंक ।**
**जेणें निराकार साकार व्रजनायक । आत्मत्वें पतित्वें मिळे ॥२५३॥.**

तेव्हां कोणत्याहि दृष्टीनें सत्त्वभावपदार्थरूप धर्म आहे, हें लक्षण सिद्ध झालें. गीतेमध्यें त्रिगुणविभाग करून कर्ता, कर्म, करण, धृति इत्यादिक सात्त्विक धर्माच्या उपयोगी आहेत, असें सांख्यवेदान्तानुसारच भगवंतानें सांगितलें आहे. गुणांच्या अपेक्षेनें शास्त्राची प्रवृत्ति आहे, असें भाष्यकार आचार्यांनीं म्हटलें आहे. अशा या धर्माचा अंतःकरणाशी संबंध असल्यामुळें, जन्मजातिवाद सिद्ध होत नाहीं असें म्हणतात, व कोणी द्रव्यत्वास्तव होतो असें म्हणतात. तें कांहीहि असोः धर्मधर्माचे (य११पू.२९) सत्त्ववृद्धि असें लक्षण निर्विवाद ठरतें.

आतां धर्म म्हणजे सत्त्ववृद्धि असें जरी लक्षण झालें, तरी लोक ज्याप्रमाणें एकादा पुरुष क्षमाशील दयाशील असला म्हणजे, त्याला त्या गुणावरूनच धार्मिक म्हणतात, तें मात्र बरोबर नाहीं; कारण धर्म जरी सात्त्विक आहे, तरी तो आगमावांचून प्रत्यक्षगोचर नाहीं. दयादिक त्याचीं साधनें आहेत, किंवा दयादिकावरून तो अनुमेमय आहे. कारण आचार्यांनीं देखील बृहदारण्यकाच्या ४।३।९ च्या भाष्यांत धर्माधर्माचें साक्षात् दर्शन संभवनीय नाहीं, असें म्हटलें आहे; आणि आनंदगिरीनेंहि ''आगमादृते''[१४३] असा त्याचा अर्थ केला आहे. शिवाय



वैराग्य हें धर्माहून भिन्न असें बुद्धीचें सात्त्विक रूप आहे तेव्हां तें धर्म नव्हे. एवढ्याकरितां धर्मस्वरूप आगमावरूनच निश्चित केलें पाहिजे. यद्यपि गुणाच्या अपेक्षेनेंच शास्त्रप्रवृत्ति आचार्यांनीं सांगितलीं आहे, तथापि ती अपरोक्ष जो दयामिश्र सत्त्वभाग त्याचा आश्रय करून, परोक्ष जो धर्मरूप सत्त्वभाग, तो संपादन करण्याकरितां सांगितली आहे, असें समजावें; नाहीं तर धर्म सर्वथा वचनगोचर होणार नाहीं.

**भगवदपेक्षा विवर्जिता । दयादिकां धर्म म्हणतां ।**
**तरी जैनागमादिप्रणीता । येईल धर्मत्व ॥२५४॥**
**किंवा भागवतवचन विरोधु । तोहि येऊनि पडेल बाधु ।**
**स्वयें बोलिले गोविंदू । कीं मद्अनपेक्षी नीतिमय धर्म वृथा ॥२५५॥**
''धर्मः सत्यदयोपेतो विद्या वा तपसान्वितः ।
मद्भक्त्यापेतमात्मानं न सम्यक् प्रपुनातिहि ॥२२॥''(भाग.स्कं.११अ१४,)
**सत्यदयादि यमरूप । धर्म भक्तिरहिता बंधनस्वरूप ।**
**अनुष्ठानधर्म नियमरूप । तोहि बंधनरूप बोलिला प्रथमस्कंधीं ॥२५६॥**
**म्हणवोनि भगवंतासाठीं । सोसणें यमादिकांच्या कोटी ।**
**तेणें धर्म उपजे अदृष्टसृष्टीं[१४४] । ईश्वरवृत्त्यपरोक्ष[१४५] तो ॥२५७॥**
**म्हणवोनि नाना अधिकारें । धर्म मिळे आगमानुसारें ।**
**यालागीं सत्त्ववृद्धिप्रकारें । बोलिजे धर्मार्थ ॥२५८॥**
**शिष्य म्हणे भगवंता । धर्म युक्तीनें वाढे हाता[१४६] ।**
**तया निरोधरूपता[१४७] । म्हणोनियां ॥२५९॥**
**तंव बोलती श्रीगुरुरावो । म्हणती तुझा मार्मिक भावो । (य११पू.३०)**
**परी केवळ निरोधपर्यवसायी[१४८] स्वभावो । नव्हे धर्मु ॥२६०॥**
**अवस्तुशेषनिरोध[१४९] धर्म म्हणतां । तरी तया येईल माध्यमिकमान्यता[१५०] ।**
**आणि वस्तुशेषनिरोध धर्म म्हणतां । तरी आगमोपजीविता[१५१] आली तया**
**॥२६१॥ दृष्टादिवस्तुशेषनिरोधा । धर्म म्हणतां उपदेशबाधा[१५२] ।**
**अदृष्टवस्तुशेषनिरोधा । धर्म म्हणणें आगमपरतंत्रें ॥२६२॥**
**एरवीं निरोधाच्या ठायीं । युक्तीनें धर्मताचि नाहीं ।**
**नपुंसकासी कायी । ब्रह्मचर्याधिकार शास्त्रीं ॥२६३॥**

निरोधें धर्म साधें सकल । तरी नपुंसकास मिळावें ब्रह्मचर्याचें महाफळ।
परी धर्मशास्त्रोक्त वैदिकसंस्कारहि सकळ । तिरस्कारिती नपुंसका ॥२६४॥
अनागमनिरोधु[१५३] धर्म वहिला । तरी जाण हा कोणे संकल्प केला ।
कीं मी मातेवांचूनि अन्य स्त्रीला । कल्पांतीहि न भोगी ॥२६५॥
जैसें स्वस्त्रीवांचूनि परस्त्रीगमन । वर्जणें निरोधाचेंचि साधन ।
तरी मातेवांचूनि विवाहित स्त्री आदिकांचें गमन ।
वर्जणें निरोध साधन कां नव्हे ॥२६६॥
येथ हेतुसाम्यत्वें नाहीं असिद्धता । म्हणोनि निरोधधर्में मातृगमनासहि धर्मता ।
म्हणशील निरोधानुकूल विवाहाचीच व्यवस्था ।
तरी आगमपरतंत्रता न सोडी ॥२६७॥
स्वत्त्व मातेवरी जेवढें । परकन्येवरी नाहीं तेवढे ।
गर्भांतूनि येतां रोकडें । उपस्थहि लागेल योनीतें ॥२६८॥
एवं तर्के मातृगमन महाधर्म । होऊं पाहे म्हणोनि धरावा आगम ।
जो कोठें बोलिला युक्तिसंभ्रम । तो बालरंजनमात्र ॥२६९॥
जेविं औषध घेऊनि हातीं । माय म्हणे बालकाप्रती ।
काल मी तुज प्रभातीं । दिधलें कीं नाहीं भातुकें ॥२७०॥
तैसें आजहि वत्सा घेईं । ऐसेनी औषध पाजी आई ।
बाळासी भुलवी लवलाहीं । गतदिनस्मृति हेतुवशें ॥२७१॥
परी तो केवळ तर्काभास । तैसेंचि आगमोक्त न्याय विशेष ।
तर्क वाढवावयास । तात्पर्य नाहीं तयाचें ॥२७२॥
पुनः निरोधास धर्म म्हणतां । तरी यमांगेंचि[१५४] साधेल योगता ।
मग अष्टांगाची व्यवस्था । होईल वृथा सर्वही ॥२७३॥
यद्यपि श्रीमद्भागवतीं । 'आसुनिवृत्तिरिष्टे' त्यादि श्लोकोक्ति ।
धर्ममूलक निरोधयुक्ति । बोलिल्या आथी अनुगमार्थ[१५५] ॥२७४॥
तथापि 'आसु' या सप्तमीवचनविशेषें । सुरा-मांस-मैथुनपिसें ।
निवृत्त करावें ऐसें । बोलिलें आहे ॥२७५॥
परी तितुक्यानेंचि धर्म साधे । हें नाहीं बोलिलें विशदें । (य११पू.३१)
किंवा 'आसु निवृत्तिरिष्टा'' हेंही शब्दें । भागवतेंचि बोलिलें ॥२७६॥


भागवतवचनास्तव ही युक्ति । प्रमाण आहे निश्चितीं ।
एरवीं अमूळ[१५६] युक्ति । निरोधोक्तीहि आतांचि खंडिली ॥२७७॥
पित्याचें मांस वर्ज्य करून । इतर मांसाचा न करी यज्ञ ।
येणें संकल्पें धर्मसाधन । घडे केवीं ॥२७८॥
अथवा निरोधरूप सर्वथा । धर्म एक म्हणतां ।
तरी गंगास्नानादि व्यवस्था । होईल वृथा निश्चयें ॥२७९॥
किंवा निरोधासचि धर्मलक्षण । म्हटलिया शून्यसमाधीहून ।
भगवंताचें नामस्मरण । श्रेष्ठ न होईल किंचित् चांचल्यास्तव ॥२८०॥
परी अभावयोगाहून[१५७] । ईश्वरशेष[१५८] महायोग श्रेष्ठ म्हणे कूर्मपुराण ।
आणि तातांचेहि वचन । ऐसें आहे ॥२८१॥
''श्रीगुरुचें उशिटें । लाहे जैं अवचटें ।
तै तेणें लाभें विटे । समाधीसी ॥ (४५०.ज्ञाने.अ.१३.)
गुरुवाक्यश्रवणावांचुनी । समाधि नुपजवी ज्ञान मनीं ।
हें वेदान्तग्रंथीं स्थानीं स्थानीं । बोलिलें आहे ॥२८२॥
'ऐसा सांडूनि सोहळा । कोण लावुनि बैसे डोळा'' ।
इत्यादि तुकारामोक्ति वेल्हाळा । निरोधकुश्चळा[१५९] न म्हणती धर्मु ॥२८३॥
म्हणोनि श्रुतीनें बोलिला । कां स्मृती विस्तारिला ।
तोचि एक धर्म बोलिला । येर अधर्म सर्वथा ॥२८४॥
कां पंचरात्रें बोलिला अपर । कीं श्रीमद्भागवतें बोलिला पर ।
तो महाधर्म समग्र । भगवत्प्रद ॥२८५॥
तैसा भलतिया मार्गी ईश्वरशेषें[१६०] । एकादा गेला प्रतारकवशें[१६१] ।
तरी ईश्वर तारी निजविश्वासें । म्हणोनि वचनविशेषें उपजे धर्मु ॥२८६॥
इंद्रियमनोनिग्रहेंकरून । धर्म उपजे हें आगमाचेंचि वचन ।
यालागीं मानसनिरोध धर्मलक्षण । सुखें हो कां ॥२८७॥
परी अदृष्टउत्पादक । धर्म तो बोलिजे आणिक ।
जो भगवदर्पण केलिया सम्यक । निपजवी ज्ञाना ॥२८८॥
केवळ मननिग्रहें धर्म उपजतां । न लागेल इतर सत्त्वव्यवस्था ।
तरी शरीरा सत्त्वपरमाणुता । घडेल केविं ॥२८९॥

प्राणादिक जड समग्र । कैसे होतील सत्त्वाकार ।
किंवा देशकालादि देवताभार । विघ्न न करी हें घडे केंवि ॥२९०॥
शतबद्ध[१६२] तामसाच्या ठायीं । एकट्या जीवाचा प्रयत्न कायी । (य११पू.३२)
यद्यपि दृष्टिसृष्टिवादें सर्वहि । मिथ्या आहे ॥२९१॥
अल्पहि प्रयत्न मिथ्या पराभवित[१६३] । परी न घडे समान सत्तेआंत ।
सत्य आगमोपजीविता[१६४] विषमसत्तेंत । न सांडी कदा ॥२९२॥
स्वप्न आपणचि उपजवितां । परी स्वप्नींच शत व्याघ्र पाठीं लागतां ।
तरी आपल्या एकट्याचें बळ तत्वतां । चालें केविं ते ठायीं ॥२९३॥
कीं स्वाप्निक शत स्त्रिया येऊन । बळेंचि करितां आलिंगन ।
तरी जागृतींताल ब्रह्मचर्यसंस्काराविण । कैसें मन धरवेल तेथ ॥२९४॥
आणि जागृतींतील ब्रह्मचर्यसंस्कार । तो तंव आतांचि बोलिला
आगमानुसार । यालागीं आगमपरतंत्र । सर्वथा धर्मू ॥२९५॥
सत्त्ववृद्धि धर्माचें लक्षण । आणि आगम तेथ प्रमाण ।
आगम म्हणजे ईश्वरवाक्य वा पूज्यवचन । पूज्य जाण हितकर्ता ॥२९६॥
तो आगमु अधिकारभेदीं । भिन्न भासलिया निजबुद्धि ।
हनन करूं नये त्रिशुद्धि । ऐसी प्रसिद्धि आगमाची ॥२९७॥
बाळासी आगम मायेचें वचन । तेथ मातेसी नसतां शास्त्रीय ज्ञान ।
तरी काय तिचें हितवचन । मोडावें बाळें ॥२९८॥
म्हणोनि उपदेशक पाहिजे हितकर्ता । मग तया असो नसो सर्वज्ञता ।
बाळासी प्रमाण आपुली माता । बालअवस्था जंववरी ॥२९९॥
एरवीं वेदान्तीं अध्ययन । जितुकें जितुकें न्यून ।
असोनि जयातें ब्रह्मज्ञान । तोचि उत्तम अधिकारी ॥३००॥
जितुकें जितुकें अधिकाध्ययनें । जयासी घेणें ब्रह्मज्ञानें ।
तितुकें तया कनिष्ठ म्हणणें । निश्चय केला ॥३०१॥
या वेदान्तयुक्ति देखतां । तरी उत्तम गुरूसी भूषण अल्पज्ञता । म्हणोनि बापा
विनयसंपन्नचित्ता । श्रीमद्भागवतोक्त भगवन्निष्ठता भागवतधर्मु ॥३०२॥
एवं सर्वथा सांडोनि युक्ति । आगमानुसार यत्नरीति । सत्त्ववृद्धि धर्म निश्चिती ।
तत्साधन आगमादि दशकोक्ति पुढें ऐक ॥३०३॥



“[१]आगमो[२]ऽपः [३]प्रजा [४]देशः [५]कालः [६]कर्म च [७]जन्म च ।
[८]ध्यान-[९]मंत्रोऽथ [१०]संस्कारदशैते गुणहेतवः ॥४॥ (भाग.स्कं.११.अ.१३)
(१)आगम म्हणजे होय शास्त्र । जेणें उघडती बुद्धीचे नेत्र ।
(२)जल तेंहि करी पवित्र । प्राणरूपादौ परिणमोनी ॥३०४॥
(३)प्रजा म्हणजे तद्धार्मिकसंगति । क्षणोक्षणीं वाढवी आगमोक्त गुणाप्रती ।
सात्त्विकागमीं सत्संगती । बोलिली जे ॥३०५॥ (य११पू.३३)
(४)देश तो भूतगुणा । निका वाढवी गुणपणा ।
(५)कालहि निजबळें गुणा । वाढवितु होय ॥३०६॥
(६)कर्म तें उपजवी अदृष्ट गुण ।(७)दीक्षा निवारी सकल विघ्न ।(८)ध्यान एकाग्र करी
मन । (९)मंत्र दोषनिर्दलन करूनि भगवदाव्हान करी ॥३०७॥
(१०)संस्कार उपजवी तदीयता । एवं गुणवृद्धीचीं तत्त्वतां ।
दश कारणें परी या समस्तां । आगम मूळ ॥३०८॥
येथ सात्त्विक हे दहा घेईजे । तरी सत्त्ववृद्धि पाविजे ।
एरवीं ज्या गुणाचें दशक घेईजे । तो गुण वाढे ॥३०९॥
अधिकारभेदें तामस राजस । सात्त्विक होती ही कवणास ।
परी तेथहि आगमास । मूलत्व आहे ॥३१०॥
हें सत्त्वागमाचें उदाहरण । घेऊनि काहीं करूं निर्वचन[१६५] ।
प्रथम लक्षूनि स्वाभाविक मानस अल्पगुण । आगमकथन प्रवर्तवी निज ॥३११॥
गंगेचें माहात्म्य थोर । आगमाविण न कळे सार ।
एरवीं सारखेंचि नीर[१६६] । सर्वत्र आहे ॥३१२॥
शिवालयादि देश । आगमेंचि आले महत्वास ।
एरवीं पृथ्वीत्वास । उणें काय स्मशानींहि ॥३१३॥
प्रातःकालचि आगमीं बोलिला । संध्याकाळ संध्येसी वहिला ।
तोही आगमेंचि उपदेशिला । एरवीं कैसा कळे ॥३१४॥
आगमप्रधानचि विद्वत्संगति । आगमाविण नाहीं कर्मनिष्पत्ति ।
दीक्षेची आघवी रीति । वेद वा पंचरात्रागम ॥३१५॥
मंत्र म्हणजे आगमगत । शब्दविशेष सर्वसंमत ।
आगमावांचून नाहीं उपजत । ध्यान निश्चित कल्पांती ॥३१६॥

**आगमांवाचून संस्कार । सर्वथा नोहे साचार ।**
**एरवीं प्रत्यक्षादि प्रमाणें संस्कार । देहाहंकाररूप आहे ॥३१७॥**
**आगमचि गुणस्वरूपें गुण प्रवर्तवी[१६७] । यालागीं सकळ आगममूळ**
**बोलिजे ऊर्वी[१६८] । काहींच उपपन्न[१६९] आगमापूर्वी । नाहीं म्हणूनी ॥३१८॥**
**''आचारहीनं न पुनन्ति वेदा'' इति ।**
**धर्मरहित आगमपठणनैष्फल्योक्ति । त्याहि आगममूळचि निश्चितीं ।**
**म्हणोनि सकळ गुणप्रतीति । आगमोपजीव्य ॥३१९॥**
**यालागीं आगम करोनि प्रधान । ये ग्रंथीं निरूपण ।**
**यथावकाश संपूर्ण । कीजेल ते सज्ञन परिसोत ॥३२०॥**
**श्रीज्ञानेश्वरचरणकमल । सकलमंगलाचें मंगल ।**
**येथ विघ्नाचें नांव तिन्ही काल । स्पर्श न करी ॥३२१॥**
**हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यप्रबंधे संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे मंगलाचरणंनाम प्रथमं कुसुमम् ॥ (य११पू.३४)**

०००

---

## अध्याय १ ला शब्दार्थ टीपा :-

(१) प्राणप्रिय श्रीकृष्णाची (२)हृदयात (३)प्राणायाम केला न केला (४)पाहून (५)आनंदली (६)पावून (७)तसे (८)आवडते (९)आत्म्याचे (१०)मैं तो छांडे सब काम भई पायकी गुलाम । उर मेरे आठो याम स्वामी अलंदीराज है ॥ (११)शिरोभूषण (१२)संघ-पाठभेद (१३)श्यामतनु (१४)आर्त (१५)लाजून राहिली (१६)सुवर्णकान्ती (१७)रसना (१८)सौंदर्यसुख (१९)पाण्यातील प्रवाळाची (२०)मण्यातील (२१)विद्युत्,विजेच्या (२२)साडीची (२३)अरुणापासून (२४)स्वारी (२५)शोभा (२६)लाली (२७)संसारवणव्याने पोळलेल्यांना (२८)हिमालय (२९)वसंतऋतु (३०)उपाय हेच कोणी वन तेथे (३१)मांग (३२)नावाचे एक मोठे कवि (३३)नाश (३४)परंपरा अकारण (३५)मोठा (३६)विघ्ननाशास (३७)कारण (३८)मंगलाचरणाबरोबरच (३९)पुण्याने (४०)मंगल केले तरच विघ्ननाश होऊन ग्रंथ पूर्ण होतो असे म्हणणे हा अन्वय किंवा सहचार.  मंगलाचरण न केल्यास विघ्ननाश होत नाही



म्हणून ग्रंथही पूर्ण होत नाही असे म्हणणे, व्यतिरेक  किंवा व्यभिचार होय. (४१)नाश (४२)अपेक्षा, वाट (४३)फल (४४)ज्ञान उत्पन्न करणारे पुण्य (४४अ)पापनाश (४५)पापक्षय (४६)विशेष सांगावयाचे (४७)बौद्ध (४८)बुद्धिभेद, फसवणूक (४९)थोरांचे आचरण (५०)वाटेल तसे भरमसाठ प्रतिपादणारे (५१)तथ्यरहित (५२)वेदाने करावयास सांगितलेले (५३)घातली (५४)स्वभावतः (५५)अनुमानाची मांडणी (५६)मान्य (५७)प्रमादी मनुष्याने केलेले (५८)निराळे करणारे (५९)अनिष्ट करणारी वागणूक (६०)प्राप्ती (६१)शेवटी अनिष्ट उत्पन्न करीत नाही म्हणून शिष्ठ लोक त्याचे आचरण करितात या हेतूवरून ते ठष्ट फल देणणारे आहे. (६२)कमीपणा (६३)उल्लेख (६४)सर्वमान्य (६५)भेद (६६)ऐक्य (६७)दुसऱ्या कशाने (६८)नमस्काररूप मंगल न करताहि (६९)निरर्थक (७०)गुप्त ठेवावे म्हणून (७१)स्पष्ट गोवलेले नाही (७२)मंगलाचरण न करणारे (७३)कर्म होतेवेळी (७४)विघ्ने (७५)प्रतिबंध (७६)पुत्र (७७)मधुराद्वैत म्हणजे ज्ञानानंतर होणारी भक्ति हीच कोणी सुवर्णालंकारांची राशी, तिला प्रसवणणारा हा ग्रंथ जणुंकाय स्यमंतक मणीच होय. राजा सत्राजित याचेपाशी स्यमंतक नावाचा मणी सूर्यनारायणाने दिलेला होता व तो रोज सुवर्णराशी प्रसवत असे. अशी भगवतात कथा आहे. (७८)आगमातील संपूर्ण रहस्यप्राप्ति (७९)उपासनांचा समुद्र (८०)प्रमाण आहे (८१)कांही निमित्ताने वेळोवेळी प्रवृत्त झालेले धर्माचार (८२) तो धर्म निर्माण करणारे तेच प्रवर्तक (८३)नांवाचे ऋषी (८४)आचार्य म्हणजे प्रवर्तक (८५)यमाकडून (८६)आंधळा आहे (८७)याच्या उलट (८८)समर्थ (८९)आपल्याहून दुसऱ्याच्या ठिकाणी कमीपणा पाहणे (९०)श्वेतकेतूने जसा आजपासून जो कोणी परस्त्रीगमन करील तो नरकगामी होईल,असा नियम करून टाकला त्याप्रमाणे (९१)हिरवा (९२)सोडावा (९३)उत्तम, योग्य (९४)पुढे प्राप्त होणारे (९५)स्पष्ट (९६)पात्रता (९७)उत्पत्ति (९८)उत्पन्न झाली नाही तिचे ठिकाणी (९९)प्राप्त (९९अ)दृढ (१००)व्यवहार दशेतहि  (१०१)नास्तिक्य निश्चय. ही असंभावना दोन प्रकारची आहे. प्रमाण असंभावना व प्रमेय असंभावना. ब्रह्म केवळ श्रुतीने कळते असे नसून प्रत्यक्षादिकानेच कळते असे निश्चित वाटणे ही प्रथम; आणि ब्रह्म व जगत् विलक्षण आहेत म्हणून ब्रह्म जगताचे कारण नसून प्रकृतीच एक जगताचे कारण आहे असे

वाटणे, ही दुसरी असंभावना होय. (१०२)मी देह आहे असे वाटणे (१०३)अभ्यासा वांचून (१०४) यांच्या वचनाने माझी अविद्या नाहिशी झाली या उपकाराच्या स्मृतीमुळे (१०५)युक्त, सहित (१०६)ब्रह्मपणाचा अभिमान (१०७)नीट, समर्थ (१०८)विरुद्ध (१०९)प्रतिष्ठा (११०)यमपुरी (१११)ब्रह्मलोकादिकात (११२)सगुणोपासक (११३)गौण (११४)प्रमाणाने (११५)एकवाक्यता करणारा (११६)साखरेच्या ठिकाणचा (११७)गुणारोप (११८)एकवाक्यता पाहये (११९)संशयित (१२०)आठ प्रकारचे (१२१)ब्रह्माचे ठिकाणी अज्ञानाने भासणारा (१२२)ब्रह्मज्ञान होईपर्यंत (१२३)सुखदुःखाला कारणीभूत अशा पाप पुण्याच्या दृष्टीने (१२४)पाप-पुण्यात्मक (१२५)निर्दयपणा, विषमता (१२६)व्यक्त करणारी (१२७)संध्येतील एक विधी (१२८)शक्ति (१२९)खोटे जे अज्ञान ते ईश्वराचे ठिकाणी नसल्यामुळे (१३०)श्रुतिस्मृतीने सांगितलेला (१३१)रजोगुण व तमोगुण यांनी युक्त असा सत्त्वगुण (१३२)श्रीकृष्ण (१३३)प्रयत्नसाध्य (१३४)द्वेष न करणारे वगैरे (१३५)एकनाथमहाराज (१३६)सुखदुःखे (१३७)भूतमात्राचे ठायी दया (१३८)प्रयत्नाने मिळवून घेण्याजोगा (१३९)अश्रमरूप (१४०)आहवनीय अग्नीचे ठिकाणी होणारे (१४१)ज्याचे फळ अदृष्ट आहे (१४२)दृष्टफलावसायी (१४३)शास्त्रावांचून (१४४)अदृष्टद्वारा फळ देणारा (१४५)ईश्वराला कळणारा (१४६)हाती येतो (१४७)आळा (१४८)केवळ इंद्रियादि प्रवृत्तीस आळा घालणारा (१४९)एखादि वस्तू प्राप्त करून घेण्याकरिता नसेल तर (१५०) माध्यमिक नावाच्या बौद्धांची स्थिति मानण्यासारखे (१५१)शास्त्रावर अवलंबून असणे (१५२)शास्त्रोपदेशवैय्यर्थ्य (१५३)शास्त्रास सोडून (१५४)यमाचे अनुष्ठान केल्याने (१५५)कळण्याकरिता (१५६)शास्त्रवाचून (१५७)शून्ययोग (१५८)ईश्वर ध्येय ठेवून केलेला (१५९)मलिनास (१६०)ईश्वर ध्येय ठेवून (१६१)भलता उपदेश करणाऱ्याच्या मागे (१६२)शेकडो ठिकाणी गुंतलेल्या (१६३)नाहिसे करितो (१६४)शास्त्रावर अवलंबून असणे (१६५)निरूपण, फोड (१६६)पाणी (१६७)प्रवृत्त करितो (१६८)पृथ्वीवर (१६९)प्राप्त

..........................................................................................................................



॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## अध्याय २ रा.

# नाममहिमा निर्णय

जय जय सद्गुरु मायबहिणी । मज निरखीं करुणानयनीं ।
पुढें ग्रंथ चालवोनि । विश्व हें रक्षी ॥१॥
स्वामीतें विचारावया । जें जे वाटेल हृदया ।
तें उत्तर तया । स्वामीदत्तस्फुरणें[१] ॥२॥
तो हा गुरुशिष्यसंवादु । ग्रंथरूपेंचि अनुवादु[२] ।
जेथ कर्मोपास्तिभक्तिबोधु । स्वानंदप्रदु सांपडे ॥३॥
नाना गुरु करोनि । मी पोळलिया स्वमनीं ।
आणि पापेंहि अनुदिनीं । करितचि असतां ॥४॥
परी आपुलेपणाची नवाई । न सोडीच सद्गुरु आई ।
म्हणोनि स्वयें लवलाहीं । दिधला मंत्र चतुराक्षरी* ॥५॥
''कैवल्यकनकाचिया[३] दाना । जो न कडसी[४] थोर साना ।''(अमृ.)
या आपुलिया वचना । साच केलें ॥६॥
तो मंत्र माझा मियाचि जपावा । येर कोणी नोच्चारावा ।
हा संप्रदायनियम बरवा । पाळावा सकळीं ॥७॥

ग्रंथपठन : शाप आणि रीति

येथ माझेनि मुखें तात । बोलिजे तें मानिजे यथार्थ ।
नायकतां बहिर्भूत । संप्रदायांतुनी ॥८॥
जया करणें ऐसें आचरण । हा ग्रंथ निरखावा त्यान ।
येरां घडेल मातृगमन । सद्गुरु-आण ये विषयीं ॥९॥
नर आणि नारी । येथ निःशेष अधिकारी ।
उघड मंत्र *सप्ताक्षरी[५] । जपावा सिद्धारिचक्राविणें[६] ॥१०॥

(टीप :- सप्ताक्षरी मंत्र म्हणजे ज्ञानराज माउली.)

म्हणाल हा मंत्र मराठी । तरी ही संताची परिपाठी ।
अबद्ध सुबद्ध गोमटी । दिसती दृष्टि तेचि घेती ॥११॥

श्रीराम जयराम जय जय राम । हा त्रयोदशाक्षरी मंत्र उत्तम ।
मौनें जपावा संप्रदायनियम । समर्थे केला ॥१२॥
समर्थ असोनि ब्राह्मण । त्रयोदशाक्षरी मानला प्रणवाहून ।
शिलपिल्ले या नांवें करून । तरल्या कुमरी ॥१३॥

सर्व शब्दांचा अर्थ ईश्वर

*लौकिक *अलौकिक *अभाव *ईश्वर । हे शब्दाचे अर्थ असती चार ।
लौकिक घटादि शब्दव्यवहार । अलौकिक शास्त्र स्वर्गादि ॥१४॥
अभाववाचक शशशृंगादि । परी समासाविण तदसिद्धि । (य११पू.३५)
पाणिनीय[७] म्हणती बौद्धीं[९] । अभावहि येतो ॥१५॥
शब्दार्थाचा नित्यसंबंध । अर्थावांचून न राहे शब्द ।
म्हणोनि लौकिक-अलौकिक-अभाव-रहित[१०] जे एक पद ।
केवळ गोविंद अर्थ त्याचा ॥१६॥
लौकिक-अलौकिक-अभाव-रहित । परिभाषा[११] नसतां विवक्षित[१२] ।
कोणत्याहि अक्षराचा अर्थ । होय भगवंत निःसंशय ॥१७॥
विवक्षा[८] असली ईश्वराची । तरी लौकिकादिहि शब्दांची ।
अर्थवत्ता साची । परमेश्वरींचि घटे ॥१८॥
(पूर्वपक्ष) आतां झणी कां डित्थादि शब्दांप्रती । अर्थ नाहीं म्हणतां निश्चितीं ।
तरी अर्थ नाहीं हे विवक्षा निश्चिती । पाहिजे तया ॥१९॥
विवक्षेविण सकळ शब्दार्थ । जरी नारायण हा सिद्धान्त ।
तरी अवघियातें घडत । नामस्मरण म्हणावें ॥२०॥
(उत्तर) अवघीयातें नामस्मरण । हें बोलणें नाहीं अकारण ।
परी वासना महादारुण । ते घेई पूर्ण लौकिक-शब्दार्थ ॥२१॥
अत्यंत नेणतपणें शब्द । विषयरहित वदतां शुद्ध ।
तरी अवश्य प्रसिद्ध । नामस्मरण होईल ॥२२॥
परी तेवढें नेणते लौकिकार्था । दुर्लभ असे तत्वतां ।
बाळाच्याहि शब्दार्था । मायेस याचनाद्यर्थ असती ॥२३॥
आणि पशुपक्ष्याचे धणी (ध्वनी) । विवक्षे येती लौकिकस्थानीं ।
यालागीं नारायणीं । विवक्षा नव्हे ॥२४॥

म्हणोनि विवक्षेविण । अवचित घडलिया नामस्मरण ।
तयाचें फळ होय पूर्ण । जेंवि तरला ब्राह्मण पुत्रनामें ॥२५॥
तीं नांवे पुराणप्रसिद्धें । जे ऋषि गाताती स्वच्छंदें ।
येऱ्हवीं भाषांतरें अनुवादें । ते श्रद्धेविण न फळती ॥२६॥
हें भगवंताचें नांव । ऐसा पाहिजे भाव ।
आणि पुराणप्रसिद्ध तंव नांव । असतां नसतां भाव फळे ॥२७॥
कां संतानें दिधलें । कां विश्वासें ठेविलें ।
तें पुराणप्रसिद्धासम पहिलें । आणि दुसरें श्रद्धे फळे ॥२८॥
म्हणवोनि शिलपिल्ले ईश्वरनांव । हें मानोनि तरल्या कुमारी सावेव ।
नामें उच्च नीच भाव । दूर टाकिला ॥२९॥
नारी नर हीनयाती । नामें अवघेचि तरती ।
नामापरतें साधन निश्चितीं । नाहीं नाहीं कलियुगीं ॥३०॥
स्मरण आणि ध्यान । हें नामेंचि घडे संपूर्ण । नामें पतित तरले दारुण ।
हें वदले आचार्य आपण विष्णुसहस्रनामभाष्यीं ॥३१॥
''मनसा वा अग्रे संकल्पयत्यथ वाचा व्याहरति''
''यद्धि मनसा ध्यायति तद्वाचा वदति'' (य११पू.३६)
''इति श्रुतिभ्यां स्मरणं ध्यानं च नामसंकीर्तनेऽन्तर्भूतम्''
नवल सप्रेम नामाची गति । अबद्ध म्हणतांहि श्रुति ।
फळ पावे यथा निगुती[१३] । साक्ष देती पुराणें ॥३२॥
'ऐं' हें बीज असोन । निरनुस्वारहि निघतां मुखांतून ।
महासंकटींहि गेले तरोन । देवीभागवत प्रमाण येविषयीं ॥३३॥
''नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिका पंथा जासी झणी''
इत्यादि करुणानिधि तातवाणी ।
सुखें निवटावें नामस्मरणीं । सांडूनि आन उपायाते ॥३४॥
(पूर्वपक्ष) येथ ऐसें म्हणती कोणी । कीं कलींत वेदोक्त सांडोनि ।
मूर्ख विनटले नामस्मरणीं । ते आघवेचि पतनीं अधिकारी ॥३५॥
(उत्तरपक्ष) परी हें बोलणें अवघें वृथा । जे युगींचा जो धर्म सर्वथा ।
त्यावीण आचरितां अन्यथा । कष्ट पडती ॥३६॥

इतर युगींचे धर्म पूर्ण । कलियुगीं करितां हरिकीर्तन ।
मिळती येथ असती प्रमाण । श्रुतिस्मृति ॥३७॥
''ध्यायन् कृते यजन् यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ।
यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवम् ॥''
''हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम् ।
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥''
नामधारकाहून इतर । धर्महि सोडिती जे नर ।
तेचि कलिदोषा समग्र । लिप्त होती ॥३८॥
आघवींच पुराणें । विशेष बोधिती कलिजनाकारणें ।
शिव केशव नामस्मरणें । कलींत तरती महापापी ॥३९॥
धर्महीन लोक निश्चिती । शेवटीं कलींत वर्णसंकर करिती ।
तेव्हां नामबळेंचि लोक तरती । प्रमाण श्रुति येविषयीं ॥४०॥
''अपि वा यश्चाण्डालः शिव इति वाचं वदेत्
तेन सह संवदेत् तेन सह संवसेत् तेन सह भुंजीत ॥'' (शिवार्कमणिदीपिका)
वर्णसंकर कलीचे अंतीं । तत्कालीन आचरण सांगे ही श्रुति ।
मध्यें जेऊं नये निश्चितीं । चांडालहातीं उच्चवर्णी ॥४१॥
किंवा चारी वर्णाची भिक्षा । चाले ऐसी परमहंसदीक्षा ।
जयातें जाहली विधिपरीक्षा । निवर्तोनी ॥४२॥
जयाचिया ज्ञानानळें[१४] । संसारतृण जळालें सगळें । परी भक्तीसाठीं
जीवित रुळे[१५] । तयाचें आचरण सांगे ही श्रुति ॥४३॥ (य११पू.३७)
अथवा बळेंचि नाम घेऊनी वदनीं । वर्णसंकर करतील कोणी ।
तरी भाविक तरतील तया वंदुनी । आणि तेही तरतील अति श्रमें ॥४४॥
नामाचे दहा अपराध । ते न करोनि नाम घेतां शुद्ध ।
तरी तात्काळ तरे प्रसिद्ध । संशयो नाहीं ॥४५॥
निरपराध नामग्रहण । हें वरिष्ठ सर्वाहून ।
परी सापराध नामग्रहण । तेंहि तारी पद्मपुराण सांगे ॥४६॥
''जाते नामापराधे तु प्रमादे तु कथंचन ।
सदा संकीर्तयन्नाम तदेकशरणो भवेत् ॥२१॥



नामापराधयुक्तानि नामान्येव हरन्त्यघम् ।
अविश्रान्तिप्रयुक्तानि तान्येवार्थकराणि यत् ॥२२॥'' (पद्मपुराण ब्रह्मखंड अ.२५)
अपराधहि करोनि । नामहि नेघे वाणी ।
तयापरीस सापराध नामग्रहणीं । वरिष्ठता ॥४७॥
मूर्ख जे लोक असती । ते नाममाहात्म्या म्हणती स्तुति ।
आणि नामहि वाचे न घेती । ते न तरती सर्वथा ॥४८॥
म्हणोनि निरपराध वा सापराध । नाममंत्रचि जपावा विशद[१६] ।
कल्कि अवतारें रक्षिला सिद्ध । द्विज तो नामबळेंचि ॥४९॥
अनध्यस्तविवर्त शब्द तो नाम । अनध्यस्तविवर्तरूप[१७] मेघश्याम ।
येथ प्रधानगौणसंभ्रम[१८]। करूं नये हें तुकाराम वदती ॥५०॥

अभंग श्रीतुकारामांचा -

'नामाचे पवाडे बोलती पुराण । होवोनि कीर्तन तोचि ठेला ॥१॥
आदिनाथा कंठीं आगळा हा मंत्र । आवडीचें स्तोत्र सदा घोकी ॥२॥
आगळें हे सार उत्तमा उत्तम । ब्रह्मकर्मा नाम एक तुझें ॥३॥
तिहीं त्रिभुवनीं गमन नारदा । हातीं वीणा सदा नाम मुखीं ॥४॥
परीक्षिता मृत्यु सातां दिवसाचा । मुक्त झाला वाचा उच्चारितां ॥५॥
(कोळियाची)केलियाची कीर्ति वाढली गहन । केलें रामायण रामा आधीं ॥६॥
सगुण निर्गुण तुज म्हणे वेद । तुका म्हणे भेद नाहीं नामीं''॥७॥(गाथा १८०५)

रूप व नामसाक्षात्कार

आणि तुलसीदासहि एवंविध । बोलिले आथी प्रसिद्ध ।
कीं रूपसाक्षात्कारसम शुद्ध । नामसाक्षात्कार हा अभिप्रायु ॥५१॥
''समुझत सरस[१९] नाम अरू[२०] नामी । प्रीति परस्पर प्रभु अनुगामी[२१] ।
नामरूप दोउ ईशउपाधी । अकथ[२२] अनादि सुसामुझि[२३] साधी[२४]।''
(तुलसीरामायण बालकांड.) (य११पू.३८)
''स भूरित्युक्त्वा भुवमसृजदिति'' । स्वयें सांगते जननी श्रुति ।
कीं नामें प्रगटरूप स्थिति । बहु असती स्मृतिहि त्या ॥५२॥
नाम प्राणाचा प्राण । नाम जीवाचें जीवन ।
नाम म्हणजे नारायण । भाव भिन्न कल्पूं नये ॥५३॥

'असति[२५] नाम-वैभव-कथा' । हा अपराध आहे सर्वथा ।
परी जो अपराधहि करी आणि नाम वर्जी तत्वतां ।
त्यापरीस 'असति नामवैभवकथा' अपराध नव्हे ॥५४॥
म्हणोनि नामाची स्तुति । आम्ही निर्भय होवोनि करूं चित्तीं ।
संतनिंदाहि अपराध निश्चितीं । म्हणून शुद्धाचरणहि निंदूं ना ॥५५॥
शुद्धाचरणाची निंदा करून । बळेंचि असन्मार्ग स्थापून ।
जरी उपदेशूं नामस्मरण । तरी मग होऊं अपराधी ॥५६॥
परी शुद्धाचरण पाहिजे आम्हासी । नाम तंव तारी शुद्धाशुद्धासी ।
या वस्तुतंत्र [२६]माहात्म्यासी । काय करावें ॥५७॥
वेदाहूनि नाम वरिष्ठ । हें आम्ही म्हणों मुक्तकंठ ।
'आचारहीनं न पुनन्ति वेदाः' स्पष्ट । स्मृति ऐसी ॥५८॥
नामें तरला अजामिळ । गणिका तरली वेल्हाळ[२७] ।
महामूढ तरला केवळ । भद्रजाती[२८] तो ॥५९॥
कृतयुगीं पुण्यधामा विप्र । तैसाचि प्रल्हाद असुर ।
त्रेतायुगीं शबर्यादि समग्र । नामेंचि तरले ॥६०॥
द्वापरीं गोपउद्धवादि निश्चितीं । नामेंचि तरले पुराणें वदती ।
कलींत तरले नाहीं मिती । पुढेंहि तरती अनंत ॥६१॥
येथ ऐसें म्हणती कोणी । कीं नामधारकावरी चक्रपाणि ।
कृपा करी भलत्या मिषानीं । तरी तो न्यायी न होय ॥६२॥
याचें ऐकावें उत्तर । कीं कोणी एक व्यक्ति ईश्वर ।
त्याचा पिता तयासी नाम ठेवणार । हें साचार आम्ही न म्हणों ॥६३॥
ईश्वर दयालु कीं न्यायकर्ता । तया स्वातंत्र्य कीं परतंत्रता ।
हे आघवीचि शंकापंकता[२९]। निमित्तकारणार्था[३०] कलंकी[३१]॥६४॥
आमचा ईश्वर निमित्तोपादान[३२] । जो जो पदार्थ तदवच्छिन्न ।
नामहि तोचि म्हणोन । तया झगटतां पूर्ण तारी पापी ॥६५॥
ईश्वर जरी व्यापक नसता । तरी दयालु कीं न्यायीं हा प्रश्न येता ।
व्यापक म्हणोनि यद्यदवच्छिन्नता । तत्तद्गुणवत्ता तेथ घडे ॥६६॥ (य११पू.३९)
गगन घटाकाश घटीं । मठाकाश होय मठीं ।



तैसें दयावच्छिन्न चैतन्य दयालु पोटीं । न्यायवृत्त्यवच्छिन्न न्यायकारी ॥६७॥
आतां दुःखादिवृत्त्यवच्छिन्न । तरी दुःखीहि होईल नारायण ।
परी दुःखादिकांचा जीव घे अभिमान ।
म्हणोनि त्या वृत्ति आपण ईशाकडे न जाती ॥६८॥
वृत्तींची ऐसी आहे रीति । कीं जो धरी तयांची अहंकृति ।
तयासी त्या झगटती । साक्षी ठेविती इतरांते ॥६९॥
सुख मी भोगी, पुण्य मी करी । दुःख मी भोगी, मी पापकारी ।
इत्यादि वृत्तींचा निर्धारीं । जीव धरी अहंकारु ॥७०॥
सकळ जग रक्षावया पाही । म्हणे मज सामर्थ्य नाहीं ।
म्हणोनियां लवलाहीं । दयावृत्ति जाय ईश्वराकडे ॥७१॥
वृत्ति जंव आहे तत्वतां । तिची कोणीच न धरी अहंता ।
तरी ती होय ईश्वराश्रिता । मान्य महंता सिद्धान्तु हा ॥७२॥
चेंडु आकाशीं फेंकिला । पुढती करीं न घेतां वहिला ।
तरी गति एक तयाला । पृथ्वीचि आहे ॥७३॥
म्हणोनि वृत्ति तंव उठती । परी जितुक्यांची जीव धरी अहंकृति ।
तितुक्याचि तया झगटती । येर जाती ईश्वराकडे ॥७४॥
जीवास अविद्या उपाधि म्हणून । नीचवृत्तीचा तया अभिमान ।
अर्थातचि उच्चवृत्तिसंपन्न । परमेश्वरु ॥७५॥
आपणातें बाळ म्हणतां । तरी इच्छेविण अन्या पितृता ।
तेविं जीव धरी कनिष्ठाहंता । तेणें उत्तमता भगवंतीं ॥७६॥
एरवीं आमुचिया मतीं । वादिशंकेची नोहे प्रवृत्ति ।
आम्हा वैदिकातें शंकास्थिति । शिवेचि ना म्हणोनि ॥७७॥
वादिशंकेचा अभिप्रावो । कीं जगीं आहे दुःखभावो ।
म्हणोनि ईश्वर स्वयमेवो । पापक्षमाकर्ता नोहे ॥७८॥
ईश्वर जरी दयाळु असता । तरी कोणत्याहि पापाची क्षमाचि करिता ।
आणि न्यायी ऐसें म्हणतां । भजकासीहि पाप न चुके ॥७९॥
या शंकेचें उत्तर । सावध ऐकें सविस्तर ।
आमुचिया धर्मी परमेश्वर । जीवशत्रु नाहीं कल्पिला ॥८०॥

जयांचिया धर्ममतीं । पापी जीव जे नरका जाती ।
पुनः सुटका नाहीं तयांप्रती । त्यावरी निश्चितीं शंका हे ॥८१॥
आमुचिया मतीं समग्र । उच्च नीच गति कर्मानुसार ।
पापीहि सुटती निर्धार । आपुलें पाप भोगोनी ॥८२॥
संबंध[३४] किंवा स्वरूपस्थिति[३५] । दोंचि रीतीनें परमेश्वरप्राप्ति ।
मानिली आहे आमुचे मतीं । नाहीं शत्रुता कल्पिली ॥८३॥ (य११पू.४०)
शत्रुताहि द्विविध जाण । स्वाभाविक आणि आगंतुक[३६] म्हणोन ।
नकुलसर्पादींचें प्रमाण । स्वाभाविक वैर ॥८४॥
प्रसिद्ध तें आगंतुक । त्यांत परमेश्वरजीववैर नाहीं स्वाभाविक ।
क्रूर श्वापद शत्रुरक्षक । हें देखिलें ना ऐकिलें ॥८५॥
पापिया परमेश्वर देत शिक्षा । परी तयाची अंतीं होय रक्षा ।
येणें आगंतुक वैरपरीक्षा । तेहि न घडे ॥८६॥
आगंतुक वैराचें कारण । आशाबद्ध पाहिजेत जन ।
आप्तकाम नारायण । तया आगंतुक वैर उपजेना ॥८७॥
स्वाभाविक जीवेश्वरवैर असतें । तरी धर्मोपदेशाचें कारण नव्हतें ।
प्रायश्चित्त न सांगतें । परमेश्वर पापाविषयीं ॥८८॥
आतां प्रायश्चित्तानें न होय पापनिवृत्ति ।
तरी पापें दुःख मिळे या तरी वचना कवण गति ।
ज्या धर्मी मूळावरी शंकेची प्रवृत्ति ।
ते धर्मी मूळ उत्तरानुकूल असतां त्याग न घडे ॥८९॥
एवं जीवेश्वरांची शत्रुता । कल्पिलीच नाहीं सर्वथा ।
आतां संबंधी परमेश्वर मानितां । तरी दयालुता सहज सिद्ध ॥९०॥
आदि अंतीं रक्षण । आणि आगंतुकनिग्रहशिक्षण[३७] ।
हें माता पितयाचें लक्षण । शत्रूचें नव्हे ॥९१॥
तें कैसें उमटे परमेश्वरीं । उपदेशादि रक्षणाचीच परी । आणि मरणकाळीं
अथवा प्रलयकाळीं हरी । आपणांतचि उपसंहरी व्यष्टिसमष्टि[३८] ॥९२॥
शत्रु जयासी मारीत । तया आपणामाजी नाहीं मिळवीत ।
यालागीं जगदुपादान भगवंत । वादिशंका तेथ उपजेना ॥९३॥



किंवा स्थित्युपादानपणें[३९] देवो । धरी कर्मानुसार फलद स्वभावो ।
तरी निमित्तपणें यदुरावो । भक्तवात्सल्यभावो सांडीना ॥९४॥
कारणीभूत[४०] तमोपहित । चैतन्य जगाचें 'उपादान' होत ।
कारणीभूत शुद्धसत्त्वोपहित । 'निमित्त' होत विश्वाचें ॥९५॥
शुद्धसत्त्वाच्या ठायीं । दयेचेंचि आधिक्य पाही ।
एवं भगवंत होय लवलाहीं । दयालुचि ॥९६॥
जैसें मातापितयाचें शरीर । पुत्रातें उपादान[४१] सुंदर ।
आणि तयांचा मनोभाव साचार । निमित्त होय ॥९७॥
तैसें निमित्तोपादान परमात्मा । मातृपितृचित्ता दयामहिमा ।
दार्ष्टान्तीहि[४२] दयागरिमा[४३] । भगवंतीं मिळे ॥९८॥
बाळें परस्पर कलह करितां । तरी उनाडा निग्रही माता ।
केवळ प्रेमें वा रोषें मायेकडे धावतां । तरी स्तनपानार्था कडियेचि घे ॥९९॥
तेवि जीव-जीव स्वाहंकारीं । भांडतां उनाडा दंडी हरी ।
जे प्रेमीं अथवा वैरी । परमेश्वराचेचि झाले ॥१००॥ (य११पू.४१)
तया कोणत्याहि मिषानें । भगवंता स्वपदचि देणें ।
सनत्कुमार आणि रावण मिळविणें । एकाचि परीं ॥१०१॥
''अगा मी एकलाणीचें[४४] खागें[४५] । मज येवों भलतेनि मार्गे ।
भक्तीं कां विषयविरागें । अथवा वैरें'' ॥४७०॥ ज्ञाने.अ.९.
इत्यादि श्रुति । ऐसेंचि निरूपिती ।
आणि आहे उपपत्ति । इयेविषयीं ॥१०२॥
बाळ आन कांहीं मागतां । तरी किंचित् सायासें देत माता ।
आणि रोषेंहि स्तनपान इच्छितां । तरी अनायासें पाजवी ॥१०३॥
तेवीं इतर विषयांचें याचन । तें परमेश्वर दे काळेंकरून ।
वैरेंहि करितां भगवद्भजन । तरी निजपदस्तनपान चुकवीना ॥१०४॥
हें असो जगीं दुःख आहे म्हणून । करितोसी भगवद्दयेचें खंडण ।
तरी दुःख मानलेया आधीन । मानणें आपुले आपण जाणो ॥१०५॥
अग्नि अन्न निफजवोनी पाळी । आणि मूर्खाहस्तें नगरे जाळी ।
आज मित्र जो ये वेळीं । तो वासनावश उद्या शत्रु ॥१०६॥

एवं दुःख आपुलेचि मानणें । तरी आपण दयाळू कीं क्रूर आपणा पुसणें ।
परमेश्वरावरी शंका करणें । व्यर्थ कासया ॥१०७॥
परमेश्वरें जीव उत्पन्न केले । हें वैदिक धर्मी नाहीं बोलिलें ।
म्हणोनी नैर्घृण्य(४६) वैषम्य(४७) वहिले । न घडे सर्वथा भगवंतीं ॥१०८॥
अंबा दटाविता उनाडपण । बाळ तिजकडे धांवे जैं सोडोन ।
तैं तयाचें इतुक्यानेंचि संपे शासन । पुत्रमरण नेच्छी माता ॥१०९॥
स्वाभाविक शत्रु जे असती । ते शरण आलियाही मरण देती ।
जैसा जंबुक शरण गेला व्याघ्राप्रति । तो मारिल्याविण सोडीना ॥११०॥
तेंवि सोडोनी पापप्रवृत्ति । भावें भगवंतीं देतां वृत्ति(४८) ।
इतुक्यानेंचि शासनसमाप्ति । परमेश्वराची होत असे ॥१११॥
केलिया पुत्रशासनाचा । मायेस अनुताप पळपळ साचा ।
तेविं जीवशासनीं भगवत्कृपेचा । ओघचि वाहे ॥११२॥

ज्ञानेश्वरी -

''किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा ।
तो मातेचा सोयरा । केतुला पां ॥८३॥
तेवि मी तया । जैसे असती तैसिया ।
कळिकाळ नोकोनिया । घेतला पटा ॥८४॥
येऱ्हवी तऱ्ही माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता ।
काय समर्थाची कान्ता । कोरान्न मागे ॥८५॥ (य११पू.४२)
तैसें तें माझें । कलत्र हें जाणिजे ।
कायिसेनिही न लाजे । तयाचेनि मी ॥८६॥
जन्ममृत्युचिया लाटी । झळंबती इया सृष्टि ।
ते देखोनिया पोटी । ऐसे जाहाले ॥८७॥
भवसिंधूचेनि माजे । कवणासी धांक नुपजे ।
तेथ जरी कीं माझे । बिहीती हन ॥८८॥
म्हणोनी गा पांडवा । मूर्तीचा मेळावा ।
करूनी त्यांचिया गावा । धांवत आलो ॥८९॥
नामाचेया सहस्त्रवरी । नावा इया अवधारी ।



सजूनिया निर्धारीं । तारूं जाहलो ॥९०॥
सडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले ।
परिग्रही घातले । तरियावरी ॥९१॥
प्रेमाची पेटी । बांधली एकाचिया पोटीं ।
मग आणिले तटीं । सायुज्याचिया ॥९२॥
परी भक्ताचेनी नांवें । चतुष्पादादि आघवे ।
वैकुंठीचिये राणिवे । योग्य केले ॥९३॥
म्हणोनी गा भक्ता । नाहीं एकही चिंता ।
तयाते समुद्धर्ता । आथी मी सदा ॥९४॥
आणि जेव्हाचि कीं भक्ति । दिधली आपुली चित्तवृत्ती ।
तेव्हांचि मज सूती । त्यांचिये नाटीं ॥९५॥
याकारणें भक्तराया । हा मंत्र तुवा धनंजया ।
शिकीजे जे यया । मार्गा भजिजे ॥९६॥ ज्ञाने.अ.१२
इत्यादि श्रुतिकोटि । अवतरलिया मजसाठीं ।
ते वाऊगी तोंडपिटापिटी । तुवा न कीजे ॥११३॥
जें प्रमाणाचिये माथा । पाय देवोनी आतां ।
शब्दसत्तें अर्थसत्ता । प्राप्त जाहली ॥११४॥
या श्रुत्यनुसारिणी स्मृति । स्वयें तुकारामहि वदति ।
जेथ दयालुतेची संपत्ति । तें प्रमाण ऐक ॥११५॥
''न पाहे गुण दोष पोटीं आलियाचा । कल्याणाची इच्छा माऊलीते ॥''
शिक्षा शासन दंड । हे संस्कृत शब्द उदंड ।
परी त्याचा अर्थ प्रचंड । नाश नव्हे ॥११६॥
कुप्रवृत्ता सत्प्रवृत्ति । शिक्षादि शब्द रूढ याच अर्थी ।
जीवाची नाहींच उत्पत्ति । यास्तव सर्वथा परतंत्र तो नव्हे ॥११७॥
बाळा उनाडपण करणें । किंवा मायेकडे जाणें ।
हे स्वतंत्रतेचें करणें । मग रक्षणें शिक्षणें जननी करीं ॥११८॥
तेविं संसारीं आसक्ति । कीं रमणें भगवंतीं ।
हें जीवाचिया हातीं । मग दया शासन हातीं हरीच्या ॥११९॥

**''पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः'' म्हणून ।**
**जगन्मातापिता हें स्वयेंचि बोलिले भगवान । (य११पू.४३)**
**यालागी तयाचें दयालुपण । शंकार्ह नव्हे ॥१२०॥**
**तंव वादी म्हणे सोळावियांत । आसुर जे तिर्यगादि[४९] योनि प्राप्त ।**
**तयांचे कल्याण कदापि न होत । हें स्वयें भगवंतचि बोलिले ॥१२१॥**
**सिद्धान्ती म्हणे ऐक उत्तर । कर्ममार्गपरिपाटीविचार[५०] ।**
**पुण्यवान बहुजन्मानंतर । सिद्धि जेवि पावे ॥१२२॥**
**तेवि पापी पापकर्मे । सिद्धि न पावे कोणत्याही जन्में ।**
**परी भक्तिमार्गे भागवतधर्मे । सिद्धि पावती असुरहि हे भागवतोक्ति ॥१२३॥**

---

(१६)स्पष्ट (१७)ब्रह्मरूप (१८)श्रेष्ठकनिष्ठभाव (१९)सारखे (२०)आणि (२१)प्रभूच्या ठिकाणी (२२)अकथनीय (२३)ज्ञात्या पुरुषांनी (२४)सांगितले आहेत (२५)दुर्वृत्ताला (२६)स्वतःसिद्ध (२७)सुंदर (२८)गजेंद्र (२९)शंकारूपी चिखल (३०)ईश्वराला केवळ निमित्तकारण मानले तर (३१)दूषित करिते (३२)निमित्तकारण व उपादान कारण (३३)ह्यावरच भासणारा (३४)ईश्वराशी संबंध (३५)ईश्वराशी तादात्म्य (३६)नैमित्तक (३७)दंड (३८)व्यक्ति व ब्रह्मांड (३९)जगताची स्थिती. जगताचे उपादान कारण म्हणजे जगात व्यापून राहून करितो (४०)कारणरूप तमोगुणाचा आश्रय होऊन (४१)मातापित्यांच्या शरीराचा जो जड तमोगुणी भाग वीर्य व रक्त यापासून पुत्रशरीरोत्पत्ती होते (४२)सिद्धान्तात (४३)दयेचे आधिक्य (४४)निर्वाणीचे (४५)स्थान (४६)निर्दयपणा (४७)विषमबुद्धी (४८)अन्तःकरण (४९)पक्ष्यादि (५०)कर्ममार्गाच्या पद्धतीने विचार (५१)गीतेत सांगितलेले (५२)भक्ति न करणाऱ्या (५३)एक मुखाने सांगतात (५४)शुद्धसत्त्वगुणाचा आश्रय होऊन निमित्तकारण होत असल्यामुळे (५४)सर्वत्र कारण चेतनच आहे अशी वेदान्ताची प्रतिज्ञा आहे तिची हानी (५६)मातीची बाहुली करणे व मोडणे (५७)दुष्टपणा (५८)कर्म करितेवेळी (५९)कृतीने उत्पन्न होणारे (६०)शास्त्राचा एक भाग (६१)सिद्ध करणारा (६२)शास्त्रातील दुसरा भाग (६३)जीवावर दया करणे (६४)आत्मज्ञानानेच नाहीसे होणारे (६५)भिन्न (६६)आत्मज्ञानाची सामुग्री मिळवून देणे (बकी,पूतना) (६७)करुणाकल्लोळरूपी विलासात (६८)निवड (६९)सर्व जगाला एकच उपादानकारण असणाऱ्या परमेश्वरात (७०)शिक्षेप्रमाणेच असल्यामुळे (७१)न्यायवृत्तीने संकोचित झालेला दयाळुपणा (७२)नाही म्हणणे (७३)शास्त्रांचे स्वाधीन (७४)उपनिषदाचे नांव (७५)हत्त्याच्या पायात ज्याप्रकारे सर्व प्राण्यांच्या पायांचा समावेश होतो त्याप्रमाणे मोठ्या प्रायश्चित्तात सर्व प्रायश्चित्तांचा समावेश होतो असे (७६)पूर्वमीमांसेतील एक न्याय. हा न्याय जेव्हा एकाच वस्तूचा काम्य व नित्य अशा दोन्ही रीतीने उपयोग सांगितला असतो तेव्हा लागू होतो (७७)समाधी (७८)शेवटी (७९)संसारतापापासून रक्षणारे आतपत्र= छत्री (८०)जिव्हा (८१)प्रयत्नाने (८२)समर्थ (८३)ज्याला इतिहासपुराणांची पुष्टी आहे असे (८४)युक्ती (८५) खंड,दोष (८६)मुख (८७)घोट्यापर्यंत (८८)ओरडू लागला (८९)आपले-आपण दिलेले - नाम जपण्यास (९०)आपले नाम जपण्यास (९१)अमंगल, न शोभणारे, निष्फळ (९२)भक्तीची प्राप्ती (९३)भक्तीचा उद्बोध करणारे (९४)दुःखरहित (९५)भीष्माचार्य (९६)प्राप्ति (९७)निषेध (९८)सुंदर (९९)निश्चित (१००)सवस्त्र- अंगावरील वस्त्रांसुद्धा

---

**''केवलेनहि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः ।**
**येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरंजसा ॥८॥''** (श्रीमद्भागवत स्कं. ११ अ. १२,)
**श्रीधरी टीका :-**
**तत्र वृत्रादीनां भवतु नाम कथंचित्साधनान्तरम् ।**
**गोपीप्रभृतीनां तु नान्यदस्तीत्याह केवलेनेति ।**
**सत्संगलब्धेन केवलेनैव भावेन प्रीत्या ।**
**नगा यमलार्जुनादयः । नागाः कालियादयः ।**
**यद्वा तदानींतनानां सर्वतरुगुल्मादीनामपि भगवति भावोऽस्तीति गम्यते ।**
**तदुक्तं - ''अहो अमी देववरामरार्चितं पादांबुजं ते सुमनः फलार्हणम् ।**
**नमन्त्युपादाय शिखाभिरात्मनस्तमोपहत्यै तरुजन्म यत्कृतम्''**
**नागाः कालियादयः सिद्धाः कृतार्थाः संतः ईयुः प्रापुः ॥८॥**
**या सटीक श्लोकांचा भावार्थ । कीं भावेंचि तिर्यगादिकाला मिळाला भगवंत ।**
**म्हणोनी 'आसुरीं योनिमापन्ना' इत्यादि गीतोक्त[५१] ।**
**भक्तिव्यतिरिक्त[५२] जनांविषयी ॥१२४॥**
**''अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितोहि सः ॥३०॥''**(गीता अ.९)
**दुराचारीहि मज भजे । तरी तोहि साधू होय सहजे ।**
**आतां दयालुत्व उमजे । ऐसे आणिकही आहे ॥१२५॥**

**''गोप्यः कामाद्भयात्कंसो द्वेषाच्चैद्यादयो नृपाः ॥३५॥ (उत्तरार्ध)**
**सम्बन्धाद् वृष्णयः स्नेहाद्यूयं भक्त्या वयं विभो ॥३६॥'' (पूर्वार्ध)** (भाग.स्कं.७.अ.१)
**जरी आसुरी संपत्ति म्हणोनी । गीतेंत निषेधिली स्वमुखें करोनी ।**
**तियाचि संपत्तीं कंसादि जनीं । मिळविला देवो ॥१२६॥ (य११पू.४४)**
**''तैसाचि गोपिकासीं कामें । तया कंसा भयसंभ्रमें ।**
**येरा घातका मनोधर्मे । शिशुपाळादिका'' ॥४६९॥**
ज्ञानेश्वरी अ.९
**इत्यादि तातोक्ति । हाचि अर्थ समन्वयिती[५३] ।**
**म्हणोनी भगवंतीं । दयालुत्वचि उमजे ॥१२७॥**
**परी जे आसुर । दैवी जीवाते पिडिती निर्धार ।**
**तयाते मात्र परमेश्वर । शासन करी ॥१२८॥**
**ईश्वर नावलंबिता । पापकर्मे न मिळे भगवत्पथा ।**
**भक्ता तंव चिंता सर्वथा । न घडेचि कांहीं ॥१२९॥**
**यास्तव स्वतंत्रत्वें करून । भगवंतासी जावे शरण ।**
**मग कर्म न्यून पूर्ण । न पाहे तो ॥१३०॥**
**''समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।**
**ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्'' ॥२९॥** गीता अ.९

गीतावाक्याचें अवलंबन करिता तीन प्रकारचीं वाक्यें सांपडतात.

''अपि चेत्सुदुराचारो'' मी पापी लोकांनाहि तारतो हें एक,

''समोऽहं सर्वभूतेषु'' मी सर्वाभूतीं समान असून माझ्या भक्ताविषयीं मी वत्सल आहे हें दुसरें; आणि

''तानहं द्विषतः क्रूरान्'' मी भूतद्रोही पुरुषांना दुःखांत टाकतो, हें तिसरें.

- ही वाक्यें परस्पर विरोधी दिसतात. यांचा समन्वय टीकाकारानीं केलेला नाहीं. परंतु यांचा समन्वय असा आहे कीं,

* भगवच्छरण प्रथम असुर असला तरी त्याचें रक्षण परमेश्वर करितो. याविषयीं शांडिल्याचें उदाहरण प्रसिद्धच आहे.

* भक्तिहि नाहीं व भूतद्रोही आहे अशाला मी आसुर योनींत टाकतो. हें कर्मफलदातृत्वाचें लक्षण आहे.

*''समोऽहं'' याचा भावार्थ असा आहे की, उपादानरूपानें मी सर्वाभूतीं समान असूनहि शुद्धसत्त्वोपहितनिमित्तत्वास्तव[५४] भक्तवत्सल आहे. यमरूपी परमेश्वराचें न्यायानुसार दंड देणें व विष्णुरूपी परमेश्वराचें भक्त-पाप क्षमा करणें हें याचेच द्योतक आहे.

आतां एवढ्यानें कर्मनियम मिथ्या होईल असें मात्र कोणी समजूं नये, कारण भगवन्नामस्मरणादिकानेंच महत्पुण्य प्राप्त होऊन सर्व पापांचा क्षय होतो.

आतां पाप करणें हें महत्पाप असेल तर भगवन्नामावर विश्वास न ठेवणें हे त्याहीपेक्षां महत्तम पाप आहे असें आम्ही म्हणतो. (य११पू.४५)

मधुसूदनमताचे खंडन

स्वामी मधुसूदन गूढार्थदीपिकेंत सोळाव्या अध्यायांत असें म्हणतात कीं-
**''पापकर्माण्येव तेषां कारयति भगवान् तेषु तद्बीजसत्त्वात् ।**
**कारुणिकत्वेऽपि तानि न शातयति तन्नाशकपुण्योपचयाभावात् ।**
**पुण्योपचयं न कारयति तेषामयोग्यत्वात् ।**
**न हीश्वरः पाषाणेषु यवांकुरान्करोतीश्वरत्वादयोग्यस्यापि योग्यतां संपादयितुं शक्नोतीति चेत् शक्नोत्येव सत्यसंकल्पत्वात् ।**
**यदि संकल्पयेत् न तु संकल्पयति ।**
**आज्ञालंघिषु स्वभक्तद्रोहिषु दुरात्मस्वप्रसन्नत्वात् । अत एव श्रूयते -**
**''एष ह्येव साधु कर्म कारयति तं यमुन्निनीषत ।**
**एष उ एवासाधु कर्म कारयति तं यमधो निनीषते'' -** (गूढार्थदीपिका अ.१६ श्लो.९)

भावार्थ :- पापी लोकांकडून परमेश्वर पापच करवितो, पुण्य करवीत नाहीं. त्यांना पुण्य करण्याची योग्यता नाहीं म्हणून पुण्यकर्म करवीत नाहीं. पाषाणामध्ये अंकुर उगविण्याची शक्ति नसल्यामुळें त्याच्या ठिकाणीं परमात्मा अंकुर उत्पन्न करीत नाहीं.

आतां कोणी असें म्हणेल की, परमेश्वर स्वतंत्र असल्यामुळें तो अयोग्याला देखील योग्य करूं शकेल, तर त्याला मी म्हणतो कीं, तो सत्यसंकल्प असल्यामुळें खरेंच करूं शकेल, परंतु तो अशा प्रकारचा संकल्पच करीत नाहीं; कारण भूतद्रोही पुरुषावर परमात्मा प्रसन्न नसतो. म्हणूनच ज्याला उच्च पदवीस न्यावयाचे

असते त्याच्या कडून परमात्मा पुण्य कर्म करवितो व ज्याला नीच पदवीस न्यावयाचे असते त्याच्याकडून पाप करवितो, अशी श्रुति म्हणते.

- हें मधुसूदनस्वामीचें म्हणणें पुष्कळ ग्रंथांशीं विरुद्ध आहे; कारण

''**सत्संगेनहि दैतेया यातुधानाः मृगाः खगाः**''

इत्यादि भागवतश्लोक, सत्संगानें आसुर व तिर्यग्योनीचीहि मुक्ति सांगतात. तेव्हां त्यांना हा सत्संगलाभ पुण्यपरिपाकाशिवाय कसा झाला? पुण्यपरिपाक मानला तर मधुसूदनस्वामींच्या ''पुण्य करवीत नाहीं'' या म्हणण्याला विरोध येतो, आणि परमेश्वराला कोणत्याही प्रकारची अपेक्षा नसल्यामुळें पुण्यवंतावरच मी दया करीन अशा प्रकारचा संकल्पहि थोडेसें वैषम्यच आहे; आणि हें मधुसूदनस्वामीला मान्यहि आहे. त्यांनी या श्लोकाच्या टीकेंतच पुढें असें म्हटलें आहे कीं, ''**अन्ततोगत्वा किंचिद्वैषम्यापादने महामायात्वाददोषः**'' (**य११पू.४६**) थोडेसें वैषम्य दिसत असले तरी, परमेश्वर महामायी असल्यामुळें दोष नाहीं; म्हणजे महामाया त्रिगुणात्मक असल्यामुळें ती स्वतः विषम आहे, म्हणून तदुपहित परमेश्वरावर किंचित वैषम्यारोप विरुद्ध नाहीं. असें जर मधुसूदनस्वामींचें म्हणणें आहे, – तर महामायेच्या शुद्धसत्त्वास्तव सर्वदयालुत्वहि परमेश्वराचे ठायीं विरुद्ध नाहीं. पुनः अल्प साधु देखील पापीयांची उपेक्षा करितो, किंवा प्रसंग विशेषीं त्यांच्यावर दयाहि करितो, मग महात्म्यांचाहि महात्मा अशा परमेश्वराचें ठिकाणीं हा गुण नसणें लज्जास्पद आहे; म्हणून - आई लेकरांना ''मी आतां असें करणार नाहीं'' असें म्हणेपर्यंतच शिक्षा देते व पुढें पोटाशीं धरते, त्याप्रमाणें भगवच्छरणानुतापापर्यंतच सर्व भगवंताच्या शिक्षा आहेत, त्या द्वेषमूलक नाहींत.

''**न च वक्तव्यो नास्त्यवकाशो देवगुणाभ्यासस्य तथा सति गुणव्यतिकरो न सिध्यति**'' (**गीता समन्वयभाष्य अ.१६.श्लो.१९**)

भावार्थः- असुरांना देवगुणांचा अभ्यासच करतां येणार नाहीं असें मात्र कोणी समजू नये, कारण तसें मानल्यास गुणसंक्रमण सिद्ध होणार नाहीं.

हे असो. सर्वथा मायावादाचा अंगिकार करून परमेश्वरालाहि जगत्परतंत्र केल्यास वेदान्ताला सांख्याप्रमाणें जडकारणवाद मानावा लागेल, व त्यानें चेतनकारणप्रतिज्ञाहानि[५५] होईल.



यद्यपि शुद्ध चेतनाचें ठिकाणीं जगत्कारणत्व नाहीं, मायाविशिष्ट चेतनाचेंच ठिकाणीं आहे, तथापि तें मायाविशिष्ट चेतन मायापरतंत्र नाहीं, हेंच पंचदशीकारानीं ''**मायाबिम्बो वशीकृत्य तां स्यात्सर्वज्ञ ईश्वरः**'' या वचनानें ''तत्त्वविवेकां''त म्हटले आहे. त्या सर्वज्ञ ईश्वरानें मायेला आपल्या आधीन ठेवले आहे असा त्या वचनाचा अर्थ आहे.

हे वादिन्! आतां दुर्जनतोषन्यायानें तुझें म्हणणें घेऊन परमेश्वराला विषम म्हटले तरी आमची काय हानि आहे? कारण परमेश्वर रागी आहे असें म्हटलें तरी त्याला त्याच्या पातकाचें फल देणारा दुसरा कोण आहे?

जगत्सत्यवादी वल्लभ देखील - ''**आत्मसृष्टेर्न वैषम्यं नैर्घृण्यं चापि विद्यते**'' (**य११पू.४७**) असें आपल्या तत्त्वदीपनिबंधांत म्हणतो, आणि ही परमेश्वराची सृष्टि असल्यामुळें त्याला निर्दयता व विषमता काय असणार? हा त्या म्हणण्याचा अर्थ आहे.

हें वल्लभाच्या जगत्सत्यवादांत दुर्घट आहे परंतु आमच्या जगन्मिथ्यावादांत दुर्घट नाहीं, कारण मातीच्या पुतळ्या करून मोडल्या असतां त्याविषयीं करणाऱ्याला पुण्य व मोडणाऱ्याला पाप कोणी सांगितले आहे?

यद्यपि देवपूजेसाठीं केलेल्या मातीच्या प्रतिमा करण्यांत पुण्य आहे व मोडण्यांत पाप आहे तथापि हा नियम जीवास लागूं आहे. परमेश्वराला दुसरा कोणी पूज्य नसल्यामुळें त्याला लागूं नाही.

वादी उवाचः- ''मृत्पुत्तलीजननहननन्याय''[५६] या ठिकाणीं प्रवृत्त होत नाहीं; कारण मृत्पुत्तली ज्याप्रमाणें जड आहे त्याप्रमाणें जीव जड नसून चेतन आहे, आणि तो भोक्ता आहे, म्हणून चेतनाला सहज दुःख देण्याचें कौटिल्य[५७] परमेश्वराकडे येते.

सिद्धान्ती उवाचः- हें म्हणणें सम्यक् नाहीं; कारण स्वप्नांतील चेतन पुरुषाचें हनन केलें असतां, जागृतींत त्याचे प्रायश्चित्त कधीं कोणी सांगत नाहीं. यद्यपि स्वप्न मिथ्या असून दैवानें शकुनाशकुन सत्य होतात असें ब्रह्मसूत्रकारांनी व तद्भाष्यकार श्रीभगवत्पूज्यपादाचार्यांनीं मानिले आहे, तथापि जगत् हे परमेश्वराचें स्वप्न आहे याचा जसा वेदान्तांत अंगिकार आहे, तसा शकुनाशकुनादि स्वप्नफळांचा अंगिकार नाहीं; कारण परमेश्वर नित्य असून नित्यतृप्त व सर्वसंपन्न असल्यामुळें

शकुनानें त्याचा उत्कर्ष किंवा अपशकुनानें त्याचा अपकर्ष संभवत नाहीं.

किंवा, तुझ्या आक्षेपाचें आणखीहि दुसऱ्या रीतीनें समाधान करिता येते. परमेश्वर न्यायी आहे कीं दयालु आहे? अशा प्रकारचा आक्षेप करतांना त्वां जे हेतु दिले आहेत, त्या हेतूवरूनच परमेश्वर आहे असे तुला मानावे लागते; कारण जगांत दुःख निर्विवाद आहे. ''परमेश्वर दयालु असता तर कोणत्याच पापाचें फल दिले नसते'', हा हेतु देतांना पुण्यपापाचें फळ सुखदुःख होते, हे मानणें तुझ्या गळीं आले आहे; परंतु त्यामुळें तूं आगमपरतंत्र झाला आहेस. कारण पुण्यपापाचें फळ सुखदुःख होते हें प्रत्यक्षानें किंवा अनुमानानें गम्य नाहीं. फळ विपाककाळीं होत असल्यामुळें आरंभसमयीं(५८) कर्मकर्त्याला कर्मफलाचा संबंध (य११पू.४८) प्रत्यक्ष होणें शक्य नाहीं, आणि अनुमानानेंहि तो कळणें शक्य नाहीं. यद्यपि सुखदुःखवैचित्र्यास्तव पुण्यपापवैचित्र्याचें अनुमान होते, तथापि पुण्यपापानें सुखदुःख होते अशा प्रकारचें आगमवाक्यच त्या अनुमानाला प्रथम उत्पादक आहे. जसा अग्नि-धूमसहचार प्रत्यक्ष हेतू असून अनुमानाला साधक होतो, त्याप्रमाणें पुण्यपापसुखदुःखसहचार प्रत्यक्षगम्य नसल्यामुळें आगममानच या ठिकाणीं अनुमानाला साधक होते; म्हणून हें अनुमान आगमोपजीवी आहे.

पुनः तें अनुमान सामान्य आहे, विशेष नाहीं; किंवा स्वबुद्धीनें तसें अनुमान करतांहि येत नाहीं, कारण कर्मफलसंसर्गाविषयीं स्वबुद्धीनें अनुमान केल्यास स्वार्थबाध व परार्थकल्पना असें दोन दोष प्राप्त होतात; म्हणजे ज्या प्रकारचे दुसऱ्याला आपण करितो, त्याचप्रमाणें दुसरा आपल्याला करतो हे परस्पर उसणें फेडणेंच कर्माविषयीं आपल्या बुद्धींत येऊं शकते. अथवा एक प्रकारक पीडा देणाऱ्याला त्या पीडेचे जे अन्य प्रकार असतील, त्यापैकीं दुसऱ्या एकाद्या प्रकारानें तीच पीडा दुसऱ्याकडून दिल्या जाते असें बुद्धींत येते. परंतु हे दोन्हीहि हेतु कर्मफलसंसर्ग सिद्ध करण्याला समर्थ नाहींत; कारण एकाद्या प्रकारानें एकाचें उसणें फेडणें एवढेंच जर कर्मफल असेल तर व्यभिचार करणें पाप होणार नाही; कारण व्यभिचार प्रथम कोणाला दुःखदायक नाही.

कथासरित्सागर लंबक १२ तरंग ५ मध्यें अशी कथा आहे कीं:-

कथा : विकृत न्यायदान

**पांचालेषु पुरा देवभूति नामाभवद्विजः।**
**तस्याभूद्भोगवत्याख्या भार्या वेदवता (१) सती ॥२०५॥** (१)(भोगवती)
**सा स्नानाय गते तस्मिन् शाकार्थं शाकवाटिकाम् ॥**
**प्रविष्टा धावकखरं खादन्तं शाकमैक्षत ॥२०६॥**
**गृहीतलगुडा तं च साभ्यधावत्खरश्च सः।**
**पलायमानः पतितः श्वभ्रे भग्नखुरोऽभवत् ॥२०७॥**
**तद्बुद्ध्वा सोऽत्र तत्स्वामी क्रोधादागत्य धावकः ।**
**लगुडैः पादघातैश्च ब्राह्मणीं तामताडयत् ॥२०८॥**
**तेन सा काण्डविभ्रष्टगर्भाभूद्गर्भिणी सती ।**
**ततः स खरमादाय धावकः स्वगृहं ययौ ॥२०९॥ (य११पू.४९)**
**स्नात्वागतोऽथ तद्भर्ता तद्बुद्ध्वा वीक्ष्य तां च सः ॥**
**भार्या विप्रः पुराध्यक्षं गत्वोद्विग्नो व्यजिज्ञपत् ॥२१०॥**
**स बलासुरनामानं तदैवानीय धावकं ॥**
**श्रुत्वा तयोर्द्वयोर्वादं मूर्खो विवृतवादिनम् ॥२११॥**
**खुरभंगात्खरस्यास्य धावकस्य वहत्वयम् ।**
**खरभारं द्विजो यावत् प्रकृतिस्थो भवेत्खरः ॥२१२॥**
**धावकोऽप्ययमेतस्य भार्यायामग्रजन्मनः ।**
**गर्भं प्रजनयत्वन्यं तस्यां तद्गर्भपातनात् ॥२१३॥**

भावार्थः- पूर्वी पांचाल देशांत देवभूति या नांवाचा एक ब्राह्मण होता. त्या वेदवेत्या विप्राची भोगवती म्हणून भार्या होती. एकदा तो ब्राह्मण स्नान करावयास गेला असतां त्याची भार्या भाजी आणण्यासाठीं आपल्या घराच्या मागील वाडींत गेली. तों तेथें एक धोब्याचा गाढव खुशाल भाजी खात आहे असें तिला आढळलें. त्याबरोबर त्या ब्राह्मणीला मोठा क्रोध आला, व हातांत लांकूड घेऊन ती त्याला मारावयास धावली; पण गर्दभहि मोठा हुशार होता. ती आपल्याला मारण्याकरितां येत आहे असें कळतांच तो वेगानें पळून जाऊं लागला; पण दुर्दैवामुळें तो मध्येंच एका खड्ड्यांत पडला, व त्याचा पाय मोडला. तें अनिष्ट वर्तमान कळतांच त्या गाढवाचा रजक धनी तेथें आला, आणि रागाच्या आवेशांत त्यानें त्या ब्राह्मणीला

काठीनें व लाथांनीं पुष्कळ मारलें. ती बाई त्यावेळीं गर्भिणी होती. धोब्याच्या त्या असह्य मारामुळें तिचा गर्भपात झाला. नंतर आपल्या गाढवाला घेऊन तो निर्दय रजक घरी निघून गेला.

इतकें सगळें झाल्यावर ब्राह्मण स्नान करून परत आला. त्याला हें घडलेलें वृत्त कळलें. त्यानें आपल्या साध्वी भार्येची ती दुर्दशाहि प्रत्यक्ष पाहिली. त्यामुळें त्या विद्वानाला फार खेद झाला. त्यानें नगराध्यक्षाला तें सर्व कळविलें. नगराध्यक्षानें बलासुर धोब्याला बोलावून आणिले, व त्याची हकीकत ऐकून घेतली; आणि शेवटीं त्या मूर्खानें त्या वादाचा असा निर्णय सांगितला कीं, ''या रजकाच्या गाढवाचा पाय मोडलेला असल्यामुळें तो बरा होईपर्यंत ब्राह्मणानें त्याचा भार वहावा; (य११पू.५०) आणि या रजकानें ब्राह्मणाचा गर्भ पाडल्यामुळे त्याच्या भार्येच्या ठायीं त्यानें दुसरा गर्भ उत्पन्न करून द्यावा.'' हा न्याय तुलाहि मान्य असला पाहिजे.

वादी उवाचः- या कथेंत ब्राह्मणाचा गर्भ जरी व्यभिचारानें भरून येत असला तरी, गर्भनाशापराधाचे उसणें मिळत नाहीं, म्हणून अनुमानानेंच कर्मफळ अन्य ठरवितां येते.

सिद्धान्ती उवाचः- अशानें जीवाचा पुनर्जन्म होतो हें तुला मानावे लागेल आणि त्यामुळें जीवाला कर्मसंसर्ग कसा होतो हे पुनः सांगावे लागेल. कर्म निष्पाद्य[५९] असल्यामुळें जड आहे हे उघड आहे. त्याचा नियामक चेतन अंगिकार केला पाहिजे. अनिष्ट फळ भोगतो म्हणून तो नियामक जीव संभवत नाही. परमेश्वर नियामक मानल्यास कर्मफलाविषयीं आगमानें केलेली व्यवस्थाच प्रमाण होईल; व त्यामुळेंच कर्मप्रतिपादक आगमैकदेश[६०] प्रमाण मानणाऱ्या तुला दयालुता प्रतिपादक[६१] आगमान्यदेशही[६२] प्रमाण मानावा लागेल. यद्यपि वेदान्तात सृष्टीच्या अनादित्वास्तव अदृष्ट नियमही अनादि आहेत, तथापि त्यामुळेंच भूतानुग्रहहि[६३] अनादि आहे.

मोक्षाविषयीं स्वतःचे अज्ञान हेतु असून तें आत्मज्ञानैकनिवर्त्य[६४] असल्यामुळें, आणि जीव परमेश्वराचा अंश असून सर्वथा अपर[६५] नसल्यामुळें कृपेनें त्याचा पुण्याविषयीं सर्वथा निग्रह भगवंताकडून संभवनीय नाहीं; परंतु विघ्नपरिहरण आणि ज्ञानसामग्रीसंप्रदान[६६] हीं दोनच भगवत्कृपेचीं फलें संभवनीय असल्यामुळें,



मला स्तनपान पाहिजे अशी प्रार्थना करणाऱ्या बालकाप्रमाणें जगदंबा परमेश्वराच्या दयालुत्वाचा उपयोग स्वप्रार्थना-यत्नानेंच करून घेतला पाहिजे.

किंवा सुषुप्तिसमयीं, मरणसमयीं आणि प्रलयसमयीं परमेश्वरांतच जीवात्म्याचा लय होतो आणि त्यामुळें त्याला जे अगाध सुख प्राप्त होते ते कर्मक्षयामुळें कर्मावांचूनच होते. परमेश्वर दयाळु नसता तर आपल्यामध्यें पापी जीवांना त्यानें मिळवून घेतले नसते; म्हणून निमित्तकारणवादीयांवर परमेश्वरदयालुत्वाविषयीं जसें दोष येतात, तसें निमित्तोपादानकारण मानणाऱ्या आमच्यावर येत नाहींत. आगमही आपल्याकडे लक्ष्य लावणाऱ्या मित्रांना व शत्रूंना परमेश्वर आपलेंच पद देतो असें उघड प्रतिपादन करीत आहे. (य११पू.५१)

**''अहो बकीयं स्तनकालकूटं जिघांसयापाययदप्यसाध्वी ।**
**लेभे गतिं धात्र्युचितां ततोऽन्यं कं वा दयालुं शरणं व्रजेम ॥२३॥''**

(बकी=पूतना)(भाग.स्कं.३.अ.२)

**तया निखिळ निजानंद सागरीं । करुणाकल्लोळकुसरीं[६७] ।**
**जगदनुग्रहाचिया लहरी । उठती नाना ॥१३१॥**
**तेथ हा मित्र हा वैरी । हें सर्वथाचि नये उजरी[६८] ।**
**तथापि कर्मफळें जीवावरी । येती ते निजविस्मृति ॥१३२॥**
**भलतिया भावे भावना । झगटलिया नारायणा ।**
**मग तया एकोपादाना[६९] । मिळणेंचि आहे ॥१३३॥**
**अमृतघट प्रेमें प्याला । कीं द्वेषें तो शोषिला ।**
**तरी अमरत्वचि तयाला । घाली माळ ॥१३४॥**
**आपुलिया उपादाना । विसरुनि आपली कल्पना ।**
**विशेष सुखदुःखपणा । आपण भोगवी ॥१३५॥**
**तो आपण जयाते सौख्य मानी । तेथ दया कैसी करावी भगवंतानीं ।**
**तयाचें चित्त दुखवितां प्रथम क्षणीं । शिक्षाचि होय ॥१३६॥**
**देतां तयातें अनुमोदन । तरी कर्मफळाचेचि साधन ।**
**कर्म मानिलिया आगमपरतंत्रा तुजकारण । हा निर्णय पाहिजे केला ॥१३७॥**
**अनुमोदन देऊन कर्मफळ देता । कीं प्रथम क्षणींच चित्त दुखविता ।**

**शासनसमानत्वे[७०] न्यायितोपष्टब्धदयालुता[७१] । प्राप्त होय ॥१३८॥**
**आतां शासनाविण निग्रह कीजे । तरी जीववस्तुत्वचि भंगिजे ।**
**परी जगद्दुःखप्रत्यक्षवज्जीवप्रत्यक्ष अपलपिजे[७२] । कवणे परी तुवा ॥१३९॥**
**म्हणोनी भलतिया भावे । परमेश्वरचि भाव्य भावे ।**
**मग दयालुस्वभावे । समगतिक तो ॥१४०॥**
**धरूनिया विषस्तना । मारूं आलिया पूतना ।**
**तिये मातृगतिनिदाना । पात्र केले ॥१४१॥**
**ऐसा स्वामी कृपावंत । सांडोनी कोण निववी आर्त ।**
**म्हणोनी भजावा भगवंत । सर्वकाळचि ॥१४२॥**
**आणिकही प्राकृत कव्युक्ति । न्यायोपष्टब्धदयालुता बोधिती ।**
**त्याहि संशयच्छेदार्थी । उदाहरिजती ऐक पां ॥१४३॥**

तुकाराम गाथा - ३००४ -

**सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥१॥**
**येथें अलंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥२॥**
**अंतरीचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळा ब्रह्मांडाचा॥३॥(य११पू.५२)**
**''प्रभो शरण आलियावरि न व्हा कधीं वांकडे ।**
**म्हणोन इतुकेंच हें स्वहित कृत्य जीवाकडे ।**
**प्रसाद करिता नसे पळ विलंब बापा खरे ।**
**घनांबु न पडे मुखीं उघडल्याविना पांखरे ॥''- मोरोपंत**
**''लक्ष्मीकांतकृपासुधाघन जगीं सर्वावरी वर्षतो ।**
**जे कां पातक झोंपडींत दडती त्यातेचि न स्पर्शतो ।**
**विप्राची अघ-झोपडी न कळता नामाग्निनें जाळिली ।**
**तेव्हां कृष्णकृपांबुवृष्टि सहसा माथा पडो लागली''॥ - वामन पंडित**
(विप्राची - अजामिळाची. अन्य सर्व अर्थ स्पष्ट आहे)
**किंवा सकळ कर्मा भगवन्नाम । प्रायश्चित ऐसा आगम ।**
**भगवद्दयालुतेविण परम । प्रतिष्ठा न पावे ॥१४४॥**
**म्हणसी नाम प्रायश्चित्तागम मान्य नाहीं । तरी कर्मफलागम मान्य कायी ।**
**जो कर्मवादी तो लवलाही । आगमपरतंत्र[७३] निश्चयें ॥१४५॥**



**न मानिता त्वां पुण्यपाप । करिता नये भगवद्दयालुतेविषयीं आक्षेप ।**
**यास्तव सोडोनी कुसंकल्प । करुणाघननामजप आदरीं कीजे ॥१४६**

वादी उवाच - अहो या नामसौलभ्यानें परमेश्वराच्या दयालुत्वाची उपपत्ति होत असली तरी, तें सौलभ्य न्याय्य नव्हे; कारण अल्प पापाला अल्प व महत्पापाला महत् प्रायश्चित होणें योग्य आहे.

सिद्धान्ती उवाच - अल्प व महत् म्हणण्याला तुजजवळ काय प्रमाण आहे? न्याय किंवा आगम?

यांतून प्रथमपक्ष संभवत नाहीं, कारण तर्काचे स्वरूप प्रत्येकाजवळ भिन्न भिन्न असल्यामुळें, प्रत्येकाची मतें भिन्न भिन्न होण्याचा संभव आहे. पुनः न्यायाचे दृष्टीनें पाहिले तर स्वस्त्रीगमनापेक्षां मातृगमनच न्याय्य होईल; कारण स्त्रीचा तरी प्रथम ऋतुस्नातसमयीं नूतन उपस्थयोनिसंयोग व्हावयाचा असतो; पण मातेचा व बालकाचा गर्भातून बालक निघतांना उपस्थयोनिसंयोग होऊन गेला असतो. तेव्हां नूतन संयोगापेक्षां प्राप्तसंयोग करणेंच समाधानाचें आहे.

आतां विवाहसंस्कार झाला नाहीं म्हणून मातृसंयोग करणें योग्य नाहीं, (य११पू.५३) असे म्हणशील तर, न्यायानें धर्मसिद्धि होते असें म्हणूं नको; आगमानेंच ती होते असे म्हण.

न्यायानें पापपुण्य मानल्यास चोरापेक्षां राजा अधिक पापी होईल; कारण चोर एकादे घर लुटतो व राजा अनेक गावें लुटत असतो. म्हणून अमुक अल्प व अमुक महत् पाप हें शास्त्रानेंच जाणावे लागत असते.

आतां अल्प व महत् याची व्याख्या तरी तूं काय करतोस? कर्तृआयासपर किंवा शास्त्रप्रशंसापर?

* प्रथम पक्ष योग्य नाहीं, कारण प्रायश्चित घेणारे किंवा द्वादशाब्दिक व्रत करणारे यापेक्षांहि कृषी करणारे इत्यादि लोक अत्यंत श्रम करीत असतात. ऊन, तहान, थंडी, वारा, पाऊस इत्यादिक त्यांना सहन करावे लागत असतात. अति आयासालाच मोठ्या पापाचे निवर्तक मानले तर, पंचगव्यापेक्षां सिंहव्याघ्रादिकांचे दुध मिळण्यास अतिशय कठीण असल्यामुळें, त्याच्या योगानेंच पंचगव्यापेक्षां अत्यंत शुद्धि मानावी लागेल. शिवाय ते मिळविण्याकरितां मरण आले असतां मरणांतिक प्रायश्चित्त घडून आत्महत्येचा दोषही घडणार नाहीं.

* द्वितीयपक्षीं म्हणशील तर, आम्हाला इष्टापत्तिच आहे; कारण शास्त्रांत ज्याची प्रशंसा केली आहे, तेच अल्प किंवा महत् होय, असें पराशरस्मृतीच्या टीकेच्या उपोद्घातांत माधवाचार्यांनीं सांगितले असून, औषधादिकांचें ठायीं तसे दृष्टहि आहे. ते माधवश्लोक प्रमाणार्थ सांगतो -

**''ननु क्व पंचगव्यादि कुत्र वा मरणान्तिकम् ।**
**तयोः समविकल्पत्वं वदतस्तेऽतिसाहसम्**
**क्व विश्वजित् क्वाग्निहोत्रं स्वर्गं साधयतोस्तयोः ।**
**विकल्पं वदतस्ते वा कुतो नैवाऽतिसाहसम् ॥**
**कर्माधिक्यात्फलाधिक्यमिति न्यायसमाश्रयात् ।**
**साहसं परिहर्तव्यमित्येतदुभयोः समम् ॥**
**न्यायाश्रये त्वस्मदुक्तव्यवस्था द्विष्यते कुतः ।**
**इति चेदव्यवस्थोक्ता त्वयातो द्वेष्मि ते वचः ॥**
**देशभेदात्कालभेदात् पुंभेदादन्यथान्यथा ।**
**विपर्य्यस्यति शास्त्रार्थ इति पूर्वमवादिषम् ॥**
**अतोऽपास्यार्थवादांशं विधिवाक्येषु यद्यथा ।** (य११पू.५४)
**प्रतीतं तत्तथा ग्राह्यं बाधं वाचनिकं विना ॥**
**स्मृतिव्याख्यातृभिः सर्वैर्वचनानां व्यवस्थितम् ।**
**ब्रुवाणैर्मंदमतयो व्युत्पाद्यन्ते हि केवलम् ॥**
**अन्यथात्यल्पपापस्य कृते द्वादशवार्षिके ।**
**न स्यान्निवृत्तिस्त्वत्प्रोक्ता व्यवस्था तादृशी यतः ॥**
**अथाल्पं महता नश्येन्नाल्पेनान्यत्तदा वद ।**
**इदमल्पमहच्चेदमिति ते किंन्नियामकम् ॥**
**अल्पायासमहायासौ यद्यल्पत्वमहत्वयोः ।**
**हेतुर्महाव्रतास्तर्हि भवेयुः कृषिकादयः ॥**
**सिंहव्याघ्रादिमूत्रादौ प्रयासबहुलत्वतः ।**
**पंचगव्यात्प्रशस्तत्वं व्रतांगत्वे च ते भवेत् ॥**
**इति कर्तव्यबाहुल्यं महत्वं चेत्तदाल्पता ।**
**जलाग्न्यादिप्रवेशस्य प्रसज्येत व्रतान्तरात् ॥**
**तस्माच्छास्त्रेण यस्योक्ता प्रशंसा तन्महाव्रतम्''॥** (पाराशरस्मृति-उपोद्घात् : माधवाचार्य)

या श्लोकांचा भावार्थ बहुतेक वर आलाच आहे. थोडासा येथें राहिला तो सांगतो. पराशरस्मृतींत कलियुगाला अनुसरून मन्वादि स्मृतींतील कठीण व्रतांच्या अपेक्षेनें आचरण्याला सुलभ अशीं व्रतें सांगितली आहेत. त्यामुळें पराशरस्मृति प्रमाण नाहीं असें पूर्वपक्षाचें म्हणणें आहे. त्यावर निराळें व्रत दाखविणें म्हणजे विरोध नव्हें, असें सिद्धान्तीचें म्हणणें आहे. बाकीच्या शेष सर्व अर्थाचा अनुवाद केलाच आहे.

हाच न्याय आम्हीं नामस्मरणास लागूं करितो. शिवाय 'कलिसंतरणादि'[७४] श्रुतींत व भागवतादि पुराणांत नाममहिमा अत्यंत सांगितलाच आहे. न्यायाचाच आश्रय केला तर, कुऱ्हाडीनें खोबरे तोडलें असतां जशी इष्टसिद्धि होत नाहीं, तद्वत् मोठ्या द्वादशाब्दादिक प्रायश्चित्तानेंहि अल्पपापाची निवृत्ति होऊं नये.

आतां नागपदनिवेशन्यायाचा[७५] अंगिकार करशील तर हें मोठें व हें लहान याविषयीं आगमावांचून दुसरें तुज जवळ प्रमाण नाहीं.

वादी उवाच - अहो हा तुम्ही सांगितलेला श्लोकांचा अर्थ समजला; पण अल्प प्रायश्चित्तानें मोठ्या पापाचा एकदेश नाश पावतो, असे (य११पू.५५) याच उपोद्घातांत म्हटले आहे तें आपण पाहिलें नाहीं असें वाटते.

सिद्धान्ती उवाच - अरे तुझ्या सारख्या मंदबुद्धीचें समाधान करण्याकरितां तें म्हटले आहे, किंवा अल्प कर्माविषयीं आहे असें समज; नामाविषयीं नाहीं. कारण इतर कर्माचें अल्पत्वबोधक इतर शास्त्रें उपलब्ध आहेत, तसें नामाचें अल्पत्वबोधक कोणतेंही शास्त्र उपलब्ध नाहीं.

वादी उवाच :- वचनावरच सर्वथा अवलंबून राहिले तर नरमूत्रपानादि वचनालाहि धर्मत्व येईल.

सिद्धान्ती उवाच :- ज्या धर्मांत तीं वचनें असतील त्या धर्मांत त्यांना धर्मत्व जरी असलें तरी, वैदिक धर्मांत त्यांना पापरूपत्व श्रुत व स्मृत आहे. तसें नामस्मरणाला पापरूपत्व वैदिकादि धर्मांत कोठेंच सांगितले नाही. म्हणून तें स्वतःच धर्मरूप आहे. एवढ्याकरितांच तूं त्याचें सर्वदा स्मरण कर.

आतां नामग्रहण न करणाऱ्याला प्रत्यवाय सांगितला आहे, म्हणून ते काम्य नाहीं; कारण काम्यकर्म न करणाऱ्याला प्रत्यवाय नाहीं. तसेंच

ग्रहणादिकाप्रमाणें नैमित्तिक नाहीं; कारण इतरकालीं केले असतांहि नामस्मरणाला प्रत्यवाय नाहीं; म्हणून अर्थातच तें नित्य आहे; व ऋतुपर व पुरुषपर अशा खादिरादि वचनसंबंधी संयोगपृथकत्व-न्यायानें[७६] तें प्रायश्चित्तरूपहि आहे.

सर्वांगांचे अनुष्ठान शक्य नसतां जन्मभर प्रधान अंगाचेच अनुष्ठान करावे असें पूर्वमीमांसेच्या सहाव्या अध्यायांत म्हटले आहे. नामाविषयीं कोणत्याहि अंगाची अपेक्षा नाहीं, म्हणून ते स्वयंप्रधान आहे.

श्रीमच्छंकराचार्यांनी देखील इतकें सुलभ असतां त्याचें निराकरण केले नाहीं. एवढ्याकरितां तूंहि त्याचाच आश्रय कर; कारण त्याला नित्यत्व असून भक्तित्व वचनगोचर आहे.

**तें उत्तमामाजीं उत्तम । रामकृष्ण मेघःश्याम ।**
**शिवहर उमाधाम । इत्यादि नामें ॥१४७॥**

अभंग : संत तुकाराम १८८४ -

**''मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतासी ॥१॥**
**वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा वस्तूंसी ॥२॥**
**भस्म दंड न लगे काठी । तीर्थ आटी भ्रमण ॥३॥**
**तुका म्हणे आडकाठी । नाहीं भेटी देवाची ॥४॥** (य११पू.५६)
**''कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे ।**
**जे नांवचि नाहीं पापाचें । ऐसे केले ॥१९७॥**
**तयापाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ।**
**जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥२०८॥ ज्ञा.अ.९**
**रूपें दोन अंतरीं येती । परी दो अक्षरा न कल्पी वृत्ति ।**
**यालागीं नामी एकाग्रवृत्ति । निरुद्धस्थिति[७७] हरिनामें ॥१४८॥**
**सांडोनिया सर्व कर्म । आवडी भजावा पुरुषोत्तम ।**
**कृष्णप्राप्तिविण धर्म । महा अधर्म तोचि की ॥१४९॥**
**नामधारक परस्त्रीगमनी । तरी कर्मठ निंदिती वाणीं ।**
**अप्सराभोगाची कामना मनीं । ती चोरोनी ठेविती ॥१५०॥**
**निषिद्धाचरणी नामधारक । तो नाममाहात्म्य बोलतां देख ।**
**तरी थूं थूं म्हणोनी मूर्ख । वेगळे होती ॥१५१॥**
**उगेचि श्रुति देऊनी प्रमाण । घ्यावा म्हणती पशूंचा प्राण ।**
**हें असो आम्हा नारायण । रक्षो अथवा शिक्षो कां ॥१५२॥**
**उनाड बाळासी माय मारी । तरी काय म्हणावी वैरी ?**
**तेवी नामधारका पूतनारी । शिक्षा देता कृपाचि ते ॥१५३॥**
**काशींत पाप करी कांहीं । परी तेथ यमयातना नाहीं ।**
**भैरवयातना लवलाही । भोगुनी होई मुक्त शेखीं[७९] ॥१५४॥**
**तैसा नामधारकाप्रति । रक्षक शिक्षक कमळापति ।**
**म्हणोनी आम्हीं निर्भय चित्तीं । स्वेच्छा क्षितीं वावरू ॥१५५॥**
**आतां जया इंद्रियासी नियम । आणि मुखें घेतो नाम ।**
**त्यासी सापराध नामधारक । जैं छळी ॥१५६॥**
**तेव्हां न मानूं ते मात्र । होऊं निरपराधनामधारककृपापात्र ।**
**हें असो दोही पक्षीं भवातपत्र । नामचि आम्हा ॥१५७॥**
**सिद्ध साध्य सुसिद्ध अरि । हे उभे न ठाकती नामद्वारीं ।**
**यास्तव रामकृष्णहरी । मंत्र षडाक्षरी जपावा हा ॥१५८॥**
**सप्ताक्षरी कीं षडाक्षरी । मंत्र सकलाते तारी ।**
**किंवा शिवरामकृष्ण निर्धारी । म्हणावे सुखें ॥१५९॥**
**वैखरी[८०]पासूनी ऊर्ध्वगती । ज्या ज्या नांवांची निश्चिती ।**
**ती नांवें बीजमंत्र होती । सद्गुरुमुखें फळती ते ॥१६०॥**
**वैखरी वाणीपासून । ज्या नामाची गति समान ।**
**ते उघड जपतांहि जाण । दोष नाहीं ॥१६१॥**
**ज्या नांवांची ऊर्ध्व अधो गति । त्यांचिहि उघडचि जपकृति ।**
**कां भलतेही नाम श्रीगुरुमूर्ति । दाता तरी निश्चिती समचि फळ ॥१६२॥**
(य११पू.५७) **अथवा हा विकल्प पाही । भाविकें न धरावा कहीं ।**
**शिवकेशव सर्वा ठायीं । जपावे आवडी ॥१६३॥**
**नाम वेडे वाकुडे घ्यावे । तेणें सद्गुरुतें मिळवावे ।**
**मग तेंचि नाम स्वभावें । महावाक्य होय ॥१६४॥**
**नामें हांकारिता भेटे । तो सद्गुरुमुखीं अंतरीं प्रगटे ।**
**म्हणोनी आघवे नेटें[८१] । नामचि घ्यावे ॥१६५॥**

(प्रश्न) तैं शिष्य जोडोनिया पाणि । म्हणे जी स्वामी कैवल्यदानी ।
नाम आधींच शक्त[८२] सर्व संपादनीं । तरी मग सद्गुरुवाणी कां घ्यावे ॥१६६॥
सद्गुरु तंव दोन । गायत्री उपदेशक कीं महावाक्योपदेशक निधान ।
आधिला गुरु आश्रम तीन । चतुर्थाश्रमीं द्वितीय गुरु ॥१६७॥
(उत्तर) ऐसें सच्छिष्याचें वचन । आचार्य ऐकोनि कृपाघन ।
म्हणती वत्सा अनुपबृंहण[८३] । श्रुति-प्रमाण बोलूं नये ॥१६८॥
गायत्री आहे त्रिवर्णांप्रति । क्षत्रिय असतां दाशार्ह नृपति ।
तो घ्यावया पंचाक्षरी शिवोपास्ति । गर्गमुनिप्रति शरण गेला ॥१६९॥
हें स्कंदपुराण ब्रह्मोत्तरखंडीं प्रथमाध्यायीं कथा । यालागीं उपास्ति गुरुहि असे तत्वता । अनुभव उपपत्तिहि[८४] समर्था । असती येथ ॥१७०॥
प्रथम नामजपबळें । जैं कृपानिधान सद्गुरु मिळे ।
तैं तयाते अर्पणें सगळे । तनु मन धन ॥१७१॥
पूर्वी जी उपासना केली होती । तिची साधनचतुष्टयांत झाली समाप्ति ।
परी संस्कार पाहिजे पुढती । ज्ञानोत्तरभक्ति घडावया ॥१७२॥
तो संस्कार न घडे नामाविण । ऐसा तंव अनुभव पूर्ण ।
शिष्य रिघतां सद्गुरूस शरण । तरी गुरुआज्ञेविण कर्तव्य नाहीं ॥१७३॥
गुरुआज्ञेवांचून । करितां अन्य उपासन ।
तरी गुरुभक्तींत पूर्ण । व्यभिचार[८५] होय ॥१७४॥
''जयाचे वक्त्र[८६] । वाहे गुरुनामाचें मंत्र ।
गुरुवाक्यावांचुनि शास्त्र । हातीं न शिवे ॥४४८॥''(ज्ञा.अ.१३श्लो.७)
ऐसी जरी तातोक्ति । तरी आम्हांचि जोडिली ती स्थिति ।
अत्यंत दुर्घट आणिकाप्रति । सर्वथा प्रतीति घडेना ॥१७५॥
गुरु तंव असती निरभिमान । ते न सांगती आपुले नामस्मरण ।
ग्रहण करिता आज्ञेविण । तरी प्रमाद जाण निश्चये ॥१७६॥

विपुलाची कथा

ऐसी महाभारतीं कथा । विपुलासी गुरूनें स्त्रीरक्षण सांगता ।
तेणें अत्युत्तम कार्य साधुनिहि तत्वता । गुरुलागीं न निवेदिले ॥१७७॥
(य११.पू.५८) सूर्यादिकीं सुचविले तयासी । कीं विपुल आहे महादोषीं ।



तेणें ऐकुनी श्रीगुरूसी । कर जोडोनी विनविले ॥१७८॥
मग श्रीगुरु बोलिले विपुलाते । त्वां उत्तम कार्य केलें हें मज कळले चित्तें ।
परी स्वमुखें न निवेदिले मातें । हा दोष महंते न साहिजे ॥१७९॥

नानकांची कथा

हें असो कलीत नानक तत्वता । शिष्यासह नदींतून जात असतां । 'अलख निरंजन' म्हणती तत्वता । आणि शिष्यासी सांगती 'वाह गुरु' म्हणे॥१८०॥
नानकासी गुल्फपाणी[८७] । उरुपर्यंत शिष्यालागुनी । तंव विकल्प आला शिष्याचें मनीं । म्हणे साधारण मंत्र कथिला मज ॥१८१॥
मग आपणचि स्वतंत्र । नानक जपती तो जपे मंत्र । तेणें मस्तकावरुते जाहले नीर । मग बोभावें[८८] साचार बुडालो म्हणुनी ॥१८२॥
मग मागें पाहुनी सद्गुरु । काढला धरोनिया करू । म्हणे तुज सांगितला असता 'वाहगुरु'[८९]। आमुचा मंत्र जपलासि कां ॥१८३॥
गुरु सांगती ते आचरावे । गुरु करिती ते न करावे ।
सांगितले बीजचि जपोनी बरवे । चाल स्वभावे मज मागे ॥१८४॥
ही कथा भक्तिलीलामृतीं । स्वयें बोलिले राय महिपती ।
यालागीं गुरु आज्ञेविण निश्चिती । कांहींहि स्वार्थी करूं नये ॥१८५॥
येथ ऐसे म्हणती कोणी । कीं - ''यान्यस्माकं सुचरितानि ।
तान्येव त्वयोपास्यानि । नो इतराणि'' श्रुति ऐसी ॥१८६॥
तियेचा अभिप्राय पूर्ण । कीं न घ्यावे गुरूचें असदाचरण ।
परी शिकावे तत्सदाचरण । मग गुरु करिती तें न करावे हें कैसे ॥१८७॥
ह्या शंकेचें उत्तर । कीं घ्यावा गुरूचा सामान्य सदाचार । यान्यस्माकं या बहुवचनीं हाचि विचार । परी विशेष सदाचार ज्याचा तया ॥१८८॥
असदाचरण कदापि न घ्यावे । सदाचरण सामान्य घेयावे ।
विशेष सदाचरण तंव करावे । आज्ञेनेंचि ॥१८९॥
प्रसंगें आज्ञेनें असत । घडलिया शिष्य अलिप्त ।
''आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया'' ही प्रस्तुत । स्मृतिहि आहे ॥१९०॥
* बळीनें नायकिली शुक्राची वाणी । परी तेथ गुरु उपाध्याय मुनि ।
केवळ सद्गुरूची वाणी । मोडिली ऐसा कोणी न देखिला ॥१९१॥

न मानावे तैसे गुरूचें वचन । हें जें तुकाराम बोलिले आपण ।
तेहि परमार्थभिन्न । विषयींचि असे ॥१९२॥
म्हणोनी गुरु स्वनामआज्ञा[९०] न देतां । स्वार्थासाठीं तें शिष्यें जपतां । तरी शपथ
वाहोनी सांगतो तत्वता । अनर्थ सर्वथा चुकेना ॥१९३॥(य११पू५९)
कित्येकांचे ऐसें मत । एकवेळ ज्ञान झालिया प्राप्त ।
मग गुरुआज्ञाहि मोडता निश्चित । बोध सर्वथा न ढळेचि ॥१९४॥
परी आमुचे संप्रदायीं । ऐसे मानिलें नाहीं ।
स्वयें बोलिली ज्ञानेश्वर आई । सद्गुरुक्षोभे नाश पावे ॥१९५॥
''जयाचेनि सावायें । जीवु ब्रह्मउपरू लाहे ।
ब्रह्महि हातातळील जाये । उदासे जेणें''॥ (अनुभवामृत प्र.२.ओ.१६)
हातातळील म्हणजे अपरोक्ष । उदास होतां श्रीगुरु प्रत्यक्ष ।
ते भक्तरहित होय हें साक्ष । तातचि देती ॥१९६॥
भक्तिविण विधुर[९१] ज्ञान । त्यासी न स्वीकारिती ब्राह्मण ।
अधिकार नाहीं म्हणून । भवपशुयजनीं ॥१९७॥
एवं कवणियाहि ठायीं । समर्पितालागी पाही ।
गुरुआज्ञेविण नाहीं । स्वार्थाधिकारू ॥१९८॥
ते निरभिमानें जैं स्वनाम न देती । मागील नामहि गेले वाक्समर्पणरीति ।
नामाविण तंव भक्तिसंस्थिति[९२] । न होय ही अनुभूति महंताची ॥१९९॥
एवं इकडे आड तिकडे विहिरी । अडलिया सर्वापरी ।
ज्ञानबोधक श्रीगुरुवक्त्रीं । प्रार्थोनी भक्तिसंस्कारी[९३] घेयावे नाम ॥२००॥
अम रोग जया नाहीं । तें नाम हा विग्रह सुंदर पाही ।
अनामय[९४] पद लवलाही । येणेंचि मिळे ॥२०१॥
क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळ यवन दुराचार ।
पतिव्रता गणिका समग्र । नामीं साचार अधिकारी ॥२०२॥
नामें तरती विधवा । परी पतिविण नामें न तरती सधवा ।
ऐसे आपुलिया मनो भावा । रामीरामदास बोलिले ॥२०३॥
ग्रंथ अवलोकलियाविण । व्यर्थचि बोलो नये वचन ।
पति आधीं मंत्रग्रहण । कलावतीते हे स्कंदपुराण सांगे ॥२०४॥



पतीवांचुनि नाहीं गुरु । हा साच आहे निर्धारू ।
परी मुमुक्षु स्त्रियेस साचारू । नियम नव्हे ॥२०५॥
म्हणती स्वानुभव दिनकर । कीं दुष्टबुद्धि असलियां भ्रतार । तयासी सद्बुद्धि
उपजवोनी साचार । मग ज्ञानविचार करावा स्त्रियेनें ॥२०६॥
हेंही बोलणें पक्षपाती । *ऐसी कथा महाभारती । कीं एका स्त्रियेनें आराधिला
उमापति । पतिआज्ञेंत न राहावे म्हणुनी ॥२०७॥ (य११पू.६०)
मग प्रसन्न होवोनी पिनाकपाणि । केली ती वेदशाखाप्रवर्तक जननी ।
*चुडालाही पतिआधीं ज्ञानविचार करोनी । तरली ही कथा वासिष्ठीं ॥२०८॥
*मदालसाहि येणें रीति । ज्ञानिनि हे मार्कंडेय पुराणोक्ति ।
*हेमलेखेस हेमचूडाआधीं बोधसंपत्ति । त्रिपुरारहस्यीं हे कथा ॥२०९॥
म्हणवोनी आमुचे संप्रदायीं । अधिकारी म्हणता शेषशाई ।
जैसे साधनहि नसतां कांहीं । प्रत्यभिज्ञामतीं लवलाही कथनेचि मोक्ष ॥२१०॥
तया निर्गुण म्हणोनी दुष्कर । आम्हा सगुण म्हणुनी सुकर ।
यास्तव ज्ञानदेव हरीहर । जपावे प्रेमें ॥२११॥
शिष्य म्हणे श्रीगुरुमाय । विष्णुसहस्त्रनामभाष्यांत वदले आचार्य ।
कीं शूद्रासि श्रवणेंचि मोक्ष होय । जपयज्ञ करूं नये तयानें ॥२१२॥
श्रीगुरु म्हणती ऐक वचन । विष्णुसहस्त्रनामछंदबद्ध पठण ।
न करावें हा आचार्याभिप्राय पूर्ण । परी नाहीं नामस्मरण निषेधिलें ॥२१३॥
या विष्णुसहस्त्रनामभाष्यांतचि । आचार्य वदले पूर्वीचि ।
कीं 'जपन्मुच्यते जन्तु' या श्लोकाची । करिता टीका ॥२१४॥
''अनेन जन्तुशब्देन जपार्चनस्तवनादिषु यथायोग्यं सर्वप्राणिनामधिकारं सूचयति''
जंतुशब्दें करून । ऐसें सूचवी जान्हवीनंदन[९५]। कीं जप स्त्रोत्र आणि अर्चन।
कराया यथायोग्य सर्व वर्ण साधारण अधिकारु ॥२१५॥
येथ 'यथायोग्यं' शब्दाचा अर्थु । शूद्राविषयीं घेतां श्रवणार्थु ।
तरी तो छंदबद्ध स्तोत्राविषयीं समर्थु । जपाविषयीं घडेना ॥२१६॥
जपश्रवणचि नाहीं । मा प्रसक्ति[९६] घडेल कायी ।
प्रसक्तिविणा नाहीं । प्रतिषेधू[९७] ॥२१७॥
आतां उच्च जप नामाचा । तच्छ्रवणेंचि उद्धार शूद्राचा ।

ऐसा अर्थ घेतांहि इतर पुराणांचा । होईल लोपू ॥२१८॥
विष्णुभक्तिमय श्लोक । शूद्रें पढावेत हा स्कांद श्लोक ।
आणि भविष्य म्हणे नृसिंह नाम एक । घेतां शूद्रम्लेच्छादिक तरती ॥२१९॥
''अमेध्योक्तं च पत्रं च लिप्यक्षरविभूषितम् ॥३३॥
पूतं स्यात्तत्क्षणाद्विप्राश्चतुः पंचाक्षरेण वा ।
नारसिंहस्य विन्यासे पूतो भवति तत्क्षणात् ॥३४॥
मायाविभवविन्यस्ते महापापकलेवरे । (य११पू.६१)
मुहूर्तार्धेन पूतत्वं प्रभोर्यान्ति परां गतिम् ॥३५॥
स्त्रियो वा निन्दितो वाऽपि म्लेच्छो याति परां गतिम् ।
यो मूढो मन्यते दोषं तस्य शौचं समाचरेत् ॥३६॥
स गर्दभीं खरीं योनीं प्रविशेन्नात्र संशयः ॥३७॥ (भविष्यपुराण मध्यमपर्वणि अ. ८)
पुस्तक लिहावयाचें पत्र । जरी स्पर्शेल अपवित्र ।
तरी तें चतुराक्षर वा पंचाक्षर । मंत्रवर्णे शुद्ध होय ॥२२०॥
नृसिंहनामाचें माहात्म्य मोठे । महापापी उद्धरती गोमटे[९८] ।
जातिपतित कर्मपतित पावती नेटें[९९] । परम पदा ॥२२१॥
स्त्रिया शूद्र म्लेच्छ चांडाळ । धर्मशास्त्रीं हे जातिपतित सकळ ।
आणि स्ववर्णाश्रम त्यागिती खळ । कर्मपतित बोलिजेती ॥२२२॥
इया समस्तांचा उद्धारु । करावया प्रल्हादवरदनाम तारूं ।
येथ विश्वास धरीना जो पामरु । तया निरखितां सचैल[१००]कीजे ॥२२३॥
श्रद्धा नाहीं नामस्मरणीं । तरी तो पावे गाढवयोनी ।
ऐसी भविष्यपुराणवाणी । तत्संकोच शंकराचार्यवाणी करो न शके ॥२२४॥
''कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे ।
जे नांवचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥१९७॥ ज्ञानेश्वरी अ.९
ऐसें श्रीआळंदीरमण । बोलिले कीं मागील पापदहन ।
होय नामस्मरणेंकरून। 'नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे' या पदें ॥२२५॥
'कीर्तनाचेनि नटनाचें' । या पदें अविच्छिन्नत्व सांगती स्मरणाचें ।
'जे नांवचि नाहीं पापाचें' । या पदें सांगती पापप्रवृत्तिरोधु ॥२२६॥
अथवा भूत भविष्य वर्तमान । दोष न ठेवी नामस्मरण ।
हाहि अर्थ समीचीन[१०१] । ओंवीमाजी या ॥२२७॥
आणि या विष्णुसहस्रनामाच्याचि टीकेंत ।
नीलकंठ स्तोत्रपठणींहि अधिकार देत । विष्णुभक्तिमय श्लोक जो पठित ।
तो शूद्र होय मुक्त । हें स्कंदपुराण म्हणे ॥२२८॥
म्हणोनि असच्छूद्रीं स्तोत्र । न पढावें हा आचार्याभिप्राय सुंदर ।
नामस्मरण तंव सकळांसि सार । पतीत नर उद्धरती येणें ॥२२९॥
ब्रह्मोत्तरखंडीं स्कंदपुराणीं । शिवपंचाक्षरी जपावा चहूं वर्णीं ।
आणि संकरहि योनी हा जपोनि । तरती हें वदले ॥२३०॥ (य११पू.६२)
भागवतीं आणि अन्य पुराणीं । शूद्रादिकां अधिकार नामस्मरणीं ।
'येरां स्तोत्र कां नाममंत्र' म्हणोनि । तातहि अधिकार सांगती ॥२३१॥
ऐसें शिष्यातें श्रीगुरु सांगतां । तंव वादी पातला अवचितां ।
म्हणे नाममाहात्म्य बोलतां । जन असत्पंथा लावावया ॥२३२॥
सिद्धांती म्हणे बोलतो साचें । तेथ काय जातें तव बापाचें ।
आम्ही होऊं नरकाचे । अधिकारी सुखें ॥२३३॥
वादी म्हणे तुमची करुणा । बहुत येते माझ्या मना ।
सिद्धांती म्हणे तुझीच करुणा । करावी लागेल समर्था मज ॥२३४॥
वादी म्हणे सांगावें तरी । सिद्धान्ती म्हणे योग्य विचारी ।
वादी म्हणे नाममहिमा असच्छोत्रीं । घालितां होय अपराधु ॥२३५॥
सिद्धांती म्हणे हें साचचि तत्वतां । परी अपराध नामासी अर्थवादहि म्हणतां ।
एवं दोन्हीपक्षीं अडचण येतां । तरी अर्थवाद[१०२] तत्वतां म्हणों नये ॥२३६॥
असताशी न करावें भाषण । परी नामासी अर्थवाद म्हणतां जाण ।
तयां अपराधाकारण । अन्यत्र गति न सांपडे ॥२३७॥
'असति नामवैभव' न सांगावें म्हणोनि । उलटें नाम वाल्मीकीस सांगितलें ब्राह्मणीं । ही कथा अध्यात्म रामायणीं । बोलिली आहे ॥२३८॥
म्हणोनि 'नामवैभवकथा असति' । या अपराधा अन्यत्र गति ।
परी नामार्थवादी अपराधियाप्रती । अन्यत्र[१०३]गति नाही नाही ॥२३९॥
आरंभीं केशव नारायण । अंतीं अच्युतनामग्रहण ।
येणेंचि वैदिक कर्म न्यून । पूर्ण होय ॥२४०॥

नामासि अर्थवाद कल्पितां । तरी कवणें पूर्णकर्में तयाची शुद्धता ।
तंव वादी म्हणे येणे कर्मसाद्गुण्यता[१०४] । आली नामा ॥२४१॥
सिद्धांती म्हणे हें चित्ती न धरी । अशुचि कर्मासि अनधिकारी ।
शुचि अशुचि नामीं अधिकारी । हें कलिसंतरण* श्रुति सांगे ॥२४२॥*उपनिषद्
वादी म्हणे ''ब्राह्मणः पठन् विमुच्यते'' । ऐसें तेथ वाक्य उपलभ्यते ।
यालागीं नाहीं शूद्रातें । नामस्मरणीं अधिकारु ॥२४३॥
सिद्धांती म्हणे ऐक वचन । त्या उपनिषदेचें कराया पठण ।
अशुचिहि परी ब्राह्मण । पाहिजे हा त्वदुक्त्यर्थु ॥२४४॥
उपनिषत्पठणीं कहीं । शूद्रास सर्वथा अधिकार नाहीं ।
परी शिवनामें धन्य चांडाळहि । ऐसी श्रुति मागेंच वदलों ॥२४५॥
आणि तदुपबृंहणन्यायें । नामें शूद्रासि अधिकार होये ।
एवं कर्मसाद्गुण्य नोहे । नामाप्रती सर्वथा ॥२४६॥
पूर्वी उदाहरिली श्रुति । तींतील चांडाल शब्दार्थ पतीत द्विजजाति । कलिसंतरण समन्वयें निश्चितीं । हें वादी वदतां सिद्धांती म्हणे ॥२४७॥ (य११पू.६३)
महाभारतादि पुराणीं । जातीं चांडाल तरले नामस्मरणीं ।
यालागीं उपबृंहणीं । श्रुत्यर्थ कीजे ॥२४८॥
शूद्रास अचिन्ह[१०५]संन्यास सांगे श्रुति । आणि तिचेंचि उपबृंहण महाभारतीं ।
आश्रमास्तव नामनिषेधव्युत्पत्ति[१०६] । कदा न घडे ॥२४९॥
वैराग्यमासाद्यतु पापयोनिः शूद्रोपि संन्यासमुपेत्य मोक्षम् ॥
प्राप्नोति पापं तु विधूय विप्रः संन्यासमेत्य ननु मुच्यते वै ॥ (वैराग्यभास्कर, पान ३४.)
भगवंतहि वदले आपण । कीं स्त्रीशूद्र करितां माझें भजन ।
तरती म्हणोनि नामस्मरण । निषेधिल्या नवजाय ॥२५०॥
आतां तुवां श्रुति समन्वय बोलिला ।
री कलिसंतरणीं अशुचि ब्राह्मणचि म्हटला । चांडालत्व नाहीं तयाला ।
यालागीं पूर्वोद्धृत[१०७] श्रुतींत चांडाळ बोलिला जातिमंत ॥२५१॥
आणि बोलिले सांबपुराणीं । कर्मसाद्गुण्य नाहीं नामालागुनी ।
तोहि श्लोक ऐक श्रवणीं । मन करोनि सावध ॥२५२॥
''यदन्यत्कुरुते कर्म यदि वा न करोति च ।
कृतेन जपयज्ञेन परां सिद्धिमवाप्नुयात् ॥३॥ (सांबपुराण, अ. ४७)
करो न करो अन्यकर्म । जपयज्ञेंचि गति पावे परम ।
महापातकीहि जपेंचि धर्म । पावती हें तेथेंचि बोलिले ॥२५३॥
''महाद्भिः पातकैर्युक्ता ये चान्ये कार्यकारिणः ।
खखोल्कजाप्यन्मुच्यन्ते सर्वे तैस्तैस्तु पातकैः ॥४॥'' (सांबपुराण, अ ४७.)
महापातकी आणि दुराचारी । खखोल्कजपें[१०८] शुद्ध अंतरी ।
होवोनि होती मोक्षाधिकारी । जपयज्ञ ऐसा श्रेष्ठ हा ॥२५४॥
हें खखोल्कमंत्रजपाचें प्रकरण । येथहि सत्कर्मव्यावृत्ति आणि महापातकविमोचन । आतां कर्मसाद्गुण्य नापेक्षी नामस्मरण ।
हें कैमुतिकन्यायान सिद्ध झालें ॥२५५॥
इतर कर्माची केली व्यावृत्ति । म्हणोनि अर्थवादत्व नाहीं नामाप्रती ॥
'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' इति । जागृत श्रुति गर्जतु ॥२५६॥ (य११पू.६४)
नाममाहात्म्य अर्थवाद असतें । तरी 'नामोच्चरितव्यं' हें विधिवाक्य नसते ।
'यजमानः प्रस्तरः'[१०९] या वाक्यातें । विधित्व मतें(ने)हि[११०] कल्पितां नये ॥२५७॥
यद्यपि छांदोग्यीं सनत्कुमार । वस्तु सांगती नामब्रह्मपर[१११] ।
परी तेथ शार्ङ्गधर । नामनिर्देश नाहीं ॥२५८॥
तेथ नाम जें बोलिले । तें शब्दमात्र भाष्यकारीं स्पष्ट केलें ।
म्हणोनि 'नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा'
हें हृदयाचार्य बोलिले । तेंचि साच ॥२५९॥
कर्मांगत्व अच्युतस्मरणा । तरी तें प्रायश्चित्ताचिया कारणा ।
येऱ्हवि मंत्रविनियोगादिवत् कल्पना । करोचि नये नामाविषयीं ॥२६०॥
आणि स्वतंत्र प्रायश्चित्तकारी । कर्म श्रद्धावंता तारी । शुभक्रियासाम्य नामापराध भारी । एतदर्थ द्वादशाब्दप्रायश्चित्तादौ हरिस्मरण कर्मांग बोलिले ॥२६१॥
नामापराधिया नाम तारक । ऐसे पद्मपुराणीं श्लोक ।
कर्म व्यर्थ होता नामव्यतिरेक[११२] । तस्मान्नाम मुख्य सर्व शास्त्रीं ॥२६२॥
जेवि शिशुरोगीं कुपथ्य वांच्छिता । तरी भक्षणानुज्ञा दे वैद्यमाता ।
परी औषध भक्षणीं तत्वतां । आग्रह करी तयासवें ॥२६३॥
तेवि कर्मश्रद्धाजडा[११३] । प्रायश्चित्त सांगे मुनिजन रोकडा ।

**परी आग्रह करी हरिनामभांडा[११४] । होवावया ॥२६४॥**
**म्हणवोनी भागवन्नाम । विधिशेष[११५] नोहे क्रियासम ।**
**नामधारका पुरुषोत्तम । कल्पांतीहि नुपेक्षी ॥२६५॥**
**कर्मारंभी केशव नारायण । तेहि संध्या-काळपूर्व दोषप्रायश्चित्ता कारण ।**
**म्हणोनीहि नामस्मरण । कर्मसाद्गुण्ये प्रमाण म्हणो नये ॥२६६॥**
**आतां मीमांसकांशीं शास्त्रार्थ करोनी । नामार्थवादत्व निरसिले श्रीधरस्वामीनीं।**
**तयांचीहि सुंदर वाणी । पैठू दे[११५अ] अंतःकरणीं श्रोत्रद्वारें ॥२६७॥**

**अयं भाव :-**

**''कर्मांगत्वेऽपि हरिनाम्नः खादिरत्वादिवत् संयोगपृथक्त्वेन सर्वप्रायश्चित्तार्थत्वं युक्तमेव तथाहि ।**
**''अवशेनापि यन्नाम्नि कीर्तिते सर्वपातकैः । पुमान् विमुच्यते सद्यः सिंहत्रस्तैर्मृगैरिव''**
**इत्यादिभिः पुराणे तावत्सहस्रशो नाम्नः स्वातंत्र्यमवगम्यते ।**
**न चैतेऽर्थवादा इति शंकनीयं विधिशेषत्वाभावात् ।**
**न च विध्यश्रवणादन्यशेषता कल्पनीया ।**
**यदाग्नेयोऽष्टा कपालो भवतीत्यादिवदप्राप्तार्थत्वेन विधिकल्पनोपपत्तेः ।**
**मंत्रेषु च ''मर्त्या अमर्त्यस्य ते भूरि नाम मनामहे ।**
**विप्रासो जातवेदसः आस्य जानन्तो नाम चिद्विवक्तनेत्यादिषु**
**नाम्नस्तपोदानादि सर्वधर्माधिक्यमवगम्यते ।**
**उपपादितं च मंत्रार्थवादानामपि स्वार्थे प्रामाण्यं देवताधिकरणे (य११पू.६५)**
**तस्मात् श्रीनारायणनामाभासमात्रेणैव सर्वाघनिष्कृतं कृतं स्यादिति ॥८॥**

(श्रीमद्भागवत - श्रीधरी स्कं.६अ.२.श्लोक८)

**भावार्थः- विधिशेष नाहीं म्हणोन । अर्थवाद न म्हणावे नामस्मरण ।**
**अन्यविधिशेषकल्पन[११६] । योग्यचि नाहीं ॥२६८॥**
**मंत्र तप दानादिहून । अधिक सांगे नामस्मरण ।**
**आणि मंत्रार्थवाद प्रमाण । हे देवताधिकरणीं बोलिले ॥२६९॥**
**पद पदार्थ जाणती पंडित । मज येत नाहीं संस्कृत ।**
**परी निश्चयें जे जाणे माझें चित्त । तेचि यथार्थ बोलिले म्यां ॥२७०॥**

वादी उवाच :- तुम्हाला पद-पदार्थ न समजो परंतु विषय तरी मला स्पष्ट समजला पाहिजे.

सिद्धान्ती उवाच :- ज्ञानी व पंडितापुढें मला पदपदांतर येत नाहीं, म्हणून तुझ्या पुढें येत नाहीं असे नाहीं. सार सांगून अवशिष्ट पदार्थ मी टीकेचा सोडून दिला होता. तुझा आक्षेपच आहे तर पुनः श्रवण कर.

नामाला कर्मांगत्व[११७] जर आहे तर तें प्रायश्चित्तरूप पृथक् कर्म कसे होईल? अशी शंका आली असतां खादिरत्वाप्रमाणें होते असें स्वामी सांगतात. या विषयीं जैमिनी सूत्र आहे तें असें-

**''एकस्य तूभयत्वे संयोगपृथक्त्वम्'' (पूर्वमीमांसा अ४.पा३.सू.५)**

अर्थः- कर्मामधील एका द्रव्याविषयीं नित्य व काम्य अशा भेदानें विनियोग प्राप्त झाला असतां, म्हणजे त्या द्रव्याचा नित्यकर्मात व काम्यकर्मात दोन्हीं ठिकाणीं उपयोग सांगितला असतां, सांगणाऱ्या वाक्यांचा एकच अर्थ करावा कीं पृथक् अर्थ करावेत या विचारानें हें अधिकरण प्रवृत्त झाले आहे.

अग्निहोत्राविषयीं ''दध्ना जुहोति'' असें वाक्य आहे; आणि दह्यानें हवन करितो असा त्याचा अर्थ आहे. दुसरें वाक्य 'दध्नेन्द्रियकामस्य जुहूयात्' असे आहे, आणि इंद्रियकामी पुरुषानीं दह्यानें हवन करावे असा त्याचा अर्थ आहे.

त्याचप्रमाणें ''खादिरो यूपो भवति'' खैराचा यज्ञस्तंभ होतो असें एक वाक्य असून ''खादिरं वीर्यकामस्य यूपं कुर्यात्'' वीर्यकामी पुरुषाकरितां खैराचा यज्ञस्तंभ करावा असें दुसरे वाक्य आहे. ह्या सर्व वाक्यांचा विचार केला असतां दही व खैर ह्यांचा नित्यकर्मात व नैमित्तिक कर्मात (य११पू.६६) उपयोग केलेला दिसतो. म्हणून दही व खैर या द्रव्यांचा नित्यकर्मात साद्गुण्य आहे आणि काम्यकर्माविषयीं त्यांचे पृथकत्वही आहे.

**''शेष इति चेत्'' (पूर्वमीमांसा अ.४,पा.३,सू.६)**

पूर्वपक्षीं म्हणतो - अरे! हे तुला कसें समजत नाहीं. ''दह्यानें हवन करितो. खैराचा यज्ञस्तंभ होतो'' ह्या वाक्यांतील दह्याचे फळ इंद्रिय व खैराचे फळ वीर्य मानले असतां अर्थातच एकवाक्यता होते.

**नार्थपृथक्त्वात्'' (पूर्वमीमांसा अ.४,पा.३,सू.७)**

उत्तरपक्षी म्हणतो- हें पूर्वपक्षाचें म्हणणें बरोबर नाहीं, कारण होमाशीं दह्याचा संयोग व त्याचा वीर्यफळासी संयोग हे पृथक् आहेत. त्याचप्रमाणें

खैराची गोष्ट आहे. दह्याला होमसाद्गुण्यच मानले तर इंद्रियकामित्वाला दह्याचे पृथक् फळ सांगणारे वाक्य व्यर्थ होणार. यद्यपि अग्निहोत्रादि कर्मामध्यें दह्याचें इंद्रियत्वादि फळ पूर्वपक्षाला स्वीकृत असेल तरी ते देवलोकींच होईल, परंतु केवळ इंद्रियकामी पुरुषाला दह्याचा होम सांगणाऱ्या वाक्याची व्यवस्था लागणार नाहीं; म्हणून दही हें अग्निहोत्रादिकर्माचें सहकारी असून इंद्रियकामी पुरुषाला पृथक् फळ देणारेहि आहे. हाच मीमांसेंतील संयोगपृथक्त्वन्याय आहे.

खादिर-यूपविचार संस्कृतवेत्त्यांनीं शबरभाष्यांतून पाहून घ्यावा. तो हिंसेला किंचित् पोषक असल्यामुळें मी आपल्या ग्रंथांत लिहीत नाहीं. स्वामीनीं दिलेल्या उदाहरणाचे दह्याच्या दिलेल्या उदाहरणाने स्पष्टीकरण चांगले होतें. आतां हा संयोगपृथक्त्वन्याय नामस्मरणाचें ठिकाणीं कसा प्रवृत्त होतो तो पहा.

संयोगपृथक्त्वन्याय

**''यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपोयज्ञक्रियादिषु ।**
**न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वन्दे तमच्युतम् ''**

अर्थ :- तपयज्ञादिकर्मामध्यें ज्याचें स्मरण आणि नामोच्चारण केले असतां उणें राहिलेले काम पूर्ण होते त्या अच्युताला मी नमस्कार करितो. - या स्मृतींत भगवन्नाम कर्माचे पूरक सांगितले आहे, म्हणजे कृतकर्माहून भिन्न नामाचे फळ दाखविलेले नाहीं आणि (य११पू.६७)

**''हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम् ।**
**कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥**
**प्रायश्चित्तान्यशेषानि तपः कर्मात्मकानि वै ।**
**यानि तेषामशेषाणां कृष्णानुस्मरणं परम्''॥**

जें तप क्रिया इत्यादिक प्रायश्चित्तें सांगितली आहेत. त्या सर्वांमध्यें कृष्णस्मरण हें श्रेष्ठ आहे. पूर्ववाक्यांत भगवन्नामाचा नित्यकर्माशीं संबंध असून, उत्तरवाक्यांत भगवन्नामाचा प्रायश्चित्तकर्माशीं संबंध आहे; म्हणून संयोगपृथक्त्वन्याय येथें प्रवृत्त होतो. तथापि 'कर्मसाद्गुण्यच नामाला आहे -पृथक्त्व नाहीं,' असें वादी म्हणेल तर तें मात्र बरोबर नाहीं. कारण,

**''सकृदुच्चरितं येन हरिरित्यक्षरद्वयं ।**
**बद्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति ॥५२॥**

(स्कंदपुराण वैष्णवखंड मार्गशीर्ष माहात्म्य अ.१५)

अर्थ - एकवेळ ज्यानें हरी हें नामोच्चारण केलें, तो मोक्षाला जाण्याकरिता कटिबद्ध झालाच. ह्या वाक्यांत नामाचें प्रायश्चित्तावांचून मोक्ष हे पृथक् फल सांगितलें आहे.

**न गंगा न गया सेतु न काशी न च पुष्करम् ।**
**जिव्हाग्रे वर्तते यस्य हरिरित्यक्षरद्वयम् ॥**
**ऋग्वेदोऽथ यजुर्वेदस्सामवेदो ह्यथर्वणः ।**
**अधितास्तेन येनोक्तं हरिरित्यक्षरद्वयम् ॥**
**प्राणप्रयाणपाथेयं संसारव्याधिभेषजम् ।**
**दुःखक्लेशपरित्राणं हरिरित्यक्षरद्वयम् ॥**

अर्थ स्पष्ट आहे. ह्या वाक्यावरून धर्म अर्थ काम इत्यादि सर्व फळें नामानीं प्राप्त होतात असें सांगितलें आहे. उदाहरण दिलेल्या टीकेंत स्वामींनी जो वेदमंत्र सांगितला आहे, त्याचा अर्थ तपदानादिकापेक्षां नाम श्रेष्ठ आहे असा स्वामींनीच केलेलाहि आहे.

**''तमुस्तोतारः पूर्व्य यथो विद ऋतस्य गर्भ जनुषा पिपर्तन ।**
**आस्य जानन्तो नाम चिद्विवक्तन महस्ते विष्णो सुमतिं भजामहे''(य११पू.६८)**

(ऋग्वेद अष्टक २ अ.२ वर्ग२६ मंत्र२)

वादी उवाचः - यावरून वर्णत्रयासच नाममाहात्म्य विहित आहे शूद्रादिकांस नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- हें तुझें म्हणणें योग्य नाहीं; कारण,

**'ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः स्त्रियः शूद्रान्त्यजादयः ।**
**यत्र तत्रानुकुर्वन्ति विष्णोर्नामानुकीर्तनम् ।**
**सर्वपापविनिर्मुक्तास्तेऽपि यान्ति सनातनम्''॥ भविष्यपुराण.**

असें भविष्यपुराणाचें वचन आहे. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य स्त्रिया शूद्र अंत्यज आदिशब्दानें म्लेच्छ इत्यादि. जेथे तेथें हरिनामाचे कीर्तन करून सर्वपापरहित होत्साते भगवत्स्वरूपाला मिळतात असा त्या वचनांचा भावार्थ आहे. तसेंच भागवतांतहि,

**''किरातहूणांध्रपुलिंदपुल्कसा आभीरकंका यवनाः खशादयाः ।**

येन्येऽच पापा यदुपाश्रयाश्रयाः शुध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नमः'' (भाग.स्कं.२ अ.४)

श्रीधरी :- भक्तेः परमशुद्धिहेतुत्वं दर्शयन्नाह ।

किरातादयो ये पापजातयः, अन्ये च ये कर्मतः पापरूपास्ते यदुपाश्रया

भागवतास्तदाश्रयाः सन्तः शुद्ध्यन्ति ।

असंभावनाशंकां परिहरति प्रभविष्णवे प्रभवनशीला इति ।

भावार्थः - किरातादिक जातीनें वाईट व आणखी कोणी आगंतुक केलेल्या कर्मानें वाईट असणारें, सर्वच ज्याच्या भक्तांच्या आश्रयानें शुद्धि पावतात, त्या सर्वकारण विष्णूला मी नमस्कार करितो.

वादी उवाच :- अहो एवढें जर भक्तीचें वरिष्ठत्व आहे तर, मोठ्या मोठ्या महात्म्यानीं हें सोपें नामस्मरण सोडून इतर मोठमोठीं प्रायश्चित्तें कां सांगितली आहेत?

सिद्धान्ती उवाचः- ह्या तुझ्या प्रश्नाचें उत्तरहि सात्वत श्रुति देत आहे, ते श्रवण कर.

''प्रायेण वेद तदिदं न महाजनोऽयं देव्या विमोहितमति बत माययालम् ।

त्रैय्यां जडीकृतमतिर्मधुपुष्पितायां वैतानिके महति कर्मणि युज्यमानः''

(भागवत स्कं.६,अ.३,श्लो.२५) (य११पू.६९)

श्रीधरी :- ''यत्तूक्तं व्यर्थं तर्हि द्वादशाब्दादिस्मरणमिति तत्राह प्रायेणेति ।

महाजनो मन्वादिः।

अयं भावः- यथा मृतसंजीवनौषधिमजानन्तो वैद्या रोगनिर्हरणाय त्रिकटुकनिम्बादीनि स्मरन्ति तथा स्वयंभूशंभुप्रमुखद्वादशव्यतिरेकेणायं महाजनोऽतिगुह्यमिदमज्ञात्वा द्वादशाब्दादिकं स्मरतीति ।

किंच मायया देव्या अलं विमोहितमतिरयं जनो मधु मधुरं यथा भक्त्येवं पुष्पितायां पुष्पस्थानीयैरर्थवादैर्मनोहरायां त्रैय्यां जडीकृताऽभिनिविष्टा मतिर्यस्य ।

अतो महत्येव कर्मणि श्रद्धया युज्यमानो नाल्पे प्रवर्तते ।

दृश्यतेहि प्राकृतस्य लोकस्य महति मंत्रादौ श्रद्धाऽल्पे चाश्रद्धा ।

तस्मादस्य ग्राहको नास्तीति तैर्नोक्तम् ।

यद्वा स्वाधीनः सिंहोऽस्त्येवता श्वशृंगालादिनिवारणाय तं यथा न प्रयुंजते तथाऽतितुच्छत्वात्पापस्य न तन्निरसनाय परममंगलं हरेर्नाम स्मरन्ति ।



यद्वा नाममाहात्म्ये ज्ञाने सर्वमुक्तिप्रसंगादित्येषा दिक् ।

ग्रंथविस्तारभयात्तु नातिप्रपंच्यते'' ॥

भावार्थः- मायादेवीनें ज्यांच्या बुद्धीला मोह पाडला आहे, असे ते बारा भागवताहून भिन्न- अन्य मन्वादिक महात्मे, हा उत्तम नाममहिमा जाणत नसल्यामुळें, प्राकृत लोकांप्रमाणें अल्प साधन सोडून मोठ्या मोठ्या द्वादशाब्दादिक प्रायश्चित्ताविषयीं प्रवृत्त होतात, आणि लोकांनाहि तसेंच सांगतात. ज्याप्रमाणें मृतसंजीवनी माहित नसलेला वैद्य नाना प्रकारच्या श्रमसाध्य औषधाविषयीं प्रवृत्त होतो; किंवा अतितुच्छ पापाविषयीं एवढ्या मोठ्या नामाचा उपयोग करणें महात्म्यांना बरें वाटले नाहीं, असें जाण.

अथवा परमेश्वरानीं त्या मन्वादिकांना सृष्टिव्यवस्थेचा अधिकार दिला आहे. नाममाहात्म्यज्ञान सर्वांना करून दिल्यानंतर सर्वमुक्तिमुळें म्हणा; किंवा सर्वच निर्भय झाल्यामुळें सृष्टीची व्यवस्था चालणार नाहीं व त्यामुळें भगवदाज्ञाभंग होईल. आपल्याला जो अधिकार दिला आहे तेंच आपलें कर्तव्य आहे. नाममहिमाविस्तार परमेश्वर आपल्या भक्तमुखानें करीलच. अशा आशयानीं त्या महात्म्यांनीं नाममाहात्म्य प्रगट केले नाहीं.

वंशीधर ह्या श्लोकावर टीका करतांना नाममाहात्म्यानें सर्व जगत् मुक्त झालें असतांना परमेश्वराची लीलाच बंद पडेल असें म्हणतात, ते वेदान्त व युक्तिविरुद्ध आहे, ''लोकवत्तु लीलाकैवल्यम्'' या सूत्रावर भाष्य करतांना भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्य म्हणतात. (य११पू.७०)

''न चेयं परमार्थविषया सृष्टिश्रुतिः ।

अविद्याकल्पितनामरूपव्यवहारगोचरत्वात् ।

ब्रह्मात्मभावप्रतिपादनपरत्वाच्च ।

इत्येतत् अपि नैव विस्मर्तव्यम्''॥

सृष्टि सांगणाऱ्या श्रुति । जगत्परमार्थता न बोलती ।

केवळ मोक्षचि उपदेशिती । ब्रह्मात्मैक्यरूप ॥२७१॥

अथवा जीव ते अनंत । आघवेचि कैसे होतील मुक्त ।

बहु पश्वादिक असमर्थ । दिसती नामग्रहणीं ॥२७२॥

मूर्ख मनुष्येहि नाम न घेती । नास्तिक मनुष्ये श्रद्धा न ठेविती ।

किंवा पांडित्यदग्धहि अर्थवाद म्हणती । कांहीं नाम घेती तेहि सापराध ॥२७३॥
एवं दुर्लभ नाममाहात्म्य ज्ञान । सापराध नामधारका फल काळें करून ।
म्हणोनी वंशीधराचें वचन । अप्रमाणचि कीं ॥२७४॥
आणि सर्व जीव मुक्त झाले । तरी ईश्वराचे काय गेले ।
प्रातिभासिक सत्तेंत वहिले । अल्पहि होय महत्साधन ॥२७५॥
जैसे एकासी दिसले स्वप्न । कीं माझ्या सर्वांगीं किडे पडले गलित कुष्टानं ।
तंव मुखीं अमृत बिंदु पडला आकाश मेघांतून ।
तेणें गलित कुष्ट निमाला ॥२७६॥
हें स्वप्नीं अप्रमाण होईल कैसे । येथ सोमराज तेलादि चिकित्सावाद करिता ये हांसे । तेवि महामायाविलासे । भगवदिच्छा भगवन्नाम सुलभहि बळी ॥२७७॥
तंव वादी म्हणे हो कां यथार्थ । हें साचे घडो प्रायश्चित्त ।
परी अनुमोदन द्यावया पंडित । परिषद पाहिजे ॥२७८॥
सिद्धान्ती म्हणे सावध चित्त । होऊनि ऐक यथार्थ ।
या प्रश्नाचेंहि भागवत । उत्तर देत सहजचि ॥२७९॥
''यथाऽगदं वीर्यतममुपयुक्तं यदृच्छया ।
अजानतोऽप्यात्मगुणं कुर्यान्मंत्रोऽप्युदाहृतः ॥१९॥ (श्रीमद्भागवत स्कं.६.अ.२)
श्रीधरी :- नन्विदमपि पर्षदनुपदिष्टं श्रद्धाहीनंच कथं प्रायश्चित्तं स्यात्तत्राहुः यथेति। अगदमौषधम् ।
वीर्यवत्तममिति वक्तव्ये वीर्यतममित्युक्तम् ।
यदृच्छया श्रद्धादिहीनमुपयुक्तं भक्षितं पर्षन्मुखादजानतोऽपि स्वगुणमारोग्यं कुर्यात्। मंत्रोऽपि नामात्मकस्तया स्वकार्यं कुर्यादेव ।
नहि वस्तुशक्तिः श्रद्धादिकमपेक्षत इत्यर्थः तदुक्तं विष्णुधर्मेषु - (य११.७१)
''हरिर्हरति पापानि दुष्टचित्तेरपि स्मृतः ।
अनिच्छयापि संस्पृष्टो दहत्येवहि पावकः''इति ॥१९॥
भावार्थः- भिल्ल राहती अरण्यांत । ते न पढोनिहि चरक सुश्रुत ।
अनुभवें औषधी जाणती बहुत । निववितो आर्त चिकित्सेनें ॥२८०॥
अमृत अवचट मुखीं पडलें । तरी काय म्हणावे मरण न चुकले ।
तैसे अवचट हरिनाम वदनीं आले । तरी होय दहन महादोषा ॥२८१॥

वस्तुशक्तीच्या ठायीं । श्रद्धादिकांची अपेक्षा नाहीं ।
नाम वस्तुतंत्र लवलाहीं । वचनसिद्ध ॥२८२॥
जैसे वस्तुतंत्र ज्ञान । तया अभिव्यंजक महावाक्यादि वचन ।
तैसे वस्तुरूपचि नामस्मरण । परि तेथ वेदपुराणवचन अभिव्यंजक ॥२८३॥
वचनें ज्ञानाची आवृत्ति । जैसें सूत्रभाष्यकार बोधिती ।
परी कर्मरूप क्रिया न म्हणिजती । कर्तृतंत्र नव्हे म्हणुनी ॥२८४॥
तैसे नामाचेंहि स्मरण । आवृत्ति सांगे पुराणवचन ।
तथापि कर्मरूप नामाकारण । वस्तुतंत्र म्हणून म्हणवेना ॥२८५॥
श्रद्धेविण न फळे कर्म । श्रद्धेविण फळे नाम ।
येचविषयीं सप्रेम । वचने ऐक ॥२८६॥
अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ नच तत्प्रेत्य नो इह ॥२८॥ (गीता अ. १७)

अर्थ श्रीधरी टीकेनुसार :- श्रद्धारहित सर्वच कर्माची निंदा करितात. अश्रद्धेनें हवन केलें किंवा आणखी यज्ञादि कर्म केलें असतांहि सर्व निष्फल होते. त्याचें येथें किंवा परलोकीं कांहींच फल होत नाहीं.

याप्रमाणें अश्रद्धेनें केलेल्या धर्माविषयींची निष्फलता सांगितली आहे; परंतु नामाविषयीं श्रद्धेची अपेक्षा नाहीं असें नारदपुराणांत प्रत्यक्ष वचन आहे.

अश्रद्धयापि यन्नाम्नि कीर्तितेऽथ स्मृतेऽपि वा ॥५१॥ (उत्तरार्ध)
विमुक्तः पातकैर्मर्त्यो लभते पदमव्ययम् ॥
संसारघोरकान्तारदावाग्नि मधुसूदनः ॥५२॥
स्मरतां सर्व पापानि नाशयत्याशु सत्तमः ॥५३॥ (पूर्वार्ध) (नारदपुराण अ.१)

भावार्थः- जो संसारवनाचा दाह करणारा अग्नि असा जो मधुसूदन, (य११पू.७२) ज्याचें नांव श्रद्धा नसतांहि, वाचेनें घेतलें असतां, अथवा मनांत आले असतां, सर्व पापापासून पुरुष मुक्त होतो, तो सर्वांत श्रेष्ठ आहे.

उदाहरण घेतलेल्या गीताश्लोकांत धर्म श्रद्धाधीन आहे, म्हणूनच तो कर्तृतंत्र आहे; आणि नाम हें श्रद्धेच्या आधीन नाहीं, म्हणून तें वस्तुतंत्र आहे.

वादी उवाचः- पण दान हें क्रियारूप असूनहि अश्रद्धेनें द्यावें म्हणून श्रुति सांगत आहे, असें तुम्ही उदाहरण घेतलेल्या गीतेंतील श्लोकाच्या टीकेंत शंकरानंद

म्हणतात; त्याप्रमाणेंच नामस्मरणाविषयीं नारदपुराणवचन आहे असें मी म्हणतो.

सिद्धान्ती उवाच :- तुला म्हणावयाला काय होते; परंतु ''अश्रद्धयाऽदेयं'' या श्रुतीचा अर्थ ''अदेयं न दातव्यम्'' असा तैत्तिरीयभाष्यांत श्रीमच्छंकराचार्य भगवत् पूज्यपाद करितात.

**किं च यत्किंचिद्देयं तत्छ्रद्धयैव दातव्यम् ।**
**अश्रद्धया अदेयं, न दातव्यम् ॥** (तैत्तिरीयोपनिषत् शिक्षाध्याय अनुवाक् ११)

शंकराचार्यांपुढें शंकरानंदाची महति नाहीं; किंवा शंकरानंदाचा तरी स्वकृत केलेल्या अर्थावर निश्चय कोठें आहे? कारण गीतेंत केलेल्या अर्थाचा ते स्वतःच तैत्तिरीयोपनिषद्दीपिकेंत बाध करितात. ते त्यांचे वचन येणेंप्रमाणें आहे.

**''अश्रद्धया तु किंचिदपि अदेयम्''**

आतां नामाविषयीं पुनः भागवतांतच-

**''सांकेत्यं पारिहास्यं वा स्तोभं हेलनमेव वा ।**
**वैकुंठनामग्रहणमशेषाघहरं विदुः'' ॥१४॥ भाग.स्कं.६अ.२**

**श्रीधरी :- नन्वयं पुत्रनामाग्रहीत् नतु भगवन्नाम तत्राहुः ।**
**सांकेत्यं पुत्रादौ संकेतितं, पारिहास्यं परिहासेन कृतं, स्तोभं गीतालापपूरणार्थ कृतं, हेलनं 'किं विष्णुना' इति सावज्ञम्, अपि च वैकुंठ नामोच्चारणम् ॥**

भावार्थः- बरें तेंहि असो; परंतु ह्यानें भगवंताचें नांव न घेतां पुत्राचें नांव घेतले अशी शंका घ्याल तर, हे यमदूत हो! पुत्रादिकांचें ठिकाणीं संकेतानें ठेवलेंलें, थट्टेनें अथवा गायनसंबंधी आलाप परिपूर्ण करण्याकरितां घेतलेलें, (य११पू.७३) किंवा विष्णूचा काय उपयोग आहे? अशा अवज्ञेनेंहि केलेलें विष्णुनामोच्चारण सर्व पातकांचा नाश करणारे आहे, असें वेदवेत्ते समजतात.

पुत्रादि संकेत केलेल्याहि नामाचें फळ मूळांत सांगितले आहे; म्हणून शालिग्रामादिकांचे ठिकाणीं जसें विष्ण्वादिकांचे अनुसंधान विहित आहे, तसें भगवन्नामाचें अनुसंधान विहित नाहीं; म्हणून विद्यारण्यानें विवरणप्रमेयसंग्रहांत ध्यानावर आणलेला मनोराज्यत्व दोष नामस्मरणावर येत नाहीं. तेवढ्यानेंच नाम वस्तुतंत्र आहे असें सिद्ध होते.

उदाहरण घेतलेल्या १९ व्या श्लोकाच्या टीकेंत स्वामीनीं विष्णुधर्मातील वचन प्रमाण घेतले आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं, दुष्टचित्त पुरुषांनीं देखील



स्मरण केले असतां हरि हा पापांचा संहार करितो. ज्याप्रमाणें इच्छा नसतांहि स्पर्श झाला असतांना अग्नि जाळतोच.

अग्नि हा रूपतन्मात्र [११८]आहे, म्हणून तो जसा वस्तु आहे, तसें नामहि शब्दतन्मात्ररूप असल्यामुळें वस्तु आहे. शब्दाला पूर्वमीमांसक द्रव्य मानत असून सांख्य कार्यद्रव्य मानतात, आणि वैशेषिक गुण मानतात.

वादी उवाचः- आणि वेदान्तीहि पण गुणच मानतात; म्हणून नामरूप शब्दहि आकाशाचा गुण असल्यामुळें ईश्वराशीं वास्तविक संबंध तो ठेवीत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- मला वाटलेंच होते कीं तूं अशी कांहीं खुळी कल्पना काढशील. अरे! वेदान्ती आकाशाचा गुण जो शब्द मानतात त्याचा आशय प्रतिध्वनिरूप किंवा ध्वनिरूप शब्द समजावा, वर्णरूप शब्द समजू नये; कारण वर्णाचा व ध्वनीचा शांकरभाष्यदेवताधिकरणांत स्पष्ट भेद सांगितला आहे. विद्यारण्यस्वामीहि आपल्या पंचदशीच्या भूतविवेक नामक दुसऱ्या प्रकरणांत ''प्रतिध्वनिर्वियच्छब्दः'' प्रतिध्वनिरूप शब्दच आकाशाचा गुण आहे असें म्हणतात. म्हणून वर्णरूप शब्द अन्य आहे असें म्हणावे लागते. यंत्रादि वाद्यांत उत्पन्न होणारा वर्णरूप शब्दहि वर्णाची अनित्यता बोधन करीत नाहीं, तर प्रतिध्वन्याश्रितता बोधन करितो; म्हणून वाद्याची शंका व्यर्थ घेता येणार नाहीं. (य११पू.७४)आतां,

**''अक्षराणामकारस्त्वं स्फोटस्त्वं वर्णसंश्रये''**

अक्षरामध्यें तूं अकार असून वर्णाचें आश्रयामध्यें तूं स्फोट आहेस. (स्फोट म्हणजे वर्णरहित व अर्थाला स्पष्ट करणारा बुद्धींतील अव्यक्तशब्द. याचा विशेष विचार अन्यत्र सांगू.) हें वाक्य हरिवंशांतील असल्यामुळें स्फोटरूप शब्दहि आकाशाचा गुण होऊं शकत नाहीं, असा त्याचा अभिप्राय घेऊन बौद्धिक नामस्मरण किंवा वाचिक भगवन्नाम आकाशाचा गुण नाहीं. अथवा इतर वर्ण आकाशाचे गुण झाले तरी मनुष्याप्रमाणें दिसणारे भगवच्छरीर जसें भूतमय होत नाहीं, तसें भगवन्नामहि आकाशाचा गुण होत नाहीं. असेंच आनंदचंद्रिकेंत विश्वनाथ चक्रवर्ती म्हणतात.

**''भगवन्नामानि तु अखंडशब्दब्रह्मरूपाणि ।**
**यथा भगवत्स्वरूपे शरीरे लौकिकत्वभानं ग्राहकदोषात्तथा नामस्वपि ।**
**लौकिक शब्दत्वेन भानं तद्दोषादेवेत्यादि ।**

**तेन सर्वेषां स्वरूपवन्नाम्नामपि नित्यता मन्तव्या ।**

**ननु गुणकर्मणीति वचनात् गुणकर्मकरणानन्तरभाविनां नाम्नां कथं ब्रह्मत्वम् ? तस्य तु त्रैकालिकाबाधविषयत्वादितिचेन्न ।**

**स्वरूपकर्मणामपि प्रादुर्भावेन तदनुरूपनाम्नामपि प्रादुर्भाव एव । परं न तूत्पत्तिः । अन्यथा गोविंदाभिषेकात् पूर्वमेव पूतनासु पयःपानानंतरं बीजन्यासं कुर्वन्त्यो व्रजवरवध्वः 'क्रीडन्तं पातु गोविंद' इति गुणगाने च 'गोविंदवेणुमनुमत्तमयूरनृत्यम्' इति कथं वदेयुः ।**

**तेन यत्कर्मविशिष्ठस्य यस्य रूपस्य यन्नाम तत्कर्मविशिष्ठतद्रूपं नित्यमेव'' (उज्वलनीलमणी श्लोक १८)**

नामहि अनध्यस्तविवर्त

भावार्थ :- भगवंताचीं नांवें अखंडब्रह्मरूपच आहेत. भगवंताच्या रूपाच्या ठिकाणीं लौकिक मनुष्यबुद्धि, ज्याप्रमाणें पाहणाऱ्याचा दोष आहे, त्याप्रमाणें भगवन्नामाच्या ठिकाणींहि लौकिकशब्दत्वदृष्टि पाहणाऱ्याच्या दोषामुळें होते. म्हणून भगवंताचें रूप जसें नित्य म्हणजे अनध्यस्तविवर्त आहे, तसें नामहि अनध्यस्तविवर्त व नित्य आहे.

पूर्वपक्षी उवाचः- गुणकर्मावरून पडलेलीं नांवे नित्य कशीं होतील?

उत्तरपक्षी उवाचः- अरे स्वरूपप्रादुर्भावाबरोबरच नित्य भगवन्नामाचाहि प्रादुर्भाव होतो. याविषयीं आगमहि आहे. (य११पू.७५) गायी चारून गोवर्द्धनोद्धारणकाली इंद्रानें केलेल्या अभिषेकावरून पडलेले गोविंद नाम पूर्वीच गोपिकांनी बालरक्षासमयीं उच्चारले आहे. ''क्रीडन्तं पातु गोविंदः'' तें उच्चारता आले नसते.

वादी उवाचः- पूर्वकल्पीचें किंवा यौगिक गोविंद नाम स्मरून तसें उच्चारता येणें शक्य आहे.

सिद्धान्ती उवाचः- पूर्वकल्पीचें असले तरी उत्तरकल्पीं तशा लीला घडून आल्यावरच प्रगट होत असतात. आतां रामापूर्वी रामायण या न्यायानें भगवन्नाम पूर्वीच प्रगट मानले तर सत्कार्यवादान्वयें[११९] तें नित्यच सिद्ध होते.

यौगिक[१२०] म्हटले तरी त्याची रुढी कोठे तरी कल्पिलीच पाहिजे. रुढि कल्पिली तर पूर्वोक्तच समाधान आहे, आणि योगार्थाचेच ठिकाणीं रुढि मानली तरी नित्यता सिद्ध होत आहे.

शांकरभाष्यांतहि देवताधिकरणांत -

**''वर्णा एव शब्दा इति भगवान् उपवर्शः ।'' (ब्रह्मसूत्र अ.१.पा.३ सू.२८)**

असें सांगून ध्वनि त्याचा उपाधि आहे, उपाधि उपहिताचा भेद असतो म्हणून वर्ण नित्य आहेत असें म्हटले आहे. याचमुळें ध्वनिरहित परावाणीनें जपलेल्या नामाचें फल होते. यद्यपि अनित्य व्यक्ति नित्य वर्णाचा विषय होऊं शकत नाहीं; म्हणून जातीच वर्णशब्दवाच्य[१२१] आहे असा सिद्धान्त आहे.

तथापि सर्व शब्दांची अंतर्यामीचे ठिकाणीं शक्ति[१२२] आहे, या वादनक्षत्रमालाकारांच्या म्हणण्यावरून जाति ही उपाधिच आहे. तिच्या आश्रयबोधाला[१२३] आक्षेपाचा[१२४] सहकार[१२५] लागतो. म्हणून निरपेक्ष[१२६] शब्दबोध्य[१२७] परमात्माच आहे,

तथापि घटादिशब्दाविषयीं अनादिव्यवहारजन्यभ्रम झाला आहे, तसा हरि-नारायणादि नामाविषयीं झाला नाहीं; म्हणून तीं नांवें साक्षाद्भगवद्रूप असून भगवत्प्रादुर्भावक[१२८] आहेत.

यद्यपि वाच्यवाचकाचा अत्यंत संबंध नाही, तथापि हा सिद्धान्त इतर पदार्थाविषयीं आहे; कारण इतर पदार्थांचे ठायीं शब्दशक्ति आक्षेपादि-सहकारसंयोगेंकरून[१२९] राहते, आणि भगवंताच्या ठिकाणीं ती स्वतः राहते, म्हणून तेथें वाच्यवाचकाचा अभेद मानल्यास दोष नाहीं. दुर्जनतोषन्यायें अभेदचिंतनदृष्टि[१३०] घेतली तरी, भावनाफल समानच आहे. (य११पू.७६)

आतां उज्वलनीलमणीची टीका जी आनंदचंद्रिका तिचेंच पुनः विवरण करितो. ज्या कर्मानें विशिष्ट, ज्या रूपाचें नाम असेल, तें त्या रूपकर्मासह नित्यच आहे. याप्रमाणें आनंदचंद्रिकाकाराचें म्हणणें सांगितलें. - परमतीय असलें तरी अत्यंत स्वानुकूल असल्यामुळें सांगितलें

शिष्य उवाचः- भगवन्, घटादि नामाविषयीं जसा व्यवहारजन्यभ्रम आहे, तसा रामकृष्णादि नामाविषयींहि भ्रम आहे; कारण स्वपुत्राचे रामकृष्णादि नाम ठेवल्यावर आईबापाच्या मनांत त्याला हांक मारतांना नंदपुत्राची भावना उत्पन्न न होतां एकदम स्वपुत्राचीच भावना उत्पन्न होते.

अवस्तुस्थानीं एकदम भावना उत्पन्न होणें याचेंच नांव भ्रम आहे.

श्रीगुरु उवाच :- यथार्थ विचारलेस. रामकृष्णांचे[१३१] ठिकाणीं स्वपुत्रादिकांचा[१३२] भ्रम अनादिव्यवहारजन्य[१३३] नाहीं, तर मातृपितृकल्पित आहे; आणि घटादिकांचे ठिकाणीं अनादिव्यवहारजन्य असून आगमनिष्पाद्य[१३४] आहे.

ईश्वरेच्छाशक्तिवादियांच्या[१३५] मतानें तर भगवन्निष्पाद्य आहे, परंतु तो आहे भ्रमच; म्हणून शिलपिल्लोपासनेप्रमाणें प्रसंगीं भावनासिद्धीला[१३६] कारण आहे. रामकृष्णादि नामांचें ठिकाणीं स्वपुत्रादिशक्तिभ्रम तसा आगमनिष्पाद्य किंवा ईश्वरनिष्पाद्य नाहीं, प्रत्युत[१३७] आगमविरोधी आहे. म्हणूनच स्वपुत्र उद्देशून नारायणाचें नांव घेतल्यानें अजामिळाचा उद्धार झाला. दुर्जनतोषन्यायानें याला संवादिभ्रम[१३८] म्हटले तरी, भावनेवांचून त्याची सिद्धि होत असल्यामुळें, नामाचें वास्तविकत्व निश्चितच आहे.

यद्यपि ''द्वादशेऽहनि पिता नामकर्म कुर्यात्'' या श्रुतिवरून रामकृष्णादि-नामाविषयीं स्वपुत्रादिशक्तिभ्रम आगमनिष्पाद्य सिद्ध होऊं पहात आहे, तथापि धौम्य कैय्यट मम्मट इत्यादि नामाविषयीं ही श्रुति लागूं शकते; कारण ही श्रुति सामान्य आहे. म्हणून घटादिकाप्रमाणें रामकृष्णादिनामाविषयीं स्वपुत्रादिशक्तिभ्रम[१३९] विशेष आगमनिष्पाद्य म्हणता येत नाहीं; आणि गोपालतापनीयाद्युपनिषदांत रामकृष्णादि-नामांच्या रूढी आदि शक्ति भगवंताचे ठिकाणीं आहेत, अशी विशेष वचनें आहेत.

''सामान्यशास्त्रापेक्षां विशेष शास्त्र बलवान् असते'' हा व्याकरण व मीमांसा यांचा वेदान्ताशीं विरोधी नाहीं असा सिद्धान्त आहे; म्हणून भगवन्नाम प्रमाणत्वेंकरून साक्षात् भगवच्छाब्दीप्रमाजनक[१४०] आणि भगवद्रूप आहे असें निश्चित समज. (य११पू.७७)

पुनः ''अक्षराणामकारोऽस्मि'' हे भगवंताचें स्पष्ट वचन आहे. यावरून वर्णरूप नामहि भगवत्स्वरूप असल्यामुळें वस्तुरूप आहे. तात्पर्य, *व्रतामध्यें जसा काल मुख्य आहे, म्हणजे ज्याकालीं जे व्रत सांगितले आहे त्याचकालीं तें व्रत केलें असतां त्या व्रताचें फल होते, त्याचप्रमाणें

*तीर्थामध्यें देश मुख्य आहे. काशीआदि स्थानींच त्याचें विशेष फल आहे.

*यज्ञामध्यें सर्वच मुख्य आहे, कारण एकांग देखील विकल झाले असतां अदृष्ट





उत्पन्न होत नाहीं.

तसें हरिस्मरण नव्हे. त्यांत नामच मुख्य असल्यामुळें स्मरण-ध्यानाचा नामोच्चारणांतच अंतर्भाव विष्णुसहस्रनामभाष्यांत आचार्यांनीं सांगितला आहे. नामाला देशकालादिकांची अपेक्षा नाहीं, अशीं आणखीहि वचनें आहे.

**न देशकालनियमः शौचाऽशौचविनिर्णयः।**
**परं संकीर्तनादेव रामरामेति मुच्यते ॥ (वैश्वानरसंहिता)**

अर्थः- देश-कालशुद्धि किंवा अशुद्धि हें पाहण्याची आवश्यकता नाहीं. केवळ राम राम म्हटल्यानेंच पुरुष मुक्त होतो.

**न देशनियमो राजन्नकालनियमस्तथा ।**
**विद्यते नात्र संदेहो विष्णोर्नामानुकीर्तने ॥**
**कालोऽस्ति यज्ञदाने वा स्नाने कालोऽस्ति सज्जपे ॥**
**विष्णुसंकीर्तने कालो नास्त्यत्र पृथिवीपते ॥**
**गच्छंस्तिष्ठन्स्वपन्वापि पिबन्भुंजञपंस्तथा ॥**
**कृष्ण कृष्णेति संकीर्त्य मुच्यते पापकंचुकात ॥**

असें नारदांचें म्हणणें आहे, आणि त्याचा अभिप्राय असा आहे कीं, स्नान, दान, यज्ञ व जप या विषयीं जसा देशकालाचा नियम आहे तसा भगवन्नामाविषयीं नाहीं. उठतां बसतां कसेंही नाम घेतलें तरी तें मुक्त करिते.

वादी उवाचः- इतर जपाविषयीं जर देशकालादिकांचा नियम आहे तर तो भगवन्नामाविषयींहि असलाच पाहिजे; कारण नामहि मंत्र असल्यामुळें, मंत्राचे सर्व नियम त्याला लागूं होतात.

सिद्धान्ती उवाचः- वादिन्! नाम हें मंत्रापेक्षा वरिष्ठ आहे. (य११पू.७८) त्याला जीं कारणें आहेत तीं ऐक - मंत्राचा महिमा मंत्र सांगत नसतात, तसें कोठें मंत्रशास्त्रांत दृष्टीस पडतहि नाहीं. उदाहरण घेतलेल्या ऋग्वेदांतील सूक्तांत नामाचें माहात्म्य सांगितले आहे, आणि सूक्त[१४१] मंत्रमय आहे; कारण विपरीत क्रमानें म्हटले असतां त्यापासून अनर्थप्राप्ति होते. स्वरवर्णविपर्यय वेदामध्यें करूं नये हें प्रातिशाख्यादि[१४२] सर्व ग्रंथकार कंठमुक्त करून म्हणतात; परंतु भगवन्नामाची गोष्ट तशी नाहीं. त्यांत वर्णविपर्यय देखील फलदायक होतो. याविषयीं अध्यात्मरामायणांत वाल्मीकी रामाला म्हणतातः- मी अतिपापी असतांना

मला ऋषि भेटून त्यांनी तुझ्या नामाचा मजवर असा अनुग्रह केला,

**इत्युक्त्वा राम ते नाम व्यत्यस्ताक्षरपूर्वकम् ।**
**एकाग्रमनसात्रैव मरेति जप सर्वदा ॥८०॥**
**टीका :- व्यत्यस्तानि विपरीतपौर्वापर्याण्यक्षराणि यस्मिन् तादृशरूपं यस्य तत् ते नाम जपेत्यन्वयः ।**
**तदाकारो मरेति एकाग्रमनसेति जप इति कर्तव्योपदेशः ।**
**अत्र मनस एकाग्रता वर्णविषयैत्र ॥** (अध्या.रामायण अयोध्याकांड सर्ग ६)

भावार्थः- याप्रमाणें ते मुनि आपसांत बोलून, हे रामा! तुझें उलटे नांव त्यांनी मला सांगितलें. तें नांव म्हणजे मरा मरा असें होय. याचा एकाग्रमनानें जप कर असें ते म्हणाले.

नामांतील एकाग्रता म्हणजे वर्णावांचून इतर ठिकाणीं चित्त न जाऊं देणें.

परंतु ही एकाग्रता उलट्या व कल्पित नामासच विहित आहे, पुराण प्रसिद्ध नामास विहित नाहीं; कारण ''अवशेनापि यन्नाम्रि कीर्तिते''[१४३] इत्यादि वचनें जागृत आहेत म्हणून. एवं सर्व भगवन्नामाचा समान महिमा आहे. तथापि श्रीकृष्णनामाचा विशेष महिमा पुराणादिकांत सांगितला आहे.

**नाम्नां सहस्रं दिव्यानां स्मरणे यत्फलं लभेत् ।**
**तत्फलं लभते नूनं रामोच्चारणमात्रतः ॥**
**नाम्नां सहस्रं दिव्यानां त्रिरावृत्त्या तु यत्फलम् ।**
**एकावृत्त्या तु कृष्णस्य तत्फलं लभते नरः ॥ ब्रह्मवैवर्तपुराण (य११पू.७९)**

भावार्थः- एकसहस्त्र नामावर्तनाचें फळ एका रामनामानें होते व तीनसहस्त्र नामावर्तनाचें फल एका कृष्णनामानें होते.

याप्रमाणें कृष्णनामाचें विशेषत्व सांगितले आहे. रामनामाचें कृष्णनामाहून विशेषत्व एकाद्या उपपुराणांत असले तरी, महापुराणानुसारच उपपुराणाला प्रामाण्य आहे, हें कोणी विसरूं नये. स्कंदपुराणांतहि कृष्णनामाचें विशेषत्व सांगितले आहे.

**नान्याभिर्नामकोटिभिस्तोषो मम भवेत्क्वचित् ।**
**श्रीकृष्णेति कृतोच्चारे प्रीतिरेवाधिकाऽधिका ॥**

भावार्थः- इतर कोटीनामानेंहि माझा संतोष होत नाहीं, परंतु श्रीकृष्ण-नामोच्चारणानें मात्र अत्यंत प्रीति वाटते.

वादी उवाच :- 'श्री' हे बीज शूद्रांनीं म्हणूं नये, असे नृसिंहतापानीयोपनिषदेंत व तद्भाष्यांत सांगितले आहे, तेव्हां श्रीकृष्णनाम हें सर्वसाधारण कसें होईल?

सिद्धान्ती उवाचः- अनुस्वारसहित तें बीज म्हणूं नये असा त्या श्रुतिभाष्यांचा अर्थ आहे; आणि त्या बीजाचें स्वरूपहि सानुस्वार आहे, हें श्रीदक्षिणामूर्तिमुनिकृत बीजकोशावरून दिसून येते; आणि तुकाराममहाराजानींहि ''श्रीपंढरीशा पतीतपावना । एक विज्ञापना पायापाशीं'' या अभंगांत श्रीचा उच्चार केला आहे.

वादी उवाचः- ''ॐ तत्सदिति सूत्राचें हें सार'' या अभंगांत तुकाराम महाराजांनीं प्रणवाचाही उच्चार केला आहे, म्हणून त्याचा शूद्रांना अधिकार आहे काय?

सिद्धान्ती उवाचः- बहुवचनविरोधास्तव त्याचा अधिकार शूद्रांना नसो, परंतु अभंगाच्या आरंभीं असलेल्या त्या विषयींचा शूद्राधिकार कोण निवारण करूं शकतो? अनुस्वाररहित श्री अक्षराचा उच्चार साधकाविषयींहि उपदेशिला दृष्ट आहे. ''श्रीकृष्णः शरणं मम'' हा मंत्र वल्लभमती सर्व वर्ण जपतात, आणि ''श्रीरामजयराम जयजयराम'' हाही मंत्र रामदासी संप्रदायांत जपतात. अथवा श्री वर्ज्यकरून कृष्ण नामहि समानच फल देणारें आहे. याप्रमाणें शिवनामाचीहि शक्ति आहे, हें आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे. त्याविषयीं विशेष विचार अपय्यादीक्षित कृत शिवार्कमणिदीपिका नामक टीकेंत पहावा; आणि आम्हीहि पुढें हरिहरमंत्र-निर्णयांत सांगूं. (य११पू.८०)

वादी उवाचः- मला हा सर्व नाममहिमा अर्थवादरूप[१४४] वाटतो. कारण सर्व पाप जर भगवन्नामानींच दूर होत आहे तर, *केशवादि २४ नांवे प्रथम घेतल्यावर नंतर संध्या करण्याचें प्रयोजन काय? *पुनः नाम घेणारांची पापप्रवृत्ति दिसते, आणि *नामस्मरण एवढें सुलभ असलें तर धर्माचा लोप व्हावयाला लागेल. कल्पकल्प देखील कोणी धर्म करणार नाहीं.

**अपहाय निजं कर्म कृष्णकृष्णेति वादिनः ।**
**ते हरेर्द्वेषिनः पापाः धर्मार्थं जन्म यद्धरेः ॥**

अर्थ :- आपलें कर्म सोडून देऊन जे कृष्ण कृष्ण नुस्तें म्हणतात ते पापी लोक हरीचे द्वेष्टे होत, कारण धर्माकरितांच हरीचा अवतार होतो. असें

शूद्रकमलाकरांत विष्णुपुराणांतून वचन घेतलें आहे.

सिद्धान्ती उवाचः- आतां तुझ्या प्रश्नाचीं उत्तरें यथाशक्ति देतो. शूद्रकमलाकरांत घेतलेलें वचन विष्णुपुराणांत आढळलें नाहीं, किंवा एकाद्या प्रतींत असलें तरी त्याचा अर्थ असा होतो - विहितकर्मत्याग हा दश अपराधांपैकीं नामाचा एक अपराध आहे. म्हणून तें सापराधनाम भगवंतास प्रिय नाहीं, तथापि आपल्या द्वेष्ट्यालाही परमेश्वर शुभ फल देत असतो हें पुराणज्ञांनीं विसरूं नये. नाम-माहात्म्याचीं सर्व वचनें आम्हीं पुढें एकत्र करूं. आतां एकादा कल्पभर धर्म उत्पन्न न होईल तर त्यांत तुझें काय जातें? कारण पापानें देखील कांहीं काहीं कल्पांत मनुष्यें तरून गेलीं असें योगवासिष्ठात वचन आहेः-

**इतः शुभेन नश्यन्ति यान्ति पापैस्तथा दिवम् ।**(निर्वाण प्र. उत्तरार्ध सर्ग ६० श्लो.३८)

कांही कल्पामध्यें कलींत कृतयुगाचें आचार व शूद्रादिकांची विद्याहि योगवासिष्ठकार सांगतात.

**कलौ कृतयुगाचारान्कृते कलियुगस्थितिम् ॥४९॥ उत्तरार्ध**
**त्रेतायां द्वापरे चैव संसरामि मुनीश्वर ॥५०॥ पूर्वार्ध** (निर्वाण प्र.पू.सर्ग २२)
(य११पू.८१)

तेव्हां हा मायाजालसंसार सुलभ अशा नामस्मरणानें जीव जर तरून जातील तर त्यांत तुझें काय जातें? आतां नाम घेतल्यावर पापप्रवृत्ति कशी राहते या विषयीं बालप्रबोधिनीकारांचें वचन घेऊन सांगतों.

**''नच प्रायश्चित्तानंतरं पापे प्रवृत्तिवन्नामोच्चारणानंतरमपि पापप्रवृत्तिर्दृश्यते तत्कथं संगच्छते नामसंकीर्तनेन समूलदोषनिवृत्त्यंगिकाराद् इति शंकनीयम् । नामसंकीर्तनादितः समूलदोषनिवृत्तावपि भोजनादिप्रवृत्तिवत्प्रबल-संस्कारवशात् पापप्रवृत्तिसंभवात् ।**
**नच तर्हि पापफलमपि स्यादेवेति शंक्यमुदाहृतानेकवचनविरोधात् ॥''**

भावार्थ :- भोजनादिकाप्रमाणें पापप्रवृत्ति होते, तरी पुष्कळ वचनांचा विरोध असल्यामुळें पापफल होते असें म्हणतां येत नाहीं.

अक्षरार्थ स्पष्ट आहे आणि कंटाळा आल्यामुळें लिहित नाहीं. ज्ञानानें सर्वपापदाह होत असूनहि, ज्याप्रमाणें संस्कारानें चांगली वाईट प्रवृत्ति संभवते त्याप्रमाणें नामधारकालाही संभवत असली तर त्यांत तुझी हानि काय आहे? कारण नामहि ज्ञानाप्रमाणें वस्तुतंत्र आहेच. केशव नारायण प्रथम करून संध्या करावी हा नामधारकाकरितां विधिच नाहीं; तर नामापेक्षां संध्येवर ज्यांची अधिक श्रद्धा आहे तेंच तसें करितात.

कदाचित् तूं असे म्हणशील कीं, अशानें सर्व वेद नाहींसा होईल, तर याचा प्रश्न आम्हाला कशाला करतोस? कल्पाच्या पूर्वी कृतयुगीं प्रणवरूपच वेद होता, ऋगादिरूप नव्हता असें भागवतांत स्पष्ट सांगितले आहे. तसा आतांहि हरिनामरूपी वेद राहिला तर त्यांत तुझी कोणती हानि आहे ?

वादी उवाच :-

**नाम स्मरता म्हणुनी आचराल दोष ।**
**तरी श्रवणमननभक्ति पडली ओस ॥ (अभंग एकनाथ)**
**इंद्रियासी नेम[१४५] नाहीं । मुखी राम म्हणुनी कायी ॥१॥**
**जेवि मासीसवे[१४६] अन्न । सुख नेदी तें भोजन ॥२॥**
**कीर्तन करावे । तैसे करोनी दावावे ॥३॥** (य११पू.८२)
**हें तों नाहीं आंगीं चिन्हे । गायिले वेश्येच्या ढब्यानें[१४७] ॥४॥**
**तुका म्हणे रागा । संत शिवूं नेदिती अंगा ॥५॥ तुकाराम २५१६**

या नाथ व तुकाराम वाक्यांची नामाला अर्थवाद[१४८] मानल्यावांचून दुसरी गति कोणती?

सिद्धान्ती उवाच :- पण याच्या विरोधी नाथ व तुकारामांची वाक्यें आहेत त्यांची गति काय? ती वाक्यें येणेंप्रमाणें -

**रकारासी कान्हा मकार पुढती । स्मरतां होय मुक्ति सर्व जनां ॥१॥**
**नारी अथवा नर हो कां दुराचारी । वाचे म्हणता हरी सवे[१४९] मुक्त ॥२॥**
**सायास तो नाहीं अनायासें काम । वाचे रामनाम सदा गावे ॥३॥**
**एका जनार्दनीं धरा हेतू मनीं । श्रीराम वदनीं उच्चारावा ॥४॥गाथा ७३५**
**०**
**चाल[१५०] केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळा ॥१॥**
**तुज पापचि नाहीं ऐसे । नाम घेतां जवळी वसे ॥२॥**
**पंच पातकांच्या कोडी[१५१] । नामें जळतां न लगे घडी ॥३॥**
**केली मागे नको पाहो । तुजसमान आम्ही आहो ॥४॥**

**करी तुज जी करवती । आणिक नामें घेऊं कीति ॥५॥**
**तुका म्हणे काळा । रीग[१५२] नाहीं निघती ज्वाळा ॥६॥**

सापराधनामापेक्षां निरपराध नाम वरिष्ठ आहे, एवढाच या वाक्यांचा अर्थ आहे.

वादी उवाच :- अहो ! सोप्या साधनानें मोठें फल देणें हें काय परमेश्वरानीं न्याय्य केलें?

सिद्धान्ती उवाच :- अरे हा सर्व अशोकवनिकान्याय आहे. अशोकवनिकान्यायांत शंका काढूं लागल्यास कोणत्याही कक्षेंत[१५३] दोष समान असतो. अशोकवनिकान्याय म्हणजे रावणानें सीतेला घेऊन गेल्यावर कोठे तरी तिला ठेवावयाचे होते ते त्यानीं अशोकवनिकेतच ठेवलें. (य११पू.८३) आतां तेथेंच कां ठेवलें अशी शंका केली तर, जेथें जेथें तो ठेवील तेथें तेथें ही शंका सारखीच राहील. त्याप्रमाणें सुलभ नामस्मरणानें मोठें फल कां होते, अशी कोणी शंका करीत असेल तर, दयाळू परमेश्वरानें अतिसायाससाध्य असे यज्ञादिक कां निर्माण करावे अशी आम्हीहि शंका करितो. आतां नामाला अर्थवाद म्हणणाराला दोषहि सांगितला आहे.

**अर्थवादं हरेर्नाम्नि संभावयति यो नरः ।**
**स पापिष्ठो मनुष्याणां नरके पतति स्फुटम् ॥ कात्यायन संहिता.**

अर्थः- जो नामाला अर्थवाद म्हणतो तो पापी नरकांत पडतो.

वादी उवाचः- अहो! सर्वपापनिवारण करणाऱ्या नामाला स्वतःच्या अर्थवादरूप अपराधापासून सोडवितां येत नाहीं हें मोठें आश्चर्यच आहे.

सिद्धान्ती उवाचः- सर्वअपराधक्षमायोग्यबालकालाही स्वमैथुनाचे ठिकाणीं प्रवृत्त झाला असतां माता जशी दंड करिते, किंवा सर्वानंदस्वरूप आत्माहि आपल्याकडे लक्ष न देणाराला जसा संसारांत टाकतो त्याप्रमाणें नामापराधियांचीहि गोष्ट आहे. भगवद्विमुखांना अपराधामुळेंच संसार आहे; म्हणून नाममाहात्म्याविषयींहि कोणत्याच प्रकारची अनुपपत्ति[१५४] नाहीं.

अर्थवादाचे ३ प्रकार

आतां दुर्जनतोषन्यायानें अर्थवाद जरी घेऊन चाललों तरी कांहीं विशेष विरोध येत नाहीं; कारण स्तुति, निंदा, व इतर कार्य जाणविणारीं विधिनिषेधवाक्यें



अर्थवाद होतात. तो अर्थवाद तीन प्रकारचा आहे. गुणवाद, अनुवाद, आणि भूतार्थवाद. पैकीं -

(१) दुसऱ्या प्रमाणांनी विरुद्ध असा अर्थ जो जाणवितो त्याला गुणवाद म्हणतात. जसें :- ''आदित्यो यूपः'' यज्ञस्तंभ सूर्य आहे. या वाक्यांत यज्ञस्तंभाची स्तुति केली आहे; परंतु सूर्य यज्ञस्तंभ प्रत्यक्षादि प्रमाणानें दृष्ट नाहीं, आणि यज्ञस्तंभ दृष्ट असल्यामुळें परोक्षबोधक[१५५] शब्दप्रमाणहि प्रवृत्त होत नाहीं, म्हणून याला गुणवाद म्हणतात.

(२) दुसऱ्या प्रमाणांनीं कळणाऱ्या अर्थाला जाणविणाऱ्या वाक्याला अनुवाद म्हणतात. (य११पू.८४) जसेंः- ''अग्निर्हिमस्य भेषजम्'' विस्तव हिंवाचें औषध आहे. हें प्रत्यक्षप्रमाणानें दृष्ट असूनहि वाक्यांत आहे, म्हणून त्याला अनुवाद म्हटलें आहे.

(३) प्रमाणांतरबाध[१५६] किंवा प्रमाणांतरप्राप्ति[१५७] या दोहोंनी रहित अर्थबोध करणाऱ्या वाक्याला भूतार्थवाद म्हणतात.

या तिन्हीं अर्थवादांना विधिस्तुतिपरत्व[१५८] आहे, आणि म्हणूनच तिन्ही अर्थवाद प्रमाण आहेत; तरी भूतार्थवादाचें स्वार्थी देखील प्रामाण्य आहे; म्हणून इंद्रादि विग्रह आहेत असें त्यावरून सिद्ध होतें. हें अर्थवादाचें प्रामाण्य देवताधिकरणानुरोधानें[१५९] श्रीधरस्वामीनेंहि मानलें आहे.

वादी उवाच :- अहो! तुम्ही जर नामाला सर्वथा अर्थवाद मानीत नाहीं, आणि नामापराधी मनुष्याला देखील नामच तारक आहे असें पद्मपुराणावरून सांगण्याचा मानस आहे; तर मग तुम्ही लोकांना उघड उघड पाप करण्याची आज्ञाच देतां म्हणावयाचें?

सिद्धान्ती उवाच :- होय. आम्ही नाम घेत राहणाऱ्याला पाप करण्याची सुखानें आज्ञा देतो व त्याचप्रमाणें दुसऱ्या एकाद्याला नाम घेत घेत त्या पाप करणाऱ्याला खेट्टानें[१६०] झोडण्याचीहि आज्ञा देतों; कारण जसा नाम घेऊन पाप करणारा नामानेंच तरतो, त्याप्रमाणें त्याला खेट्टानें झोडणाराही नामानेंच तरतो असें आमचें मत आहे. रामराम म्हणून पाप लागत नसेल तर, रामराम म्हणून त्याला खेट्टानें झोडण्यानेंहि पाप लागत नाहीं. नामानें जर केलेलें पाप जळून जातें तर, नामापराधियाला नाम घेत घेत खेट्टानें झोडणें हेंहि पाप नामानें

जळून जातेंच.

स्कंदपुराणांत अशी कथा आहे कीं, देवीनें महिषासुराला मारून शिवभक्ताचा व्यर्थ आपण वध केला म्हणून खेद वाटून तिनें अनुष्ठान केलें. त्याचप्रमाणें नेहमीं ज्याचें विष्णु सहाय्य करितो अशा विष्णुभक्त इंद्रानें विष्णुभक्त वृत्राचा वध केला अशी कथा भागवतांत आहे.

या दोन्ही कथेवरून नाम घेणारा नामापराधी व नाम घेत घेत त्यास झोडणारा नामापराधी या दोघांनाही नाम मोक्षाला नेईल यांत शंका नाही. व्यवहारांत जें ज्याला योग्य वाटेल तें त्यानें करावें. जसें स्वामीच्या घरचे दोन कुतरे आपसामध्यें कितीहि भांडले तरी स्वामी त्यांना खावयाला देतोच. हा मी नवीन कल्पिलेला ''श्वयुद्धस्वाम्यन्नन्याय''आहे. (य११पू.८५) हाच न्याय नाम घेत पाप करणारा व नाम घेत घेत त्यास झोडणारा या दोघांनाहि लागू करावा.

आतां प्रऱ्हाद दैत्याला इंद्रानें कां मारले नाहीं अशी शंका योग्य होणार नाहीं; कारण प्रऱ्हाद निरपराधी नामधारक होता. श्वयुद्धस्वाम्यन्नन्याय सापराध नामधारकांतच परस्पर प्रविष्ट(१६१) आहे. देवीमहिषासुरयुद्धांत मात्र प्रविष्ट नाहीं. कारण निरपराध नामधारकानें सापराध नामधारकांस झोडणें न्याय्य आहे; आणि हा मन्निर्मितन्याय एकवेळ लोकांना समजला म्हणजे लोक नामापराधहि करणार नाहींत. कारण अपराध रागानें(१६२) करीत असतात, मोक्षाकरितां कोणी करीत नाहींत. नामानें चैन करूं लागले म्हणजे आपल्याला नाम घेऊन झोडणारेहि आहेत, असें एकदां कळले म्हणजे नामापराध करण्याकडे लोक फारसे धजणार नाहींत. म्हणून आम्हीं नाम घेणाराला जरी पाप करण्याची सुखानें परवानगी दिली, तरी आमच्या नाममाहात्म्यांत कोणत्याच प्रकारची अडचण येत नाहीं.

ईश्वरावर विश्वास ठेवून जर कोणी पाप करीत असेल तर दुसऱ्यानें त्याला खुशाल झोडावे; मात्र त्यानेंहि ईश्वरावर विश्वास ठेवावा म्हणजे झाले. युद्धांत बापाला मारणारा मुलगा जर क्षत्रियधर्मानें स्वर्गाला जातो तर, नामापराधाबद्दल भांडणारे दोघे नामधारक काय म्हणून मोक्षाला जाणार नाहींत. ''भ्रातापि भ्रातरं हन्यात्'' अशा क्षत्रियधर्माला जर तूं अर्थवाद म्हणत नाहींस तर, नाममाहात्म्याला अर्थवाद म्हणण्याकरितां तरी तुझी जिव्हा कशी सरसावते.



आतां नामधारकानें पाप केलें तरी, जर कोणी नामधारक नामाचें माहात्म्य समजून त्याला झोडणार नाहीं तर, तो त्या महात्म्याचा मोठेपणा. आम्हीं मात्र सर्वांना समानच आज्ञा देतो. परंतु नामधारक नसेल आणि मोठा धार्मिकही असेल तर, त्याला नामधारकाला दंड करण्याचा अधिकार नाहीं. ज्याप्रमाणें राजाच्या घरच्या डसऱ्या कुत्र्यालाहि दंड करण्याचा दुसऱ्या कोणाला अधिकार नाहीं. याविषयीं देविदास आपल्या वेंकटेशस्तोत्रांत म्हणतातः-

**समर्थाचे घरचे श्वान । त्यासि सर्वहि देती मान ।**
**तैसा तुझा म्हणवितो दीन । हा अपमान कवणाचा ॥१७॥** (य११पू.८६)

धनासाठीं जयविजयानें परस्पर शाप देऊन दुर्योनि पावूनहि ते दोघे भक्तच राहिले. ही सापराध भक्ताविषयीं पुराणांत कथा प्रसिद्ध आहेच. सापराध भक्त त्या अपराधाचें फळ आपल्या कृतीनेंच पावतात. परमेश्वर त्यामध्यें कोणाचाच पक्षपात करीत नाहीं, हे जय-विजयाचें कथेवरून स्पष्ट होते.

जय–विजय कथा

कर्दम ऋषीचे पुत्र जयविजय विष्णुभक्त असून, एके ठिकाणीं त्यांना यज्ञांत दक्षिणा मिळाल्यामुळें मार्गानें चालत असतां, धनाबद्दल त्या दोघांचे भांडण होऊन ग्राह(१६३) आणि हत्ती हो असा परस्परानीं परस्परास शाप दिला. नंतर त्यांनीं भगवंताची प्रार्थना केली ती अशीः-

**जयविजयावूचतुः-**
**भक्तावावां कथं देव ग्राहमातंगयोनिगौ ।**
**भविष्यावः कृपासिंधो तच्छापो विनिवर्त्यताम् ॥१४॥**
**श्रीभगवानुवाचः-**
**मद्भक्तयोर्वचोऽसत्यं न कदाचित् भविष्यति ।**
**मयापि नान्यथाकर्तुं शक्यते तत्कदाचन ॥१५॥**
**तस्माद्युवामिमौ शापावनुभूय स्वयंकृतौ ॥**
**लभेथां मत्पदं नित्यमित्युक्त्वान्तर्दधे हरिः ॥१६॥** (पद्मपुराण उत्तरखंड अ.११२)

भावार्थ :- भगवन् आम्हीं तुझे भक्त म्हणवितो तर, आम्हाला तिर्यग्योनींत जाणें कसें शोभते? एवढ्या करितां आमच्या ह्या परस्पर दिलेल्या शापांची आपण निवृत्ति करा.

यावर भगवान् म्हणाले :- माझ्या भक्ताचें वाक्य असत्य होणें शक्य नाहीं, आणि माझ्याच्यानेंहि तें खोटें करवत नाही. एवढ्याकरितां तुम्हीं आपल्यांतच परस्पर दिलेले शाप अनुभवून नंतर माझ्या नित्य अशा पदाला प्राप्त व्हा; असें म्हणून भगवान् अंतर्धान पावले.

म्हणून नाम घेऊन पाप करणारा व नाम घेऊन त्या पाप करणाऱ्याला खेट्टानें[१६४] झोडणारा हे दोघेही मोक्षाला जातील असें जें आम्ही म्हटले तें न्याय्यच आहे.

आतां केवढाहि धार्मिक असला तरी सापराध नामधारकास त्याला दंड करण्याचा अधिकार नाहीं, (य११पू.८७) हें अंबरीष-दुर्वास-आख्यानावरून समजून घ्यावे. परंतु नाम घेत पाप करणाऱ्याला नांव घेत झोडणाऱ्यांनें नामावर अविश्वास मात्र न केला पाहिजे.

यद्यपि नाम वस्तुतंत्र आहे, त्याला श्रद्धेची अपेक्षा नाहीं असें नारदपुराणांत सांगितले आहे, तरी अग्नीच्या दाहकत्वावर विश्वास न ठेवून वेडे आपले हात जाळून घेत नाहींत असें नाहीं; त्याप्रमाणें वस्तूवरहि अकर्तृतंत्र[१६५] अविश्वास करणारे असतात. आतां तसेंहि नामग्रहण केलें तरी फळ होईल, परंतु अविश्वासी नामग्रहणच करणार नाहीं; म्हणून हा अनुवाद केला. कलीमध्यें भगवन्नाम-स्मरणानेंच सर्वपूर्ति[१६६] नृसिंहपुराणांत सांगितली आहे.

**घोरे कलियुगे प्राप्ते सर्वकर्मबहिष्कृते ।**
**न्यूनातिरिक्तता न स्यात्कलौ वेदोक्तकर्मणाम् ॥५७॥**
**हरिस्मरणमेवात्र संपूर्णफलदायकम् ।**
**हरि केशव गोविंद वासुदेव जगन्मय ॥५८॥**
**जनार्दन जगद्धाम पीतांबरधराच्युत ॥**
**इतीरयन्ति ये नित्यं न हि तान् बाधते कलिः ॥५९॥**
**अहो हरिपरा ये तु कलौ सर्वभयंकरे ।**
**ते सभाग्या महात्मानः सत्संगरहिता अपि ॥६०॥**
**हरिनामपरा ये च हरिकीर्तनतत्पराः ।**
**हरिपूजारता ये च ते कृतार्था न संशयः ॥६१॥**
**इत्येतद्वः समाख्यातं सर्वदुःखनिवारणम् ।**
**समस्तपुण्यफलदं कलौ विष्णोः प्रकीर्तनम् ॥६२॥ नृसिंहपुराण अ.५४.**



भावार्थः- दहा हजार वर्षपर्यंतच कलिमध्यें विष्णूची स्थिति राहील असें म्हणणारांचें खंडण करण्याकरितां घोर व भयंकर हीं विशेषणें श्लोकांत घातली आहेत; म्हणजे कलीच्या चवथ्या चरणांत देखील भगवत्स्थिति राहील, हा त्या विशेषणांचा आशय आहे. कलीला दहा हजार वर्षे झाल्यावर विष्णूची स्थिति न सांगणारे वाक्य तर, वाममार्गादिकांचा[१६७] सुळसुळाट दाखविणारे आहे, भगवत्स्थित्युच्छेदक[१६८] नाहीं. अन्य श्लोकार्थ स्पष्ट आहे. (य११पू.८८)

वादी उवाचः- भगवद्विषयक मानसक्रिया कायिक वाचिक क्रियेहून श्रेष्ठ आहे असा निश्चय आहे, आणि

**''कृते यद्ध्यायते विष्णुं त्रेतायां यजतो मखैः।**
**द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ॥५२॥ भाग.स्कं.१२.अ.३**

ह्या श्लोकांत ध्यानापेक्षां नामाला वरिष्ठत्व दिलें आहे. ज्या ठिकाणीं कनिष्ठाचे गुण श्रेष्ठापेक्षां दाखविले जातात, त्याठिकाणीं अर्थवाद होत असतो; म्हणून नाममाहात्म्य अर्थवाद आहे असें मी म्हणतो.

सिद्धान्ती उवाचः- तूं मूर्ख आहेस म्हणून म्हणतोस; कारण ध्यानापेक्षां नाममाहात्म्याची श्रेष्ठता या श्लोकांत कालभेदानें सांगितली आहे.

एककालसंप्राप्तश्रेष्ठापेक्षया[१६९] कनिष्ठविशेषगुणविधायक वचन अर्थवादरूप असो; पण भिन्नकालसंप्राप्तविशेषगुणविधायक वचन अर्थवादरूप होत नसून, तत्तत्कालावच्छिन्न[१७०] धर्मरूप होत असतें.

यद्यपि [१७१]उदितानुदित-होमनिंदास्तुतिविधायक श्रुतिवाक्यें कालभेदेंकरूनहि प्रशंसाबोधक अर्थवादरूप आहेत; तथापि आवश्यक होमकर्तव्यता तीं वाक्यें बोधन करितात. तद्वत् त्वां उदाहरण घेतलेल्या श्लोकांत दुर्जनतोषन्यायानें अर्थवाद म्हटलें तरी कलीमध्यें नामस्मरणाची विशेष-कर्तव्यता तें वाक्य बोधन करिते. अथवा,

**''युगपज्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिंगम्''** (न्यायदर्शन अ.१,आ.१,सू.१६)

असें न्यायसूत्र आहे. दोन ज्ञानें एकाकाळीं उत्पन्न न होणें हें मनाचें लक्षण आहे; कारण गंधादिक विषय घ्राणादिकाशीं संयुक्त झाले असतां, दोन विषयांचे एका कालीं मन ग्रहण करू शकत नाहीं. तें मन नामस्मरणामध्यें स्थिर झालें असतां सहजच एकाग्र होतें.

वादी उवाचः- **''क्रमशोऽक्रमशश्चेन्द्रियवृत्तिः'' (सांख्यसूत्र अ.२)**

अर्थः- सर्व इंद्रियांच्या वृत्ती क्रमानें होतात व युगपत्हि होतात. या सांख्यसूत्रावरून व वेदान्ताने अंतःकरण अणु मानलें नाहीं म्हणून (य११पू.८९) आणि दशावधानी शतावधानी लोक दृष्टीस पडतात म्हणून, न्यायाचा मनोणुवाद[१७२] घेऊन नामस्मरणाची तुम्ही उपपत्ति सांगितली, ती मला मान्य नाहीं.

सिद्धान्ती उवाच :- अनुभवापुढें तुझें सर्व तर्क व्यर्थ आहेत. वेदान्त, सांख्य व न्यायाचा मनाच्या इतर विषय ग्रहण करण्यासंबंधांत विरोध आहे, परंतु नामस्मरणासंबंधात तो विरोध प्राप्त होत नाहीं. कारण कोट्यावधानी जरी पुरुष असला, तरी दोन अक्षरें एका काली उच्चारण्यास तो समर्थ होत नाहीं; तर एकामागून एकच तीं अक्षरें त्याला उच्चारावीं लागतात असा अनुभव आहे. म्हणून एका अक्षरावर स्थिर झालेली वृत्ति त्याच काळीं दुसऱ्या अक्षरावर जाऊं शकत नाहीं. एवढ्याच करितां नामस्मरणामध्यें एकाग्रता होते.

वादी उवाच :- अशी एकाग्रता होण्याकरितां नामस्मरणाची कांहीं अपेक्षा नाहीं. ज ब ग ड द अशीं अक्षरें उच्चारलीं असतांहि तिचा लाभ होतो.

सिद्धान्ती उवाच :- ज ब ग ड द या अक्षरांबरोबर त्या अक्षरांचाच काय तो लाभ होतो, वाचकाबरोबर वाच्याचा लाभ होत नाही आणि नाामस्मरणाात तर वााचकाबरोबर वाच्याचाही लाभ होतो, म्हणजे भगवन्नामस्मरणाबरोबर भगवंताची स्मृति होते.

वादी उवाच :- अहो, तुम्हीं आतांच न्यायाचा पक्ष घेऊन, मनाला दोन ज्ञानें एका कालीं होत नाहींत असें सांगितलें; आणि आतां वाचकाबरोबर वाच्याची स्मृति होते असें म्हणतां तेव्हां हें कसें?

सिद्धान्ती उवाच :- प्रथम न्याय वाचून पहा म्हणजे कळेल. न्यायांत मन व बुद्धि हे दोन निराळे मानले आहेत. मनास द्रव्य मानलें असून, बुद्धीस गुण मानलें आहे.

दोन ज्ञानें एकाकालीं न होणें हें मनाचें लक्षण सांगितलें असून, सर्व व्यवहाराला कारण ज्ञान असें बुद्धीचे लक्षण सांगितलें आहे.

स्मृति म्हणजे आठवण हा बुद्धीचा भेद सांगितला असून, मनाचा भेद न्यायानें सांगितला नाहीं. म्हणून नामस्मरणाकडे मनाची एकाग्रता झाली असतां, बुद्धीचे ठायीं भगवंताची स्मृति होते असें न्यायाचें उत्तर आहे. अथवा शब्दानें अर्थ कळण्यामध्यें ईश्वराची इच्छा (य११पू.९०) अथवा अमुक शब्दानें अमुक अर्थ कळावा याविषयीं ईश्वराची इच्छा शक्तिरूपानें नियामक आहे. तें, 'माझें नाम अमुक आहे' हें सांगणाऱ्या देवदत्ताप्रमाणें, भगवन्नामाचे ठिकाणीं अधिक प्रगट आहे. म्हणून नामाबरोबर शक्तिबलानें भगवंताची स्मृति होते, असेंहि न्याय उत्तर देतो; किंवा मन आणि आत्मा यांच्या संयोगानें ज्ञान उत्पन्न होत असतें. तशीच भगवत्स्मृति उत्पन्न झाली असतां विरोध येत नाहीं.



यद्वा न्यायपक्ष राहूं दे. सांख्य आणि वेदान्ताप्रमाणें मन हें बहुज्ञानग्राहक असल्यामुळें, नामाबरोबर भगवत्स्मृति होणें विरुद्ध नाहीं. म्हणूनच स्मरण आणि ध्यानाचा नामस्मरणामध्येंच अंतर्भाव होतों असें विष्णुसहस्रनामभाष्यांत आचार्य म्हणतात.

वादी उवाचः- संस्कारमात्रजन्य[१७२अ] ज्ञानाला न्यायानें स्मृति म्हटलें आहे, आणि ''अनुभूतविषयासंप्रमोष''[१७३] हें स्मृतीचें लक्षण योगियादिकानीं केलें आहे. भगवंताचा कोणास अनुभव नाहीं, म्हणून त्याची स्मृतिहि नामाबरोबर होणें शक्य नाहीं.

सिद्धान्ती उवाच :- प्रमाणसाध्यसंस्कारजन्य[१७४] स्मृति होत असते. *ती कोठें प्रत्यक्षप्रमाणसाध्य[१७५] संस्कारानें होतें, *कोठें अनुमानप्रमाणसाध्य[१७६] संस्कारानें होते, व *कोठें शब्दप्रमाणसाध्य[१७७] संस्कारानें होते.

यद्यपि भगवत्प्रत्यक्ष[१७८] योगी किंवा भक्तावांचून अन्यांना होत नाहीं, तथापि अनुमानसाध्यसंस्कारजन्य[१७९] स्मृति किंवा वेदपुराणशब्दसाध्यसंस्कारजन्य[१८०]स्मृति भगवन्नामाबरोबर उत्पन्न होते.

वादी उवाच :- हें प्रासंगिक निरूपण असो, परंतु नामाला संवादिभ्रमरूप स्वामी विद्यारण्यानीं म्हटलें असल्यामुळें, नाममाहात्म्य अर्थवादरूप आहे असें मी म्हणतो. तो श्लोक येणें प्रमाणें:-

**ज्वरेणाप्तः संनिपातं भ्रान्त्या नारायणं स्मरन् ।**
**मृतः स्वर्गमवाप्नोति स संवादिभ्रमो मतः ॥९॥ पंचदशी- ध्यानदीप**

अर्थः- ज्वरानें संनिपात झाला असतां भ्रांतीनें नारायणाचें स्मरण करून मेल्यावर स्वर्गास जाणें संवादिभ्रम होय.

सिद्धान्ती उवाच :- या श्लोकाचा अर्थ तुला कळला नाहीं. (य११पू.९१) नामस्मरण संवादिभ्रम आहे असा जो तूं त्या श्लोकाचा अर्थ केला आहेस, तो सम्यक् नाही; कारण शास्त्रांत सांगितलेल्या परोक्ष नाममाहात्म्याला तूं संवादिभ्रम म्हणतोस, किंवा अजामिलानें भ्रांतीनें पुत्रनाम स्मरण केल्याला संवादिभ्रम म्हणतोस? प्रथम पक्ष योग्य नाहीं, कारण विद्यारण्यस्वामीच तृप्तिदीपांत असें म्हणतात कीं-

**व्यक्त्यनुल्लेखमात्रेण भ्रमत्वे स्वर्गधीरपि ।**
**भ्रांतिः स्याद्व्यक्त्यनुल्लेखात्सामान्योल्लेखदर्शनात् ॥५३॥**
**अपरोक्षत्वयोग्यस्य न परोक्षमतिर्भ्रमः ।**
**परोक्षमित्यनुल्लेखादर्थात्पारोक्ष्यसंभवात् ॥५४॥**(पंचदशी तृप्तिदीप.)

भावार्थ :- ब्रह्म आहे इतक्या परोक्ष ज्ञानाला जर तुम्ही भ्रम म्हणत असाल तर स्वर्ग आहे याहि परोक्षज्ञानाला भ्रम म्हणावें लागेल; म्हणून वाक्यावरून होणारें परोक्ष ज्ञान भ्रम नव्हे.

अन्य पदार्थ पंडितानीं समजून घ्यावा. मला संस्कृत येत नसल्यामुळें मी सांगूं शकत नाहीं. या श्लोकावरून शास्त्रानें सांगितलेले परोक्ष नामस्मरण संवादिभ्रमरूप आहे असें तुला म्हणतां येणार नाहीं.

आतां दुसरा पक्ष आम्हास इष्ट आहे; म्हणजे अजामिलानें पुत्राचें नारायण नाम घेऊनहि तो मुक्त झाला हें त्या संवादिभ्रमाचें उदाहरण होईल; परंतु हा संवादिभ्रम असला तरी नामस्मरणाचें वस्तुमाहात्म्यच द्योतन[१८१] करितो. संवादिभ्रम हा भ्रांतपुरुषाच्या दृष्टीनेंच भ्रम असतो, वस्तुदृष्टीने भ्रम नसतो. येथें स्वामीनीं दिलेले मणिदीपाचेंच उदाहरण जुळवून घ्यावें. तूं उदाहरण घेतलेल्या या श्लोकावरील रामकृष्णी टीका पहा. मागे वादीनीं उदाहरण दिलेल्या ध्यानदीपांतील ९ व्या श्लोकाची टीकाच येथें उत्तरार्थ लिहितो.

**टीका :- ''ज्वरेणाप्त इति । ज्वरेण सन्निपातं प्राप्तः पुरुष इदं नारायणस्मरणं मम स्वर्गसाधनमिति ज्ञानमन्तरेणापि सन्निपातप्रयुक्तभ्रमवशात् साधारणपुरुषतया चैद्यादिवन्नारायणं स्मरन् मृतः स्वर्गमवाप्नोत्येव ।**
**''हरिर्हरति पापानि दुष्टिचित्तैरपि'' स्मृतः ।**
**''आक्रुष्य पुत्रमघवान् यदजामिलोऽपि नारायणेति म्रियमाणं इयाय मुक्तिम्'' इत्यादिपुराणवचनेभ्यः ।**



**अत्रापि नारायणनाम्नः पुत्रनामत्वज्ञानं भ्रान्तिरेव ॥''** (य११पू.९२)

**भावार्थ :- भगवंताचें नामस्मरण । माझिया मुक्तीचें साधन ।**
**ऐसें नसोनीहि ज्ञान । नामस्मरण जरी घडे ॥२८७॥**
**तरी तेणें होय मुक्ति । जेविं अजामिल संन्निपातीं ।**
**पुत्रनाम घेवोनी मुक्ति । पावला भागवतीं कथा ही ॥२८८॥**
**नामस्मरणें मागील पाप जळे । आणिक पाप न घडे संन्निपाताचिये वेळे ।**
**म्हणोनी नामाचेंचि फळ मिळे । महात्मया तया ॥२८९॥**
**ऐसें जे म्हणती । तयांची असो संमति[१८२] ।**
**परी भ्रमेंहि नामस्मरणीं मुक्ति । वस्तुमाहात्म्य हें ॥२९०॥**
**दुर्जनींहि केलिया स्मरण । हरि करी पापपरिहरण[१८३] ।**
**हें वामनहि आपण । नामसुधेंत बोलिले ॥२९१॥**
**'न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असें न कधीं घडे ॥**
**अजितनाम[१८४]वदो भलत्या मिसें । सकल पातक भस्म करीतसे ॥'**वामनपंडित
**जाणोनी नाम घेतां वासनाक्षय । नेणोनी नाम घेतां पापमात्रक्षय ॥**
**हें वामनें बोलिलें होय । तें वाचोनी पहावें ॥२९२॥**
**भ्रमेंहि नामाची फलप्राप्ति । येणें अधिक विश्वास वाढला चित्तीं ।**
**की उपासनेहूनि नामगति । श्रेष्ठ जाहली ॥२९३॥**
**अर्चिरादि मार्गे उपासक जाती । त्यांना मरणसमयी पाहिजे उपास्यस्मृति ।**
**आणि नाम विकारवशें घेती । तरीहि पावती मुक्तीतें ॥२९४॥**
**दक्षिणायणाधिकरणीं । श्रौत[१८५] उपासकांचा कालनियम खंडिती मुनि ।**
**''आस्य जानन्तो नाम'' इत्यादि वाक्यें नामहि श्रौत म्हणुनी ।**
**कालनियम मरणीं त्यास न लगे ॥२९५॥**
परंतु श्रौतहि दहराद्युपासना[१८६] **। भ्रमेंकरोनी असाध्य जाणा ।**
**भ्रमेंहि केलिया नामस्मरणा । गति पावे हें उपासनाश्रैष्ठ्य ॥२९६॥**
**एवं रामकृष्णाचें मनोगत । या श्लोकाच्या टीकेत ।**
भलतेंचि वदती अच्युत । यास्तव रामकृष्णचि येथ प्रमाण मानू ॥२९७॥
तंव वादी म्हणजे उपासकासी । नामस्मरण असो विशेषी । परी ज्ञानोत्तर भक्ति मान्य तुह्मासी । तरी ज्ञानियासी नामस्मरणीं प्रमाण सांगा ॥२९८॥

ज्ञान्यालाही नाामजप

सिद्धान्तीं म्हणे ऐक सावचित्त । स्वामी विद्यारण्य बोलिले द्वैतविवेकांत । कीं ज्ञान झालिया प्रणवजपें मनोनाश होत । तो श्लोक प्रमाणार्थ येथ सांगू ॥२९९॥

(य११पू.९३) ''बुद्धतत्त्वेन धीदोषशून्यैनैकान्तवासिना ।
दीर्घं प्रणवमुचार्य मनोराज्यं विजीयते'' ॥६२॥ (पंचदशी द्वैतविवेक)

महावाक्यें ब्रह्म जाणुनी । कामादिक दोष वैराग्यें जिंकोनीं ।
प्रबलतर संस्कारें झणीं । मानसविकार उठती ॥३००॥
तैं ज्ञानियानें एकान्ती बैसावें । सहा-बारा मात्रा प्रणव जपावे ।
तेणें मनोराज्य जिंकावे । सर्व दोषमूळ ॥३०१॥
या निरूपणीं ऐसा भाव । जीवन्मुक्तीचे तीन उपाव ।
*वासनाक्षय *बह्मभाव । *मनोनाश तिसरा ॥३०२॥
ते तिन्ही एककाळीं अभ्यासितां । शक्य परी बहु कठीणता ।
हे जीवन्मुक्तिविवेकीं तत्वता । विद्यारण्य बोलिले ॥३०३॥
म्हणोनी ज्ञानानंतर जप करावा । तेणें वासनाक्षय मनोनाश साधें बरवा ।
एरव्ही जपनियम सांगावा । ज्ञानिया कवणें ॥३०४॥
पुण्यरूप अदृष्ट पाहिजे ज्यासी । जपादिकांचा नियम तयासी ।
पुनर्जन्म नाहीं ज्ञानियासी । अदृष्टविशेषी[१८७] म्हणोनी नसे ॥३०५॥
अदृष्टाभावे न घडे नियम । यालागीं ज्ञानियाचा जपोद्यम[१८८] ।
जीवन्मुक्तिसाठींच परम । परलोकार्थ नव्हे ॥३०६॥
जैसा प्रणवजप ज्ञानियासी । तेविं नामस्मरणहि विहित त्यासी ।
श्रौत म्हणोनी निश्चयेसी । बोलिलें आहे ॥३०७॥
''ॐमित्येकाक्षरं ब्रह्म'' या श्लोकावरुती । टीका करितां वामन म्हणती ।
नारायण वासुदेव हेहि श्रीपति । चतुरक्षरब्रह्म इति सुचवितू ॥३०८॥
वामन पंडित :-
''प्रणव एकचि अक्षर । म्हणूनी हे ब्रह्म एकाक्षर ।
तैसेंचि ब्रह्म चतुरक्षर । वासुदेव नारायण म्हणोनी ॥५६०॥
तैसेंचि उपनिषदीं । दोनी अक्षरे हरि पदीं ।
हे द्व्यक्षर ब्रह्म वेदीं । जैसा प्रणव एकाक्षर ब्रह्म ॥५६१॥



ऐशींच जीं जीं हरिनामें । जैसीं रामकृष्णादिरूपें अभिरामें[१८९] ।
तैसें ध्वनिरूप रूपें सर्वसुगमें । अक्षर ब्रह्म नामें समस्तहि ॥५६२॥''

(यथार्थदीपिका अ.८)

म्हणवोनि ज्ञानिया नामस्मरण । विहित हें आम्ही बोलिलों वचन ।
एवं कोणेहि परी अर्थवादपण । नये नामा ॥३०९॥
आणि दुर्जनतोषन्याये स्वामीनी । देवताधिकरण[१९०] उदाहरण देऊनी ।
(य११पू.९४) मंत्रार्थवाद प्रमाण सांगुनी । जिंकिला वादी तें ऐक ॥३१०॥

''मंत्रार्थवादेतिहासपुराणलोकेभ्यो । विग्रहवत्वाद्यवगमात्'' ॥२३॥

(ब्रह्मसूत्र-शांकरभाष्य अ.१.पा.३)

हेंचि शांकरभाष्यवचन । श्रीधरस्वामीनें घेतलें प्रमाण ।
याचा अर्थ कीं मंत्रार्थवादइतिहासपुराण । सर्वही प्रमाण म्हणोनी ॥३११॥
वादी म्हणे देवांच्या व्यक्ती । मंत्रार्थविषय[१९१] न होती ।
सिद्धान्ती म्हणे नानाव्यक्तिनिष्ठ आकृती । शब्दार्थविषय होतसे ॥३१२॥
पूर्व कल्पीचें पुढतपुढती । उत्पन्न करी प्रजापती ।
म्हणोनि तेचि तेचि शब्दार्थ निश्चिती । उत्पन्न होती अविरोधें ॥३१३॥

वर्ण आणि ध्वनि

आणि व्यक्तिभेद नाहीं म्हणोनी । सादृश्यता नये वर्णीं ।
उपाधीभेदें ध्वनी । वेगळा भासें ॥३१४॥
अ-कार नाहीं देखिलें दोन । कीं क-कार नाहीं देखिले तीन ।
यालागीं तोचि तो वर्ण उत्पन्न । पुढती पुढती होत असे ॥३१५॥
उदात्त[१९२] ककार उच्चारितां । तरी तो पकार न होये तत्वतां ।
आणि तोचि अनुदात्त[१९३] उच्चारितां । सकार न होय ॥३१६॥
उदात्त अनुदात्त स्वरित[१९४] । ककार एकचि या तिहींत ।
यालागीं ध्वनीचेचि भेद बहुत । वर्ण निश्चित एकची ॥३१७॥
तैं वादी म्हणे स्थानानुसार[१९५] ध्वनी । होतां उमटे वर्णपणीं ।
ध्वनी व्यापक व्याप्यता वर्णी । ते नित्य काय म्हणोनि म्हणावे ॥३१८॥
तेव्हां म्हणे सिद्धान्ती । जरी ध्वनीचि वर्णाकार असती ।
तरी वर्णाची झाली नसती स्मृती । परी मनेंही स्मरतां येति वर्ण ॥३१९॥

उदात्त अनुदात्त स्वरित । हें कल्पोंचि न शके चित्त ।
आणि ध्वनि जो ऐकों येत । तोही वर्णाश्रयें करोनी ॥३२०॥
प्रथम मानस वर्ण । स्थानादिकीं ध्वन्युपहित[१९६] होवून ।
प्रगट होय म्हणून । आधार वर्ण आधेय ध्वनी ॥३२१॥
तंव वादी म्हणे व्यस्त[१९७] समस्त । वर्ण बोधूं न शकती अर्थ ।
यालागीं वर्णे स्फोट उपजत । तो अदृश्य शब्द म्हणावा ॥३२२॥
सिद्धान्ती म्हणे वर्णाहून । गौरव[१९८] स्फोट कल्पिणें भिन्न ।
मानस वर्णेही सामर्थ्ये करून । बोध करिती अर्थाचा ॥३२३॥
म्हणोनि वर्णचि शब्द होती । ऐसे भगवान् उपवर्श म्हणती ।
शारीरकभाष्यीं स्वसम्मती । येथेंची दिधली आचार्यांनीं ॥३२४॥
(य११पू.९५) आतां देवदत्तादि व्यक्ति । उत्पन्न झालिया पितादि नांव ठेविती ।
तैशा न होती घटादि व्यक्ति । जाति आकृति दर्शक म्हणोनी ॥३२५॥
तंव वादी म्हणे एखादें कार्य करून । तयाचें नांव ठेवी कर्ता आपण ।
मग त्या कार्यत्व जातीकारण । तेंचि नाम होय ॥३२६॥
जेवीं बृहत्कथेंत कथा । नूतन मंत्र मयासुरें निर्मितां ।
स्वेच्छेनें नाम ठेवितां । त्या जाती आकृतीसी तेंचि नांव ॥३२७॥
तैं सिद्धान्ती म्हणे एथ काय झालें । वर्णाचे क्रम मात्र वेगळे केले ।
वर्ण तंव तेचि वहिले । नाहीं मोडले सर्वथा ॥३२८॥
अथवा जें कार्य मनुष्यीं केले । तज्ञातिदर्शक नांव जरी तेणेंचि ठेविलें ।
तरी गवादिक मनुष्यें नाहीं केलें । तज्ञातिदर्शक नांव अनादि ॥३२९॥
तंव वादी म्हणे धुंडतां धुंडतां । एखादा पदार्थ सांपडे अवचितां ।
तयाचें नांव ठाऊक नसतां । द्रष्टाचि कल्पी ॥३३०॥
सिद्धान्ती म्हणे तेथही वर्ण । निश्चयें असती समान ।
आणि त्या पदार्था कारण । कोणी देखिलें कीं नव्हतें पूर्वी ॥३३१॥
नव्हतें म्हणतां प्रमाण नाहीं । देखिलें म्हणतां नामानुमान राही । ऐसेंचिपडतां अतिप्रवाही[१९९]। तरी अनवस्था[२००]किंवा अनादि शब्दप्रवृत्ति मानणें ॥३३२॥
एवं लौकिक शब्दास जंव ही गती । तंव नाम शब्दाची कवण रीती ।
जयाचा अर्थ एक श्रीपती । जो जातीविण व्यक्तित्वें नित्य ॥३३३॥





वादी म्हणे येणें पाहतां । सकळ शब्दांस लौकिकार्थता ।
तुम्ही विवक्षेनें[२०१] शब्दा लौकिकता[२०२] । पूर्वी बोलिली ऐकिली मी ॥३३४॥
सिद्धान्ती म्हणे साच बोलिली । परी ते कल्पित शब्दाविषयींच वहिली ।
तत्तात्पर्य कीं विवक्षेविण वनमाळी । कल्पित शब्दाचाही अर्थू होय ॥३३५॥
वेद पुराण प्रसिद्ध नाम । जरी कल्पित असतें परम ।
तरी स्वकल्पिताचा महिमोद्‌गम[२०३] । करितां न येता ॥३३६॥
कर्मपंथ चालूं असतां । कोणी न मानतें नामपंथा ।
नामनिंदा नाहीं तत्वतां । वेदीं पुराणीं ऐकिली कोठें ॥३३७॥
कल्पित ऋषींच्याही स्मृती । अझोनि प्रमाण न चालती ।
कल्पित नाम असतें निश्चिती । तरी कोणी न मानतें तयातें ॥३३८॥
वैदिक धर्मी कीं अन्यमतीं । नाम महिमा अवघे मानिती ।
आपल्याला भाषेंत घेती । पौराण वा कल्पित हरिनावें ॥३३९॥
जरी लोभीष्ठांचे अनुमतें । नाममाहात्म्य निघालें असतें । (य११पू.९६)
तरी दानापरीस तयातें । न प्रशंसितें कोणी अधिक ॥३४०॥
केवळ पाप करावयासाठीं । उघडली म्हणतां नामाची पेटी ।
तरी श्रुतिविरुद्ध म्हणूनि पाटी[२०४] । खंडोन टाकिती बहुत जन ॥३४१॥
परी श्रौतकर्मांत कोणी न घेतें । 'यावन्ति वेदाक्षराणि तावन्ति हरिनामानि' न म्हणते । अथवा ऐसेंचि जरी कल्पणें चित्तें ।
तरी कोण्याचि धर्मातें स्थिति न राहे ॥३४२॥

नास्तिक मत

यज्ञप्रवृत्ति हिंसेसाठीं । दानप्रवृत्ति  लोभापाठीं ।
नामप्रवृत्ति पापासाठीं । आळसिया पोटीं योगप्रवृत्ती ॥३४३॥
निद्रेसाठीं प्रशंसिती ध्यान । बाईल न पोसवे जयाकारण ।
तेंचि चतुर्थाश्रम करोन । भिक्षाटणें पोट भरती ॥३४४॥
खायास न मिळे म्हणोनि निश्चिती । पर्णाहारें अनुष्ठान करिती ।
लोकीं पूजावें म्हणोनि पाळिती । सत्यादिक ॥३४५॥
एवं तुझिया मतानुसार । शंकाग्रस्त अवघे आचार ।
तेथ नामाचा कायसा विचार । चार्वाकसार निवडिलें त्वां ॥३४६॥

असो तुझीच मानोनि उक्ती । अवघेचि झाले नास्तिकमती ।
तरी कोण होईल जगाची गती । तेही चित्तीं विचारी ॥३४७॥
पुनर्जन्माची गेली भीती । अवघिया आहे सुखप्रवृत्ति ।
तैं कलही[२०५] होतील जीवनार्थी । एकाचि गृहीं शत चोर ॥३४८॥
चार मिळोनि नियम करितां । तरी तोही न चालेल तत्वतां ।
अवघियासचि सुखाची आस्था । यालागीं एकान्ता[२०६]उल्लंघतील नियम ॥३४९॥
शस्त्रग्रहें होतील वनप्रांती । घडी घडी होईल राज्यक्रांती ।
ऐसा संशय वाढेल चित्तीं । कीं बाळाप्रती मातृशंका ॥३५०॥
एवं धर्मातें न मानितां । तरी महा अनर्थ चढेल हातां ।
आणि तुझा सिद्धान्तचि सत्य असता । तरी जगत् व्यवस्था न चालती ॥३५१॥
जीवनप्रवृत्ती[२०७] आधींचिपासुनी । जरी धर्मानुभव न घेता कोणी ।
तरी केव्हांचि जग निवर्तोनि[२०८] । गेलें असतें ॥३५२॥
वादी म्हणे पूर्वी जन । मूर्खचि होते अवघे जण ।
म्हणोनि धर्माचा भारा आपण । वाहत होते मस्तकीं ॥३५३॥
सिद्धान्तीं म्हणे भार वाहविता । कोणी तरी चतुर होता की नव्हता ।
प्रथमपक्षीं मोडे मूर्खव्यवस्था । द्वितीयपक्षीं बुद्धि न वाढे शिक्षणाविण ॥३५४॥
म्हणोनि आतांही मूर्खचि असावेत । मग शंका कां करिसी व्यर्थ ।
किंवा पूर्वी मूर्ख आणि सद्गुणी होतें बहुत ।
आतां शहाणें आणि दुर्गुणी पशू ॥३५५॥ (य११पू.९७)
वादी म्हणे पशूपासूनि मनुष्यजाती । झाली ऐसें निरंजनादि[२०९] म्हणती ।
आणि पशु स्वप्रवृत्त्यनुसार वागती । म्हणोनि पूर्व मूर्खस्थिती मी मानी ॥३५६॥
सिद्धान्ती म्हणे पशु योग्य वागती । आणि मनुष्य कलह माजविती ।
तरी पशुयोनी वांछी चित्तीं । शंका मजप्रती पुसूं नको ॥३५७॥
जरी म्हणसी सद्गुण । मनुष्यांत अधिक परिणमले[२१०] पशुहून ।
तरी भोगार्थ कीं अन्य कार्याकारण । ते मजलागुन सांग आतां ॥३५८॥
भोगार्थ सद्गुण मनुष्यांत म्हणतां । तरी पशूंतचि मनुष्याहूनी अधिक सर्वथा ।
अन्य कार्यार्थ मनुष्यांत सद्गुण म्हणतां । तरी अदृष्ट प्रयोजनता[२११]पातली
॥३५९॥ अदृष्टाविषयीं पशुवृत्ति प्रमाण । म्हणतां वचनचि अप्रमाण ।



हा मूळकारणाचा धर्म म्हणतां जाण । तरी सर्वज्ञ कारण तें झालें ॥३६०॥
बुद्धीनें सर्वज्ञ कारण मानितां । तरी कां उच्छेदिसी शास्त्रव्यवस्था ।
निरंजन जें बोलिले तत्वतां । तें श्रुतिविरोधास्तव मी न मानी ॥३६१॥
किंवा निरंजनाचा आशय आन । पापानुशयी[२१२] निघतां नरकांतून ।
प्रथम तमोगुणीं पशू होऊन । पुढें शनैः स्वकर्मे मनुष्य होती ॥३६२॥
मी शौच्येस नाहीं गेलो म्हणूनि । तम वाढला माझिया मनीं ।
यास्तव तुझिया सुरामत्तवचनीं । प्रतिवचन देत बैसलों ॥३६३॥
असो हें वायफळ बोलण । अर्थवाद नाहीं नामस्मरण ।
तंव वादी म्हणे ऐसेन । होईल अनर्थ अत्यंत ॥३६४॥
तुम्ही धर्मे जगत् रक्षू पाहतां । आणि नाममहिमा एवढा सांगतां ।
तरी नामविश्वासें स्वार्थी तत्वतां । गळे कापतील आणिकांचे ॥३६५॥
विचित्र आहे कलीची गति । तया उत्तेजक नाममाहात्म्यरीति ।
तेव्हां ऐक म्हणे सिद्धांती । नास्तिकातें ऐसी नामस्मृति कदा नव्हे ॥३६६॥
पापाचें भय कोणाच्या मस्तका । नास्तिका कीं नामधारका ।
ईश्वर नाहींच हें वाटे नास्तिका । यालागीं पापशंका न ये तया ॥३६७॥
नामधारका नाहीं भीति । ऐसी आहे तुझी उक्ति ।
तेव्हां भय राहिलें मध्यस्थाप्रति । जे नास्तिक नामधारक ॥३६८॥
ऐसे आहेत कवण । जरी म्हणशील धर्मसंपन्न ।
तरी ते अविश्वासी कीं विश्वासपूर्ण । प्रथमपक्षीं नास्तिकता येत तयां ॥३६९॥
द्वितीयपक्षीं शाब्दप्रमाणांगीकार । तरी तेंचि सांगे कलींत धर्म मोडेल समग्र ।
जरी नीतिच पाळावी धर्मानुसार । तरी संसर्गे तें चालूं न शके ॥३७०॥
(य११पू.९८) अधर्मेच्छा नसतांहि चित्ती । चाकर पोटासाठीं अधर्म करिती ।
ऐशा समयीं भगवद्भक्तीं । नास्तिकता धरावी काय सांग ॥३७१॥
प्रतिपदीं[२१३] प्रत्यवायान्वित[२१४] । तें कर्म जाहलें संसर्गदूषित ।
नास्तिकता तंव नाहीं युक्त । तरी कवण पंथ शोधावा ॥३७२॥
म्हणोनि कोटिशंकांची उपस्थिति । असतांहि नामावीण नाहीं गति ।
जैसी रोगविषशंका[२१५]पळ पळ चित्तीं । परी नाहीं गति जेविल्यावीण ॥३७३॥
आणि नामस्मरणें पापप्रवृत्ति । होईल हेंहि न वाटे चित्ती ।

कासया लोक नाम स्मरती । पापनिवृत्ति वा संसारप्राप्ति व्हावया ॥३७४॥
पापाची भीति मानिल्यावीण । तन्निवृत्त्यपेक्षा करील कवण ।
म्हणशील संसारप्राप्ति कारण । तरी नामें कवण काज निफजे ॥३७५॥
दंभें फसवावया लोकांप्रती । जरी म्हणशील नामप्रवृत्ति ।
तरी धर्माचीहि प्रवृत्ति । दंभें निश्चितीं करिती पापी ॥३७६॥
जो अखंड करी धर्माचरण । पाप न होय म्हणसी तयाकडून ।
तरी जो अखंड करी नामस्मरण । पाप त्याकडून न होय हें मी म्हणें ॥३७७॥
मध्यें सोडोनि नामस्मरण । पाप करील हें बोलसी वचन ।
तरी मध्यें सोडोनि धर्माचरण । पाप कवण करूं न शके ॥३७८॥
धर्मे न नाशे पापप्रवृत्ति । आणि पदीं पदीं प्रत्यवायहि होती ।
तैसी नाहीं नामस्मृति । हें भागवतीं बोलिलें ॥३७९॥
जयाच्या आज्ञेनें धर्म सार्थ । त्याचेंचि नांव केविं व्यर्थ ।
नामस्मरण अखंड करित । तरी पापप्रवृत्ति समूळ हरी ॥३८०॥
एकवेळचि नाम स्मरतां । तरी मागील पापें जळती तत्वतां ।
आणि नाम जपोनि पाप करीत जातां । तरी पाप जळे हा निश्चयो ॥३८१॥
परी दैवें मरणाचिया समयीं । जी प्रवृत्ति राहील पाहीं ।
तेणेंचि गति लवलाहीं । होईल तैसी ॥३८२॥
अजामिळें पापान्तीं नाम । घेतलें म्हणोनि पावला राम ।
संततपापकृन्नामधारका[२१६] नामान्तीं परम । पापही राहील मरणसमयीं ॥३८३॥
तेव्हां यमचि नेईल तयातें । म्हणोनि अखंड नाम स्मरावें चित्तें ।
पाप नामप्रवाहातें । रोधिल्यावीण घडेना ॥३८४॥
जरी सकृन्नामोच्चारें पापें जाती । तरी नामप्रवाहावीण न मोडे पापप्रवृत्ति । जेवी दीप उजळतां तमनिवृत्ति । परी सततदीपावीण पुनस्तमःप्रवृत्ति न मोडे ॥३८५॥
(य११पू.९९) नामासी सूर्य म्हणतां । तरी न मानी कवणाच्या चित्ता ।
परी सूर्याऐसी अखंडता । सहजचि झाली पाहिजे ॥३८६॥

धर्म आणि नाम

आणिक धर्माहून । एक नामाचें रहस्य पूर्ण ।
सावध करोनि अंतःकरण । तेहि शिष्य होऊन ऐक वादिन् ॥३८७॥



कर्म करतिये वेळीं । मी कर्ता ही बुद्धि वाढे आगळी[२१७] ।
आदि-अंतीं मात्र वनमाळी । स्मरल्या जाय ॥३८८॥
जो कां करी नामस्मरण । तयासी अक्षय ईश्वरध्यान ।
नामानेंचि स्मरणध्यान । हें आचार्य बोलिले सहस्रनामभाष्यीं ॥३८९॥
तंव वादी म्हणे गुरुआज्ञेवीण । तुम्हीं व्यर्थ बोलिलें नामस्मरण ।
सिद्धांती म्हणे शांडिल्यवचन । प्रमाण आहे येविषयीं ॥३९०॥
संप्रदायं विना मंत्रः संप्रदायं विना क्रिया ।
संप्रदायं विना नाम सर्वं भवति निष्फलम् ॥१॥ शांडिल्यसंहिता
अर्थ स्पष्ट.
वादी म्हणे असो शांडिल्य । परी तुमच्याचि आचार्यांचे बोल ।
कीं गुरुमंत्र अवघड म्हणोनि विठ्ठल । सोपा आम्हीं वदूं वाचे ॥३९१॥

ज्ञानेश्वरांचा अभंग -

''अष्टांगयोगें शरीर दंडूं पाहे तंव येवढें कैचें कष्टसाधन ।
लय लक्ष लावूनि गुरुमंत्र जपों म्हणो तरी स्थिर नोहे अंतःकरण ।
तल्लीन होऊन हरिकथा आयिकों म्हणों तरी ठायींचेंचि बधिर श्रवण ।
उदंड वाचे हरि हरि म्हणतां फुकासाठीं चुके पतन रे रे ॥२१०॥गाथा,
सिद्धांती म्हणे हें वचन म्हणसी । परी अर्थ सर्वथा नेणसी ।
योगमंत्रकीर्तनाहूनि नामासी । सुलभता हें वचन बोधी ॥३९२॥
लयलक्ष[२१८] लावोनि गुरुमंत्र जपणें । हें अनुग्रहानंतरचि होणें ।
परी गुरुसेवाधिकारी नसतां चिन्हें । तयाकारणें बोलिलें हें ॥३९३॥
किंवा इतर संप्रदायीं गुरुमंत्र कठिण । लयलक्षें अजपाध्यान[२१९] ।
महाविधि पुरश्चरण । याहूनि नामस्मरणचि आमुचें बरे ॥३९४॥
किंवा पुराणप्रसिद्ध नामाविषयीं । मी पूर्व बोलिला नियमचि नाहीं ।
मंत्र सांगती गुरुहि । तेचि म्हणोनि ॥३९५॥ (य११पू.१००)
गुरुआज्ञेवीण गुरुनाम घेतां । ते मी बोलिली अनर्थता ।
ते जया शास्त्रप्रसिद्ध गुरुनाम तत्वतां । लाधलें नाहीं तयातें ॥३९६॥
माझें गुरुनाम शास्त्रप्रसिद्ध । यालागीं पूर्व बोलणें मज नाहीं वैध[२२०] ।
येथ शास्त्रहि शुद्ध । एकनाथवचनादि ॥३९७॥

किंवा गुरुआज्ञेवीण जपतां । तरी गुरुलाभचि फळ तत्वतां ।
जेवीं नामदेव नाम जपतां । खेचरलाभ फळ त्याचें ॥३९८॥
ऐसी आमुची वृत्ति । आतां या वचनाचा अर्थ जो तुझिया चित्तीं ।
असेल तो असूं दे निश्चितीं । परी घेई श्रीपतिनाम वाचे ॥३९९॥
गुरुआज्ञे किंवा गुरुआज्ञेवीण । आधीं सुखें करी नामस्मरण ।
मग तयाचें फळ तें होईल आपण । तेथ विचार जाण न लगे तुझा ॥४००॥
वादाचा सांडी प्रांत । करी हृदयभोग-निष्क्रांत[२२१] ।
रमाकान्त उमाकान्त । वदनीं अनंत गायी नामें ॥४०१॥

नामापराध

वादी म्हणे मजप्रती । सांगावी अपराधांची रीति ।
कैसे अपराध न होती । घडता, रीति कवण कीजे ॥४०२॥
सिद्धांति म्हणे ऐक वचन । अपराधाची दशा कवण ।
नामधारकसन्निंदा जाण । अपराध पूर्ण होतसे ॥४०३॥
नामधारकारहित सन्निंदा[१] होता । तरी सामान्यजननिंदासम तयाची कथा ।
भक्तिरहित सद्गुणनिंदा भगवंता । संमत म्हणोनी ॥४०४॥
''विप्राद्द्विषट्गुणयुतादरविन्दनाभपादारविंदविमुखात् श्वपचं वरिष्ठम् ।
मन्ये तदर्पितमनोवचने हितार्थ प्राणं पुनाति स कुलं न तु भूरिमानः॥१०॥''
(भागवत- स्कं.७ अ.९)

भक्तिविमुख बारागुणी[२२२] । ब्राह्मण असतां तयाहूनि । ज्यानें सर्व भाव
वाहिला हरिचरणीं । तो अंत्यज मज मान्य प्रऱ्हाद म्हणे ॥४०५॥
या श्लोकीं भक्तिविमुखसन्निंदा । यास्तव नामापराध म्हणजे भक्त-सन्निंदा ।
आतां 'असति नामवैभवकथा'[२] या अपराधा । श्रवण करी ॥४०६॥
इतर दुष्ट कर्मे करी । आणि नामासहि निंदी अविचारी ।
तयासचि सांगू नये निर्धारी । नाममहिमा कदापि ॥४०७॥
एऱ्हवी दाशार्हराव असज्जन असतां । गर्गे तया सांगितली नाममाहात्म्यकथा ।
वाल्मिकीसहि तत्वतां । नाममाहात्म्यकथा सांगितली॥४०८॥
(य११पू.१०१) म्हणोनी जो असज्जन । परी सत्प्रवृत्ति करूं इच्छी आपण ।
तयापुढें नाममाहात्म्य निरूपण । अपराध जाण न होय ॥४०९॥



आतां विष्णुशिवांचा मानणें भेद[२] । हा कोणत्याहि समयीं अपराध ।
पुराणीं जो केला समत्वनिषेध । तो भेदे सति साम्यभाव उत्सेदिला ॥४१०॥
उमाकान्त रमाकान्त । ऐसे दोन भगवंत ।
आहेत समान शक्तिमंत । ऐसें राजस मानिती ते समस्त निषेधिले ॥४११॥
एकचि ईश्वर द्विमूर्ति । हें न निषेधी कोणीहि उक्ति । म्हणोनि समत्वें वा विषमत्वें
शिवविष्णुभेदमती । कोणत्याहि रीति अपराधू ॥४१२॥
जरी सूतसंहितेंत केली विष्णुनिंदा । तरी भागवतीहि केली आहे शिवनिंदा ।
त्याचा भाव कीं निज उपास्य वंदा । किंवा शिवगोविंदा एकत्वें भजावें ॥४१३॥
परी भक्तिरहित सन्निंदा । आहे तेवी सत्कर्मरहित नाहीं भक्तिनिंदा ।
तंव वादी म्हणे हें अप्रबुद्धा । समान वदता ॥४१४॥
वृद्धगौतमस्मृतींत देव । बोलिले कीं श्रुतिस्मृती माझा मनोभाव । तयास उल्लंघोनि
जो भजे स्वयमेव । तो माझा भक्त परी वैष्णव न म्हणावा ॥४१५॥
श्रुतिः स्मृतिर्ममैवाज्ञा यस्तामुल्लंघ्य वर्तते ।
आज्ञाच्छेदी मम द्रोही मद्भक्तोऽपि न वैष्णवः ॥६१॥ (वृद्धगौतमस्मृति.)
सिद्धांती म्हणे ही स्मृति । एवढेंचि सांगें जनाप्रती ।
कीं शास्त्ररहित करितां भगवद्भक्ति । तरी वैष्णव तयाप्रती न म्हणावें ॥४१६॥
परी भक्तिविमुखसद्गुणाची निन्दा । शास्त्रचि संमत आहे गोविंदा ।
तैसी सद्गुणविरहितभक्तिनिंदा । शास्त्रीं नाहींचि बोलिली ॥४१७॥
बळेंचि उल्लंघोनि श्रुतिस्मृती । जे स्वकल्पित भक्ति करिती ।
ते रामनामशास्त्रहि उल्लंघिती । मग बळेंचि जपती ठोमनाम ॥४१८॥
ते ईश्वरभावें ठोम जपती । म्हणोनि मद्भक्त तव होती ।
परी वैष्णव न म्हणिजती । श्रुतिस्मृति उल्लंघनें ॥४१९॥
जया शास्त्र ठावेचि नाहीं । जे सद्भावें भजती शेषशायी ।
ते वैष्णव होतीच लवलाहीं । हें समर्थ पाहीं बोलिले ॥४२०॥ (य११पू.१०२)

समर्थ रामदास -

''नको कंठ शोषूं बहू वेदपाठीं । नको तूं पडूं साधनांच्या कपाटीं ॥
कसा कोण तो नेणवे आजपा रे । 'हरे राम' हा मंत्र सोपा जपा रे ॥१॥
नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी । चढे गर्व ताठा अभिमान पोटीं ॥

घडे कर्म खोटे बहू हा दगा रे । 'हरे राम' हा मंत्र सोपा जपा रे ॥२॥''
इतर कर्मावीण नामजप । फळे हाहि शास्त्रसंकल्प ।
म्हणोनि त्वदुक्त जल्प । नामधारका स्पर्शीना ॥४२१॥
यास्तव भक्तिरहित सन्निन्दा । तें पापचि परी जेवी सामान्यजननिंदा ।
तैसें न म्हणावें शिवविष्णुभेदा । जे सर्वथा अपराधामाजी टाकी ॥४२२॥
श्रुतिवाक्यावरी अविश्वास करण । हा सर्वथाचि अपराध जाण ।
अधिकारभेदें करून । व्यवस्था त्याची करावी ॥४२३॥
शास्त्र म्हणजे मन्वादि स्मृति । तदविश्वासीहि अपराधी होती ।
परी नामापेक्षां तयाप्रती । अधिकता निश्चितीं मानूं नये ॥४२४॥
मन्वादिक नाममहिमा न जाणती ।
ऐसी षष्ठ स्कंध तृतीयाध्याय टीकेंत श्रीधरोक्ति ।
म्हणोनि नाम सोडोनि निंदितां मन्वादि स्मृती । अपराधु होय ॥४२५॥
दिवसांतून एकादे वेळ म्हणे कृष्णगोविंदा । आणि अवघा वेळ करी
स्मृतिनिंदा । तोचि नामापराधा । माजीं पडे ॥४२६॥
जैसा मन्वादिस्मृति निंदणें अपराधू । तैसा नामाहूनि मन्वादि उक्तप्रायश्चित्त
मानणे महा अपराधू । तेणें नामीं अर्थवादू । कल्पना पडे म्हणूनी ॥४२७॥
ऐक सर्व अपराधाची समष्टि[२२३] । सद्गुरुवाक्याचा अविश्वास पोटीं ।
परी येथ गुरु तोचि कीं जो कृष्ण-धूर्जटी । नाम ओठीं सदा गाय ॥४२८॥
भलताही गुरु म्हणतां । तरी बळीनें शुक्र आज्ञा उल्लंघिली ऐसी कथा । तयाची
करावी कोण व्यवस्था । आणि भक्तेतर गुरुनिषेध सर्वथा शास्त्रीं असे ॥४२९॥
न ते विदुः स्वार्थगतिं हि विष्णुं दुराशया ये बहिरर्थमानिनः ।
अंधा यथान्धैरुपनीयमाना वागीशतंत्यामुरुदाम्निबद्धाः ॥३१॥

(भागवत स्कं.७ अ.५)

याचा अर्थ वामनानीं केला आहे तोच तुला सांगतो. (य११पू.१०३)
हे तो गुरु पापतरु म्हणावें । अंधाहुनी अंध तसे गणावे ।
दे प्रीति कृष्णीं गुरु तोचि साच । श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच ॥
गुरुविणें न मिळे परमा गति । गति शुकादि गुरूसचि मागती ।
परि गुरु करि अंतर राघवी । न गुरु तो ठक दांभिक लाघवी ॥ (वामन पंडित)

आणि पद्मपुराणीं तंव ऐसें वचन । कीं अवैष्णव गुरु त्यागावा मंत्र थुंकोन ।
तें तेथेंचि पहावें वाचोन । किंवा मीहि सांगेन पुढें कधीं ॥४३०॥
म्हणोनी येथ भक्तचि गुरु । तयाचा करितां अनादरु ।
तरी त्राता नाहीं ईश्वरु । येथ निर्धारु स्मृतीचा ॥४३१॥
यो गुरुः स शिवः साक्षात् यः शिवः स गुरुः स्मृतः ।
शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन ॥
अर्थ स्पष्ट आहे.
म्हणोनी गुरुवाक्यावरोनी । श्रद्धा न सोडावी विनोदेंहि करोनी ।
कीं न कळतांहि स्पर्शतां वन्हि । तो दाही हें निर्वाणी कवण न म्हणे ॥४३२॥
नामबळें विहित त्याग । तोहि अपराध होय चांग ।
निजकर्मार्पणें श्रीरंग । पुजावा हा विधि म्हणुनी ॥४३३॥
परी कीर्तन सांडोनी विहित करितां । तरी तोहि महापराधूचि तत्वतां ।
कीर्तनार्थ कर्म सोडितां । तो विहितत्याग सर्वथा अपराध नव्हे ॥४३४॥
येथहि आहे शास्त्रप्रमाण । तेहि ऐके सावधान ।
स्वयें बोलिले नारायण । स्वभक्तिमहिमान अति गोड ॥४३५ ॥
मत्कर्म कुर्वतां पुंसां कर्मलोपो भवेद्यदि ।
तेषां कर्माणि कुर्वन्ति तिस्त्रः कोट्यो महर्षयः ॥
मजवरी वारितां व्यजन । संध्यावेळ गेली टळोन ।
तरी तीनकोटी ऋषी आपुलें पुण्य । भगवद्भक्तार्पण होवो म्हणती ॥४३६॥
म्हणोनी माझिया भक्ता । नाहीं कर्माकर्मचिंता ।
तरी नामापराध विहितत्याग पाहतां । वेगळा आहे ॥४३७॥
ब्राह्मण नाम जपे वाणी । आणि बळेंचि जेवी अंत्यजसदनीं ।
गूफेड्याची[२२४] कन्या पर्णी । मुके घेऊनी सुखे रमे ॥४३८॥
विष्णुनाम जपे वाणी । आणि शिवावरी लाथा हाणी ।
कीं नामधारकाभिमानें शौच्यक्षणीं । उपवीतचि कानीं न ठेवी ॥४३९॥
मुखें म्हणतो वासुदेव । म्हणोनिच न करी वैश्वदेव । (य११पू.१०४) की
जेवितां नामग्रहणें व्रत घडे स्वयमेव । दाविना यास्तव नैवेद्यचि देवा ॥४४०॥
ऐसा ऐसा विहितत्याग । तो नामापराध बोलिला चांग ।

आतां निषिद्धाचार प्रसंग । नामापराध एक ॥४४१॥
परी देवासाठीं निषिद्धाचरण । तो नामापराध नोहेचि जाण ।
व्रजगोपीचें जारपण । नामापराध कोण म्हणे ॥४४२॥
बांधावया भगवत्सदन । मामाभाचे झाले जैन ।
हेममूर्ति चोरावया कारण । तया नामापराध कोण म्हणे ॥४४३॥
संतां घालावया भोजन । कबिरें चोरिलें अन्नसामान । केळ्याची साले विदुरकान्ता आपण । श्रीकृष्णास देतां नामापराध कवण म्हणे ॥४४४॥
यास्तव नामापराध निषिद्धवृत्ति । वेगळी आहे तियेची रीति ।
वैष्णवतीर्थ म्हणोनी शिवावरुती । आपुलेंचि पायवणी[२२५] घाली ॥४४५॥
कीं मुखें जपे शिवनाम । म्हणोनिच फोडी शालिग्राम ।
कीं नामबळें उन्मत्त सकाम । स्त्रियेसी मुखमैथुनचि करी ॥४४६॥
कां एकादेवेळीं घे नाम वाणीं । प्रवर्ते पुरुषगुदमैथुनी ।
किंवा मुखयोनि नासायोनि । आणि नामचि वाणीं मात्र जपे ॥४४७॥
कमरेस तातेचें कडसूत्र बांधोन । श्राद्धांत पितरा घाली भोजन ।
कीं नामबळें मदिरा मंत्रोन । तीर्थ म्हणोन बळेंचि पिये ॥४४८॥
इत्यादि निषिद्धवृत्ति । नाहीं तेचि आचरे रीति ।
द्वादशीस वांग्याची प्रीति । मुखें श्रीपति म्हणोनि गाजे ॥४४९॥
आतां शेवटचा अपराध नाम । मानणें इतर देवता सम ।
परी उमाधवरमाधवनाम । मानितां सम अपराध नोहे ॥४५०॥
शिवविष्णूची भेदबुद्धि । करितां होय अपराधी ।
यास्तव तन्नामसाम्यबुद्धि । होईल अपराधी कैसी ती ॥४५१॥
एवं राधा कृष्णनाम । अपराध नाहीं मानितां सम ।
शास्त्रप्रमाण परम । आहे म्हणुनी ॥४५२॥
विठ्ठलरुक्मिणीनामसमता । अपराध नाहींच सर्वथा ।
उमारमानामसमता । अपराध नाहीं ॥४५३॥
सद्गुरु आणि पुरुषोत्तम । यांचीं नांवें म्हणतां सम ।
अपराध नाहीं हें सांगतांचि परम । लाजे चित्त ॥४५४॥
किंवा गुरुहरिनामसाम्य मानिता । हा अपराधहि घडो तत्वतां ।
परी हरिनाम गुरुनामाहूनि मानितां । तो महापराधू ॥४५५॥
गुरुनाम मानितां हरिनामाहून । तो अपराध म्हणेना स्वयें भगवान । किंवा गुरुनाम हरिनाम समान । मानिता अपराध नाहीं येथ प्रमाण श्रुति ॥४५६॥
(य११पू.१०५)
गुरुर्दाता हरिर्देयस्तस्मादस्त्यधिको गुरुः ।
एतत्स्वसंहितायां वै शाण्डिल्यवचनं स्फुटम् ॥
असो साम्यनामापराध । कोणता तो ऐक सावध ।
यमनाम आणि गोविंद । म्हणतां समान अपराधू ॥४५७॥
यक्षिणी आणि राधिका । चुडेल आणि हिमकन्यका ।
इंद्र आणि वैकुंठनायका । सम म्हणणें देखा अपराधू ॥४५८॥
यद्यपि इंद्रादि नामें वैदिक । भगवन्नामेंचि असती सकळीक । तथापि कर्मीच तयांचा विनियोग सुरेख । जपीं साम्य मानितां दोख[२२६] उपजे ॥४५९॥
भूत आणि कर्पुरगौर । वेताळ आणि उमावर ।
कुंभकर्ण आणि चंद्रशेखर । मानितां समान तरी महापराधू ।४६०॥
चूर्णिका
उमारमाराधारुक्मिणीगोपीरहित सरस्वत्यादि शक्ति ।
सूर्य आणि गणपति । यांचीहि नामें उमापतिरमापतिसम म्हणतां ।
यद्यपि पंचायतन पूजका अपराध नाहीं तत्वता ।
तथापि श्रीशेषयोर्भेदधी विचारिता या द्विवचनार्था ।
अन्य नामसाम्या ये अपराधता । गुर्वविश्वासहि अपराध तत्वता ।
म्हणोनी तन्नामसाम्या नाहीं अपराधता ।
राधादि नामसाम्यीं दाविली शास्त्रप्रमाणता ।
तदपि माझिया संप्रदायीं सूर्यादि नामसाम्यता ।
अपराध नसोनिहि सर्वथा । उपेक्ष्य मानी ॥४६१॥
हरिहर आणि हरिहरभक्त । यांचे नामसाम्य जरी होत । तरी सर्व पार्षदनामसाम्य न वाटे चित्तांत । काम्यभक्तिविशेषसाध्यता म्हणुनी ॥४६२॥
अथवा सपार्षद हरिहरनाम । जरी मानिले सम ।
तरी शिवमेघःश्याम । मुख्यत्व आहे ॥४६३॥

एवं हें दिग्दर्शन होय । शहाणे जाणती सर्व सोय ।
यावरी आतां पुससी काय । कीं विगतसंशय जाहलासी ॥४६४॥
वादी म्हणे गजसंशय गेला । परी पुच्छसंशय आहे उरला ।
जरी चुकोनी नामापराध झाला । तरी तयाला उपाय कवण ॥४६५॥
सिद्धान्ती म्हणे कां कळत ना हें । बाळाचा अपराध मायचि साहे ।
तेवी नामापराधिया आहे । नामेंचि गती ॥४६६॥
नारदपुराणीं ऐसें वचन । कीं इतर क्षेत्रीचें पाप गहन । तें नाशे गंगास्नानेंकरून।
आणि गंगातटीं कृतपापाही गंगास्नानचि नाशी ॥४६७॥
तेवीं सर्व पाप नाम जाळी । आणि नामापराधाही नामेंचि होळी ।
वामनमत कीं वनमाळी । नाम गंगेहूनि श्रेष्ठ ॥४६८॥ (य११पू.१०६)

श्लोक (नामसुधा) -

''नामें स्फुरे तनु समग्र मनांत जेव्हां । मंदाकिनी पदनखांत दिसेल तेव्हां ॥
व्यापूनी नाम असणार समस्त अंगा । त्याची कशी सरि करी चरणांबु गंगा''
॥१॥

परी विष्णुतनुचि मंदाकिनी । हें बोलिले आहे नारदपुराणीं ।
द्रवरूप परब्रह्म म्हणोनी । केदारखंडीं बोलिले ॥४६९॥
यास्तव गंगा शिव मेघःश्याम । अपराध नाहीं मानितां सम ।
अपराध असेल तरी मजचि यम । दंडो इतरा न दंडो ॥४७०॥
असो नामापराधा नामचि तारक । ऐसें पद्मपुराणीं असती श्लोक ।
तेहि सार्थ सावध ऐक । चित्त एक करोनी ॥४७१॥

शौनक उवाच :-

श्रीप्रदं विष्णुचरितं सर्वोपद्रवनाशकम् ।
सर्वपापक्षयकरं दुष्टग्रहनिवारणम् ॥१॥
विष्णुसान्निध्यदं चैव चतुर्वर्गफलप्रदम् ।
यः शृणोति नरो भक्त्या चान्ते याति हरेर्गृहम् ॥२॥
नामोच्चारणमाहात्म्यं श्रूयते महदद्भुतम् ।
यदुच्चारणमात्रेण नरो यायात्परं पदम् ॥
तद्वदस्वाधुना सूत विधानं नामकीर्तने ॥३॥

सूत उवाच :-

श्रुणु शौनक वक्ष्यामि संवादं मोक्षसाधनम् ।
नारदः पृष्टवान्पूर्वं कुमारं तद्वदामि ते ॥४॥
एकदा यमुनातीरे निविष्टं शान्तमानसं ।
सनत्कुमारं पप्रच्छ नारदो रचिताञ्जलि : ॥५॥
श्रुत्वा नानाविधान्धर्मान् धर्मव्यतिकरांस्तथा ।

श्रीनारद उवाचः-

योऽसौ भगवता प्रोक्तो धर्मव्यतिकरो नृणाम् । (य११पू.१०७)
कथं तस्य विनाशः स्यादुच्यतां भगवत्प्रिय ॥६॥

श्रीसनत्कुमार उवाचः-

श्रुणु नारद गोविंदप्रिय गोविंदधर्मवित् ।
यत्पृष्टं लोकनिर्मुक्तिकारणं तमसःपरम् ॥७॥
सर्वाचारविवर्जिताः शठधियो व्रात्या जगद्वंचकाः ।
दंभाहंकृतिपानपैशुनपराः पापाश्च ये निष्ठुराः ।
ये चान्ये धनदारपुत्रनिरताः सर्वेऽधमास्तेऽपि हि ।
श्रीगोविंदपदारविंदशरणाः शुद्धा भवन्ति द्विज ॥८॥
तमपि देवकरं करुणाकरं स्थविरजंगममुक्तिकरं परम् ।
अतिचरन्त्यपराधपरा जना य इह तान्वपति धृव नाम हि ॥९॥
सर्वापराधकृदपि मुच्यते हरिसंश्रयः ।
हरेरप्यपराधान्यः कुर्याद्विपदपांसनः ॥१०॥
नामाश्रयः कदाचित्स्यात्तरत्येव स नामतः ।
नाम्नोहि सर्वसुहृदो ह्यपराधात्पतत्यधः ॥११॥

श्रीनारद उवाचः-

के तेऽपराधा विप्रेन्द्र नाम्नो भगवतः कृताः ।
विनिघ्नन्ति नृणां कृत्यं प्राकृतं ह्यानयन्ति च ॥१२॥

दश नामापराध

श्रीसनत्कुमार उवाचः-
सतां निंदा नाम्नः परममपराधं वितनुते ।
यतः ख्यातिं यान्तं कथमु सहते तद्विगर्हाम् ।
शिवस्य श्रीविष्णोर्य इह गुणनामादिसकलं ।
धिया भिन्नं पश्येत्स खलु हरिनामाहितकरः ॥१३॥
गुरोरवज्ञा श्रुतिशास्त्रनिंदनं तथाऽर्थवादो हरिनाम्नि कल्पनम् ।
नामापराधस्य हि पापबुद्धेर्न विद्यते तस्य यमैर्हि शुद्धिः ॥१४॥
धर्मव्रतत्यागहुतादिसर्वशुभक्रियासाम्यमपि प्रमादः ।
अश्रद्दधानो विमुखोऽप्यश्रुण्वन्यश्चोपदेशं शिवनामापराधः ॥१५॥
श्रुत्वापि नाममाहात्म्यं यः प्रीतिरहितोऽधमः ।
अहंममादिपरमो नाम्नि सोऽप्यपराधकृत् ॥१६॥
एवं नारद शंकरेण कृपया मह्यं मुनीनां परम् । (य११पू.१०८)
प्रोक्तं नाम सुखावहं भगवतो वर्ज्यं सदा यत्नतः ।
ये ज्ञात्वापि न वर्जयन्ति सहसा नाम्नोऽपराधान् दश ।
क्रुद्धामातरमप्यभोजनपराः खिद्यन्ति ते बालवत् ॥१७॥
अपराधविमुक्तो हि नाम्नि जप्तं सदाचर ।
नाम्नैव तव देवर्षे सर्वं सेत्स्यति नान्यतः ॥१८॥
श्रीनारद उवाचः-
सनत्कुमार प्रियसाहसानां विवेकवैराग्यविवर्जितानाम् ।
देहप्रियार्थात्मपरायणानां मुक्तापराधाः प्रभवन्ति नो कथम् ॥१९॥
श्रीसनत्कुमार उवाचः-
जाते नामापराधे तु प्रमादात्तु कथंचन ।
सदा संकीर्तयन्नाम तदेकशरणो भवेत् ॥२०॥
नामापराधयुक्तानां नामान्येव हरन्त्यघम् ।
अविश्रान्तिप्रयुक्तानि तान्येवार्थकराणि यत् ॥२१॥
नामैकं यस्य चिन्हं स्मरणपथगतं श्रोत्रमूलं गतं वा ।
शुद्धं वाऽशुद्धवर्णं व्यवहितरहितं तारयत्येव सत्यम् ।
तच्चेद्देहद्रविणजनितालोभपाखण्डमध्ये ।
निक्षिप्तं स्यान्न फलजनकं शीघ्रमेवात्र विप्र ॥२२॥
इदं रहस्यं परमं पुरा नारद शंकरात् ।
श्रुतं सर्वाऽशुभहरमपराधनिवारकम् ॥२३॥
विदुर्विष्ण्वभिधानं ये ह्यपराधपरा नराः ।
तेषामपि भवेन्मुक्तिः पठनादेव नारद ॥२४॥
नाम्नो माहात्म्यमखिलं पुराणे परिगीयते ।
ततः पुराणमखिलं श्रोतुमर्हसि मानद ॥२५॥
पुराणश्रवणे श्रद्धा यस्य स्याद्भ्रातरन्वहम् ।
तस्य साक्षात्प्रसन्नः स्याच्छिवो विष्णुश्च सानुगः ॥२६॥
यत्स्नात्वा पुष्करे तीर्थे प्रयागे सिंधुसंगमे ।
तत्फलं द्विगुणं तस्य श्रद्धया वै श्रुणोति यः ॥२७॥
ये पठन्ति पुराणानि शुण्वन्ति च समाहिताः ।
प्रत्यक्षरं लभन्त्येते कपिलादानजं फलम् ॥२८॥ (य११पू.१०९)
अपुत्रो लभते पुत्रं धनार्थी लभते धनम् ।
विद्यार्थी लभते विद्यां मोक्षार्थी मोक्षमाप्नुयात् ॥२९॥
ये श्रुण्वन्ति पुराणानि कोटिजन्मार्जितं खलु ।
पापजालं तु ते हित्वा गच्छन्ति हरिमंदिरम् ॥३०॥
पुराणवाचकं विप्रं पूजयेद्भक्तिभावतः ।
गोभूहिरण्यवस्त्रैश्च गंधपुष्पादिभिर्मुने ॥३१॥
कांस्यैर्विनिर्मितं पात्रं जलपात्रं मुदान्वितः ।
कर्णकुण्डलकं चैव मुद्रिकां स्वर्णनिर्मिताम् ॥३२॥
आसनं तु तथा दद्यात्पुष्पं माल्यं तपोधन ।
वित्तशाठ्यं न कुर्वीत दानं हीनफलं यतः ॥३३॥
पुराणं वाचयेद्विप्र सर्वकामार्थसिद्धये ।
सुवर्णं रजतं वस्त्रं पुष्पमाल्यं तु चंदनम् ।
दद्याद्यः पुस्तकं भक्त्या स गच्छेद्धरिमंदिरम् ॥३४॥
कुर्वन्ति विधिनानेन संपूर्णं पुस्तकं च ये ।

तेषां नामानि लिम्पेत चित्रगुप्तोऽर्चनाद्द्विज ॥३५॥ (पद्मपुराण ब्रह्मखंड अ. २५)

महापराध

या सकल श्लोकांचा अर्थ । संस्कृतवेत्ते जाणती समर्थ ।
वरी मी बोलिलो प्राकृत । तदनुकूलचि निश्चये आहे ॥४७२॥
परी एक अपराध यांत विशेष । ऐकोनी नाममाहात्म्यास ।
जयाचे प्रीतियुक्त नोहे मानस । तो निःशेष अपराधू ॥४७३॥
याची नाहीं अन्यत्र गति । म्हणोनिया महापराध म्हणती ।
आणिकही अपराध या अध्यायान्तीं । दाविले ते समजती स्पष्टचि ॥४७४॥
अपराधियांहि नामचि गति । हे बोलिले याचि अध्यायान्तीं ।
एवं नाममाहात्म्य श्रुतियुक्ति । प्रमाणें तुजप्रति सांगितले ॥४७५॥
तंव वादी म्हणे शांडिल्य ब्राह्मण । परस्त्रीगामी परि करी हरिपूजन ।
तयातें कां नरक भोगून । नंतर झाले वैकुंठ ॥४७६॥
नामें अजामिळ तरला । देवें शांडिल्य कां उपेक्षिला ।
सिद्धान्ती म्हणे अवधानाला । दृढ ठेवी ॥४७७॥
नामीं नाहीं शौचाऽशौच । पूजेस पाहिजे सदा शौच ।
आणि पूजा विकल्पवाक्य[२२७] । बोलिली आहे ॥४७८॥ (य११पू.११०)
अहोरात्रं हरेर्नाम कीर्तयन्ति च ये नराः ।
कुर्वन्ति हरिपूजां वा न कलिर्बाधते च तान् ॥९२॥ (नारदपुराण अ. ४१)
पूजन धर्म द्वापराचा । कलीं युगीं विकल्प त्याचा ।
समुच्चय नामस्मरणाचा । स्पष्ट बोलिला ये श्लोकीं ॥४७९॥
पूजा ती तंव क्रिया जाण । नाम वस्तुमाहात्म्यें करी पापहरण ।
यालागीं हरिपूजेहून । नाम वरिष्ठ संत म्हणती ॥४८०॥
''मधुपर्कादिक विधान । सांग केले जें पूजन ।
तेहि मानोनिया गौण । आवडे कीर्तन कलीयुगीं कृष्णा ॥३४५॥''

(एकनाथी भागवत अ. ५ श्लो. ३२)

एवं श्रीएकनाथ वचन । कलींतीलहि तंत्रोक्त पूजेहून ।
श्रेष्ठ आहे नामस्मरण । निश्चयेचि ॥४८१॥
पूजेवरी दृष्टि । आणि परदारागमनीं तुष्टि ।
येणें शांडिल्यासी गोमटी । नरक प्राप्ति ॥४८२॥

अभंग

नाम घेता वाया गेला । ऐसा नाहीं आयकिला ॥१॥
सांगा विनवितो तुम्हासी । संत महंत सिद्ध ऋषी ॥२॥
नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडोन ॥३॥
सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ॥४॥ (गाथा-१८३७)

इत्यादि महात्म्यांची वचनेंहि प्रमाण आहेत.

आणखीहि नामाचा महिमा । संमत आहे पुराण निगमा ।
वेदमार्ग बहिष्कृता परमा । नामसीमा तरावया ॥४८३॥
वेदमार्गबहिष्ठानां जनानां पापकर्मणाम् ।
मनःशुद्धिविहीनानां हरिनाम्नैव निष्कृतिः ॥१०५॥ (नारदपुराण अ. ४१)
नामाचें वस्तुमाहात्म्य अगाध । ये श्लोकीं बोलिले प्रसिद्ध ।
वेदमार्गबहिष्कृत अशुद्ध । तोहि नामें साच तरे ॥४८४॥
''आचारहीनं न पुनन्ति वेदा'' इति । स्वयें सांगत आहे स्मृति ।
आणि नाम तंव वेदबहिष्कृता तारिती । ते अगाध रीति माहात्म्याची ॥४८५॥
वेदविरुद्ध सांख्यादि स्मृति । सूत्रकार भाष्यकार खंडिती । (य११पू.१११) परी
वेदरहितासहि तारका नामाप्रति । संग्रहिती विष्णुसहस्रनामीं तद्भाष्यी ॥४८६॥
म्हणोनी भगवन्नामाविषयीं । आशंकेते अवकाश नाहीं ।
पापकर्मी जनाहि । नामचि एक तारक ॥४८७॥
ज्ञानासी अधिकारी होय तेव्हां । चित्तशुद्धि कर्मे होय जेव्हां ।
चित्तशुद्धि नसताहि नामसेवा । करिता अनुभवा पावतु ॥४८८॥
चिताग्नि म्हणोनी लाविता तृणा । तरी तो काय घे शक्ति न्यूना ।
पाप उपमिले आहे तृणा । नाम उपमिले वन्हीते ॥४८९॥
म्हणोनी प्रवेशेना उदकोपमा । उक्तगतिपरंपरा आगमा ।
यालागीं बोलिजे भगवन्नामा । वस्तुसामर्थ्ये शुद्धिकर ॥४९०॥
कलियुगीं कर्मे सांग । यत्न केलियाहि न होती चांग ।
पंचमहापातकीसंसर्ग । पातक बोलिले ॥४९१॥
तो तंव कलींत वारणें अवघड । यालागीं हरिनामचि उघड ।

महापातकाचे धोंड । विचूर्ण करी ॥४९२॥
तेहि सांगतू आहे श्लोकें । श्रोतीं अवधान द्यावे निके ।
हरिभजनाविण आणिके । क्षण जाती ते महामृत्यु ॥४९३॥
दैवाधीनं जगत्सर्वमिदं स्थावरजंगमम् ।
यथाप्रेरितमेतेन तथैव कुरुते द्विज ॥१०६॥
शक्तितः सर्वकर्माणि वेदोक्तानि विधाय च ।
समर्पयेन्महाविष्णौ नारायणपरायणः ॥१०७॥
समर्पितानि कर्माणि महाविष्णौ परात्मनि ।
संपूर्णतां प्रयान्त्येव हरिस्मरणमात्रतः ॥१०८॥
हरिभक्तिरतानां च पापबन्धो न जायते ॥
अतोऽतिदुर्लभा लोके हरिभक्तिर्दुरात्मनाम् ॥१०९॥
अहो हरिपरा ये तु कलौ घोरे भयंकरे ।
ते सुभाग्या महात्मानः सत्संगरहिता अपि ॥११०॥
हरिस्मरणनिष्ठानां शिवनामरतात्मनां ।
सत्यं समस्तकर्माणि यान्ति संपूर्णतां द्विज ॥१११॥
अहोभाग्यमहोभाग्यं हरिनामरतात्मनाम् ।
त्रिदशैरपि ते पूज्याः किमन्यैर्बहुभाषितैः ॥११२॥
तस्मात्समस्तलोकानां हितमेव मयोच्यते ।
हरिनामपरान्मर्त्यान्न कलिर्बाधते क्वचित् ॥११३॥ (य११पू.११२)
हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम् ।
कलौ नास्त्यैव नास्त्यैव नास्त्यैव गतिरन्यथा ॥११४॥ (नारदपुराण अ. ४१)
दैवाधीन आघवे जग । तथापि दयार्द्र रमारंग ।
तो दैवामाजींहि प्रसंग । तरणीयाचा करी ॥४९४॥
जीवाचिया पापवृत्ति । साक्षी प्रकाश न लोपे निश्चिती ।
तैसे जीव सांपडलीया दैवावरुती । भगवान् दया लोपवीना ॥४९५॥
व्यष्टिप्रारब्धाचें फळ । सुखें दुःखें येती पळ पळ ।
समष्टिप्रारब्धाचें फळ । कृतत्रेतद्वापारकलियुगादि ॥४९६॥
व्यष्टिदैव व्यष्टिप्रयत्नीं । जय होय व्यष्टिप्रयत्नी ।



परी समष्टिदैवी निर्वाणी । दैवजय ॥४९७॥
यास्तव दैवप्रेरणें जीव जाती । परी निष्कामे जें भगवद्भक्ति ।
करिती तया समष्टिदैवनियति । कल्पांतीं बाधूं न शके पैं ॥४९८॥
म्हणोनी कलियुग प्राप्त जाहला । तेणें वेदधर्म बुडविला ।
आतां निष्कृति नाहीं आम्हाला । ऐसी ग्लानि न कीजे ॥४९९॥
वैरियाहि निजपददानी । यास्तव पक्षपातरहित दयाळु चक्रपाणि ।
तो जीव पडलिया दैवसंधानीं । निजनामगुणीं कर्षतु ॥५००॥
म्हणोनि सकलाहि कर्मा । अर्पणे लागे पुरुषोत्तमा ।
भावे जपलिया रामनामा । न्यून कर्मा पूर्णता ॥५०१॥
अहो जाहलिया हरिनामपर । सत्संगरहितहि ते पवित्र ।
कलिमाजीं दुस्तर । सत्संग म्हणोनी । ॥५०२॥
नास्तिक पाखंडी अनीश्वरवादी । वामपंथादि महमदी ।
तयासी न मिळे असताहि प्रसिद्धि । भगवद्भक्ति ॥५०३॥
यालागीं सुधासिंधुनवनीत । आधीं सेवा याहो महंत ।
जंव काकश्रेणिकुमत[२२८] । स्पर्शले नाहीं ॥५०४॥
म्हणोनिया निर्गर्व । सांडोनि वासना सर्व ।
नित्य साधावे हरिनामपर्व । सांगितले हें ॥५०५॥
तंव वादी म्हणे अमुप । नामें जळत आहे पाप ।
संचित आगामी कीं प्रारब्धरूप । सकल सांगा ॥५०६॥
सकल कर्मे जळती जरी । नामें काम्यहि फळ लाहे तरी ।
मग उगें कां नामधारी । घोर संसारी चरफडती ॥५०७॥
एकासी खावया न मिळे अन्न । एकाचें न वाढे संतान ।
येथ श्रद्धा म्हणाल जरी कारण । तरी वस्तुमाहात्म्य बुडाले ॥५०८॥
तैं सिद्धान्ती म्हणे देऊनी टाळी । नामें संचिताची होय होळी ।
क्रियमाण भोगाची पाळी । नयेचि कदा ॥५०९॥ (य११पू.११३)
अभंग -
तुटे भवरोग । संचित क्रियमाण भोग ॥१॥
ऐसे विठोबाचें नाम । उच्चारिता खंडे जन्म ॥२॥

**वसो न सके पाप । जाय त्रिविध तो ताप ॥३॥**
**तुका म्हणे माया । होय दासी लागे पाया ॥४॥** (गाथा अभंग १८८९)

अभंगांतील मायाशब्द विक्षेपरूप प्रारब्ध सुचवितो, व ''तुटे भवरोग'' हे वाक्य नामानुषंगिक ज्ञानानें आवरणनिवृत्ति सुचविते.

**मागील जाती प्रमादोष । पुढें नाहीं गर्भवास ।**
**हे सर्व बोलिले देहूनिवास । तुकाराम स्वामी ॥५१०॥**
**प्रारब्ध लागे भोगणें । परी ते कष्टतर नामाविणें ।**
**नामें प्रारब्धहि होय उणें । दृष्टिसृष्टिवादीय[२२९] क्षणें नव देहयोगें ॥५११॥**
**नामधारकाच्या छाया । पवित्र होय कुंभिनी-काया[२३०] ।**
**म्हणोनी प्रारब्ध ठेवणें राया । उचित वाटे तयांचे ॥५१२॥**
**नामधारकांच्या शरीरीं । दैवे दुःख दिसे अवसरी ।**
**परंतु तेथ विरहोपलालनें हरी । सांपडे म्हणोनी उपयोगी ते ॥५१३॥**
**दुःख ते देईल सर्व सुखफळ । ऐसे श्रीतुकाराम वदले प्रांजळ ।**
**यालागीं नामधारक प्रेमळ । नोहे चंचल दैववशें ॥५१४॥**
**प्रथम नाम घेती । आणि पुढें अविश्वासें टाकिती ।**
**तरी जैसी श्रद्धा तैसी गति । नामचि दे त्यां ॥५१५॥**
**आणि बहु दीर्घकाळें जन्मांतरीं । पुढें तेंचि नाम तारी ।**
**नाम घेतले निर्धारी । अन्यथा नोहे ॥५१६॥**
**आतां सकाम जे होती । ते नामें संसार वांछिती ।**
**तेहि मिळो शके तयाप्रति । परी श्रद्धा चित्तीं दृढ नाहीं ॥५१७॥**
**सकामाचा कर्मपाक । स्वयें परिक्षी विश्वपालक ।**
**हें त्रिपुरारहस्यीं सम्यक । बोलिले आहे ॥५१८॥**
**किंवा जयाची श्रद्धा जैसी । देव दृढ करिती तैसी ।**
**स्वयें बोलिले हृषीकेशी । गीतेमाजीं ॥५१९॥**
**घडी वाटें नामें कार्य होईल । घडीत वाटे न होईल ।**
**तरी तो संशयचि राहील । निज प्रमादे ॥५२०॥**
**बोलिलासी वस्तुतंत्रासी कांहीं । श्रद्धेची अपेक्षा नाहीं ।**



**तरी हे बोल सर्वही । बोलता फोल जाहले ॥५२१॥**

माझा अनुभव

**वस्तुतंत्र ब्रह्मज्ञान । तेहि फळ न दे श्रद्धेविण ।**
**हे मी म्हणे बळेंकरून । अनुभव म्हणोनी मजलागीं ॥५२२॥**
**श्रद्धेवांचुनि अहंब्रह्म प्रतीति । तरी फळ होईल सकलाप्रति । (य११पू.११४)**
**तरी वेदान्त वाचुनि जे खंडण करिती । तयासीहि वेदान्तफळ होवावे ॥५२३॥**
**शब्दाचा अर्थ समजल्याविण । कदापि घडो न शके खंडण । आतां म्हणाल ते**
**अयोग्य खंडण । तरी अन्ययुक्तिसमुच्चयेंकरून[२३१] मीहि म्हणे ॥५२४॥**
**युक्तिअनुभवदृष्टीं पाहता । तें खंडण अयोग्य सर्वथा ।**
**परी समजावयास शब्दार्था । तया खंडक-चित्ता[२३२] चुकी नसे ॥५२५॥**
**म्हणाल शब्दार्थ जरी समजला । तरी पाहिजे विचार केला ।**
**तंव विचारही आक्षेपिला[२३३] । ऐसाच कां न कीजे ॥५२६॥**
**शमदमादि संपत्तींत । श्रद्धाहि गणिली साधनांत ।**
**विचारे वस्तुतंत्र कळत । ज्ञान जरी ॥५२७॥**
**तरी नामाची तैसीच गति । पाप केवि नाशे शब्दशक्ति ।**
**श्रवणेंहि पाप नाशती । श्रोतयांचे ॥५२८॥**
**म्हणोनी तया नाहीं क्रियासाम्यता । म्हणाल नाम न राहे क्रिया सोडिता ।**
**तरी भलतिया नामाची आरोपिता । न घडे हरिनामीं ॥५२९॥**
**अश्रद्धेनेंहि घेता नाम । तरी सकल पातक करी भस्म ।**
**ऐसे पुराणीं ऋषिसत्तम । बोलिले आथी ॥५३०॥**
**जया देवतेचिया नांवा । आहे शास्त्रवचनठेवा ।**
**त्या देवतेचा उपासक बरवा । तें फळ पावे तन्नामें ॥५३१॥**

स्वतःबद्दल

**आम्हासी हरिहरनामीं आवडी । माझी तंव नामावरीचि उडी ।**
**मजसमान पापें कोडी । कर्ता नाहीं त्रिजगतीं ॥५३२॥**
**परी नामाचेंनि बळें । अंगिकारिले विश्वस्नेहाळे ।**
**दैवे डोळे करितांहि आंधळें । मति देऊनि व्रजपाळे रक्षिले ॥५३३॥**

गुरु भेटले श्रीमंत । परी संकोचित प्रेम तेथ ।
श्रीकृष्णनामीं आवडी बहुत । आतां सुचवितील पंथ श्रीगुरु वा हरि ॥५३४॥
श्रीमंते मज मंत्र दिधला । भय-संवलित प्रेमें जपतो मी तयाला ।
परी कृष्णनामीं मना लागला । वाटे अनुछंदु ॥५३५॥
म्हणोनी श्रीगुरुराये श्रीमंतें । शास्त्रीं बोलिले तेचि चित्तें ।
सामान्य तथापि आवडी पंथें । घेवोनि चाललो ॥५३६॥
येथ सकळहि माझे हित । करोत आळंदीनाथ समर्थ ।
अपराधी लेकरू उपेक्षित । नाहीं जननी ॥५३७॥
"तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चितांचे ।
जे नामचि नाहीं पापांचे । ऐसे केले ॥१९७॥
यमदमा अवकळा आणिली । तीर्थे ठायावरूनी उठविली ।
यमलोकांची खुंटली । राहाटी आघवी ॥१९८॥
यम म्हणे काय यमावे । दम म्हणे कवणाते दमावे ।
तीर्थे म्हणती काय खावे । दोष औषधासी नाहीं ॥१९९॥ (य११पू.११५)
ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाची दुःखें ।
अवघे जगचि महासुखें । दुमदुमित भरले ॥२००॥
ते पहांटेविण पहावित । अमृतेविण जीववित ।
योगेविण दावित । कैवल्य डोळा ॥२०१॥
परि राया रंका पाड धरूं । नेणती सानेया थोरा कडसणी करूं ।
एकसरे आनंदाचे आवारु । होत जगा ॥२०२॥
कांहीं एखादेनि वैकुंठा जावे । तिही वैकुंठचि केले आघवे ।
ऐसे नामघोष गौरवे । धवळले विश्व ॥२०३॥
तेजें सूर्य जैसे सोज्वळ । परी तोहि अस्तवे हे किडाळ ।
चंद्र संपूर्ण एकादे वेळ । हें सदा पुरते ॥२०४॥
मेघ उदार परी ओसरे । म्हणवुनी उपमेसी न पुरे ।
हे निःसंशकपणें सपांखरे । पंचाननू ॥२०५॥
जयाचे वाचेपुढा भोजे । अखंड नाम नाचतसे माझे ।
जे जन्मसहस्रीं ओळगिजे । एक वेळ यावया ॥२०६॥
तो मी वैकुंठीं नसे । वेळ एक भानु बिम्बींहि न दिसे ।
वरी योगियांचीं मानसे । उमरडोनी जाय ॥२०७॥
तरी तयापाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ।
जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥२०८॥
कैसे माझ्या गुणीं धाले । देशकाळाते विसरले ।
कीर्तनसुखें सुखावले । आपणपांचि ॥२०९॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामांचे निखिल प्रबंध ।
माजी आत्मचर्चा विशद । उदंड गाती" ॥२१०॥ (भावार्थदीपिका अ.९ श्लो.१४)
या गुरुवचनांचा अर्थू नेटका । वादीच्या सकळ हरपती शंका ।
स्मरणकीर्तनसुखा । हेंचि फावे ॥५३८॥
आणि "हरि मुखें म्हणा हरि मुखे म्हणा" इत्यादि हरिपाठ ।
अवघाचि दाखवि नामवाट । हा गुरुवाक्य मंदाकिनीपाट ।
मजसम गुरुमंत्रापराधीहि अचाट पवित्र करो ॥५३९॥
निर्गुणीं धरावी प्रीति । तंव अभिमान वाढे चित्तीं ।
स्थिर नोहे अव्यक्तीं वृत्ति । व्युत्थानप्राप्ति अखंड ॥५४०॥
सगुणाचें करावें ध्यान । तरी विकारें भरे अंतःकरण ।
शरीर मन अक्षय मलीन । कैसे आलिंगन द्यावे देवा ॥५१४॥
म्हणोनी नामीं अखंड प्रीति । नामचि माझी अंतिम गति ।
किंबहुना प्रियकर पति । नामचि माझा ॥५४२॥
नामचि माझे जीवन । नामचि माझा प्राण । नामें समाधि लागतां पूर्ण ।
तरी सगुण निर्गुण एकवटती ॥५४३॥ (य११पू.११६)
क्रिया फळीं सरे । नाम घेता नामीं उरे ।
स्फोटवर्णादि नित्यत्वे वस्तुतंत्र खरें । ज्ञानसम नाम ॥५४४॥
कर्मी आरोप न घडे अन्यथा । नामीं आरोप घडे भाषांतर करिता ।
ज्ञानींहि आरोप घडे तत्वता । ब्रह्मोपासन ॥५४५॥
आरोप घडे ज्यावरी । ते अधिष्ठान वस्तुतंत्र गा निर्धारी ।
यालागीं अवधारी । वस्तुतंत्र नाम ॥५४६॥
म्हणाल नाम नित्य ब्रह्म नित्य । तरी द्वैत होईल सत्य । तरी हे नोहे जैसे अज्ञान

नाशीं असत्य । परी नाम त्याहोनी सत्य हरिरूपीं मिळे ॥५४७॥
मी आपुलियाकडे पाहता । तरी कवणिया वचनें आळवू अनंता ।
आघवीच अपात्रता । दिसे डोळा ॥५४८॥
करुणा भाकावी प्रेमें करोनी । तंव डोळिया नयेचि पाणी ।
तेथ बाहता[२३४] श्रमलो म्हणोनी । तरी आघवे खोटे ॥५४९॥
प्रेमाविण परमेश्वरीं । सत्ता चालविता पुरी ।
ते चित्रगुप्त लिहिती पत्रीं । यमाचें अग्रीं सांगावया ॥५५०॥
यालागीं एक आधार । मज कृष्ण विष्णु शार्ङ्गधर ।
उमानाथ शशिशेखर । करुणाकर आळंदिपति ॥५५१॥
मलत्यागींहि न विसंबावा कर्मठपणें करोनी । ऐसी समर्थ रामदासवाणी ।
नाम जपवो मज कडूनी । भलते स्थानीं समाधि वरी ॥५५२॥
म्हणाल सकळा सुलभ नाम । तरी मीहि म्हणे सकळा मुक्ति सम ।
द्वैताविण गुरुशिष्य होता ब्रह्म । तुझें कवण वर्म दुखवी तेथें ॥५५३॥
शापादि भयंकर कर्मा । ते बाधूं न शकती नामा ।
तपें शापसामर्थ्य वाक्सिद्धिमहिमा । ते तपहि नामा नमन करी ॥५५४॥
दीनांचे वचन पाळी भगवंत । म्हणोनी तिहीं कालीं नाम समर्थ ।
कवणाचाहि शाप तया प्रत । बाधूं न शके कल्पान्तीं ॥५५५॥
शाप लागला गायत्रीपाठीं । विप्रा शापमोचन करणें परिपाटी ।
अंबरीषाचा दुर्वासशाप जगजेठी । नामासाठीं निवारी ॥५५६॥
शिवपुराणीं वायुसंहितेंत । उत्तर भागीं द्वादशाध्यायांत ।
मंत्रजपीं प्रमाद होता स्मरावे मजप्रत । हें उमेसी उमाकान्त सांगे ॥५५७॥
म्हणोनी मंत्रजपाहूनी नाम । मज वाटे उत्तम ।
तैसे गुरूपदेशादि धर्म । घेता नाम न विशेषु ॥५५८॥
स्कंदपुराणीं ब्रह्मोत्तरखंडी । प्रथमाध्यायीं सूताचें तोंडीं ।
नोपदेशश्च ही वाक्यभंडीं[२३५] । नामीं लावणें सांगतू ॥५५९॥
उपदेशाविण नाम घेता । तरी फळ न चुके सर्वथा ।
परी उपदेशे तेचि घेता । सुसिद्धता शीघ्रतर ॥५६०॥ (य११पू.११७)
नामासी नाहीं काळ वेळ । 'न कालो' हे वचन तेथेंचि सबळ ।



शिवपुराणींहि उज्वळ । दंश याचा ॥५६१॥
म्हणाल कीं नाम सुलभ म्हणोन । न जाये त्याचे अर्थवादपण ।
जे जे सुलभ ते स्तावक[२३६] जाण । संशय नाहीं ॥५६२॥
तरी अतिकठीण जे धर्म । तेहि जीवासी न होती परम ।
मध्यमाचा जरी नियम  तरी शक्त्यनुसार जाहला ॥५६३॥
कलींत जीवाच्या न्यून शक्ति । यालागीं नाममाहात्म्य नोहे स्तुति ।
कठीण धर्म तरी वैदिकाप्रति । तप्तशीलारोहणादि असती जैन ॥५६४॥
वेदान्तीं शारीरक ब्रह्मसूत्र । तेथ निरूपण कीं श्रुति देव करी लीलामात्र ।
ते लीला मायानुसार । त्रिविध होय ॥५६५॥
रजोगुणें कर्माधिकार । तमोगुणें पाखंडाधिकार ।
सत्त्वोपहित लीला सर्वत्र । समानचि आहे ॥५६६॥
तांत्रिकधर्म वेद-निर्मिला । तंत्रीं वैदिक उपेक्षिला ।
परी वेदीं तंत्रीं मिळोनी रक्षिला । भगवन्नाममाहात्म्यधर्मू ॥५६७॥
जरी ''विष्णोर्नाम न गृह्णीयात्'' इति । तंत्रामाजी  असती उक्ति ।
तरी त्या तंत्रीं गायिली महती । शिवनामाची ॥५६८॥
म्हणोनिहि तंत्रवाक्यें । न होती नाममाहात्म्यहारके ।
इष्टदेवताप्रेमवर्धके । होती मात्र ॥५६९॥
विष्णुनाम घेऊं नये म्हटले जेथ । ते बोलिले वाममार्गीयार्थ ।
परी मद्यानें विष्णुतर्पण वाममार्गीयाप्रत । बोलिले आहे ॥५७०॥
म्हणोनी नाममाहात्म्य संकोच नाही । आणि कर्मवर्धक लीला म्हणावी तरीहि।
नाममाहात्म्य कां नाहीं । भक्तिवर्धक लीला । ५७१॥
लीला रागें[२३७] जैन म्हणती । तरी दयालु अर्हन्त[२३८] बल असोनी जना कां न तारिती । यालागीं भगवन्नामप्रतीति । अन्यथा नोहे ॥५७२॥
अशौच ते बाधी आणिका अक्षरा । नाम घेता तरे निदसुरा ।
हे तुकारामवाणी सुंदरा । नाममाहात्म्यीं प्रमाण ॥५७३॥
अभंग १८६६ –
मंत्रचळे पिसे लागते सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ॥१॥
अशौच ते बाधी आणिका अक्षरा । नाम निदसुरा घेता तरे ॥२॥

रागज्ञान घात चुकता होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक ॥३॥
आणिका भजना बोलिला निषेध । नाम ते अभेद सकळामुखीं ॥४॥
तुका म्हणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरोनी गेली नामें ॥५॥
(य११पू.११८) तंव वादी म्हणे निज निज कर्मे । जगन्नियमिजे पुरुषोत्तमें ।
हे श्रुति सांगे तरी नामें । केवि तारे भगवंतू ॥५७४॥
तंव सिद्धान्ती म्हणे नाम । हो ना तुझे मतीं कर्म ।
श्रुतिचि सांगे हा धर्म । म्हणोनिया ॥५७५॥
महाभारतीं आणि धर्मसिंधूंत । प्रमाण आहे कीं साधनजात । पुरुषार्थचतुष्टयीं जे बोलिले विख्यात । ते नसूनिहि पावे पुरुषार्थ भगवद्भक्त ॥५७६॥
या वै साधनसंपत्तिः पुरुषार्थचतुष्टये ।
तया विना तदाप्नोति नरो नारायणाश्रयः ॥
तंव वादी म्हणे भले केले । अवघियासी पाप करावयासी सांगितले ।
नाममाहात्म्य प्रशंसिले । मूर्खाचिये परी ॥५७७॥
सिद्धान्ती म्हणे तूं त्वत्पिता आजा । मूर्खासमान पैजा ।
परी तुज अनेक वेळ सहजीसहजा । बोलिलो हें समाधान ॥५७८॥
आतां स्पष्टचि मी सांगे सकळासी । आज्ञा देतो महत्पापें करावयासी ।
परी अनन्य असावे नामासी । नामाविण अन्यासी आतळूं(२३९) नये ॥५७९॥
नाम घेऊनी करावी चोरी । परी चोर येतां आपणावरी ।
नामावांचुनि निर्धारी । इतर शस्त्र घेऊं नये ॥५८०॥
आपल्या रक्षणीं इतरांचे काम । दुसऱ्यासी पीडिता दाखवी नाम ।
तथापि तयासीहि शिक्षा पुरुषोत्तम । स्वयें देत परी यम न दंडी ॥५८१॥
अनन्य जो कां नामासी । पाप करिता पाप नाहीं त्यासी ।
नामदंभ करी त्यासी । भगवंत शिक्षी तयातें ॥५८२॥
पद्मपुराणीं ऐसें वचन । कीं ईश्वरापराधी जे जन ।
तया भगवंतचि करी शिक्षण । यमाचा अधिकार नाहीं तेथें ॥५८३॥
मन्नामरुद्राक्षविभूतिधारणो ममाग्रतो यस्तु पुराणवक्ता ।
सर्वेषु पापेष्वपि तेषु सत्सु प्रशास्म्यहं नैव यमाधिकारः ॥४४॥

(पद्मपुराण पातालखंड अ.१०७)

शिव सांगे यमदूताते । माझिया भक्ता यावया तुमचिया येथें ।
अधिकार नाहीं निश्चिते । कवणिये वेळे ॥५८४॥
माझे मुखीं नाम । आणि आंगीं रुद्राक्ष भस्म ।
तो जरी महापापीं पापोत्तम । तरी यम तया बांधूं न शके ॥५८५॥
राजपुत्रें अपराध केला । तरी राजाच दंडी तयाला ।
इतर प्रजेस नाहीं बोलिला । अधिकार तेथ ॥५८६॥ (य११पू.११९)
शिव तोचि विष्णु म्हणून । शैवा तेचि वैष्णवा कारण ।
तुकारामहि आपण । बोलिले हेंचि ॥५८७॥

तुकारामांचा अभंग १२४९ -

प्रीति नाहीं राया वर्जिली ती कांता । परी तिची सत्ता जगावरी ॥१॥
तैसे दंभे झालो जरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहती ॥२॥
राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिका दंडवेल ॥३॥
बहात्तरी खोडी परी देवमण कंठीं । तैसा जगजेठी म्हणे तुका ॥४॥
आतां हृदयाचार्यचरणवचन । जे श्रुतिशिरःप्रमाण ।
ते ऐकोनी भगवत्स्मरण । कुतर्क सांडोनी करावे ॥५८८॥

ज्ञानेश्वरांचा अभंग २७७ -

तत्त्वमस्यादि वाक्यउपदेश । नामाचा अर्धांश नाहीं तेथें ॥१॥
म्हणोनि नामसंकीर्तन करिता । जवळी जोडलासी आतां ।
क्षणुभरी न विसंबे जीवाचिया जीवना रया ॥२॥
नाम निज धीर गर्जती वैष्णव वीर ।
कळिकाळ यमाचे भार पळाले तेथे ॥३॥
म्हणोनी नाम वज्रकवच तोचि निर्गुणाचा अभ्यास ।
पाहें पा स्वयें प्रकाश विचारोनी ॥४॥
ऐसें सुंदर रुपडे हृदयीं धरिले आतां ।
पाहता केवि होय पूर्ण योनि रया ॥५॥
ऐसा सकळा अकळ कळला । हृदयीं धरिला समता बुद्धि ॥६॥
बाप रखुमादेविवरु विठ्ठलु चिंतिता । तुटली जनांची व्याधि रया ॥७॥
पूर्वीच सांगितले सर्व । वस्तुतंत्र हरीचें नांव ।

यालागीं जैसा भाव । तो तैसाचि होय ॥५८९॥
आतां महावाक्य उपदेश श्रेष्ठ । कीं नाम एक वरिष्ठ ।
येथ विचार स्पष्ट । उत्पन्न होय ॥५९०॥
वेदान्ताचा सिद्धान्त । ज्ञानचि सर्व कर्माचा अंत । आणि
''सर्वं कर्माऽखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते'' हें भगवंत । बोलिले ॥५९१॥
परी ''ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा मद्भक्तिं लभते'' इति ।
देवचि सांगती ज्ञानोत्तर भक्ति । आणि ज्ञानोत्तर भक्ति विषयीं श्रुति ।
मिया अनेक निज ग्रंथीं उदाहरिल्या ॥५९२॥
नामहि वस्तुतंत्र । आणि ज्ञानहि वस्तुतंत्र ।
दोन्ही झालिया स्वतंत्र । द्वैत होय ॥५९३॥
म्हणोनी महावाक्य उपदेशू । करितां नामसाधन विशेषू ।
नामाचा संकोचांशु । नामदेव बोलिले ॥५९४॥ (य११पू.१२०)
परी महावाक्याहूनि हरीचें नांव । श्रेष्ठ हे वदती सद्गुरुराव ।
नामासी अर्थवाद म्हणो नये म्हणोनी स्तव । म्हणता नये या वाक्या ॥५९५॥
उपदेशीं पाहिजे लाघव । तरीच उत्तमाधिकारीमतिगौरव ।
येणें मानें नाम अपूर्व । वाक्य नोहे ॥५९६॥
पदातें नामनिष्ठा । निश्चये होय प्रतिष्ठा ।
ईश्वरीं शक्ति जीवीं लक्ष्यनिष्ठा[२४०] । ही एकपदप्रतिष्ठा[२४१] नामाची ॥५९७॥
नामें महिमा उपजे । तैंचि अलिप्तादि साजे ।
यालागीं वाच्य उमजता उमजे । लक्ष्यांशचि ॥५९८॥
एवं पदाचा मुख्य अर्थु । जाहलिया परमार्थु ।
वाक्य खटापटी व्यर्थु । कवण न म्हणे ॥५९९॥
म्हणोनि ''तत्त्वमस्यादि'' वाक्यांचे ठायीं । नामाचा अर्धांशहि नाहीं ।
हे आळंदीवल्लभाचार्यपायीं । बिरुद विराजे ॥६००॥
अथवा प्रकरणें[२४२] फावे । वाक्यें अन्यार्थी संभवे ।
यालागीं नामचि ओळखावे । मुख्यार्थबोधक ॥६०१॥
एवं पदमात्र नामें निर्गुणप्राप्ति । आणि नामेंचि उपजे भगवद्भक्ति ।
यालागीं जीवन्मुक्ति । उभी ठाके ॥६०२॥



तत्त्वज्ञान मनोनाश । वासनाक्षय हा त्रितयाभ्यास ।
नामेंचि घडे हा दंश । इये चरणीचा ॥६०३॥
नामें कैसे होय तत्त्वज्ञान । हें आतांचि केलें समाधान ।
आणि पापकर्म तंव जाय जळोन । पापवासनाक्षय जपें ॥६०४॥
नामापुढें निश्चिती । धर्माचे आयास न लगती ।
यालागीं शुभ वासनाहि अंतीं । पावल्या क्षय ॥६०५॥
नाम घेतां ध्यान घडे । हें रहस्य आहे उघडे ।
निषेध तंव न जोडे । कल्पांतींहि ॥६०६॥
म्हणोनी नामसंकीर्तन । म्हणावया हेंचि कारण ।
कीं हरिकथा आणि नामस्मरण । ते नामींच ध्यान उपजवी ॥६०७॥
उलटोनी पाहतां दृष्टि । तरी तीव्र संयोगहि होय हृदयसंपुष्टि ।
इया गुरुगम्य गोष्टी । तातोपदेशू ॥६०८॥
आघवीया लीला । स्मरें तो सगुण जाहला ।
आणि कर्तव्याभिमानें फुगला । तो जीव होय ॥६०९॥
यास्तव लीलाविग्रही[२४३] सगुण । होय जीवाचें जीवन ।
न विसंबे एक क्षण । ध्यानाविण नामें वस्तुतंत्रें ॥६१०॥
धीर बोलिलें आत्मज्ञानी । वीर बोलिले षडरिमर्दनीं ।
वैष्णव बोलिले नामस्मरणीं । रामकृष्णीं उच्चारु ॥६११॥
कळीकाळाचे भार पळाले । येणें युगधर्मादि बंधना आटले ।
बैसलिया ठायीं फावले । ईश्वरकृत युग ॥६१२॥ (य११पू.१२१)
नामकवच लेयावे । तेथ निर्गुणहि ओळखावे ।
जे शक्तिमत्वें स्वभावें । तेचि होय ॥६१३॥
नामें परोक्ष नोहे हरि । लक्षांश अपरोक्ष प्रगटे अंतरीं ।
प्रणवलक्ष्यासम[२४४] पुरी । लक्षणा होय ॥६१४॥
परी प्रणवाहोनि येथ विशेष । न त्यागिता मात्रांश[२४५] ।
भलतिया ठायीं परेश । अधिष्ठानत्वें कळे ॥६१५॥
अनेक उपाधि त्यागिता क्षणीं । दृष्टि न जाय पूर्वोत्तर उपाधिसंधिस्थ अधिष्ठानीं।
तें एकपदें कळे हरिनाम म्हणता वाणी । म्हणूनी निर्गुणीं तो अभ्यासू ॥६१६॥

नामें सिद्ध कळे तें निर्गुण । आणि अनध्यस्त विवर्त कळे सगुण ।
हेहि गुरुगम्य वचन । अवधारिजे ॥६१७॥
''ऐसे सुंदर रुपडें हृदयीं धरिले आतां । पाहता केवि होय पूर्ण योनि रया''
एवं सगुण रुपडें हृदयीं धरितां । निःशेष आटे जन्ममरणचिंता ।
आतां समुच्चयें भगवंता । बोलणें घडले ॥६१८॥
''ऐसा सकळा अकळा कळला । हृदयीं धरिला समता बुद्धि ।
बाप रुक्मादेविवरु विट्ठलु चिंतिता । तुटली जनांची व्याधि रया ''
एवं सगुण आणि निर्गुण । संधित्वें[२४६] वृत्तित्वें समभाव धरून ।
करितां भगवच्चिंतन । सवासन जननमरण परिहरिले ॥६१९॥
किंवा सकळा अकळ आहेचि कळला । तों हृदयीं समता बुद्धि धरिला ।
यालागीं रागद्वेषादि भाव हारपला । तरी उत्पत्तिलयालाहि मिथ्यात्व ॥६२०॥
''ना ना विपाये आम्हीं हन । कीजे तें पां मौन ।
तरी काय जनीं जन । दिसते ना ॥९॥''
इत्यादि अनुभवामृत दशमाध्यायीं । स्वयें बोलिली श्रीगुरु आई ।
आणि हे लाभे सर्वही । श्रीविट्ठलचिंतनरूपचि ॥६२१॥
या अभंगाचा अर्थ । संपूर्ण जाणती तात ।
मज कळला आहे किंचित । तो लिहिला निजस्तुतिविवर्जूनि ॥६२२॥
एवं नाममाहात्म्य सर्व । वर्णिले धरूनि वा सांडुनी गर्व ।
परी ते जाहले मुख्य पर्व[२४७] । श्रोतया वक्तिया प्रवर्तका[२४८] ॥६२३॥
पुढेंहि सांगेन नाना ठायीं । हरिभजनीं कंटाळा न धरावा कहीं ।
ज्ञानदेव शिव शेषशाई । भजावे सुखें ॥६२४॥
वादी म्हणे नाममहिमा । एवढा सांगतां करोनी गरीमा । तरी कृमि पशु कां दिसती आम्हां । मुक्त कां ते न झाले नामें ॥६२५॥ (य११पू.१२२)
सिद्धान्ती म्हणे महाघोर । तूं तर्क करिसी समग्र ।
तरी येथ खंडक अघोर । निश्चयें आहे ॥६२६॥
नामें जे कां मुक्त झाले । ते कृमिपश्वादि जन्मांत नाहींत आले ।
कृमीपश्वादि दिसती वहिले । ते अन्य जीव ॥६२७॥
जीव असती अनंत । यालागी शंका नये येथ ।



म्हणसी एक एक जाहलिया मुक्त । तरी संख्या अवश्य जीवाची ॥६२८॥
तरी हें बोलणें । ऐल[२४९] आकाशाचे तीर कल्पणें ।
आपण उभा तेथ सीमा करणें । मग दुसरे तीर कल्पणें आकाशा ॥६२९॥
तैसेचि आहे गा साच । तंव वादी म्हणे हा मोहच ।
सादि अनंत वाच्य । होतील जीव ॥६३०॥
ब्रह्मसूत्र शांकरभाष्यांत । संसार बोलिला अनादि अनंत ।
तेणें संसारी जीवहि तदंत । सहज जाहले ॥६३१ ॥
सिद्धान्ती म्हणे काळदृष्टि । जीव अनादि अनंत भाष्यगोष्ठी ।
परी सादि अनंत देशदृष्टि । मानता चुकी कायसी ॥६३२॥
कालदृष्टिहि तोवरी । ज्ञान न होय जोवरी ।
अविद्या आहे तोवरी । अनादि अनंत संसारु ॥६३३॥
कालासहित जीव परमार्थी लोपे । व्यवहारीं जीव कालसम जाऊपे ।
संख्या गणणें नाहीं सोपे । याचिलागी जीवांची ॥६३४॥
सकलचि मुक्त होतील । ऐसे म्हणतां संख्या येईल ।
परी जो करेल तो मुक्त होईल । मग संख्या कायसी ॥६३५॥
जितुका काल कल्पवेल तुम्हासी । तितुके जीव कां न कल्पिता येती बुद्धीसी ।
वस्तुतः जीवाविण काळासी । कल्पिता कवणू ॥६३६॥
एरवी हा प्रश्न तत्वता । ज्ञानावरीहि येईल पाहता ।
कल्प अनंत गेले तत्वता । आणि अनंत मुक्त जाहले जीव ॥६३७॥
तरी मग कां दिसे संसार । ज्ञानें अवघियांचा कां नाहीं उद्धार ।
येथ वेदान्ती जें देईल उत्तर । तेंचि उत्तर नामाविषयीं आमुचे ॥६३८॥
म्हणाल बंध मोक्ष आघवे व्यर्थ । हें ज्ञानचि आहे परमार्थ ।
तरी ईश्वरभक्तीचा परमार्थ । आम्हीहि म्हणो ॥६३९॥
एकजीववादीं कैसी व्यवस्था । ऐसी शंका करणें वृथा ।
तेथ तंव अनुभवचि तत्वता । दृढतर आहे ॥६४०॥
परमार्थसत्ता एक । त्याचे प्रतिभास झाले अनेक ।
यालागीं एका अनंताचे औपाधिक । संख्या अनेक परिच्छेदें ॥६४१॥
एक अनंत संख्या अनेक जाहले । तेथ सत्ताभेदें नाहीं विरोधिले ।

म्हणोनि नामें मुक्त होता गेले । संख्यासंशय ॥६४२॥
एका पुरुषाच्या स्वप्नीं । अनंत जीवांची उभारणीं । (य११पू.१२३)
त्याही अनंताच्या स्वप्नीं । अनंत जीव ॥६४३॥
एवं जीव ब्रह्म एक अनंत । जीवाभास संख्या अनंत ।
यावदविद्या निश्चित । तोवरी अनंत व्यवहारु ॥६४४॥
समसत्तेंत दोन अनंत । म्हणतां न येती हा सिद्धान्त ।
विषमसत्तेंत स्वप्नासमान प्रतीत । तेथें युक्ति कासया पाहिजे ॥६४५॥
बंधक असलियाविण । मुक्ति नव्हेचि उत्पन्न ।
येथ बंधक नाहीं म्हणोन । नामें जें जन मुक्त झालें ॥६४६॥
ते नाहींच आले पश्वादिकांत । पश्वादिक हे अन्य जीव निश्चित ।
अथवा नामीं विश्वासेना जयाचे चित्त । ते हे तुजसम असतील ॥६४७॥
विश्वास नसोनी नाम न घेती । तेचि हे कृमिपश्वादि दिसती ।
यास्तव आळंदिवर श्रीपति । भजावे प्रीति अति गजरे ॥६४८॥
परमार्थसत्ता ईश्वर । नाम तेथ पाववी होवोनि ज्ञानपूर्वोत्तर ।
विषमसदनंतलय समसदनंतीं[२५०] अविरोधमात्र ।
यास्तव भगवन्नाम मंत्र जपावा ॥६४९॥
अनादि षट् पदार्थांची सत्ता दृष्टिसृष्टिभिन्न । हें अद्वैतसिद्धींत बोलिले मधुसूदन।
यालागीं नामें ज्ञानें मुक्त होता नारायण । संशयीं मन आतळूं नये ॥६५०॥
सत्ताद्वय वाद जरी जाहला । दृष्टिसृष्टिवादांतील[२५१] सत्तात्रयवाद[२५२] बोलिला ।
जरी केवल सत्ताद्वयवाद[२५३] घेतला ।
तरी बिम्बभूत परमेश्वराला प्रपंचविषमसत्ताकत्व[२५४] ॥६५१॥
म्हणोनी नामें ज्ञानें मुक्त होती । ते जन्मासी सर्वथा न येती ।
आळंदीवल्लभ यदुपति । स्मरावे पुढती आवडी ॥६५२॥
नाम बोलिले तैसे । आतां भजन कीर्तन सांगूं आपैसे ।
नामयुक्त गान जे असे । भजन ते गा ॥६५३॥
एरवी गायनाचा महिमा । संमत आहे निगमागमा ।
वेदीं गान करिती सामा । हे तो प्रसिद्ध यज्ञादौ ॥६५४॥
''गायेतां ब्राह्मण्याविति । क्वणयन्तावुभौविणामिति च'' श्रुति ।



यालागीं गानाची संमति । अगाधचि आहे ॥६५५॥
गानेंचि होय समाधि । हें स्मृतिवचनहि श्रुतिसंवेदी ।
याज्ञवल्क्य बोलिले आधीं । तेचि ऐक ॥६५६॥
यथा विधाने पठन् सामगायमविच्युतम् ।
सावधानस्तदभ्यासात्परं ब्रह्माधिगच्छति ॥११२॥ (याज्ञवल्क्यस्मृति यतिधर्म)
वर्ज्यमंत्र वर्जोन । जो करी सर्वदा सामगान ।
तयाचे एकाग्र चित्त होवोन । समाधीते तो पावे ॥६५७॥
परी जयाचे चित्त । न रमे वैदिक गानांत । (य११पू.१२४)
तया लौकिक गानेंहि समाधि होत । मिताक्षराकार[२५५] म्हणती ॥६५८॥
अपरान्तकमुल्लोप्यं मद्रकं मकरीं तथा ।
औवेणकं सरोबिन्दुमुत्तरं गीतकानि च ॥११३॥
ऋग्गाथा पाणिका दक्ष विहिता ब्रह्मगीतिका ।
गेयमेतत्तदभ्यासकारणान्मोक्षसंज्ञितम् ॥११४॥ (याज्ञवल्क्यस्मृति यतिधर्म)

भावार्थः- अपरान्तक, उल्लोप्य, मद्रक, मकरी, औवेणक, सरोबिन्दु व उत्तर अशी सात प्रकरण संज्ञक गीते आहेत. ११३ व्या श्लोकाच्या शेवटीं ''च'' असा जो शब्द आहे त्यावरून आसारित, वर्धमान इत्यादि महागीते घ्यावी. ऋग्गाथा, पाणिका, दक्षविहिता व ब्रह्मगीतिका या चार प्रकारच्या गीति यांचे गायन करावे. त्याचा अभ्यास केल्यानें तें मोक्षाचें साधन होते, म्हणून त्याला मोक्ष अशीहि संज्ञा योजितात.

वीणावादनतत्त्वज्ञः श्रुतिजातिविशारदः ।
तालज्ञश्चाप्रयासेन मोक्षमार्गं नियच्छति ॥११५॥ (याज्ञवल्क्यस्मृति यतिधर्मप्रकरण)

भावार्थः- भरतादि मुनीनीं प्रतिपादिलेल्या वीणावादनाचे तत्त्व जाणणारा, सप्त स्वरांतील बावीस प्रकारच्या श्रुति व अठरा जाति यांत निपुण असलेला, गीताचें परिमाण कळण्यासाठीं तालाची कल्पना केलेली असते त्याला चांगले जाणणारा, कांहीं प्रयासावांचून मुक्तिमार्गास प्राप्त होतो. षड्ज, मध्यम व धैवत यांच्या प्रत्येकी चार श्रुति, ऋषभ व धैवत यांच्या प्रत्येकीं तीन, आणि गांधार व धैवत यांच्या प्रत्येकीं दोन मिळून बावीस श्रुति आणि षड्जादि सात शुद्ध व संकरानें झालेल्या अकरा मिळून अठरा जाति. तालाचा भंग होईल या भयानें

चित्तवृत्ति एकाग्र होते, व तदनुविद्ध[२५६] आत्म्याची उपासना केल्यानें मुक्तिमार्ग सुलभ होतो.

अहो स्वर ताल श्रुति जाति । ऐशा नाना अवधानीं वृत्ति ।
एकाग्रता चित्तीं । येईल कैसी ॥६५९॥
हे जरी विजातीय[२५७] असते । तरी एकाग्र करावया प्रतिबंध येते ।
सम मेळवावे ताला स्वराते । म्हणूनि प्रतिबंधू नयेचि ॥६६०॥ (य११पू.१२५)
म्हणूनि जैसे अनंतहि व्यक्ति । विराडोपासका न प्रतिबंध होती ।
तैसे ताल स्वर श्रुति जाति । समस्थिति समाधिप्रद ॥६६१॥
नवल आहे गानशक्ति । बहुशा गायका व्याधि न होती ।
झालेत तरी स्तंभित होती । दूरहि होती विशेषवशें ॥६६२॥
नवल गानाची महाशक्ति । जरी न झाली समाधिप्राप्ति ।
तरी पुण्यलोकाप्रति । गमन सांगती स्मृतिकार ॥६६३॥
गीतज्ञो यदि योगेन नाप्नोति परमं पदम् ।
रुद्रस्यानुचरो भूत्वा तेनैव सह मोदते ॥११६॥ (याज्ञवल्क्यस्मृति यतिधर्म प्रकरण.)
प्रतिबंधामुळें गानकारी । जरी न झाला योगाधिकारी ।
तरी होवोनि रुद्रानुचारी । शिवासह क्रीडे आनंदे ॥६६४॥
वादी म्हणे गायक । घोर कर्मे करिती अनेक ।
गान शूद्रधर्महि देख । सांगितला श्रुतिमाजी ॥६६५॥
पैं ऐक म्हणे सिद्धान्ती । जे गायक घोर पापें करितीं ।
तयांची गानामध्यें वृत्ति । न रंगे म्हणोनी ॥६६६॥
नीच धर्म सांगितला गान । तो बोलिला वृत्तिकारण[२५८] ।
ब्राह्मणें गायन करून । पोट सर्वथा भरूं नये ॥६६७॥
शिष्य म्हणे श्रीगुरुमूर्ति । मज श्रुतिविरुद्ध भासे ही स्मृति ।
तैत्तिरीय उपनिषदीं गंधर्वानंदाप्रति । न्यून बोलिले देवाद्यपेक्षेनें ॥६६८॥
गान जाणती गंधर्व । परी रुद्रानुचर ते गान सर्व ।
श्रीगुरु म्हणती शंकागौरव । संशनीय तुझे ॥६६९॥
कर्मविद्या विशेषेंकरून । जे मनुष्य गंधर्वयोनींत गेले आपण ।
आणि देव गंधर्वहि जाण । प्राक्कल्पकर्मादिविशेषे जे ॥६७०॥
ते देवादिकांचे भोग्य होती । देवादिकांस रंजविती ।
म्हणूनी मनुष्यापरीस आनंदप्राप्ति । अधिक तयांची बोलिली ॥६७१॥
परी तो भोगजन्य आनंद भला । गानजन्य आनंद नाहीं बोलिला ।
मृत्युलोकीचा पुरुरवाहि वरचढ झाला । गानांत ही कथा पुराणीं ॥६७२॥
देववृत्ति गान गंधर्वांचे । अप्सरादि भोगीं चित्त त्यांचें ।
यालागीं पूर्ण गानजन्य आनंदाचे । अनुभवी ते न होती ॥६७३॥
पूर्ण गानजन्य आनंद । तो पाववी समाधि वा शिवपद । स्वरोपहितचैतन्य[२५९]
साक्षात्कारें समाधिबोध । केवल शिवपद स्वरादिवृत्ति[२६०] ॥६७४॥
एवं नुसुध्या गानेंकरून । बोलिले समाधिप्राप्ति लक्षण । (य११पू.१२६)
आतां भगवन्नामयुक्त गानें करून । जें फल तें ऐकावे ॥६७५॥
द्विजांचा वेदधर्म म्हणोन । गान बंद केले रायान ।
एक अपवर्ण[२६१] करिता गान । राये दंडन दिधले तया ॥६७६॥
तेणें रायासी घोर दुःख झाले । ऐसें चरित्र पुराणीं बोलिले ।
शिवनारदादि स्वलीलें । गान करिती आनंदें ॥६७७॥
गानासाठीं हरिण । निःशेष सोडी आपुला प्राण ।
लेकरूंहि अति अज्ञान । गीत ऐकोन सुखें निजे ॥६७८॥
सर्प विषारी महाघोर । तोही विवश गानासमोर ।
मत्त झाला गज दुर्धर । तो गजपर्णे[२६१अ] धरिता ये ॥६७९॥
एवं नवल गानाची गति । नुसुधिया गानें समाधिप्राप्ति ।
होय पश्वादिकाहि प्रति । तेथ हरिनामयुक्ति काय वाणूं ॥६८०॥
''श्रुण्वन् सुभद्राणि रथांगपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ।
नामानि गीतानि तदर्थकानि गायन् विलज्ञो विचरेदसंगः ॥३९॥''
(भागवत स्कं.११ अ.२)

हरिनामगुणांचे श्रवण । हरिजन्मकथाकीर्तन ।
हरिनामयुक्त गीताचें गायन । तें स्मरण बोलिजे ॥६८१॥
कीर्तन आणि स्मरण । या दोहोंत अनुवृत्त गायन ।
आणिक भगवद्वचन । तेहि ऐक ॥६८२॥
''नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।

मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥''
''तो मी वैकुंठीं नसे । वेळु एक भानुबिम्बींहि न दिसें ।
वरी योगियांचीहि मानसे । उमरडोनि जाय ॥२०७॥
परी तयापाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ।
जेथ नामघोष बरवा । करिती माझा'' ॥२०८॥ ज्ञाने.अ.९
एवं श्लोकरहस्य तातोक्ति वदते । माझे भक्त गातीं जेथें ।
नारदा मी उभा तेथे । हे बोलती अन्य साधू ॥६८३॥
''कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचें निखिल प्रबंध ।''
येणेंहि वचनें आचार्य बोध । करिती कीं गावी हरिनामें ॥६८४॥
''विष्णु नामानि पुण्यानि सुस्वरै रचितानि चेत् ।
भवन्ति सामतुल्यानि कीर्तितानि मनीषिभिः ॥५॥'' (संगीत परिजात)
(य११पू.१२७) ऐसीहि एक कव्युक्ति । कीं महामुनि जयाते गाती ।
ती विष्णुनामें निश्चिती । पुण्यमय सर्वदा ॥६८५॥
परि सुस्वरें मिश्र गाता । तरी सामतुल्य होती तत्वतां ।
सामाहूनि विशेष हरिनामार्था । जे न गाताहि पुण्यप्रद ॥६८६॥
श्रवणीं ऐकावे हरिनाम गान । गानें कीर्तनीं कर्षावे श्रोतृमन ।
गानें करावे भगवत्स्मरण । सामगान तेंचि कीं ॥६८७॥
स्वामी सखा रिझवावा गानें । अर्चना शेवटीं गाणें गाणें ।
गाणें समाधींत निवेदनें । आत्मा परमात्मरूपीं ॥६८८॥
एवं नवविधा भक्ति । गान करी तदनुवृत्ति ।
अल्प प्रेम असतां चित्तीं । गान अधिकचि वाढवी ॥६८९॥
यालागीं सुंदर सगुण भजन । अखंड करावे सावधान ।
राग आणि तानमान । असावे समर्थ म्हणती ॥६९०॥
भगवन्नामाचे प्रबंध । अभंग पदे नानाविध ।
गात जावे विशद । रामकृष्ण मुकंद संपुटी ॥६९१॥
प्रेम असेल गावयाचा । आणि ठाव नसेल तालस्वराचा ।
तरी भगवंता विस्वरहि साचा । रुचे अभंगीं ॥६९२॥

तुकारामांचा अभंग ३२३८
''नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाही देवें ॥१॥
नाहीं तयाविणें भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण ॥२॥
देवापाशीं मागे आवडीची भक्ति । विश्वासेसी प्रीति भावबळे ॥३॥
तुका म्हणे मना सांगतो विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥४॥''(गाथा)
कोणाचिया प्रेम चित्तीं । लौकिक लाजे भजना लाजती ।
मधुर कंठ नाहीं म्हणती । उगेचि राहती ऐकत ॥६९३॥
तयासी वदती तुकाराम । तुज नये उत्तर मधुर परम ।
तरी नाहीं येत म्हणता सुगम । लाज कायसी चित्तांत ॥६९४॥
नाहीं येत ते येते म्हणता । हा अभिमान न रुचे भगवंता ।
येवो न येवो रमानाथा । प्रेमळ भक्त प्रिय होय ॥६९५॥
भजनांत जावोनि नये गायन । तेथ म्हणता विस्वरें करोन ।
तरी अल्प एकाग्र मूढांचे मन । विक्षिप्त होय त्याठायीं ॥६९६॥
म्हणोनी आपणासमान किंवा एकान्तीं । घेवोनि यथास्वरें आळवावा श्रीपति ।
टाळमृदंगविणासंपत्ति । घेवोनि अथवा एकटें ॥६९७॥
देवासी मागावा प्रेमभावो । दिवसेंदिवस धरावा निश्चयो ।
साचचि येईल भगवत्प्रत्ययो । निराशा ठाव हा नव्हे ॥६९८॥ (य११पू.१२८)
''तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन्प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।
नामान्यनन्तस्य यशोंकितानि यच्छृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ॥११॥''
(भाग.कं.१ अ.५)
संस्कृत अथवा प्राकृत । भाषेंत भजावा भगवंत । मलीन वाटता अमल[२६२]
क्षेत्रचित्त[२६३] । करुनी मृदु मध्य तीव्र वेगे भगवंत भजावा ॥६९९॥
शुद्धाशुद्ध पद रीति । सत्पुरुष तिकडे न पाहती ।
भगवन्नामाची कीर्ति । गाती ऐकती सर्वदा ॥७००॥
''मूर्खो वदति विष्णाय बुधो वदति विष्णवे ।
नम इत्येवमर्थं च द्वयोरपि समं फलम् ॥''
ऐसे पंचरात्र वचन । परी येथ सांडावा अभिमान ।
माझेच योग्य आहे म्हणोन । मूर्खानें सर्वथा म्हणो नये ॥७०१ ॥

**विष्णाय पदाचा अभिमान असतां । त्या मूर्खाहूनि शहाणाचि श्रेष्ठ तत्वतां ।**
**तो अभिमानीहि तत्वता । असला जरी ॥७०२॥**
**परी मूर्ख नाम घे निरभिमानी । पंडित विष्णवे पदाचा अभिमानी ।**
**श्रेष्ठ नोहे मूर्खाहूनी । वैय्याकरणी जरी जाहला ॥७०३॥**
**आपणास नाहीं येत म्हणोनी सांगावे । एकांती जावोनी हरीस आळवावे ।**
**भजनाभिमानें तुच्छ न करावे । कोणा धर्मासहि वृथा ॥७०४॥**
**ऐसे होईल तरी । शपथचि हाता येतो हरी ।**
**भूवैकुंठ वृंदावन पंढरी । आळंदीसहित क्षेत्र एक ॥७०५॥**
**भजनीं मागें पुढें म्हणणार । निर्गर्व गुरुशिष्य परस्पर ।**
**आळंदीवल्लभ करुणाकर । निष्काम सुविचार बोधिती ॥७०६॥**
**श्रीज्ञानेश्वर माय माऊली । तियेची वंदोनी पाऊली ।**
**कविताकमलमाल वाहिली । सप्रेम चरणीं ॥७०७॥**
**॥ हरिः ॐ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यप्रबंधे संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे नाममहिमादिनिर्णयो नाम द्वितीयं कुसुमम् ॥ (य११पू.१२९)**

**॥ शुभं भवतु ॥**

**०००**

## अध्याय २ रा टीपा

(१)गुरूने केलेल्या स्फूर्तिनुसार (२)तेच सांगणे (३)सुवर्णरूप मोक्षदान करिताना (४)परीक्षून घेत नाही (५)ज्ञानराजमाऊली (६)मंत्र घेणाऱ्याला तो मंत्रलवकर सिद्ध करून देणारा होईलकिंवा नाही हे पाहण्याचे चक्र (७)वैय्याकरणी (८)उद्देश भावना (९)बुद्धीत (१०)लौकिक घटादि, अलौकिक स्वर्गादिक व अभाव हे ज्याचे अर्थ नाही असे (११)संज्ञा (१२)उद्देशून (१३)योग्य (१४)ज्ञानाग्नीने (१५)तळमळे (१६)स्पष्ट (१७)ब्रह्मरूप (१८)श्रेष्ठकनिष्ठभाव (१९)सारखे (२०)आणि (२१)प्रभूच्या ठिकाणी (२२)अकथनीय (२३)ज्ञात्या पुरुषांनी (२४)सांगितले आहेत (२५)दुर्वृत्ताला (२६)स्वतःसिद्ध (२७)सुंदर (२८)गजेंद्र (२९)शंकारूपी चिखल (३०)ईश्वराला केवळ निमित्तकारण मानले तर (३१)दूषित करिते (३२)निमित्तकारण व उपादान कारण (३३)ह्यावरच भासणारा (३४)ईश्वराशी संबंध (३५)ईश्वराशशी तादात्म्य (३६)नैमित्तक (३७)दंड (३८)व्यक्ति व ब्रह्मांड (३९)जगताची स्थिती. जगताचे उपादान कारण म्हणजे जगात व्यापून राहून करितो (४०)कारणरूप तमोगुणाचा आश्रय होऊन



(४१)मातापित्यांच्या शरीराचा जो जड तमोगुणी भाग वीर्य व रक्त यापासून पुत्रशरीरोत्पत्ती होते (४२)सिद्धान्तात (४३)दयेचे आधिक्य (४४)निर्वाणीचे (४५)स्थान (४६)निर्दयपणा (४७)विषमबुद्धी (४८)अन्तःकरण (४९)पक्ष्यादि (५०)कर्ममार्गाच्य पद्धतीने विचार (५१)गीतेत सांगितलेले (५२)भक्ति न करणाऱ्या (५३)एक मुखाने सांगतात (५४)शुद्धसत्त्वगुणाचा आश्रय होऊन निमित्तकारण होत असल्यामुळे (५५)सर्वत्र कारण चेतनच आहे अशी वेदान्ताची प्रतिज्ञा आहे तिची हानी (५६)मातीची बाहुली करणे व मोडणे (५७)दुष्टपणा (५८)कर्म करितेवेळी (५९)कृतीने उत्पन्न होणारे (६०)शास्त्राचा एक भाग (६१)सिद्ध करणारा (६२)शास्त्रातील दुसरा भाग (६३)जीवावर दया करणे (६४)आत्मज्ञानानेच नाहीसे होणारे (६५)भिन्न (६६)आत्मज्ञानाची सामुग्री मिळवून देणे (बकी,पूतना) (६७)करुणाकल्लोळरूपी विलासात (६८)निवड (६९)सर्व जगाला एकच उपादानकारण असणाऱ्या परमेश्वरात (७०)शिक्षेप्रमाणेच असल्यामुळे (७१)न्यायवृत्तीने संकोचित झालेला दयाळुपणा (७२)नाही म्हणणे (७३)शास्त्रांचे स्वाधीन (७४)उपनिषदाचे नांव (७५)हत्त्याच्या पायात ज्याप्रकारे सर्व प्राण्यांच्या पायांचा समावेश होतो त्याप्रमाणे मोठ्या प्रायश्चित्तात सर्व प्रायश्चित्तांचा समावेश होतो असे (७६)पूर्वमीमांसेतील एक न्याय हा न्याय जेव्हा एकाच वस्तूचा काम्य व नित्य अशा दोन्ही रीतीने उपयोग सांगितला असतो तेव्हा लागू होतो (७७)समाधी (७८)शेवटी (७९)संसारतापापासून रक्षणारे आतपत्र= छत्री (८०)जिव्हा (८१)प्रयत्नाने (८२)समर्थ (८३)ज्याला इतिहासपुराणांची पुष्टी आहे असे (८४)युक्ती (८५) खंड,दोष (८६)मुख (८७)घोट्यापर्यंत (८८)ओरडू लागला (८९)आपले-आपण दिलेले - नाम जपण्यास (९०)आपले नाम जपण्यास (९१)अमंगल, न शोभणारे, निष्फळ (९२)भक्तीची प्राप्ती (९३)भक्तीचा उद्बोध करणारे (९४)दुःखरहित (९५)भीष्माचार्य (९६)प्राप्ति (९७)निषेध (९८)सुंदर (९९)निश्चित (१००)सवस्त्र- अंगावरील वस्त्रांसुद्धा (१०१)योग्य (१०२)केवल स्तुति (१०३)सुटका (१०४)कर्माच्या द्वारा उपयोग-कर्मांगता (कर्माचे एक अंग) (१०५)आश्रमचिन्ह न घेता (१०६)नामाचा अधिकार नाही म्हणून प्रतिपादणे (१०७)पूर्वी दिलेल्या (१०८)साक्षात् भगवद्वाचक नाही अशा खखोल्क नावाला जर कर्मांगित्व नाही तर साक्षात् भगवद्वाचक नामाला ते असणे अर्थातच शक्य नाही (खखोल्क= मंत्रजप, एक प्रकारचा) (१०९)एक श्रुतिवाक्य (११०)मनानेहि किंवा मीमांसेच्याही दृष्टीने (१११)नाम व्रत्येत्यु उपासीन- हो असे (११२)एकटे नामच ते कर्म पूर्ण करू शकते हा व्यतिरेक (११३)कर्माच्याच ठिकाणी श्रद्धा असणाऱ्या मंदबुद्धींना (११४)हरिनामाची बडबड करणारा (११५)कर्मांग (११५अ)ठसू दे (११६)दुसऱ्या एका विधिवाक्याचे अंगभूत

(११७)अपूर्ण कर्म पूर्ण करणारे म्हणून कर्मामध्येच नामाचा उपयोग करावयाचा (खादिर-खैराचे लाकूड) (११८)रूप यागुणाचे सूक्ष्म स्वरूप (११९)जोपर्यंत अविद्या आहे तोपर्यंत तिचे कार्य नित्य आहे हा वाद (१२०)व्युत्पत्तिसिद्ध (१२१)वर्णरूपी शब्दाचा अर्थ (१२२)वाचकता (१२३)आश्रय आहे हे ज्ञान होण्याकरिता (१२४)भावनेच्या विवक्षेचा (१२५)साह्य (१२६)विवक्षेवाचून (१२७)शब्दाने कळणारा (१२८)भगवंताला प्रगट करणारे (१२९)ह्या शब्दाने अमुक विवक्षित ठरलेला अर्थ घ्यावयाचा अशी विवक्षा अंतःकरणात घेऊन (१३०)नाम व रूप यांचा अभेद आहे अशी भावना करणे (१३१)रामकृष्णादि नामांचे (१३२)रामकृष्ण हे आपल्या पुत्राचे नांव आहे असा (१३३)अनादि कालाच्या व्यवहाराने (१३४)शास्त्राने निर्माण केलेला (१३५)अमुक शब्दाचा अमुकच अर्थ व्हावा याला ईश्वराची इच्छा कारण आहे असे मानणारे (१३६)त्या शब्दाचा अर्थ भगवान आहे अशी भावना करून परमेश्वरप्राप्ति करून घेण्यास (१३७)उलट (१३८)ज्या भ्रमात ज्या वस्तूचा भास झाला तीच वस्तू आहे असे शेवटी ठरते तो भ्रम. उदा.- दुरून पाहत असताना सोने आहे काय असे वाटले व जवळ जाऊन पाहता शेवटी सोनेच ठरले तर तो संवादि-भ्रम म्हणावा (१३९)रामकृष्ण हे देवाचे नाव नसून माझे मुलाचेच नांव आहे असे समजणे (१४०)भगवंताचेच नांव आहे असा बोध उत्पन्न करण्यास कारणीभूत (१४१)वेदातील अध्यायांतर्गत भागाचे नांव आहे (१४२)वैदिक व्याकरण (१४३)अकस्मात् (१४४)नुस्ता स्तुतिपर (१४५)मर्यादा (१४६)माशीबरोबर (१४७)पद्धतीने (१४८)स्तुतिरूप (१४९)बरोबर (१५०)आचरण (१५१)राशी, चळती (१५२)शिरकाव (१५३)पक्षात (१५४)बाधकता (१५५)अतीन्द्रीय वस्तूचे ज्ञान करून देणारे (१५६)दुसऱ्या प्रत्यक्षादि प्रमाणांशी विरुद्ध (१५७)दुसऱ्या प्रमाणाने कळणे (१५८)विधेय कर्माची स्तुति करणे (१५९)ब्रह्मसूत्रातील एक अधिकरण (१६०)जोड्याने (पायात घालण्याचा) (१६१)लागू (१६२)विषयासक्तीने (१६३)मगर (१६४)जोड्याने (१६५)वस्तुतंत्र, दृढ (१६६)सर्व साधनांची फलप्राप्ति (१६७) (शाक्त मताचाच) (१६८)विष्णूची स्थिति राहणार नाही असे सांगणारे (१६९)एकाच काली दो साधने सांगून त्यापैकी अमुक एक साधन श्रेष्ठ आहे व दुसरे कनिष्ठ आहे असे सांगितले असेल व पुनः त्याच कालाच्या दृष्टीने कनिष्ठ म्हणून गणले गेलेल्या साधनाची जर श्रेष्ठ म्हणून ठरविलेल्या साधनापेक्षा महती गायिली असेल तर ती महती केवळ स्तुति म्हणून अर्थवाद समजले जाईल (१७०)त्या त्या कालापुरते (१७१)सूर्य उगवण्यापूर्वी होम करणाऱ्यांची निंदा करून सूर्य उगवल्यावर होम करणाऱ्यांची स्तुति करणारे श्रुतिवाक्य व सूर्य उगवल्यावर होम करणाऱ्यांची निंदा करून सूर्योदयापूर्वी होम करणाऱ्यांची स्तुति करणारे श्रुतिवाक्य ही दोन्ही वाक्ये परस्परांची निंदास्तुति करीत असल्यामुळे अर्थवादरूप होतात (१७२अ)डोळ्यासमोर पदार्थ नसतां त्या पूर्वीच असलेला मनावरचा जो संस्कार त्याच्या योगाने मनात तो पदार्थ येणे (१७२)मन हे अत्यंत अल्प परिणामरूप आहे हा वाद (१७३)पूर्वी अनुभवलेल्या विषयाची आठवण (१७४)प्रत्यक्षादि प्रमाणांच्या योगाने झालेला वस्तूचा जो संस्कार त्याच्या योगाने होणारे त्या वस्तूंचे ज्ञान (१७५)प्रत्यक्ष प्रमाणाने वस्तू कळून तिचा मनावर संस्कार होऊन राहतो व त्या संस्कारामुळे वस्तूची स्मृति होते (१७६)अनुमान प्रमाणाने एखादि वस्तू कळून त्या प्रमाणाने मनावर जो त्या वस्तूचा संस्कार होतो त्या संस्काराने केव्हा वस्तूची आठवण होते (१७७)त्याचप्रमाणे एखाद्या वस्तूचा शब्दप्रमाणाने मनावर ज्ञानसंस्कार होऊन त्या संस्काराने त्या वस्तूची आठवण होते (१७८)भगवंताचा प्रत्यक्ष साक्षात्कार (१७९)अनुमानाने भगवंताचे अस्तित्व कळून झालेल्या भगवत्संस्काराच्या योगाने भगवंताची स्मृति (१८०)वेदवचन किवा पुराणवचनावरून झालेल्या भगवत्स्वरूपाच्या संस्काराने भगवत्स्मृति होते (१८१)प्रकाशित (१८२)अनुमोदन (१८३)पापनाश (१८४)अजित म्हणजे भगवत्प्रेम ज्यांच्या चित्तात नाही अशांना न जिंकल्या जाणारा जो परमात्मा त्याचे नांव (१८५)श्रुतीमध्ये सांगितलेल्या सगुणोपासना करणारे (१८६)हृदयामध्ये परमात्म्याची उपासना करणे (१८७)पुण्यपाप (१८८)प्रणवजप करण्याचा उद्योग (१८९)मनोहारी (१९०)शांकरभाष्यातील एक अधिकरण यात देवता वगैरेंची रूपे आहेत हे सिद्ध केले आहे (१९१)मंत्राचा अर्थरूप विषय (१९२)ऱ्हस्व उच्चार (१९३)दीर्घ (१९४)प्लुत (१९५)वर्णाच्या उच्चाराची तत्वादि स्थाने (१९६)ध्वनीचा आश्रय होतो (१९७)संक्षिप्त व पूर्ण (१९८)उगीचच, अधिक (१९९)बुद्धि चालवू लागल्यास (२००)हा दोष आहे ह्यात मूळ शोधून काढणारा कोठे थांबू शकत नाही याचे कारण ते, त्याचे कारण ते, असेच करीत राहवे लागते, म्हणून अनवस्था म्हणजे ज्याला शेवट नाही (२०१)ह्या शब्दाचा अमुक अर्थ असे मनात धरून ठेवल्याने (२०२)व्यावहारिक वस्तूंची बोधकता (२०३)महिमा वर्णन (२०४)प्रवृत्ति प्रसिद्धी (२०५)भांडखोर (२०६)एकटेच असताना (२०७)देह पोसण्याची प्रवृत्ति (२०८)नाहीसे होऊन (२०९)सिद्धान्तसूत्रावरील भाष्यकार (२१०)उत्पन्न झाले (२११)त्यांचे फल इष्ट (दृष्ट) विषयसुख नसून कांहीतरी अदृष्ट असले पाहिजे. अदृष्टफलाकरितांच त्याचा उपयोग असला पाहिजे (२१२)मृत्युलोकात भोगण्याजोगे पापरूप प्रारब्ध घेऊन जन्मास आलेला (२१३)क्षणोक्षणी (२१४)दोषयुक्त (२१५)रोगाची किंवा विषाची शंका (२१६)सतत नामस्मरण करितो व पापे करितो त्यास (२१७)विशेष (२१८)मनाने संकल्प विकल्प स्फुरू न देता (२१९)श्वयसात होणारा नित्य जप

(२२०)लागू,विहित (२२१)विषयवासनेरहित (२२२)ब्राह्मणाचे १२ गुण : ज्ञान, सत्य, दम, वेदान्तश्रवण, अमात्सर्य, लज्जा, तितिक्षा, अनसूया, यज्ञ, दान, धृति, शम, (सनत्सुजातीय अ.२.श्लोक १९) (२२३)ज्यात सर्व अपराधांचे पाप घडते तो (२२४)भंग्याची (२२५)चरणतीर्थ (२२६)दोष (२२७)करावी किंवा न करावी (२२८)नाममहिमा सहन न करणारे कुमत हेंच कोणी कावळ्यांची पंक्ती किंवा रांग (२२९)दृष्टिसृष्टिवादानुसार क्षणोक्षणी नवीन देह उत्पन्न होतो म्हणून (२३०)सर्व पृथ्वी (२३१)दुसऱ्या युक्तीच्या साह्याने (२३२)खंडण करणाऱ्याच्या चित्तात (२३३) त्यावरही शंका करता येते (२३४)हांका मारून (२३५) वचनाचा दोष (२३६)स्तुतिरूप (२३७)वासनेने, आसक्तीने (२३८)जैनांचा उच्च पुरुष (२३९)शिवू नये (२४०)लक्ष्यार्थता (२४१)तत्त्वमसि महावाक्य परमात्म्याच्या लक्षणेने बोध करिते व हरिनाम शक्तिवृतीने बोध करिते म्हणून महावाक्य हे नामाचा एक अंश आहे (२४२)महाक्य ज्या प्रकरणात आले आहे त्या प्रकरणावरून (२४३)लीलेने देह धारण करणारा (२४४)प्रणवावाची लक्षणा करून जसा लक्ष्य परमात्मा कळतो तसाच लक्ष्य येथे कळतो (२४५)प्रणवाच्या ठिकाणी लक्षणा करताना जसा भूतांश टाकावा लागतो तसा येथे टाकावा लागत नाही (२४६)संधित्वे म्हणजे निर्गुण व वृत्तित्वे म्हणजे सगुण (२४७)मंगल प्रसंग (२४८)प्रवृत्त करणाऱ्याला (२४९)अलिकडे (२५०)कधीकाळी नाश न पावणारे ब्रह्म व ज्ञानाने नाश पावणारे जीवत्व यांची विषमसत्ता आहे म्हणून विषमसत्तेने असणाऱ्या अनंत संसाराचा त्रिकालाबाधित अशा अनंत ब्रह्मात लय होऊ शकतो (२५१)पदार्थाचे जेव्हा ज्ञान होते तेव्हां तो आहे व ज्ञान होत नाही तेव्हा नाही, हा वाद (२५२)पारमार्थिक, व्यावहारिक व प्रातिभासिक अशा तीन सत्ता मानणारा वाद (२५३)पारमार्थिक व प्रातिभासिक अशा दोनच सत्ता मानणारा वाद (२५४)परमेश्वर कधी नाश न पावणारा म्हणून पारमार्थिकसत्तावान् व प्रपंच ज्ञानाने नाश पावणारा म्हणून प्रपंच व परमात्मा विषमसत्तावान् आहेत (२५५)याज्ञवल्क्यस्मृतीचा टीकाकार (२५६)त्याने युक्त (२५७)परस्पराशी विसंगत (२५८)उपजिविके करिता (२५९)स्वर उपहित चैतन्याकडे ठेवून (२६०)केवळ स्वराकडे वृत्ति ठेवून (२६१)शूद्रवर्ण (२६१अ)तालभेद (२६२)निर्मळ (२६३)चित्तरूपी क्षेत्र

०००



**।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।**

## ।। अध्याय ३ रा ।।

# गुरुतत्त्व-निरूपण

**जय आळंदीअयोध्येशा श्रीगुरुरामा ।**
**जय उन्मनीजानकीजीवना मंगलधामा ।**
**जय भक्तहंसमनविश्रामा । पूर्णकामा सर्वेशा ।।१।।**
**माझिया हृदयलंकेआतूं । अहंकार रावण प्रमत्तु ।**
**क्रोधकुंभकर्ण धुसमुसितु । छळितु योगबिभीषणा ।।२।।**
**येणेंचि महाखळें । उपडिली समाधानाची मुळें ।**
**गांजिली साधनें सकळें । वैराग्यादि ।।३।।**
**येणें प्राणाग्निहोत्र यज्ञ विध्वंसिला । येणें इंद्रिया आसुरा लळा दिधला ।**
**येणें परिवार वाढविला । दंभादिकांचा ।।४।।**
**याच्या अनंत वासना कामिनी । त्यांत सद्वासना मंदोदरी स्वामिनी ।**
**परी हा तियेचे नायकोनी । छळित मुनि अनिवार ।।५।।**
**येणें महासिद्ध नागविले । येणें ब्राह्मण राज्यांतुनि उठविले ।**
**तुझिया उन्मनी प्रियेते हरिले । महाखळें येणें ।।६।।**
**दहरपंपासरोवरीं[१] । धैर्यशील हनुमान निर्धारी ।**
**तेथ धर्मसुग्रीवासी सख्य करी । कामवाळीते हरोनी ।।७।।**
**शांति सुंदरा तारा । अर्पोनी सुग्रीवा प्राणेश्वरा ।**
**सीताशुद्धि मनोहरा । झडकरी कीजे ।।८।।**
**सोडुनि आघवी संसारमाया । यद्दच्छालाभतुष्ट यत्काया ।**
**ते महामुनि वानरे घेऊनिया । श्रीगुरुरघुराया धांव त्वरें ।।९।।**
**धैर्याचेनि बळें । अनाहत वाद्ये तुंबळें[२] ।**
**सुषुप्ति विवरद्वार सगळे । भेदोनि येई ।।१०।।**
**मध्यें संत सादर करुणेचा । सेतू बांधोनिया साचा ।**
**सुवेळेसी कल्याण वाचा । करीतचि येई ।।११।।**

विवेकबिभीषण पाळावा । हा महाखळ रावण जाळावा ।
लंकागड आक्रमावा । आघवा स्वामी ॥१२॥
परी हो येथ एक कीजे । ये लंकेते अयोध्या म्हणीजे ।
उन्मनी पर्णोनी राहिजे । एथेंचि स्वामी ॥१३॥
मग रामसीतावियोगू । कदापि न घडे प्रसंगू ।
सदाचि सुखसंयोगू । सीतारामीं ॥१४॥
एवं दीव्य रामायण । तुझें हें चरित्र गहन ।
पळपळ मी अवलोकीन । ऐसे करी ॥१५॥
तंव येथ श्रीगुरुराय । सुचविती हे वदसी काय ।
ग्रंथ सांडोनिया वाय । दवडसी वेळू ॥१६॥
तेथ मी म्हणे । जी आघविया ग्रंथा मूळपणें ।
मी पावेन स्तवनें येणें । तैं श्रीगुरुवचनें होई ऐसे ॥१७॥
सर्वांगा करोनी कान आतां । (य११पू.१३०) सावधान असावे श्रोता ।
जो मागा विखो[३] बोलिला होता । नाममहिमादि ॥१८॥
तो ऐकुनिया वहिला । शिष्य पोटीं चमत्कारिला ।
मग नमोनी श्रीगुरुपाऊला । प्रश्न आरंभिला अतिमधुर ॥१९॥
जी स्वामी आपुलें वचन । प्रमाणाचें अधिष्ठान ।
शास्त्रें पाया पडती म्हणोन । वचनाचिया ॥२०॥
''जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगमवना आंतु ।
तंव आपुलिये फळीं हातु । न घेपतीहि'' ॥१८॥ (अनुभवामृत प्र.२)
''गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम ।''
एवं समर्थे वर्म । बोलिले आहे ॥२१॥
तेथ शंका घेयावया । सामर्थ्य अंगीं कवणाचिया ।
परी मुकुळित[४] बाळहृदया । जागवी जननी ॥२२॥
तेवी संशयाचे पवाडे । हृदयीं गाजती फुडे ।
म्हणोनी आक्रोशे रडे । जे पाळिजे माते ॥२३॥
तैं श्रीगुरु म्हणती हे असो । तुझे मन आम्हा सुखें पुसो ।
मग उत्तरें विज्ञानाचा अतिसो[५] । ओळघो[६] दे आगीं ॥२४॥

तैं शिष्य म्हणे जी वरदा । तोडावया संसार पडदा ।
श्रीगुरु आज्ञाचि प्रसिद्धा । बोलिली मागें ॥२५॥
तें श्रीगुरुतत्व कैसे । कवण विधी हृदयीं विलसे ।
हे माझें संशय पिसे । झाडोत स्वामी ॥२६॥
ऐसिया वचनाते । ऐकोनिया निरुतें[७] ।
श्रीगुरु म्हणती हें भलते । पुसिले तुवा ॥२७॥
या तत्त्वासाठीं । स्मशानीं बैसला धूर्जटी ।
स्वप्रियेते चोरोनी गोष्ठी । एकांतीं सांगे ॥२८॥
परी उदैजिलिया चंद्रा । केवि भरते सावरे सागरा ।
तेवि अवलोकोनी तव प्रश्नकरा[८] । मम बोधसमुद्रा उल्हासू ॥२९॥

अभ्यासाची सांप्रदायिक रीति -

तरी अशिष्य अभक्त अदानी । हें आघवे वाळोनी श्रवणीं ।
श्रवणाद्वारें हृदय भुवनीं । ठेवी नेवोनी शब्द माझे ॥३०॥
जाणावया सद्गुरुनाथा । मनबुद्धी ठेवी पवनाचिया[९] माथा ।
मग सोहं स्वभावे सरता । पुढारा धांवे ॥३१॥
चंद्र पिळोनी आनंद काढी । सूर्यप्रकाश घेऊनी उष्णता दवडी ।
शिवसुषुम्नेची जोडी । जोडी मार्गे ॥३२॥
मागा जे नाम म्हणून । बोलिले ते करी मन ।
मग सांडी आपुले हंसपण । सोहं म्हणुनी ॥३३॥ (य११पू.१३१)

(टीप :- १) किरणाते.

काळेंचि काळ वश करावया । उठे ब्राह्ममुहूर्ती पुत्रराया ।
आवश्यक विधि सारोनिया । स्ववर्णक्रिया करावी ॥३४॥
मग साधक अथवा सिद्ध । मुमुक्षु अथवा बद्ध ।
हें आघवेचि भेद । सांडोनी द्यावे ॥३५॥
आघवी सारोनिया क्रिया । वल्लभा भेटो धावे प्रिया ।
तेवि मागिला पुढीलिया । आतळूं[१०] नको ॥३६॥
मग काळाचिया संधीं । दृढ ठेवानि बुद्धि ।
तेथ अरुणोदया आधीं । प्रकाश पडे ॥३७॥

रात्रीं समूळ गेली । सूर्यबुंथी उदयेचि ठेली ।
तैं अरुणप्रभा फांकली । उष्ण ना शीतळ ॥३८॥
तैं शिवालयीं का मठीं । कां सद्गुरुमाउली सन्निध गोमटी ।
असतां संप्रदाय परिपाटी । अभ्यासु कीजे ॥३९॥
येथ आळसें अथवा शहाणपणें । झणी चुकसी अंतःकरणें ।
तरी तुझे सुखदुःख तूं जाणें । आम्ही वेगळे ॥४०॥
सांगितलिया वाटा । मौनेंचि चाले सुभटा ।
मृत्युचि दिवटा । करोनी पुढें ॥४१॥
मरण होईल निर्धारी । यास्तव आधींचि स्वश्राद्ध करी ।
मग बैसे आसनावरी । करूनि बोहरी[११] महा मोहा ॥४२॥
श्रीआदिनाथ सद्गुरु पिता । सद्गुरुरूप उमामाता ।
सद्गुरुरूप भगवंता । सिरसे नमी ॥४३॥
श्रीमत्स्येंद्र माऊली । तियेची वंदोनी पाऊली ।
गुरु गोरक्षकृपा वहिली । संपादी[१२] नमुनी ॥४४॥
व्यक्तचि अद्वयानंद । नमुनी तयाचे सुपद ।
पुढें गैनीनाथ प्रसिद्ध । स्मरावें अंतरीं ॥४५॥
मग साष्टांग वंदावे स्वामीनिवृत्ति । वंदनेंचि लाहे चित्तनिवृत्ति ।
सप्ताक्षरवाच्य ब्रह्म पुढती । नमावे आवडी ॥४६॥
बाबा तात काका जननी । अनंत वेळहि यांच्या नमनीं ।
श्रम न मानावा सर्वथा मनीं । जें नमनेंचि मुनि आत्मा भेटे ॥४७॥
चांगदेव विसोबा नामदेव । जनाबाई आदि सर्व ।
परंपरा अंगभाव । नमावे प्रेमें ॥४८॥
शरीराबाहेरीं मग तर्कातें शिकवावे । तुवा माझिया दूरी रहावे ।
जननी श्रद्धेचिया यावे । हातातळीं ॥४९॥
शरीराचिया भयें करूनी । मिया दवडिली होती श्रद्धाजननी ।
तियेते शरीरा तिळांजुळी देऊनी । मिळविले पुनः ॥५०॥
इंद्रियातें उलटविले । राग द्वेष उत्सारिले[१३] ।
तेणें आघवेंचि मेले । आजि मम शत्रु ॥५१॥



भूमिनेंचि गिळिले कांटे । मग कोण जाईल आडवाटे ।
विश्वासाचे दिवटे । धरिले हातीं ॥५२॥
अभावाते घेणें । हे तर्काचे ना श्रद्धेचे करणें ।
भावाते मंद दाखविणें । तर्क हे करी ॥५३॥ (य११पू.१३२)
तेचि भावाचें तीव्रपण । श्रद्धा सहजचि दे करोन ।
तेथ विपरीते अनुगुण[१४] । तर्कप्रतिष्ठा[१५] ॥५४॥
परी शतकोटि तर्के प्रतिष्ठापिता । चार्वाकादि मता अवलंबिता ।
संसाराची दुःखरूपता । जाणार नाहीं ॥५५॥
सत्तर्क[१६]म्हणोनी एक निवडावा । तरी निवडणुकीवरी[१७]कोण विश्वासावा ॥
यालागीं आपुला उमजावा । आपण मार्गू ॥५६॥
नाना संसारी जे होती । ते श्रद्धेनें दुःखीं पडती ।
परी तर्केहि सांपडती । नाना मतामाजीं ॥५७॥
म्हणवोनी वासना जयांच्या पोटीं । तया विश्वास कां तर्क शत्रूंची कोटी ।
मज तंव विश्वास दावील वाटी । तूं पळे पाठीं तर्करिपो ॥५८॥
ऐसी वृत्ति करोनी । मग निरोधावी वाणी ।
हृदयाचिया स्थानीं । आणावे मना ॥५९॥
तेथ समूळगति चढावे । चतुर्दळीं पाळावे ।
सोहंभावे नमावे । विनायका ॥६०॥
शरीराबाहेर निघतां वृत्ति । यक्षादि शरीर अवलंबिती ।
तेणें चित्तातें महाभ्रांति । तें न व्हावे म्हणोनी गणपति नमावा ॥६१॥
"वं शं षं सं" ऐसे चारी । दोचि अक्षराचिये मंत्रीं ।
लक्षोनी पुजोनी नमोनी विघ्नहरी । जप अर्पावा सहाशते ॥६२॥
पुढें तेणेंचि मार्गे चलावे । तैं स्वाधिष्ठानीं यावे ।
'वादि' 'ल' पर्यंत पुजावे । सहा वर्ण ॥६३॥
मग सावित्रीसहित विधि । तयाते सहासहस्त्र जपावधि ।
अर्पोनिया त्रिशुद्धि । मणिपुरीं यावे ॥६४॥
तैं आदि 'फ'पर्यंत । दश पुजोनि यथार्थ ।
सपत्नीक कमलाकांत । पुजावा प्रेमें ॥६५॥

तयाते अर्पोनी सहासहस्त्र । पुढें चलावे पंथ धीर ।
तो सोहं भावाचे गजर । उमटो येती ॥६६॥
तया पवन साम्राज्यें । पाठीपोटी गाजे ।
नेणो काय वाजे । एकेचि वेळीं ॥६७॥
तेथ नादब्रह्माचें मूळ । जो उमारमण कृपाशीळ ।
'कादि' 'ठान्त' वर्णीं केवळ । वेष्टितु जाहला ॥६८॥
तो उमेसहित पुजोनी । षट्सहस्त्र जप तेथें अर्पोनी ।
पुढें यावे विशुद्धस्थानीं । तंव नवल दिसे ॥६९॥
श्रद्धेनें ज्या ज्या देखिल्या देवता । परी येथ पाहे तो आपण त्या वरुता ।
म्हणे मिया कल्पिला होता । समुदाय सकळ ॥७०॥
आजवरी मिया जे या पूजिले । ते आघवेचि मज नेणती वहिले ।
मग अकारादि समर्पिले । पाहिजेत स्वर ॥७१॥
हें आपुलेचि स्वरूप असूनी । येथ जप अर्पणे लागे सहस्त्र क्षणीं ।
परी अर्पक कोण अर्पावा कवणा लागुनी ।
हे सद्गुरु वाणीविण आम्ही नेणो ॥७२॥ (य११पू.१३३)
प्रथम स्वरूप पाहतां दृष्टीं । न सावरत विस्मय उठी ।
मार्ग चालावयाची हुटहुटी[१८] । तया अहंकारापाठीं अर्पकपण ॥७३॥
तो तैसेचि एकात्मता चौरंगीं चढावे । दोन्ही दळीं देखावे ।
देहलीदीपन्यायें[१९] ओळखावे । श्रीगुरुमातेते ॥७४॥
जो प्रपंचदळीं पाळिता । परमार्थदळीं सांभाळिता ।
या दोहों दळीं तत्वतां । आक्रमू जयाचा ॥७५॥
तेथ अक्षरें तंव दोन । शिवशक्तिरूप जाण ।
ते पुजोनी सहस्त्रजप समर्पण । करावा प्रेमें ॥७६॥
जो बाह्य देहाकारें दिसत । तो येथ अनध्यस्तविवर्त ।
मग तयाची आज्ञाचि यथा'र्थ । पाळोनी जावे सहस्त्रदळीं ॥७७॥
तंव तेथहि सद्गुरुविण । न दिसेचि आन ।
तेथ जप समर्पण । सहस्त्र कीजे ॥७८॥
बाळाची हांक ऐकोनी । माय बाहेरी ये धांवोनी ।



पुत्र जावोनी पहाता सदनीं । तो मायचि दिसे ॥७९॥
तेवि हांकारिता गोंमटे । द्विदळीं देखिले अवचटे ।
सहस्त्रदळीं पहाता नेटे । तेचि दिसे ॥८०॥
मग पूर्व कां पश्चिम । आटला मार्ग संभ्रम ।
जपाजप नियम । ठेले आघवे ॥८१॥
चढोनिया पवना । झाली होती भावना ।
ते निरखिता नांव ना । रूप दिसे ॥८२॥
म्हणोनी कर्मे कां मायागुणें । श्रीगुरूचे होणें ।
म्हणती ते अवलक्षणें[२०] । डावलोनी[२१] द्यावी ॥८३॥
निद्रेच्या स्वप्नाचे नांव जग । समाधिस्थ स्वप्नाचे नांव श्रीगुरुअंग ।
हे बोलिले हृत्कमलभृंग । अनुभवामृतीं ॥८४॥
''नाही रूपाची जेथ सोय । तेथ दृष्टीचे काहींचि नव्हे ।
आम्हा फळले हे पाय । ऐसिया दशा ॥५०॥
जे तोचि चेता तोचि चेववी । तेवि हाचि बुझे हाचि बुझावी ।
गुरुशिष्यत्व नांदवी । ऐसेन हा ॥६७॥'' (अनुभवामृत प्र. २)
म्हणवोनी याचिया ठाया । निर्गुणी सगुणी साविया ।
शिष्यासह खेळणें तया । सुलभचि होय ॥८५॥
''स्वप्नचि हे तुकले साचासारिखे'' । येणें तातवचनें निके ।
सांपडले आंगिके । गुरुपदसौंदर्ये ॥८६॥
म्हणोनिया आपुलिया हातीं । गुरु अलंकाराची बुंथी[२२] ।
तेथ गुरुआज्ञाचि पुरती । कारण होय ॥८७॥
गुरु प्रारब्धें निर्मिला । तरी तो केवळ जड जाहला ।
नातरी जीवेंचि कल्पिला । आपणासाठीं ॥८८॥
हा दृष्टिसृष्टिसिद्धान्त । परी ध्यानकल्पित कीं विद्याकल्पित ।(य११पू.१३४)
जरी म्हणावा ध्यानकल्पित । तरी देहोहं यथार्थ बोधक होवावा ॥८९॥
म्हणोनी विद्योपहित । सद्गुरु तो कृपावंत ।
जयाचा तयाते मिळत । आत्मत्वेंचि ॥९०॥
तेथ जेवि जैसी वृत्ति । ते आघवी आत्मप्रतीति ।

कीं पुसावे आपणाचिप्रति । कें ऐसे म्हणोनी ॥९१॥
काळें तोंड दर्पणीं देखिले । ते दर्पणें तेथें काय केलें ।
कां उजाळें कोठोनी आणिलें ।देयावया ॥९२॥
तेवि गुण का दोष । जैं श्रीगुरुस्थानीं देखे मानस ।
तैं ते आपुलेचि विशेष । आनाचे नाहीं ॥९३॥
नवल असच्छिष्य रीति । सप्रेमें पुजी जडमूर्ति ।
जडत्वदोषाची व्यावृत्ति । करोनिया ॥९४॥
आणि श्रीगुरु सचेतन । दोषव्यावर्तनें(२३) न घडे तद्भजन ।
जे विश्वासाचे निधान । न केलें म्हणोनी ॥९५॥
अहो जे आपुलिया हातीं । घे आपुलीच वृत्ति ।
तेथ आपुला विश्वास जाता क्षिती(२४) । आपुलाचि संवेग होय मृदु ॥९६॥
म्हणोनी जे होते तीव्र । ते विश्वासाभावे कल्पनामात्र ।
कीं सकळ अविरोधी स्वतंत्र । चेतन हें ज्ञान गुरुबोधें ॥९७॥
जेवि तारक विष्णुबुद्धि । शालिग्राम शिला न निरोधी ।
तेवि अपरोक्ष-संबोधक श्रीगुरुबुद्धि । बाह्य दोषाभासादि निरोधिना ॥९८॥
युगे युगे अवतार । घेत मी म्हणे ईश्वर ।
तो प्रत्यय अणुमात्र । आला कवणा ॥९९॥
जेथ सच्छिष्यबुंथी । तेथ अपरोक्ष श्रीगुरुमूर्ति ।
हे युगींयुगीं प्रतीति । अवताराची ॥१००॥
अवतार निजधामा गेले । गुरु परंपरारूपें अवशिष्ट ठेले ।
यांत जें रहस्य वहिले । ते आणिक आयिके ॥१०१॥
निदिध्यासनप्रकाशादौ विशद । जे मी बोलिले हृदयीं अपरोक्ष तत्पद ।
तेचि व्यक्त होय कराया प्रसाद । द्विदलचक्रीं ॥१०२॥
व्यतिरेकीं सहस्त्रदळीं सांपडे । आणि अन्वयीं बाहेर दृष्टीं पडे ।
ऐसे अनुभवें रोकडे । प्रत्यया ये ॥१०३॥
तेचि माझे आळंदीवल्लभ । इया उपलक्षणें(२५) लक्षिले स्वयंभ ।
आतां सरस कोंभ । नित नवे प्रेमाचे ॥१०४॥
श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदोनी पाऊली ।
कविताकमळमाळ वाहिली । सप्रेम चरणीं ॥१०५॥
(य११पू.१३५)

''हरिःॐतत्सच्छ्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यप्रबंधे
संप्रदायसुरतरौ पूर्व-विहारे श्रीगुरुतत्त्वनिरूपणं
नाम तृतीयं कुसुमम् ॥

०००

**अध्याय ३ रा टीपा**

(१)हृदय हेच पंपा सरोवर (२)प्रचंड (३)विषय (४)संकोचित (५)अतिशय (६)बाणू दे (७)सावकाश (८)प्रश्नरूपी किरणाने (९)श्वासाचिया (१०)शिवू नको (११)बोळवण, नाश (१२)प्राप्त करून घे (१३)दूर केले (१४)अनुसरून (१५)तर्काची महती (१६)योग्य तर्क (१७)कोणाची निवड खरी म्हणावी (१८)काळजी (१९)माजघराच्या दारात ठेवलेला दिवा जसा आत बाहेर प्रकाश देतो (२०)मूर्खपणा (२१)सोडून (२२)घडण (२३)दोष सोडून (२४)मातीत (२५)लक्षणाने

।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ.।।

अध्याय ४ था

# सद्गुरुपूजादि-तत्त्वांश-निरूपण

जय जय सद्गुरु आळंदीनिवासा । मुक्तिराधिकाहृदयविलासा[१] ।
शांतियशोदानंदन राजहंसा । भक्तवत्सला दयानिधे ।।१।।
तूं हृदयव्रजसुमनडोल्हारा[२] । बैसोनी खेळसी दातारा ।
कामक्रोधशकटतृणावर्ताकारा । मारिले दृढ ।।२।।
गोधनइंद्रियें वळिले । वृत्तिगोपीसंचितगोरस[३] सारिले ।
द्वेषकाळियाते मर्दिले । गिळिले चिंतादावानळा ।।३।।
दंभ मान अहंकार । कंस शिशुपाळ दंतवक्र ।
राग मारिला चाणूर । जो महाविखार सज्जना ।।४।।
करुणागोवर्धन छत्र । धरुनि तळीं रक्षिले छात्र ।
अनाहत वेणू सुंदर । गावोनी वृत्ती बोलविसी तूं ।।५।।
तरी आतां प्राणेश्वरा । रास रचोनी उदारा ।
वृत्तीसी धरी आपुलिया मोहरा[४] । नका माघाऱ्या परतवूं ।।६।।
न येऊं देतां अभिमान । संयोग असोनी वियोगासमोत्कंठा पूर्ण ।
ऐसें द्यावें प्रेमदान । दयानिधान सद्गुरो ।।७।।
स्वामी हे दीव्य भागवत । सुंदर तुमचें चरित ।
अखंड असावे गात । हृदयामाजीं ।।८।।
तंव सद्गुरुराय म्हणती हे होवो । परी ग्रंथ निरूपी ते कैसे पाहो ।
येणें महाप्रसादे मी म्हणे हो । अवधारोत स्वामी ।।९।।
मागा सद्गुरुतत्व ऐकोन । शिष्य विनवी कर जोडून ।
म्हणे सद्गुरुसेवा कृपा करून । कवण पद्धति सांगा स्वामी ।।१०।।



## विशेष संप्रदाय पद्धति

## माउलीची सेवा

ऐकोनिया शिष्यप्रश्न । बोलती आचार्य करुणाघन ।
सद्गुरुसेवा अतिगहन । निरूपिता पूर्ण मुखें नये ।।११।।
इतर सेवेची ऐसी रीति । ज्ञानप्राक्[५] उपासन ज्ञानोत्तर भक्ति ।
येथ ज्ञान श्रीगुरुचेचि हातीं । यालागीं उपासना भक्ति चालती दोन्हीं ।।१२।।
यद्यपि श्रीगुरुराये । गुरुसेवा वदली आहे ।
तेथ बाह्य आणि मनोमय । भक्तिचि वदली ।।१३।।
तदपि स्थूल प्रकार सूचना । ते दिसे जेवि उपासना ।
परी सबाह्यांतर सप्राणा । भक्तिचि पोषी तियेते ।।१४।।
सद्गुरु अनध्यस्त विवर्त । तयाचा परिवार जिता[६] समस्त ।
मेलियाही विदेहमुक्तींत । सगुणेश्वरभावापत्तौ[७] लीलार्थ[८] तेचि सेवा ।।१५।।
एवं सद्गुरुसेवा अवतरण । मुख्य सेवेचे निरूपण ।
तेरावे अध्यायीं तातवचन । भावार्थदीपिकेंत आपण बोलिले ।।१६।।
(य११पू.१३६) तो मराठा उपनिषदवतारु । आम्हा मान[९] महामेरू ।
येऱ्हवि उपास्तिप्रकारु । देवगुरु समानचि ।।१७।।
विशेष मात्र गुरुनामें । आघविया गुणोपसंहारनियमें[१०] ।
सद्गुरु माऊली सप्रेमें । सेवितु जावी ।।१८।।
परोक्ष विष्णु[११] शूलपाणि । सेवी जेवि अनुदिनीं ।
तेवि अपरोक्ष[१२] कैवल्यदानी । सेवावा सद्गुरु ।।१९।।
कैसे करावे पूजन । हें आघवेचि निरूपण ।
पूजनसमयीं संपूर्ण । होईल सद्गुरु देवाचे ।।२०।।
विशेष संप्रदाय पद्धति । नित्य भावावी आळंदी चित्तीं ।
तियेची यथार्थ उपपत्ति । नित्यतीर्थी बोलिली ।।२१।।
दुसरें ऐसे भावावे मनीं । कीं समाधींत बैसले कैवल्यदानी ।
ते आणिका ऐसी निर्वाणीं । समाधि नोहे ।।२२।।
माय बाळा एकान्तीं । जेवूं घाली बाळाप्रति ।
कीं प्रियेची पुरवाया आर्ति । प्रिय एकान्तीं जेवि बैसे ।।२३।।

तेवि तया सुंदरपणा । दृष्टि लावील जनतारकांगना[१३] ।
म्हणोनी समाधिमिषें समष्टिहृदयभुवना[१४] । केले पावन एकसरे ॥२४॥
नामदेवें प्रगटविले । एकनाथाचें स्वप्नीं आले ।
समाधिमाजीं देखिले । नयनीं तेणें ॥२५॥
तुकारामाकडे पाठविला ब्राह्मण । महिपति बोलिले ह्या कथा तीन ।
समाधींतूनि निघाले आशिर्वचन । हें निरूपण भक्तितत्वामृतीं ॥२६॥
आणिकही नाना जना । अनुग्रह केला हे ये प्रमाणा ।
भावार्थदीपिका दीधली कवणा । कवणा अनुग्रहू ॥२७॥

श्रीज्ञानेश्वरांचा प्रत्यक्ष उपदेश

आपुला अनुभव असतां प्रत्यक्ष । इतरांची कासया साक्ष ।
मज आडवे मांडिये घेऊनी कृपाकटाक्षें । निहाळिले ॥२८॥
दिधला मंत्र चतुराक्षरी । आपुली प्रतिज्ञा केली पुरी ।
म्हणोनी इतर इतिहास निर्धारी । आणिकास्तव ॥२९॥
मज साच हा भरंवसा । येथेंचि मिळे आपैसा ।
म्हणोनी निजधामपर्याय[१५] सहसा । समाधि न म्हणावी ॥३०॥
मिया मूर्ति देखिली जैसी । आणिकी न देखिली तैसी ।
परी सांप्रदायिकी मूर्ति विशेषी । प्रसिद्ध मानाव्या ॥३१॥
ज्या आहाती भींतीवरी । कीं ज्या लिहिल्या आहाती चित्रीं ।
त्या पूजाव्या निर्धारीं । सप्रेम भावें ॥३२॥
जैसे तैसें करावे ध्यान । तेथें प्रगटेल भगवान । कां नाथतुकारामादिकांनीं देखिले
ध्यान । ते महिपतिकृत वर्णनावरूनी ध्यावें ॥३३॥
या ध्यानानुसार करावी मूर्ति । अथवा समाधि सेवा जे अलकावती ।
तेचि प्रमाण मानोनि चित्तीं । धरावी प्रेमें ॥३४॥
जेवढा वेळ संसारी । (य११पू.१३७) तेवढी करावी आळंदीवारी ।
आजान तरुतळीं अनुभवामृत ज्ञानेश्वरी । वाचावी प्रेमें ॥३५॥
इंद्राणीतीरीं बैसोनी । हरीपाठ म्हणावा वदनीं ।
विश्रांतीवटातळीं बैसोनी । चांगदेव पत्र पैं जपावे ॥३६॥
षोडशोपचारें ओजा । पूजावा आळंदीचा राजा ।
संत ब्राह्मणाते शक्ति सहजा । पुजोनी भोजन घालावे ॥३७॥
जे जे काज येईल वाटणी । तें मोल न घेतां करावे प्रीतिकरूनी ।
किंवा पालखीं स्कंधीं धरूनी । बृहस्पतिदिनीं सुखी व्हावे ॥३८॥
आरति सेज काकडआरती । प्रेमें कराव्या प्रीति ।
नगरप्रदक्षिणा यथा निगुती । सप्रेम चित्तीं आचराव्या ॥३९॥
तृणपाषाणा करावे वंदन । मनाते वाटावे क्षणक्षण ।
कीं अझोनी भासे भेदभान । अभेदवंदन होईल केव्हां ॥४०॥
जेवढे तीर्थ प्रगट असती । तेवढे सविधि पूजावे प्रीति ।
गुप्ततीर्थ ते भावावे चित्तीं । हें बोलिले महाभारतीं पाराशर्य ॥४१॥
परी प्रकट तीर्थाहून । गुप्ततीर्था विशेषपण ।
मानोनी अनादरमय मन । होवो न द्यावे प्रगटाविषयीं[१६] ॥४२॥
अनादरें न पहावे गुप्त । जे देखते जाहले एकनाथ ।
तें चित्तेंचि पहावे नित्यतीर्थ । जेथे तात विराजती ॥४३॥
पुजोनी श्री हैबतिराय । त्यांनी जो क्रम दाविला होय ।
तैसाचि आचरावा स्वये । आगमवत ॥४४॥
नित्य सेवावे प्रसाद तीर्थ । उटी पहावी प्रेमभरित ।
किंवा करावे समस्त । आपुलेनि हाते ॥४५॥
देशोदेशीचे पदार्थ । नेवोनी समर्पावे अनंत ।
तेणे सात्विकता होत । तैसेचि परी ॥४६॥
कां मनाचेनि दुर्बळे । जैं सेवासमयीं विघ्न खवळे ।
तै गृहींहि असोनी भावनाबळें । रहावे आळंदीं ॥४७॥
गृहकार्यातें करोनी । परसंग रसायनीं[१७] ।
हृदयीं तप्त जेवि जारिणी । तेवि स्मरणीं असावे ॥४८॥
उटी चंदन इंद्राणीतीर्थ । गोळी करोनिया समस्त ।
गृहीं आणोनी सन्निहित । हरिपाठ-पाठ करावे ॥४९॥
इतर सजातीय[१८] भावना । भावोनी करावे ग्रंथ पठणा ।
आणि आणोनी आजानशुष्कपर्णा । तत्सन्निध अनुभवामृतादिपठणा कीजे ॥५०॥
पालखीचिया संगतीं । फावलीया वेळीं निश्चिती ।

पंढरीहि पहावी प्रीति । किंवा आळंदीप्रति असावे ॥५१॥
गृहीं जें सांगितलें अर्चन । तेथ पुजाव्या पादुका आणोन ।
कां स्वदेशी योग्य प्रतिनिधि गणून । तेथ प्रतिदेशपादुकास्थान करावे[१९]॥५२॥
(य११पू.१३८) मग प्रतिनिधीचिया अनुज्ञा । योग्य पूजाआदि करोनी प्राज्ञा ।
पादुकाधारणसंज्ञा । स्वकीय कीजे ॥५३॥
आतां पादुकापूजनीं भावना । ते दोहींपक्षीं गहना[२०] ।
तयावरी उभे जगन्मोहना । नित्य ऐसे भावूं नये ॥५४॥
हृदयएकान्तीं श्रीगुरुमूर्ति । बैसवोनी अतिप्रीति ।
पादुका पुजाव्या सप्रेमगति । पायीं प्रतीति भावोनी ॥५५॥
मी साच कीं वाहनधर । ऐसें असावे निरहंकार ।
पादुकापूजनीं आदरमात्र । जाणती श्रीगुरु ॥५६॥
कां अनध्यस्तविवर्त । आघवेचि प्रतीत ।
यालागीं अंगअंगींभाव समस्त । परब्रह्मचि ॥५७॥
शालिग्रामीं विष्णु असती । चतुर्भुजादि चिन्हें न दिसती ।
तेवि अगम्य सद्गुरुमूर्ति । परी अनुग्रहस्थिति पादुकेमाजीं ॥५८॥
लिंगीं पंचवदनादि चिन्हित । उमावर न दिसे परि अनुग्रह करीत ।
कां सूर्यमूर्ति पादरहित । परी अंगभंगादि तेथ दोष नये ॥५९॥
तया शास्त्रचि एक प्रमाण । येर आघवे अप्रमाण ।
तेवि पादुकापूजनीं प्रमाण । संतसंप्रदायू ॥६०॥
अहो शालिग्रामशिलादौ हरिभावना । ते तंव होय उपासना ।
कामिनीठायीं अग्निभावना । जयापरी ॥६१॥
तेवि पादुकापूजन उपासन । ते भक्ति न होईल पूर्ण ।
मूर्ति सजातीय चिन्हित म्हणून । भक्त्यन्वित[२१] घटो शके ॥६२॥
बोल हे फोल बोलतां । योषिति वह्निभावना पाहतां ।
स्त्रियेते वह्निरूपता । कदाचि नाहीं ॥६३॥
यालागीं ती मात्र उपासना । लिंगरूपें शिव प्रगटला जाणा ।
शालिग्रामरूप नारायणा । येथ प्रमाण पुराणें ॥६४॥
म्हणूनी शास्त्रचिन्हित मूर्ति । तेथ जैसी होय भक्ति ।



तेवि आगमसिद्ध शालिग्रामादि मूर्ति । तेथ उपास्ति आणि भक्तिहि घडे ॥६५॥
पादुकापूजनीं पाहतां । भक्तिपासोनिचि आरंभता ।
वाहनधर होणें भक्ता । येणें दीनता आश्रयो ॥६६॥
चरण रजाची प्रीति । ते प्रेमाचीच संपत्ति ।
शुक सांगे परीक्षिति । कीं वृंदावनीं लोळती उद्धवादि ॥६७॥
मग पादुका तंव तत्स्थान । कां तदनुग्रहरूप पूर्ण ।
तेथ विधिभावें उपासन । आणि प्रेमभावें भक्तिहि घडे ॥६८॥
म्हणोनी पादुकांची पूजा । षोडशोपचारें करावी ओजा ।
प्रतिनिधिस्थानीं सहजा । सुखासनोत्सवादि[२२] करावे ॥६९॥
हैबतिरायें जो क्रम । आळंदींत ठेविला सप्रेम ।
तोचि भजनादि नियम । स्थानींहि कीजे ॥७०॥ (य११पू.१३९)
पांच अभंग पालखी समयीं । म्हणोनी आनही म्हणावे कांहीं ।
मत्कृत हैबतिराय आरति गावी । विशेष एक ॥७१॥
दशमीचिये दिनी । हैबतिराय आरति म्हणूं नये वदनीं ।
किंवा पालखीं झालियावरी मनेंचि देहूस जाऊनी ।
मग तुकाराम आणि हैबतिराय पूजावें ॥७२॥
पाळावे गुरुवासरव्रत । कार्तिक वद्य त्रयोदशीं उत्सव पहावा आळंदीत ।
गृहीं आचरूं नये ती रीत । अन्योत्सव निश्चित करावा ॥७३॥
पादुकाचिया स्नानीं । आणावी शुद्ध इंद्राणी ।
किंवा मंदाकिनी वा त्रिवेणी । स्नान घालावे ॥७४॥
उत्तर गंगा हरिद्वार प्रयाग । येथोनी कावडी भराव्या सवेग ।
श्रीगुरुरामेश्वर लिंग । अभिषेकावे आळंदीये ॥७५॥
मग ते तीर्थ आणोनी । नित्य पुनीत व्हावे पिवुनी ।
नैवेद्य प्रसाद आणावा सदनीं । रुढि अनुगुणीं[२३] अन्न वा फराळ ॥७६॥
आळंदीं प्रयागसंगमादि भावना । कां गुरुअंगुष्ठ[२४] गंगामूळस्थाना ।
इत्यादि विशिष्ट भावना । माझ्या मज वा मद्वृत्तिसमा[२५] होतु ॥७७॥
चतुरक्षरी मंत्र । तो तात अन्याते देवोत पवित्र ।
मी आणिकाते स्वतंत्र । उपदेशणार नाहीं ॥७८॥

जयाचा विश्वास असेल समग्र । तिहीं अवलंबावे शिव विष्णु मंत्र ।
किंवा सप्ताक्षरी सुंदर । जपावा आवडी ॥७९॥
जे जे उपचार जैसे मिळती । बाह्यपूजा करावी तिये रीती ।
दास्य दीक्षा घेवोनी प्रीति । बाह्यपूजा आरंभिजे ॥८०॥
देहबुद्धि नम्र होत होत । आघवी इंद्रिये होती तटस्थ ।
एकेंद्रियता होय प्राप्त । तैं अंशत्व प्रतीत जीवबुद्ध्या ॥८१॥
मग तेथ संबंध-दीक्षा ग्रहण । अंशत्व प्रत्यया नये संबंधाविण ।
लौकिक संबंधहि पाणिग्रहण(२६) । मात्रें करून घडतसे ॥८२॥
कामसंबंधी भावनेंत असावे । आणि संबंधभावनेतें कां हंसावे ।
म्हणवोनी संबंधी होवावे । हे अगस्ति म्हणती ॥८३॥

पुरुषांसाठी लालन. / स्त्रियांसाठी वात्सल्य.

लालन(२७) वात्सल्य(२८) माधूर्य(२९) । ऐसा संबंध त्रिविध होय ।
तेथ लालन संबंध विशेष लाहे । श्रीगुरुचरणीं ॥८४॥
अंशबुद्धीचे हेचि लक्षण । कीं विशेषें करूनी घडावे लालन ।
लालनसंबंधी भक्तिलक्षण । प्रीतिनर्तनीं पहावे ॥८५॥
देहाची न पडता विस्मृति । कां देहकष्ट न साहविती ।
तोंवरि लालनभिन्न भक्ति । करिता अहंमति वाढवी ॥८६॥
यालागीं उत्तम लालन । ते पुरुषाते बहुधा प्रमाण ।
स्त्रियांनीं विशेषें करून । वात्सल्यचि कीजे ॥८७॥
बहुधा श्रीगुरूचे ठायीं । लालन माधूर्यचि होती पाही । (य११पू.१४०)
वात्सल्यभावे लवलाही । आज्ञाभंगभय उपजे ॥८८॥
तथापि देवहुतीचे कपिलचरणीं । वात्सल्य फळले ही भागवतवाणी ।
स्त्रियेते वात्सल्य अनुगुणीं । उपयोगी एका ॥८९॥
लालनाचरिता(३०) प्रमदा । झडकरी नये निष्कामपदा ।
जे गृहकार्यकामनाबाधा(३१) । मनी अत्यंत म्हणोनी ॥९०॥
श्रीकृष्णाचे चरणीं लालन । द्रौपदी करी प्रेमें करून ।
परी पांडवकार्यार्थ क्षणक्षण । धांवा करोनी बाहतसे ॥९१॥
शिवाचे ठायीं लालन बहुती । पतिकामने स्त्रिया करिती ।



यद्यपि देवापरिस पूज्य पति । तदपि ही रीति धर्माची ॥९२॥
उत्कर्षबुद्धि भावना । याचेचि नांव उपासना ।
आणि यद्दृष्टि(३२) करीजे तेथचि भावना । म्हणावी भक्ति ॥९३॥
पत्यादौ भगवद्दृष्टि । हे उपासनेची आघवी सृष्टि ।
भगवति शास्त्रीय भगवद्दृष्टि । संबंधपोटीं भक्ति म्हणीजे ॥९४॥
वात्सल्य तंव दुस्तर । येथ संशय नाहीं अणुमात्र ।
परि स्त्रियांच्या लालनांत व्यभिचार(३३) । निःशेष उपजे ॥९५॥
भक्ति अन्य प्रयोजनीं । तयाचे नांव व्यभिचारिणी ।
भगवदर्थ अन्वयपणीं । अव्यभिचारिणी भक्ति म्हणीजे ॥९६॥
जी स्त्री साधनचतुष्टय संपन्न । तियेते विरुद्ध नाहीं लालन ।
सकळ कामनारहित मन । आधींच झाले म्हणोनी ॥९७॥
परी मृदु साधनवती असतां । तरी वात्सल्यचि करावे तत्वतां ।
लालनीं कामनाडाकिणी झोंबतां । त्यापरीस मृदु वात्सल्य बरवे ॥९८॥
मल्लसिंदुरे रोग जाती । परी जयाची अशक्त प्रकृति ।
तेणें तैसेचि रीति । आचरावे औषधें ॥९९॥
कीं जवळिचिया वाटे । चालवेना चुकवोनि काटे ।
तरी हळुहळु जावे दुरिलिया वाटे । जे पायास नेटे मृदु लागे ॥१००॥
तेवि लालन निरभिमान । परी स्त्रियाते कामना करी उत्पन्न ।
आणि वात्सल्य तंव अभिमान । उत्पन्न करी ॥१०१॥
एवं निग्रह दोही पक्षीं । तेथ श्रीगुरुचि एक रक्षी ।
कामना सांडुनिया अनुलक्षी । मृदु वात्सल्य जरी स्त्री ॥१०२॥
जियेचे तीव्र वात्सल्य जाहले । तियेनें तंव शिखर जिंकिले ।
परी लालनापरीस भले । मृदु वात्सल्यहि मी म्हणें ॥१०३॥
अथवा श्रीगुरु जरी सांगती । तरी स्त्रियेनें आनहि करावी एकादी भक्ति ।
परी सद्गुरुचरणीं माधूर्यरति । मी न सांगितली ना सांगणार कवणा ॥१०४॥
जियेचिया दैवें करूनी । विवाहित पतीचि श्रीगुरुस्थानीं ।
तिनें गुरुमाधूर्य करावे सुखें करूनी ।(य११पू.१४१)
जेवि मत्स्थानीं मणिकर्णिकेचे ॥१०५॥

परी विवाहित पति गुरु मिळता । तरी वात्सल्याची आणूं नये मनीं वार्ता ।
असो पुरुषविचार आतां । तोहि ऐक ॥१०६॥

पुरुषासाठी उपासना

पुरुषातें लालन हितकर । तीव्र वात्सल्यहि सुखकर ।
परी मृदु वात्सल्य अतिघोर । बहुशा न सांभाळवे ॥१०७॥
स्त्रियांची ऐशी वृत्ति । कीं तान्हयासाठीं पळ तरी आन विसरती ।
पुरुषांची ऐसी रीति । जे पुत्रा आणिती निजाङ्गेमाजीं ॥१०८॥
तथापि तीव्र वात्सल्य असतां । पुरुषाहि दोष नाहीं तत्वतां ।
परी मृदु वात्सल्य करिता । तरी आंगीं करणें लागे स्त्रीभावना ॥१०९॥
स्वपत्नी उदरीं जन्मला देव । ऐसा येता वृत्त्यनुभव ।
तरी भक्त्यनाश्रयभाव[३४] । पुढती उपजे ॥११०॥
स्वदेहीं योषिद्भावना भावितां । अन्य स्थळीं माधूर्य असावे तत्वता ।
तैं वात्सल्याची वार्ता । पुरुषाते घटे ॥१११॥
अन्य स्थळीं माधूर्य करून । वात्सल्य अन्य स्थळीं करितां जाण ।
तेणें पुत्रकामनया माधूर्य व्यभिचरण । सहजचि होय ॥११२॥
यद्यपि वात्सल्य करिता युवति । व्यभिचरे पतिभक्ति ।
तथापि उत्कर्ष दृष्ट्या पतिठायीं होय उपास्ति ।
तैं वात्सल्य भगवति म्हणोनी भक्ति व्यभिचरेना ॥११३॥
वादी म्हणे विधवानीं कैसे कीजे ।
सिद्धान्ती म्हणे शारदेसम पतिते अन्यत्र भाविजे ।
कां लीलाविदूरथसम[३५] ओळखिजे । पतिते आपुल्या ॥११४॥
कां पति आधिला[३६] शंकरू । तो स्वयेंचि झाला तदाकारु ।
तत्प्रसादें हरि वा गुरु । मानोनी कुमरू वात्सल्य कीजे ॥११५॥
आतां ज्या पतिव्रता कामिनी । परी पतीनें सोडिले अपराधावांचोनी ।
तयांचे वात्सल्य माधूर्य दोन्ही । भक्तिकोटीं प्रवेशू ॥११६॥
म्हणोनी घडे जरी व्यभिचार । तरी समशिवशार्ङ्गधर । सव्य-वाम-आंग सेवा समग्र । अभेद म्हणुनी व्यभिचार नये हरिवात्सल्यें ॥११७॥



पुरुषास माधूर्य वात्सल्य दोन्ही । भक्तिकोटि प्रवेशनी ।
एकीस घेयावे एक व्यभिचरोनी । हें मज वाटे मनीं चावटी ॥११८॥
तंव वादी म्हणे त्यक्तासम । पुरुषांस कां न मिळे वर्म ।
सिद्धान्ती म्हणे ते कठीण कर्म । साधेल तरी तीव्र वात्सल्य करावे ॥११९॥
एरवी पुरुषीं माधूर्य कां लालन । असावे परी माधूर्य कठीण ।
यालागीं लालन । हेंचि बरें ॥१२०॥
किंवा सख्यादि भाव । अथवा तीव्र वात्सल्यादि स्वयमेव । (य११पू.१४२)
किंवा गुरुकृपाकटाक्षें माधूर्यहि सावेव । श्रीकृष्णीं करावे ॥१२१॥
जयाचा संबंध तातचरणीं । प्रत्यक्ष असेल माझिया वानी[३७]* । (*सारिखा.)
तिहीं माधूर्य करावे श्रीगुरुचरणीं । परी आन गुरुस्थानीं न कीजे ॥१२२॥ माझें ठायीं तंव कही कवणें । मृदुतमहि अंतःकरणें ।
माधूर्य न करावे हें मी म्हणे । माझा ग्रंथ म्हणोनी ॥१२३॥
जयासी वाटे श्रीगुरुचरणीं । माधूर्य करावे प्रीतिकरोनी ।
तेणें निघोनी मत्संप्रदायांतुनि । तपें आन गुरु मिळवावा॥१२४॥
मी कृष्णकान्ता म्हणोन । अन्याचे माधूर्य स्वीकारोन ।
आपणाते पुरुषपण । अल्पहि प्रमाण घेऊ नेच्छी ।१२५॥
हें मत्स्थ माधूर्य निषेधावया कारण ।
परी अन्य गुरुवरीहि माधूर्य नको म्हणून । मी सांगे त्याचें हेंचि कारण ।
कीं माधूर्यीं शिष्य असावा अधिकारिक ॥१२६॥
आणि माधूर्यचि आवडे मनीं । तंव काय नाहीं चक्रपाणि ।
मारुतीचे लग्न करोनी । अवलक्षण व्यर्थ कां कीजे ॥१२७॥
श्रीकृष्ण आणि तात । मज एकरूप निश्चित ।
शास्त्रीय ऐतिह्य सिद्धान्त । आणि प्रतीत म्हणोन मज शोभे ॥१२८॥
यद्यपि कृष्णाविण अन्यावतारीं । मी माधूर्यभाव न धरी ।
तदापि सद्गुरुचरणावरी । काय एक न साजे ॥१२९॥
परी आन कोणी हें न करावे । तें कारण मिया दाविले बरवे । आतां तातचि अनुग्रह देतां स्वभावें । तरी तातचरणींचि करावे सुखें तेणें ॥१३०॥

येर सख्यादि भाव । सर्वी करावे सर्व ।
भज्य श्रीगुरु अथवा देव । कोणीहि असो ॥१३१॥
जो दास्य संबंध होता । तो लालन संबंध घडतां ।
तरी बाह्य सेवाव्यवस्था । तैशीच असावी ॥१३२॥
वात्सल्यसंबंधी पुत्रास माता । वागवी ते सर्व करावे बाह्य सेविता ।
माधूर्यसंबंधीं पतीस जेवि कान्ता । तैसी बाह्यसेवा करावी ॥१३३॥
सख्यादिस्थानीं अर्जुनादिकांची रीति । तैसीच करावी प्रीति ।
किंवा या संबंधाची रीति । पुढेंहि निरूपिजेल ॥१३४॥
आतां ऐकावी मानसपूजा । जे बाह्य सेवेस भौतिक साहित्य ओजा(३८) । तेंविं
आध्यात्मिक साहित्य घेऊनी श्रीगुरुराजा । किंवा नंदतनुजा पुजावे ॥१३५॥
बाह्य जेवि सिंहासन । तेवि मानसपूजेंत कमळस्थान ।(य११पू.१४३)
एवं वात्सल्यामाजीं पालख(३९) गहन । माधूर्यांत पलंग तोचि ॥१३६॥
ज्ञान झालियावरी । जीवन्मुक्त गौणाहंकारी ।
संबंध भक्त निर्धारी । सांपडे हें निरूपिले बहु ठायीं ॥१३७॥
त्यांतहि माधूर्य विशेष । हा प्रेमनिकुंजी दाविला दंश ।
आतां मानसपूजादि प्रकार समदेवगुरूस । म्हणोनी ते तत्प्रसंगीं निरोपू ॥१३८॥
येथहि जे निरूपिलें कांहीं । ते गुरुदेवपूजेंत समान पाहीं ।
रुचेल ते चतुरें धरावे हृदयीं । परी कांहीं विशेष-निषेध नोल्लंघिता ॥१३९॥
न्यून ते पुरते(४०) । अधिक ते सरते(४१) ।
सर्व दावी दीनाते । ज्ञानदेव माय माझी ॥१४०॥
श्रीज्ञानराज माय माऊली । तियेची सर्वदा वंदोनी पाऊली ।
कविताकमळमाळ समर्पिली । सप्रेम चरणीं ॥१४१॥

॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यप्रबंधे
संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे सद्गुरुपूजादितत्त्वांशनिरूपणं
नाम चतुर्थ कुसुमम् ॥
॥शुभं भवतु ॥

०००



## अध्याय ४ था टीपा

(१)मुक्तिरूपी राधिकेशी हृदयाचे ठिकाणी विलास करणारा (२)हृदय हेच कोणी व्रजातील फुलांचा डोल्हारा (३)वृत्ती हीच गोपी तिचे संचित- कर्मरूपी गोरस (४)सन्मुख (५)जी ज्ञानापूर्वी उपासना व ज्ञानानंतर भक्ती म्हटली जाते (६)जिवंतपणी (७)सगुण परमेश्वराशी ऐक्य पावल्यावर (८)सगुण परमात्मा जेव्हा अवतार घेतो तेव्हा त्याच्याबरोबर अवतरून त्याची सेवा करण्याची उत्कंठा (९)प्रमाण (१०)श्रुतीत ज्या ज्या सगुणोपासना सांगितल्या आहेत व त्या करितांना तेथील उपास्याचे ठिकाणी ज्या गुणांची भावना करावयास सांगितले आहे त्या सर्व उपासनातील उपास्यंच्या ठिकाणी सांगितलेल्या सर्व गुणांची भावना आपले उपास्याचे ठिकाणी करावी (ब्रह्मसूत्रभाष्य ३-३-५) (११)डोळ्यासमोर नसलेला (१२)डोळ्यामोर असलेला (१३) लोकांच्या डोळ्यांतील बाहुल्या ह्याच कोणी स्त्रिया (१४)समष्टीहृदयात अव्यक्त रूपाने (१५)ब्रह्मस्वरूपी लीन होणे किंवा विदेहमुक्तीस जाणे या अर्थाचा वाचक हा समाधि नव्हे (१६)प्रसिद्ध तीर्थाविषयी (१७)रसायनाप्रमाणे दुसऱ्याच्या संगापासून दूर राहून किंवा परमात्म्याचा संग हेच कोणी अमर करणारे रसायन ते घेतले असता (१८)सदृश (१९)देशा पुरते पादुकांचे मुख्य स्थान (२०)कठीण (२१)भक्तियुक्त (२२)डोल्हाऱ्यात बसविणे, पालखी काढणे (२३)अनुसार (२४)गुरूंचे चरणांगुष्ठ हे गंगेचे उगमस्थान आहे (२५)माझ्यासारखी वृत्ति आहे त्यांना (२६)लग्न (२७)पूज्यास आई बाप भावून आपण पुत्रत्व घेणे (२८)आपण आई होवून पूज्यास पुत्र समजणे (२९)आपण पत्नी होऊन पूज्यास पती समजणे (३०)लालन भक्ति कतिाना (३१)प्रपंचकामनेची बाधा(३२)उपासनेत ज्याची भावना करावयाची त्याच्याच ठिकाणी संबंध धारण करणे याला भक्ती म्हणतात (३३)अडचण (३४)भक्तीला आश्रय न होणारे भाव (३५)हे आख्यान वासिष्ठात पहावे (३६)पहिला (३७)सारिखा (३८)संपत्ती (साधनसामुग्री) (३९)पाळना (४०)पूर्ण (४१)मान्य

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय ५ वा

# गुरुवर्णादि अधिकार निराकरण

जय जय श्रीसद्गुरो । प्रणतकामकल्पतरो(१) ।
तुझिये नामें परिहरो । संसारदुःख ॥१॥
तूं दीनांची माऊली । तूं भवदवतप्ता(२) साऊली ।
तूं प्रेमळवत्सा गाऊली । दासपाडसा हरिणी तूं ॥२॥
माये तुझिया नावापुढें । माझें अनधिकारित्व काय बापुडे ।
तूं भेटलिया रोकडे । आपणा ऐसे तात्काळ करिसी ॥३॥
डोळियाचा डोळा । उघडोनिया एकी हेळा ।
सोहं भावे निज बाळा । चेवविसी तूं ॥४॥
तुझिया भजनाचिया पोटीं । भजक भजन भज्य त्रिपुटी ।
हारपोनि कैवल्य कोटी(३) । चढे हाता ॥५॥
चहु मुखाचा वर्णिता भागला । पांचा मुखाचा तटस्थ राहिला ।
सहा मुखाचा दडाला । कपाटामाजीं जाऊनी ॥६॥
सहस्त्रमुखाचा वर्णिता देवा । दोन सहस्त्र जाहल्या जिव्हा । (य११पू.१४४)
तेथ मी वर्णावया स्वभावा । केतुला पात्र होईन कीं ॥७॥
यालागीं गर्व सांडुनी आघवे । मौनेंचि तुज प्रेमें नमावे ।
रुक्मिणीहृदयरत्ना(४)* ठेवावे । पायीं हेचि याचितसे ॥८॥ (*श्रीज्ञानेश्वरमहाराज)
मोडोनिया समाधि । सोडोनिया आळंदी ।
मज लेकुरासाठीं त्रिशुद्धि । माये धांवत येई तूं ॥९॥
श्रीगुरुस्तवनें येणें । मज तृप्त करी पसायदाने ।
आतां श्रोते प्रसन्न मनें । पुढील संवाद परिसोत ॥१०॥
शिष्य म्हणे महाराजा । एक संशय वारिजे माझा ।
मागा बोलिली श्रीगुरुपूजा । प्रमाण सकळ ॥११॥
परी श्रीगुरूचा कवण वर्ण । सर्व वर्णाते गुरु ब्राह्मण ।
हें माते तत्त्व विवंचून । सांगावे स्वामी ॥१२॥
तैं श्रीगुरु म्हणती । गुरु हो कां भलती याती ।
जेणें फेडिली आपुली भ्रांति । तया ब्रह्म भाविती ते सच्छिष्य ॥१३॥
येथ आगम बहु प्रमाण । तेंही ऐके निरूपण ।
छांदोग्योपनिषदीं गौतम प्रवाहण । संवाद ऐसा ॥१४॥
गौतम भेटोनी प्रवाहणासी । पुसिले पंचाग्निविद्येसी ।
तैं तो म्हणे येथ चिरवासी । व्हावे तुम्ही ॥१५॥
आजवरी ही विद्या कहीं । ब्राह्मण वंशांत गेली नाहीं ।
या विद्येचे गुरु लवलाहीं । क्षत्रियचि होते ॥१६॥
ऐसे छांदोग्य पंचमाध्यायीं । तृतीय खंडीं सप्तम श्रुतींत पाहीं ।
निरूपिले त्याचे भाष्यहि । ऐसेंचि केलें आचार्यांनीं ॥१७॥
याचा अपवाद आणिके ठायीं । कोठेंचि पैं दिसत नाहीं ।
म्हणोनी वेदद्रष्टा लवलाही । निज तपें कोणीहि होवो शके ॥१८॥
आतां अध्यात्मविद्येचा गुरु ब्राह्मणचि । हेहि वार्ता न होय साची ।
अजातशत्रुराय उपदेष्टाचि । झाला बालाकी ब्राह्मणाते ॥१९॥
कौषीतकी श्रुतींत ही कथा । आणि आत्मपुराणींहि तत्वतां ।
तेहि प्रमाण ऐकावे आतां । सज्जनी श्रवणीं ॥२०॥
सर्व वर्णा गुरु ब्राह्मण । आणि क्षत्रियादिक शिष्य असोन ।
आत्मज्ञानें गुरु होती ब्राह्मणाकारण । हे द्वितीयाध्यायांतीं निरूपिले ॥२१॥
मग तृतीयाध्यायारंभीं शिष्य प्रश्न करीत ।
कीं हें स्वामी बोलिले काय आत्मज्ञानस्तुत्यर्थ ।
तेव्हां गुरु म्हणती नव्हे हा इतिहास वेदोक्त । जाण यथार्थ शिष्यराया ॥२२॥
''श्रुतिसामान्यमात्रं तु'' या सूत्रेंकरून । बबराचा अर्थ केला पवन ।
तैसे येथें नाहीं व्याख्यान । यालागीं प्रमाण इतिहास हा ॥२३॥ (य११पू.१४५)
येथ ऐसे म्हणेल कोणी । कीं क्षत्रिय तथापि द्विजस्थानीं ।
अद्विज गुरु द्विजा कोणी । ऐकिला नाहीं ॥२४॥
तरी हें बोलणें वृथा । स्कंदपुराणीं सूतसंहिता ।
तेथ ऐसी आहे कथा । कीं सूत सांगता मुनिवरातें ॥२५॥
तदाज्ञयैव विप्रन्द्राः संहितेयं मयोदिता ।

अहं क्षुद्रोऽपि युष्माकं महतामपि देशिकः ॥४३॥
अभवं सा शिवस्याज्ञा लंघनीया न केनचित् ।
शिवस्याज्ञाबलाद्विष्णुर्जायते म्रियतेऽपि च ॥४४॥
ब्रह्मा सर्वजगत्कर्ता विराट् सम्राट् स्वराडपि ॥
खरोष्ट्रतरवः क्षुद्रा ब्रह्मविष्ण्वादयोऽभवन् ॥४५॥
तस्माद्गुरुत्वं मे विप्रा युज्यते न हि संशयः ।
शिष्यत्वं चापि युष्माकं स्वतंत्रः खलु शंकरः ॥४६॥ सूतसंहिता
मी शूद्र किंवा प्रतिलोमज असोन । गुरु जाहलो तुम्हा ऋषीकारण ।
येथ ईश्वरेच्छाचि प्रमाण । नाहीं आन संशय ॥२६॥
उंट गाढव श्वान । तेहि ईश्वरकृपेंकरून ।
पावती ब्रह्माविष्णुशिवस्थान । त्याच्याचि इच्छेन मी गुरु तुम्ही शिष्य ॥२७॥
भगवद्दास कीं तद्दास । स्वतंत्रता या सर्वांस ।
मग तया महेश्वरास । विधिपरतंत्र कवण करी ॥२८॥
येथ ऐसे म्हणेल कोणी । कीं जरी नीच वर्ण गुरु ब्राह्मणालागुनी ।
तरी तो पूजादि वंदनीं । योग्य नोहे ॥२९॥
येथ हेंचि समाधान । जैबिली गौतमातें करवी उपसर्पण ।
आणि मुनि सूताचें पूजन वंदन । करिती हे सूतसंहितेंत कथा ॥३०॥
चूर्णिका -
तैं वादी म्हणे तुम्हाप्रति । सूतसंहिता प्रमाण निश्चिती ।
तरी तींतचि मुक्तिखंडीं पंचमाध्यायीं उक्ति ।
कीं गुरुत्व असो क्षत्रिया वैश्याप्रति । परी शूद्र युवति गुरु न होती ॥३१॥
उत्तम गुरु तो ब्राह्मण । मध्यम तो क्षत्रिय जाण ।
कनिष्ट गुरु तो वैश्य आपण । याचे ऐकावे समाधान ।
कीं बहुधा शूद्रामाजीं अवगुण । यालागीं बहुत न सांपडती घ्यावया गुरुपण ।
नाहीं तरी भारतविरोध गहन । येईल तो विचारावा ॥३२॥
तुलाधार वैश्यापासोनी । समाधान पावले जाजली मुनि ।
तैसा कौशिक द्विज धर्मव्याधम्लेच्छापासुनी । ह्या कथा दोन्ही महाभारतीं ॥३३॥
आपसांत चारी वर्ण । गुरु होती हें निरूपण ।



महाभारतीं असे आन । मोक्षधर्मी ॥३४॥ (य११पू.१४६)
तदिदं ब्रह्मवार्ष्णेयमितिहासं श्रुणुष्व मे ।
ब्राह्मणो ब्राह्मणैः श्राव्यो राजन्यः क्षत्रियैस्तथा ॥११॥
वैश्यो वैश्यैस्तथा श्राव्यः शूद्रः शूद्रैर्महामनाः ।
माहात्म्यं देवदेवस्य विष्णोरमिततेजसः ॥१२॥ (महाभारत)
हे अध्यात्म शुद्ध ज्ञान । ब्राह्मणीं ऐकावे ब्राह्मणापासून ।
क्षत्रियानीं क्षत्रियापासोन । आणि वैश्यापासोन वैश्यानीं । ॥३५॥
शूद्रापासोन शूद्रें ऐकावे । तंव वादी बोले स्वभावें ।
अहो महाभारतींच विदुर म्हणे बरवे । कीं मी शूद्र ब्रह्मज्ञान सांगूं नेच्छी ॥३६॥
तरी याचें ऐकावे उत्तर । जेष्ठ बंधु धृतराष्ट्र ।
तो नायकेल माझें उत्तर । हे जाणोनी विदुर नाकारी ॥३७॥
आणि मुनींच्या वचनेंकरून । हा किंचित् तरी होईल मृदु मन ।
हाचि आशय मनीं धरून । सनत्सुजात बोलविले ॥३८॥
नाहीं तरी धर्मव्याधकथा । त्याची कैसी करशील व्यवस्था ।
गुरु होती वनिता । ह्याहि कथा असती बहु ॥३९॥
चुडालाराणी आपण । बोधी शिखिध्वजपतिकारण ।
ही कथा वसिष्ठ आपण । बोलिले बृहद्वासिष्ठीं ॥४०॥
हेमलेखा हेमचूडपतीस । बोधी येथ प्रमाण त्रिपुरारहस्य ।
पुत्र ज्ञान सांगे पितयास । मार्कंडेय पुराणीं ॥४१॥
'अन्त्यादपि परं धर्म' इति । स्वयें मनूहि बोलती ।
विद्यारण्यहि ऐसेंच म्हणती । टीकेंत सूतसंहितेच्या ॥४२॥
"यद्यपि वर्णानां ब्राह्मणो गुरुरिति क्वचित् ब्राह्मणस्यैव गुरुत्वं स्मर्यते ।
तथापि श्रुतिस्मृत्यन्तरपर्यालोचनया समनन्तरवक्ष्यमाणविभागेन
A
इतरेषामस्ति इत्यभिप्रेत्योक्तम्" - विद्यारण्य.
जरी उत्तम गुरु ब्राह्मण । इतर गुरूस अधमपण ।
ऐसें सूतसंहितेचें वचन । तें अभक्ताकारण किंवा सद्गुणपर जाणावे ॥४३॥
नाहीं तरी गुरुभक्ताप्रति । उत्तम मध्यम गुरुप्रतीति ।

**होईल तरी कवणे रीति । यास्तव आमुची उक्ति सत्य ॥४४॥**
**जया गुरुचरणाची माती । निश्चिये वाटे भागीरथी ।**
**तया उत्तम मध्यम गुरुप्रतीति । सर्वथाहि घडेना ॥४५॥**
**यालागीं सद्‌गुरुचरण । अपेक्षिती ना आश्रमवर्ण ।**
**येथ श्रुति स्मृति पुराण । आणिक प्रमाण बहुत असती ॥४६॥** (य११पू.१४७)
**कलीचा विचार करिता । तरी ऐशा असती बहुत कथा ।**
**जीवातत्वा द्विज कबिरशिष्य तत्वता । आणि दादूशिष्य सुंदरदास ॥४७॥**
**मृत्युंजय यवनापासोन । उपदेश घेतला बहुतान ।**
**रामेश्वर वेदोक्त ब्राह्मण । तुकारामशिष्य झाले ॥४८॥**
**येथ रामीरामदासादि ऐसे म्हणती । कीं ही आपत्काळची स्थिति ।**
**परी ही पक्षाभिमानी उक्ति । प्रमाण निश्चिती सर्वथा नव्हे ॥४९॥**
**काय वेदकाळीं नव्हते ब्राह्मण । ऋषि विद्या घेती क्षत्रियापासून ।**
**जरी वेदकाळींचि आपत्काल पूर्ण ।**
**तरी कलींत संपत्काल दाखविणार कवण हे ॥५०॥**
**पुराणीं सूतास पूजिता । कीं महाभारतीं धर्मव्याध प्रार्थिता ।**
**वासिष्ठादौ नमिता वनिता । काय वसिष्ठादि ऋषि समाज नव्हता तेव्हां ॥५१॥**
**हें असो रामेश्वर ब्राह्मण । जेव्हां तुकारामांचे धरी चरण ।**
**तेव्हां हे रामीरामदासादि आपण । होतेचि कीं ॥५२॥**
**मग रामेश्वरातें कां न बोधिलें । म्हणोनी येथ पक्ष न चाले ।**
**निर्णय हा कीं ज्यास ज्ञान वहिले । तो सद्गुरु आन शिष्य ॥५३॥**
**पवनविजयादि ग्रंथीं । मुकुंदराजादि हेंचि वदती ।**
**संता पुंसूं नये जाती । हेहि वदति महंत ॥५४॥**
**तंव वादी म्हणे हें तों खरें । परी संशयो अनुकरे ।**
**'अंत्यादपि परं धर्म' निर्धारे । बोलिले मनू ॥५५॥**
**त्या मनूची टीका करिता । सर्व पंडित बोलिले तत्वता ।**
**कीं प्रारब्धविशेषें नीच योनीस येतां । तरी तत्ववेत्ता गुरु होय ॥५६॥**
**तंव सिद्धान्ती म्हणे चूडालाराणी । येच जन्मीं ज्ञान पावोनी ।**
**पतीस बोधिता निर्वाणीं । प्रारब्धविशेषे स्त्रीयोनि ती नव्हे ॥५७॥**
**आणि मृत्युंजयादिक । कलिमध्यें येचि जन्मीं पावोनी सुख ।**
**तयांचे शिष्य जाहले अनेक । यालागीं प्रश्न सम्यक नव्हे तुझा ॥५८॥**

वादी उवाचः- अहो शूद्रास उपनयनाचा अभाव ब्रह्मसूत्रांत सांगिला आहे. उपनयनावांचून विद्या नाहीं; म्हणून शूद्राला वेदविद्येचा अधिकार नाहीं. ''अथास्य वेदमुपश्रुण्वतस्तस्य त्रपुजतुभ्यां श्रोत्रप्रतिपूरणं'' इत्यादि स्मृतींत वेदश्रवणाचा निषेध केला आहे. श्रवणनिषेधानेंच अध्ययननिषेधहि सिद्ध आहे, श्रवणावांचून अध्ययन संभवनीय नाहीं म्हणून. लिखितपाठादिकावरून शूद्रानीं वेदाध्ययन करूं नये, म्हणून ''उच्चारणे जिव्हाच्छेद'' इत्यादि स्मृति आहेत. याप्रमाणें शूद्राला वेदश्रवणपठणाचा (य११पू.१४८) अधिकार नाहीं. **वेदाक्षरविचारेण शूद्रश्चांडलतां व्रजेत् ॥** अशी स्मृति असून, **सच्छूद्रैरपि नो कार्या वेदाक्षरविचारणा ।** असे स्कंदपुराणवचन आहे; म्हणून शूद्रांना सर्वथा वेदाधिकाराचा निषेध सिद्ध झाला. ''**श्रोतव्यमेव शूद्रेण नाध्येतव्यं कदाचन**'' असें भविष्यपुराणवचन असल्यामुळें, ''पुराणानां न पाठश्च'' असें स्कांदपुराणवचन असल्यामुळें, पुराणजन्य विद्येंतहि शूद्राचा अधिकार नाहीं, व त्याचप्रमाणें

**न पाठयेत्तथा शूद्रं शास्त्रं व्याकरणादिकं ॥३७॥**
**काव्यं वा नाटकं वापि तथालंकारमेव वा ।**
**पुराणमितिहासं च शूद्रं नैव तु पाठयेत् ॥३८॥**

(स्कांद वैष्णवखंड व्यंकटाचल माहात्म्य अ.१९)

या स्कांदपुराणवचनावरून व्याकरणशास्त्र काव्यनाटकादि पौरुषेय ग्रंथांतहि शूद्राला अधिकार नाहीं; आणि ''**शूद्रानां न तच्छ्रोत्रपदवीमुपयास्यति ।**'' इत्यादि वचनावरून पांचरात्रादि आगमश्रवणाचाहि शूद्राला अधिकार नाहीं; आणि श्रीमच्छंकराचार्यानीं आपल्या विष्णुसहस्त्रनामभाष्यांत शूद्राला स्तोत्रपठणाचा निषेध सांगितला आहे. एवं सर्वथा विद्याविधूर जो शूद्र, आणि तत्समधर्मिणी स्त्री हे या जन्मीं अध्ययन करून कोणत्याही कालीं गुरु होऊं शकत नाहींत.

सिद्धान्ती उवाचः- याविषयीं समाधान सांगतो ऐक. वेदश्रवणपठणाविषयीं शूद्राचा सर्वथा अनधिकार आहे, ह्याविषयीं बहुशः विवाद नाहीं; परंतु - ''**यथेमां वाचं कल्याणीमावदानि जनेभ्यः ब्रह्मराजन्याभ्यां शूद्राय चार्याय च स्वायचारणाय च**'' या शुक्लयजुर्वेदसंहितेच्या २६ व्या अध्यायाच्या दुसऱ्या

मंत्रावरून व त्याच्या महिधरकृत भाष्यावरून वेदविद्येविषयीं किंचित् संशय (य११पू.१४९) उपन्यस्त आहे. त्याचें कोणी अर्थांतर करितात, म्हणून वेदाविषयीं श्रवणपठणाचा शूद्रांना अधिकार नाहीं हे मला मान्यच आहे. परंतु महाभारत शांतिपर्वाच्या क्रमानें ३२७ व्या अध्यायांत व्यास आपल्या शिष्यास म्हणतात, योग्य देश काल पात्र पाहून तुम्हीं वेदाचा प्रचार करा. ह्याच अध्यायांत हा पुढील ४९ वा श्लोक आहे.

**श्रावयेच्चतुरो वर्णान् कृत्वा ब्राह्मणमग्रतः ।**
**वेदस्याध्ययनं हीदं तच्च कार्यं महत्स्मृतम् ॥४९॥**

ब्राह्मणाला पुढें करून तुम्ही चारी वर्णाला ऐकवा. ह्या श्लोकाचें अर्धच घेऊन पुराणश्रवणपर हा श्लोक आचार्यादिकांनी लावला आहे. परंतु प्रश्नोत्तरपूर्वक हें प्रकरण वेदाविषयीं चालले आहे, आणि याच श्लोकाच्या उत्तरार्धांत ''वेदस्याध्ययनं हीदं'' असें वाक्य आहे. तेव्हां वेदच ऐकवावा असा त्याचा अर्थ स्पष्ट होतो. शूद्रासमीप अध्ययन करूं नये इत्यादि निषेध असच्छूद्रपर लावतां येतो; आणि ''सच्छूद्रैरपि नो कार्या वेदाक्षरविचारणा'' हें वाक्य सच्छूद्राविषयीं वेदाच्या पठणाचा निषेध करीत आहे. तात्पर्य सच्छूद्रांना ब्राह्मण पुढें करून वेद श्रवण करिता येतो असा विकल्प करणें शक्य आहे. कोणी याचा संकोच असा करितात.

**पुराणश्रवणविधानादेव तदन्तर्गतवैदिकमंत्रश्रवणेऽपि न दोषः ।**
**तदुक्तं वार्तिके -**
**तानेव वैदिकान्मंत्रान्भारतादिनिवेशितान् ।**
**विहाय मंत्रनियमं लोकबुद्ध्या प्रयुंजत ॥** (शुद्रकमलाकर प्र. १)

अर्थ - पुराणश्रवणाचें विधान केले आहे तेणें करूनच पुराणान्तर्गत वैदिकमंत्रशश्रवण केलें असतां दोष नाहीं. तेंच वार्तिकांत सांगितले आहे. जे वैदिक मंत्र शूद्रास श्रवण करण्याविषयीं अयोग्य आहेत, तेच महाभारतादिकांत असतील, व त्यांचा जर मंत्राचा नियम सोडून लौकिकबुद्धीनें प्रयोग केला असेल, तर त्यांच्या श्रवणाचा दोष शूद्रास नाहीं.

वादीं उवाच :- अहो श्रवणाविषयीं अधिकार सिद्ध होवो, परंतु अदृष्टार्थकता तर उत्पन्न होणार नाहीं ना ?



सिद्धांती उवाच :- पुराणश्रवणजन्य अदृष्ट पुराणान्तर्गत वेदमंत्रश्रवणानेंहि होईल. (य११पू.१५०) हा विधि असच्छूद्राविषयींहि विकल्पता येतो. याप्रमाणें शूद्रांना वेदमंत्रश्रवणाविषयीं विचार झाला.

पुराणश्रवणाविषयीं तर शूद्राविषयीं विवादच नाहीं. ''श्रवणं कारयेत्सदा'' इति स्कंदपुराणवाक्यावरून, आणि श्रीमच्छंकराचार्यकृत ब्रह्मसूत्रभाष्य आणि विष्णुसहस्त्रनामभाष्यावरून,

**''शूद्रस्य शुश्रुषोरस्तु पुराणेनैव वेदनम्''**

इत्यादि सूतसंहितावाक्यावरून, आणि पुराणश्रवणमनननिदिध्यासन शूद्रांनीं करावे, इत्यादि धर्मसिंधुवाक्यावरून शूद्राविषयीं पुराणश्रवणाचा निषेध नाहीं.

वादी उवाचः- अहो सिद्धान्तलेशसंग्रहाच्या टीकेंत शूद्राला पुराण श्रवणाचीच आज्ञा आहे, मनननिदिध्यासनाची आज्ञा नाहीं, म्हणून त्याला पुराणापासून ज्ञान उत्पन्न होणें शक्य नाहीं असें म्हटले आहे.

सिद्धान्ती उवाचः- ज्याच्या ग्रंथावर ह्या टीकाकारानीं टीका केली आहे, त्या अपय्यादीक्षित संज्ञक मूळ ग्रंथकारानेंच आपल्या न्यायरक्षामणि संज्ञक ब्रह्मसूत्र-भाष्याच्या प्रथमाध्यांयांतील अपशूद्राधिकरणविचारांत शूद्राला पुराणश्रवण-मनन-निदिध्यासनाद्यधिकार सांगितला आहे. तो टीकाकारानीं अथवा तूं पहावा.

**'कथं तर्हि विदुरधर्मव्याधप्रभृतीनां ब्रह्मज्ञत्वम् ।**
**पूर्वजन्माधिगतज्ञानाप्रमोषात् ।'**
**'धर्मव्याधादयोऽप्यन्ये पूर्वाभ्यासाज्जुगुप्सिते वर्णावरत्वे संप्राप्तास्संसिद्धिं श्रमणीयथेति हि स्मरन्ति ब्रह्मज्ञानमपि तेषाम् ।**
**हीनजातिषु जननं तु प्रारब्धबलात् ।**
**ननु पूर्वजन्मानुष्ठितयज्ञादिकर्मभिश्शुद्धान्तःकरणतयोत्पन्नब्रह्मविविदिषाणामपि साधनसंपत्त्यभावेनानुत्पन्नब्रह्मविद्यानां ततः प्रारब्धबलेन शूद्रादिजन्मप्राप्तानां पूर्वसंस्कारानुवृत्त्या विरक्तानामनुवृत्तब्रह्मविविदिषाणां किं ब्रह्मविद्योपायो नास्ति?। अस्त्येवेतिहासपुराणादिः ।**
**ननु 'श्रोतव्यः श्रुतिवाक्येभ्य' इति ब्रह्मदर्शनार्थं वेदान्तश्रवणनियमविधिना सकलोपायान्तरव्यावर्तनात् कथमितिहासपुराणादेतदुपायत्वेन परिग्रहः ।**
**न । त्रैवर्णिकान् प्रति स नियमविधिरिति तल्लब्धनियमस्यापि तद्विषयत्वात् ।**

एवं तर्हीतिहासपुराणादिवद्वेदान्तार्थग्रथनरूपो भाषाप्रबन्धः 'त्वमेवब्रह्मासि' इत्यादि लौकिकवाक्यं च तदुपायोऽस्तु । (य११पू.१५१)

तस्यापि ब्रह्मात्मैक्यज्ञानजननसमर्थत्वात् ।

न चाध्यासनिवर्तनक्षमं तदपरोक्षज्ञानं वेदान्तैस्तन्मूलैरितिहासपुराणैर्वा भवति नान्यैरिति वाच्यम् ।

विषयस्वाभाव्येन ''दशमस्त्वमसी''त्यादि लौकिकवाक्यैरपि-अपरोक्षज्ञानस्य सिद्धान्तीनाभ्युपगतत्वात् ।

तथापि लौकिकवाक्यजम् अपरोक्षज्ञानमसंभावना-विपरीतभावना-प्रतिबंधान्नाध्यासनिवर्तनक्षममिति चेन्न ।

वेदान्तजापरोक्षज्ञानस्येव तस्यापि मनन-निदिध्यासनाभ्यां प्रतिबंधकनिवर्तनसंभवात्।

यद्वा माभूद्भाषाप्रबंधो मा च भूल्लौकिकवाक्यं मननाख्येनानुमानकलापेन प्रतिबन्धनिवृत्यर्थमवश्यापेक्षितेन ''चिन्मात्रतत्त्वमन्यत्सर्वमारोपित'मिति निर्धारणं संभवति ।

तच्च विषयस्वाभाव्यादपरोक्षमिति मननमात्रं निदिध्यासनशिरस्कं शूद्राणां ब्रह्मविद्योपायोऽस्तु ।

यदि मननं प्रमाणप्रमेयानुपपत्तिनिरासकतर्करूपतया वेदान्तश्रवणस्येति कर्तव्यतारूपं न स्वतंत्रं तर्हि 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्' इति वचनाद् इतिहासपुराणानामपि तथैव ।

यदि च तद्वचनमनेकशााखाभिज्ञमहर्षिकृतेतिहासपुराणानुसारिण्येवार्थे वेदस्य तात्पर्यं ग्राह्यमित्येवं परं न स्वातंत्र्येण ततोऽर्थनिर्णयनिषेधपरं ।

तर्हि श्रोतव्यो मंतव्य इति श्रवणांगत्वेन मननविधिरपि वेदान्तेषु संभावितप्रमाण-प्रमेयानुपपत्तिशंका मननेन निरसनीयेत्येतावन्मात्रपरं न तु स्वातंत्र्येण अनुमानाद् ब्रह्मनिर्णयो न भवतीत्येतत्परम् ।

''नैषा मतिस्तर्केणापनेयेति'' श्रुतेर्नानुमानगम्यं ब्रह्मेति चेत्

''त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामी'ति श्रुतेर्नेतिहासपुराणादिगम्यमित्यपि स्यात् ।

औपनिषदत्वश्रुतिरुपनिषद्विरोधिशब्दान्तरगम्यत्वनिरासपरा चेत् सापि श्रुतिस्तद्विरोधितर्कगम्यत्वनिरासपरास्तु ।

अथवा मा भूद्भाषाप्रबंधलौकिकवाक्यानुमानजातं शूद्रस्य ब्रह्मावगत्युपायः ।

मा च भूत्त्वदुक्तमितिहासपुराणम् ।

वेदान्तवाक्यजातमेव लिखितपाठादिना गृहीतमविधिना विचारितं तदुपायोऽस्तु ।

व्युत्पन्नस्य लिखितपाठादिगृहीतादपि ततोऽर्थप्रत्ययस्यानिवार्यत्वात् ।

अविहितविचारस्याप्यार्द्रकमरिचादिविषयस्येवासंभावनानिवर्तनक्षमत्वात् ।

अविहितविचारस्य च वैदिकाधिकारनिरपेक्षतया तद्वैकल्येन निष्फलत्वाप्रसक्तेः।

शूद्रस्य वेदग्रहणनिषेधोल्लंघने च कूपखननन्यायेन प्रवृत्त्युपपत्तेरिति चेत् ।

अत्र ब्रूमः । बहूनि मनुष्याणां ब्रह्मविद्योत्पत्तिप्रतिबंधकानि दुरितानि (य११पू.१५२)

''तस्मादेषां तन्न प्रियं यदेतन्मनुष्या विद्युः'' इत्यादिवैदिकलिंगावगतानि ।

तत्र कानिचिद्विविदिषोरपि श्रवणादिसाधनसंपत्तिविघटनद्वारकानि ।

अपराणि श्रवणादिसाधनसंपत्तावपि बुद्धिसामर्थ्यविघटनद्वारकानि ।

इतराणि विद्योदयेऽप्यसंभावनादिबाहुल्यापादकानि ।

किंबहुना निरस्तसमस्तासंभावनादिप्रतिबंधनिर्विचिकित्स-ब्रह्मविद्योदयेऽप्यविद्याऽनिवृत्तिकराणि ।

सत्यपि विशेषदर्शने भ्रमानिवृत्तिकरोपाधिसन्निधानकल्पानि कान्यपि संति ।

तानि सर्वाणि यज्ञदानादिभिस्संन्यासपूर्वेण वेदान्तश्रवणनियमादृष्टेनेतिहास पुराणादिश्रवणनियमादृष्टेन च निवर्तनीयानि ।

एतानि च प्रतिबंधकनिवर्तकानि यथाधिकारं व्यवतिष्ठन्ते । तथाच -

''श्रावयेच्चतुरो वर्णान् कृत्वा ब्राह्मणमग्रतः''

''शूद्रः सुखमवाप्नुयात्''

इत्यादिवचनैरितिहासपुराणश्रवणपठणाधिकारत्वेनावगतस्य शूद्रस्य तच्छ्रवणनियमसंपाद्यम् अदृष्टंविना लिखितपाठगृहीतवेदान्तादिभिः कथमप्रतिबद्धब्रह्मावगतिसंभवः ।

सन्ति हि पुराणेतिहासश्रवणसामान्ये केचन नियमाः ।

विशिष्य च पुराणभेदेन भारतपर्वादिभेदेन चान्ये नियमाः ।

तत्रापि ब्रह्मावगत्युपायेषु गीतादिभागेषु ''शिष्यस्तेऽहं शाधि माम्''

इत्यादिपार्थवचनप्रभृतिलिंगावगता गुरूपसदनादिनियमाः ।

तस्मान्नियमरहितैर्लिखितपाठगृहीतवेदान्तभाषाप्रबंधलौकिकवाक्यतर्क-कलापैरध्यासनिवर्तनक्षमब्रह्मावगत्यापादनमनधिगतवैदिकमर्यादानामेव शोभते ।

ननु तथापि शूद्रस्येतिहासपुराणादिनाऽपि नास्ति विद्याधिगमेऽधिकारः ।
न हि तमुद्दिश्य विशिष्यास्ति विद्याविधानं ।
विशेषविहितेतरधर्मास्तु तस्य प्रतिषिद्धा इत्युक्तम् ।
सत्यं । ब्रह्मविद्यायां नास्ति विध्यपेक्षा ।
आनंदसाक्षात्कारत्वेन तस्याः फलत्वात् ।
बंधनिवृत्तिरूपमुक्तिसाधनत्वेऽपि प्रमाणवस्तुपरतंत्रत्वेन विध्यनर्हत्वात् ।
किंतु तत्साधने तत्र च त्रैवर्णिकानां वेदान्तश्रवणरूप इव शूद्राणाम् इतिहासपुराणश्रवणरूपे विशेषतोऽस्त्येव विधिः ।
ननु 'द्रष्टव्यः श्रोतव्य' इति वेदान्तश्रवणे ब्रह्मदर्शनफलानुवादवदिह तदनुवादो नास्ति ।
सत्यं । तथापि यत्र योऽर्थः प्रतिपाद्यते तदवगतिरसति बाधके तत्र फलत्वेन व्यवतिष्ठते ।
''धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्''
इत्यादिवचनैस्तत्तत्प्रतिपाद्यदर्शनमपि तत्तदवगतेः फलत्वसूचनायैव ।
एवं चेतिहासपुराणेषु यस्याधिकारिणो यदर्थावगतिर्यथोपयुज्यते (य११पू.१५३) तथैव सा तस्य फलतया व्यवतिष्ठते ।
ततश्च यद्यपि तेभ्यश्शुद्धब्रह्मावगतिर्वेदान्तश्रवणनियमवतां त्रैवर्णिकानां तत्र वेदान्ततात्पर्यस्थिरीकरणार्थतयोपयुज्यते ।
तथापि प्रतिषिद्धवेदश्रवणानां शूद्राणां साक्षान्मुक्तिसाधनतयैवोपयुज्यते ।
तस्यास्तत्साधनत्वप्रतिसिध्यर्थं मनननिदिध्यासने अपि शूद्रस्य मुक्तिसाधने ब्रह्मविद्याफलकेतिहासपुराणश्रवणविधिनैवाक्षिप्येते ।
यथाऽध्ययनविधिना स्वफलस्यार्थज्ञानस्य क्रत्वनुष्ठानादिसाधनत्वसिध्यर्थं विचार आक्षिप्यते ।
तस्माद्युक्तमुक्तं शूद्राणमितिहासपुराणादिकं मुक्तिसाधनब्रह्मविद्योपाय इति ।
तथापि तत्तल्लोकविशेषावाप्तिफलकसगुणब्रह्मविद्याविधेयत्वाद्विशिष्य शूद्रान् प्रत्यविधानाश्च तेषां न स्यादिति चेन्माभूत् तदंशे यज्ञादिकर्मांश इव इतिहासपुराणादि श्रवणमर्थावगतिफलकं पापक्षयफलकमस्तु ।

अध्ययनविधिरपि ह्यर्थावबोधफलकत्वपक्षेन सर्वत्रार्थावबोधफलकः ।
किं च शूद्रस्य क्वचित्क्वचिदस्त्येवेतिहासपुराणप्रतिपाद्यायां सगुणविद्यायामप्यधिकारः।
यत्र विशिष्य विधानं लिंगं वास्ति यथा प्रणवरहितेन पंचाक्षरेण शिवोपासनायां ।
यथा वा नारदस्य प्राचीने शूद्रजन्मनि यतिभिरुपदिष्टायामच्युतोपासनायां ।
एवं शैवपाशुपतपांचरात्रादिदृष्टेषु सगुणविद्याविशेषेष्वपि शूद्रोचितसंस्कारपूर्वकं विशिष्य विहितेषु तस्याधिकारो द्रष्टव्यः ।
एवं शूद्रस्य इतिहासपुराणादिमूलकविद्याधिकारसत्वेऽपि वेदमूलक-संवर्गविद्याद्यधिकारशंकानिवारणार्थं सूत्रे जानश्रुतेः क्षत्रियत्वसमर्थनम् ।
वेदमूलकाधिकारनिराकरणार्थं ह्येतदधिकरणम् ।
अत एव वेदश्रवणादिप्रतिषेधस्सूत्रकृता हेतुकृत इत्यलम् प्रसक्तानुप्रसत्त्या ।
(न्यायरक्षामणि अ.१ पा.३ सूत्र ३८)

भावार्थः-

पूर्वपक्षी उवाचः- याप्रमाणें वेदाचा अधिकार शूद्राला नाहीं, असें तुम्हीं सांगतां तर मग विदुर व धर्मव्याधादिक हीन जातीपुरुष ब्रह्मवेत्तें कसे झालेत?

उत्तरपक्षी उवाचः- पूर्वजन्मांत त्यांनीं ज्ञानाचा अभ्यास केल्यामुळे या जन्मांत त्यांना ज्ञान उत्पन्न झाले. धर्मव्याधादिक निंद्य अशा वर्णांत प्राप्त होऊन ब्रह्मवेत्ते झालेत अशी स्मृति आहे. त्यांचा हीन जातींत जन्म प्रारब्धबलानें समजावा.

वादी उवाचः- सध्यां टीकेचा अर्थ मग सांगा. मला मध्येंच एक शंका आली आहे. (य११पू.१५४)

जन्तूनां नरजन्मदुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता ।
तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता द्विजत्वमस्मात्परम् ।
आत्मानात्मविवेचनं स्वानुभवो ब्रह्मात्मना संस्थिति–।
र्मुक्तिर्नोशतजन्मकोटिसुकृतैः पुण्यैर्विना लभ्यते । (विवेकचूडामणि श्लो.२)

असें आचार्यांचें वचन आहे; आणि जीवानां आधीं मनुष्यजन्म दुर्लभ आहे, त्यामध्यें पुरुषत्व दुर्लभ, त्यामध्यें ब्राह्मणत्व दुर्लभ, त्याहिमध्यें वेदालाच अनुसरून चालणें दुर्लभ आहे, इतकेंहि मिळून विद्वत्ता दुर्लभ आहे, त्यांत इतकेंहि मिळून पुनः आत्मा कोणता व अनात्मा कोणता हा विचार दुर्लभ आहे व त्याचा अनुभव येणें सर्वापेक्षां दुर्लभ आहे. तस्मात् कोटीजन्मपुण्य असल्यावांचून मुक्ति कांहीं

मिळत नाहीं हा त्या वचनाचा अर्थ आहे. तेव्हां द्विजजन्मांत अभ्यास करून धर्मव्याधादिकांनां चांडाल जन्मांत जाण्यास प्रारब्ध उरते कसें?

सिद्धान्ती उवाचः- ज्यांच्या मतांत चरम जन्मच ज्ञानाचें साधन आहे, त्यांच्या मतांत खरोखरच हें मोठें गूढ आहे; व ज्यांच्या मतांत तसें नाहीं, त्यांच्या मतांत कर्माचें फळ अनंत आहे असें समाधान करितां येते; कारण ब्रह्मज्ञानियालाहि ज्वरादिक होतात, आणि ज्वरादिक पापाचें फल प्रसिद्ध आहे, म्हणून सर्वथा पापनिवृत्ति होऊनच ज्ञान होते असें म्हणतां येणार नाहीं; तर जेवढें पुण्य ज्ञानसंपादक आहे तेवढें व जेवढें कर्मभोगसंपादक आहे तेवढें दोन्ही मिळून आपआपली कामें करितात. म्हणून प्रारब्धसंपादित शूद्रजन्मांत पूर्वाभ्यासानें ज्ञान होणें दुर्घट नाहीं. परंतु हेंहि समाधान ज्यांच्या मतांत ज्ञान होऊन जीवन्मुक्ति शेष राहते त्यांच्याच मतांत संभवते; परंतु ज्यांच्या मतांत श्रवणमनननिदिध्यासन जन्मभर करून मरणसमयीं ज्ञानोत्पत्ति झाल्यावर विदेहमुक्तिच होते असा अंगिकार आहे, त्यांच्या मतांत अर्थातच पूर्वाभ्यासानें ज्ञान होते असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण ज्ञान झाल्यानंतर देह अवशिष्ट रहात नाहीं, हें संक्षेपशारीरककारांचे मत आहे तें तेथेंच पहावे. धर्मव्याधादिकांचे देह स्पष्ट दिसत होते, आणि ते ज्ञानानें मुक्त झाले अशाहि स्मृति आहेत. (य११पू.१५५) वामदेवादि कथेचें या मतांत विद्यास्तुतिपरत्व आहे. तेव्हां धर्मव्याधादिकांनी त्याच जन्मांत श्रवणमनननिदिध्यासन केलें हें ओघानेंच प्राप्त होते. तेव्हां आतां त्या जन्मांत श्रवण मनन निदिध्यासन कशाचे केले वेदाचें कीं पुराणाचें? प्रथम पक्ष बरोबर नाहीं. कारण वेदश्रवणपठणाचा अधिकार धर्मव्याधादिकांना साक्षात् म्हणतां येत नाहीं. पूर्वजन्माच्या वेदस्मृतीवरून म्हणावे, तर तें जुळत नाहीं; कारण ज्ञानावांचून वर्णाश्रम उल्लंघन करणें उचित नाहीं, आणि ज्ञान तर मरणकालींच प्राप्त होणार. तेव्हां मरणकालीं होणाऱ्या ज्ञानाकरितां पूर्व जन्माच्या स्मरलेल्या वेदाक्षराचा विचार केला म्हणावयाचा; परंतु तसें मानलें म्हणजे ''सच्छूद्रैरपि नो कार्या वेदाक्षरविचारणा'' ह्या स्कंदपुराणांतील वाक्याला बाध येतो, आणि ''उच्चारणे जिव्हाच्छेदः धारणे शरीरभेदः'' या दंडाला धर्मव्याधादिक पात्र होतात.

बरें आतां पुराणाच्या श्रवणानें या जन्मांत त्यांना ज्ञान झालें असें म्हणावें तर तेंहि जुळत नाहीं; कारण पूर्वजन्मीचा वेदाभ्यास व या जन्मीचा पुराणाभ्यास म्हणजे मुख्य टाकून गौणग्रहण करण्या सारखेंच होतें; आणि वेदपुराणाची समता मानल्यास आम्हाला इष्टापत्तीच आहे; परंतु पुराणश्रवणानें शूद्रादिकांस त्याच जन्मांत ज्ञान होतें हेंहि म्हणणें कांहीं वेदान्तियांना मान्य नाहीं; कारण पुराणश्रवणादिकानीं शूद्रादिकांना ब्राह्मण जन्म मिळूनच ज्ञान होतें असें अपय्यादीक्षित आपल्या सिद्धान्तलेशसंग्रहांत म्हणतात. तात्पर्य भगवद्भक्ताची सर्वथा[५] अधिकारिता, किंवा ''सर्वोपायैस्तु क्रोधस्य लोभस्य च विनिग्रहः'' हा भारतांतील पुढें सांगितला जाणारा वर्णसंबंधी गुणकर्मविचार, किंवा पुराणाचें साक्षात् ज्ञानप्रदत्व असा तिहींतून कोणता तरी एक निर्णय करून घ्यावा लागतो. पण पुराणाचे साक्षात् ज्ञानप्रदत्व जरी मानलें तरी त्यानें विदुरासंबंधीं समाधान होईल, परंतु धर्मव्याधासंबंधी समाधान होत नाहीं; कारण ''म्लेच्छा धर्मव्याधादयः'' असें योगवासिष्ठाच्या टीकेंत वचन आहे, आणि म्लेच्छांना पुराणश्रवणाचा अधिकार नाहीं हें बहुठायीं बोलिले आहे॰ म्हणून त्यांना पौरुषेय वाक्यच विचारणीय आहे, कारण अन्य जे हीन वर्ण त्यांना ज्ञानाभ्यास भाषांतरानें विहित आहे असें सूतसंहितेचें वचन आहे; परंतु त्यांना भाषांतरानें त्याच जन्मांत ज्ञान होत नाहीं (य११पू.१५६) तर कालानें म्हणजे अन्य जन्मांतरीं ज्ञान होतें असें तेथें सांगितलें असून टीकाकारानें तें स्पष्ट वर्णिलें आहे. परंतु धर्मव्याधादिकांना साक्षात् ज्ञान झाले होतें, इतकेंच नव्हे तर ते कौशिक ब्राह्मणादिकांना उपदेशकहि झाले असा इतिहास आहे. तेव्हां ''श्रावयेच्चतुरो वर्णान्'' हा श्लोक वेदसंबंधींच लावून गुणकर्मनिर्णय करावा लागतो, किंवा अन्य भाषांतररूप संतवाक्याचें देखील वेदाप्रमाणेंच ज्ञानदेण्यामध्यें साम्य मानावे लागते; आणि

**तयाचे बिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद ।**
**सदेह सच्चिदानंद । कां नोहावे ते ।। १६४६।।**(ज्ञानेश्वरी अ. १८)

असे तातांचें वाक्यहि आहे. याप्रमाणें संक्षेपशारीरककारांचा पक्ष घेतला असतां हें मोठें गूढच राहते. आतां संक्षेपशारीरककारांचा पक्ष सोडून द्यावा काय म्हणून, कारण वेदान्ताविषयीं अनेक प्रक्रिया आहेत हें ज्यांना मान्य आहे, त्यांनाच हा पक्षहि मान्य आहे; पण आपणाला इतक्या उहापोहाची आवश्यकता काय, गुणग्रहण करावे म्हणजे झाले.

वादी उवाचः- हें मला उत्तम समजलें. आतां न्यायरक्षामणिकार काय म्हणतात ते पुनः सांगा.

सिद्धान्ती उवाचः- ऐक. प्रथम पूर्वपक्षी असें म्हणतो की, काय हो! द्विजजन्मामध्यें यज्ञादिकांचें अनुष्ठान करून ब्रह्मज्ञानाची इच्छा झाली असतांहि साधनसामग्री जुळून न आल्यामुळें ब्रह्मसाक्षात्कार झाला नाहीं, आणि नंतर प्रारब्धाच्या योगानें शूद्रादि जन्म प्राप्त झाला; तथापि पूर्व अनुवृत्तीनें वैराग्यपूर्वक मुमुक्षादिक प्राप्त झाल्यास त्या शूद्रादिकांना काय ब्रह्मज्ञानाचा उपायच नाहीं? उत्तरपक्षी म्हणतोः- त्यांनाहि इतिहासपुराणादि हा उपाय आहेच.

वादी उवाचः- इतिहासपुराणादि म्हणजे काय? हें मला थोंडेंसे स्पष्ट करून सांगा.

सिद्धान्ती उवाचः- इतिहास म्हणजे महाभारत, पुराण म्हणजे विष्णुपुराणादि मिळून अठरा, व आदि शब्दानें उपपुराणें व रामायण, योगवासिष्ठ इत्यादि काव्यें, त्रिपुरारहस्यादिक तंत्रे, पंचदश्यादि पौरुषेय संस्कृत ग्रंथ, (य११पू.१५७) आणि विवेकसिंधु आदिक अन्य भाषाग्रंथहि ग्रहण केले जातात. रामायण-योगवासिष्ठाचा समावेश इतिहासांत करणें मला अधिक इष्ट आहे. याप्रमाणें तुझ्या पक्षाचें उत्तर दिलें. आतां न्यायरक्षामणिकार काय म्हणतात तें श्रवण कर.

पूर्वपक्षी म्हणतोः- अहो! वेदान्तश्रवणाचाच नियम मुख्य असल्यामुळें इतिहासपुराणादिकांची अर्थातच निवृत्ति होते, मग त्या इतिहासपुराणादिकांना ज्ञानोपाय कसें म्हणता येईल?

उत्तरपक्षी म्हणतो :- तीन वर्णाविषयींच उपनिषच्छ्रश्रवणाचा नियम केला आहे, इतराविषयीं नाहीं.

पूर्वपक्षी म्हणतो :- तर मग अन्य भाषेंत केलेले प्रबंध व तूं ब्रह्म आहेस इत्यादि वाक्यानेंहि त्याचें कार्य होऊं शकेल; आणि वेदान्तानेंच किंवा इतिहासपुराणानेंच ब्रह्मज्ञान होते, इतर वाक्यानें होत नाहीं हें म्हणणें सम्यक होणार नाहीं; कारण 'तूं दहावा आहेस' या पौरुषेय वाक्यानें जसें दहाव्या संबंधाचें अपरोक्ष ज्ञान होतें, तसेंच विषय स्वभावानें ब्रह्माचेहि होते; आणि तसें वेदान्तियांना संमतहि आहे. आतां यावर उत्तरपक्षी कदाचित् असें म्हणेल कीं, जरी ज्ञान होते तरी असंभावना विपरीतभावना हे प्रतिबंध रहात असल्यामुळें संसारनिवर्तक ज्ञान इतिहासपुराणादिकानें होत नाहीं; पण हें म्हणणें सम्यक् नाही. वेदान्तापासून झालेल्या अपरोक्ष ज्ञानाप्रमाणेंच अन्य कोठून झालेलें अपरोक्ष ज्ञान श्रवणमनननिदिध्यासनानें असंभावनाविपरीतभावनानिवृत्ति करून संसारनिवर्तक होते यांत संशय नाहीं.

अथवा वेदान्तहि नको, किंवा इतिहासपुराणादिकहि नकोत; शूद्र असो कीं चांडाल असो, ज्याला म्हणून बुद्धि आहे तो अनुमानानेंच ब्रह्म जाणून घेईल. सर्व चैतन्यावर आरोपित आहे इत्यादि तर्क करून तो आपली असंभावना नाहीशी करून घेईल. म्हणून तें अनुमानच मननस्वरूप होऊन श्रवणावांचून शूद्राला ब्रह्मज्ञानोत्पादक होतें. हे उत्तरपक्षी! जर तूं असें म्हणशील कीं, मनन हें श्रवणाचें अंगरूप आहे, स्वतंत्र ज्ञान देण्याला समर्थ नाहीं, तर इतिहासपुराणानें वेद पुष्ट करावा असें वाक्य असल्यामुळें, ते इतिहासपुराणहि वेदावांचून स्वतंत्र ज्ञान देण्याला समर्थ होणार नाहीं. (य११पू.१५८)

हें उत्तरपक्षी ! यावर तूं पुनः कदाचित् असें म्हणशील कीं, महर्षिनिर्मित इतिहासपुराणांनीं स्पष्ट केलेल्या अर्थातच वेदाचें तात्पर्य समजावे हाच उपबृंहणन्यायाचा अर्थ आहे, इतिहासपुराणानें स्वतंत्र ज्ञान होत नाहीं, असा त्या न्यायाचा अर्थ नाहीं; तर मीहि म्हणतो कीं, आत्मा ऐकण्याला योग्य आहे, तर्क करण्याला योग्य आहे, या वाक्यांतहि वेदान्तांत येणाऱ्या प्रमाणप्रमेयसंबंधीं शंका मननरूप तर्कानें दूर कराव्या असें सांगितलें आहे, उपनिषद्वाक्यावांचून अनुमानानें ब्रह्मनिर्णय होत नाहीं असें सांगितलें नाहीं. यावर उत्तरपक्षी असें म्हणेल कीं, आपल्या बुद्धीला तर्कानें दवडूं नये या श्रुतीवरून तर्काचा निषेध केला आहे; तर मीहि म्हणतो कीं, उपनिषदानें सांगितलेला पुरुष मी विचारतो या श्रुतीवाक्यावरून इतिहासपुराणादिकांचाहि निषेध होतो. यावर पुनः उत्तरपक्षी म्हणेल कीं, उपनिषद्वेद्य ब्रह्म आहे हें सांगणारें श्रुतिवाक्य वेदविरुद्धवचनांचा निषेध करीत आहे; तर मीहि म्हणतो कीं, तर्कामागें जावूं नये हें श्रुतिवाक्य वेदविरुद्ध अनुमानाचाच निषेध करीत आहे.

पूर्वपक्षी पुनः म्हणतो :- किंवा लौकिक वाक्य, भाषाप्रबंध, अनुमान हे शूद्रांना ब्रह्मज्ञानसाधक न होवोत, परंतु तुम्हीं सांगितलेलें इतिहासपुराणहि होणें शक्य नाहीं. विद्वान् अशा शूद्रादिकांना कोणी न सांगतांहि वेद पढूं नये या

निषेधाचें उल्लंघन करून कूपखननन्यायानें पुस्तकावरून उपनिषद् ज्ञानाकडे त्यांची प्रवृत्ति झाल्यास ब्रह्मज्ञान होऊं न देणें हे कोणाच्याहि हातीं नाहीं. ह्याचा भाव असा आहे कीं, विहिर खांदण्याऱ्याचें अंग ज्याप्रमाणें चिखलानें व मातीनें भरते, परंतु विहिरीला पाणी लागल्यावर पुनः तें धुतल्या जातें. अपशब्दाचें ज्ञान होणें जरी अधर्म आहे, तरी त्याचा विचार करून शब्दाचें सम्यक् ज्ञान झाले असतां, त्यापासून होणाऱ्या धर्माच्या योगानें त्या अधर्माचें निराकरण होतें, असें व्याकरणमहाभाष्यांत म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच विधिनिषेधाला न मानून पुस्तकावरून वेदाचा विचार केल्यानें लागणारें पाप ब्रह्मज्ञान झालें म्हणजे अर्थातच धुवून जाईल. हा कूपखननन्यायाचा अर्थ मी स्वतः स्पष्ट केला आहे.

आतां पुनः टीकाकाराचें म्हणणें सांगतो. याप्रमाणें (य११पू.१५९) पूर्वपक्षानें प्राप्त झाले असतां, उत्तरपक्षी म्हणतो, आमचें असें म्हणणें आहे कीं, मनुष्याच्या ज्ञानाला प्रतिबंध करणारीं पापें पुष्कळ आहेत. कित्येकांना मोक्षाची इच्छा असूनहि विवेकादि चार साधनांचा पातकामुळें अभाव असतो. कित्येक साधनचतुष्टयसंपन्न असूनहि त्यांना श्रवणादि सामग्रीची सोय नसते. कित्येकांना श्रवणादिसामग्री असूनहि बुद्धिसामर्थ्यच नसते. कित्येकांना सर्व असून विद्येचा उदय होऊनहि असंभावनाविपरीतभावनाच उत्पन्न होतात. कित्येकांना ज्ञान प्राप्त होऊनहि विशेषदर्शनभ्रम तसाच राहतो.

तात्पर्य, अशीं अनंत प्रकारचीं पापें यज्ञ, दान, संन्यास, व उपनिषच्छ्रवण यापासून उत्पन्न झालेल्या सुकृतानें द्विजांना दूर करावे लागत असून, इतिहासपुराणश्रवणापासून उत्पन्न झालेल्या सुकृतानें शूद्रादिकांनां दूर करावी लागतात. म्हणूनच ''चाऱ्ही वर्णाला ऐकवावे'' ''शूद्र सुखी होतो'' या वाक्यांत इतिहासपुराणांच्या श्रवणाचा व पठणाचा अधिकार असणाऱ्या शूद्राला इतिहासपुराणजन्य नियमादृष्टावांचून[६] पुस्तकावरून केलेल्या उपनिषदांच्या अध्ययनानें ब्रह्मज्ञान कसें संभवते? इतिहास व पुराणश्रवण करण्याविषयीं साधारण नियम आहेत, प्रत्येक पुराणाविषयीं कांहीं नियम निरनिराळे आहेत, व भारताच्याहि पर्वापर्वाचे नियम निरनिराळे आहेत. पुनः गीतादिभागामध्यें ''मी तुझा शिष्य आहे, मला कृपा करून उपदेशावे'' इत्यादि असलेल्या वाक्यावरून सद्गुरुद्वाराच वेदान्तश्रवणादिकांचा अधिकार आहे. त्याचें उल्लंघन करून उपनिषदाचीं पुस्तकें वाचून किंवा स्वतंत्र अनुमानें करून ब्रह्मज्ञानाची आशा करणें, ज्यांना वेदमर्यादा ठाऊक नाहीं त्यांनांच बरें दिसते. त्यांचे ते श्रम निरर्थक आहेत असा भाव.

पूर्वपक्षी म्हणतोः- असें असलें तरी इतिहासपुराणावरून ब्रह्मविद्या संपादन करण्याचा शूद्रादिकांना अधिकार नाहीं; कारण शूद्रांनीं विद्या शिकावी असा कोठें विधि नाहीं. जे विशेष धर्म शूद्रादिकांना सांगितले नाहींत, तें करण्याचा त्यांना निषेध आहे.

उत्तरपक्षी म्हणतो :- हें म्हणणें सत्य आहे, परंतु ब्रह्मविद्या विधिस्वरूप नाहीं, तिचें फल आनंदसाक्षात्काररूप मोक्षच आहे म्हणून, व ज्ञान वस्तुतंत्र आहे म्हणून, विधीची ब्रह्मविद्येच्या साधनांत अपेक्षा आहे. त्यांत (य११पू.१६०) द्विजांना वेदान्तश्रवण विहित असून शूद्रादिकांना पुराणश्रवणाविषयीं विशेष विधि आहे.

पूर्वपक्षी म्हणतो :- पण ''आत्मा पहावा ऐकावा'' या श्रुतिवाक्यांत जसा फलाचा व साधनाचा निकट संबंध दाखविला आहे, तसा इतिहासपुराणादिकांचा दाखविला नाहीं.

उत्तरपक्षी म्हणतोः- हे ठीक आहे. परंतु जी गोष्ट जेथें सांगितलेली असते तिला कांहीं बाधक नसेल तर त्या गोष्टीचे फलाचा व सांगण्याचा दृढ संबंध असतोच. जसे ''धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चाऱ्ही साधनाविषयीं जे येथे आहे तेच दुसरीकडे आहे, व जे येथे नाहीं ते कोठेंच नाहीं'' इत्यादि वाक्यावरून त्याच्या ठिकाणीं सांगितलेलें ज्ञान फलजनकच असते. याप्रमाणें ज्याला जेथें अधिकार आहे त्याला तेथें फळहि आहेच. जरी उपनिषत् ऐकण्याचा अधिकार असणाऱ्या तीन वर्णांना इतिहासपुराणाचा विचार केवळ उपनिषदाचें तात्पर्य दृढ मनांत ठसण्यापुरतांच आहे, तरी वेदाविषयीं ज्यांना निषेध आहे त्यांना इतिहास पुराण साक्षान्मुक्तिचेंच साधन आहेत. सारांश, जसा अध्ययन करणाऱ्यांना अनुष्ठानादि करण्याकरितां अर्थज्ञानरूपविचार आक्षिप्तच आहे; त्याप्रमाणें शूद्रांना इतिहासपुराणश्रवणादिकामुळेंच मनननिदिध्यासनहि आक्षिप्त आहेतच. म्हणून इतिहासपुराणादि शूद्रांना मोक्षोपाय आहेत हें सांगणें न्याय्यच आहे.

पूर्वपक्षी म्हणतो :- अहो हें निर्गुणविद्येविषयीं असो, पण पुण्यलोक देणाऱ्या सगुणोपासनांचें त्यांना विशेष विधान नाहीं.

उत्तरपक्षी म्हणतोः- नसूं द्या; इतिहासपुराणानेंच त्यांचा पापक्षय व त्यांना पुण्यलोकप्राप्ति होते. पुनः इतिहासपुराणांत सांगितलेल्या कांहीं सगुणविद्येविषयींहि शूद्रादिकांचा अधिकार आहे. जसा पंचाक्षरी मंत्राविषयीं ब्रह्मोत्तरखंडांत शूद्रांना अधिकार सांगितला असून, नारदाच्या पूर्वीच्या शूद्रजन्मांत मुनीनीं त्यांना अच्युतोपासना सांगितली होती असें श्रीमद्भागवतांत आहे. याप्रमाणें शैव, पाशुपत, पंचरात्र इत्यादि आगमोक्त विद्यांच्या विषयीं संस्कारपूर्वक शूद्रादिकांना अधिकार आहेच. ''शूद्रः सुखमवाप्नुयात्'' याचा अर्थ अपय्यादीक्षिताचार्यांनीं पठणपरच घेतला आहे असें दिसते. (य११पू.१६१)

आतां शूद्राला मोक्षोपायाधिकार सांगतो-

**''कथं तर्हि भाष्ये तेषां पुराणेतिहासादिमूलविद्यानुष्ठानाभ्युपगमः?**
**''श्रावयेच्चतुरो वर्णान्'' इति श्रवणात् तस्य दृष्टार्थत्वाय पुराणेतिहासशैववैष्णवादि आगमवर्णितयजमानकर्तृकवैदिकमंत्राद्युच्चारणानपेक्ष्य व्रतनियमोपासनादिः संभवतीति तदभिप्रायः''** (वेदान्तकल्पतरुपरिमल अ.१ पा.३ अधि.४)
**ननु तर्हि ये मुमुक्षवः शूद्रास्तेषां किं मोक्षोपाया एवापलप्यन्ते नेत्यभिप्रेत्याह ।**
**''श्रावयेच्चतुरो वर्णानिति'' ।**
**नन्वेतद्वचनपर्यालोचनया भारतश्रवणे ऽधिकारोऽस्तु नाम ।**
**तावता कथं मोक्षाधिकारितेति चेदुच्यते ।**
**मोक्षो नामानंदसाक्षात्कारः ।**
**तदधिकारो नाम तत्रैच्छा ।**
**सा तु स्वत एव सर्वेषां न निषेद्धुं शक्या न हि सा धर्मः ।**
**तत्साधनीभूतो यो वृत्तिरूपः साक्षात्कारः सोऽपि ''धर्मेऽस्याधिकारोऽस्तीति'' प्रतिषेधस्य विषयो न भवति ।**
**विधिना अलौकिकश्रेयस्साधनतयानुष्ठेयत्वेन यो बोध्यते स हि धर्मः।**
**ब्रह्मज्ञानस्य च प्रमाणवस्तुपरतंत्रस्य पुरुषकृत्यसाध्यस्याननुष्ठेयतया धर्मत्वाभावात्।**
**तथाच तत्रापि तदिच्छारूपोऽधिकारो नानुपपन्नः ।**
**तदुपायेषु परं वेदान्तश्रवणादिषु विधेयतया धर्मभूतेष्वधिकारस्य निषिद्धत्वात् न तदनुष्टानं फलपर्यवसायीति वक्तव्यम् ।**
**''धर्मेऽस्य नाधिकारोऽस्तीति'' वचनं विशेषविहितेतरविषयम् ।**



**भारतश्रवणं च विशिष्य विहितम् ।**
**अतस्तदन्तर्गतब्रह्मभागश्रवणे सति जायमानं ज्ञानं केन वारयितुं शक्यं ।**
**न च वाक्यश्रवणमात्रेणार्थबोधो न भवति ।**
**अपि तु तदर्थध्यानादिकमप्यपरोक्षज्ञानायापेक्षितम् ।**
**तत्तु शूद्रस्य न विहितमिति वाच्यम् ।**
**तावता हि भारतश्रवणजनितं ज्ञानमपरोक्षतापर्यवसायि न भविष्यति ।**
**परोक्षं तु ब्रह्मज्ञानं भारतादिश्रवणे शूद्राणामपि संभाव्यत एव ।**
**ननु यदि परोक्षब्रह्मज्ञानमेवाद्वितीयवस्तुपरं भारतांशश्रवणस्य फलं ।**
**तर्हि तद्भाषाप्रबंधेनापि संपादयितुं शक्यमिति शूद्राणां भारतश्रवण एव को निर्बन्ध इति चेत् भारतादिश्रवणजनितस्यात्मज्ञानस्य जन्मान्तरे ह्यपरोक्षतायामुपयोगो वक्तव्यः तत्र प्रतिबन्धकीभूतदुरितक्षपणं नियमादृष्टस्य प्रयोजनं भविष्यति ।**
**एवं यानि सगुणोपासनानि विशिष्य शूद्रं प्रति (य११पू.१६२) शैववैष्णवतंत्रेषु प्रदर्शितानि तत्र शूद्रस्याधिकारे न काचिदनुपपत्तिः ।**

(ब्रह्मविद्याभरण अ.१ पा.३ सूत्र ३८)

भावार्थः- तर मग काय मोक्षाची इच्छा करणाऱ्या शूद्रांना मोक्षोपायच नाहींत? आहेत असें सांगतात ''चाऱ्ही वर्णांना श्रवण करवावे ऐसे ''

पूर्वपक्षी म्हणतोः- चाऱ्ही वर्णाला श्रवण करवावे या वचनावरून भारतश्रवणाविषयीं अधिकार असो; परंतु मोक्षाचा अधिकार आहे हें कशावरून?

उत्तरपक्षी म्हणतोः- मोक्ष म्हणजे आनंदसाक्षात्कार. त्याची इच्छाकोणालाही असणें स्वाभाविक आहे; आणि तिचा निषेधहि करणें शक्य नाहीं. ती कांहीं धर्म नव्हे कीं प्रतिषेधाचा विषय होईल. ''अलौकिक फळ मिळावे म्हणून जो विधीनीं सांगितल्या जातो त्याला धर्म म्हणतात'' आणि ब्रह्मज्ञान तर प्रमाणसाध्य असून वस्तुतंत्र असल्यामुळें विधिप्रतिषेधाचा विषय होत नाहीं.

पूर्वपक्षी म्हणतो :- अहो पण तरी ब्रह्मज्ञानाच्या इच्छेविषयीं शूद्राला अधिकार प्राप्त होत नाहीं; कारण धर्माप्रमाणेंच वेदान्तश्रवण ज्ञानाविषयीं विहित असून शूद्राला त्याविषयीं निषेध आहे म्हणून केलेलेंहि श्रवण सफल होणार नाही.

उत्तरपक्षी म्हणतो :- हें म्हणणें बरोबर नाहीं. धर्मांत शूद्राला अधिकार नाहीं हें वचन त्याला जे धर्म सांगितले आहेत त्याहून भिन्न धर्माविषयीं निषेध

करीत आहे. भारतश्रवण शूद्राला विहीत म्हणून सांगितलें आहे; म्हणून तदंतर्गत वेदान्तभाग ऐकून जर शूद्राला ज्ञान झाले तर त्याचे कोणाच्यानें निवारण करणें शक्य आहे?

याप्रमाणें तीव्र मुमुक्षु जो शूद्र आहे त्याला पुराणश्रवणानें अपरोक्षज्ञानार्थता सुचविली. आतां मंद मुमुक्षु शूद्राविषयीं पूर्वपक्षीं शंका करितो.

पूर्वपक्षी म्हणतोः- अहो! वाक्य श्रवण करूनच केवळ ब्रह्मज्ञान होत नाही. त्याना मनननिदिध्यासाची अपेक्षा आहे, आणि ते तर शूद्राला विहित नाहीं.

उत्तरपक्षी म्हणतो :- त्यामुळे त्याला अपरोक्ष ज्ञान न होवो, परंतु परोक्षज्ञान श्रवणमात्रानेंच होते ?

पूर्वपक्षी म्हणतो - परोक्षज्ञान भाषाप्रबंधादिकानेंहि होईल.(य११पू.१६३)

उत्तरपक्षी म्हणतो :- भाषाप्रबंधादिकानें झालेलें परोक्षज्ञान शूद्राला नियमादृष्टसंपादक नाहीं, आणि भारतादिश्रवणानें झालेलें परोक्षज्ञान नियमादृष्टसंपादक आहे, हा विशेष समजावा. नियमदृष्टीनें शूद्राचें ज्ञानप्रतिबंधक पापांचा क्षय होऊन परोक्ष आत्मज्ञानाचा जन्मांतरीं अपरोक्ष आत्मज्ञानांत उपयोग होतो. एवं शैववैष्णवादितंत्रामध्यें शूद्राला विशेषेंकरून ज्या सगुणोपासना सांगितल्या आहेत, त्या विषयीं कोणतीच अनुपपत्ति नाहीं.

ब्रह्मविद्याभरणकारानीं अपरोक्षज्ञान शूद्राला श्रवणानें होत नाहीं व मनननिदिध्यासनाचा अधिकार नाहीं, असें एक वेदान्तांतील मत दर्शविले आहे. असेंच योगवासिष्ठाच्या टीकाकारानींहि असें म्हणणारे कांहीं आहेत असें सांगितलें आहे, आणि योगवासिष्ठश्रवणाविषयींहि शूद्राला अधिकार दिला आहे. आतां निदिध्यासनाविषयीं अधिकारहि गरुडपुराणांत सांगितला आहे.

**सर्वे वर्णा स्त्रियः सर्वाः कृत्वा पापानि भस्मसात् ।**
**ध्यानाग्निनामलाः सन्तो लभन्ते परमां गतिम् ॥** (गरुडपुराण.)

अर्थ स्पष्ट आहे. तातानींहि ''योग्यतेची कांहीं खाणि आहे'' इत्यादि वचनानीं सर्वांना योगरूप निदिध्यासनाधिकार सांगितला आहे. आतां स्त्री शूद्रांना अपरोक्षज्ञान होते हें स्वामी शंकरानंद म्हणतात तें येणें प्रमाणें –

**मां हीति द्वाभ्याम् ।**

**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रा येऽपि स्युरन्ये पापयोनयो नीचजन्मानो ये नीचकर्माणश्च म्लेच्छपुक्कसादयस्तेऽपि मां परमात्मानं सोपाधिकं निरूपाधिकं वा सद्गुरूपदेशजनितज्ञानेन व्यपाश्रित्य सम्यगुपास्य क्रमेण साक्षाद्वा परां गतिं परमपुरुषार्थं कैवल्यं प्राप्नुवन्तीत्यर्थः ।**

**हि शब्दः ''किरातहूणांध्रपुलिंदपुल्कसा आभीरकंकायवनाः खशादयः । येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रयाः शुद्ध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नमः'' इत्यादिशास्त्रप्रतिद्धिद्योतनार्थः ।**

**एतेन स्त्रीशूद्रादीनामपि शास्त्रप्रज्ञाशून्यानां ज्ञानतत्फलप्राप्तिप्रतिपादनेन ज्ञानस्य अतिसुलभत्वं सूचितं भवति ॥** (गीता अ.९ श्लो.३२) (य११पू.१६४)

भावार्थ :- स्त्री, वैश्य, शूद्र किंवा आणखी जे पापयोनि चांडालादिक ते सद्गुरूपदेशानें माझा निरूपाधिक किंवा सोपाधिक परमेश्वराचा आश्रय करून अधिकारानुसार क्रमानें किंवा साक्षात् मुक्तीला प्राप्त होतात. तात्पर्य शास्त्रप्रज्ञारहित अशा स्त्री शूद्रांना देखील ज्ञान होते असें सांगितले, यावरून ज्ञान फार सुलभ आहे. हि शब्दाचा अर्थ करतांना भागवताचा श्लोक दिला आहे, किंतु भगवद्भक्तांना साक्षात् ज्ञान होते असें यांचें मत आहे.

वादी उवाचः- अहो ब्रह्मज्ञानाला जर धर्मता नसती, तर तुमची सर्व मते प्रमाण झाली असती; पण ब्रह्मज्ञानाच्या धर्मतेविषयीं वचन आहे.

**प्रवृत्तिसंज्ञके धर्मे फलमभ्युदयो मतः ।**
**निवृत्तिसंज्ञके धर्मे फलं निःश्रेयसं मतम् ॥**

अर्थः- प्रवृत्तिलक्षण धर्माचें फल अभ्युदय आहे व निवृत्तिलक्षण धर्माचें फल मोक्ष आहे. - या वाक्यांत सांगितलेला निवृत्तिलक्षण धर्म ब्रह्मज्ञानच होय कारण त्याचेंच फल मोक्ष आहे. शिवाय ''आत्मा वा अरे श्रोतव्य':'' या वाक्यांत नियमविधि मानला आहे. नियम म्हणजे दोन्ही पक्षानें एक गोष्ट प्राप्त झालीं असतां एका पक्षाचा अंगिकार करणें. जसें ज्ञानाकरितां श्रवण विहित आहे पण तें पुराणाचें कीं वेदाचें? असें दोन्हीं पक्षीं प्राप्त झाले असतां तें वेदाचेंच श्रवण विहित आहे हा नियम समजावा. या नियमामुळेंच मोक्षधर्म असाधारण होतो; म्हणून त्याचा शूद्रास अधिकार नाहीं, व त्यामुळें त्याला ज्ञानहि उत्पन्न होत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- तुझें म्हणणें सम्यक् नाहीं. धर्म कर्तृतंत्र आहे, आणि ज्ञान वस्तुतंत्र आहे. यास्तव शतावधिवचनानेंहि तें धर्मरूप होऊं शकणार नाहीं.

तूं दिलेल्या वाक्यांत निवृत्तिलक्षण धर्म जो सांगितला आहे, तो शमदमादिरूप आहे, आणि शमदमादिकांस मोक्षधर्मत्वहि आहे.

**अहिंसासत्यमस्तेयमकामक्रोधलोभता ।**
**भूतप्रियहितेहाच धर्मोऽयं सार्ववर्णिकः ॥ (य११पू.१६५)**

हें भागवतवचन त्याच्या साधारणत्वाविषयीं प्रमाण समजावे.

वादी उवाचः- हा साधारण धर्म झाल्यास अन्य असाधारण धर्माची अपेक्षा असलीच पाहिजे, नाहीं तर सर्व फल साधारण धर्मानेंच मिळाल्यास असाधारण धर्म सांगणारें शास्त्र व्यर्थ होऊन आयाससाध्य असा असाधारण धर्म आचरण्यास कोणी प्रवृत्त होणार नाहीं. त्यामुळें वर्णभेदहि अप्रयोजक होऊन जातिसांकर्य होईल, म्हणून मोक्ष असाधारण धर्माचेंच फल मानले पाहिजे.

सिद्धान्ती उवाचः- हे वादिन् । शमदमादिक जसें साधारण धर्म आहेत, तसें ते असाधारण धर्महि आहेत. महाभारतांत शमादिक साधारण धर्म सांगितले आहेत, आणि गीतेंत ''शमो दमस्तपःशौच'' इत्यादि श्लोकांनीं ब्राह्मणांचे विशेष धर्महि सांगितले आहेत. तेव्हां शमदमादिक साधारण धर्महि आहेत व विशेष धर्महि आहेत.

वादी उवाचः- अहो शूद्राच्या शमदमाच्या अपेक्षेनेंच ब्राह्मणाचें शमदमादिक असाधारण धर्म आहेत, परंतु वेदाध्यनादिकांचे अपेक्षेनें नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- तुला भ्रम झाला आहे, कारण जे ब्राह्मणांचे वर्णत्रयापेक्षा असाधारण धर्म आहेत, ते बहुधा गौण आहेत; म्हणजे तें करावयाचें असल्यास ब्राह्मणानींच करावेत, पण न केल्यास ब्राह्मणास प्रत्यवाय नाहीं. याजन, अध्यापन, प्रतिग्रह हे ब्राह्मणांचेच असाधारण धर्म आहेत, इतरांचे नाहींत; म्हणजे इतरानीं ते करूं नयेत, परंतु ब्राह्मणानींहि हे केलेच पाहिजेत असा त्यांना आग्रह नाहीं. यद्यपि ''स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्'' शिकण्याचा व सांगण्याचा प्रमाद करूं नये या श्रुतीवरून अध्ययन ब्राह्मणांला नियत होत असले तरी याजन, प्रतिग्रह त्यांच्या खुषीवर अवलंबून आहे. शिवाय (ज्याप्रमाणे) पायसान्न (बासंदी) व परमान्न (क्षीर) सर्व जनाच्या दृष्टीनें साधारण अन्न आहे, व भस्मक रोगाकरितां असाधारण औषध आहे; त्याप्रमाणें शमदमादिक धर्मांत साधारण आहेत व मोक्षाविषयीं असाधारण आहेत. क्रियारूप असल्यामुळें याठिकाणीं स्याद्वादाचीही



अपेक्षा नाहीं. भगवंताचें वाक्यहि एतत्संबंधी प्रमाण आहे ते असें- (य११पू.१६६)

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।**
**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥३॥(गीता अ.६)**

अर्थः- योगारूढ होण्याची इच्छा करणाऱ्यास कर्म करावे लागते, व योगारूढ झाल्यावर शमच करावा लागतो.

या वाक्यांत योगारूढाचा शम मोक्षाकरितां असाधारण सांगितला आहे. शिवाय सकल साधारण व असाधारण धर्म विद्याजनकच आहेत असें संक्षेपशारीरककारादि म्हणतात. स्वर्गाद्यभ्युदयाकरितां मात्र असाधारण धर्माची अपेक्षा आहे. यद्यपि मोक्षापेक्षां अभ्युदय गौण आहे, त्याविषयीं एवढी असाधारण धर्माची अपेक्षा कां अशी शंका येते, तथापि मुख्यापेक्षां गौणाचें आयाससाध्यत्व धर्मदृष्टीनें लोकांत दृष्ट आहे. लेकराला दुध पिण्याकरितां आई कोणीहि होऊं शकते, पण लग्न केल्यावांचून भार्या कोणी होऊं शकत नाहीं; हा नियम सर्वांस ठाऊक नाहीं काय? इतकेंहि करून जर आत्मज्ञानच मोक्ष धर्म म्हणत असशील, तर तुझ्या म्हणण्याप्रमाणें अंगीकार करून देखील महाभारतानुसार हेमाद्रीनीं आपल्या चतुर्वर्गचिंतामणींत निर्णय केला आहे तो येणें प्रमाणें-

साधारणधर्मास्तु महाभारतेः-

**श्राद्धकर्म तपश्चैव सत्यमक्रोध एवच ॥**
**स्वेषु दारेषु संतोषः शौचं नित्यानुसूयता ॥**
**आत्मज्ञानं तितिक्षा च धर्मः साधारणो नृप ॥**
**चातुर्वर्णस्येति शेषः । तपश्चांद्रायणादिः । यदाह देवलः ।**
**व्रतोपवासनियमैः शरीरोत्तापनं नृप ।**
**व्रत शब्दोऽत्र स्नानदानजपहोमपूजोपवासादिपरः ।**
**एतेन व्रतखण्डप्रतिपाद्यानां धर्माणामपि साधारणत्वं सूचितं ।**
**आत्मज्ञानमित्यनेन मोक्षखंडप्रतिपाद्यानामपि धर्माणां साधारणत्वं ।**
**न चापशूद्राधिकरणन्यायेन शूद्राणां विद्यायामनधिकार इति ।**
**कथं मोक्षधर्माणां साधारणत्वमिति वाच्यम् ।**
**तेषामुपनयनाभावेनाध्ययनासंभवाद्वेदवाक्यविचार एवानधिकारः।**
**न पुनरवैदिके ''श्रावयेच्चतुरो वर्णान्'' इति शूद्राणामपि पंचयज्ञादिवत् पुराण-**

**स्मृतिप्रतिपाद्यविद्योपदेशदर्शनात् । (य११पू.१६७)**
**ननु तथापि कथं वेदान्तवाक्यविचारजनितज्ञानाभावे शूद्राणां मोक्षधर्माधिकार इति चेन्मैवं मोक्षसाधनस्य तदेव साध्यत्वसिद्धेः ।**
**तथा च श्रुतिः –**
**''तरति शोकमात्मवित् ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति ।**
**ब्रह्मविदाप्नोति परम् ।**
**विद्यया मृतमश्नुत'' इति मोक्षस्यात्मज्ञानसाध्यतां वदति ।**
**आत्मज्ञानस्यच पुराणादिवचननिचयविचारपरिचयादप्युपपत्तेः ।**
**श्रोतव्य इत्यादिवाक्यानां तु विचारनियमबिधित्वानंगिकारात् ।**
**अंगीकारे वा तस्य द्विजातिनियततया 'श्रावयेच्चतुरो वर्णान् इत्यादि पुराणवचनविषयविधेरप्यध्ययनविधिवद्विचारपर्यंततास्तु ।**
**ततश्च यथा द्रव्यसाध्यत्वाविशेषेऽपि क्रतूनां तत्तद्वर्णविहितोपायनियमार्जितद्रव्यसाध्यत्वम् ।**
**एवमात्मज्ञानसाध्यत्वाविशेषेऽपि मोक्षस्य तदुपायविशेषजनितज्ञानसाध्यत्वमिति सर्वमनवद्यम् ।**
**तथाचोक्तं भागवते -**
**स्त्रीशूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा ।**
**इति भारतमाख्यानं मुनिया कृपया कृतम् ॥**
**महाभारतेऽपि -**
**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥**

भावार्थः- या वाक्यावरून व्रत दान तीर्थ मोक्ष आणि परिशेषदेवतापूजनादि या सर्व धर्माला साधारणत्व असल्यामुळें ते धर्म चारी वर्णाला आचरण्याजोगे आहेत. अपशूद्राधिकरणांत शूद्राला ज्ञानाचा अधिकार नाहीं असे सांगितले आहे. त्यामुळें मोक्षधर्म साधारण नाहीं असें मात्र कोणी म्हणूं नये. उपनयनादि संस्कार नसल्यामुळें शूद्राच्या वेदविद्येचाच निषेध केला आहे. 'ब्राह्मण पुढें करून चाऱ्ही वर्णांना ऐकवावे' इत्यादि वाक्यें असल्यामुळें इतिहासपुराणांतर्गत ब्रह्मज्ञानाचा शूद्रासंबंधीं निषेध करतां येत नाहीं. शिवाय वाचस्पत्यादिकानीं श्रोतव्य या वाक्यांत नियमविधीचा अंगिकारहि केला नाही; किंवा विवरणकारांच्या म्हणण्याप्रमाणे नियमाचा अंगिकार केला, तरी तो द्विजाविषयींच लागू होतो, शूद्राविषयीं इतिहास पुराणें सार्थक आहेतच. शिवाय ज्ञान झाल्यावर मोक्ष होणार नाही असें म्हणता येत नाहीं; कारण मोक्षाचा व ज्ञानाचा अन्वय व्यतिरेक असून मोक्ष अन्यनिरपेक्षज्ञानसाध्य आहे.(य११पू.१६८) द्विजांच्या वेदाध्ययननियमाप्रमाणें ब्रह्मविद्येपर्यंत शूद्रालाहि पुराणश्रवणाचा नियम असो, किंतु जसा आपल्या आपल्या उपायानीं सर्वांना द्रव्य साध्य आहे, तसा मोक्षहि सर्वांना आपापल्या उपायानीं साध्य आहे हें भागवतांत सांगितले आहे. ''स्त्री,शूद्र आणि पतित द्विज यांना वेदश्रवण करण्याचा अधिकार नाहीं'' असें पाहून भगवान् बादरायणाचार्य मुनीनीं हें भारताख्यान रचले. – या हेमाद्रीच्या निर्णयावरूनहि शूद्राला ज्ञान साध्य आहे यांत संशय नाहीं. हेमाद्रि ग्रंथ सर्व निबंधकारांस मान्य आहेच. अन्य वर्णांना केवळ भाषाप्रबंधानें नियमादृष्ट उत्पन्न होतें हें सूतसंहितेंत सांगितलें आहे.

**अन्येषमपि सर्वेषां ज्ञानाभ्यासो विधीयते**
**भाषान्तरेण कालेन तेषां सोऽप्युपकारकः ॥२२॥**(सूतसंहिता शिवमाहाम्यखंड अ.७)

अर्थ स्पष्ट आहे; परंतु शूद्राला तर पुराणश्रवणानेंच नियमादृष्ट उत्पन्न होते, कारण ब्राह्मणांना तर उपनिषच्छ्रवणच नियमविधि आहे असें विवरणकार म्हणतात; म्हणून पुराणें केवळ शूद्राकरितांच आहेत असें म्हणणें वाउगे होणार नाहीं. ज्ञानेश्वरी, नाथभागवत, विवेकसिंधु इत्यादि ग्रंथांच्या मनन-निदिध्यासनादिकानें गावोबा मृत्युंजयादिकांना अपरोक्ष ज्ञान कलींतहि दृष्ट आहेच.

वादी उवाचः- पण मनननिदिध्यासनाकरितां पठणाधिकार किंचित् तरी पाहिजे, आणि शूद्राला तर तो मुळीच नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- त्याविषयींहि विकल्प आहे तो तुला सांगतो. धर्मसिंधुकारानें ''केचिदवैदिकमंत्रेणोपनयनमप्याहुः'' असें म्हटलें आहे; आणि वैदिकरहित मंत्रानें शूद्राचें उपनयन करावे, असा त्या वाक्याचा अर्थ आहे. उपनयनविधीनेंच अर्थांत अवैदिक अध्ययन सिद्ध झालें ह्याविषयीं स्कंदपुराणांत असें वाक्य आहे कीं,

**शूद्रोऽपि प्रातरुत्थाय कृत्वा पादाभिवंदनम्**
**विष्णुभक्तिमयान् श्लोकान् पठन्विष्णुत्वमाप्नुयात् ॥५॥** (स्कंदपुराण नागरखंड अ.२४२) (य११पू.१६९)

अर्थ :- शूद्र प्रातःकाळी उठून नम्यांना प्रणाम करून विष्णुभक्तिमय श्लोकांचें पठण करील तर तो विष्णुलोकाला जातो.

श्लोकांत ''श्लोकान्'' असें बहुवचन आहे, त्यामुळें पुष्कळ पुराणपाठाविषयीं शूद्राधिकार सिद्ध होतो. आतां भक्तिभिन्न जो पुराण भाग त्याविषयीं अधिकार असो किंवा नसो, त्याचें आम्हाला कांहीं कर्तव्य नाहीं. पौराणमंत्र शूद्रांना विहित आहे असें शूलपाणि म्हणतो. विष्णुभक्तिमयच श्लोकांचें पठण करावे या विधीवरूनच शूद्रांचें वैष्णवत्व सिद्ध आहे, व तसेंच शैवत्वहि सिद्ध आहे; कारण शिवपंचाक्षरी मंत्राचा अधिकार शूद्राला स्कंद पुराणांत ब्रह्मोत्तरखंडांत सांगितला आहे. ज्याचें जें जें जाप्य आहे तें तें गायत्रीतुल्य आहे असें महाभारत व त्याच्या टीकेवरून सिद्ध होते.

**यदस्मिन्नियतं लोके सर्वं गायत्रिरुच्यते ॥६॥** (महा.अश्व.पर्व.अ.४४)

**टीका :- सिंहावलोकनेन सावित्रीं व्याचष्टे ।**
**उपासनार्थं नियतं जप्यं ब्राह्मणक्षत्रियादिम्लेच्छान्तानां तत्सर्वं सावित्रिपदवाच्यमिति।**

अर्थ स्पष्ट आहे. विष्णुसहस्त्रनामाच्या जपाविषयींहि भारतटीकाकार नीलकंठ शूद्राला अधिकार सांगतात.

'शूद्रः सुखमवाप्नुयात्' इत्यनेन शूद्रस्याप्येतज्जपेऽधिकारोऽस्तीति दर्शितम्' ।

अर्थ स्पष्ट आहे. श्रीमच्छंकराचार्यांनी ंजो विष्णुसहस्त्रनामपठणाचा निषेध केला आहे, तो अर्थातच असच्छूद्रपर असला पाहिजे; कारण नीलकंठाची उक्ति स्कंदपुराणोक्त्यनुसार आहे. स्कंदपुराणांत शूद्रानें पुराणाचा पाठ करूं नये म्हणून सांगितले, तेंहि विष्णुभक्तिव्यतिरिक्त पुराणाविषयीं किंवा असच्छूद्राविषयीं समजावे; कारण गोपिकांनीं पठण केलेलें गोपीगीत व युगुलगीत भागवतांत प्रसिद्ध असून, धर्मव्याधानें स्तोत्रपठण केल्याची कथा वराहपुराणांत आहे.

**धर्मव्याधो जगामाशु तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम् ॥४१॥**
**पुरुषोत्तमाख्यं च परं तत्र गत्वा समाहितः।**



**तपश्चचार नियमान् पठन् स्तोत्रमिदं धरे ॥४२॥** वराहपुराण अ.८ **(य११पू.१७०)**

**धर्मव्याध तीर्थांसी गेला । तप करीत हें स्तोत्र म्हणो लागला । याचि अध्यायीं इतिहास वहिला । कीं मुनिवरी कोपोनी गेला व्याध क्षेत्रा ॥५९॥**
**तरी तयासी विष्णु प्रसन्न । तपें स्तोत्रें झाला म्हणोन ।**
**भक्तीचि सकळा कारण । श्रेयस्कर हा वाराहाभिप्रावो ॥६०॥**

याप्रामाणें कैमुतिकन्यायानें शूद्रांना पुराणपठणाधिकार दिसत असून, तातहि ''येरा स्तोत्र कां नाममंत्र'' असा स्वाध्याय सांगतात. माधवाचार्यांनीं तर पराशरस्मृतीच्या पहिल्या श्लोकाच्या स्वकृत टीकेंत केवल वेदमंत्रवर्ज्य करून स्मृत्यादि सर्व आर्ष व तदितर पौरुषेय ग्रंथांचा चाऱ्ही वर्णांना अधिकार सांगितला आहे तो असा-

**एवं तर्हि ॐकारोऽत्र प्रयुज्यतामिति चेत् ।**
**न तस्य श्रुतिविषयत्वात् ।**
**अत एवाचार्यैः प्रपंचसारेऽभिहितम् 'अस्य तु वेदादित्वात् सर्वमनूनां प्रयुज्यते ह्यादौ' इति ।**
**ततः स्मृत्यादावथशब्द एव महर्षिभिः प्रयुज्यते ।**
**अधिकारिपर्यालोचनेनापि ॐकाराथशब्दयोरुक्तविषयव्यवस्था सिद्ध्यति ।**
**त्रैवर्णिकमात्राधिकारा हि श्रुतिः प्रसिद्धा ।**
**ॐकारश्च तथाविधः''सावित्रीं प्रणवं यजुर्लक्ष्मीं स्त्रीशूद्रयोर्नेच्छन्ति'' इति श्रुतेः।**
**अथशब्दस्य पौरुषेयग्रंथानां च सर्ववर्णविषयत्वात् स एव तेषु योग्यः।**

(पराशरस्मृति आचारकांड अ. १ श्लो. १)

भावार्थः- ॐकार व अथ शब्द दोन्ही जर मंगलकारक आहेत तर स्मृतीचें पूर्वी ॐकारच असणें बरें, अथ शब्द नको. या शंकेवर समाधान सांगतात. शंकराचार्यानीं प्रपंचसारांत ॐकार वेदाचा आदि असून सर्व मंत्रांच्या पूर्वी त्याचा उपयोग करितात असें म्हटलें आहे. म्हणूनच स्मृतींच्या अगोदर महर्षि अथ शब्दाचा उपयोग करितात. प्रणवाचाहि श्रुतीप्रमाणें तीन वर्णांसच अधिकार आहे; कारण प्रणवाचा शूद्रास अधिकार नाहीं अशी नृसिंहतापनीय श्रुति आहे. स्मृत्यादि पौरुषेय ग्रंथांचा चाऱ्ही वर्णांना अधिकार आहे म्हणून त्या ग्रंथांच्या आरंभीं अथ शब्दच ठेवणें योग्य आहे.

यावरून सर्व पौरुषेय ग्रंथपठणनिषेध असच्छूद्रपर समजावा. विज्ञानभिक्षु आपल्या ब्रह्मसूत्रभाष्यांत तर शूद्रांना पुराणपठणाधिकार स्पष्ट सांगतात. (य११पू.१७१)

**''विदुरादीनां पुराणादेर्ब्रह्मज्ञानमैहिकाध्ययनसाध्यमपि स्वीकर्तुं शक्यते''**

अर्थ स्पष्ट आहे. याप्रमाणें संन्यासाधिकारहि शूद्राला महाभारतांत सांगितला आहे.

**''पुराणादिश्रवणनिदिध्यासनादिं कृत्वा ब्रह्मज्ञानमपि स्त्रीशूद्रैः संपाद्यम्''**

(धर्मसिंधु पूर्वार्ध परि.३)

असें धर्मसिंधुकारानीं म्हटलें आहे.

पुनः महाभारताच्या टीकेंत -

**''शूद्रोऽपि नैष्ठिकं ब्रह्मचर्यं वानप्रस्थं वा अनुतिष्ठेत्''**(भा. शां. अ. ६३ श्लो. १३)

असें नीलकंठ म्हणतात. याप्रमाणें उपनीत शूद्राच्या अध्ययनाविषयीं विचार सांगितला; परंतु अनुपनीत शूद्राला देखील अध्ययनविचार सुश्रुताचार्य सांगतात.

**शूद्रमपि कुलगुणसंपन्नं मंत्रवर्ज्यमनुपनीतमध्यापयेदित्येके ।**(सुश्रुत.सूत्रस्थान अ.२)

अर्थ :- कुलसंपन्न व शिष्याला पाहिजे त्या गुणानीं संपन्न असतां उपनयन न केलेला शूद्र देखील वेदमंत्रवर्ज्य करून शेषभाग पढविण्यास योग्य होतो असें कोणी म्हणतात. यावर निबंधसंग्रह संज्ञक डल्लनाचार्यांची व्याख्या आहे तीहि सांगतो.

**शूद्रमपि कुलगुणसंपन्नमित्यादि ।**

**कुलसंयुक्तं गुणसंपन्नं वयः शौचादिशिष्यगुणसंयुक्तं अनुपनीतं दीक्षारहितं शूद्रमपि गुणसंपन्नमंत्रवर्ज्यं उपनीय अध्यापयेत् इत्येके इति केचित्पठन्ति ।**

भावार्थः- गुणसंपन्न शूद्राचें देखील मंत्रवर्ज्य उपनयन करून त्याला पढवावे असे कोणी म्हणतात. अन्य अर्थ स्पष्ट आहे. याप्रमाणें वेद व पुराणश्रवणपठणाविषयीं अधिकार झाला.

आतां पौरुषेय ग्रंथाविषयीं विचार सांगतो.–

नाट्य हा पंचम वेद असून तो स्त्रीशूद्रांना द्यावा असें भरताचार्यांनीं आपल्या नाट्यशास्त्रांत म्हटलें आहे.

**नव्य वेदविहारोऽयं संश्राव्यः शूद्रजातिषु ।**

**तस्मात्सृजापरं वेदं पंचमं सार्ववर्णिकम् ॥१२॥** (नाट्यशास्त्र अ.१) **(य११पू.१७२)**

त्यानेंच अर्थात काव्यालंकाराचा निषेध नाहींसा केला. आतां स्कंदपुराणांत जें काव्यालंकार व नाटकादि पढूं नये म्हणून सांगितले आहे, तें असच्छूद्रपर आहे; किंवा अग्निपुराणान्तर्गत अलंकारलक्षणादि व वाल्मिकीरामायणादि काव्यपठणपरहि कोणी म्हणोत. विष्णुभक्तिकल्पलतादि विष्णुभक्तिमय काव्यांचा अर्थातच निषेध नाहीं. भविष्योत्तरपुराणोक्त व्याकरणादिपठणनिषेधहि पाणिनीय सूत्रादि वैदिक व्याकरणाविषयींचाच आहे. सारस्वतादि लौकिक किंवा शाकटायनादि बौद्ध व्याकरणाविषयींचा नाहीं. बुद्धागमाचा अर्थ बौद्धांनीं जाणावा असें सूतसंहितादि ग्रंथावरून सिद्ध आहे; आणि त्या आगमाचा अर्थ जाणण्यास व्याकरणाची अपेक्षा आहे. बौद्धापेक्षां शूद्र किंचित् वैदिकास गृहीत आहेत; मग पाणिनीय नसो परंतु बौद्धादिकृत व्याकरणाचा शूद्रास निषेध कसा प्राप्त होतो. 'नोच्चरेत्संस्कृतां गिरां' इत्यादि निषेध असच्छूद्रपर किंवा वैदिक निषेधपर आहेत. बौद्धादि कृत व्याकरणाला पाणिनीय व्याकरणवत् अदृष्टार्थजनकत्व न मानलें, तरी भाषाज्ञानादि दृष्टार्थजनकत्व आहेच; आणि त्याचा शूद्रास उपयोगहि आहे. भगवद्भक्त शूद्रांना तर नुसतें देखील ज्ञान होऊं शकेल, मग विहित अशा पुराणपठणादिकानीं अपरोक्ष ज्ञान कसें होणार नाहीं ? तात पुराणपठणाविषयीं असें म्हणतात,

**वेद संपन्न होय ठायीं । परी कृपण ऐसा आन नाहीं ।**
**जे कानीं लागला तिही । वर्णांच्याचि ॥१४५७॥**
**येरा भव व्यथा ठेलिया । स्त्रीशूद्रादि प्राणिया ।**
**अनवसर मांडुनिया । राहिला आहे ॥१४५८॥**
**मज पाहता ते मागील उणें । फेडावया गीतापणें ।**
**वेद वेठला भलतेणें । सेव्य होवावया ॥१४५९॥** (ज्ञाने.अ.१८)

**''जे कानीं लागला तिही वर्णांच्याचि''**

यावरून शूद्रांना गीताश्रवणच विहित आहे असा आग्रह कोणी या ओवीच्या अर्थाविषयीं करूं नये. कारण त्या वचनावरून ब्राह्मणादिकांना देखील वेदाचें श्रवणच विहित होईल. सांख्यादि शास्त्राविषयींचा अधिकार देखील सूतसंहितेंत मानला आहे; आणि ब्राह्मणाविषयीं त्याची(७) अनपेक्षा आहे, म्हणून (य११पू.१७३)

तो[८] विशेषतः शूद्रपर आहे असे म्हणण्याला प्रत्यवाय नाहीं; आणि वैदिक मंत्रविरहित शैववैष्णवादि सर्व आगमांत शूद्राधिकार सर्वच मानतात. वराहपुराणांत शूद्रदीक्षासमयीं शूद्रास पौराण छंदबद्ध मंत्रहि सांगितले आहेत. मननोपयोगी न्यायादि तर्कशास्त्रांचा आणि परलोकानुमानोपयोगी मंत्रशास्त्रांचाहि शूद्रास अधिकार आहे; कारण मेधातिथी आपल्या मनुस्मृतीच्या दुसऱ्या अध्यायांतील २३८ व्या श्लोकाच्या टीकेंत म्हणतात-

**श्रद्दधानः शुभां विद्यामाददीतावरादपि ।**

**श्रद्दधानः आस्तिक्योपगृहीतान्तरात्माऽभियुक्तो यः शिष्यः स शुभां विद्यां न्यायशास्त्रादितर्कविद्यां ।**

**अथवा या शोभते केवलं सा विशदकाव्यभरतादिविद्याविभूषिता मंत्रविद्या वा न धर्मोपयोगिनी तामवरादपि हीनजातीयादप्याददीत शिक्षेत ।**

**नत्वत्र शुभा वेदविद्या वेदितव्या आपदि विधिर्भविष्यति अनापदि नैवेष्यते ।**

**या च शुभा शाश्वती माया कुहकादि वा तां न क्वचित् ।।**

भावार्थः- विद्यादान करणाऱ्या नीचासहि गुरु समजावे हें दाखविण्याकरितां श्रद्दधान असें पद श्लोकांत आहे. अन्यथा त्या पदाचा कांहीं उपयोग नाहीं. शुभा विद्या म्हणजे न्यायशास्त्रादितर्कविद्या, किंवा भरतादिनिर्मित काव्यविद्या, किंवा मंत्रविद्या किंवा धर्माला जिचा उपयोग नाहीं अशा प्रकारची मंत्रविद्या. ब्राह्मणांना तांत्रिक मंत्राचा धर्मसंबंधी उपयोग नाहीं तर वैदिक मंत्रांचा आहे; आणि त्यांचा तर शूद्रास अधिकार नाहीं, म्हणून न्यायादि तर्कविद्या, रोगनिवारकादि मंत्रविद्या, किंवा उत्तम काव्यविद्या ह्या हीन जाति शूद्रादिकापासूनहि शिकाव्यात. मायाकपटादि विद्या शिकूं नयेत. आपत्कालींच हा विधि आहे, संपत्कालीं नाही.

हा भावार्थ झाला, पण ह्या विद्या शूद्राला आल्याच नसत्या तर आपत्कालीं तरी त्या शिकाव्या असा विधि कांहीं प्राप्त झाला नसता; आणि जर त्या विद्येपासून शूद्राला दुर्गति असती तर शिकणाऱ्यालाहि अधिक दुर्गति झाली असती. तसें न मानले तर वेद येणाऱ्या शूद्राला दुर्गति होत असली तरी त्यापासून वेद शिकणाऱ्या ब्राह्मणाला दुर्गति (य११पू.१७४) होत नाहीं असें मानण्याचा प्रसंग येईल; म्हणून न्यायादि विद्येनें हीनास दुर्गति नाहीं.

आतां वृद्धगौतमस्मृतींत जो शूद्राला चतुर्दश विद्याविषयीं निषेध सांगितला आहे, त्यांत अर्थातच न्यायशास्त्राचाहि निषेध होतो; परंतु त्या स्मृतींत जातीपेक्षां गुणवर्णवाद श्रेष्ठ मानला आहे; तेव्हां तो निषेध जर मूर्खाविषयींचा असेल तर नको कोणाची आहे? अथवा जन्मजातीपक्षींहि असच्छूद्रपर तो निषेध आहे असे म्हणावे लागते; कारण वृद्धगौतम ऋषि आहेत तसे मेधातिथीहि ऋषि आहेत. यांचें नांव भागवतांतील प्रथम स्कंदाच्या १९ व्या अध्यायाच्या १० व्या श्लोकांत प्रथमच आले आहे. आतां टीकाकार मेधातिथी कोणी अन्य असल्यास वचनाच्या क्रियापरत्वास्तव विकल्पाची हानि होत नाहीं.

याप्रमाणें शूद्राला श्रवणविधिस्तव किंवा वैकल्पिक अध्ययनविधिस्तव सिद्धविद्यत्व[९] आहे; आणि मैत्रेयीला याज्ञवल्क्यांनीं सांगितलेल्या वेदेतिहासावरून भारतांतील सुलभादिकांच्या इतिहासावरून, योगवासिष्ठांतील चुडालादिकांच्या इतिहासांवरून व त्रिपुरारहस्यांतील हेमलेखादिकांच्या इतिहासावरून शूद्रसमान धर्मिणी म्हणून स्त्रियांसहि श्रवणविधीनें, वैकल्पिक अध्ययन विधीनें सिद्धविद्यत्व आहे; आणि भाषांतरावरून अन्य हीनवर्णासहि सिद्धविद्यत्व आहे. कारण ''अन्येषां हीनवर्णानां ज्ञानाभ्यासो विधीयते'' या सूतसंहितेच्या वचनांत ''अभ्यास'' पद आहे. तें आवृत्तिपर्यायवाचक असल्यामुळें, श्वेतकेतूला 'तेंच तूं आहेस' असे नऊ वार पित्यानीं सांगितलें म्हणून, ''आवृत्तिरसकृदुपदेशात्'' श्रवण वारंवार करावे या ब्रह्मसूत्रांत सांगितलेले मननिदिध्यासनादिहि शूद्रास पुराणद्वारानें व अन्य हीनांना भाषांतरद्वारानें सिद्ध आहेत. भाषांतरद्वारानें तर निदिध्यासनादि कोणासच प्रतिषिद्ध नाहींत, हें तात नाथ तुकारामादिकांच्या वचनाचरणावरून निश्चित होते. तेव्हां विदितवेद्य असा कोणीहि गुरु होऊं शकतो हा अर्थ सिद्ध झाला.

वादी उवाच :- उच्च वर्णाला नीचगुरुप्रसंग आल्यास तो नीच गुरु त्याला वेदोपदेश करणार नाहीं, आणि उच्चांना वेदजन्यच ब्रह्मज्ञान विहित आहे.

सिद्धान्ती उवाचः- हा नियम विवरणाचार्यांनीं स्वीकारला आहे. (य११पू.१७५) तेंहि त्यांचें मत वेदान्तांत एक आहे. तें असो; परंतु सूतापासून कृतपुराणश्रवणादिकानीं ज्ञानप्राप्ति ऋषींना वर्णिलेली आहे, आणि कलींतहि भाषान्तरादिकें करून बहुतांना दृष्ट आहे. किंबहुना रामदासादिकानींहि उपनिषन्निरूपण वर्ज्य करून दासबोधादि स्वग्रंथद्वाराच स्वशिष्यांना अध्यात्मप्राप्ति

करून दिली आहे; म्हणून वेदभिन्न साक्षादध्यात्मश्रवण ज्ञानोत्पादक होणार नाहीं, असा जो तुझा प्रश्नाभिप्राय तो निरर्थक आहे. भगवन्नामस्मरणानें सर्व प्रतिबंधक पाप निवृत्त होऊन पुराणादिद्वाराहि ब्रह्मज्ञान होणें शक्य आहे.

वादी उवाचः- तर मग ब्राह्मणादिकांची औपनिषत्प्रवृत्तिच निरर्थक होईल?

सिद्धान्ती उवाचः- नाहीं, बलेंकरून विहितपरित्याग करण्याला सांगितला नाहीं, म्हणून ब्राह्मण गुरु मिळत असतां उपनिषद्विद्येचा व्यर्थ परित्याग उच्चवर्णांनीं करूं नये. याविषयीं मी आपल्या स्वमतनिर्णयांत असा विचार केला आहे कीं, कर्मज्ञान उच्चानीं नीचाला सर्वदा द्यावे. आपत्काली नीचानीं उच्चालाहि द्यावे. भक्तिमात्र कोणी केव्हांहि कोणाला द्यावी, म्हणून भक्तिज्ञानसिद्धि पुराणादिद्वारा कोणापासूनहि कोणाला घेण्यास प्रतिषेध नाही. गोपालतापनीयाद्युपनिषत् उपासनाबाहुलप्रतिपादक आहेत. त्याचें स्पष्टीकरण पुराणादिद्वाराच संभवनीय असल्यामुळें पुराणादिद्वारा भक्तिग्रहणाला कोणापासूनहि निषेध नाहींच. अथवा श्रवणाविषयींच श्रुतिवाक्यनियम उच्चवर्णाला विहित आहे. मनन उपपत्त्यात्मक असल्यामुळे श्रुतिवाक्यावरूनच तें झाले पाहिजे असा नियम नाहीं. ''मंतव्यः'' ही श्रुति मननाचें मात्र विधान करित आहे, तत्साधनार्थ श्रुतिवाक्यनियमाचें विधान करीत नाहीं; म्हणूनहि मननादिसहायक उपपत्त्युपदेष्टा कोणीहि असल्यास प्रतिषेध संभवत नाहीं.

वादी उवाच :- अहो? गुणकर्मवर्णपक्षियांसच हा तुमचा विचार मान्य होईल, जन्मजातिपक्षियांस मान्य होणार नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- जन्मजातिपक्षानेंच हा विचार सिद्ध होतो. गुणकर्मपक्षांत तर शूद्र अत्यंत मूर्ख असल्यामुळें खरोखरच त्याला कोणताहि अधिकार सिद्ध होत नाहीं. (य११पू.१७६)

वादी उवाचः- पूर्वी तुह्मीं आपत्कालविषयक रामीरामदासांचें म्हणणें खंडण केलें आहे, आणि आतां ब्राह्मणांची उपनिषत्प्रवृत्ति रक्षण करतांना त्याचेंच पुनः मंडण केलें आहे; हें कसें?

सिद्धान्ती उवाचः- भक्तिविरहित ज्ञानाविषयीं आम्हीं खंडण केलें आहे, आणि वेदरक्षण व्हावे एवढाच आमच्या मंडणाचा अर्थ आहे. अथवा कोणाहिपासून कोणत्याहि रितीनें ज्ञान घेऊन उपनिषदादि विचारानें तें दृढ करावे; किंवा त्रैवर्णिक स्वशिष्यांना उपनिषदादिद्वाराच सामर्थ्य असतां सांगावे, असें मी स्पष्ट म्हणतो. अध्ययनसामर्थ्यादि नसून मोक्षाची इच्छा असल्यास भाषान्तरादिकांस कोणीच प्रतिषेध करूं शकत नाहीं. हें नुस्त्या कर्मज्ञानाविषयीं समजावे. भक्तिज्ञानाविषयीं व विस्तृत मननादिकाविषयीं पुराणादि विहित आहेच; किंवा अनुभवनिष्ठ गुरु विवक्षित आहे, केवळ शब्दनिष्ठ विवक्षित नाहीं. यद्यपि शाब्दनिष्ठ व अनुभवनिष्ठ असा दोन्ही प्रकारचा गुरु पहावा असा विधि आहे; तथापि त्यांत अनुभवनिष्ठाचीच मुख्यता आहे, शाब्दनिष्ठाची नाहीं; म्हणून मुमुक्षूनीं जेव्हां अनुभवनिष्ठ दृष्टीस पडेल तेव्हां काल व्यर्थ न जाऊं देतां ज्ञान संपादन करावे. जन्मजातिपक्षानें नीच देखील अनुभवनिष्ठ असल्यास गुरु होऊं शकतो.

वादी उवाचः- शूद्रकमलाकरांत मत्स्यपुराण व लिंगपुराणांतील वचनें घेऊन असें म्हटलें आहे-

**ब्राह्मणाः शूद्रयोनिस्थाः शूद्रा वै मंत्रयोनयः ।**
**उपस्थास्यन्ति तान् विप्रा वेदार्थमभिलिप्सवः ॥**
**लैंगेऽपि - शूद्रानां मंत्रयोनिश्च संबंधो ब्राह्मणौः सह ।**
**भवतीह कलौ तस्मिन् शयनासनभोजनैः ॥**
**राजानः शूद्रभूयिष्ठा ब्राह्मणान्बाधयन्ति ते ।**
**शूद्राश्च ब्राह्मणाचाराः शूद्राचाराश्च ब्राह्मणाः ॥**
**अक्षत्रियाश्च राजानो विप्राः शूद्रोपजीविनः ।**
**शूद्राभिवादिनः सर्वे ब्राह्मणैरभिवन्दिताः ॥**
**आसनस्थान् द्विजान् दृष्ट्वा न चलन्त्यल्पचेतसः ।** (य११पू.१७७)
**ताडयन्ति द्विजेंद्राश्च शूद्रा वै स्वल्पबुद्धयः ॥**
**आस्ये निधाय वै हस्तं कर्णे शूद्रस्य वै द्विजाः ।**
**नीचस्य च तदा वाक्यं वदन्ति विनयेन तु ।**
**अधीयन्ते तथा वेदान् शूद्रा धर्मार्थकोविदः ।**
**यजन्ते चाश्वमेधेन राजानः शूद्रयोनयः॥**
**तस्मादायुर्बलं रूपं कलिं प्राप्य प्रहीयते ।**
**तदा त्वल्पेन कालेन सिद्धिं गच्छन्ति मानवाः ।**
**धन्या धर्मं चरिष्यन्ति युगान्ते समुपस्थिते ।**

**त्रेतायां वार्षिको धर्म इत्युक्त्वा तदन्हा प्राप्यते कलौ इत्युक्तम।**(शूद्रकमलाकर प्रकरण१)

भावार्थः- ब्राह्मण शूद्रासारिखें अध्ययनरहित अज्ञानी स्थित होतील. शूद्र हे ब्राह्मणासारिखे ज्ञानसंपन्न होतील. वेदाचा अर्थ जाणण्याकरितां ब्राह्मण शूद्राजवळ जातील असें सांगितलें आहे. लिंगपुराणांतहि या कलियुगांत बहुतकरून शूद्र मंत्रज्ञानी होतील, व एकत्र निजणें, बरोबर भोजन करणें, एके ठिकाणीं बसणें, याहींकरून त्यांचा ब्राह्मणाशीं संबंध होईल. राजे प्रायः शूद्रच होतील, मग ते ब्राह्मणांला बाधा करतील. शूद्र ब्राह्मणांचा आचार घेतील. ब्राह्मण शूद्रांचा आचार घेतील. राजे क्षत्रिय नसतील. ब्राह्मण शूद्रानें दिलेल्यावर निर्वाह करतील. सर्व ब्राह्मण शूद्रांना नमस्कार करतील. ब्राह्मणांनीं ज्यास नमस्कार केला आहे असे ते शूद्र विचार अल्प असल्यामुळें आपल्याजवळ ब्राह्मण आलेले पाहूनहि त्यांना उत्थापन देणार नाहींत. ते अल्पबुद्धि शूद्र ब्राह्मणांस मारतील. आपल्यापेक्षां नीच अशा शूद्राच्या कानांत कांहीं सांगावयाचें असले तर ब्राह्मण आपल्या तोंडा आड हात ठेवून मोठ्या नम्रतेनें सांगतील. तसेंच शूद्र वेदाचें अध्ययन करतील, व धर्मार्थ जाणणारे होतील. शूद्रापासून झालेले राजे अश्वमेध करतील. या अकर्मापासून मनुष्यांचे आयुष्य, बल, रूप कलियुगांत दिवसेंदिवस कमी होत जाईल. त्याकालीं (कलियुगांत) तर मनुष्य अल्प कालानें केलेल्या कर्माच्या सिद्धीला पावतील. असें जरी आहे तथापि जे पुण्यवान् असतील (य११पू.१७८) ते कलियुगाचा अंतकाळ प्राप्त झाला असतां स्वधर्माचरण करतील. त्रेतायुगांत एक वर्षपर्यंत आचरण केलेल्या धर्माचें फळ कलियुगांत एका दिवसांत प्राप्त होते असें सांगितलें आहे.

हीं वाक्यें निंदापर आहेत, व यावरून ब्राह्मणांना शूद्रसेवा करण्यास अधिकार नाहीं; म्हणून शूद्र गुरुहि होऊं शकत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- ही वाक्यें वेदज्ञानानें उन्मत्त झालेल्या शूद्रांची निंदा करीत आहेत असें दिसतें; नाहीं तर कलियुग नसतांना देखील धर्मव्याधादिकांनी ब्राह्मणादिकांना ज्ञान सांगितलें याची वाट काय? आणि कलींतहि श्रीतुकारामांनीं रामेश्वरभट्टांना ज्ञान सांगितलें त्याची व्यवस्था कशी लागणार?

वादी उवाचः- मी प्रमाण घेतलेल्या वाक्यांत शूद्र धर्मार्थ जाणणारे होतील असें म्हटलें आहे.



सिद्धान्ती उवाचः- म्हणून काय यथार्थज्ञानी शूद्रपर तीं सर्व वाक्यें लावावयाची म्हणतोस? तर मग धर्मव्याधादिपरहि लाविली पाहिजेत. पुनः तूं उदाहरण दिलेल्या वाक्यांतच शूद्र ब्राह्मणाचा अपमान करून त्यांना ताडन करतील असें म्हटलें आहे. तेव्हां धर्म जाणणारे होतील या वाक्याचा अर्थ धर्म जाणणारेच मात्र होतील, करणारे होणार नाहींत असा केला पाहिजे; कारण धर्म करणाऱ्याला कोणाचा अपमान व ताडन इत्यादि आचरण शोभत नाहीं. आतां तूं उद्धृत केलेल्या वाक्यांतील ब्राह्मण श्रोत्रिय घेतोस कीं अश्रोत्रिय घेतोस? प्रथम पक्षीं त्यांच्या हातून सेवा घेतली असतां शूद्रांना अधर्म लागेल ही गोष्ट सत्य आहे; कारण लघ्वाश्वलायन स्मृतींत -

**वेदविद्विजहस्तेन सेवां संगृह्यते यदि ।**
**न तस्य वर्धते धर्मः श्रीरायुः क्षीयते धुवं ॥१७॥** (लघ्वाश्वलायनस्मृति - वर्णधर्म प्रकरण)

असें म्हटले आहे; व वेदवेत्त्या द्विजांच्या हातून सेवा घेतली असतां धर्म वाढत नाहीं; लक्ष्मी व आयुष्य निश्चयानें क्षीण होतात, असा त्याचा अर्थ आहे. पुनः वेदवेत्त्या द्विजांची सेवा केली असतां शूद्र सद्गतीला जातो (य११पू.१७९)

**स्वर्गार्थमुभयार्थं वा विप्रानाराधयेत्तु यः।**
**जातब्राह्मणशब्दस्य सा ह्यस्य कृतकृत्यता ॥१२२॥ (मनुस्मृति अ. १०)**

या मन्वादिवाक्यावरून पतित द्विजाच्या सेवेचें शूद्राला विधान नाहीं; आणि पतित द्विजाच्या हातचें भोजनहि शूद्रानें वर्ज्य करावे असेंहि धर्मशास्त्र आहे. म्हणून वेदज्ञ ब्राह्मणाला खाण्यापिण्याला न मिळाल्यामुळें धनसंपन्न शूद्र बळेंकरून आपल्या अल्प वैदिकज्ञानानें आपत्प्रसंगीं त्या वेदज्ञांचा अवमान करतील, व ते वेदज्ञहि आपले ज्ञान चित्तांत दाबून ठेवून क्षुधेनें पीडित झाल्यामुळें बलानें लादलेला शूद्राचार ग्रहण करतील. तन्निंदापरच हीं पुराण वाक्यें समजावीत. दुसऱ्या पक्षीं तर अश्रोत्रिय द्विजांचे शूद्रसमान धर्म वसिष्ठस्मृतींत सांगितलें आहेत ते असें-

**''अश्रोत्रिया अननुवाक्या अनग्नयो वा शूद्रसमधर्माणो भवन्ति''**

भावार्थः- **वेद न पढलेले, अनुवाक् इत्यादि न जाणणारे, किंवा स्मार्ताग्नि होत्र देखील न करणारे तिन्ही वर्ण शूद्रसमान धर्मी होतात.** अशाकडून ज्ञानी शूद्रानीं घेतलेले कार्य धर्मनाशक होईल किंवा नाहीं शंका वाटते. भारतवनपर्वांतील

धर्मव्याधोपाख्यानाचा विचार केला असतां, त्यांनी तपस्वी व वेदवित् अशा कौशिक ब्राह्मणाला उपदेश केला असें दिसते. आतां तो कदाचित् पूर्वजन्माभ्यासानें ज्ञानी झाला असेल, परंतु त्या संबंधाचा विचार मागें संक्षेपशारीरककारांची मतें देऊन केलाच आहे; म्हणून वेदवित् तपस्वी ब्राह्मणाला देखील यथार्थोपदेश करण्याला कोणाला प्रतिषेध नाहीं. ही जर भिन्नयुगाची गोष्ट आहे तर कलियुगीं प्रश्न पाहिजे कशाला? अपमान तर कोणत्याच जीवाचा करणें बरोबर नाही; मग वेदवित् ब्राह्मणाविषयीं प्रश्नच उत्पन्न कसा होतो. परंतु अश्रोत्रिय ज्यांचे शूद्रसमान धर्म आहेत त्यांना कार्यग्रहणपूर्वक उपदेश करण्याविषयीं धार्मिक शूद्राला प्रत्यवाय नसावा असें मला वाटते.

वादी उवाचः- अहो शूद्राला पतित ब्राह्मण देखील पूज्यच आहेत, कारण वेदाधिकार नसलेल्या पतित द्विजांचे जे तंत्र ग्रहण[१०] (य११पू.१८०) करितात, त्या तंत्रांतहि वर्णचतुष्टयव्यवस्था सांगितली असून, शूद्रांनीं तंत्रदिक्षामान् ब्राह्मणाला भजावे असें म्हटलें आहे; आणि

**पतितोऽपि द्विजः श्रेष्ठो न च शूद्रो जितेन्द्रियः॥**

अशी स्मृति आहे; म्हणून अश्रोत्रिय ब्राह्मणांना देखील धार्मिक शूद्रानें उपदेश करणें उचित नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- शास्त्राचें इंगित अजून तुला कळत नाहीं. ज्या तंत्रांत पतित ब्राह्मणाला अधिकार असून त्यांना शूद्रापेक्षां वरिष्ठत्व सांगितलें आहे तेथें पतित[११] शूद्राचे किंवा शूद्रसंस्कारांचें ग्रहण आहे असें समजावे, किंवा असच्छूद्राचे ग्रहण समजावे. आतां पतित द्विज श्रेष्ठ आहे, पण जितेंद्रिय शूद्र श्रेष्ठ नाहीं अशी जी स्मृति तूं प्रमाण घेतली आहेस, तिचा अर्थ असा आहे कीं, पतित दोन प्रकारचे असतात. प्रायश्चित्त करून शुद्ध होणारे व ज्यांच्या शुद्धिविषयीं प्रायश्चित्तच नाहीं असें. त्यांतून पहिल्या प्रकारचे पतित जितेंद्रिय शूद्रापेक्षां त्याच जन्मांत ब्राह्मण जातींत येऊं शकतात म्हणून श्रेष्ठ आहेत. दुसऱ्या प्रकारच्या पतित ब्राह्मणापेक्षां धार्मिक शूद्रच श्रेष्ठ आहेत.

वादी उवाचः- पण धार्मिक शूद्रांनाहि तांत्रिक विधि विहित आहे.

सिद्धान्ती उवाचः- तसा थोडासा तांत्रिक विधि वेदांगत्वें करून द्विजांनाहि आहे; परंतु तेवढ्यावरून द्विजांना सर्वथा तांत्रिक म्हणतां येत नाहीं; त्याप्रमाणें



तांत्रिक मंत्राधिकारावरून शूद्रांनाहि सर्वथा तांत्रिक म्हणतां येत नाहीं. कारण त्यांना तंत्रभिन्न[१२] असा पौराणिक विधि विहित आहे. पौराणश्राद्धादिकाहून तंत्रश्राद्धादिकर्मे स्पष्ट भिन्नहि आहेतच; म्हणून पतितवर्णचतुष्टय तंत्राधिकृत असता परस्पर पतित शूद्रापेक्षां पतित ब्राह्मणांना श्रेष्ठत्व असो, परंतु पतित ब्राह्मण तंत्राधिकृतापेक्षां पौराणधर्मी सच्छूद्रांना श्रेष्ठत्व असावे असें मला वाटते.

वादी उवाचः-

**स्त्रीशूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा ।**
**इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ॥**

या श्रीमद्भागवतवाक्यांत पतितांचाहि भारताविषयीं स्वीकार केला आहे, म्हणून पतित द्विजहि पौराणधर्मी असल्यामुळें त्यांच्यापेक्षां शूद्रानां श्रेष्ठत्व नाहीं. (य११पू.१८१)

सिद्धान्ती उवाचः- या वाक्यांत आम्हीं पूर्वी सांगितलेल्या दोन पतितापैकीं प्रथम पतिताचे ग्रहण केले पाहिजे; नाहींतर पुराणश्रवणाला पतितवर्ज्य केले पाहिजेत,

**रजस्वलां त्यज म्लेच्छपतितव्रातकैस्तथा ।**
**द्विजद्विड्वेदबाह्यैश्च व वदेद्यः कथाव्रती ॥४९॥** (भागवतमहात्म्य अ. ६)

या पद्मपुराणांतील भागवतमहात्म्यवाक्याशीं विरोध येतो. नैष्टिकधर्मापासून पतित झालेल्याला निष्कृतिच नाहीं असें स्मृतिवचन आहे; म्हणून दुसऱ्या प्रकारच्या पतित द्विजापेक्षां धार्मिक शूद्र पौराणधर्मत्वास्तव श्रेष्ठ आहेच.

**आरूढो नैष्ठिकं धर्मं यस्तु प्रच्यवते द्विजः ।**
**प्रायश्चित्तं न पश्यामि येन शुद्ध्यति कर्मणा ॥** (अत्रिस्मृति)

अर्थ स्पष्ट आहे. आतां दुसऱ्या प्रकारचा पतित द्विज जरी शांडिल्याप्रमाणें तंत्राधिकृत होतो, तरी त्याला नरकप्राप्ति सांगितली आहे; आणि तंत्राधिकृत अपतित शूद्राला नरकप्राप्ति सांगितली नाहीं; हें वासिष्ठलैंग पुराणांतील शांडिल्याख्यानावरून दिसते. म्हणून अश्रोत्रिय द्विजापासून प्रसंगानें धार्मिक शूद्रानें कार्य करविलें असतां, त्याला पातक आहे किंवा नाहीं, हा मला संशय वाटतो. ह्या सर्व विवेचनाचें तात्पर्य असें कीं, तपस्वी वैदिक ब्राह्मणालाहि असेवापुरस्सर प्रसंगानें अनुभवनिष्ठ कोणीहि गुरु होऊं शकतो, आणि अश्रोत्रियांना

दैवेकरून मुमुक्षा झाल्यास कोणीहि गुरु सेवापुरस्सर होऊं शकतो असा अल्पबुद्ध्यनुसार मी निश्चय करितो.

वादी उवाचः- पण स्त्रियांविषयीं व्यवस्था कशी ?

सिद्धदान्ती उवाचः- सर्वसंस्कारसिद्ध व सर्व स्त्रीधर्मसहित अशा स्त्रियांना मोक्षेच्छा झाल्यास प्रसंगानें अनुभवनिष्ठ कोणीहि अल्पसेवापुरःसर गुरु होऊं शकतो; आणि संस्कारविहीन व स्त्रीधर्मविहीन अशांना दैवेंकरून मुमुक्षा झाल्यास मैथुन वर्ज्य करून पूर्ण सेवापुरःसर कोणीहि गुरु होऊं शकतो. आतां वेश्यांविषयीं विवादच नाहीं, परंतु दैवाचें फळ अनंत आहे, (य११पू.१८२) म्हणून त्यांनाहि मुमुक्षा उत्पन्न झाल्यास कोणत्याहि वर्णाचा अनुभवनिष्ठ गुरु होऊं शकतो. परंतु त्यांना मैथुन वर्ज्य करणें वैकल्पिक आहे. सूतसंहितेंत एक वेश्या बह्मनिष्ठाची मैथुनसहित सेवा करून ब्रह्मज्ञान होऊन परम गतीला गेली अशी कथा आहे. म्हणून वेश्यांना मैथुन वर्ज्य करणें हा विधि वैकल्पिक आहे; परंतु माझ्या संप्रदायांत वेश्यागमन केलेला प्रतिनिधि चालत नाहीं असा मी नियम केला आहे. म्हणून पुढें मागें ब्रह्मनिष्ठ होऊन कोणी वेश्यागामी सांप्रदायिक झाल्यास, आणि दुसरा कोणी ब्रह्मनिष्ठ संप्रदायांत नसल्यास ज्ञानोपदेश त्या वेश्यागामी ब्रह्मनिष्ठापासून आपत्काल समजून श्रवण करावा; परंतु त्याला स्वसंप्रदाय पारिभाषिक प्रतिनिधि समजूं नये; व त्यापासून मंत्रोपदेश ग्रहण करूं नये. अज्ञानी सांप्रदायिक वेश्यागामी झाल्यास तो श्रावक व प्रतिनिधि या दोहीपक्षीं बहिष्कृत करावा. तात्पर्य, कोणीहि अनुभवनिष्ठ कोणालाहि प्रसंगीं गुरु होतो. याविषयीं याज्ञवल्क्यानें देवरातास सांगितलें आहे कीं,

**प्राप्य ज्ञानं ब्राह्मणात् क्षत्रियाद्वा वैश्याच्छूद्रादपि नीचादभीक्ष्णम् ।**
**श्रद्धातव्यं श्रद्दधानेन नित्यं न श्रद्धिनं जन्ममृत्यू विशेषताम् ॥८८॥**

(भारत शांतिपर्व अ. १३८)

**भावार्थः- याज्ञवल्क्य म्हणे देवराता । हें ज्ञानचि मोक्षदायक सर्वथा ।**
**येथ भलताहि वर्ण ज्ञानदाता । तरी सद्गुरुचि होय ॥६१॥**
**ब्राह्मण क्षत्रिय वैश्य कां शूद्र । किंवा नीच आम्लेच्छान्त नर ।**
**तयापासूनिहि जर । मिळाले ज्ञान ॥६२॥**
**तैं त्यावरी विश्वास ठेवावा । अविश्वास सर्वथा न करावा ।**



**श्रद्धावंत शिष्य म्हणावा । तोचि एक ॥६३॥**
**गुरु असो भलती याती । जेणें फेडिली आपुली भ्रांति ।**
**तया ब्रह्मचि भाविती । ते सच्छिष्य ॥६४॥**
**एवं मुकुंदराज पवनविजयीं बोलीले । ते श्लोकार्थाचिया उपयोगा आले ।**
**आतां नीचापासोनि ज्ञान घेतले । ते प्रत्यवाय करील कीं ॥६५॥**
**ऐसी शंका न यावी म्हणूनी ।'न श्रद्धिनं जन्ममृत्यू विशेषताम्' हें पद मूळस्थानीं।**
**याचा अर्थ कीं ज्ञान घेतां विश्वास असेल तेथूनी । जन्ममरणीं पडेना ॥६६॥**
**'श्रद्धातव्यं' या मूळपदें करून । 'श्रद्दधानेन' या पुनः प्रशस्तानुवादान । नीच यातिं गुरु करितां होय पतन । हें रामदासादींचें मत पूर्ण प्रतिषेधिले ॥६७॥**
(य११पू.१८३)

**यस्य कस्य च वर्णस्य ज्ञानं देहे प्रतिष्ठितम् ।**
**तस्य दासस्य दासोऽहं भवेज्जन्मनि जन्मनि ॥**

अशीहि एक स्मृति आहे; व कोणत्याहि वर्णाच्या ठिकाणीं ज्ञान असल्यास त्याच्या दासाचा मी दास आहे, असा तिचा अर्थ आहे. ही स्मृति समर्थानीं दासबोधांत प्रमाण घेतली आहे, आणि त्यानींच अन्ययातिगुरूचा निषेध केला आहे; तेव्हां या परस्पर विरोधाला काय म्हणावे. तो अन्ययातिगुरूचाहि निषेध त्यांनी सांगितलेल्या सद्गुरुप्रकरणांत पठित आहे, म्हणून अर्थांतर संभवनीय नाहीं. आतां असें त्यांनीं लोकांकरितां केले असें म्हणावे, तर व्यासादिकांनीं जें भारतादिकांत लिहून ठेविलें तें लोक बुडविण्याकरितां असें म्हणावे लागेल. व्यासादिकांचें म्हणणें कलिभिन्न युगपर आहे असें कोणी म्हणेल, तर रामेश्वरभट्टाला अनुग्रह देणाऱ्या तुकारामांचा रामदासांनी समोर असून निषेध कां केला नाहीं? अन्य यातीचा गुरु होऊनहि जीवातत्वा ब्राह्मणादिकांना कोणी वाळीत टाकले नव्हते. ह्याहि कथा कलींतीलच आहेत. आतां कोणी असें म्हणेल कीं, तर्कानें आपलें मत मंडण करणें हा कलीचा धर्मच आहे, तर हें त्याचें म्हणणें म्हणणारासहि लागू होते; कारण समर्थानींहि गुरूला नमस्कार केला असतां ब्राह्मण क्षोभतात, व ब्राह्मणाला नमस्कार केला असता गुरुक्षोभ होतो; म्हणून अन्ययातीचा गुरु नको असा हेतुपूर्वक निषेध केला आहे, पुनः केवळ हेतूचा निषेध आहे, वचनपूर्वक हेतूचा निषेध नाहीं. वचनपूर्वक हेतूचा निषेध मानल्यास जैमिनीकृत पूर्वमीमांसा

व भगवान् बादरायणाचार्यकृत उत्तरमीमांसा दोन्हीहि व्यर्थ होतील; कारण वचनानुगामी हेतुच त्यांत मुख्य आहे. हेत्वनुगामीवचन आम्हींहि धर्म्य मानीत नाहीं; म्हणून व्यासादिकांच्या वचनावरून आम्हीं आपली निष्ठा दृढ करून; जातिपक्षास्तव तातांना आचार्य न मानणाऱ्यांचा जिव्हाच्छेद करितो.

आतां समर्थांच्या वाक्यांचा पूर्वापर विचार केला असतां अन्ययातीच्या गुरुनिषेधाच्या, व ब्राह्मण महत्वाच्या प्रकरणामध्यें एका ओवीचा उत्तरार्ध असा घातला आहे कीं, त्याचा मागच्या व पुढच्या ओव्याशीं कितीहि प्रयत्न केला असतां संबंध लागत नाहीं. (य११पू.१८४) ती ओवी पुढें लिहितो.

**''लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । अन्य यातीस पुसे कोण ।**
**परी भगवंतासी भाव प्रमाण । येरा चाड नाहीं'' ॥**

या ओवीचा अर्थ रामदासी सांप्रदायिकांना मी विचारितें कीं, 'लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । अन्य यातीस पुसे कोण' या निषेधाचा 'परि' हे पक्षांतर अव्यय घालून 'भगवंतासी भाव प्रमाण । येरा चाड नाहीं' या वाक्यानें प्रतिषेध केला नाहीं काय? तात्पर्य 'प्रकृतार्थस्यात्यंतदार्ढ्यद्योतनाय द्वौ नयौ' जी गोष्ट अत्यंत दृढ करावी लागते त्याबद्दल दोन नकार होतात, व त्याचा अर्थ विधि होतो; तसें येथें झाले नाहीं काय? कोणी कांहीहि म्हणो, समर्थांच्या वाक्यांत देखील आमचा पक्ष गुप्त आहे हें सिद्ध होते. आतां स्त्री शूद्राचे अधिकार व गुरुत्व याविषयीं आचार्य संमति सांगतो.

**''प्रधानोपासनायां स्त्रीशूद्रस्याप्यधिकारं दर्शयति''**

(नृसिंहतापनीय प्रथमोपनिषत् खंड ४ अनुवाक्. ३)

हें नृसिंहतापनीय उपनिषदेवरील भाष्यच संमति होय.
आतां गुरुविषयीं श्रीमच्छंकराचार्य भगवत्पूज्यपाद ।
मनीषापंचकीं बोलती शुद्ध । तयाची टीका विशद । ऐकें आधीं ॥६८॥
**सत्त्याचार्यस्य गमने कदाचिन्मुक्तिदायकम् ।**
**काशीक्षेत्रं प्रति सहगौर्या मार्गे तु शंकरम् ॥१॥**
**अंत्यवेषधरं दृष्टाव गच्छगच्छेति चाब्रवीत् ।**
**शंकरः सोऽपि चांडालस्तं पुनः प्राह शंकरम् ॥२॥**
**कोणी एके अवसरीं । आचार्य पावले काशीपुरीं ।**
**तैं चांडाल वेषें त्रिपुरारि । सहगौरी नयनीं देखिले ॥६९॥**
**तयातें आचार्य म्हणती आपण । चाल जाई वेगळा होऊन ।**
**तेव्हां बोलती उमारमण । अंत्यवेष जयांचा ॥७०॥**
**ईश्वर उवाचः-**
**अन्नमयादन्नमयमथवा चैतन्यमेव चैतन्यात् ।**
**द्विजवर दूरीकर्तुं वांच्छसि किं ब्रूहि गच्छगच्छेति ॥३॥** (य११पू.१८५)
**देहापासोन देहातें । की आत्मया पासोन आत्मयाते ।**
**दूरी जाई म्हणसी कवणाते । सांग माते ब्राह्मणा ॥७१॥**
**वस्तु वस्तुत्वें सम समान । भूत भूतत्वें समान जाण ।**
**येथ मिथ्या गमनागमन । बोलसी वचन तूं कैसे ॥७२॥**
**एवं देह आणि आत्मया । भेद नाहीं सत्यतया ।**
**आतां चिदाभासाहि यया । भेद नाहीं हें बोलती ॥७३॥**
**किं गंगांबुनि बिम्बितेऽम्बरमणौ चाण्डालवाटीपयः ।**
**पूरे चान्तरमस्ति कांचनघटीमृत्कुम्भयोर्वांबरे ॥**
**प्रत्यग्वस्तुनि निस्तरंगसहजानन्दावबोधाम्बुधौ ।**
**विप्रोऽयं श्वपचोऽयमित्यपि महान् कोऽयं विभेदभ्रमः ॥४॥**
**मंदाकिनीचें पाणी । त्यांत बिंबला वासरमणी ।**
**आणि बिंबला रजक सौंदर्णी । चर्मककुंडामाजीहि तैसा ॥७४॥**
**तरी बिंबा कीं प्रतिबिंबा । घेऊनि नुमटे भेद शोभा ।**
**तेवि परमात्मया कीं जीवप्रभा । नव्हे भेद ॥७५॥**
**आणि पाणी ते अंतःकरण । लिंगदेह सम समान ।**
**तेथहि नाही कारण । भेदाचे की ॥७६॥**
**आता स्थूल देहाचा भेद । तेथहि आत्मा परम अभेद ।**
**जैसे कनक कुंभीं कीं मृत्कुंभीं शुद्ध । गगन एक ॥७७॥**
**तैसा कूटस्थ चिदानंद आत्मा । निश्चळ पूर्ण परमात्मा ।**
**जयाचा वेद गाती महिमा । तेथ भेदभ्रमा कल्पूं नये ॥७८॥**
**हा ब्राह्मण हा महार । कल्पूं नये भेद विचार ।**
**तैं आश्चर्य पावले सर्वेश्वर। भगवत्पूज्यपाद ॥७९॥**

जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु स्फुटतरा या संविदुज्जृम्भते ।
या ब्रह्मादिपिपीलिकान्ततनुषु प्रोता जगत्साक्षिणी ॥
सैवाहं न च दृश्यवस्त्विति दृढप्रज्ञापि यस्यास्ति चेत् ।
चांडालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम ॥५॥
मग संमति ऐसे उद्गार । दोहीं दळीं सुंदर ।
जागृत्स्वप्नसुषुप्तिवर । साक्षिचैतन्य जे ॥८०॥
मुंगीपासुनि ब्रह्मया पर्यंत । जेथे आघवे कल्पिले जगत ।
जेवि हितानाडी अणुमात्र दिसत । परी आश्रय होत स्वप्न ब्रह्मांडा ॥८१॥
तैं परं ज्योती परं ज्ञान । जे दृश्य नसोनी दृश्याधिष्ठान । तें मी आहे ऐसे यदंतःकरण । तो चांडाल वा ब्राह्मण असो परी सद्गुरु ॥८२॥ (य११पू.१८६)
''ब्रह्मैवाहमिदं जगच्च सकलं चिन्मात्रविस्तारितम् ।
सर्वं चैतदविद्यया त्रिगुणया शेषं मया कल्पितम् ॥
इत्थं यस्य दृढा मतिः सुखतरे नित्ये परे निर्मले ।
चांडालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम ॥६॥
मी आहे पूर्ण ब्रह्म । मज नाहीं धर्माधर्म ।
हा आवघा विश्वभ्रम । ममाश्रयें अविद्या कल्पी ॥८३॥
कां सूर्याचिया आश्रयें केवळ । निके[१३] वाढे मृगजळ ।
तैसे चैतन्याश्रयें सकळ । वाढले जग ॥८४॥
ते नाहीं म्हणू तरी काय निषेधिजे । आहे म्हणो तरी सर्वथा नुमजे ।
म्हणोनी भासे तथापि सहजे । कल्पना सांडुनि चैतन्यचि ॥८५॥
आतां चैतन्यावांचुनि कल्पना । तरी चैतन्याविण गोचर कवणा ।
हें बोलणें पडले सकरुणा । आळंदीवल्लभातेहि ॥८६॥
''तैसा जाणणियाचा व्यवहारु । जेथें माखला सुमरू ।
तेथें आणिजे पुरु । अज्ञानाचा'' ॥१००॥
तया नांव अज्ञान ऐसे । तरी ज्ञान होवावे ते कैसे ।
इत्यादि वचनीं विलसे । अनुभव श्रुति ॥८७॥
जयाचिया ठायीं । तिन्ही काळीं मनोमळ नाहीं ।
जे दुःख अनिर्वाच्य म्हणोनि लवलाहि । सुखरूपचि जे ॥८८॥
दुःख सत्य होईल । ध्वंसप्रतियोगीयोग्या[१४] येईल ।
तैं दुःखाभाव म्हणिजेल । मोक्ष ऐसे ॥८९॥
तया दुःखा अनिर्वाच्य स्थीति । जेथ दुःखाची कल्पित निवृत्ति ।
ब्रह्म म्हणावे उदासवृत्ति । तरी स्वरूप ते ॥९०॥
यालागीं पदीं शेषें सुख । हें परार्थानुमिति[१५] बोलिली देख ।
स्वये अनुभविती सम्यक् । आनंद भुवनीं ब्रह्मवेत्तें ॥९१॥
ते मीचि आहे ऐसी मति । अखंड जयांची विराजती ।
ते ब्राह्मण किंवा चांडाल जाती । असो परी मम चित्तीं सद्गुरु वाटे ॥९२॥
ऐसे जे परब्रह्मज्ञान । तें पूर्वजन्मीचे कीं या जन्मीचे पूर्ण ।
होवो परी तेणें करून । गुरु निर्वाणीं तो होय ॥९३॥
शश्वन्नश्वरमेव विश्वमखिलं निश्चित्य वाचा गुरो-।
र्नित्यं ब्रह्म निरंतरं विमृशता निर्व्याजशांतात्मना ।
भूतं भावि च दुष्कृतं प्रदहता संविन्मये पावके ।
प्रारब्धाय समर्पितं स्ववपुरित्येषा मनीषा मम ॥७॥
ब्राह्मण असलिया वेदवाणी । कीं शूद्रयोनींत पुराणवाणी । (य११पू.१८७)
कां भाषांतर ऐकोनी अंत्यज योनी । कीं गुरुमुखें करोनी जाणिले तत्व ॥९४॥
ब्रह्म एक वस्तु नित्य । जगत् आघवे अनित्य ।
ऐसा अनुभव घेतला सत्य । श्रवण मनन निदिध्यासें ॥९५॥
सर्वदा इच्छारहित शांत । ज्ञानें जाळिले संचित ।
अकर्तृपणें आगामी न स्पर्शत । देह समर्पित प्रारब्धाते ॥९६॥
तो चांडाल कीं ब्राह्मण । तया सद्गुरुचि मानी माझें मन । आतां सकळाते स्पष्ट परमात्म ज्ञान । यालागीं अधिकारी आपण कोणीहि ॥९७॥
आत्मभिन्न शरीर असते । तरी ज्ञानाते अधिकारी कोणी नसते । अधिकार-निषेध वेदादिशब्दापुरते । परी अर्थत्वें परमार्थी सर्व अधिकारी ॥९८॥
या तिर्यङ्नरदेवताभिरहमित्यन्तः स्फुटा गृह्यते ।
यद्भासा हृदयाक्षदेहविषया भान्ति स्वतोऽचेतनाः ॥
तां भास्यैः पिहितार्कमंडलनिभां स्फूर्तिं सदाभावयन् ।
योगी निर्वृतमानसो हि गुरुरित्येषा मनीषा मम ॥८॥

पशु पक्षी मनुष्य देव । हृदयीं चिंतिती अहंभाव ।
देहादिकांचे ठायीं सर्व । स्थापिती ममत्व ॥९९॥
ते उपाधिरहित शुद्ध चेतन । तत्प्रकाशें देहेंद्रियमन ।
विहरति जैसे चेतन । ते मी म्हणोन प्रतीति जया ॥१००॥
देहाते चैतन्य असते । तरी मरण कवणाते न येते ।
कीं द्रव्यावांचोनि गुणाते । गमन नाही म्हणोनी ॥१०१॥
इंद्रिय असते चेतन । तरी एकार्थ ग्राहक अहं नसता भिन्न ।
जरी चेतन असते मन । तरी विरोधीवृत्तिधारण न कळते ॥१०२॥
क्षणें क्रोध क्षणें शांति । हे दोन्ही कळती अहंप्रति ।
निश्चयहि होती जाती । म्हणोनी बुद्धि निश्चिती चेतन नव्हे ॥१०३॥
सर्वदा न राहे आनंद लहरी । हेहि जो जाणे सर्वापरी ।
बिंबभूत अचळ निर्धारी । उपाधिरहित चिदात्मा तो ॥१०४॥
तो मी आहे ऐसी बुद्धि । जयाची दृढ जाहली त्रिशुद्धि ।
तो चांडाल असो कीं द्विज विद्याधि । श्रीगुरु आधीं मज वाटे ॥१०५॥
तें चैतन्य उपाधिरहित । ज्ञानें जाणे वा ध्यानें भावित ।
शेवटीं झाला निरपेक्ष चित्त । तो चांडाल वा द्विज श्रौत सद्गुरूचि ॥१०६॥
यत्सौख्याम्बुधि लेशलेशत इमे शक्रादयो निर्वृता । (य११पू.१८८)
यश्चित्ते नितरां प्रशांतकलने लब्ध्वा मुनिर्निर्वृतः ॥
यस्मिन्नित्यसुखाम्बुधौ गलितधीर्ब्रह्मैव न ब्रह्मवित् ।
यः कश्चित्स सुरेन्द्रवन्दितपदो नूनं मनीषा मम ॥९॥
जयाच्या आनंदलेशाचा लेश । पावोनी इंद्रादि सुखी विशेष ।
ते मीचि ऐसी जयास । प्रतीति दृढ ॥१०७॥
सकळ कलंकनिवृत्ति । ऐसी जयाची चित्तवृत्ति ।
परब्रह्मावांचोनी जगतीं । आन नाहीं ॥१०८॥
ऐसे जाणोनिया मनीं । निरंकुशा तृप्ति पावुनी ।
जयाची तनु सद्गुरूहूनि । चैतन्यकांचनमणीव विलसे ॥१०९॥
श्रवणमनननिदिध्यासे । मी ब्रह्म हें वृत्ति उल्लसे ।
तैं सकार्याज्ञान नाशे । मग ज्ञान जें विलसे स्वानुपयोगी ॥११०॥



ते कल्पाआदि हरिमुखश्रुति । आणि गुरुमुखें उपनिषन्मूर्ति ।
तातचरणांबुज वर्णीती । येणेंचि रीति ऐका तें ॥१११॥
''तयाचे बिसाट शब्द । सुखें म्हणो येती वेद ॥
सदेह सच्चिदानंद । कां नोहावे ते'' ॥१६४६॥ (ज्ञानेश्वरी अ. १८)
अथवा अज्ञान नाशत । तैं ज्ञानहि उपशान्त ।
ब्रह्मानंदरूपचि विख्यात । ब्रह्मवित् तो ॥११२॥
शिव शिव तया ब्रह्मवेत्ता । म्हणता लाज वाटे चित्ता ।
तो ब्रह्मचि परी काय कीजे अर्था । वाणिचि न पवे त्या ॥११३॥
म्हणोनी चावळी भलते । असो तयाचे कोणीहि जनिते ।
परी इंद्रादिकाहि वंद्य पद ते । श्रुतिमानें ॥११४॥
''यो यो देवानां प्रत्यबुध्यत स स तदभवत्तथर्षीणां तथा मनुष्याणामिति श्रुतिः ।''
(बृहदारण्यक)

उपबृंहणं च -
'प्राप्ता ज्ञानदशामेतां पशुम्लेच्छादयोऽपि ये ।
सदेहा वाप्यदेहा वा ते मुक्ता नात्र संशयः ।' (वासिष्ठ)
प्रथम श्रुतीचा भावार्थ । देव ऋषि वा मनुष्य परी ब्रह्म जो जाणत ।
तो ब्रह्मचि होय यथार्थ । संशय येथे न धरावा ॥११५॥
आतां वासिष्ठ वचनार्थू । कीं जो चढला हा ज्ञानप्रांतु ।
तो पशु म्लेच्छ कीं असुर संघातु । सदेह कीं अदेह स्थावर खेचरू ॥११६॥
(य११पू.१८९) तो मुक्त येथ संशयो नाहीं । म्हणोनी भेद हा मिथ्या पाही ।
एवं वर्ण कोणताहि । ज्ञानी तरी सद्गुरु तो ॥११७॥
जें पूर्ण वर्णाभिमानी । स्वभिन्न विशिष्टाद्वैतध्यानी ।
त्यांच्याहि मतीं षठकोप म्हणोनी । आचार्य झाले द्विजभिन्नजाति ॥११८॥
ज्योतिषामुळें मान । यवनाचार्या देती ब्राह्मण ।
महाभारतीं विश्वामित्रा कारण । चांडाल बोलिला परिसंख्याविधि ॥११९॥
म्हणोनी ज्ञानी कोणीहि गुरु । यालागी सोडी उच्च नीच विचारू ।
गुरुभक्ता व्यर्थ डगरू । न साहे हा ॥१२०॥
भगवद्भावें अश्वचांडालगोखरा । प्रवर्तावे नमस्कारा ।

तेथ गुरूसचि अन्य यातीय नरा । मानोनी कैसे वाळावे ॥१२१॥
म्हणवोनी तूं भ्रांति सोडोनी । विश्वास ठेवी सद्गुरुवचनीं ।
बहुशा ब्राह्मण ब्राह्मणानी । करावा गुरु ॥१२२॥
किंवा जेथ दिसेल विशेष गुण । तेचि गुरूचे अधिष्ठान ।
कर्मी प्रमाण आश्रमवर्ण । येथे निर्वाण गुरुभक्ति ॥१२३॥
माझी ज्ञानेश्वर माऊली । अतिवर्णाश्रमित्वें वहिली ।
सर्वांसचि सद्गुरु जाहली । ती म्यां वंदिली सद्भावे ॥१२४॥
सकळ कविताकमळमाळा । वाहुनी श्रीगुरुचरणकमळा ।
ज्ञानराज नामें वाणीस चाळा । लावोनि जिताचि सोहळा[१६] भोगू ॥१२५॥

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यप्रबंधे
संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे
गुरुवर्णाद्यधिकारनिराकरणं
नाम पंचमं कुसुमम् ॥

०००

### अध्याय ५ टीपा

(१)शरणागतांची इच्छा पुरविणारा कल्पवृक्ष (२)संसार वणव्यानी पोळलेल्याना (३)पद,योग्यता (४)ज्ञानेश्वरमहाराज (५)उत्तम अधिकारिता (६)ज्ञान वेदांवरून किंवा पुराणावरूनही होवू शकते तरीपण शूद्रांनी पुराणादिकांवरूनच करून घ्यावे, या नियमविधीचे पालन केल्याने उत्पन्न होणाऱ्या पुण्यावाचून (७)सांख्यशास्त्राधिकाराची (८)सांख्यशास्त्राधिकार (९)विद्या संपादन करण्याचा अधिधकार (१०)त्या तंत्राचे अधिकारी म्हणून (११)तो पतित ब्राह्मण पतित शूद्रापेक्षा श्रेष्ठ आहे किवा त्याला शूद्र संस्कार लागू नाहीत असा अर्थ करावा (१२)तांत्रिक मार्गाहून निराळा (१३)खरे पाहता (१४)ध्वंस म्हणजे नाश त्याचा प्रतियोगी होण्याला योग्य, वस्तुतःदुःख असते तर त्याचा नाश झाला असता असा अर्थ (१५)ब्रह्मवस्तूचे ठिकाणी सुख आहे दुःख नाही हे अनुमान दुसऱ्याकरिता आहे (१६)ब्रह्मसोहळा

०००



॥श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय ६ वा

# ॥ श्रद्धातत्त्व निरूपण ॥

जय जय सद्गुरु सर्वेश्वरा । सच्चिदानंदा करुणाकरा ।
भक्तवत्सला दीनोद्धारा । पावे उदारा मजलागीं ॥१॥
तूं सन्निध असतां भवगजकेसरी[१] । मज जंबुक गांजिती षडरि ।
येई धांवोनी झडकरी । करी बोहरी[२] त्रिविध तापा ॥२॥
तुझी एक मजवरी सत्ता । असलिया आळंदिनाथा ।
मग नेत्र उघडोनी पाहतां । होय प्रळय सर्वथा महाकाळा ॥३॥
म्हणोनी एवढा भरंवसा । पुढें ग्रंथ अविचल[३] तैसा । (य११पू.१९०)
चालविता आळंदिनिवासा । तूंचि एक ॥४॥
येणें स्तुति प्रसन्नें । श्रीगुरुकृपादाने ।
मज प्रेरिले अंतःकरणें । तरी वचनें ऐकोत श्रोते ॥५॥
शिष्य विनवी कर जोडोनी । म्हणे स्वामी कैवल्यदानी ।
तुम्ही मागा बोलिले कृपा करोनी । कीं विश्वास गुरुवचनीं ठेवावा ॥६॥
तरी तर्काते नावलंबिता-। श्रद्धेची कायसी वार्ता ।
बहुजन इहलोकीं ताता । श्रद्धेनेंचि नाडिले ॥७॥
ऐसें वचन ऐकोनी । श्रीगुरु म्हणती हांसोनी ।
तूं सच्छिष्य असोनी । नवल मनीं तर्काशा ॥८॥
परी हे असो वादीचा हेतू । घेवोनि यांतुनि सांगितु ।
कीं निज निवाडे रक्षितु । श्रद्धाचि माता ॥९॥
'श्रद्धावस्तूशीं आदरु' । येणें तातवचनें निर्धारु ।
कां मूळीं दावावया प्रकारु । श्रद्धाचि शुद्ध ॥१०॥
परी हा बौद्धार्थू । तुज न गमे यथार्थू ।
तरी ऐके हेतु । नानाविध ॥११॥
तर्काते नाहीं लक्षण । यालागीं श्रद्धाचि अधिष्ठान । कां तर्काचें लक्षण कवण।
अनुमान कीं अनिष्टापादन[४] कां निरिक्षण संशय असे ॥१२॥

तेथ पक्ष आश्रयिता पाहिला । तरी नैय्यायिकी प्रमाणभिन्न केले तर्काला ।
यालागीं अनुमानभिन्न तयाला । पाहिजे रूप ॥१३॥
आतां तर्कचि जरी अनुमान । तरी ते सामान्य(५) मात्र जाण ।
यालागीं विशेष जाणावया कारण । नोहे प्रमाण सर्वथा ते ॥१४॥
किंवा अनुमानाची प्रतिष्ठा । प्रत्यक्षावरीच निष्ठा ।
परी निर्विवादत्वाची काष्ठा(६) । प्रत्यक्षहि न पावे ॥१५॥
वाचक वाच्य आणि संबंध । या तिहीचा असता भेद ।
भासत असे अभेद । हा इंद्रियप्रमाद(७) योगी म्हणती ॥१६॥
कां पदार्थ एकदेशचि फावे । इतर आकार मनें संभवे ।
यालागीं प्रत्यक्षहि प्रमाण नोहे । जे अनुमान आघवे प्रतिष्ठी ॥१७॥
अतिदूर अतिसंन्निध । अतिसूक्ष्म अतिस्थूल प्रसिद्ध ।
प्रत्यक्षें न दिसे शुद्ध । सांख्य हें म्हणे ॥१८॥
इंद्रिय विकल असतां । कां मन एकाग्र नसतां ।
अन्य व्यवधान पैसतां(८) । प्रत्यक्षें सर्वथा वस्तु न दिसे ॥१९॥
कां अभिभवें(९) कीं समानाभिहारी(१०) । असोनी प्रत्यक्ष विषय न करी ।
अथवा इंद्रियचि निर्धारी । प्रत्यक्ष न होती ॥२०॥
यालागीं प्रत्यक्ष प्रमाण । हें आघवेचि अप्रमाण ।
म्हणून तयाचें ग्रहण(११) । श्रद्धाचि कीं ॥२१॥
तेणें अनुमानातें श्रद्धात्व आले । पुढती सकल जगतीं वहिले ।
हेत्वाभास(१२) नाहीं राहिले । ऐसेहि नाहीं ॥२२॥ (य११पू.१९१)
आतां तर्क जो अनिष्टापादन(१३) । तंव ते प्रतिबुद्धि होईल भिन्न ।
यालागीं सिद्धान्त स्थापन । न होय तेणें ॥२३॥
तर्के एक वस्तु कळे सकळासी । तरी अनिष्टापत्ति नाहीं कवणासी ।
यालागीं तर्काच्या द्वितीय लक्षणासी । स्वरूपचि नाहीं ॥२४॥
आणि वस्तुविषयीं मत भेद । तरी अनिष्टापत्ति सर्वासचि प्रसिद्ध ।
यालागीं तर्काचे द्वितीय लक्षण शुद्ध । निश्चया नये ॥२५॥
अंतःकरणीं विकार । नानाविध असती साचार ।
तेणें अनिष्टापत्ति प्रकार । बहुतचि होय ॥२६॥



यालागीं कवणा कोणीहि । भलते वेळा भलते ठायीं ।
स्वाभिमतें परासी पाही । अनिष्ट लवलाही वदो शके ॥२७॥
आतां संशय घेवोनि निरीक्षण । हेचि जरी तर्काचे तिसरें लक्षण ।
तें तंव नांवचि सहन । करो न शके ॥२८॥
लक्षण करितां लक्षणाचा । निश्चय कवणें करावा साचा ।
नातरी आघवीयाचि वस्तूचा । संशय जरी ॥२९॥
लक्षणप्रमाणें(१४) वस्तुसिद्धि । हे तंव अपरिक्षित श्रद्धावधि ।
परीक्षा करिता बुद्धि । अनवस्था पावे ॥३०॥
अविश्वासिया कोण कोण प्रमाण । तंव वादी म्हणे आपण ।
अहो असत्तर्काचे ग्रहण । न कीजे तुम्ही ॥३१॥
परी सत्तर्काचे ठायीं । तुम्हास सम्मति असो लवलाही ।
जे अनुभवाचिया ठायीं । प्रतिष्ठा म्हणोनी ॥३२॥
परी हें वादीचें बोलणें । शून्यासी गुणिता शून्यें ।
हाता चढे जे तेणें मानें । बरवे झाले ॥३३॥
येथ अनुभव तरी कोणता घ्यावा । बाह्य कीं आंतर ओळखावा ।
प्रथमपक्षीं मानावा । तंव चार्वाकप्राप्ति ॥३४॥
बाह्यचि अनुभव अंतीं । घेऊनि झाली चार्वाकप्रवृत्ति ।
प्रत्यक्ष-खंडणेंचि तयाप्रति । खंडण झाले ॥३५॥
आणि चार्वाकांचे खंडण । बहुतीं केलें संपूर्ण ।
यालागीं बाह्यानुभव अधिष्ठून । तर्कप्रतिष्ठा न पावे ॥३६॥
अंतर-अनुभव जो कांहीं । तो तंव विवेकाविण नाहीं ।
विवेक तंव लवलाही । शास्त्रवचनसिद्ध ॥३७॥
यास्तव सत्तर्क म्हणोन । स्वतंत्रत्वे अवलक्षण ।
आतां हेतु आन । ऐके शिष्या ॥३८॥
व्यवहारीं पाहतां । तरी श्रद्धाचि उमटे सर्वथा ।
बाळ मायेवरोनी विश्वास काढितां । तरी जीवन तत्वतां केवि घटे ॥३९॥
कां प्रतिक्षणीं पति । म्हणेल व्यभिचारिणी मम युवती ।
तरी वर्णाश्रम संस्कार पुत्राप्रती । घडतील कैसे ॥४०॥ (य११पू.१९२)

केवळ तर्के कर्म करिता । तरी शरीरा व्याधिसंपन्नता[१५] ।
येथ माझी मलविसर्गव्यवस्था । पहावी कोणी ॥४१॥
अवघे संशयीत जीवित । तरी मी अमर असावे ही इच्छा कां होत ।
भ्रम म्हणावा तरी तर्कनिरीक्षित । राहिला कैसा ॥४२॥
ध्यानें सुटेल जरी ती भ्रांति । तरी ध्यानेंचि कां न होईल अमरत्व प्राप्ति ।
यालागीं तर्का व्यवस्थिति[१६] । ऐसीहि नाहीं ॥४३॥
आतां इच्छानुभवें तर्क कीजे । तरी इच्छेवरी श्रद्धाचि ठेविजे ।
मग व्यर्थ तर्क कां अवलंबिजे । श्रद्धेनें कां न कीजे तीव्र इच्छा ॥४४॥
व्यवहार श्रद्धापन्न । त्रिपुरारहस्यीं सुंदर निरूपण ।
ते इच्छा असेल तरी त्यान । पहावे मी ग्रंथविस्तारभयास्तव न निरूपी ॥४५॥
''सर्व शंकाभिराक्रान्तमन्नं पानं च भूतले ।
प्रवृत्तिः कुत्र कर्तव्या जीवितव्यं कथंन्नुवा''।
आतां ऐसे म्हणेल वादी । कीं तर्केचि तर्क खंडिला त्रिशुद्धि ।
यालागीं तुम्हा तर्कबुद्धि । प्रमाण आहे ॥४६॥
या शंकेचें समाधान । कीं स्वयें जो करी आपुलें खंडण ।
तो आत्मनाशक दुसरिया प्रमाण । होईल कैसा ॥४७॥
आत्मनाशक प्रमाण झाला । तरी उत्पत्तिनाशाचा विरोध गेला ।
विरोधाविण ठाव नाहीं परीक्षणाला । परीक्षणाविण तर्क न घटे ॥४८॥
तंव वादी म्हणे असो श्रद्धा । परी श्रद्धेनें जन फसविती अप्रबुद्धा ।
तैं मी म्हणे हेहि मुधा । बोलणें तुझे ॥४९॥
एकापासूनि अन्य मत । जेव्हां जेव्हां वेगळे होत ।
तेव्हां तेव्हां तर्कबळेंचि स्थापित । आणिकांच्या मनीं ॥५०॥
श्रद्धेनें असतां मतभेद । तरी सर्वथा न होय वाद ।
यालागीं तर्कचि फसवे प्रसिद्ध । श्रद्धा नाहीं ॥५१॥
हें असो मतें फसवोत तर्कानें निश्चिती । परंतु श्रद्धेनें नाडिती कांहीं व्यक्ति ।
तरी येथ रागद्वेषवृत्ति । कां दैवगति नाडितू ॥५२॥
जैसें रागबळें मनुष्य नेवोनी । पूर्वीं विकीत होते जनीं ।
कां दैवबळेंचि निर्वाणीं । भलते मिळे श्रद्धेतें ॥५३॥

श्रद्धे म्हणे पाहिले पीक । तंव दुष्काळ पडे अचाणुक ।
येथ कवण व्यक्ति प्रतिबंधक । दैव निश्चिती सोडीना ॥५४॥
जगांत वेश्या पाहोनी । जो कलंकी मानी आपुली जननी ।
तैसे मूर्ख एक विपरीत प्रत्यय घेवोनी । श्रद्धा हननीं प्रवर्तती ॥५५॥
तंव वादीं म्हणे दैवाधीन होवावे । तरी मग प्रयत्न कासया करावे ।
(य११पू.१९३) सिद्धान्ती म्हणे येथूनि स्वभावे । श्रद्धाचि काढी ॥५६॥
दैव न निरोधी[१७] प्रयत्नफळ । परी चालू नेदी उताविळ ।
यालागीं भगवच्छ्रद्धाशीळ । तया तमाळनीळ नुपेक्षी ॥५७॥
जे जे श्रद्धेंत विघ्न येती । ते ते सोसुनी दैवाघातीं[१८] ।
इष्टनिष्ठा[१९] वाढविता प्रीति । फळ निश्चिती चुकेना ॥५८॥
एरवी दैवाचें विघ्न । तें तर्कहि काय करील खंडण ।
जरी तर्क तोडी दैवविघ्न । तरी प्रतिपुरुषभिन्न नसते ॥५९॥
सर्वाची तोडिता दैवगति । तरी सर्वासिचि समसुखप्राप्ति ।
मग प्रतिपुरुषभिन्न तर्कस्थीति । असावया निश्चिती कवण हेतू ॥६०॥
तंव वादी म्हणे ते अवसरी । श्रद्धा येथ ठेवावी दैवावरी ।
तरी दैवाभावावरी[२०] । कां न कीजे ॥६१॥
येथ वादीचे 'कां न कीजे' वचन । आहे तर्क अवलंबून ।
आम्ही तर्काचें करीत आहोत खंडण । यालागीं प्रश्न-कोटींत प्रवेशेना ॥६२॥
आणि एक जुनी श्रद्धा सोडूनी । नवी श्रद्धा करावया लागुनी ।
तर्काभास घेवोनी । प्रवर्तती सकळ ॥६३॥
तो तर्काभास अप्रमाण । दैवावरी श्रद्धा पुरातन ।
म्हणोनी दैवाभावावरी जाण । श्रद्धा योग्य नाहीं ॥६४॥
तंव क्षोभोनी म्हणे वादी । मग कवणिया रुढीस नाहीं अशुद्धि ।
सिद्धान्ती म्हणे तुझी बुद्धि । नष्ट झाली तर्कबळें ॥६५॥
जेथ अनिष्टाभावप्रतीति[२१] । तेथ पूर्व आहे इष्टभावप्रतीति ।
असलियाविण श्रद्धार्थ प्रवृत्ति । वादी न करिता खंडण ॥६६॥
यालागीं दैवशब्दप्रवृत्तिविण[२२] । नाहीं झाले दैवखंडण ।
म्हणोनी दैवाभाव[२३] अधिष्ठान । श्रद्धेकारण घटो न शके ॥६७॥

वादी म्हणे अनवधि[२४] दैवशब्दप्रवृत्ति । तरी तर्कासीहि तेचि गति ।
श्रद्धेची सादि होय प्रतीति । हे नव्हे सिद्धान्ती योग्य म्हणे ॥६८॥
तर्काचे आम्ही करितो खंडण । तेहि तुज रुचेल त्या तर्के करून ।
आणि तर्कानें जें केले श्रद्धाखंडण । तें श्रद्धेनें नाहीं म्हणून तर्क सादि ॥६९॥
यालागीं दैवाचे प्रतिबंध । उताविळ न करितां सोसावेत शुद्ध ।
तरी पावे गोविंद । संशय येथ अणुमात्र नाहीं ॥७०॥
'आत्मा यजमानः श्रद्धा पत्नीति' । स्वयें सांगताहे श्रुति ।
आणि 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानमिति' । जागृच्छ्रुतिहि सांगतसे ॥७१॥
समर्थ तुकारामादि महंत । ऐसेचि बोलिले यथार्थ ।
यालागीं तेहि प्रमाण समस्त । ऐके आतां ॥७२॥ (य११पू.१९४)
''उपेक्षा कदा रामरूपीं असेना । जिवा मानवा निश्चयो तो दिसेना ।
सदा सर्वदा देव सन्निध राहे । कृपाळुपणें अल्प धारिष्ट पाहे ॥''

(-समर्थ रामदास)

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥१॥
येथें अलंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचे ते ॥२॥
अंतरीचे बीज जाणे कळवळा । व्यापक सकळा ब्रह्मांडाचा ॥३॥
तुका म्हणे नाहीं चालत तातडी । प्राप्त काळघडी आल्याविण ॥४॥

(श्रीतुकाराम ३००४)

अविश्वासियाचे शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाही ॥१॥
काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥२॥
मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥३॥
तुका म्हणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा ॥४॥

(श्रीतुकाराम २५४८)

ऐका ऐका भाविकजन । कोण कोण व्हाल ते ॥१॥
तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरावा ॥२॥
नका शोधूं मतांतरे । नुमगे खरें बुडाल ॥३॥
कलिमध्यें दास तुका । जातो लोका सांगत ॥४॥

(श्रीतुकाराम २५८२)

तंव वादी म्हणे अहो ऐका । तुम्हा आगम भावार्थदीपिका ।
तरी श्रद्धाप्रतिषेध निका । तेथेंचि केला ॥७३॥
''नुसधियाचि श्रद्धा । झोंबो पाहसी परम पदा ।
तरी तैसे हे प्रबुद्धा । सोहोपें नोहे'' ॥५०॥ (अ.१७)
सिद्धान्ती म्हणे पूर्वापर । न पाहतां चावळणार ।
तेणें तुझें हृदयघर । विशीर्ण झाले ॥७४॥
येथ जी निषेधिली श्रद्धा । ते शास्त्रावीण अप्रबुद्धा ।
शास्त्रश्रद्धेनें असच्छ्रद्धा । निवारिली ॥७५॥
परी अशास्त्र श्रद्धा यावया कारण । तेथहि दैवचि सांगती कृपाघन ।
त्याचि ओव्या तुजकारण । ऐकवितो आम्ही ॥७६॥ (य११पू.१९५)
''म्हणे पार्था तुझा अतिसो । घेई गा आम्ही जाणतसो ।
शास्त्राभ्यासाचा आडसो । मानितोसि कीं ॥४९॥
गंगोदक जरी झाले । तरी मद्यभांडा आले ।
तें घेऊं नयें कांहीं केलें । विचारी पां ॥५२॥
चंदन होय शीतळु । परी अग्नीसी पावे मेळु ।
तैं हातीं धरितां जाळुं । न शके कायी ॥५३॥
कां किडाचिये आटतिये पुटीं । पडिले सोळें किरीटी ।
घेतलें चोखटासाठीं । नागवीना ॥५४॥
तैसे श्रद्धेचे दळवाडे । आंगे कीर चोखडे ।
परी प्राणियाच्या पडे । विभागीं जैं ॥५५॥
तैं प्राणिये तंव स्वभावे । अनादिमायाप्रभावे ।
त्रिगुणाचेचि आघवे । वळिले आहाती ॥५६॥
तेथही दोन गुण खांचती । मग एक धरी उन्नति ।
तैं तैसियाचि होती वृत्ति । जीवांचिया ॥५७॥
वृत्ति ऐसे मन धरिती । मना ऐसी क्रिया करिती ।
केलिया ऐसी वरिती । मरोनी देहें ॥५८॥
परी गुणत्रयवशें । त्रिविधपणाचें लासे ।
श्रद्धे जें उठिले असे । ते ओळख तूं ॥७३॥

तरी जाणिजे झाड फुलें । कां मानस ओळखीजे बोले ।
भोगें जाणिजे केलें । पूर्व जन्मीचें ॥७४॥
तैसी जिहीं जिहीं चिन्हीं । श्रद्धेचीं रूपें तिन्हीं ।
देखीजती ते वानी । अवधारी पां ॥७५॥ (ज्ञाने.अ.१७)
या ओव्यांचा अभिप्राव । कीं बहुजन्माभ्यासें जो गुण दैव ।
जयासी होय सावेव । तो त्याचि श्रद्धेचा होतसे ॥७७॥
परी सत्वश्रद्धेनें अन्य श्रद्धा । येथ आणिली प्रतिषेधा ।
एरवी तर्के मिळेल ब्रह्मबोधा । हा अभिप्राय येथ नाहीं ॥७८॥
भाष्यांतहि बोलिले आचार्य आपण । कीं शास्त्रश्रद्धा परित्यागोन ।
बळेंचि श्रद्धा करिती ग्रहण । ते श्रद्धाचि नोहे ॥७९॥
यालागीं दैवे मिळाली रजस्तमश्रद्धा । तरी ते टाकुनी अप्रसिद्धा[२५] ।
यत्नें स्वभावजयें सत्वश्रद्धा । मिळवावी हा मधुसूदनाभिप्रावो ॥८०॥
मग वादी म्हणे इतर श्रद्धा निराकरणीं । पाहिजे तरी तर्कवाणी ।
तंव सिद्धान्ती म्हणे हे निर्वाणी । आगमवाण्युपदेशें[२६] घडे ॥८१॥
जें मत आपणा प्रमाण नाहीं । आचार्यीं समन्वय केला त्याचाही ।
यालागीं निःशेष त्याज्य नाहीं । कोणतीहि श्रद्धा ॥८२॥
तेचि समन्वय वचनें । ऐसे सावधान मनें ।
जे पुष्पदंतादि वदनें । बोलते जाहले ॥८३॥ (य११पू.१९६)
त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति ।
प्रभिन्नें प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां ।
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥७॥(महिम्नस्तोत्र )
यं शैवा समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो ।
बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः ।
अर्हन्नित्यथ जैनशासनरता कर्मेति मीमांसकाः ।
सोऽयं वो विदधातु वांच्छितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥ (स्मृति)
वेदान्ते वैष्णवे शैवे सौरे बौद्धेऽन्यतोपि च ।
एक एव परस्वात्मा ज्ञाताज्ञेयं महेश्वरी ॥ (कुलयुक्ति)

या आघविया श्लोकांचा अर्थ । जितुकीं मतें विख्यात ।
रुचिवैचित्र्यें करोनी समस्त । शेखीं मिळत परब्रह्मीं ॥८४॥
योगवासिष्ठीं निरूपण । ऐसेंचि केलें ते पाहोत सज्जन ।
कीं याचि परमात्मया कारण । बौद्धहि स्मरती ॥८५॥
किंबहुना अनार्य मत । जे मनुष्यपरिकल्पित ।
तेहि धर्म म्हणूनी संग्रहीत । सूतसंहितेंत स्कंदपुराणीं ॥८६॥
स्वमनीषिकयोत्पन्नो निर्मूलो धर्मसंज्ञितः ।
श्रद्धया सहितो यस्तु सोऽपि धर्म उदाहृतः ॥१३॥ (सूतसंहिता यज्ञवैभवखंड अ. २०)
सूत उवाचः-
अथातः संप्रवक्ष्यामि मार्गप्रामाण्यनिर्णयम् ।
श्रद्धया सहिता यूयं श्रुणुध्वं मुनिपुंगवाः ॥१॥
ननु बौद्धार्हताद्यागमानां वेदविरुद्धार्थप्रतिपादकानां वेदैकसमधिगम्ये ब्रह्मात्मैकविज्ञाने रुचिजनकत्वं नोपपद्यतेऽतो वैदिकमार्गव्यतिरिक्तानां सर्वेषाम् अप्रामाण्यमेवेत्याशंक्य तत्प्रामाण्यं समर्थयितुमारभते ।
अथात इति । श्रुतिस्मृत्यादिभिः शैवपाशुपतबुद्धाद्यागमैः समये नानाविधा मार्गाः प्रतिपादितास्तेषामधिकारिभेदेन प्रामाण्यनिर्णयः क्रियत इत्यर्थः॥१॥ (य११पू.१९७)
वेदांश्च धर्मशास्त्राणि पुराणं भारतं तथा ।
वेदांगान्युपवेदांश्च कामिकाद्यागमानपि ॥२॥
कापालं लाकुलं चैव तयोर्भेदान्द्विजर्षभाः ।
तथा पाशुपतं सोमं भैरवप्रमुखागमान् ॥३॥
तेषामेवोपभेदांश्च शतशोऽथ सहस्रशः ।
विष्ण्वागमांस्तथा ब्राह्मान्बुद्धार्हाद्यागमानपि ॥४॥
लोकायतं तर्कशास्त्रं बहुविस्तरसंयुतम् ।
मीमांसामतिगंभीरां सांख्ययोगौ तथैव च ॥५॥
उपवेदांश्चेति । आयुर्वेदधनुर्वेदादय उपवेदाः ॥२।३।४।५॥
अनेकभेदभिन्नानि तथा शास्त्रान्तराणि च ।
निर्ममे शंकरः साक्षात्सर्वज्ञः संग्रहेण तु ॥६॥
निर्ममे शंकर इति । श्रुतिस्मृतीतिहासपुराणादीनि वैदिकानि शास्त्राणि ।

तदर्थानुसारिशैवपाशुपताद्यागमान्बुद्धार्हतादिबहुभेदभिन्नान्वेदविरुद्धांश्च सर्वज्ञः शिव एव स्वशक्त्या निर्मितवानित्यर्थः । अतः सर्वज्ञेन शिवेनैव प्रणीतत्वादेषां मध्ये कस्यचिदप्यप्रामाण्यं न युक्तमिति भावः ॥६॥

कुर्वन्ति तानि नामानि कथितानि मनीषिभिः ।
अधिकारिविभेदेन नैकस्यैव सदा द्विजाः ॥
तर्कैरेते हि मार्गास्तु न हन्तव्या मनीषिभिः ॥७॥

यद्यप्येवमीश्वरनिर्मितत्वात्सर्वेषां प्रामाण्यं तथापि परस्पर विरुद्धार्थप्रतिपादकत्वाद् अप्रामाण्यमपि स्यादित्यत आह अधिकारीति ।

यथा ''उदिते जुहोति । अनुदिते जुहोति'' इत्यादि विरुद्धार्थप्रतिपादकानां वाक्यानामधिकारिभेदाद्विरोधाभावेन प्रामाण्यमेवमत्रापीत्यर्थः ।

एवमेते मार्गाः शुष्कतर्कबलान्नबाध्या इत्यर्थ ॥९॥

यथा तोयप्रवाहानां समुद्रः परमावधिः ।
तथैव सर्वमार्गाणां साक्षान्निष्ठा महेश्वरः ॥१०॥

साक्षान्निष्ठेति । सर्वेष्वपि मार्गेष्वस्ति कश्चिद्देव इति संमतत्वात्तस्य च परमेश्वरव्यतिरिक्तस्याभावात्तदागमोक्तगुणवैशिष्ठेन शिवः प्रतिपाद्यत इति भवति तस्मिन्सर्वेषां मार्गाणां पर्यवसानमित्यर्थः ॥१०॥ (सूतसंहिता यज्ञवैभवखंड अ. २२)

(य११पू.१९८)

या आघविया श्लोकांचा । अभिप्राय साचा ।
कीं निर्माता सकलागमाचा । परमेश्वरू ॥८७॥
साधनफलांशीं[२७] भ्रांतिरहितता । जीवासी नाटोपेचि[२८] सर्वथा ।
यद्यपि शिष्ठासी[२९] भ्रांतिरहितता । तथापि शास्त्रपूर्वकता[३०] बोलिजे ॥८८॥
म्हणवोनी सकलागमांच्या ठायीं । निर्माता एक भुजगशाई ।
जैसे बाळरुचि पाहोनी लवलाही । औषध आई निर्मितु ॥८९॥
कीं एका घासाचे दहा घास । माय करोनी चारी लेकुरास ।
म्हणोनी काय तियेस । शत्रु विशेष म्हणावे ॥९०॥
यालागीं जैसा जैसा अधिकारु जीवा । तैसें सांगणें पडले देवा ।
म्हणोनी शुष्क तर्के आघवा । खंडूं नये आगमगणू ॥९१॥
श्लोकामाजीं बौद्धादि मतें । तेंहि तर्के खंडूं नये निश्चिते ।
ऐसें बोलिले येणें श्रद्धेते । कवण्याचि सोडिले नाहीं ॥९२॥
यालागीं तर्कादिकीं सांख्यखंडण । ते वेदागमश्रद्धा धरून ।
केवळ तर्के तंव निराकरण । नाहींचि मानिले वेदमतीं ॥९३॥
याचिलागीं आर्यावर्तीं । धर्मार्थ युद्धें कदा न होती ।
इतर खंडीं युद्धें होती । तेहि श्रद्धारहित परद्वेषें ॥९४॥
एवं सोपानक्रमें करोन । शेवटीं पावती नारायण ।
यालागीं ज्याचिया दैवें करून । जया जें मत लाहे ॥९५॥
तो तेथ बुडाला निश्चिती । हें न म्हणवे कल्पांती ।
लवकर वा बहुकाळे भगवंती । पावेलचि तो ॥९६॥
तामस राजस सात्विक । जरी श्रद्धेचे भेद अनेक ।
तरी तामसहि पावती देख । काळें करोनी भगवंती ॥९७॥

भूतप्रेतादिसद्भावज्ञानं येषां हृदि स्थितम् ।
तेऽपि विज्ञानसंपन्ना इति मे निश्चिता मतिः ॥७॥
यक्षरक्षादिसद्भावो येषां भाति प्रमाणतः ।
तेऽपि विज्ञानसंपन्ना इति मे निश्चिता मतिः ॥८॥
इंद्रादिदेवतास्तित्वं येषां चित्ते प्रकाशते ॥
तेऽपि विज्ञानसंपन्ना इति मे निश्चिता मतिः ॥९॥ (सूतसंहिता यज्ञवैभवखंड अ.११)

तामसांचे भूतप्रेतयजन । परी तेहि विज्ञानसंपन्न ।
हें सूतसंहितेचें वचन । आतांचि प्रमाण दिधले ॥९८॥
एवं राजस यक्षरक्षादि यजिती । तेहि विज्ञानसंपन्न म्हणीजती । आणि सात्विक इंद्रादि देवा यजिती । तयाहि विज्ञानसंपन्न सूतसंहिता म्हणे ॥९९॥
(य११पू.१९९) यालागीं ईश्वरश्रद्धा धरून । जरी इतर श्रद्धा तात म्हणती गौण । तरी तर्कापेक्षे[३१] करून । वरिष्ठचि तीहि ॥१००॥
ईश्वरभिन्नदेवतांच्या[३२] ठायीं । जरी प्रधान गौण श्रद्धा पाहि ।
परी ईश्वर उपास्य असतां लवलाहि । भलतीहि श्रद्धा फळे ॥१०१॥
हेंहि तातचि बोलिले वचन । तेंहि ऐके प्रमाण ।
जेणें संशय छिन्न । होईल तुझा ॥१०२॥
''हेंचि कवणे एके मिसे । चित्त माझे ठायीं प्रवेशे ।

येतुले हो मग आपैसे । मीचि होणे असे ॥४६३॥
अगा मी एक लाणीचे खागे। मज येवो ये भलतेनि मार्गे ।
भक्ति कां विषयविरागे । अथवा वैरे ॥४७०॥
तैसाचि गोपिकासी कामें । तया कंसा भय संभ्रमे ।
येरा घातका मनोधर्मे । शिशुपालादिका ॥४५१॥
म्हणोनि पार्था पाही । प्रवेशावया माझ्या ठायीं ।
उपायांची नाहीं । वाणी एथ ॥४७१॥''(ज्ञानेश्वरी अ. ९)
एवं ईश्वरचि जरी उपास्य होय । तरी सात्विक राजस तामस ठाय ।
श्रद्धा भलतीहि कां होय । पावे भगवंती ॥१०३॥
शास्त्रीय अशास्त्रीय श्रद्धा विचार । कीं तारतम्य अधिकार ।
आघवाचि भिन्नोपास्यपर[३३] । उपास्य ईश्वर असतां समान फळ ॥१०४॥
सात्विक भजन नारदादिकांचे । राजस भजन कुब्जादिकांचें ।
तामस भजन शिशुपालादिकांचे । परी पावले साचे परब्रह्मीं ॥१०५॥
रज्जुवरी होय सर्पाभास । त्या नांव म्हणावे अध्यास ।
आणि शुक्तीवरी जो रजताध्यास । तो काय अध्यास नव्हे? ॥१०६॥
तैसा तमोगुण एक मायाजनित[३४] । आणि सत्व काय ब्रह्मस्वरूप निश्चित ।
गुण तंव आघवेचि अध्यस्त । अधिष्ठान भगवंत चित्सामान्य[३५] ॥१०७॥
म्हणोनी ईश्वराविषयीं भलती । श्रद्धा असलीया फळप्राप्ति ।
जया यजनें ब्राह्मण पावती । तया शबरी पावली बदरीफलदानें ॥१०८॥
जो स्वर मात्र चुकता यज्ञांत । याजका ऋत्विजा संयमिनी[३६] दावित ।
तो बोबडिया गोपाळासवे भात । मागोनी खात जगद्गुरु ॥१०९॥
बहु काय नारायणीं । प्रवर्तलीया गुदमैथुनीं ।
एक नपुंसक तरला निर्वाणीं । ऐसीहि कथा भक्तचरित्रीं ॥११०॥
शिवलिंगा घालोनी आचमन स्नान ।एक भक्त तरला हे सांगे स्कंदपुराण ।
श्रीमच्छंकराचार्य अशास्त्रीय श्रद्धाखंडण । गीताभाष्यांत करिताती ॥१११॥
(य११पू.२००)
तेचि स्वयें शिवानंदलहरींत । म्हणती कीं ईश्वरीं अशास्त्रीय श्रद्धाहि फळत ।
तोचि श्लोक प्रमाण येथ । ऐकिजे तुवा ॥११२॥



मार्गावर्तितपादुका पशुपतेरंगस्य कूर्चायते ।
गण्डूषाम्बुनिषेचनं पुररिपोर्दिव्याभिषेकायते ।
किंचिद्भक्षितमांसशेषकवलं नव्योपहारायते ।
भक्तिः किंन्न करोत्यहो वनचरो भक्तावतंसायते ॥६३॥ (शिवानंदलहरी)
या श्लोकाचा अर्थ स्पष्ट । तात्पर्य भगवच्छ्रद्धा वरिष्ठ ।
कोणत्याहि मार्गे विशिष्ठ । तेथेंचि मिळवी ॥११३॥
तंव वादी म्हणे श्रद्धेनें । भलते सांगतां मानावे कवणें ।
सिद्धान्ती म्हणे तर्केंहि कवणें । भलते सांगता कवण मानी ॥११४॥
वादी म्हणे मग तुम्ही तरी । विश्वास ठेवावा बौद्धशून्यावरी ।
सिद्धान्ती म्हणे विश्वास ठेवितां निर्धारी । शून्याचे शून्यपणचि जाय ॥११५॥
विश्वास जेथ जेथ राहे । तेथ तेथ भावचि उत्पन्न होय ।
हें असो नागार्जुन स्वयें । बोलताहे कीं बौद्धशून्य तें वेदान्त ब्रह्म ॥११६॥
सर्वालंबनधर्मैश्च सर्वतत्त्वैरशेषतः ।
सर्वक्लेशाशयैः शून्यं न शून्यं परमार्थतः ॥ नागार्जुन.
गुणाद्यालंबन धर्म । द्रव्यादि तत्त्वसंभ्रम ।
अविद्यादि क्लेश धर्म । या विरहित तें शून्य म्हणिजे ॥११७॥
एरवी परमार्थदृष्टीं । नाहीं ते असद्भावगोष्टीं[३७] ।
येणें वचनेंचि वेदान्तपरिपाटी[३८] । सांपडे ब्रह्म ॥११८॥
एरवी आत्मनाश जरी मानावा । तरी तो सर्वप्रमाणें असिद्ध आघवा ।
प्रत्यक्ष प्रमाणें आत्मनाश पहावा । हें घटेचिना ॥११९॥
चूर्णिका -
आत्मनाशाविषयीं शाब्द प्रमाण । तरी ते प्रवर्तवी कवण ।
जरी म्हणावे अनुमान । तरी आत्माभावांतून[३९] होवो शकेल पुनर्व्युत्थान[४०] ।
हा देह पूर्वी आत्माभावांतून आला म्हणोन । यद्यपि भावाचेचि नानापण ।
अभाव तंव एकचि पूर्ण । म्हणोनी जो निमे त्याचेचि होय पुनरुत्थान ।
ऐसे निघते अनुमान । तरी मग आत्मनाश नाममात्र असोन ।
आत्मया अनाद्यनंतपण । सिद्ध झाले ॥१२०॥
तव वादी म्हणे हा कीर तर्क । सिद्धान्ती म्हणे विश्वास देख ।

तर्काचें लक्षण कीं सम्यक्। दोन्ही पक्ष समान कीजे ॥१२१॥
(य११पू.२०१)
एका पक्षाच्या ठायीं । दृढ श्रद्धा ठेवोनि पाही ।
अन्य पक्ष खंडिता लवलाही । तरी तर्काचें तर्कपण जाय ॥१२२॥
दोन्ही पक्ष समान धरिता । तरी त्याचेचि नांव संशयावस्था ।
अनंतवार संशय संशये गुणिता । निश्चय सर्वथा न सांपडे ॥१२३॥
तंव वादी म्हणे तर्क म्हणजे काय । अनुभवाचा कें अपलाप होय ।
सिद्धान्ती म्हणे श्रद्धा ही सोय । अनुभवापलाप करीना ॥१२४॥
किंबहुना अनुभवांत संशय घेणें । हींचि तर्काचीं लक्षणें ।
अनुभव जैसा तैसाचि मानणें । या नांव श्रद्धा ॥१२५॥
वादी म्हणे असदनुभव । तेथहि श्रद्धा राहील स्वयमेव ।
सिद्धान्ती म्हणे तर्कासी आघवाचि संशय । तो काय असदनुभव(४१) नव्हे ॥१२६॥
अहो एक अनुभव दृढकरण । हेंचि तर्काचें साध्य जाण ।
अरे तोहि कालत्रयीं राहे येथ श्रद्धेविण । आन प्रमाण कोणते ॥१२७॥
वादी म्हणे आगमानुसार युक्ति । भगवत्पूज्यपादादि मानिती ।
तस्मात् श्रद्धामूलकचि म्हणे सिद्धान्तीं । जैं आगमाप्रति(४२) वरिष्ठता ॥१२८॥
अहो श्रद्धाचि आघवी निश्चित । तरी तुम्हास खंडणीयचि नाहीं कोणीहि मत ।
सिद्धान्ती म्हणे हे व्यवस्थित । पूर्वीच आम्हीं बोलिलो ॥१२९॥
अहो मग तुम्हा वादीजय । करावयाची नाहीं सोय ।
सिद्धान्ती म्हणे उत्तम उपाय । वादीविजयार्थ मौन आम्हा ॥१३०॥
वादीविजयाचें लक्षण । सांग तुझ्या मतें कवण । काय तच्छ्रद्धा स्वविश्वासें करणें
खंडण । कीं तर्कें सिद्धान्त पटविणें तया ॥१३१॥
प्रथम पक्ष अंगिकारिता । तरी वादीयासी नाहीं पृथकता ।
तया हातीं श्रद्धाचि देता । मग तो पृथक् सर्वथा होईल कैसा ॥१३२॥
तर्क तंव सिद्धान्तरहित । हें आतांचि आलो प्रतिपादित ।
वादी म्हणे जेणें मुखनिरोध होत । वादीजय त्या नांव ॥१३३॥
सिद्धान्ती म्हणे मज नये कांहीं । येणेंहि वादीमुखनिरोध पाही ।
किंवा चपेटा देऊनी लवलाही । होऊं शके ॥१३४॥

''स्वामी म्हणे शिष्यासी । आतां संदेह धरिसी ।
तरी श्रीमुखांतरी खासी । निश्चयेसी ॥१५॥''
(नित्यनैमित्तिकविधिसंग्रहसोपान अंतर्भाव प्र. स. ५)
ऐसें समर्थ बोलिले विशेष । आणि व्याकरण महाभाष्यांतहि हा दंश । (य११पू.२०२)
मग वेदागमास । वरिष्ठ तुम्ही कां म्हणता ॥१३५॥
सिद्धान्तीं म्हणे ऐक उत्तर । वेदावरी आक्षेप काढिती इतर ।
वेदात आक्षेप नाहीं कवणावर । यालागीं वेद अनादि अन्य सादि ॥१३६॥
किंवा वेद बोधी अज्ञात । इतर मतें बोधिती ज्ञात ।
यालागीं वेदागम निश्चित । वरिष्ठ आम्ही म्हणो ॥१३७॥
वादी म्हणे असत् नाहीं जगत्कारण । इत्यादि श्रुतींत बौद्धखंडण ।
सिद्धान्ती म्हणे हें सामान्यजनशंकानिराकरण ।
यास्तव बौद्धानंतर वेद न होती ॥१३८॥
एरवी तरी आम्हाप्रती । अनुभव प्रमाण निश्चिती ।
साधनाविषयीं पुरती । श्रद्धाचि प्रमाण ॥१३९॥
वादी म्हणे तरी वेदान्तीं । ज्ञानार्थ विचार कां सांगती ।
सिद्धान्ती म्हणे त्या विचारार्थहि श्रुती । आहेत म्हणोनी ॥१४०॥
आगम कर्मकाण्डमात्रचि असतां । तरी तर्कें ज्ञान घ्यावे हें कोणीच न म्हणता।
जे वचनाविण विवेकसिद्धता । अहमध्यस्ता(४३) नाहीं म्हणोनी ॥१४१॥
आणिकहि तर्काप्रति । आहे देवांगण(४४) स्थिति ।
तर्क मानला जिये मतीं । तेहि म्हणती तो अयथार्थानुभव(४५) ॥१४२॥
वादी म्हणे जंव आघवी श्रद्धा । मग कोणीच न प्रवर्ते वादा ।
तरी संप्रदायभेदा । कां प्रवर्तला तुम्हीं । ॥१४३॥
सिद्धान्ती म्हणे ऐक उत्तर । सर्वचि राहती पृथ्वीवर ।
मग तूं आपले वेगळे घर । बांधले कासया ॥१४४॥
वेदान्ती प्रक्रिया अनंत । त्यांतूनि जें जें जेव्हां सुलभ भासत ।
तेव्हां तो संप्रदाय निपजत । ऐसे बहुत होतु कां सुखें ॥१४५॥
तंव वादी म्हणे तैसे नाहीं । तुम्हीं मधुराद्वैत बोलिला लवलाही ।
जें कोणेंचि कहीं । अप्रतिष्ठित(४६) ॥१४६॥

सिद्धान्ती म्हणे न करितां विचार । तूं बोलिलासी निरंकुशवक्त्र[४७]।
पूर्ववेदान्तीकृत विशेषज्ञानविचार । अवशिष्ठ भक्तिविचार मी केला ॥१४७॥
वादी म्हणे मायिक भगवद्देह खंडन । तुम्ही केले तर्ककरून ।
सिद्धान्ति म्हणे मानोनी ऐतिह्य[४८]प्रमाण । बोलिलो श्रद्धेनें हे कळो दे ॥१४८॥
वादी म्हणे श्रद्धेच्या ठायीं । अवघेचि सर्वज्ञ होतील पाही ।
तो तंव आम्हासी अनुभव नाहीं । यालागीं तर्क योग्य वाटे ॥१४९॥
सिद्धान्ती म्हणे ऐसें नाहीं । सर्वज्ञ पाहिजे तर्काचिये ठायीं ।
हेतु कालत्रयीं व्यभिचारी नाहीं । हें सांगावया ॥१५०॥ (य११पू.२०३)
तो तंव आह्मासी नाहीं अनुभव । यालागीं श्रद्धाचि वाटे ठेव ।
कीं सुखाची इच्छा आहे स्वयमेव । आणि सुख तंव जगीं न दिसे म्हणुनी ॥१५१॥
वादी म्हणे श्रद्धेच्या ठायीं । वरिष्ठ कोणीच राहणार नाहीं । सिद्धान्ती म्हणे वरिष्ठ तर्कीच नाहीं । सर्वा सम अभिमान पाही म्हणोनिया ॥१५२॥
वादी म्हणे श्रद्धा सांगे अलौकिकासी[४९] । तें तर्केविण न रुचे मनासी ।
सिद्धान्ती म्हणे तूं जगद्वैचित्र्य प्रतिषेधिसी । तुजसी बोलावे कवणें ॥१५३॥
वादीचें अंतःकरण निर्मळ । तत्काळ होऊनी श्रद्धाशीळ ।
म्हणे महाराज भेद सकळ । मज सांगावा वाद न लगे ॥१५४॥
मग सिद्धान्ती म्हणे तूं करी श्रवण । परोक्ष[५०]श्रद्धा उपजवी जें वचन ।
ते उपासनाश्रद्धा[५१] जाण । आणि अपरोक्ष वचन उपजवी ज्ञानश्रद्धा ॥१५५॥
अपरोक्ष वचन स्वानुभवपर । अध्यासनिवर्तक निर्धार ।
यालागीं त्यातें म्हणती विचार । परी तर्क मात्र तो नव्हे ॥१५६॥
स्वशारीरक चतुःसूत्रीभाष्यांत । शंकराचार्य वदती भगवंत ।
कीं येथ अनुमान नाहीं उपन्यस्त । उनपिषत्पुष्पें गुंफनार्थ सूत्रें हीं ॥१५७॥
श्रद्धेनेंचि श्रवण । पुढें बाध्याबाध्यानुभव[५२] श्रद्धेनें मनन ।
या मननाचाचि पर्याय जाण । तर्क शब्द ॥१५८॥
तेंचि दृढ श्रद्धा निदिध्यासन । साक्षात्कार तीव्रपण ।
परिपक्क निदिध्यासा कारण । समाधि म्हणती विद्यारण्य ॥१५९॥
कोणाचेहि मनन आहे तोंवरी । स्वश्रद्धेंत आणो शकेल विचारी ।
निदिध्यासन श्रद्धा जाहलिया निर्धारी । मग कोठुनिहि कोणी परतेना ॥१६०॥



कोणाची श्रद्धा कोणती । ईश्वरीं मिळे अंतीं ।
हें आम्ही बोलिलों कीं व्यापकीं मिळती । परिच्छिन्न वस्तु म्हणोनी ॥१६१॥
म्हणोनी उपासनेंत गुरुवचनी । विश्वास ठेवावा प्रीति करूनी ।
ज्ञानांत तोचि आत्मविश्वास होऊनी । भक्तींत पुढती गुरुविश्वास होये ॥१६२॥
एवं आघवीच श्रद्धा । तुज बोधिली प्रबुद्धा ।
सद्गुरुपूजनीं संप्रदायसिद्धा । हेंचि एक ॥१६३॥
एक महाभारतांत श्लोक आहे । त्याचाहि अर्थ ऐसाचि होये ।
कीं तर्काहूनि श्रद्धा लवलाहे । वरिष्ठ कीरू ॥१६४॥
तर्कोऽप्रष्ठिः श्रुतयो विभिन्नाः नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थः ॥ (भारत वनपर्व अ. )
(य११पू.२०४)येथ तर्क अप्रतिष्ठ सांगोन । श्रुतिस्मृतिहि बोलिल्या भिन्न भिन्न ।
तथापि बोलिले की महाजन । जातील तो पंथ धरावा ॥१६५॥
तरी ऋषी काय न होती महाजन । कीं वेदापरीस वरिष्ठ कोण ।
म्हणोनिया श्लोकाचा अर्थ कीं तर्के करून । श्रुतिस्मृतिवचन साधो नये ॥१६६॥
गुरुसंप्रदायरीति । समजोनी घ्याव्या श्रुतिस्मृति ।
जरी दैवें पडला अन्य पंथीं । तरी भगवदीय[५३] भगवंतीं अंतीं मिळे ॥१६७॥
यास्तव आप्तवचनीं । दृढ श्रद्धा ठेवोनी ।
आळंदीवल्लभभजनीं । वर्तावें सुखें ॥१६८॥
तर्के वाद करोनी बहु वेळा । मजहि आला कंटाळा ।
म्हणोनी श्रीगुरुनाममाळा । जपतो भावें मौनेंचि ॥१६९॥
उचित अनुचित कांहीं । ते जाणती ज्ञानराज आई ।
तुकाराम वाक्यानुसार लवलाही । वर्तणें मज ॥१७०॥
श्रीज्ञानेश्वर मायमाऊली । तियेची सर्वदां वंदोनी पाऊली ।
कविता कमळमाळ अर्पोनि लाविली । ज्ञानदेवभजनींच वृत्ति ॥१७१॥
॥ हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे नाना छंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे श्रद्धातत्त्वनिदर्शनं नाम षष्ठं कुसुमम् ॥

०००

## अध्याय ६ टीपा

(१)संसार हाच कोणी हत्ती त्याचा सिंहाप्रमाणे नाश करणारा (२)बोळवण (३)निर्विघ्न (४)दोष दाखविणे (५)सामान्य ज्ञान करून देणारे (६)सीमा (७)इंद्रियाचा दोष (८)उत्पन्न होतो (९)दडपली गेली तर (१०)सारखेपणात (११)मानणे (१२)अनुमानाला दोषी ठरविणारे सदोष हेतू (१३)प्रतिकूल दाखविणे (१४)लक्षण व प्रमाण ह्याच्या योगाने (१५)तर्काने कर्म करीत गेल्यास संशय वाढून कर्म वाढते व कर्म वाढल्याने प्रकृति बिघडते (१६)निश्चित स्वरूप (१७)अडथळा करीत नाहीत (१८)दैवाचा आघात समजून (१९)देवावरची निष्ठा (२०) दैवच नाही अशी (२१)अयोग्य नाही अशी प्रतीति (२२)दैव शब्द प्रचारात असल्याखेरीज (२३)दैवच नाही ही समजूत श्रद्धेला आधधार होऊ शकत नाही (२४)आदि नाही अशी (२५)मान्य नसलेली (२६)शास्तरूपी वाऍच्या उपदेशाने (२७)अमक्या साधनाचे अमुक फल किंवा अमुक फळ अमक्या साधनाने प्रप्त होते यांचे निर्भ्रम ज्ञान (२८)होऊच शकत नाही (२९)शिष्ट जरी निर्भ्रम ज्ञानी असतात (३०)शास्त्राच्या परतंत्र (३१)तर्काशी तुलना करून पाहतां (३२)परमेश्वराहून निराळ्या देवता (३३)ईश्वराहून इतर गौण देवता उपास्य असता (३४)मायेपासून झालेला (३५)सामान्य चैतन्य स्वरूपाने (३६)यमलोक (३७)असद्रूपता (३८)वेदान्तपद्धतीचे (३९) आत्मनाशातून (४०)पुनरुत्पत्ती (४१)खोटा अनुभव (४२)शास्त्रास (४३)कल्पित अशा अहंकारला (४४)पंतिज्ञा (४५)खोटा अनुभव (४६)न स्थापलेले (४७)बेताल (४८)पुराणेतिहास (४९)अतिंद्रियाचे ग्रहण (५०)अतिंद्रिय वस्तूंविषयी निर्धार (५१)उपासनेची श्रद्धा (५२)हे खोटे व हे खरे, या अनुभवाने झालेला निर्धार त्याने (५३)भगवन्निष्ठेचा

०००

अध्याय ७ वा

# ॥ आप्तनिर्णय ॥

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

जय जय सद्गुरु करुणाघना । जय जय सद्गुरु मनमोहना ।
जय जय सद्गुरु कल्याणनिधाना । आळंदीपते ॥१॥
जय जय सद्गुरु इंद्राणीतीरवासा । जय जय सद्गुरो मन्मानसराजहंसा ।
जय जय सद्गुरो हृदयविलासा । पूर्ण परेशा आळंदीपते ॥२॥
तूं माय भेटलिया कृपामूर्ति । मग आणिकांची चाड न राहे चित्तीं ।
सकळ देव तुजवरुती । ओवाळुनी सांडावे ॥३॥
माझी पुरवावी आर्ति । पुढें वक्ता होवोनी ग्रंथीं ।
भक्तवत्सला कृपामूर्ति । सिद्धस्फूर्ति असो द्या ॥४॥
तंव श्रीमंत म्हणती आपण । हें पहिलेंचि बोलिलो तुजकारण ।
आतां वारंवार याचन । पाहिजे कासया ॥५॥
मग मी म्हणे हो ऐसे । कल्पद्रुमा विसरूनी आपैसे । पुढती पुढती याचितसे ।
जे मी स्वबुद्धिविश्वासे नाहीं म्हणोनी ॥६॥ (य११पू.२०५)
तूं भेटलिया मायबाप । अनायासे पुरती संकल्प ।
म्हणोनी उपसाहत । वाग्जल्प ऐकोत श्रोते ॥७॥
मग शिष्य विनवी कर जोडोनी । मागा बोलिले कैवल्यदानी ।
विश्वास ठेवावा आप्तवाणीं । तरी आप्त स्वामीनीं उपदेशिजे(१) ॥८॥
मायबाप म्हणावे आप्त । तंव ते संसारीं बुडविती समस्त ।
श्रीगुरु म्हणती सावचित्त । ऐके आप्त कवण तो ॥९॥
जो यथार्थ वक्ता आणि हितकर्ता । जो सर्वज्ञ आणि सौख्यदाता ।
तया वचनीं विश्वास ठेविता । मोक्ष सर्वथा पाया पडे ॥१०॥
तैं प्रतिवादी म्हणे । ऐसे काय बोलणें ।
सर्वज्ञ कहीं कोणें । देखिला नाही ॥११॥
प्रत्यक्ष प्रमाणें करून । सर्वज्ञत्व जाणेल कवण ।
की कालत्रयी जाणावया कारण । समर्थ नाहीं म्हणूनी ॥१२॥

अनुमान प्रमाणें निश्चिती । सर्वज्ञता न कळे चित्तीं ।
एकाहूनि एकाप्रति । अधिक ज्ञान जरी म्हणावे ॥१३॥
तरी येणें अनुमानें । सापेक्षता ज्ञानाकारणें ।
आतां जरी शाब्द प्रमाणें । सर्वज्ञत्वसिद्धि ॥१४॥
तरी शाब्दें सिद्ध सर्वज्ञता । आणि सर्वज्ञवचनें शब्दा प्रमाणता ।
हा अन्योन्याश्रय दोष तत्वता । आणि उपमानादिका असिद्धता प्रवृत्त्यभावें(२)
॥१५॥ तेव्हां सिद्धान्ती म्हणे । तुझी खोडी न जाय मेल्याविणें ।
श्रद्धा मानूनहि तर्काकारणें । आश्रयो घेसी ॥१६॥
तरी तर्केंहि करून । आम्ही सर्वज्ञत्वाचें करूं स्थापन ।
आतां तुजचि करितो प्रश्न । याचें उत्तर आधीं देई ॥१७॥
सर्व आणि ज्ञाता निश्चिती । ऐशी दोन पदें सर्वज्ञतेंत दिसती ।
त्यांत सर्व पदाचा अर्थ तुजप्रति । आधी समजला पाहिजे ॥१८॥
तूं तंव आहेस अल्पमती । तरी सर्व शब्दार्थ कैसा कळेल तुजप्रति ।
आणि सर्व शब्दार्थ न कळतां निश्चिती । सर्वज्ञत्वप्रतिषेध घडेना ॥१९॥
जरी सर्व शब्दार्थ तुज कळला । तरी तूंचि सर्वज्ञ जाहला ।
मग जो सर्वज्ञ असेल तयाला । अपराध कवण ॥२०॥
जरी म्हणशील नैय्यायिक रीति । कीं देखिलिया घटव्यक्ति ।
सर्व घटस्थ घटत्व जाति । प्रत्यक्ष होय अलौकिक संन्निकर्षें(३) ॥२१॥
तरी आमचेंहि हें उत्तर । कीं जयाचें आवरणरहित(४) अंतर ।
तो सर्व जाणे परिकर । हें प्रत्यक्षें सर्वज्ञतासिद्धि ॥२२॥
आतां एकापरीस एकाचें ज्ञान । अधिक म्हणोनी अवधि(५) पूर्ण ।
सर्वज्ञता सिद्ध होय हें अनुमान । प्रमाण आहे ॥२३॥ (य११पू.२०६)
तुवां दोष आणिला होता । येणें अनुमानें कळे ज्ञानसापेक्षता ।
परी तर्कसंग्रहा इतकाही न्याय न पाहता । अनुमानादि वार्ता वदो नये ॥२४॥
अनुमानाचें ऐसें लक्षण । कीं हेतु साध्य(६) भिन्न भिन्न ।
धूमास्तव पर्वत धूमवान् । कोणी अनुमान न करी ऐसें ॥२५॥
दृश्य हेतुवरूनी । अदृश्य साध्य(७) घडे अनुमानीं । आम्हीं जगज्ज्ञानसापेक्षत्व(८)
हेतु देऊनी । सर्वज्ञत्व साध्य अनुमानीं बोलिलो ॥२६॥

त्वां त्या सापेक्ष ज्ञानावरून । सापेक्षचि काढिलें साध्य ज्ञान ।
यालागीं तूं आपलें अनुमान । हास्यास्पद जाण विकलत्वें(९) ॥२७॥
कार्यामाजीं(१०) अल्पज्ञता । तरी कारणीं पाहिजे सर्वज्ञता ।
एरवी नाना प्राणिया तत्वतां । सोपयोगी(११) साधनता देईल कवण ॥२८॥
केवल जडें हें कार्य केलें । तरी जडचि सर्वज्ञ झाले ।
परी सर्वज्ञतेविण कार्य वहिलें । एवढें जगत चालेना ॥२९॥
आतां सर्वज्ञ म्हणशील जडाकारण । तरी जड नांवेंचि झालें भगवद्भजन ।
जैसे शिळा शिळा जपोन । गेली तरोन शिळाबाई ॥३०॥
एवं प्रत्यक्ष अनुमानें पाहतां । सिद्धचि आहे सर्वज्ञता ।
तंव वादी म्हणे माझीहि सर्वज्ञता । सिद्ध केली पूर्वीं तुम्ही ॥३१॥
सिद्धान्ती म्हणे सामान्यत्वें करून । तूं सर्वज्ञ आहेसी पूर्ण ।
परी विशेष सर्वज्ञता तुज कारण । नाहीं आवरणबद्ध म्हणोनी ॥३२॥
ते सामान्य सर्वज्ञता । आम्हीं प्रत्यक्ष प्रमाणें साधिली तत्वता ।
आणि जगत्सापेक्षज्ञान हेतू देता । साधिली विशेष सर्वज्ञता अनुमानें ॥३३॥
आतां शाब्द प्रमाणावरी । अन्योन्याश्रयता ये खरी ।
परी ते प्रमाणसिद्ध म्हणोनी निर्धारी । अंगीकारी तर्काविण ॥३४॥
तूं जन्मला जेव्हा होता । तैं बाळपणीं तुझा पिता ।
दूरदेशीं गेला तत्वतां । आणि माता गेली मरोनी ॥३५॥
मग तूं होवोनी हीनदीन । हिंडत असतां वनोवन ।
तुझ्या पित्यासी वार्ता कळोन । भेटला येवोन एकान्तीं तुज ॥३६॥
म्हणे मी तुझा जन्मदाता । माझे नांव विप्रपाता ।
तैं हर्ष झाला तुझिया चित्ता । परी अन्योन्याश्रय होता तेथहि ॥३७॥
तुझा पिता होता म्हणून । मी पिता हें बोलिला वचन ।
आणि मी तुझा पिता हें ऐकोनी वचन । त्वां पिता हा निश्चय केला कीं ॥३८॥
तैसा भगवंत कृपानिधि । पाहोनी जीवांची अल्पबुद्धि ।
आपुली ओळख पुराणीं वेदीं । सांगे यास्तव सर्वज्ञ तो ॥३९॥(य११पू.२०७)
वादी म्हणे भलता कोणी । मज पिता सांगता येवोनी ।
तरी मी झकलो असतो ते क्षणीं । तेवि शाब्दप्रमाणीं येथ दोषू ॥४०॥

सिद्धान्ती म्हणे झकावया कारण । तुझिया बुद्धीचें अल्पपण ।
येथ काय करावें कोण । परी तैसा झकविता सर्वज्ञ नोहे ॥४१॥
जगांत पुरुष अनेक । एक साळसूद एक ठक ।
परी जगत्कारण आघवे  एक । तेथ भेदाभावास्तव[१२] ठक दुसरा नसे ॥४२॥
जगत्कारण ते आप्तकाम[१३] । यालागीं ठकविणारावरी नाहीं प्रेम ।
म्हणोनी सर्वज्ञ पुरुषोत्तम । तोचि आप्त आम्ही म्हणो ॥४३॥
सर्वज्ञ तंव एक । नारायणचि देख ।
वादी म्हणे एकाहूनि अधिक । राहूं शकती सर्वज्ञ ॥४४॥
सिद्धान्ती म्हणे रे वादी । शपथ तुझी चळली बुद्धि ।
दोनहि सर्वज्ञ मानतां तयामधीं । एकमेका जाणणें कीं नाहीं ॥४५॥
सर्व शब्दार्थ म्हणोन । सर्व ज्ञानाच्या विषया कारण ।
असलें पाहिजे वेगळेपण । तैं अव्यापकपण सर्वज्ञा ॥४६॥
अव्यापक सर्वज्ञ होईल जरी । अल्प द्रव्यांत महद्गुण तरी ।
राहिला असे कवणे परी । भिन्न कीं अभिन्न ॥४७॥
अभिन्न बोंलतां असिद्ध कल्पना । भिन्न म्हणतां द्रव्यास असर्वज्ञपणा ।
सर्वज्ञतेस देतां द्रव्यपणा । तरी व्यापकपणा सहजचि ॥४८॥
व्यापकपणा निवटी द्वैत । दोन व्यापक म्हणता संकर[१४] होत ।
भेदाभेदीं विरोध येत । यालागीं एक भगवंतचि सर्वज्ञ ॥४९॥
सर्वज्ञता जे मुक्ताप्रति । ते झालिया भगवद्भावापत्ति ।
म्हणोनी निरपेक्ष आप्त राधापति । येर आप्त सापेक्ष ॥५०॥
तैं वादी म्हणे अहो ऐका । तुम्हीं आपुलेंचि बोलणें देखा ।
सर्वज्ञ आणि जगद्धितकारका । सत्यवादका आप्त म्हणता ॥५१॥
ईश्वर सर्वज्ञ जरी । जगद्धितकर्ता नोहे तरी ।
सिद्धान्ती म्हणे श्रवण करी । सावधान उत्तरातें ॥५२॥
तो सर्वज्ञ दयाघन । आमुचें दुःख करावया हरण ।
स्वयें वेद बोलिला आपण । हित याहून कोण कीजे ॥५३॥
तैं वादी म्हणे नाना मत । म्लेच्छादि ऐसेचि वदती समस्त ।
कीं ईश्वरकृत आमुचे ग्रंथ । तेथ प्रमाण कोणाप्रत म्हणावें ॥५४॥



सिद्धान्ती म्हणे जीवासी । जें अज्ञात असे विशेषीं ।
तें सांगतां प्रमाणता शब्दासी । आणि ज्ञात सांगता अनुवादक शब्दू ॥५५॥
इतर धर्म मिया पाहता । तेथ ज्ञात[१५] गोष्टीचि असती बहुता ।
वेदीं जीवासी अज्ञाता । उपदेशिल्या गोष्टी ॥५६॥ (य११पू.२०८)
म्हणोनी वेदचि ईश्वरप्रणीत । तेचि प्रमाण समस्त ।
किंवा म्लेच्छादिकांचेहि ग्रंथ । ईश्वरकृत जरी झाले ॥५७॥
तरी अधिकारी पाहून । उपदेशिता नारायण ।
यास्तव आम्हां कारण । प्रमाण वेद पुराणचि ॥५८॥
मागा श्रद्धा निरूपिता । सूतसंहितोक्ति प्रमाण देता ।
तेथचि दाविले तत्वतां । कीं ईश्वर निर्माता सर्व धर्मा ॥५९॥
तंव वादी म्हणे येणें रीति । विप्रलिप्सा[१६] दिसे भगवंतीं ।
व्यर्थ जीव चाळविले नाना मतीं । यास्तव जगद्धितीं अयोग्य तो ॥६०॥
म्हणोनिच नाहीं सत्य वक्ता । यालागीं न घडेचि आप्तता ।
सिद्धान्ती म्हणे अधिकारी तत्वता । उपदेशू भगवंता करणें तैसा ॥६१॥
माय जरी जाहली कृपावंत । तरी तान्हिया बाळका अन्न कां न देत ।
पचे तेच पाजित । स्तन्य जननी ॥६२॥
वादी म्हणे भगवंत । तुमचा सर्व शक्तिमंत ।
माता राहे असमर्थ । म्हणोनी बाळा जेववूं न शके ॥६३॥
सिद्धान्ती म्हणे सर्वशक्ति । जरी हरि वाटे तुजप्रति ।
तरी मग ऐसाचि कां उपदेशी जनाप्रति । हें म्हणणार त्याजप्रति तूं कोण ॥६४॥
वादी म्हणें दयावंत । आणि सर्व शक्तिमंत ।
यास्तव अधिकाराविण निश्चित । तारक आम्हासी तो व्हावा ॥६५॥
सिद्धान्ती म्हणे दयेनें बांधला । तरी तो सर्वशक्ति कैसा जाहला ।
जरी दयेंतूनि सुटावयाला । सामर्थ्य नाहीं तयाते ॥६६॥
वादी म्हणे ऐसी रीति । एक झाले उन्मत्त आणि सर्वशक्ति ।
सिद्धान्ती म्हणे तुझा अर्थ फळो तुजप्रति । आम्हांप्रति काय पुससी ॥६७॥
तैं वादी म्हणे दया आणि सर्वशक्तिमत्ता । याते परस्पर विरोधिता ।
म्हणोनी तैसा ईश्वरचि न मानिता । तरी इष्टता मजप्रति ॥६८॥

सिद्धान्ती म्हणे हे दोष येती । जो म्हणे निमित्तकारण श्रीपति ।
आमुच्या मतें भगवंतीं । निमित्तता[१७] आणि उपादानता[१८] ॥६९॥
व्यष्टिसमष्टिवृत्त्याश्रयें[१९] । हरिवरी तो तो आरोप होये ।
हें मागां निरोपिलेंचि आहे । दयालुतास्पष्टीकरणीं । ७०॥
यालागीं आप्त गोविंद । येथ शंकाचि अप्रसिद्ध ।
तयाचें वचन पुराण वेद । तेथ विश्वास असो द्यावा॥७१॥
आणिकहि उपपत्ति । एक सांगो तुजप्रति ।
रागद्वेषरहित जे होती । ते असत्य न बोलती सर्वथा ॥७२॥ (य११पू.२०९)
जैसें दान करावें हीं आहेत वचनें । तैसे प्रतिग्रह घेऊं नयेत हींहि वचनें ।
यालागीं  लोभमूळ आप्ताकारणें । म्हणतां नये ॥७३॥
किंवा ज्या क्रियेचा लाभ नाहीं । ऐसी करावया पाहीं ।
दोघेचि लाविती लवलाही । उन्मत्त किंवा दिव्यदर्शी ॥७४॥
शिवातें बिल्वचि बहावे । केशवा तुलसीनेंचि पूजावे ।
गणपती दूर्वाचि भावे । मारोतीस वाहावी अर्कपुष्पें ॥७५॥
इत्यादि निरर्थक क्रिया । किमर्थ लाविल्या करावया ।
येथ लोभालोभचर्या[२०] । किंचितहि दिसेना ॥७६॥
म्हणोनी उपदेशकाप्रति । उन्मत्त म्हणे जरी चित्तीं ।
तरी व्यवस्थित विधिनिषेधयुक्ति । वेडियाप्रति स्फुरती ना ॥७७॥
जो उपदेशक शिवातें बेल वाहा म्हणत । तोचि तुलसी वाहूं नये हेंहि सांगत ।
यालागीं तो लोभी ना उन्मत्त । दिव्यदर्शी म्हणोनी आप्त म्हणावा ॥७८॥
सर्वदिव्यदर्शी भगवंत । यालागीं तोचि निरपेक्ष आप्त ।
इतर तद्वचनसापेक्ष आप्त । अबाधित सिद्धान्त हा ॥७९॥
म्हणोनी आप्ताचें वचन । घ्यावें हेत्वादिकीं[२१] परिक्षून ।
ऐसें महाभारतीं प्रमाण । बोलिलें आहे ॥८०॥
न्यायतंत्राण्यनेकानि तैस्तैरुक्तानि वादिभिः ।
हेत्वागमसदाचारैर्यदुक्तं तदुपास्यताम् ॥२२॥ (महाभारत शा. मो. अ. ३७)
नाना वादी नाना युक्ति । नाना तंत्र जरी सांगती ।
तरी श्रुतियुक्ति आणि महंतानुभूति । जेथ ती रीति ग्रहण कीजे ॥८१॥

केवल तर्क तंव सर्वथा अप्रमाण । केवळ आगम जरी सर्वथा प्रमाण । तरी अर्थ
कळेना मंदमती कारण । यालागीं हेत्वागम पद श्लोकीं असे ॥८२॥
आतां भलते भलताहि हेतु दाविती । भलताहि आगमार्थ सांगती ।
यालागी सदाचारहि प्रीति । प्रमाण घ्यावा ॥८३॥
यांतून हेतु वेगळा करून । आगम आणि सदाचरण ।
उपासिता येती विश्वासान । मग हेतु कासया जरी म्हणेल वादी ॥८४॥
तरी ऐकावें उत्तर । एवढा ज्याचा विश्वास तीव्र ।
तयाचा शपथचि होईल उद्धार । परी पामर हे नायके ॥८५॥
मातीचा करोनियां द्रोण । धनुर्विद्या शिकला एकलव्य व्याध आपण ।
हे महाभारतीं आहे प्रमाण । आणि तातही वदले ॥८६॥ (य११पू.२१०)
स तु द्रोणस्य शिरसा पादौ गृह्य परंतपः ॥
अरण्यमनुसंप्राप्य कृत्वा द्रोणं महीमयम् ॥३३॥
तस्मिन्नाचार्यवृत्तिं च परमामास्थितस्तदा ॥
इष्वस्त्रे योगमातस्थे परं नियममास्थितः ॥३४॥
परया श्रद्धयापेतो योगेन परमेण च ॥
विमोक्षादानसंधाने लघुत्वं परमाप सः ॥३५॥ (भारत आदिपर्व अ.१३२)
श्रीगुरूचेनि नांवें माती । डोंगरीं जयापाशीं होती ।
तेणें कोळिये त्रिजगती । एकवद केली ॥१७३१॥ (ज्ञानेश्वरी अ. १८)
प्रल्हादाच्या श्रद्धेसाठीं । स्तंभांतूनि निघाला जगजेठी ।
परी पामराची नवल गोष्टी । श्लोकीं त्यासाठीं हेतु पद ॥८७॥
एक वेळ ठकलया दैवें । जगीं ठकचि आहेत म्हणती आघवे ।
परी एक वेळ अजीर्ण झालिया स्वभावें । भोजन मात्र न सोडिती ॥८८॥
येथहि एक स्फुट प्रमाण । तेंहि ऐकोत श्रोते सज्जन ।
मूर्ख लोकचि एकावरून । अवघियास लाविती दोष ॥८९॥
दुर्जनदूषितमनसां पुंसां सुजनेऽपि नैव विश्वासः।
पाणौ पायसदग्धे तक्रं फूत्कृत्य पामरः पिबति ॥
उष्ण दुग्धें पोळल्या हाती । मूर्ख ताकहि फुंकोनी पिती ।
तेवि दुर्जना कडोनि ठकलिया जाती । मग साधूवरीहि न ठेविती विश्वासू ॥९०॥

परी शहाणे जे स्वभावें । ते म्हणती मागें ठकलों दैवे ।
उताविळ न करोनी बरवे । विश्वासे साधुसेवे विनटती ॥९१॥
तंव वादी म्हणे ईश्वरावरुती । श्रद्धा राहील भलतिया रीति ।
परी गुरु तंव मनुष्य असती । ते आप्त न होती म्हणोनी श्रद्धा न राहे ॥९२॥
तंव सिद्धान्ती म्हणे क्षोभोनी । महा नीच तूं न वदे वाणी ।
तो तिहीं लोकीं पापखाणी । जो श्रीगुरुस मनीं मनुष्य मानी ॥९३॥
ईश्वरादि आघवे पदार्थ । ज्याच्या वचनें मिथ्या समस्त ।
तो परब्रह्म श्रीगुरु कृपावंत । म्हणता अनाप्त झडो जिव्हा ॥९४॥
गुरुसंप्रदाय रीति । प्रतिमेंत प्रगटे श्रीपति ।
आप्त न म्हणता तयाप्रति । तरी आजहि यमाहातीं सांपडला ॥९५॥
(य११पू.२११) असो तुझें तूं जाणे पातक । परी तुझ्या प्रश्नें चळतील आन लोक।
यालागी उत्तर देवोनी सम्यक । मग सचैल स्नान करूं ॥९६॥
ईश्वरभिन्न जो द्रोण । तयावरतीहि श्रद्धा ठेवोन ।
व्याध विद्या शिकला हें उदाहरण । पूर्वीच दिधलें तुजलागीं ॥९७॥
''श्रीगुरुचेनि नांवें माती । डोंगरीं जयापाशीं होती ।
तेणें कोळिये त्रिजगती । एकवद केली ''॥१७३१॥ (ज्ञानेश्वरी अ. १८)
मागें निर्देशिली तातोक्ति । परी इये स्थानीं घेतली ती ।
गुरुपद प्रथम चरणीं निश्चिती । म्हणोनि विषयानुरोधें ॥९८॥
संसाराचें कारण । जीवें भाविला नारायण ।
तेवि आपुले व्हावया तारण । भाविला गुरु ॥९९॥
तयांवरीच श्रद्धा न ठेवितां । तरी आपुल्याचि भावनेप्रति मृदुता ।
ऐसें करणें तरी आम्हांस वृथा । पुसावें कां ॥१००॥
वादी म्हणे मानलें मजप्रति । कीं ईश्वराहूनि गुरु पूज्य होती ।
परी हें घडो शके अद्वैतमतीं । द्वैतीयादिकीं गुरुभक्ति कैसी कीजे ॥१०१॥
तैं सिद्धान्ती म्हणती ते द्वैतीच आपण । म्हणती आम्ही नाहीं ईश्वरासमान ।
मग गुरुभक्ति न घडतां शिष्याकारण । तैं आम्हीं काय करावें ॥१०२॥
असो जैसी श्रद्धा दुजियाच्या पोटीं । तैसी तया फळेल शेवटीं ।
आम्ही तंव विचारितां दृष्टिसृष्टि । सद्गुरुपदपुष्टि[२२] आवडे ॥१०३॥
यालागीं परोक्ष ईश्वर । कीं अपरोक्ष श्रीगुरु करुणाकर ।
आप्त हा आमुचा निर्धार । तेथ विश्वास हें मत आमुचें ॥१०४॥
सकळ आप्ता मुगुटमणी । माझी ज्ञानेश्वर जननी ।
जियेनी अवलोकितां कृपानयनीं । मी नीचहि आप्तपणीं विराजे ॥१०५॥
ऋष्यार्यम्लेच्छा कारण । तें सलक्षण[२३] असतां आप्तत्व समान ।
हें वदले मुनि वात्सायन । न्यायभाष्यांत प्रथमाध्यायीं ॥१०६॥
परी त्या म्लेच्छाहूनि नीच योनी । रेडा आप्त केला श्रुति वदवोनि वाणी ।
ती माझी ज्ञानेश्वर जननी । मज ठेविल चरणी विश्वास हां ॥१०७॥
आतां या विश्वासापाठीं । वाळो मज आघवी सृष्टि ।
परी ज्ञानराजचरणामृतपुष्टि । सर्वांगे गोमटी लेणें मज ॥१०८॥
(य११पू.२१२) श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदोनी पाऊली ।
कविता कमलमाळ अर्पिली । सप्रेम चरणीं ॥१०९॥

॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे नानाछंदबद्धे
गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे आप्तनिर्णयो
नाम सप्तमं कुसुमम् ॥
॥श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ॥

०००

**अध्याय ७ टीपा**

(१)सांगावा (२)लागू होत नाही म्हणून (३)मानसप्रत्यक्षाने (४)अज्ञानरहित (५)समाप्ती (६)हेतु वसाध्य निरनिराळे असतात (७)सिद्ध करावयाचे (८)जगतामध्ये एकापेक्षा एक अधिक ज्ञानी दिसतो, हा हेतु देऊन (९)जे सिद्ध करावयाचे तेच पूर्ण होत नसल्यामुळे (१०)जगांत (११)अमुक फलाकरिता अमुक साधन असे कोण ठरवील? (१२)भेद नसल्यामुळे (१३)कांहीहि ज्याला मिळवावयाचे नाही असा (१४)मिश्रण (१५)माहित असलेल्या गोष्टी सांगणारा ग्रंथ नुसता अनुवाद करणारा होतो (१६)फसवणुक (१७) निमित्तकारणता (१८)उपादानकारणता (१९)एका वृत्तीचा किंवा संपूर्ण वृत्तींचा आश्रय या दृष्टीने (२०)लोभी किंवा निर्लोभी वागणुक (२१)हेतु इ.अनुमानाच्या अंगाने (२२)श्रीगुरुचरणप्रेम (२३)त्यांचे ठिकाणी आप्ताचे लक्षण असल्यास

०००

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय ८ वा.

# ॥ आप्तवचन निर्णय ॥

जय जय सद्गुरु सच्चिदानंदा । जय जय सद्गुरु परम अभेदा ।
जय जय सद्गुरु पूर्णबोधा । आळंदीपते ॥१॥
सजातीय विजातीय स्वगत । हे तिहीं काळीं तुझे ठायीं असत ।
आणि काळहि कल्पित । तूं एक म्हणोनी ॥२॥
यालागीं तुज माते । वंदितां नुरे वंद्य वंदिते ।
म्हणवोनी अरौते परौते[१] । तुजचि नमो ॥३॥
तुज कायिसया सारखे म्हणावे । तंव तें म्हणणें हारपे आघवें ।
यालागीं न म्हणतां नमावे । जैसी अससी तैसिये तुज ॥४॥
माये तुवा दिधलिया स्फूर्ति । मज निमित्त करोनी मुखें वर्ण निघती ।
तयाचें कवतुक आळंदीपति । तुम्हीचि कीजे ॥५॥
बाळा लेववुनी लेणें । परी कवतुकशोभा मायचि जाणें ।
तेवि शिष्याचेनि तृप्तपणें । तृप्त श्रीगुरु ॥६॥
मागा आप्ताचें लक्षण । ऐकुनी शिष्य करी प्रश्न ।
स्वामी बोलिलेती आप्तवचन । प्रमाण मानावें ॥७॥
तरी आप्तवचन कैशा रीति । कैसी होय तयाची प्रमीती[२] ।
हे आज्ञापितील कृपामूर्ति । मज लेकुरातें ॥८॥
श्रीगुरु म्हणती ऐक । जे प्रत्यक्षानुमाना[३] नव्हे जवळीक ।
तें आप्तवचनें सकळिक । कळे बापा ॥९॥
तैं वादी म्हणे कैसे ते । सिद्धान्ती सांगतां भलते ।
आप्तवचन प्रमाणातें । धर्मबुद्धि अपेक्षा ॥१॥
विप्रलिप्सा करून । जरी असेल आप्ताचें वचन ।
तरी ते सर्वथा अप्रमाण । आणि वृथा उच्चारहि अप्रमाणचि ॥११॥
सिद्धान्ती म्हणे तूं अतिमूर्ख । विप्रलिप्सासंपन्न न होती आप्त । परी आम्ही हेंहि म्हणतो यथार्थ । कीं धर्मबुद्धि आप्तवचन प्रमाण ॥१२॥ (य११पू.२१३)



आतां जबगडद ऐसे जरी । आप्त वचन उच्चारी ।
ते प्रमाणा येती तरी । तत्तद्विषयी ॥१३॥
जबगडद उच्चार निरर्थक असता । तरी व्याकरणीं प्रत्याहारत्वा कैसा येता ।
की एकाक्षरीकोशे तत्वता । अर्थहि घडो शके ॥१४॥
हें असो वितंडेची रीति । केवळ विनोदें बोलिलो तुजप्रति ।
परी आप्त जे सार्थ शब्द बोलती । तेथचि प्रमिति पैं उमटे ॥१५॥
येर जे आप्ताचे उच्चार । ते निरर्थक परी होती मंत्र ।
ऐसे तुलसीदास पवित्र । रामायणीं वदले ॥१६॥
''कलि बिलोकि जगहित हरगिरिजा । साबर मंत्रजाल जिन सिरजा ।
अनमिल आखर अरथ न जापू । प्रकट प्रभाव महेस प्रतापू ॥''

(तुलसीरामायण बालकांड)

मिळालें नसतां अक्षर । अर्थबोध ना जप समग्र ।
तथापि फळ होय हा शंकर । पराक्रमूचि ॥१७॥
मागां श्रद्धा निरूपिता । आम्ही सिद्धान्त केला होता ।
कीं अधिकारीभेदे आगम निर्माता । परमेश्वरूचि ॥१८॥
तयासी विप्रलिप्सा म्हणसी जरी । तें तुझें बोलणें मिथ्या तरी ।
विप्रलिप्सा असतां निर्धारी । शब्दशक्ति न राहे ॥१९॥
आघवियाचि मतांत पाहता । मंत्रशक्ति दिसे तत्वता ।
जरी नसता परमेश्वर निर्माता । तरी शब्दीं अदृष्ट सामर्थ्य कैसे राहते ॥२०॥
वेदामाजीं मंत्र आहाती । ते तंव ठाऊक सकळाप्रति ।
याचिलागीं उच्चारा वरुती । स्वरादि असती तयाच्या ॥२१॥
जे ऋग्वेदी ऱ्हस्व उच्चारिती । यजुर्वेदी ते दीर्घ म्हणती ।
कीं यजुर्वेदी जेथ अकार उच्चारिती । तेथ ऋग्वेदी उच्चारिती आकारु ॥२२॥
इतर वेदी म्हणती षकार । आणि वाजसनीय म्हणती खकार ।
हे नियम सोडोनी करिता उच्चार । तरी अनर्थप्राप्ति तयाते ॥२३॥
यालागीं जैसे तैसे आप्ताचे । उच्चार निष्फळ न होती साचे ।
एवं बौद्धादि आगमींहि मंत्राचे । प्राबल्य दिसे ॥२४॥
पद्मावत्यादि मंत्र । जैनामाजींहि असती परिकर ।

विनाशुद्धि फळती समग्र । हे आर्यहि मालिनीविजयकारादि मानिती ॥२५॥
''बौद्धानां जैनमंत्राणां नैव सिद्धारिशोधनम्''
बौद्ध जैनादिकांच्या मंत्राते । सिद्धारिचक्र नसे निरुते । (य११पू.२१४)
ऐसिया सुंदर शब्दाते । ईश्वराविण कवण निर्मी ॥२६॥
''ॐ श्रीमद्गीर्वाणचक्रस्फुटमुकुटतटीदिव्यमाणिक्यमाला ।
ज्योतिर्ज्वालाकराला स्फुरितमकरिकाघृष्टपादारविन्दे ।
व्याघ्रोरुल्कासहस्त्रज्वलदनलशिखालोलपाशांकुशाढ्ये ।
आँ क्रों ऱ्हीं मंत्ररूपे क्षपितकलिमले रक्ष मां देवि पद्मे ॥१॥''

(मंत्रमहार्णव पद्मावती स्तोत्र )

हें जैनमतें परिकर । पद्मावतीचें स्तोत्र ।
याचे श्लोक सबीज मंत्र । सव्विस असती ॥२७॥
त्या प्रतिश्लोकाचें पुरश्चरण । आणि त्या पुरश्चरणाचे फल भिन्न ।
हे जैनागमींचि संपूर्ण । पहावे जनीं ॥२८॥
परी जैनमत नास्तिक । तेथहि मंत्रसामर्थ्य मानिले सम्यक ।
एवं बौद्धमतींहि अनेक । असती मंत्र ॥२९॥
आतां यवनमताच्या ठायीं । स्वप्नसाक्षात्कारादि मंत्र असती पाही ।
सज्जनीं ऐकावे तेहि । भगवदाप्तत्वानुमानहेतु ॥३०॥

यावनी मंत्र

''बिस्मिल्लाहेर्रहेमानिर्रहीम अल्लाहोरबीमहम्मद रसूलव्वाजेकीतस्वीर
कुलाआलमहजूरभेजैगेमवक्कलल्यावैगेजरूर ॥''(मंत्रमहार्णव मुसलमानी मंत्र १)
या मंत्राचा विधि संपूर्ण । पहावा यवनमतांतून ।
याचें फळ भविष्यत्स्वप्न । सुचवी हें असे ॥३१॥
एवं गुरुंड विशेष भाषेंत । मंत्रविश्वास असे दिसत ।
''अर्गिडम् मर्गिडम् स्टर्गिडम्''
या मंत्रे निश्चित । रोग निवारित होते पूर्वी ॥३२॥
यद्यपि माझ्या कवित्वग्रंथीं । परभाषेचे शब्द नसती ।
तथापि उदाहरणार्थी । एवढा शब्द श्रोतीं उपसाहिजे ॥३३॥

भविष्य पुराणांत सत्यवती नंदन । देतां गुरुंडी भाषेचें उदाहरण ।
''सिक्स्टी'' इत्यादि अपभ्रंशोच्चारण । दर्शविते जाहले ॥३४॥
म्हणोनी पर भाषा उदाहृति । माझी अपूर्व नाहीं रीति ।
नवल या मंत्रांची गति । कीं संस्कृतीं शिरती प्राकृत भाषा ॥३५॥
भूतडामर तंत्र संस्कृत । पुरातन तांत्रिक म्हणती समस्त ।
त्यांत वृश्चिकविष निवारणार्थ । हिंदी भाषेंत मंत्र आहे ॥३६॥
''काला बिच्छू पदं प्रोक्तं कातर्याला पदं पुनः''
इत्यादि वाक्यें मंत्रोद्धार । स्वयें सांगे भूतडामर ।
कक्षपुटींतहि ऐसे मंत्र । नागार्जुन बोलती ॥३७॥
एवं महाराष्ट्र भाषेंतहि बहुत । मंत्र असती यथार्थ । (य११पू.२१५)
तयाचा न कळोनी अर्थ । कार्य होत आवश्यक ॥३८॥
''सोन्याचा करा मोत्यान भरा उतर उसणिबाई जाय आपल्या घरा''
सर्पमंत्राची तंव विचित्र गति । ते प्रत्येक भाषेमाजीं असती ।
एवं मंत्रश्रद्धा सर्व मतीं । सर्व भाषेंत सिद्ध असे ॥३९॥
म्हणावे कीं मूर्ख जनीं । श्रद्धा बसविली बळें करोनी ।
परी धर्माग्रहखंडण दिसे म्हणुनी । शंका निर्वाणी हें न चले ॥४०॥
जैनमताचा आगम पाहता । हिंसा निषेधिली सर्वथा ।
मुखबंधन रात्रौ भोजननिषेधादि सर्वथा । अहिंसा पालनार्था निर्मिले ॥४१॥
एवढें आग्रही असोन । त्याही मतांत पाहतां शोधून । दशविधवसेचे बलिदान ।
लिहीले पद्मावती स्तोत्र सप्तदशमश्लोक पुरश्चरणीं ॥४२॥
आणि मधूचे वर्जिले भक्षण । तयाचेचि लिहीले आहे हवन ।
जरी मंत्रशक्ति नसती प्रमाण । तरी अहिंसा आग्रह न सुटता हा ॥४३॥
म्हणवोनी मंत्राची शक्ति । प्रमाण आहे सर्व मतीं ।
आणि प्रत्यक्षानुमानें निश्चिती । सिद्ध ती नव्हे ॥४४॥
यालागी आगमसिद्ध मंत्र । आगमास पाहिजे आप्तोच्चार ।
जीव तंव सर्वज्ञ नाहीं साचार । यालागीं ईश्वर सर्वागमोपदेष्टा ॥४५॥
तंव वादी म्हणे अवघेचि आगम । जरी निर्मी पुरुषोत्तम ।
तरी वेद सोडोनि घेतां अन्यागम । श्रुति किमर्थ प्रतिषेधी ॥४६॥

सिद्धान्ती सांगे समाधान । ज्याचा अधिकार जयाकारण ।
त्याचेचि त्यानें करावे ग्रहण । अंगिकारिता आन दुःखप्राप्ति ॥४७॥
माता आणि कामिनी । निफजती परमेश्वरा पासुनी ।
परी पुत्राते मातृमैथुनीं । अधिकार नाहीं सर्वथा ॥४८॥
माता पितयानेंचि भोगावी । स्नुषा पुत्रेचि सांभाळावी ।
कन्या जामातेंचि रक्षावी । तरीच शुद्धि ॥४९॥
कां कोंडा आणि कण । निघती एकाचि बीजापासून ।
परी मनुष्य सेविती कण । कोंडा तें अन्न पशूंचे ॥५०॥
तेवि जिये आगमीं जयासी । अधिकार बोलिले हृषीकेशी ।
तोचि आगम तयासी । हितावह ॥५१॥
तंव वादी म्हणे मंत्र हेतू देऊन । साध्य साधिले आप्तवचन ।
परी मंत्र न फळे विश्वासावीण । यास्तव सामर्थ्य नाहीं मंत्रीं ॥५२॥
वस्तुसामर्थ्य नापेक्षी श्रद्धा । यालागीं मंत्रहेतूक्ति असिद्धा ।
सिद्धान्ती म्हणे अप्रबुद्धा । ऐकें उत्तर ॥५३॥
विश्वास पाहिजे मंत्राचिप्रति । ऐसा नियम न धरावा चित्तीं । (य११पू.२१६)
विश्वासाविण न फळती । औषधीहि ॥५४॥
भीति असतां महामारी । शत औषधें देतां न होय दूरी ।
कीं सर्पशंकाविषावरी । औषधचि नाहीं ॥५५॥
मानसोन्माद अनंत । त्यावरी औषध न चले यथार्थ ।
कामज्वरादि जे रोग बहुत । त्यावरीहि औषध चालेना ॥५६॥
तयाचें हेंचि कारण । कीं औषधा प्रतिकूल असतां मन ।
औषध होय अप्रमाण । तेविचि जाण मंत्रहि ॥५७॥
जेथ दिसे औषधाची वस्तुशक्ति । तेथ रोगी उदासीन असती ।
अनुकूल वा प्रतिकूल नसती । म्हणोनिया ॥५८॥
औषध प्रत्यक्ष लौकिक म्हणोन । बहुतांचें न होय प्रतिकूल मन ।
मंत्रसामर्थ्य अदृष्ट म्हणोन । अविश्वासी मन बहुतांचे ॥५९॥
यालागीं मंत्र शिघ्र न फळती । लोक त्याविषयीं उदासीनहि नसती ।
केवल प्रतिकूलचि भावना करिती । म्हणोनी गति कुंठित होय ॥६०॥
एरवी औषधी तैसे मंत्र । हें अन्यथा नाहीं उत्तर ।
मंत्राची शक्ति असे विचित्र । हे मंत्रशास्त्र पाहतां कळे ॥६१॥
म्हणोनी मंत्रहेतुवरून । सर्वागम निर्माता नारायण ।
तोचि आप्त तयाचें वचन । निश्चयें प्रमाण बोलिलो आम्हीं ॥६२॥
तंव वादी म्हणे मग स्वागमाचा । लोकासी उपदेश न करावा साचा ।
सिद्धान्ती म्हणे अधिकारीयाचा । उपदेशाविण अनुपयोगू ॥६३॥
शेतीं पेरोनी पहावे । मग भूमि असेल तैसेचि उगवे ।
तेवि उपदेशुनी पहावे । मग अधिकार असेल तैसे फळे ॥६४॥
अनादि संसारीं पूर्वकृत । जयाची श्रद्धा तीव्र जेथ ।
तो उपदेशे तैसाचि होत । इतिहास बहुत येविषयीं ॥६५॥
एका जैन पुरुषास यमदूत मिळोनी । विष्णुभक्ति करविली तया हातुनी ।
ही कथा लिहीली महाजनीं । भक्त चरित्रीं ॥६६॥
शेखमहमद यवन । जाहले विष्णुभक्तिसंपन्न ।
शांत ब्राह्मणीं मुसलमान । मृत्युंजय अभिधान पावला ॥६७॥
एवं परधर्मी जाहले वैदिक । आतां बौद्ध झाला आर्य अशोक ।
शिवकोटी राजा शैव सम्यक । तो समंतभद्रोपदेशें जैन झाला ॥६८॥
महात्मा अलिभगवान । परम रामभक्त प्रथम असून ।
कृष्णभक्त झाले पाहतां वृंदावन । नावरे मन जडलें कृष्णीं ॥६९॥
मक्केसी जाता रसखान । मध्येंच लागले वृंदावन ।
तेथील छबी निरखून । जाहले पूर्ण हरिभक्त ॥७०॥
एवं त्या त्या धर्मीं पाहतां । तैशा तैशाचि मिळती कथा । (य११पू.२१७)
ह्या सर्वांचा विचार करितां । सिद्धान्त सर्वथा हाचि मिळे ॥७१॥
कीं जयानें जो अभ्यासु केला । तो जरी अन्य जन्मीं अन्य योनीं आला ।
प्रथम जरी आवर्ती पडला । तरी पावे पूर्विल अभ्यासा ॥७२॥
"यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥११॥" गीता अ.७
जो भक्त जिया देवतेसी । अर्चू इच्छी तया तैसी ।
अचल श्रद्धा दे आपैसी । गीतेंत हृषीकेशी वदती ऐसे ॥७३॥

तंव वादी म्हणे हे असो । आप्तवचनी[४] मंत्र पैसो ।
परी सार्थ आप्तवचन विश्वासो । कवणें रीति ॥७४॥
दृष्टविरुद्ध[५] आप्तवचन । जरी मानावे प्रमाण ।
तरी शशशृंगादिक वचन । होईल प्रमाण निश्चये ॥७५॥
दृष्टानुकूल प्रमाण म्हणतां । तरी वचना येईल अनुवादकता ।
दूरस्थ दृष्टानुकूल प्रमाण म्हणतां । तरी संशय तत्वता निवटेना ॥७६॥
''योषा वा गौतमाग्नि''रित्यादिश्रुति । स्त्रियेते अग्नित्व दृष्टविरुद्ध सांगती ।
यालागी वेद प्रमाण न होती । हें ऐकोनी म्हणे सिद्धान्ती समाधान ऐके ॥७७॥
जयाचे अदृष्ट[६] बोलिले फळ । तेथ दृष्टविरुद्धहि आगम प्रमाण केवळ ।
शशशृंगादिकाचें अदृष्ट फळ । बोलिलेचि नाहीं ॥७८॥
शशशृंगादिकांची अनादि प्रवृत्ति । जाहली आहे अभावार्थी । जरी शशशृंगध्यान धरील चित्तीं । तरी अन्य सृष्टींत तोही पावेल मी म्हणे ॥७९॥
शशशृंगादिकासी आहे बौद्धार्थ । ऐसें वैय्याकरणांचें मत ।
किंवा शशशृंगादि अर्थ चित्तांत । ध्यानार्थहि येवो न शके ॥८०॥
दुसरा पदार्थ नाहीं अग्नि । म्हणोनी ध्यानें स्थापिता ये योषिदधिकरणीं ।
शृंगे बहुता असती म्हणोनी । ध्यानें कोणाचें स्थापावे शशांगीं ॥८१॥
ध्यानांत शृंग आणो जयाचें । तें तें वाटेल नाहीं सशाचें ।
भलतेंचि लावितां कल्पनेचें । तरी धातूकाष्टादिकांचे होईल तें ॥८२॥
एवं आकाशाचें सुमन । ध्यानार्थहि कल्पूं न शके मन ।
आकाशांत कल्पिता एकादें सुमन । तें होय कोण्या तरी वृक्षाचें ॥८३॥
वंध्यापुत्राचेंहि ध्यान करितां तैसे । पुत्रत्व कल्पिता वंध्यात्वचि नाशे ।
योषिदग्निध्यान नोहे तैसे । म्हणोनी त्यासी असे सदर्थता[७] ॥८४॥
यद्यपि वन्हिरूप कामिनी । दृष्ट नाहीं कवणिये स्थानीं । (य११पू.२१८)
शाब्दी प्रमा[८] म्हणोनी । उत्पन्न न होय येथ ॥८५॥
तथापि तैसे आकार मनीं धरिता । विशेष अदृष्ट फळ मिळे तत्वतां ।
यालागीं त्या विधीस प्रमाणता । अविश्वास करितां महादोषू ॥८६॥
प्रमाण नाहीं पुरुषतंत्र । तैसा तंव आहे ज्ञानविचार ।
योषिदग्नित्वादि समग्र । उपासना असती ॥८७॥

परी त्या न होती अप्रमाण । म्हणोनी दृष्टविरुद्धहि ईश्वरवचन ।
विश्वासावे आवडी करून । हा निश्चय पूर्ण मम चित्तीं ॥८८॥
वादी म्हणे भगवंती । विप्रलिप्सा दिसे मजप्रति ।
''त्वं हि रुद्र महाबाहो मोहशास्त्राणि कारयेति''। पुराणोक्ति म्हणोनी ॥८९॥
सिद्धान्ती म्हणे याचें उत्तर । जे अति मोहांत पडले नर ।
त्यांचिया मोहसंकोचार्थ साचार । मोहशास्त्रप्रवृत्ति[११] ॥९०॥
जेवि ''सौत्रामण्यां सुरां पिबेत्'' ही श्रुति । अतिसुरापानसंकोच दाविती ।
परी जो सुरा न पी तयाप्रति । विधि न दावी ॥९१॥
तैसे प्रबळ झालिया कलियुग । मनुष्य चढतील मातृपलंग ।
तेव्हां वामतंत्र प्रसंग । संकोचाचा आणिल कीं ॥९२॥
वैष्णव राहतील क्वचित । विष्णुयशादि हा कल्किपुराणार्थ ।
आणि प्रबल कलींत कुल वाढवावे बहुत । हे महानिर्वाण तंत्र सांगे ॥९३॥
म्हणोनी जेव्हां अति वाढेल मातृमैथुन । तेव्हां संकोचार्थ पंचमकारहि प्रमाण ।
यालागीं मोहशास्त्राचें कारण । नाहीं ईश्वरविप्रलिप्सा ॥९४॥
अत्यंत निरागम न व्हावे कोणी । हें इच्छी कृपाळु चक्रपाणि ।
यालागीं मोहशास्त्रादि निर्माणीं । प्रवर्तला प्रभु ॥९५॥
दिवसा दिवा लाविता । तरी श्रम मात्र होय वृथा ।
म्हणोनी रात्रौ दिवा न लाविता । अंधारींचि राहावे काय? ॥९६॥
तैसे शुद्धयुगीं वेदादि सात्त्विक प्रवृत्ति । असतां जे तांत्रिक होती ।
ते तामस होवोनी जन्म घेती । प्रबळ कलींत भोगोनी नरक ॥९७॥
रात्रीं दिवा लावणें । याचें नांव प्रकाश करणें ।
आणि दिवसा दिवा लावणें । तो करणें सूर्य-अनादरू ॥९८॥
तैसी असतां वेदादिप्रवृत्ति । बळेंचि जे तांत्रिक होती । ते सत्त्वानादरें नरक भोगिती । परी विश्वासे पावती प्रबल कलींत जन्म ॥९९॥
अत्यंत धर्मरहित होती वृक्ष पाषाण ।
किंचित् धर्मयुक्त तोचि धर्म पावती दुःख भोगून ।
स्वर्ग पावती सर्वथा धर्मसंपन्न । आणि धर्माधर्मभिन्न ते मुक्त होती ॥१००॥
म्हणोनी वैदिक काळीं जे तांत्रिक । ते म्हणीजती किंचित धार्मिक ।

(य११पू.२१९)यालागीं भोगोनिया नरक । प्रबळ कलींत पावती जन्म ॥१०१॥
प्रबल कलींत वामागम । पापआंधारीं दीप परम ।
पुढें जनास वैदिक क्रम । देवोनी उपरम मुक्त करी ॥१०२॥
वादी म्हणे तुमचा संप्रदाय । प्रबल कलींत क्षीण होईल काय ।
सिद्धान्ती म्हणे हें न होय । येथ प्रमाण आहे सात्त्वतश्रुति ॥१०३॥
क्वचिद्वैष्णव राहतील म्हणोन । आम्ही जे बोलिलो वचन । तें
भारतभिन्नलोकसंख्या[१०]धरून । परी भारतीं नारायण रक्षील वैष्णवा ॥१०४॥
अथवा क्वचित् जरी राहतील वैष्णव ।
तरी ते दुःखी न होतील तयास रक्षीता म्हणोनी देव ।
वैष्णवेतरास संकोचक स्वभाव । वामागम आणिल कीं ॥१०५॥
आमुचा संप्रदाय राहील यासी । प्रमाण ऐक निश्चयेसी ।
श्रीमहापुराणी ऐसी । उक्ति आहे ॥१०६॥
''कृतादिषु प्रजा राजन् कलाविच्छन्ति संभवम् ।
कलौ खलु भविष्यन्ति नारायणपरायणाः ॥३८॥'' (भागवत स्कं ११ अ. ५)
कृतादि युगामध्यें जन । कलियुगीं इच्छितीं जनन ।
कीं उत्पन्न होतील सज्जन । भगवद्भक्त कलींत बहु ॥१०७॥
दिवसा जागे असती समग्र । म्हणेनी घर न रक्षिती सावकार ।
रात्रीं हिंडती बहुत चोर । यालागीं रक्षणार ठेविती सभोंवते ॥१०८॥
तैसें कृतादि युगीं धार्मिक बहुत । म्हणोनी आधिकारिक महात्मे समाधिस्थ ।
धर्मघातक होती कलींत । यासाठीं तया संरक्षिती संत महीवर येवोनी ॥१०९॥
म्हणवोनी संप्रदाय आमुचा । प्रबल कलींतहि क्षीण न होय साचा ।
आम्हा दृढ भरंवसा हरिहरांचा । ज्यांची वाचा कल्याणप्रद ॥११०॥
वैष्णव तोचि शैव । हें नारद पुराण सांगे सर्व ।
आम्हासी आवडे हरिहरैक्यभाव । म्हणोनी आमुचा संप्रदाय नसेल ना ॥१११॥
अहो हे तेव्हाच सांच बोलण । जेव्हां शब्द होईल प्रमाण ।
परी प्रमाणें तव केवळ दोन । दृष्ट आणि अनुमान वैशेषिक म्हणती ॥११२॥
''श्रुतिस्मृतिलक्षणोऽप्याम्नायो वक्तृप्रामाण्यापेक्षोऽनुमानमेव''
या प्रशस्तपादभाष्याचा अर्थ । कीं शब्दाचा अंतर्भाव अनुमानांत ।
श्रुतिस्मृतिलक्षण आगमही समस्त । अनुमा[११] निश्चित आप्तप्रामाण्यास्तव ॥११३॥
(य११पू.२२०)

या अनुमानाचा हा आकार आहे -

**''गामानयैतद्वाक्यं स्मारितार्थविषयं आकांक्षादिमत् पदकदंबकत्वात् घटमानयेत्यादि वाक्यवत्''** - एखाद्या पुरुषाचें वाक्य ऐकून श्रोता पुरुष असें अनुमान करीत असतो कीं, ''लवकर घट आण'' हीं पदें स्मारितार्थसंसर्गपूर्वक[१२] आहेत, आकांक्षा[१३] योग्यता[१४] आसत्ति यांच्या सहित समुदायरूप असल्यामुळें. जसें मी कोणाला गाय आण म्हणतो तेव्हां तीं पदे स्मारितार्थसंसर्गपूर्वकच असतात, तशी हीं आहेत. याप्रमाणें शब्दप्रमाणाचा अंतर्भाव अनुमानांतच होतो.

सिद्धान्ती उवाचः- बालपुरुषांना[१६] लक्षणावृत्तीची संवय लागावी म्हणून प्रशस्तपादाचार्यांनीं असें म्हटलें असल्यास न कळे, पण वस्तुतः शाब्दप्रमाणाचा अंतर्भाव अनुमानांत होत नाहीं. कारण मी अनुमान केलें अशा प्रकारचे जें अनुमान केल्यानंतर पुरुषाला ज्ञान होतें तें शब्दप्रमाणानंतर होत नाहीं, तर शब्दानेंच मी जाणलें असें ज्ञान होते. पुनः अनुमानाला काल लागतो तसा शब्दप्रमेला काल लागत नाहीं, तर प्रत्यक्षाप्रमाणें ती युगपत्[१७] उत्पन्न होते.

वादी उवाचः- अहो तें अनुमान पुरुषाला इतक्या लवकरच होऊन जाते कीं, तशा प्रकारचें अनुव्यवसायज्ञान[१८] होण्याला वेळ मिळत नाहीं, परंतु विचार केला असतां नुकताच जो शब्दाविषयीं अनुमानाचा आकार सांगितला तो ध्यानांत येतो; आणि तेवढ्यावरून शाब्द हें अनुमान प्रमाणच आहे असें ठरते.

सिद्धान्ती उवाचः- वाः! फार तूं आपले न्यायाचें ज्ञान प्रगट केले आहेस. अरे! अशा रीतीनें प्रत्यक्ष देखील अनुमान आहे असें सिद्ध करतां येतें. कसें ते पहा. -

**''इदं घटादि प्रत्यक्षं प्रमाणं प्रत्यभिज्ञापूर्वकं अबाधितार्थविषयसम्बन्धित्वात् यन्नैवं तन्नैवं यथा शुक्तौ रजतं प्रत्यक्षम्''**

हे घटादि पदार्थाचें प्रत्यक्षज्ञान प्रमाण आहे. पूर्वकालीं पाहिलेले पुनःहि पहात असल्यामुळें अबाधितार्थविषयसंबंधी[१९] आहे. म्हणून जें जें अबाधितार्थविषयसंबंधी[१९] प्रत्यक्षज्ञान नसते ते ते प्रमाणहि नसते जसें शिंपेवरील रुप्याचें प्रत्यक्षज्ञान. (य११पू.२२१)

वादी उवाच :- सर्व व्यवहारलोपाचा प्रसंग येत असल्यामुळें हा अनुमानाभासच समजला पाहिजे.

सिद्धान्ती उवाचः- धर्माधर्माची सिद्धि विधीनिषेधवाक्यावरूनच होत असल्यामुळें तुझ्याहि शाब्दाला अनुमान म्हणण्यापेक्षां अनुमानाभासच म्हटलें पाहिजे.

वादी उवाचः- अहो! प्रत्यक्ष जर अनुमान ठरेल तर व्याप्तिग्रहण प्रत्यक्षानेंच होत असल्यामुळें, प्रत्यक्षानें अनुमानसिद्धि व अनुमानानें प्रत्यक्षसिद्धि असा अन्योन्याश्रय दोष येईल.

सिद्धान्ती उवाचः- तर तुझ्याहि म्हणण्यांत यथार्थ पण - ''संज्ञाकर्मत्वस्मद्विशिष्टानां लिंगम्'' असें तूं कक्षी केलेल्या वैशेषिक शास्त्रांतच सूत्र आहे, आणि त्याचा आप्ताच्या सिद्धीकरितां निर्देश आहे; म्हणून इतरेतराश्रय दोष तुझ्याहि म्हणण्यावर येतो.

वादी उवाचः- शाब्द अनुमान आहे पण तर्कानें देखील तें प्रमाण आहे असें वाटत नाहीं. कारण शब्दाला अनियतार्थता असून शब्दाच्या मागें लागून पुष्कळ फसतातहीं.

सिद्धान्ती उवाचः- शब्दाला अनियतार्थता[२०] आहे या तुझ्या म्हणण्याचा अर्थ काय समजावा? अर्थाभाव,[२२] अर्थविपर्यय,[२३] अर्थव्यभिचार[२४] कीं अर्थानन्त्य?[२४] प्रथम पक्ष घटत नाही. कारण शब्दाला जर अर्थच नाहीं तर तुझें म्हणणें आम्हाला समजणेंही शक्य नाहीं. व तुझ्याशी बोलण्यांतही अर्थ नाहीं आणि तुझा आमच्याशीं वाग्व्यवहारही प्रवृत्त होणार नाहीं. याप्रमाणें दुसराही पक्ष सम्यक् नाहीं. कारण भावाचा अर्थ नियमेंकरून अभाव, आत्मशब्दाचा अर्थ नियमेंकरून देह, सूर्य शब्दाचा अर्थ नियमेंकरून अंधःकार, आणि जनन शब्दाचा अर्थ नियमेंकरून मरण असें कोठेंही दृष्ट नाहीं. किंवा ज्या शब्दाचा नियमेंकरून विपर्यय अर्थ होईल त्याच्या विरुद्ध शब्दाला तदर्थवाचकत्व आल्यामुळें कोणत्या तरी शब्दाला नियतार्थता येऊन समाधान होत असल्यामुळें तुझा पक्ष व्यर्थ होतो. या प्रमाणें तिसरा पक्षही समीचीन नाहीं. कारण घट शब्दाचा अर्थ केव्हां पट, केव्हां स्तंभ, केव्हां गुद, केव्हां उपस्थ असा होत नाहीं; अथवा घट शब्दास कोण्याकालीं अर्थ असतो व कोण्याकालीं नसतो, असेंही होत नाही. (य११पू.२२२) याप्रमाणें चतुर्थ पक्षही असंगत आहे. कारण अर्थानन्त्य जर शब्दाला मानले तर अनेक दोष येतात. प्रथम तर एकाच शब्दानें सर्व अर्थाचा निर्वाह हा दोष येतो. कारण घट शब्दच घट पट आकाशादि सर्वांचा वाचक आहे तर पट स्तंभ आकाशादि शब्द पाहिजेत कशाला?

पुनः एक शब्द अनंत अर्थाचा वाचक आहे, तो काय निरुपाधिक होत्साता अनंत अर्थाचा वाचक होतो, किंवा सोपाधिक होत्साता अनंत अर्थांचा वाचक होतो? प्रथम पक्षीं श्रोत्यांना युगपत् सर्व अर्थांचें ज्ञान करून देतो कीं क्रमें करून ज्ञान करून देतो? पैकीं आद्य पक्ष अयोग्यआहे, कारण घट शब्द ऐकल्यानेंच सर्व पदार्थांचें ज्ञान झाल्यामुळें सर्व जीव सर्वज्ञ होतील; आणि अग्नि हा शब्द ऐकल्यानेंच सर्व जीव वेदसंपन्न होतील. द्वितीयपक्षीं नियतक्रमानें ज्ञान करून देतो, कीं अनियत क्रमानें ज्ञान करून देतो? पहिला पक्ष अंगिकार करशील तर, शब्दाला नियतार्थता येऊन त्याची अनंतार्थवाचकता नष्ट होते. किंवा अनंत कालपर्यंत नियत ज्ञान करून देण्याची एका शब्दाचें ठिकाणीं सामर्थ्यधारा[२५] मानल्यास एकाच घटशब्दानें अनागत अनंत जन्मांत अनंत पदार्थाचे ज्ञान होते असें म्हणावें लागते, पण त्याविषयीं कांहीं प्रमाण नाही. दुसरा पक्षही सम्यक् नाही; कारण अग्नीनें वस्त्र धुवावें अशा अयोग्य शब्दापासून अर्थनिष्पत्ति होण्याचा प्रसंग येईल म्हणून. अथवा कदाचित् तोच तोच अर्थ स्फुरून शब्दाला नियतार्थवाचकत्वही येईल. दुसरा पक्ष अंगिकारशील तर, अनंत उपाधिरहित अशी नियतार्थवाचकता शब्दाचे ठिकाणीं मानावीच लागेल. पुनः एक शब्द अनंतार्थाचा वाचक झाल्यास त्याला पदत्व येणार नाहीं. कारण शब्दाला विभक्ति लागणें हे पदाचे लक्षण आहे आणि भिन्न विभक्तीचे भिन्न भिन्न अर्थ आहेत, पण एक शब्द अनंतार्थाचा वाचक झाल्यामुळें सर्व कारक काम त्याचे वाच्य होऊन विभक्तीची अपेक्षा लागणार नाहीं. मग पदत्वाभावास्तव हा योग्य शब्द व अयोग्यशब्द असा भेदही राहणार नाहीं. व मग ''अपदं न प्रयुंजीत'' इत्यादि नियमांचा लोप होऊन संपूर्ण व्याकरणाचा अभाव होईल; आणि लोकव्यवहाराचाही अभाव होईल. (य११पू.२२३)

पुनः तुला आम्ही असें विचारतो - एकच शब्द सर्व अर्थांचा वाचक आहे असें म्हणतोस कीं, सर्व शब्द सर्व शब्दांचे वाचक आहेत असें म्हणतोस? प्रथम

पक्ष संभवत नाही हें आम्ही आतां सांगितलेंच आहे, आणि द्वितीय पक्षीं गौरव दोष असल्यामुळें कोणते तरी शब्द निरर्थक झाले पाहिजेत. पण अमुकच शब्द निरर्थक असें सांगता येत नाहीं. म्हणून सर्व शब्दच निरर्थक होतील व त्यामुळें अर्थाभाव या प्रथम पक्षावर आलेले सर्व दोष याही पक्षावर येतील.

आतां, कोणी कोणत्या शब्दाला निरर्थक ठरवावें, कोणी कोणत्याला ठरवावें असें म्हणशील तर, कोणाशीं कोणाचा मेळ न पडून सर्व लोकव्यवहाराचा लोप होईल. ज्याच्या इच्छेस वाटेल तो त्याला निरर्थक ठरवूं लागेल व त्यामुळें मी आईला बायकोच म्हणतो असा अतिप्रसंगसुद्धां होईल; आणि कोणी अन्न मागत असल्यास कोणी विष सुद्धां देईल.

आतां सर्वच शब्द सार्थ आहेत परंतु त्याचे कित्येकानां ज्ञान असते व कित्येकानां नसते असेंहीं म्हणतां येणार नाहीं. कारण ते जे त्यांना ज्ञान नसते ते कां? असें कोणी विचारल्यास अध्ययनाभावास्तव असेंच तुला उत्तर दिलें पाहिजे. पण एकही शब्दाचे अध्ययन नाहीं असा कोणीही असणें संभवनीय नाहीं; आणि सर्व शब्द सर्व अर्थाचे वाचक आहेत, एक शब्दही सर्व अर्थाचा वाचक असल्यामुळें व्यर्थ अध्ययनश्रम करण्याकडे कोणाचीच प्रवृत्ति होणार नाहीं. आतां रानटी लोकांना भाषा चांगलीशी येत नसल्यामुळें त्यांचा बहुतेक व्यवहार खुणांवर चालतो; म्हणून शब्दाचें ठिकाणीं अनियतार्थता आहे; पण हे वादीचें म्हणणें समयास अनुसरून नाही. कारण रानटी लोक अधीत नसल्यामुळें त्यांना आपला सर्व व्यवहार शब्दानें करतां येत नाहीं असे म्हणण्यांत उलटी शब्दाला नियतार्थताच सिद्ध होत आहे. शिवाय आपलें मनोगत जशा शब्दानें काढतां येईल तशा शब्दानें कळविण्याची इच्छा श्वान सूकरादि पशूंस व काकोलूकादि पक्षांसही आहे. हें घरी चोर आला असतां कुत्र्याच्या भुंकण्यावरून व वत्स चुकलें असतां गाईच्या हंबरड्यावरून आपल्याला दिसून येते. ''क्रीं काका'' (बृहत्तंत्रसार-काकशब्दज्ञान प्रकरण) इत्यादि काकादिकांच्या शब्दाचें ज्ञान करून घेण्याचें मंत्रही मंत्रशास्त्रांत आहेत; आणि शकुनशास्त्रांत -

**'उल्हासः किल्बिले चैव चिल्पिले भोजनं तथा ॥**
**बंधनं खिटी खिटे स्यात् कुरकुर शब्दे महद्भयम्'॥** (य११पू.२२४)

इत्यादि पिंगलाशब्दाविषयीं श्लोक आहेत. प्रयाण करतांना पिंगळा किलबिल शब्द करील तर आनंद होईल असें समजावें. चिलपिल शब्द करील तर भोजन मिळेल व खिटखिट शब्द करील तर कारागृह आहे असें समजावें व कुरकुर करील तर मोठें भय मरण आहे असें समजावें. याविषयीं एका कवीनें एक ऐतीह्य आपल्या लावणींत गोवलें आहे. आतां तें कदाचित् कल्पित असेल तर त्याचें सामान्य स्वरूप तरी कल्पित नाहीं. म्हणून ती लावणी येथें लिहितो. कवि थोडासा अडाणी असल्यामुळें यांत कांहीं घोटाळ्यासारखे वाटले तर नवल नाही. पण जोपर्यंत कल्पितत्व सिद्ध होत नाहीं तोपर्यंत मांत्रिकत्वसाधक प्रमाण असल्यामुळें याला ऐतीह्य म्हणण्यांत कोणाचें कांहीं जात नाही. शिवाय जातीचें(२६) ठिकाणीं जे शक्ति मानतात, त्यांचें मतानें आक्षेप(२७) कल्पित असल्यामुळें व्यक्ति जरी कल्पित असली तरी शब्दाला कल्पितार्थत्व सिद्धच होत नाहीं. कोणत्याही दृष्टीनें असो, ग्रंथांत थोड्याशा मनोरंजनाकरितां ही लावणी असूं द्यावी, अशी मी श्रोत्यांना प्रार्थना करितो.

## ॥ निळावंतीची लावणी ॥

**धनवंतपिताघरिं सुखी, कन्या लाडकी, कोकपुस्तकीं तरबेज झाली ॥**
**ती जनावरापक्ष्यांचि बोली शिकली ॥धृ.॥**
**भर उमर आली बहारांत, रूपा स्वरूपांत,लेउनि वस्त्रांत,सर्व सुख धाली ॥**
**मुळपाठी तिला सासरची गाडी आली ।**
**केला बोळवणीचा थाट, आप्तगजघाट लावली वाट, सासऱ्या गेली ॥**
**सासुरवाडीं भाग्याची नांदूं लागली ॥**
**एके दिवशीं नारभ्रतार, खुशीमध्यें फार, प्रीतिव्यवहार, रात्र बहु झाली ॥**
**पति निजला, पतीचे पाय चुराया बसली ॥**
**चाल ॥ सुमसाम रात्र दोनप्रहर, गडद अंधार, कोलेभुक झाली ॥**
**रानांत भोंवतें कोल्हें सुंदरा महालीं । कांवखोरा पानोठा नदी पुरानें भरली ।**
**एक मुर्दा वाहत येतो, कंबर कसली ।**
**त्याच्या कंबरेस दोन लाल खुण सांगितली ।**

कोल्ह्याची बोलि नारीला गोष्ट उमजली ॥
चाल दुसरी ॥ ती नार करिती उपाय सांगड धुंडली ॥
होणार पतीला तिच्या हुषारी आली ॥ ही नार माडी उतरून कोठें चालली ॥
लागली झडी पाऊस अंधारी पडली ॥
पुढें नार मागं भ्रतार थडीवर गेली ॥ (य११पू.२२५)
चमकती विजा उजेडानें पाहूं लागली ॥ आला मुर्दालागीभागीं दोचव झाली ॥
महापूर नदी पाण्यांत उडी घातली ॥ ओढून काढिला मुर्दा नाही भ्याली ॥
मुर्द्याची कंबर ना सुटे हातें शिणली ॥ दांतानें सोडुन गांठ मोकळी केली ॥
भ्रतार म्हणे ही मुर्दा खाया आली ॥ दांतानें तोडिते मुर्दा डाकिण झाली ॥
थरकांपे आला परतुनी हुडहुडी भरली ॥
चाल ॥ नारीचा हिय्या धवताल, घेतले लाल, झाली खुश्शाल, विडा यशाचा।
आलि घरीं पुढें होणार भोगकर्माचा ॥
बाळपणीं होति माहेरा, नारसुंदरा, कोकशास्त्रा निळावंतीचा ॥
तिनें अभ्यास केला पाठ पक्षिबोलींचा ॥धृ.॥१॥
थरकापें नारिचा पती, घोकणी चित्तीं, नार बोलती बोलेना तिसीं ॥
देहीं पिंगट झुरणीं, जीवकांचणी, त्याशीं मायबाप म्हणे रे पुत्रा, राजीवनेत्रा,
कोमलगात्रा, सांग आह्मांशी ॥ काय घोर लागला रोग तुझ्या शरिराशीं ।
पुत्र म्हणे माझी नार, लास अवतार, रात्र अंधार, झडी त्या दिवशीं ॥
एकली गेली बेधडक नदीवर कैशी ॥
उडी घालून मुर्दा काढी, बाहेर ओढी, दातानें तोडी, मेल्या मुर्द्याशीं ।
म्यां दृष्टि पाहिलें, कोप माझ्या अंतराशीं ॥
॥चाल॥ मायबापानीं ऐकिलें रोखी पुत्राशीं ॥
कोणी गोड बोलेना घरां त्या नारीशीं । एकली माडीवर निजे नार वनवाशी ।
ती जागी अंदेशामध्यें एक्या दिवशीं । टिवटिवी काय बोलली शब्द आकाशीं ॥
मसणामध्यें बारवेच्या पायरीपाशीं ॥ तीन कोहळे माल आहे धनाच्या राशी ॥
ज्यापाशीं लाल तों माल त्याच्या दैवाशीं ॥
॥चाल दुसरी॥ नारीला कळे टिवटिवीची बोली भाषी ॥
चालली माडी उतरून शोध पहायाशी ॥
सासरा तिच्याचा हाळावर कळलें त्याशीं ॥
चालला सुनेच्या मागें गेली मसणासी ॥
बारव पायरी लाल दाखवी त्याशीं । मालाचे कोहळे पुढें पाहे दृष्टीशीं ।
मालाचें ओझें घरीं घेऊन जाऊं कैशी । ठेवाया ठिकाण धुंडे मसणखाईशीं ॥
उदानीं उकरला मुर्दा आदल्या दिवशीं ।
तिनें खळगी पाहिली निर्मळ केली शाखी ॥
खळगींत घाला माल तिची खुण तिशीं ॥ सासरा म्हणे मसणांत धुंडे मुर्द्याशी ॥
ही लास अगर डाकीण आली जन्माशीं ।
सासरा आला परतुन ठाऊक नाहीं तिशीं ॥
आली सवेंच मागुन नार लाभ संतोषीं ॥
॥चाल पाहिली॥
सासरा म्हणे सुन लास, करील ही ग्रास, नाहीं विश्वास, अशा नारीचा ॥
उगवला दिवस सजविला साज गाडीचा ॥ बाळपणीं हो ॥२॥
सासरा ह्मणे बाई तूं सून, कर्म जपून, गोष्ट कठीण, बोलता नाहीं ॥
तूं जाय तुझ्या माहेरीं, तुझें मन नाहीं ॥
गेली कोठडींत वेल्हाळ, रडे मुळमुळ ॥ (य११पू.२२६)
आला अपजाळ, कोण्या अन्यायीं ॥ चिडचिडा भिंतीवर पाल बोलती कायी ॥
दातांनीं सोडले लाल, टिवटिवी माल, हिंडलीस काल, मसणखाई ॥
बरेंच करितां वाईट झालें धनाच्या पायीं ॥
होणार चुकेना कधीं, आला शिरीबदी, कळा तुझी मधीं, करुनि चतुराई ॥ जय
घेऊनि चौथ्यालागीं गोष्ट फोडावी ॥
॥चाल॥
पालीनें केली नारीची मनसमजावी ॥ सासरा सुनेला नेतो माहेरगांवीं ॥
वाटेनें चालतो भितो तिच्या नसे गांवीं ॥ सून म्हणे फराळासाठीं गाडी उतरावी॥
वर झाड वडाचें पुढें बारवत्याठायीं ॥ झाडावर बसले होते कागकागाई ॥
॥चाल दुसरी॥
कावळा म्हणे कागाई इच्छा माही ॥ हे कोण फराळा बसले, बोवा एक बाई ॥
आपल्याला फराळहिस्सा देतील कांहीं ॥ मी देईन धनदौलत मालकढाई ॥

या खोडापासून नऊगज गणती घ्यावी ॥ उत्तरेकडे चौकोनी शिळा उलथावी ॥
ती नार म्हणे कावळ्या बोलतोस काई ॥
वनवासास आला कोल्हा टिटवीच्या पाई ।
कागाची गोष्ट आपल्याच लाभा व्हावी ॥
कागास फराळ दिला लाडु लवलाहीं ॥
सासरा म्हणे बोलतां इशीं गत नाहीं ॥
कोणाशीं बोलते काय गोष्ट उमजावी ॥
सासऱ्यानें जुंपली गाडी करी तो घाई ॥
दिवस गेला फराळ जाहला चल सुनबाई ॥
॥ चाल पहिली ॥
मग सोडून माहेरची वाट,धरली आडवाट,झाडी कीरकाट,तर्क नारीचा ॥
मामाजी रस्ता नाहीं माझ्या माहेरचा ॥ बाळपणीं० ॥३॥
सासरा चिंती चित्तास, सुनेचा त्रास, द्यावा वनवास, जावें टाकून ॥
साधावा डाव काढिली गाडी वैरान ॥
आडवाटेंत पिंपळझाड । बाजूनें ताट, मधीं धवाड, तोंडीं मुंगशीण ॥
तिचा मुंगुस आंधळा रडति दोघें दुःखान ॥
रडें ऐकून सुंदरा, गाडी उभी करा, तिचा सासरा उभा ऐकून ॥
मुंगुसाला पुसती नार सांगे मुंगशीण ॥
गुहेरानें फुंकले डोळे झाले आंधळे, पती तळमळे, डोळ्या वांचून ॥
ताडावर होती खडी बोले वरतून ॥
॥ चाल ॥
जो लाल विकतो पृथ्वीच्या मोलान ॥
तो लाल फिरवितां नेत्रीं येईल गुण ॥
मुंगशीण ह्मणे आपल्याला मिळेल कोठुन ॥
होता जवळ लाल दिला काढुन नारीन ॥
डोळ्यांवर फिरवितां आले मुंगसाला नयन ॥
मुंगसावर आसन केलें त्या नारीन ।
तितक्यांत बुडाला दिवस अस्तमान ॥



॥ चाल दुसरी ॥ त्या दिवशीं राहिली मुंगसाच्या ओळखीन ॥
सासरा पहातो निसटाया जागती सून ॥
पिंपळझाडावर पिंगळापिंगळी दोन ॥
करी गजबज पहिल्या प्रहरीं गोष्टी प्रमाण ॥
बाणाच्या टप्प्यावर पुढें पूर्व दिशेन ॥
चौकोनी बारव आंत सर्पाचें रहाण ॥
तो सर्प वरती येईल तोंडीं मण ।
मण ठेवूनि शिळेवर सर्प हिंडे उजेडान ॥ (य११पू.२२७)
दोन प्रहररात्रीं करावें संधान ।
सर्पाला मारून घ्यावा त्याचा मण ॥
तें पाणीं होतें दो जागीं, मण्याचा गुण ।
सर्पाचे बारवेमध्यें अपार धन ॥
पिंगळ्याच्या गोष्टी ऐकिल्या चतुर नारीन ॥
मुंगसाला हुकुम केला शिकारीकारण ॥
अठ्ठावीस मुंगसें बोलावली मुंगसान ॥
तितक्याच मुंगशिणी गणतीला छप्पन्न ॥
॥ चाल पहिली ॥
मुंगसाचा मिळाला मेळा, कांपे चळचळा, सासरा तिचा ॥
ती म्हणे मामाजी करा हिय्या दगडाचा ॥ बाळपणीं० ॥४॥
गाडीवर सूनसासरा, मुंगसकतारा, दोहींकडून फरा, फौज शीकारी ।
उभें बारवेच्या अंतरानें रात्र अंधारी ॥
तों सर्प बारवेंतून, वरती येऊन, तोंडींचा मण, ठेविला शिळेवरी ॥
उजेडानें चरतो-फिरतो बारवेतीरीं ॥
मुंगसांनीं सर्प पाहून, झाले चोहोंकडून, पडले जाऊन एकट्यावरी ॥
सर्पाच्या केल्या करंठ्या मारला वैरी ॥
नारीला लाधला मण, हातीं घेऊन, पाहे दृष्टीनें, कमाई पूरी ॥
सवें या मामाजी माझ्या माघ माघारी ॥

॥ चाल दुसरी ॥
पाण्याला मण दाखविला पायरीवरी ॥
झाले दोन भाग पाण्याचे त्या अवसरीं । गेली बारवेंत सर्पाच्या मंदिरीं ।
नीळ हिरे माणिक जव्हार जिन्नस भारी ॥ नवरत्नें वस्तू अमूल्य चंद्राकारी ॥
वर काढून भरली मालगाडी जड भारी ॥ मुंगसानीं फेंडलें आसन गेले घरीं ॥
॥ चाल तिसरी ॥
सासरा ह्मणे सुनबाई धन्य संसारीं ॥ सर्पाचें द्रव्य कसें कळलें तुझ्या अंतरीं ॥
मामाजीं विद्या लाधली मला माहेरीं ॥ कळे जनावरांपक्ष्यांची बोली सारी ॥
पिंपळ्यांनीं प्रश्न केला पिंपळावरी ॥ मुंगसाला घेऊन केली सर्पावर स्वारी ॥
सासरा म्हणे त्वां काल दिवसा दुपारीं ॥
कागाला फराळ दिला कोण्या उपकारीं ॥
सुन ह्मणे सांगतें काय गोष्टी करारी ॥ त्या शिळेखालीं मालाचे कढाव भारी ॥
सासरा सुनेला तिसरी गोष्ट विचारी ॥कां मसणखााई मध्ये उकरल्या गोरी ॥
मामाजी एकली निजलें होंतें मंदिरीं ॥ टिवटिवी बोलली बारवखूण पायरी ॥
हातिं केला माल म्यां जाऊन सुन्या रातरीं ।
मुर्द्याची खळगी कोहळ्यांनीं भरली खरोखरी ॥
॥ चाल पहिली ॥
सासरा झाला खुश्शाल, मालावर माल, धन्य आजकाल, दिवस सोन्याचा ॥
राहिला उकला, पुढें चौथ्या गोष्टीचा ॥ बाळपणीं ० ॥५॥
सुन ह्मणे मी डाकीण खरी, नसावी घरीं, भाव अंतरीं, ह्राच तुम्हांस ॥
तुह्मीं कसा मांडला होता माझा वनवास ॥
सुनबाई तुझे अवगुण, रात्रीं जाउन, नदी थडीन, मेलें माणूस ॥
काय गोडी तुला दांतानें तोडिलें मांस ॥
मामाजी कोल्हें बोललें, मला उमजलें, माणूस वाहिलें, लाल कमरेस ॥
(य११पू.२२८) म्यां जाऊन घातली उडी काढिलें त्यास ॥
मुर्द्याची कमर बळकट, हातीं ना सुटं, मीच ह्मणुन धीट, झोंबें मुर्द्यास ॥
दातांनीं सोडली गांठ लाल लाभास ॥
॥ चाल दुसरी ॥
दाखविले लाल पाहिले सासरा खुश सुनबाई, केली चतुराई
तुझी शाबास, अर्थाचा अनर्थ आला होता होण्यास ॥
हर बहाण्यानें समजावी आले नगरास ॥ झालें वर्तमान सांगे दारापुत्रांस ॥
सुन भाग्याची लक्ष्मी केवळ आपणांस ॥सुन पडे पतीच्या पायां शरण सासूस ॥
॥ चाल तिसरी ॥
हे लाल जव्हेर मण घ्या तुमचे तुह्मांस ॥
तीन कोहोळे आणूनि घेण्या जाऊं हराबडीस ॥
सासऱ्या पतीला घेऊन गेली मसणास ।उदांनीं उकरले कोहोळे रात्रसमयास ॥
घरीं घेऊन आले तीन कोहोळे उगवला दिवस ॥
तिनें कागशिळा दाखविली जाऊन घरच्यांस ॥
भरभरून गाडीमध्यें माल आणा मंदिरास ॥
जंव कलालमण पिंगळ्यापुनपैदान ॥ टिवटिवी कागाच्या कृपे नांदे सावकाश ।
हीं चार चरित्रें प्रश्न आणा ध्यानास ॥ चौ जनावरासंतीनपक्ष्यांच्या बोलीस ॥
सहा कडवीं केली कटिबंध गाणें गायास ।शके सत्राशिं पंचाहत्तर श्रावणमास ॥
संत नागुजीविठ्ठलगुरुज्ञान परीस ॥ नारायणबापू देउळगांवीं रहिवास ॥
डफावर बावन बिर्द कलगीवाल्यास ॥ पंचरंगी निशाण चंग मोर अंकुश ॥
॥ चाल पाहिली ॥
नटु भिकु खुषरंग, सभाप्रसंग, शिराअभंग, पूर्णकमळुचा ॥
कडी यादव लक्ष्मणधवशा नागेशाचा ॥
बाळपणीं होती नार सुंदरा कोकशास्त्राचा निळावंतीचा ।
जिनें अभ्यास केला पाठ पक्षीबोलीचा ॥६॥

०००

या लावणीला ऐतीह्य म्हणण्याचे कारण अशाच प्रकारचे हिंदीमध्यें दोहेही आहेत.

''कुछ करणी कुछ करमगत कुछ पूरब लेके भाग ।
जंबुकने तो कहगया तूं क्या कहता है काग ॥''

तात्पर्य, पशुपक्ष्यांनां जर शब्दपूर्वक अर्थग्रहणप्रवृत्ति आहे असें सिद्ध होते तर रानटी लोकांनां शब्दपूर्वक अर्थप्रवृत्ति नाहीं व त्यांच्या शब्दाला नियतार्थता

नाहीं असें कसें म्हणतां येईल? पुनः नैय्यायिक ज्ञातपदाला शब्दज्ञानाचे कारण मानीत नाहींत, तर पदज्ञानाला कारण मानतात; म्हणूनच मुक्या पुरुषानें खुणेंनें किंवा लिहिण्यानें दाखविलेल्या अर्थाचा दुसऱ्याला बोध होऊं शकतो. मानसज्ञातपदाला कारण मानल्यास इतरांच्या म्हणण्याचाही समन्वय होतो. (य११पू.२२९)

वादी उवाचः- शाब्द प्रमाण आहे हें मला मान्य आहे, कारण त्यावांचून दूर देशांतील पुत्रवार्ता प्रत्यक्ष किंवा अनुमानानें कळूं शकत नाहीं; पण अमुक शब्दाचा अमुकच अर्थ आहे हें आम्ही दुसऱ्याच्या म्हणण्यानें कां मानावें? कारण निरनिराळे मनुष्य शब्दाचे अर्थ जर भिन्न भिन्न करितात तर आम्हालाही आमच्या इच्छेनें कोणत्याही शब्दाचा कोणताही अर्थ करतां येईल.

सिद्धान्ती उवाचः- पण तशानें शब्द प्रमाण होणार नाहीं, कारण एकच शब्द प्रतिपुरुष भिन्न विषयाचें ज्ञान करून देणारा होईल. जी गोष्ट प्रतिपुरुष भिन्न विषयाचें ज्ञान करून देते तिला प्रमाण म्हणत नाहींत, तर भ्रम म्हणतात. जसें भ्रांतीनें रज्जुवर कोणाला जलधारा, कोणाला दंड, कोणाला सर्प, असें ज्ञान होतें तो भ्रम होय, खरें ज्ञान नव्हे. यद्यपि दंडसर्पादि भ्रमाला अधिष्ठान रज्जू एक असते, तथापि ती अज्ञात असते; आणि शब्द तर श्रोत्रग्राह्य असतो, म्हणून तो प्रतिपुरुष भिन्नविषयज्ञान करून देणारा प्रमाण होणार नाहीं. आतां अन्यथाख्यातिवादिया[२८] प्रमाणें किंवा आख्यातिवादियाप्रमाणें[२९] शब्दसामान्यज्ञानाचें[३०] ग्रहण करून शब्दाला प्रतिपुरुष भिन्नविषयज्ञानजनक[३१] मानशील, तर शब्दाला सामान्य नियतार्थता येऊन तुम्ही आपल्या इच्छेनें केलेल्या सर्व अर्थांना भ्रमत्व येईल व प्रमात्व येणार नाहीं. शिवाय अस्मदादि शब्दांना जर स्वेच्छाजनकत्व मानले, तर पुरुषव्यवस्था व लिंगव्यवस्था[३२] नष्ट होईल. आतां अनुपपत्तिमुळें[३३] किंवा विवक्षित परिस्थितीरूप उपाधिमुळें जर शब्दाचे अनेकार्थ मानशील, तर निरुपाधिक शब्दाला नियतार्थवाचकत्व मानावें लागेल; अथवा शब्दाचा यथेच्छा अर्थ करणाऱ्या तुला उन्मत्ताचे वाक्य देखील प्रमाण मानावें लागेल.

तात्पर्य, शाब्दज्ञान होण्यामध्यें तूं परतंत्र आहेस, आणि सर्व लोकांचें ज्ञान परतंत्रच असते असे आचार्यांनीही आपल्या ब्रह्मसूत्राच्याभाष्यांत म्हटलें आहे.

शाब्द अनुमान मानल्यानें सर्व शब्दाला अनुवादता येऊन अर्थवाद होतील; कारण प्रमाणांतरानें प्राप्य[३५] झालेल्या अर्थाचा वाचक होणें हेंच शब्दाचें अनुवादत्व आहे. जसें ''अग्निर्हिमस्य भेषजं '' विस्तव हिवाचें औषध आहे. ही गोष्ट सर्वांना प्रमाणांतरानें माहित आहे, म्हणून हें वाक्य अनुवाद आहे; पण विधिवाक्य कधींही अनुवाद होत नसते, कारण ते सर्वथा प्रवर्तक असते; (य११पू.२३०) जसें स्वर्गाची इच्छा असल्यास यजन करावें, रोग जाण्याची इच्छा असल्यास औषध घ्यावे, इत्यादि वाक्यें अनुवाद मात्र होत नाहींत. ''अग्निर्हिमस्य भेषजं'' या वाक्याला देखील व्यावहारिक सत्तेंत अनुवाद म्हणणें गौण आहे; कारण ''स भूरित्युक्त्वा भुवमसृजत्'' तो भू हा शब्द उच्चारून पृथ्वीला करता झाला, अशी शब्दपूर्वक सृष्टि सांगितली असल्यामुळें जीवाचें पृथ्वीविषयीचे प्रत्यक्षज्ञान भू या शब्दानंतर आहे; त्याप्रमाणें विस्तवानें हिंव नाहीसे होते हे जीवाचे प्रत्यक्षज्ञानही ''अग्निर्हिमस्य भेषजं'' या सृष्टिप्राक् शब्दरूप भगवत्संकल्पानंतरचे आहे असाही अर्थ होतो, व ध्वनिस्तव विरोध येत नाहीं; पण या ध्वनींत[३६] वाच्यार्थापेक्षां चमत्कार[३७]असला तरी तात्कालिक[३८]नाहीं. सारांश शाब्द अनुमान होत नाहीं.

वादी उवाचः- एकादी कला एकादा निर्माण करितो, व तिला एकादे नांव ठेवून देतो; त्याप्रमाणें सर्व शब्द मनुष्यानेंच कल्पित केले आहेत, म्हणून कोणालाही कोणत्याही शब्दाला यथेष्टार्थ[३९] करण्याला स्वतंत्रता आहे.

सिद्धान्ती उवाचः- सर्व शब्दांचे अर्थ मनुष्यानें कल्पित केलेत ही गोष्ट घडून कशी आली? प्रथम सर्व मनुष्यानीं एकत्र मिळून सभा करून आपण अमुक शब्दाचा अर्थ अमुक ठरवूं असा मंत्र केला काय? पण पूर्वी शब्दाचा व्यवहार नसतांना खुणेवांचून एकदम त्यांना कसें करतां आले? आतां अशिक्षित[४०] वाक्यप्रवृत्ति[४१] जर त्यांच्यामध्ये तूं मानीत असशील, तर त्या सर्व लोकांची तशी वाक्यप्रवृत्ति मानावी लागेल व ते अस्मद्विशिष्ट असले पाहिजेत. असें अस्मद्विशिष्ट अनेक मानण्यापेक्षां एक ईश्वर मानण्यांत लाघव आहे. शिवाय अस्मद्विशिष्ट अनेक अशिक्षितवाक्यप्रवृत्तीच्या लोकांचे अभिप्राय भिन्न झाल्यामुळें सर्वच शब्दांचें ठिकाणीं साधुता[४३] किंवा सर्वच शब्दांचें ठिकाणीं असाधुता प्राप्त होईल. तात्पर्य उपपत्तिमुळें[४४] लक्षणाच मानावी हाही नियम राहणार नाहीं; तर शक्तपदाला[४५] देखील भलताच असाधु म्हणेल. किंवा ही शंका निरागमवाद्यांना[४६] करतां येते,

पण ती सर्वच निरागमवाद्यांनी केली असती तर स्वर्गादि अदृष्ट अर्थाचे वाचक शब्द आजपर्यंत उत्पन्न न झाले पाहिजे होते, कारण तेव्हांच त्या शब्दांना कोणीही असाधु म्हणून म्हटलें असते. शशशृंगादि शब्द अनादिकालापासून चालत आले तरी (य११पू.२३१) अझून देखील साधु ठरलेले नाहींत; व त्यांचे लक्षणही कोणी करीत नाहीं. जगाच्या सुखदुःखाचें कारण अदृष्ट हें सिद्ध आहे व त्याचा बोध शब्दावांचून संभवत नाही; कारण गाईचे ताक व्रतांत हविष्याला चालते व म्हशीचे चालत नाहीं; यांविषयीं प्रत्यक्ष किंवा अनुमान प्रवृत्त होत नाहीं, तर केवल आगम प्रवृत्त होतो; म्हणून सर्व शब्दार्थव्यवहार ईश्वरप्रणीत आहे असें आम्ही म्हणतो.

वादी उवाचः- अनादि अविच्छिन्न परंपरेने देखील शब्दार्थव्यवहार होतो असें म्हणण्याला काय प्रतिषेध आहे?

सिद्धान्ती उवाचः- यांत तूं शब्दप्रमाण मानलेस, पण त्याची परंपरा अनादि अविच्छिन्न मानली आहेस, तेव्हां तूं बराच रस्त्यावर आलास; तथापि शब्दाचें प्रामाण्य मानणाऱ्या तुला शब्दाचा विचार केला पाहिजे. जगताचे उत्पत्ति व प्रलय होतात असें अनेक ठिकाणीं सांगितलें आहे, यावरून मध्यें या परंपरेचा विच्छेद होतो म्हणून अन्य कल्पारंभी शब्दार्थव्यवहार परमेमश्वरप्रणीतच होतो, असें मानणें भाग पडते. निद्रेंतील जीवाप्रमाणें निजून उठल्यावर पूर्व दिवशीच्या शब्दाची जशी आठवण होते, तशी प्रलयांतून उठलेल्या जीवांना आपोआपच आठवण होते असें म्हणतां येत नाहीं; कारण क्षणांतील शब्दाची देखील आठवण जीवास योग्य होत नाहीं असें आपण पाहतो. पूर्व जन्मांतील शब्दांची तर मुळींच होत नाहीं; तर मग पूर्वकल्पांतील शब्दांची कशी होईल? अथवा शब्दार्थ संबंध जर जीवानें कल्पित केला असता तर भिन्न भिन्न कल्पारंभी भिन्न भिन्न अर्थाचे वाचक शब्द झाले असते, समशब्द[४७] वाचक झाले नसते, पण तसें होत नाहीं कारण पवर्ग ओष्ठ्यच असला पाहिजे, तवर्ग दंत्यच असला पाहिजे, इत्यादि उच्चारामध्यें पुरुष जसा परतंत्र आहे तसा तो वाक्यांच्या विध्यर्थवादादि भेदामध्येंहि परतंत्र आहे; आणि आकांक्षा[४८], योग्यता, आसत्ति या सहकारीच्याही तो अधीन आहे. अपभ्रष्ट भाषेंत देखील या आकांक्षादिकांना सोडून राहतां येत नाही. किंबहुना नवीन एकाद्या वस्तूला दिलेल्या नांवाच्या वेळी व पुराण तिङ्तादि पदाच्या अधीन होऊन देखील पुरुषाला अर्थ करावा लागतो, नाहीं तर त्याच



नांवाचा शाब्दबोध होत नाहीं. (य११पू.२३२) किंवा

**''बीज मोडे झाड होये । झाड मोडे बीजीं सामाये ॥**
**ऐसेनि कल्प कोडी जाये । परी जाती न नाशे'' ॥५९॥ (ज्ञाने.अ.१७)**

**ऐसें जगदुद्धारपूज्यचरणवचन[५०] । यालागीं सकळ कल्पीं जाति[५१] समान ।**
**जाति-विशिष्ट व्यक्ति मानताहि शक्तिस्थान[५२] ।**
**घटादि पद समान सर्व कल्पीं ॥११४॥**
**म्हणोनि शब्दाची नियतार्थता । न चुके गा सर्वथा ।**
**आप्तोक्त्यादि[५३] नियतता । पावे तियेते ॥११५॥**
**तंव वादी म्हणे शब्द प्रमाण । मानलिया अनुमानाविण ।**
**तरी शशशृंगादिकहि प्रमाण । होतील निश्चयें ॥११६॥**
**तेव्हां म्हणे सिद्धान्ती । त्वां प्रामाण्यशंका केली शशश्रृंगावरुती ।**
**तरी ते शशशृंगादि धर्मी[५४] त्वद्वृत्ति[५४अ] । सिद्ध कीं साध्य घेतले? ॥११७॥**
**प्रथम पक्षीं सिद्धसाधन[५५] । वाद नाहीं असतां प्रत्यक्ष प्रमाण । यालागीं अनुवादक होईल वचन । अथवा अप्रमाण होईल असतां दृष्टविरोधी[५६]॥११८॥**
**परि सिद्धचि जंव नाहीं । तरी शंका केली कवणे ठायीं ।**
**कवणिये ग्रंथीं वचनहि नाहीं । शशशृंगादिविषयीं बोलिले ॥११९॥**
**द्वितीय पक्ष अंगिकारसी । तरी तीन प्रश्न पुसतो तुजसी ।**
**सर्वसाधारणदृष्टिसाध्य[५७] म्हणसी । कीं अन्यब्रह्माण्डान्तर्दृष्टिसाध्य[५८]॥१२०॥**
**कीं योगीसंकल्पसाध्यता[५९] । यांतूनि प्रथमपक्षीं सिद्धसाधनता ।**
**जे सिद्धपक्षाविषी दोष बोलिले आतां । ते सकळहि येती ॥१२१॥**
**द्वितीयपक्षीं अन्य ब्रह्मांडीं । तुज प्रमाण काय नाहीं म्हणाया तोंडीं । विधिशब्दा[६०] जंव तव मति खंडी । तंव तव निषेधशब्दा[६१] कोणी मानावे कां ॥१२२॥**
**योगीसंकल्पसाध्यता जरी । धर्मी घेउनी शंकसी तरी ।**
**योगीसंकल्पें निर्धारी । सकळ हो शके ॥१२३॥**
**योगीसंकल्प वा प्रकृतीचा[६२]पुरवठा । झालिया जात्यंतर[६३] परिणाम होय मोठा। ऐसा आहे प्रमाणसाठा । योगसूत्रादौ ॥१२४॥**
**म्हणवोनि योगीसंकल्पसाध्य शशशृंगादि । संदेहाधिकरण[६४]धर्मी न होती आधीं। यालागीं तद्बोधकहि[६५] शब्दीं । प्रमाणता ये योगीवाक्यें ॥१२५॥**

तैं वादी म्हणे हे न माने माते । ऐसियानें कुधर्म उपदेशतील भलते ।
सिद्धान्ती म्हणे ययाचे तूतें । भय काय उपजले? ॥१२६॥
धर्माचें मुख्य लक्षण । पाहिजे अवश्य परलोक साधन । ते जरी सांगेल प्रतारक[६६]
येऊन । तरी मान्य व्हाया कोटी[६७] दोन त्यांत ॥१२७॥ (य११पू.२३३)
एकतर सांगेल ईश्वराश्रित व्हावें । तेथ जरी फसतां जन स्वभावे ।
तरी कोणत्याहि रीती संभवे । उद्धारू त्यांचा ॥१२८॥
प्रतारकहि होवोनी । ईश्वराविषीं प्रवर्तवील जनीं ।
तरी प्रतारक जावो जळोनी । परी जनउद्धरणीं शंका नाहीं ॥१२९॥
शिलपिल्ले म्हणोनि प्रतारण करिता । तरी कन्या तरली ही भक्तमालेंत कथा ।
यालागीं प्रतारकवचनाहि ईश्वराश्रिता । भयचि नाहीं ॥१३०॥
एक सांगोनि ईश्वर । प्रतारक अन्यथा सांगेल इतर ।
तंव श्रद्धावंतासी ईश्वर । पुढें यथार्थ ज्ञान देईल निश्चयें ॥१३१॥
आतां कोटी दुसरी । ईश्वर सोडूनी प्रतारक जरी ।
परलोकधर्म सांगेल तरी । कर्माश्रित पाहिजे तो ॥१३२॥
ईश्वरास सोडून कर्म सांगतां । तरी प्रतारका सामान्य नीति सांगावी लागेल
तत्वतां । तयावांचोनि जनाच्या चित्ता । ईश्वररहित अनीति मानेल ना ॥१३३॥
सामान्य नीति मानतां प्रमाण । तरी परंपरा[६८] होईल धर्मसाधन ।
यालागीं प्रतारक करूं म्हणेल प्रतारण । तरी धर्मामाजी ते न चले ॥१३४॥
प्रतारक बुडे शिष्य तरती । ऐसीच धर्मव्याख्यान रीति । तिसरी कोटी नये
कोणाच्याहि चित्तीं । म्हणोनि सर्वथा सोडावीं भीति आगममानाविषयीं[६९] ॥१३५॥
अथवा प्रतारक प्रतारणें[७०] । करील तरी कवण्या गुणें[७१] ।
याचणें[७२] की अधर्मकथनें । विधर्मवचनें[७३] कीं आनयोगें ॥१३६॥
म्हणशील याचना करून । धूर्त उपदेशिती शिष्याकारण ।
आम्हाते द्यावे उत्तम दान । मग भोगिती आपण दिव्य भोगू ॥१३७॥
भोगावांचुनी कांहीं । लोकीं सर्वथा प्राप्य नाहीं ।
सिद्धान्ती म्हणे यापक्षीं लवलाही । बोलणें अनुचित तुझे ॥१३८॥
हें अत्यंत चार्वाकाचें मत । तें ईश्वरनिर्णयीं खंडिले समस्त ।
आणि सकळाते सकळ पदार्थ । साधितीचि[७४] ना ॥१३९॥



एकमेकाते पाहता । अपेक्षा[७५] न चुके सर्वथा ।
आणि वैराग्य आहे ज्याच्या चित्ता । तोचि अधिकारी बोलिला ॥१४०॥
उपभोग[७६] पातक जें कांहीं । त्याची दानाविण निष्कृति नाहीं ।
यथाकृति तद्विपरीत निष्कृति हे अनुमानहि । प्रमाण येथ ॥१४१॥
याचि लोकीं आहे सकळ । ऐसी जयाची मति केवळ ।
ते प्रसंगविशेषीं प्रबळ । लोकभक्षक ॥१४२॥
म्हणसी अधर्मनिरूपणें । धूर्त प्रतारिती अवगुणें[७७] ।
ते वायफळ गा बोलणें । बोलता तुझे ॥१४३॥ (य११पू.२३४)
दुसरियाते अधर्म म्हणता । धर्मनिश्चय पाहिजे तुझिया चित्ता ।
धर्मनिश्चय झाला असता । अन्य आप्ता अपेक्षिसी कां ॥१४४॥
अनपेक्षी[७८] आक्षेप । हा वृथा आघवा खटाटोप ।
अनपेक्ष वनसिंह मार्ग माप[७९] । तेथ ग्रामसिंहीं जल्प कां कीजे ॥१४५॥
जेणें धर्मनिश्चयो जाहला । तोचि तुझिया आप्तत्वा आला ।
विधर्मपक्ष तंव परिहरिला । आतांचि कोटिद्विय कल्पुनी ॥१४६॥
चतुर्थपक्ष आन योगू । कीं अज्ञात[८०] आप्ता कवण प्रसंगू ।
तरी अज्ञात आप्त म्हणूनीचि सांगू । आप्तापेक्षा आम्ही ॥१४७॥
आप्तसमा[८१] केवि आप्तता । आप्तविषमाचि[८२] अनाप्तता ।
तेणें आप्त आक्षेपिता[८३] । तरी आक्षेपा अप्रमाणता अनाप्तोक्त्या[८४] ॥१४८॥
एवं सामान्य निर्धारितां । विशेष निर्धारिजे कवणिया अर्था ।
तरी सकळा कीं तुज सर्वथा । निर्धारिता नये सांग ॥१४९॥
आद्यपक्षीं साहस मात्र । अंत्यपक्षीं तुझें अज्ञान थोर ।
अज्ञानें वस्तुनिषेधप्रकार[८५] । परीक्षकवर नांगिकारिती ॥१५०॥
अथवा तुवां कोणा प्रतारिले नसते । तरी तुज प्रतारक न मिळते । दुर्दैवें आप्त
न भेटता तूंते । तरी यथार्थवक्तृत्वादिगुणाश्रयाते[८६] अपलापू घडेना ॥१५१॥
सामान्य होतां निर्धारण । तरी अवश्य विशेष संभावन ।
जातिनिर्धारें[८७] व्यक्तिनिरसन । सर्वथाहि घडेना ॥१५२॥
जातिनिर्धार जंव नाहीं । तरी लक्षणचि न घडे कांहीं ।
लक्षाणाभास म्हणतां तोहि । लक्षणाविण असिद्ध ॥१५३॥

असत्पदार्थाचें लक्षण । अझोनि नाहीं केले कोण ।
तेथ प्रवृत्त नोहे प्रमाण । म्हणोनियां ॥१५४॥
कमलपर घंडाण कंडाणा । किणगुप्प घासंड फेंडणा ।
देंटा येंटा मेंटा संटाणा । एरुंटा भेरुंटा घटाण्याणि ॥१५५॥
इत्यादि शब्दार्थी लक्षण । सदर्थ भिन्न कीजे प्रमाण ।
तात्पर्य लक्षणाभास लक्षणाविण । सर्वथा जाण घडेना ॥१५६॥
आप्ताचें लक्षण जैं केलें । तैं अनाप्तव्यावर्तक[८८] झाले ।
येणेंचि होय निर्धारिले । विशेष ऐसे ॥१५७॥
लक्षण पूर्वी करितां । लक्षकगुण परिचित नसतां ।
तरी लक्षण पदीं योजितां । कवण कैसा ॥१५८॥
परिचये जाहला निर्धारू । आतां तुज न मिळे विशेष प्रकारू ।
तरी करंटा तूं येथ भारू[८९] । साहिजे कवणे ॥१५९॥
शब्दमात्र[९०] अनियतार्थू । तरी तव वचना कवण अर्थू । (य११पू.२३५)
प्रश्नवाक्याचा प्रश्नार्थू । घेइजे कैसा ॥१६०॥
बापें विष्णुदत्त नांव ठेविलें । आणि मातेनें तें खंडिले ।
रायें आनचि लिहिलें । पत्रपत्रीं ॥१६१॥
ऐसेंचि जरी होईल । तरी व्यवहार कैसा घडेल ।
भुकेला भोजन मागतां मारील । भलताहि तया ॥१६२॥
तहानेला मागतां पाणी । तरी सुराचि पाजील कोणी ।
जरी अनियतार्थ वाणी । होईल शब्दू ॥१६३॥
भार्या आणि माता । प्रसंगे येतील एक्या अर्था ।
जरी नियतार्थता । शब्दासी नाहीं ॥१६४॥
जन बुद्धिचि आपैसी । जरी न होय शब्दा सरिसी ।
तरी गाय म्हणोनि घुसी । दोहाया जावे गवळ्यांनीं ॥१६५॥
रायें आज्ञा एक करावी । सेनापतीनें विपरीत धरावी ।
जरी अनियतार्थे भरावी । शब्दकरंडे ॥१६६॥
किंबहुना वैदिक कर्मे । योग्य न होतां न दंडावे यमें ।
जरी अनियतार्थ धर्मे । भरतील शब्द ॥१६७॥



यमासी ऐसे सुखें बोलावे । जे याचि अर्थे शब्दा कैसे मानावे ।
म्हणोनि पुरुषार्थचि आघवे । अनियतार्थ शब्दें पावती नाश ॥१६८॥
आतां शब्दार्थाची संख्या जरी । आंत मुख्यार्थ संभवे तरी ।
आन व्यंग्यार्थ निर्धारी । शक्यभिन्न[९१] पैं होती ॥१६९॥
तेंहि चमत्काराविण । आघवेचि स्वारस्यभिन्न ।
वृत्तिलोपहि कारण । अनियतार्थ शब्दें ॥१७०॥
शब्दासी जैं अनियतार्थता । तैं आघविया अर्था शक्यता ।
लक्षणादि वृत्ति तत्वता । पावतील लोपू ॥१७१॥
शक्ति लक्षणा आणि गौणी । इत्यादि संख्यात[९२] वृत्ति शब्दस्थानीं[९३] ।
अनंत मानता शब्दार्थगुणी[९४] । शक्तिभिन्न वृत्ति अप्रयोजक[९५] ॥१७२॥
यद्यपि घेवोनिया श्रुति । द्वैताद्वैती अर्थ ओढिती ।
तथापि शक्यार्थ द्वैत म्हणती । लक्ष्यार्थ ते अद्वैत ब्रह्म ॥१७३॥
द्वैती म्हणती लक्षणा नाहीं । एवढाचि विवाद पाही ।
परी शक्ति समान लक्षणा करावी । लागे पारतंत्र्यें ॥१७४॥
इच्छा असेल ती वृत्ति । जरी मनुष्यासी ठेविता येती ।
तरी परदेशी[९६] होत्या सर्व वृत्ति । अव्युत्पत्ति असतां शब्दू ॥१७५॥
नामचि होतां आख्यातु[९७] । प्रत्ययालागीं[९८] कवण हेतू[९९] ।
ऐसा उपजता महानर्थू । जरी नियतार्थू शब्द न होता ॥१७६॥
वस्तुतः सनातन शास्त्र देखता । कर्मकांडीं जैमिनीय विरोध नाही तत्वता ।
उपासनाकांडी सर्वथा । विरोध नसे आस्तिकमते ॥१७७॥ (य११पू.२३६)
ब्रह्मकांडीं मात्र भेदू । उपजे द्वैताद्वैत वादू ।
परी द्वैती बळेंचि संबंधू । लोपविती लक्षणेचा ॥१७८॥
प्रतिशब्दा सकल वृत्ति । तयाची कोठें तरी असावी लागतें स्थिती ।
वाच्यप्रधान राहते द्वैती । अद्वैती लक्ष्यप्रधान ते ॥१७९॥
लक्षणेचे मुख्य कारण । आप्ताचें तात्पर्यसंबोधन[१००] ।
पूज्य पुरुषाचे अन्यथा वचन । नव्हेचि कदाही ॥१८०॥
जयासी ऐसी बुद्धीचि नाहीं । तया शब्दीं लक्षणा न पडे ठायीं ।
परि तेणें संबोधबोधू[१०१] लवलाही । न होय कदा ॥१८१॥

लौकिक शक्य संबंध जाण । बोध मानलिया लक्षणेविण ।
ब्रह्मबोध पूर्ण । वाच्यें[१०२] करून कदा नव्हे ॥१८२॥
दुसरे संबंधी शब्द वाचक । यालागीं लक्षणेविण कल्पिता ये संबंध लौकिक ।
परी परब्रह्मीं विवर्त सकळिक । शब्द आविद्यकसंबंधें[१०३] ॥१८३॥
साक्षात् ब्रह्म वाचक शब्द नाहीं । यालागीं लक्षणाचि तेथ पाही ।
ऐसा संबंध जिये ठायीं । लक्षणाचि घडे तेथ ॥१८४॥
यद्यपि वेदान्तपरिभाषाकृन्मतीं । ब्रह्मबोध करूं शके शक्ति[१०४] ।
तथापि 'तत्त्वमसि'विण ती । अन्यत्र नाहीं ॥१८५॥
परंतु तयाचे मते । प्रौढीवादें[१०५] सुसंगते ।
एरवी पाहतां वाक्याते । लक्षणाचि न राहील ॥१८६॥
तैसें न मानितां । पुढती शब्दा अनियत शक्यता[१०६] ।
येवोनि सकलार्थबोधकता । होवोनि व्यावर्तकता[१०७] नाशेल ॥१८७॥
लक्षणा आणि शक्ति । ब्रह्मबोधक मानतां दोन्ही वृत्ति ।
एक मुख्य एक अनुवादक निश्चिती । अवश्य होईल ॥१८८॥
नाहीं तरी दोन्ही निरर्थक । होवोनि न होतील बोधक ।
मुख्य मानतां अवश्य एक । प्राचीन मतें अनुसरावें ॥१८९॥
एवं कोणेहि दृष्टि पाहतां । न चुके शब्दा नियतार्थता ।
नदी वृद्धि संज्ञादि शब्द आतां । । पाहतां परिभाषा मात्र ते ॥१९०॥
परिभाषेचे मुख्य लक्षण । अर्थ न दाखवी विवक्षाभिन्न[१०८] ।
जैसी नदी संज्ञा पाणिनीय शास्त्रीं जाण । तयाचा अर्थ न होय गंगानदी ॥१९१॥
म्हणोनि आम्हा आगमशरणा । कोणीच न करी प्रतारणा ।
निखिलागमकृत[१०९] गोकुलराणा । सर्वदा दीना सांभाळी ॥१९२॥
तंव वादी म्हणे पुढती माते ॥ सर्वज्ञत्व न वाटे पुरते ।
सर्वज्ञ ओळखावयाते । सर्वज्ञचि पाहिजे ॥१९३॥ (य११पू.२३७)
सिद्धान्ती म्हणे तुझी शंका । सामान्य कीं विशेष सर्वज्ञा आणी कलंका[११०] ।
आद्यपक्षीं निका[१११] । निषेध न करवे तुजकरवी ॥१९४॥
सर्वत्व[११२] धर्मी घेउनी । ज्ञत्व प्रकारी आक्षेप वाणी ।
तरी सर्वशब्दार्थ तुजलागुनी । कळला काय ॥१९५॥
सत्तामात्र कळाला म्हणसी । तरी सत्ता उघड सर्वदेशी ।
तूंही सर्वज्ञ तैं असससी । तेथ आक्षेपिसी कां सर्वज्ञा ॥१९६॥
परि विशेष गौप्यावच्छिन्न[११३] सत्ता । जरी विषय सर्वशब्दार्था ।
तरी सामान्य सर्व जाणता । तूंचि जाहला ॥१९७॥
परसामान्य[११४] सर्व शब्दार्थी । सर्वज्ञ प्रत्यक्षप्रमाण प्रतीति ।
अपरसामान्यें[११५] सर्वशब्दार्थी । तरी तूंहि मग सर्वज्ञ निषेधिसी कवण ॥१९८॥
आतां विशेष सर्वज्ञ नाहीं म्हणतां । तरी विशेष अल्पज्ञ तूंचि तत्वतां ।
आणि मजहूनि वरिष्ठ नाहीं म्हणतां । तरी केवि प्रमाणता तव वाक्या ॥१९९॥
तुझें वाक्य मानितां प्रमाण । तरी इतरा तूंचि भासविसी स्वसर्वज्ञाभिमान ।
मग सर्वज्ञ नाहीं म्हणतांचि जाण । आपणा आपण निषेधिसी ॥२००॥
असेल सर्वज्ञ न कळे तुजप्रति । तरी येथ आम्हा इष्टापत्ति ।
वादी मूर्ख जाहलिया सिद्धान्ती । शोभाचि पावे ॥२०१॥
जेथ ऐसीचि बुद्धि होय । याविण यत्नें इतर न होय ।
ते बुद्धिभिन्न वस्तु तैसीचि होय । हे कवण न म्हणे ॥२०२॥
तंव वादी म्हणे आम्हातें । नेऊं पाहतां अंधपंथे ।
सिद्धान्ती म्हणे नयन तूंते । नाहींत येथ काय कीजे ॥२०३॥
एरवी आगमचि डोळे । येथ तरती जाणते भोळे ।
अनवस्थित[११६] तार्किक ओवळे । शिवों न शकती ययाते ॥२०४॥
तंव वादी म्हणे आप्त कवण । जो करी यथार्थ भाषण ।
येणेंचि अनुमानें शब्दप्रमाण । होय अनुमान निश्चये ॥२०५॥
सिद्धान्ती म्हणे ऐसे नाहीं । प्रत्यक्षानुमाने आप्तत्वचि न कळे कहीं ।
यथार्थवक्तृत्वलक्षण लवलाही । यास्तवचि केले ॥२०६॥
आतां यथादृष्ट यथाश्रुत । मजहि हेचि बोलेल निश्चये आप्त ।
ऐसें दृष्टप्रमाणें निश्चित । न शके होवू ॥२०७॥
हा घट दिसलिया आप्ता । तो मजसी येविखीं[११७] आतां ।
बोलेल हे श्रोता । अनुमानूं न शके ॥२०८॥
किंवा पर्वतावरी धुमे । देखिलिया अनुगमे[११८] ।
मजसी परार्थ[११९] प्रेमे । बोलेल आप्तू ॥२०९॥

हेहि न करितां ये अनुमान । निश्चय चुके म्हणोन ।
यालागीं शब्देचि आप्तपण । निर्धारिणें घडें ॥२१०॥ (य११पू.२३८)
आतां शब्दें बोलिलिया अन्य प्रमाणें । जैं यथार्थत्व निश्चय होणें ।
हे परतोग्राह्य[१२०] प्रमालक्षणें । अनुमान नोहे ॥२११॥
'शब्दशक्तिप्रकाशिके'त स्पष्ट । बोलिले आधी जगदीशभट्ट ।
तेहि प्रमाण नीट । दाखवूं संदेह छेदाया ॥२१२॥
''साकांक्षशब्दैर्यो बोधस्तदर्थान्वयगोचरः ॥
सोऽयं नियंत्रितार्थत्वान्न प्रत्यक्षं न चानुमा ॥३॥
योग्यतार्थगताकांक्षा शब्दनिष्ठानुभाविका ॥
प्रत्येकं वा मिलित्वा वा नैते लिंगमसिद्धितः ॥४॥
नाप्तोक्तता तु वाक्यार्थ गर्भाज्ञातोपयुज्यते ॥
वाक्यार्थ नाम पूर्वत्वात्संशयेऽप्यन्वयोदयात् ॥६॥(शब्दशक्तिप्रकाशिका.जगदीश भट्ट)
भावार्थ :- आकांक्षा योग्यताऽसत्ति । मिळूनि जे शब्दार्थ प्रतीति ।
प्रत्यक्षा प्रमा नव्हे ती । आणि नोहे अनुमिती प्रमा ॥२१३॥
परस्पर अपेक्षा जयाची जया । तया शब्दाची आकांक्षा तया ।
जैसे घट आहे वाक्यांत या । घट नामासी आहे या क्रियापदाची अपेक्षा ॥२१४॥
नाहीं तरी घट आणि रेडा । म्हैस आणि कोंबडा ।
रति आणि लांकडा । उच्चारिता अन्वय बोधू न घडे ॥२१५॥
म्हणोनि रक्तपट आहे । एवं आकांक्षा पाहे ।
योग्यता म्हणावी लवलाहे । अर्थबाधविरह[१२२] ॥२१६॥
अग्नीनें धुतली लुगडी । मीठ हाकीत आहे गाडी ।
वांझेचा पुत्र घरे जोडी । तेथ वाक्यार्थप्रौढी उमटेना ॥२१७॥
म्हणोनी जेणे जो अर्थ जोडे । तेचि बोलावे रोकडे ।
तरी ते योग्य वाक्य घडे । अन्यथा अयोग्य ॥२१८॥
कर्ता उच्चारिला ये अवसरी । क्रियापद उच्चारिले संवत्सरीं ।
वाक्यार्थबोध न होय तरी । यालागीं पाहिजे उच्चारीं संन्निधी ॥२१९॥
एवं आकांक्षा संन्निधी योग्यता । मिळोनि लिंग[१२३] न होती सर्वथा ।
अर्थाते[१२४] साध्यभिन्नता[१२५] । नये म्हणोनी ॥२२०॥

प्रत्येक[१२६]लिंग तंव न होती । न होय म्हणोनी [१२७]अन्वयप्रतीति ।
आणि मिळोनि[१२८]लिंगपणा न येती ।
[१२९]अनुमिनोमीतिवद् अनुव्यवसायप्रतीति न होय म्हणूनी ॥२२१॥
आतां आप्त बोलिला वाक्यार्थ । तो हेतू म्हणावा निश्चित ।
तरि अपूर्व असे वाक्यार्थ । लिंग पूर्वी मिळेना ॥२२२॥
आणि संशयींहि घडे अन्वय । म्हणोनि शाब्दी प्रमा अनुमिती न होय ।
नाहीं तरी वेदा येईल स्वये । अनुवादकता ॥२२३॥ (य११पू.२३९)
सकळ शब्द अनुवाद होता । तरी विधि होईल वृथा । अनुमान सामान्य जाणवी
तत्वता । विधिविशेषविज्ञानवत्ता[१३०] नये शब्दाविणें ॥२२४॥
म्हणोनि लौकिकशब्दीं परतःप्रमा । आणि वैदिकशब्दीं स्वतःप्रमा ।
वेदासी अन्य शास्तृप्रतिमा[१३१] । नाहीं म्हणोनि ॥२२५॥
तंव वादी म्हणे हे असो । शब्द अनुमानहि नसो ।
परि दिसे ते आम्ही वदतसो । न पैसो[१३२] येथे संशय ॥२२६॥
एकादा नूतन पदार्थ सांपडता । भाषेंत तया नांव नसतां ।
तरी अन्य नाम ठेविती तत्वतां । शास्त्रकल्पक ॥२२७॥
म्हणोनि शब्द कहीं । आम्ही म्हणो नियतार्थ नाहीं ।
सिद्धान्ती म्हणे लवलाही । उन्मत्त तूं ॥२२८॥
पदार्थासी इच्छागत । कल्पक जरी नांव ठेवित ।
संसार हा तंव अनंत । होतील पर्याय अनंत एक पदार्थाचे ॥२२९॥
अनंत कालीं सम नामकरण । तेणें अनंत पर्याय होतील उत्पन्न ।
आणि एक एक शब्दहि आपण । होईल अनंतार्थक ॥२३०॥
ऐसे जाहलिया जे पूर्वी कांहीं । आम्ही दोष दाविले ते सर्वही ।
येऊनि आदळतील लवलाही । त्वन्मतशब्दकंठीं ॥२३१॥
एका नगरांत शत माणसांचे । रामकृष्ण नाम ठेविता साचे ।
हाका मारिता अवघियाचे । ओ देणें घडे ॥२३२॥
मग मातापिता आडनांवावरून । प्रत्येक रामकृष्ण करावे लागे भिन्न ।
एवं एका शब्दासी अनंतार्थपण । तैं अर्थनिर्धारण निमाले ॥२३३॥
आतांपर्यंत झाले नाहीं । पुढें ऐसे होवो म्हणसी कहीं ।

मग केव्हां तरी या शब्दघायी[१३३] । व्यवहारोच्छेद घडेल ॥२३४॥
हा दोष येऊं नये म्हणोन । पदार्थाचे पाहोनि गुण ।
शास्त्रकार नव[१३४]नामकरण । कल्पिती म्हणसी ॥२३५॥
तरी गुणक्रियावाचक[१३५] अन्य । साधित वा सिद्ध शब्द सामान्य ।
अर्थी आश्रवोनि मान्य । विशेष नामकरणें कल्पक तुष्ट ॥२३६॥
कल्पिला होय जरी धर्म । तरी तो आश्रयी ईश्वर वा कर्म ।
परलोकगति[१३६] संभ्रम । म्हणोनिया ॥२३७॥
कोणत्याहि आगमाच्या ठायीं । ईश्वर वा कर्माविण कल्पना नाहीं ।
येणेंहि मानें पाही । नियतार्थता शब्दा ॥२३८॥
तुझा बाप होता भूत । म्हणोनि तूं जन्मलासी उन्मत्त ।
यालागीं बोंबलसी येथ । निरंकुश तोंडें ॥२३९॥
एरवीं गा शब्दातें कहीं । अनियतार्थता सर्वथा नाहीं ।
ते जाणावया शब्दाच्या ठायीं । वृत्तिचतुष्टय निश्चयें ॥२४०॥ (य११पू.२४०)
त्यांत मुख्य एक शक्ति । जेथ परतंत्र जीवाची गती । तियेची असतां अनुपपत्ति[१३७]
। मग लक्षणादौ प्रवृत्ति किंचित् जीवस्वातंत्र्यें ॥२४१॥
एवं सप्रयोजन स्पष्टे । बोधें जैं शक्ति उमटे ।
तैं श्रुत्यर्थ आघवा थाटे । अन्यत्र लक्षणा गौणी आदि ॥२४२॥
यालागीं शक्तीचें निरूपण । स्पष्ट करूं संपूर्ण ।
श्रोते होवोनि सावधान । करावे श्रवण आवडी ॥२४३॥

श्रीमहाराजकृत नवे लक्षण

''अधीतेऽनधीतेऽप्यनुसंधानंविना शब्दे युगपदर्थबोधकसामर्थ्यं शक्तिः'' (स्वकृत)

अर्थः- शब्द उच्चारल्याबरोबर अनुसंधान नसतां एकदम अर्थाचा बोध होणें हें जें त्या शब्दाचें सामर्थ्य त्याचें नावं शक्ति. - यद्यपि कोशादिकापासून अमुक शब्दाचा अमुक अर्थ आहे, असें अनुसंधानानें कळून घ्यावे लागते, तरी पुनः तो शब्द उच्चारल्यावर अनुसंधान करावे लागत नाहीं; आणि लक्षणादि वृत्तींत तर प्रत्येक वेळीं अनुसंधान करावें लागते; म्हणजे अमुक वाक्याची अमुक ठिकाणीं लक्षणा आहे असें जरी समजलें, तरी दुसऱ्या वेळीं तेंच वाक्य उच्चारलें असतां लक्षणेचें अनुसंधान करावे लागते; म्हणून कोशादिकांत लक्ष्यार्थवाचकाचा



विशेष संग्रह नसतो; आणि व्याकरणहि लक्ष्यार्थक प्रकृतिप्रत्ययाच्या विचारावर स्थिर होत नसते, तर ते शक्तीवरच स्थिर होत असते. म्हणून हे आमचे शक्तीचें लक्षण निर्दुष्ट आहे. अथवा - ''असंबंधिशब्दार्थसंबंधः शक्तिः'' असें लक्षण करावे. शब्दाचा व अर्थाचा जो असंबंधी संबंध त्याचे नांव शक्ति. लक्षणा जी असते ती शक्यसंबंधी असते. शक्ति ही कोणाच्या संबंधिनी नसते. म्हणून असंबंधिशब्दार्थसंबंध असें आम्ही तिचें लक्षण केले आहे. यालाच संकेत व समयहि म्हणतात.

**ज्ञानेश्वरी -**

तरी अनादि परब्रह्म । जे जगदादिविश्रामधाम ।
तयाचें एक नाम । त्रिधा पैं असे ॥३२८॥
तें कीर अनाम अजाति । परि अविद्या वर्गाचिये राती ।
माजी ओळखावया श्रुती । खूण केली ॥३२९॥
उपजलिया बाळकासी । नांव नाहीं तयापाशी ।
ठेविलेनि नांवेसी । ओ देत उठी ॥३३०॥
कष्टले संसार शिणे । जे देवो येती गाऱ्हाणे ।
तयां ओ दे नांवें जेणें । तो संकेत हा ॥३३१॥ (अ.१७) (य११पू.२४१)

आतां शक्ति म्हणजे काय याचें मतभेदानें विवेचन करूं. पण एवढें लक्षांत ठेव कीं, शक्तीविषयींच्या मतभेदानें शब्दाचें ठिकाणीं अनियतार्थता येत नाहीं. नैय्यायिक ईश्वरेच्छा शक्ति शब्दार्थ मानतात, म्हणून त्यांच्या मतांत घट शब्दाचा अर्थ घट होतो, आणि भूषणकार योग्यता शक्ति मानतात, म्हणून त्यांचे मतांत घट शब्दाचा अर्थ पट होतो असें मुळींच नाहीं. आतां शक्तीविषयीं मतभेद सांगतो -

''अमुक शब्दापासून अमुक अर्थाचा बोध व्हावा अशी जी ईश्वराची इच्छा'' तिला नैय्यायिकानीं शक्ति म्हटलें आहे.

**''अस्मात्पदादयमर्थो बोद्धव्य इति ईश्वरसंकेतः शक्तिः''।**

संकेत म्हणजे इच्छा.

वादी उवाचः- अहो हें न्यायाचें मत बरोबर नाहीं असें मला वाटते, कारण शब्दाच्या जवळ परमेश्वराची इच्छा राहूं शकत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- परमेश्वर अंतर्यामी असल्यामुळें सर्वच ठिकाणीं त्याची इच्छा संभवते, म्हणून कोणत्या पदापासून कोणत्या अर्थाचा बोध व्हावा असा संकेत परमेश्वराला करतां येतो. घट असा शब्द उच्चारल्यानें कंबुग्रीवादिमती व्यक्ति जी मनांत येते, त्यावरूनच घट शब्दानें ती व्यक्ति समजावी अशी ईश्वराची इच्छा आहे असे होते. नाही तर प्रत्येक मनुष्याची बुद्धि स्वतंत्र असल्यामुळें, शब्द व अर्थ जड असल्यामुळें, आणि शब्दार्थाचा संबंध प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळें, एकाद्यानें घट शब्द उच्चारला तर त्याचा अर्थ दुसऱ्याच्या मनांत घटच यावा पट कां येऊं नये?

वादी उवाचः- अमुक पदार्थाचे अमुक नांव हे मनुष्यानें पहिले समजून घेतले असते, आणि त्यामुळेंच एकादा शब्द उच्चारला कीं त्याचा अर्थ दुसऱ्याच्या मनांत येतो; याचा ईश्वरेच्छेशी कांहीं संबंध नाहीं.

सिद्धान्ती उवाचः- हें तुझें म्हणणें सम्यक् नाही; कारण प्रथम तान्ह्या मुलाला अमुक शब्दाचा अमुक अर्थ आहे हें निश्चित सांगतां येत नाहीं; आईबापालाहि सर्व शब्दांचा अर्थ अंगुलिनिर्देशानें दाखवून देतां येत नाहीं; अथवा तुझ्या म्हणण्याप्रमाणें जे प्रत्यक्ष पदार्थ आहेत, व ज्यांच्या विषयीं अंगुलिनिर्देश करतां येतो त्याच पदार्थाचा शब्दानें बोध होऊं शकेल. (य११पू.२४२) आत्मा आकाश काल दिशा मन इत्यादि अदृश्य पदार्थ व स्वर्गादि परोक्ष पदार्थ यांचा बोध होऊं शकणार नाही; व त्यामुळें कोणी व्युत्पन्नचित्तहि[१३८] होणार नाहीं. सर्व सर्वकाळ मूर्खच राहतील. म्हणून परमेश्वराच्या इच्छेनेंच शब्द उच्चारल्याबरोबर अर्थ मनांत येतो असें म्हणणें श्रेष्ठांना शोभतें.

वादी उवाचः- अहो चैत्रमैत्रादिक जीं नांवें आहेत त्यांत परमेश्वराची इच्छा कशी संभवते?

सिद्धान्ती उवाचः- यद्यपि परमेश्वराची विशेष इच्छा तेथें संभवत नाही, तथापि ''एकादशेऽहनि पिता नाम कुर्यात्'' अकराव्या दिवशीं बापानें नांव ठेवावे या श्रुतीवरून परमेश्वराची सामान्य इच्छा तेथेंहि आहेच. याविषयीं युक्ति अशी आहे कीं, सर्व संयोग[१३९] जसा प्रारब्धानीं होतो तसा नामसंयोगहि प्रारब्धानींच होतो. नाहीं तर व्यर्थ यदृच्छेला कारण मानावे लागेल, आणि नामावरून ग्रहांची सुखदुःखद स्थिति कळणार नाही, त्यामुळें ज्योतिष व्यर्थ होऊं लागेल, प्रारब्ध स्वतः जड असल्यामुळें परमेश्वरेच्छेवांचून त्याचे फलप्रदत्व संभवत नाहीं. म्हणून पिता जरी चैत्रमैत्रादिक नांवें ठेवतो, तरी अंतःपरमेश्वर-प्रेरणारूप इच्छा त्याला मूळ असल्यामुळें चैत्रमैत्रादिक नामांचें ठिकाणींहि ईश्वरेच्छारूप शक्तिच विद्यमान आहे. एकादें कार्य परमेश्वर एकाद्याचे हातून निर्विघ्न करवितो, आणि प्रारब्धामुळें एकाद्याच्या हातून तेंच कार्य करवितांना विघ्नें आणतो, तेव्हां जीवाचें स्वातंत्र्य नामरूपाविषयीं नसल्यामुळें, आणि ते नामरूपाला स्पष्ट करिते झाले अशी श्रुति असल्यामुळे, सकल शब्दांचे ठायीं परमेश्वरेच्छा शक्तिच निश्चित होत आहे. कोणत्याही कार्याचा जीव अभिमान मात्र व्यर्थ घेत असतो. प्रयत्नवादात देखील अनन्य परमेश्वराला शरण गेल्यास व त्याच्यावर भरंवसा टाकून कार्य केल्यास फळ होते असें आम्ही म्हणतो. म्हणून ठेवलेल्या नांवाचें ठिकाणीं देखील परमेश्वरेच्छाच शक्ति आहे, हें नैय्यायिकांचें मत आहे. नवीन नैय्यायिक लौकिक[१४०]पदाचें ठिकाणीं जीवेच्छाच शक्ति आहे असें म्हणतात. योगभाष्यानुसारे योगीजन आणि मंजुषाग्रंथान्वयें वैय्याकरणी लोक वाच्यवाचकभावाचा तादात्म्यसंबंध[१४१] शक्ति मानीत असतात, तो पितापुत्रादिकांप्रमाणे नवीन (य११पू.२४३) कल्पिलेला नसतो; कारण तो कल्पित असतां तर प्रत्येकाची कल्पना स्वतंत्र असल्यामुळें एकाच्या मनांतला अर्थ दुसऱ्याच्या मनांत स्थित झाला नसता. वैय्याकरणांचें दुसरें एक मत आहें तेंहि येथें सांगतो. बृहद्वैय्याकरणभूषणकार हरिकारिकेच्या आधारें म्हणतातः-

**इंद्रियाणां स्वविषयेष्वनादिर्योग्यता यथा ।**
**अनादिरर्थैः शब्दानां संबंधो योग्यता तथा ।।३७।।**

**इंद्रियाणां चक्षुरादीनां स्वविषयेषु चाक्षुषप्रत्यक्षादिषु यथा अनादिर्योग्यता बोधकारणता तथा शब्दानामपि सैव योग्यतेत्यर्थः ।**

**इयं च पदार्थान्तरम् ।।**(बृहद्वैय्याकरणभूषण शक्तिनिर्णय.)

भावार्थः- इंद्रियांचा आपआपल्याविषयीं जसा स्वाभाविक संबंध आहे, त्याप्रमाणें शब्दातही आपल्या धर्माचें ज्ञान करून देण्याची कारणतारूप योग्यता राहते, तिला शक्ति म्हणतात. ही एक स्वतंत्र पदार्थ आहे. परमेश्वराची इच्छा शक्ति नाही, कारण अपभ्रष्ट पदाचें ठिकाणीं व लक्ष्यार्थाचें ठिकाणीं देखील परमेश्वराची इच्छाच नैय्यायिकांना मानणें भाग पडत असल्यामुळें, त्यांनाहि

शक्ति म्हणावी लागेल. मीमांसकांच्या मतें शक्ति कांहीं पदार्थान्तर आहे, आणि वेदान्ताचें मत तर असें आहे की, सर्व पदार्थामध्यें जे आपआपले कार्य करण्याचे सामर्थ्य तीच शक्ति आहे. अग्नीच्या समोर प्रतिबंधक असतांना अग्नि जळत असूनहि दाह करीत नाहीं, आणि उत्तेजक मिळाल्यास दाह करितो. म्हणून अग्निमध्यें शक्ति आहे, तसें शब्दामध्येंही सामर्थ्य आहे; परंतु शब्दाची शक्ति जाणली असतांना कार्य करिते, व इतर शक्ति न जाणली असतांनाहि कार्य करिते. यद्यपि मुक्या पुरुषानें केलेल्या खुणावरून दुसऱ्याला बोध होतो म्हणून ज्ञातपदाची[१४२] अर्थज्ञानाचें ठिकाणीं करणरूपानें[१४३] अपेक्षा मानतां येत नाहीं; तथापि मुका ज्या खुणा करितो त्या अंगुलिनिर्देशरहित असल्यास दुसऱ्याला कसें तरी शब्दाचें स्मरण करून देतात; आणि त्यामुळें पदाची ज्ञातशक्तिच कार्य करिते असें आम्हा वेदान्तीयांचें मत समीचीन सिद्ध होते. ईश्वरेच्छारूप शक्ति आम्ही मानीत नाहीं; कारण शक्ति पदाचा धर्म असून परमेश्वराची इच्छा परमेश्वराचा धर्म आहे. म्हणून पदाचे व तिचे सांन्निध्य नाही. (य११पू.२४४) एवढ्याकरितां ईश्वराची इच्छा आम्हाला शक्ति मानतां येत नाहीं.

वादी उवाचः- अहो परमात्मा विभु आहे म्हणून त्याची इच्छाहि विभु आहे. विभूचा अल्पस्वल्प पदार्थाशीं संयोग आहे म्हणून परमेश्वराच्या इच्छेचाहि पदाशीं संयोग आहे, आणि यास्तवच शब्दाचें ठिकाणीं ईश्वरेच्छाशक्ति आहे हे नैय्यायिकांचे मत समीचीन आहे.

सिद्धान्ती उवाचः- विभूची इच्छा विभु मानल्यास कोणत्याहि कार्याची उत्पत्ति होणार नाहीं, कारण एकच कार्य सर्व ठिकाणीं होईल. वृक्षोत्पत्तीची परमेश्वरेच्छा जर विभु मानली तर वृक्षांच्या पानावर देखील वृक्ष उत्पन्न होतील; किंवा तो एकच वृक्ष सर्वत्र उत्पन्न होईल, आणि मग अन्य कार्यांच्या इच्छा सफल न झाल्यामुळें तो इच्छा करणारा परमेश्वर अनीश्वर होईल. म्हणून परमेश्वराची इच्छा आम्ही विभु मानीत नाहीं. मग अर्थातच पदसंन्निहिताभावास्तव[१४४] ती शब्दशक्ति होत नाहीं. भूषणकारानींहि तिचें खंडण केलें आहे. त्यांचा अभिप्राय आम्ही नुकताच सांगितला आहे. *वाच्यवाचकसंबंधहि आम्ही शक्ति मानीत नाहीं, कारण वाच्यवाचकांचा संयोगसंबंध लोकांत प्रसिद्ध नाहीं. *क्रिया क्रियावान् किंवा गुण गुणवान् यांचा समवायसंबंध[१४५] होत असतो, म्हणून तोहि येथें



कल्पिता येत नाहीं. *तादात्मसंबंधहि योग्य नाहीं, कारण अग्नि शब्द उच्चारल्याबरोबर तोंडाचा दाह झाला पाहिजे तो होत नाहीं. *भूषणकारांचेहि मत समीचीन नाहीं. कारण भूषणकारांनीं पदाचें ठिकाणीं योग्यता मानून तिला पदार्थान्तर मानलें आहे. तेव्हां वर्णसमुदायाहून ती जर निराळी असेल, आणि पदाचा धर्म होत नसेल, तर पद असमर्थ झाल्यामुळे नपुंसक अमोघवीर्य आहे या उन्मत्तोच्चरित वाक्याप्रमाणें असमर्थ पद अर्थबोधकयोग्यतायुक्त[१४६] आहे असें वाक्य भूषणकाराला उच्चारावे लागेल. भूषणकारानें हरिकारिका दिली आहे व ती आम्हाला प्रमाणहि आहें. परंतु तिचा अर्थ ''पदाचें ठिकाणीं अनादि असलेले सामर्थ्य'' असा आम्ही करितो. *भूषणकारावर जे दोष आहेत तेच मीमांसकांच्या शक्तीवर येतात.

*आतां भाट्टमत सांगतो. वाच्यवाचकांचा अत्यंत भेद नाहीं व अत्यंत अभेद नाहीं. कारण अत्यंत भेद असतां तर घट पदानें पटाचाहि बोध झाला असता, अथवा बोधच झाला नसता; (य११पू.२४५) आणि वाच्यवाचकांचा अत्यंत अभेद असतां तर वन्हि शब्द उच्चारल्यानें तोंडाचा दाह झाला असता; म्हणून वाच्यवाचकाचा भेदाभेदरूप तादात्म्यसंबंध आहे, त्याहून अन्य सामर्थ्य नाहीं. वाणीमध्यें वाचक राहते, आणि वाच्य बाहेर असते या अंशानें त्यांचा भेद आहे; आणि ''ॐ मित्येतदक्षरमिदँसर्वम्'' असें मांडुक्योपनिषदेंत सांगितलें आहे. ॐ हें अक्षरच सर्व कांहीं आहे असा त्या श्रुतीचा अर्थ आहे, म्हणून वाच्यवाचकांचा अभेद आहे. एवं भेदाभेद सिद्ध आहे. हें भाट्टांचें मत समीचीन नाही. कारण ज्या ज्या वस्तूचा भेद त्याच वस्तूचा अभेद कोणत्याहि ठिकाणीं दृष्ट नाहीं. मांडुक्यश्रुति तर ॐ या अक्षराची व ब्रह्माची अभेदभावना करावी म्हणून उपासना सांगत आहे. वाच्यवाचकाचा अभेद सांगत नाही. स्वामीविद्यारण्य आपल्या अनुभूतिप्रकाशांत असेंच म्हणतातः- ''यदोंकारस्य सार्वात्म्यं ध्यानायै तन्न वस्तुतः'' ॐकाराचे जें सर्वात्मत्व सांगितले तें ध्यानाकरितां आहे, वस्तुतः नाही. तेव्हां हे भाट्टमतहि समीचीन नाहीं.

याप्रमाणें नैय्यायिकाला घेऊन वेदान्तापर्यंत आम्ही मतें सांगितली. याविषयीं सुरतरूकर्त्याचा असा अभिप्राय आहे कीं, - खरोखर या मतांचा विचारच निरर्थक आहे. कारण कोणाच्याहि मतांत घटाचा अर्थ पट कांहीं होत नाहीं.

पुनः जीं हीं शक्तिवादाविषयीं मतें दिली आहेत त्यांत ठोकळ असे दोन भाग करता येतात. चेतनशक्तिवाद आणि जडशक्तिवाद. ईश्वरेच्छावादाला चेतनशक्तिवाद म्हणतां येईल. दोन्ही पक्ष आपआपल्यापरी दूषित आहेत. प्रथमपक्ष मानल्यास ईश्वराच्या इच्छेनें वैदिक शब्दाचे देखील नाना अर्थ होतील; कारण या आमच्या म्हणण्याला दृष्ट प्रतिपत्तिहि आहे. कपिल व व्यास दोघेहि परमेश्वराचेच अवतार आमच्या शास्त्रांत सांगितले आहेत. तथापि दोघानींही अजाश्रुतीचे अर्थ भिन्न भिन्न केलें असून परस्परांचे खंडण केलें आहे. म्हणून हा चेतनशक्तिवाद समीचीन नाही; आणि जडशक्तिवादहि समीचीन नाहीं; किंवा संयोग, समवाय किंवा तादात्म्य असा कोणताही संबंध सिद्ध होत नाहीं, हें आम्ही आतांच सांगितलें. शिवाय ज्ञान चेतनधर्म आहे तो नैय्यायिकांच्या मतांत आणि मीमांसकांचे मतांत आत्मधर्म आहे. सांख्य, योग व वेदान्तियांच्या मतांत अंतःकरणधर्म आहे. (य११पू.२४६) कोणत्याही मतांत शब्दधर्म नाहीं. म्हणून जडशक्तिवादांत शब्द अर्थज्ञानोत्पादक होणार नाहीं. पदशक्ति अंतःकरणांतील अर्थज्ञानाला उपादान आहे कीं निमित्त आहे ? प्रथमपक्ष समीचीन नाहीं, कारण ज्ञान पदधर्म नाहीं; आणि द्वितीयपक्षहि समीचीन नाहीं; कारण अंतःकरणद्रव्याचा व शब्दशक्तीचा जडशक्तिवादियांनी संबंध दाखविला नाहीं. संयोगसंबंध कल्पणें उचित होणार नाहीं, कारण तो अव्याप्यवृत्ति असल्यामुळें अर्थाच्या एकदेशाचेंच ज्ञान तो उत्पन्न करील, सर्व देशाचें ज्ञान तो उत्पन्न करणार नाहीं. म्हणून हा जडशक्तिवादहि समीचीन नाहीं. वेदान्ताचेंहि मत सकृद्दर्शनीं जडशक्तिवादा प्रमाणेंच दिसते; पण तसें मानल्यास वेदान्ताच्या चेतनकारणवाद प्रतिज्ञेची हानी होते. म्हणून वेदान्त व न्यायाला अनुसरून माझें मत असें आहे.

आकाशापासून वायू झाला या श्रुतीचा अर्थ जड पदर्थाचा कार्यकारणभाव नसल्यामुळें आकाशोपहित ब्रह्मापासून वायू झाला असा आम्हा वेदांतियास अर्थ करावा लागतो. कारण स्वतः प्रवृत्तिशून्यत्वच[१४७] जडाचें लक्षण आहे. म्हणून शब्दोपहित परमेश्वराची इच्छा शब्दधर्म होत्साती शक्तिरूपिणी होते; आणि तत्संबंधावच्छिन्न[१४८] लक्षणारूपिणी होते. यावत्कार्य[१४९] तिची निवृत्ति होत नसल्यामुळें योग्यता स्वभाव सामर्थ्य इत्यादिक स्थाय्यर्थवाची[१५०] शब्दांचाहि यावत्प्रलय ती विषय होते. साधुपदोपहित आणि असाधुपदोपहित चेतनेच्छा



उपाधिभेदास्तव भिद्यमान[१५१] असल्यामुळें भूषणकारांनीं दिलेले दोषहि या मतांत येत नाहींत. कल्पिलेला शब्दार्थसंबंध देखील भगवत्प्रेरणेहून अपूर्व नाहीं; म्हणून एकादा नवीन शोध काढणारा जसा अन्य पुरुषाच्या दृष्टीनें महापुरुष ठरून तच्छब्द[१५२] त्याच्या शोधाविषयीं प्रमाण होतो, तद्वत् सर्व शब्दांचे ठायीं दृष्टादृष्टविषयशक्तिस्थापक[१५३] परमात्मा महापुरुष आहे असें वाटून त्याचा शब्द वेद कोणाला प्रमाण होणार नाहीं? वादनक्षत्रमाला ग्रंथांत अपय्यादीक्षिताचार्यांनीं सकल शब्दांना अंतर्यामिवाचकत्व[१५४] सांगितलें आहे. याविषयीं मी नवीनहि युक्ति सांगतो. प्रातिभासिक सत्तेंत उच्चारलेला शब्द किंवा व्यावहारिक सत्तेंत उच्चारलेला शब्द परस्पर शक्तीनें व भ्रमानें बोध करीत असतो; म्हणजे प्रातिभासिकवाचक रज्जुभूजग आहे. यांत भुजगपदाची शक्ति व्यावहारिक भुजंगाचे ठायीं असते; (य११पू.२४७) कारण प्रातिभासिक भुजग अत्यंत अलीक[१५५] असतो. तद्वत् रज्जुभुजगसमयीं भुजगपदाची स्मृति येते; म्हणून व्यावहारिक-भुजगवाचक भुजगपदाची शक्ति अलीक अशा रज्जुभुजगाचें ठायीं भ्रमानें आहे असें मानावे लागते.– तद्वत् मी बहुत होईन अशी इच्छा करणाऱ्या अंतर्यामी परमेश्वराचें ठिकाणी, त्यावांचून प्रपंचाच्या अलीकत्वास्तव, सर्व शब्दांची शक्ति आहे; आणि गुणहि सामर्थ्यवाचक असल्यामुळें त्यांचाहि शक्तीतच अंतर्भाव होतो, म्हणून सर्वगुणवान् परमेश्वराचें ठिकाणच्या सकल शब्दांची गौणी वृत्तिहि आहे. शुद्ध चेतन कल्पितसंबंधी[१५६] असले तरी सर्वथा शब्दविषय नाहीं, म्हणून पारमार्थिक सत्तेंत शुद्धचेतनाचे ठायीं सकल शब्दांची लक्षणा आहे. शुद्धबुद्धादि विशेष धर्मांची देखील ज्ञान झाल्यावर आवश्यकता नसल्यामुळें त्या पदांची लक्षणाच आहे. म्हणूनच पारमार्थिक सत्तेंत लक्षणा ईश्वरेच्छारूप वा स्वाभाविक आहे; आणि अन्य सत्तेंत लक्षणा जीवकल्पित आहे. एवढ्याच करितां शब्दासी मुख्यार्थसंबंधच[१५७] नित्य आहे असें पूर्वमीमांसक म्हणतात -

**''औत्पत्तिकस्तु शब्दस्यार्थेन संबंधस्तस्य ज्ञानमुपदेशोऽव्यतिरेकश्चार्थेऽनुपलब्धे तत् प्रमाणं बादरायणस्यानपेक्षत्वात् ॥५॥ (अध्या.१.पाद१.सूत्र५) शब्दस्य नित्यवेदघटकपदस्य अग्निहोत्रं जुहुयात्स्वर्गकाम इत्यादेः अर्थेन तत्तत्प्रतिपाद्यर्थेन संबंधः शक्तिरूपः औत्पत्तिकः स्वाभाविकः नित्य इति यावत्''** (सुबोधिनी टीका)

तद्वत् अपभ्रंश[१५८] शब्दहि अंतर्यामीचे वाचक आहेत. यद्यपि मीमांसामतांत अनेक स्थानीं शक्ति कल्पणें गौरव म्हटलें आहे, तथापि अनेक शब्दोपहितचेतनेच्छा विरुद्ध नाहीं, आणि ते वेदान्तसंमत आहे. यज्ञकर्माच्या दृष्टीनें केवळ संस्कृत शब्दांतच शक्ति असली पाहिजे हे मीमांसामत समीचीन आहे, पण वैद्यज्योतिषादि लोकव्यवहाराचे दृष्टीनें कोणत्याही पदाचें ठिकाणीं शक्ति संभवते. नास्तिकांच्या दृष्टीनें वेद देखील रचित असल्यामुळें परस्पर अपभ्रंशास्तव[१५९] साध्वसाधु[१६०] शब्दांचा नियमच रहात नाहीं परंतु त्यांचें मत आम्हाला येथें घ्यावयाचे नाहीं; तथापि भगवदर्थबोध करणारी शक्ति तर अनेक शब्दांत समान आहे; (य११पू.२४८) आणि तीं सर्व नांवें तारकहि आहेत. तथापि कांहीं नामांची भगवद्विषयक शक्ति शीघ्र प्रगट होते, आणि कांहीं शब्दांची व्यवधानेंकरून[१६१] प्रगट होतें. जशी गौरोऽहं या शब्दाची अंतर्यामीचें ठिकाणीं शक्ति जीवद्वारा वादनक्षत्रमालाकारानीं सांगितली आहे; आणि घटादि पदांची परमेश्वराचें ठिकाणीं शक्ति जडद्वारा ''घटादीक नारायणाचीच नामें । परी तीं अविद्यामये दुःखधामे'' या श्लोकानें वामनानें सांगितली आहे. परंतु संस्कृत प्राकृत सर्व भगवन्नामाची शक्ति तर ''स्तवैरुच्चावचैःस्तोत्रैः पौराणैः प्राकृतैरपि'' या वाक्यांत स्वतः भगवंतानेंच आपल्या ठिकाणीं प्रतिबंधरहित सांगितली आहे. म्हणून कोणत्याहि भाषेंत भगवद्गुण समान फलदायकच होतात; आणि कोणत्याहि शब्दाची कोणत्याहि भाषेंत शुद्ध चैतन्याविषयीं लक्षणाच करावी लागते. द्विजातिविषयीं वेदश्रवणाचा जो विधि आहे तो नियमादृष्टोत्पादक[१६२] आहे; म्हणून तद्विषयक शंका येथें प्रविष्ट नाहीं.

**''संस्कृत वाणी देवें केली । प्राकृत चोरापासुनी झाली ॥**
**हे असो पक्षाभिमान बोली । देवाची चाली निरभिमान'' ॥**

असें एकनाथमहाराज स्पष्ट म्हणतात. म्हणून म्लेच्छ भाषेचा उच्चार करूं नये, अपभाषेचा उच्चार करूं नये इत्यादि श्रुति, आणि संस्कृत शब्दांतच शक्ति आहे इत्यादि बृहद्वैय्याकरणभूषणकाराचें मत यज्ञाविषयींच प्रसिद्धि पावो; भक्तिज्ञानाविषयीं नाहीं. याचा विचार आणखीहि पुढें येईल. लौकिकव्यवहारांत देखील सर्व शब्दांची संस्कृतांतच (शब्दांत) शक्ति आहे, असा ऐकान्तिक[१६३] नियम करतां येत नाहीं; कारण त्या भाषेंतील त्या शब्दांत त्यांची विशिष्ट शक्ति असते. संस्कृत यव शब्दाची शक्ति शुक धान्याचें ठिकाणीं आहे, आणि प्रियंगुविषयीं म्लेच्छ भाषेंत यव शब्दाचा व्यवहार आहे; म्हणून प्रियंगूचें ठिकाणीं यव शब्दाचे शक्तीचा भ्रम आहे असें संस्कृतवेत्ते म्हणतात, तर पिकनेमादि शब्दांचीहि म्लेच्छभाषागत शक्ति सोडून दिली असतां संस्कृतांत देखील त्यांचा व्यवहार भ्रमाचाच होईल असें जैमिनी आपल्या पूर्वमीमांसेंत स्पष्ट म्हणतात.(य११पू.२४९)

**''चोदितं तु प्रतीयेताविरोधात् प्रमाणेन ॥१०॥''** (अध्या.१ पाद.३ सूत्र १०)

**शबरभाष्यः-**

**अथ यान् शब्दान् आर्या कस्मिंश्चिदर्थे आचरन्ति म्लेच्छास्तु कस्मिंश्चित् प्रयुंजन्ते।**
**यथा पिकनेमसततामरसादिशब्दास्तेषु संदेहः ।**
**किं निगमनिरुक्तव्याकरणवशेन धातुतोऽर्थः कल्पयितव्यः उत यत्र म्लेच्छा आचरन्ति स शब्दार्थ इति ।**
**शिष्टाचारस्य प्रामाण्यमुक्तं नाशिष्टस्मृतेः ।**
**तस्मान्निगमादिवशेनार्थकल्पना ।**
**निगमादीनां चैवमर्थवत्ता भविष्यति ।**
**अनभियोगश्च शब्दार्थेष्वशिष्टानाम् ।**
**अभियोगश्चेतरेषाम् ।**
**तस्माद्धातुतोऽर्थः कल्पयितव्य इत्येवं प्राप्ते ब्रूमः ।**
**चोदितमशिष्टैरपि शिष्टानवगतं प्रतीयेत ।**
**यत् प्रमाणेन विरुद्धं तदवगम्यमानं न न्याय्यं त्यक्तुम् ।**
**यत्तु शिष्टाचारः प्रमाणमिति सतत्प्रत्यक्षानवगतेऽर्थे ।**
**यत्त्वभियुक्ताः शब्दार्थेषु शिष्टा इति ।**
**तत्रोच्यते अभियुक्ततराः पक्षिणां पोषणे बंधने च म्लेच्छाः ।**
**यत्तु निगमनिरुक्तव्याकरणानामर्थवत्तेति ।**
**तत्रैषामर्थवत्ता भविष्यति न यत्र म्लेच्छैरप्यवगतः शब्दार्थः ।**
**अपि च निगमादिभिरर्थे कल्प्यमाने अव्यवस्थितः शब्दार्थो भवेत् ।**
**तत्राऽनिश्चयः स्यात् ।**
**तस्मात् पिक इति कोकिलो ग्राह्यः नेमोर्द्धं तामरसं पद्मं सत इति दारुमयं पात्रं -परिमण्डलं शतच्छिद्रम्''।**

भाष्यभावार्थः- पिकनेमतामरसादि शब्दांचा आर्यभाषेंत व्यवहार नाहीं. म्लेच्छ विशेषार्थाचें[१६४] ठिकाणीं व्यवहार करितात. म्हणून त्या अर्थाविषयीं म्लेच्छभाषाच प्रमाण मानावयाची किंवा व्याकरणानें प्रकृतिप्रत्यय बसवून निराळा अर्थ करावयाचा? म्लेच्छभाषा धर्मसाधन नसल्यामुळें पिकादि शब्दांचा निराळा अर्थ करावा असें पूर्वपक्षानें प्राप्त झालें असतां – सिद्धान्त हा कीं, असें करण्याची आवश्यकता नाहीं. प्रियंग्वादि वाचक म्लेच्छ भाषेंतील यवादि शब्द जसे अर्थवादविरोधी[१६५] किंवा शुकधान्यादि यज्ञद्रव्यविरोधी[१६६] आहेत, तद्वत् पिकादि नाहींत. म्हणून त्यांच्या अर्थाविषयीं म्लेच्छव्यवहारप्रसिद्धि आहे.

शितिकंठाचार्यहि असाच अर्थ करितात. या अधिकरणावरून तर श्रुति स्मृतिपुराणाविरुद्ध अपभ्रष्ट भाषेचाच त्याग आहे, अविरुद्ध अपभ्रष्ट भाषेचा नाहीं हे प्रत्यक्ष सिद्ध होते. वंशीधरानें ''प्राकृतं श्रवणं व्यर्थं न पुण्यं तेन जायते'' इत्यादि श्लोक प्रमाण देऊन प्राकृत भगवत्स्तोत्राची निंदा केली आहे, ते जळजळित द्वेषामुळें आहे. (य११पू.२५०) प्रमाण दिलेला श्लोक तर हरिभजनव्यतिरिक्त प्राकृत गाथ्याची निंदा करीत आहे. आतां अनेक शब्दपर्याय होणें व्यर्थ आहे, अशी जर कोटी असेल तर कोषहि व्यर्थ होतील, आणि कोष अग्निपुराणांत आहे; म्हणून भगवद्विषयक शक्ति सकल शब्दाचें ठिकाणीं आहे, वैदिककर्मविषयक संस्कृत शब्दाचेच ठिकाणीं आहे, आणि लौकिकविषयक यथाप्रकाशित[१६७] आहे. लौकिक पदाचें ठिकाणीं जीवइच्छारूप शक्ति जेथें मानली आहे ती एकजीववादान्वयें आह्मा वेदान्तियांनां संमत आहे, आणि जीवकल्पित गुणगानानीं परमात्मा प्रसन्न होतो हें तिचें शेवटलें फळ आहे. याच पद्धतीनें आज्ञासिद्धमंत्रांचें[१६८] ठिकाणीं सद्गुरूची इच्छाच दुर्जनतोषन्यायानें जीवदृष्टीनें म्हणा किंवा ईश्वरदृष्टीनें म्हणा, शक्ति सिद्ध होत असल्यामुळें त्यांना सिद्धारिचक्र[१६९] पहावे लागत नाहीं. हाच सुरतरूकाराच्या मतानें सर्वशक्तिवादियांच्या मतांचा समन्वय आहे.

शिष्य उवाचः- भगवन्! शब्द नियतार्थ आहे हें मला उत्तम समजलें. तसेच लक्षणा ही वृत्ति नियतार्थ आहे, नाहीं तर तिचें ठिकाणीं जहती, अजहती, जहदजहती आणि लक्षित असे चारच भेद संभवणार नाहींत. तशीच सर्व वृत्तींची नियतता[१७०] आहे. ध्वनिविषयीं देखील व्यंग्यचमत्कारत्वें नियतता आहे, नाहीं तर गुणीभूत व्यंग्यकाव्याची व ध्वनिकाव्याची तुल्यता होईल.

श्रीगुरुरुवाचः- तुला समजलें हें उत्तम झाले. शक्तीला अनुसरूनच लक्षणा व इतर सर्व वृत्ति आहेत. तात्पर्यानुपपत्ति[१७१] हें लक्षणेचें बीज आहे खरें, तरी लक्षणेमध्येंहि पुरुष परतंत्र आहेच. नाहीं तर गंगेमध्यें घर आहे या वाक्याची लक्षणा आंब्याच्या झाडावर होण्याचा प्रसंग यावयाचा. म्हणून शक्यसबंधी वृत्तीलाच लक्षणा म्हणतात. स्वार्थाचा त्याग करून संबंधाचें जी ग्रहण करिते ती जहती होय, स्वार्थाचें ग्रहण करून अधिक संबंधी अर्थाचें जी ग्रहण करिते ती अजहती होय; आणि स्वार्थाच्या कांहीं भागाचा जी त्याग करिते ती भागत्याग म्हणजे जहदजहती होय.

शिष्य उवाचः- येथें मला एक संशय आहे तो स्वामीची अनुज्ञा आहे असें समजून निवेदन करितो. शक्तिवांचून लक्षणासंभवत नाहीं, (य११पू.२५१) म्हणून शक्ति आहे हें मला समजलें; पण एवढ्यानें शब्दाचा वाच्य पक्ष सत्य होऊं पहात असून लक्ष्य जें परब्रह्म तें तात्पर्यानुपपत्तीमुळें जीववृत्तीनें अंगिकारावे लागते, म्हणून वेदाचा अद्वैतपर अर्थ जीवकल्पित आहे असें म्हणावे लागते, आणि तेवढ्यावरूनच वेद जीवकल्पित ठरतील, किंवा अद्वैत तरी असत्य होईल.

श्रीगुरुरुवाचः- वत्सा तूं फार बुद्धिमान् आहेस. कोणी पूर्वी न केलेली अशी मार्मिक शंका तूं केली आहेस. हें गुरुगम्य असल्यामुळें तूं अधिकाऱ्यावांचून अन्यास सांगूं नको. तुझ्या प्रश्नाचें उत्तर आतां सांगतो श्रवण कर.

**वत्सा तुझे आशंकाघात । जहतीचा करिती घात ।**
**शब्दें अप्रकाशित । म्हणोनी ते ॥२४४॥**
**जहतीच्या ठायीं । शब्दस्वार्थ[१७२] प्रकाशित नाहीं ।**
**म्हणोंनी ती लक्षणा लवलाही । श्रोतृकल्पित दुर्जनतोषन्यायें ॥२४५॥**
**परी तेथहि पुरुषपरतंत्रता । ही पूर्वीच निरूपिली आतां ।**
**आणि वाक्याचें[१७३] ठायीं सर्वथा । जहती आम्ही न मानो ॥२४६॥**
**अथवा अजहती जी होय । तेथ ग्रहण स्वार्थ सजातीय ।**
**किंवा तद्गुणविजातीय । ग्रहण होती ॥२४७॥**
**तेहि काकाची स्तंभावरी । नोहे म्हणूनी परतंत्रता पुरुषावरी ।**
**तथापि वेदार्थी लौकिकाकारी । जीववृत्तिस्तव प्रगटो पाहे ॥२४८॥**
**म्हणोनी आम्हीं वाक्याचें ठायीं । अजहती मानितु नाहीं ।**

परी भागत्याग लक्षणें ठायीं । कोणताहि दोष नये ॥२४९॥
जितुका प्रकाशी शब्द अर्थ । तो तितुका प्रकाशीचि यथार्थ ।
त्यांतील अनुपपन्न जो मिथ्यार्थ । तोचि त्यागणें जीवबुद्धी ॥२५०॥
ईश्वर म्हणता मायासहित । कीं जीव म्हणता अविद्यासहित ।
चैतन्य शब्दप्रकाशित । अप्रकाशीत अर्थ घेणें न लगे ॥२५१॥
उपाधित्याग जीव बुद्धीनें केला । तरी कल्पनात्यागें सुखी जाहला ।
कल्पिताचा कल्पिते त्याग बोलिला । उपहित अर्थू राहिला तैसाचि ॥२५२॥
आणि उच्चारादि मायेचे गुण । ते भागत्यागींच रंगलेपा समान ।
हें अनुभवामृतीं सहावे अध्यायीं कृपाघन । श्रीगुरु वदले ॥२५६॥
म्हणोनी शब्दे नाहीं प्रकाशिले । भागत्यागलक्षणेनें जीवें घेतले ।
ऐसें न म्हणावे अद्वैत भले । तें सत्यरूप ॥२५४॥ (य११पू.२५२)
द्विरेफ ऐकुनी भ्रमर स्मरणें । या नांव लक्षितलक्षणा म्हणणें ।
गौणी गुणावरूनी ओळखणें । शूरत्वगुणें पुरुषसिंह ॥२५५॥
चूर्णिका -
व्यंजनेनें[१७४] उमटे ध्वनि[१७५]।
जेंवि नायक भिन्नासी[१७६]म्हणे धार्मिका जा येथोनी ।
सुख होय तो गेलिया पासोनी । सुख धर्माचें फळ म्हणोनी ।
धार्मिक तो नसूनहि म्हणीतले ॥२५६॥
परी येथहि पुरुष परतंत्र । ना तरी स्तंभादि पदार्थ पृष्टीवर । हे कळेल वाचिता 'वृत्तिक्षीरसागर'[१७७]। परी अद्वैतीं तो सार भागत्याग[१७८] ॥२५७॥
एवं श्रीगुरूचिया वचनीं । शिष्य निमग्न परब्रह्मणीं ।
तंव वादी म्हणे कोण मानी । सांप्रदायिक समाधान ॥२५८॥
वेद ईश्वरप्रणीत होता । तैंचि एवढी तयाची पृथा ।
परी शब्दोच्चार न घडे जीवापरता । म्हणोनी जीवप्रणीतता वेदातें ॥२५९॥
सिद्धान्ती म्हणे सांप्रदायिक कांहीं । आम्ही तुजसाठीं बोलिलो नाहीं ।
वत्सासचि दुग्ध देती गायी । गोचिडा न मिळे ॥२६०॥
आतां तूं बोलिलास जीवोच्चारापेक्षा म्हणोनी । जीवकल्पित वेदवाणी ।
तरी रे मूर्ख मुक्याकडूनी । श्रुति वदोनी दाखवी तूं ॥२६१॥

वादी म्हणे तो रोगें न बोले । सिद्धान्ती म्हणे रोगे त्यास कां आक्रमिले ।
मध्यस्थ म्हणे हें कर्मे जाहले । वादीनें दिधले अनुमोदन तया ॥२६२॥
सिद्धान्ती म्हणे तरी ऐसे मानी । कर्मेचि पुरषासी येत वाणी ।
जीव स्वतंत्र नाहीं उच्चारणीं । क-काराच्याहि ॥२६३॥
आतां कर्मे म्हणावे निर्मिले वेद । तरी अन्योन्याश्रय दोष सिद्ध ।
वेदापासोनी कर्मे प्रसिद्ध । आणि कर्मापासोनी वेद जाहले ॥२६४॥
ईश्वराच्या प्रेरणेविण । जीव करूं न शके शब्दोच्चारण ।
दांत पडलीया तवर्ग पूर्ण । मूखांतूनि निघेना ॥२६५॥
एवं लौकिकहि शब्द जाण । किंबहुना शब्दाचे मूळवर्ण ।
करवल्या न जाती जीवाकडून । मग वेद कैसे करील तो ॥२६६॥
जरी जीवानें लौकिक शब्द केले ।
तरी भलत्याचि स्थानांतूनि भलते पाहिजे उच्चारिलें ।
ओठापासूनी कवर्ग पाहिजे बोलिले । आणि पवर्ग कंठांतुनि ॥२६७॥
यालागीं भाषेचें सर्व शब्द । स्वयेंचि कल्पी गोविंद ।
जीव जड यंत्रासम उच्चारी समग्र । स्वतंत्र नाहीं ॥२६८॥
प्रतिध्वनि त्याचीच प्रतिकृति । यालागीं प्रेरकता नये जडाप्रति ।
कर्म जड हें प्रसिद्ध जगतीं । म्हणोनी श्रीपति जगत्कर्ता ॥२६९॥
(य११पू.२५३)येथ अन्योन्याश्रयहि नाहीं । आपुलें नांव सांगुनी जीवपुरुषही ।
आपणा दाखविती तैसा शेषशाई । वेदशब्दें ॥२७०॥
वादी म्हणे शब्दाची असो ईश्वरप्रेरणा । परी अर्थ तंव जीवेंचि निर्मिले जाणा।
सिद्धान्ति म्हणे तुझिया बापें जल भूमि तृणा । निर्मिले काय तूं सांगे ॥२७१॥
आकाश वायु पृथ्वी जल । हे त्यांचि निर्मिले जरी सकळ ।
तरी कढईतील तप्त तेलानें केवळ । तृषा कां न जाय तुझी ॥२७२॥
यद्यपि दृष्टिसृष्टिवादांत । विश्व बोलिले जीवकल्पित ।
परी तो मुख्य जीव यथार्थ । ईश्वररूपें अनंत ब्रह्मांडे निर्मिता ॥२७३॥
कुतऱ्यापासोनी झाली तुझी आई । ऐसा जीवकल्पित शब्दाचा अर्थ नाहीं ।
अविद्यावच्छिन्न चैतन्य सर्वहि । स्वप्नासमान कल्पी जग ॥२७४॥
म्हणोनी तो जीवचि ईश्वर । हा बद्ध दशेंतहि प्रत्यय सुंदर ।

दृष्टिसृष्टिवाद सांगे सत्वर । परी तोहि वेदशब्दें ॥२७५॥
आणि तिन्ही कालीं बद्ध दशा नाहीं । ऐशा जीवें वेद कल्पिले म्हणसी पाही ।
तरी इष्ट म्हणूनी तूं वादी आम्हाहि । गुरुसम पूज्य ॥२७६॥
वादी म्हणे शब्द अर्थ । ईश्वरें निर्मिलें हें यथार्थ ।
परी तयाचा संबंध जीवकल्पित । सर्वदा असे ॥२७७॥
सिद्धान्ती म्हणे याचिसाठीं । येथवर केली तोंडपिटी ।
शब्दार्थसंबंधीहि गोमटी । परतंत्रता दाविली जीवा ॥२७८॥
कर्मफळाचे संबंधादि सर्व । अदृष्ट म्हणोनी सांगो न शके अल्पज्ञ जीव ।
आणि प्रमाण[१७९] बोलावया विशिष्ट भाव । पाहिजे कोणी ॥२७९॥
मनुष्य सर्व सजातीय म्हणोन । स्वविशिष्ट आहे कवण ।
त्यांत एकाद्यास स्वविशिष्ट मिळाले ज्ञान । ऐसे जरी म्हणसी ॥२८०॥
तरी तें काय प्रत्यक्षें कीं अनुमानें मिळाले । दोन प्रमाणें तंव सकळा सुलभ वहिले।
मग न्यून बुद्धि अधिक वृद्धि जाहले । पुरुष कैसे ॥२८१॥
म्हणाल ईश्वरें बुद्धि दिधली तया । तरी शब्दार्थसंबंध ईश्वरें नाहीं दिधला हें
म्हणणें वाया । आणि म्हणसी कीं कर्में बुद्धि दिधली तया ।
तरी कर्में आगमनिष्पाद्य[१८०] ॥२८२॥
सकल धर्मागमाच्या[१८१] ठायीं । स्वविशिष्टपुरुषप्रतिपाद्यता बोलिली पाही ।
परी श्रौतासी लवलाही । अनादिता तेहि ऐक ॥२८३॥
भविष्यपुराणीं ईशपुत्रधर्म बोलिला । तेथ भूम्युद्भव षट्सहस्त्रवर्षानंतर सांगितला ।
एवं भविष्यपुराणीं महामदीधर्म बोलिला । तेथहि ऐसाचि कांही वरुषांचा सांगितला
भूम्युद्भव[१८२] ॥२८४॥ (य११पू.२५४)
परी ज्योतिषें आणि इतिहासें । भूमि बहु वरुषाची भासत असे ।
किंबहुना अनादित्व विशेषे । परिणामित्व तियेचे ॥२८५॥
बौद्ध आणि जैन धर्मात । पृथ्वी अनादि मानिली विख्यात ।
परी बुद्धाचे वैदिकगुरु[१८३] अश्वघोष चरित्रांत । बोलिले आथी ॥२८६॥
वेदाचें जैनागमांत खंडण । जैनाचें वेदीं नाहीं अभिधान ।
यालागीं उपधर्म[१८४] जैन । वैदिका जाहला ॥२८७॥
म्हणोनी सकलप्राचीन[१८५] वेदधर्म । तन्निर्माता अस्माद्विशिष्ट पुरुष पुरुषोत्तम ।



वादी म्हणे प्रतारक असत्य वर्म । बोलिला नसेल कशावरुनी ॥२८८॥
सिद्धान्ती म्हणे कशावरोनी बोलिला हें तूं तरी सांगे ।
आणि संशय असेल तरी आम्हासी शरण रिघे ।
पूर्वी एक सत्य असलियाविण अंगे । असत्य कोणी वदूं न शके ॥२८९॥
सत्य असलियाविण असत्य निघेल । तरी तें असत्य आहे हें कैसे कोण म्हणेल।
सत्य पूर्वीचे कांहीं मनीं असेल । तरीच परीक्षिता येईल असत्यातें ॥२९०॥
सत्यावांचोनी असत्य प्रतिष्ठे । तरी तुझें बोलणें कैसे सत्य तिष्ठे ।
मी म्हणे तूं बोलतोसी ते गोटे । कोहळे किंवा वाळके ॥२९१॥
वादी म्हणे प्रत्यक्ष आणि अनुमान । याविरोधी म्हणोनी प्रतारकवचन ।
सिद्धान्ती म्हणे येणें सर्व शाब्दप्रमाण । निरर्थक जाहले ॥२९२॥
मग तूं तुझियाचि मातापितयाचा । हा निर्धार कैसा होय साचा । प्रत्यक्षीं लाग नव्हे
तुझ्या डोळियाचा । आणि सामान्यें तंव भलतीयाचा होऊं शकसी ॥२९३॥
प्रमाण मानसी मातृवाणी । तरी वेदशब्दें कवण तुझी हानि । शाब्द
साक्षित्वादि[१८६] सकल राजव्यवहार स्थानीं । लोपले काय सकल सांगे ॥२९४॥
यालागीं प्रथम शब्दार्थ आहे वहिला । तरीच असत्य जीवाकडुनी जाईल कल्पीला।
श्रुतिपूर्व[१८७] धर्म नाहीं देखिला । म्हणोनी वेद सत्य तद्बाह्य असत्य ॥२९५॥
शब्दार्थ संबंध स्वाभाविक । तेथहि जीव परतंत्र देख ।
येथचि वादी अनेक । बोलती मत आपुलाले ॥२९६॥
वैय्याकरण या स्फोट[१८७अ] म्हणती । नैय्यायिक भगवदीच्छा सांगती ।
वर्ण नित्य मीमांसक म्हणती ।
आणि स्वभावसत्ता चेतनपरमेश्वर द्योती हें वेदान्तवचन ॥२९७॥
नैय्यायिक सोडोनी इतर जडवादी । तयांची जाहली अंध बुद्धि ।
निराग्रही असो समन्वयसिद्धि[१८८] । परी आग्रहें खंडण आवश्यक ॥२९८॥
(य११पू.२५५) शब्दार्थ संबंध जड मानोन । त्यासी न मानितां चिद्योतन[१८९] ।
तरी पित्यानें पुत्राचें नामकरण । नाना पदार्थांतील शब्दापासोन करावे ॥२९९॥
थापडेंतील थकार घ्यावा । टाळींतून टकार आणावा ।
काष्टाचा ककार बरवा । मग थाटिका नांवा योजावे ॥३००॥
किंवा मीमांसकानें आपुला धर्म । प्रतिध्वनिपासुनी शिकावा परम ।

वेदाध्ययनाचें काम । पुरुषास काय ॥३०१॥
जीव अल्पज्ञ सर्वापरी । यालागीं धर्मबोधक वेदशब्दार्थसंबंध द्योतकत्व परमेश्वरीं।
स्वभावास्तव प्रार्थनादि उच्चारी । दोष न येती ॥३०२॥
'विश्वानि देव सवितर्दुरितानि । परासुव यद्भद्रं तन्न आसुव' इत्यादि वाणी ।
स्वाभाविकचि भगवंते द्योतिली म्हणोनी । तयाच्या निर्मातृपणीं नये शंका
॥३०३॥ आतांहि धनिका धन याचिता । आम्हा ऐसे धन द्या म्हणता ।
या लौकिक शब्दाचा जरी जीव उच्चारिता । तरी तयासहि प्रेरिता भगवानचि
॥३०४॥ नाहीं तरी मुक्याप्रति । कां न करितां ये धनिकस्तुति ।
एवं लौकिक प्रार्थना परमेश्वरद्योती । मग वैदिक शब्दस्तुति कवण शंकी ॥३०५॥
केवळ ईश्वराची इच्छा शक्ति । जे म्हणती तयाहि शंका गिळिती ।
आम्हीं वेद स्वाभाविकसत्ता परमेश्वरद्योती । ऐसे म्हणो ॥३०६॥
भगवदीच्छा असती शक्ति । तरी वेदाचा अन्यार्थप्रतीत होता नास्तिकाप्रति ।
आणि अन्यार्थ भासता भक्ताप्रति । भक्त म्हणोनी ॥३०७॥
मग वेदाचें करावया खंडण । बौद्धादिका नसतेचि कारण ।
ईश्वरासी अन्यागम निर्माण । करावे न लागते बौद्धादिकार्थ ॥३०८॥
''अग्निमीळे'' याठायीं । ''वन्हिमीळे'' म्हणता शेषशाई ।
किंवा ''वायुमिळे'' म्हणताहि । कवण दोषू ॥३०९॥
मग भंडारं धीमहि । इत्यादि पदाचें पुरश्चरण महीं ।
चालते[१९०] ते दिसत नाहीं । यालागीं ईश्वरेच्छा शक्ति नोहे ॥३१०॥
वेदशब्द सार्थसंबंध मायेंत लीन । ते सर्गादौ परमात्मा द्योती आपण ।
जैसे आकाशादिक निर्माण । प्रगट मात्र करी ॥३११॥
सातवे बारावे ज्ञानेंद्रिय । कोठें कोणी देखता न होय ।
तीन डोळ्यांतहि नये । चक्षुरिंद्रियभिन्न शक्ति ॥३१२॥
शेषाचे डोळे ऐकती ।
परी तेथहि पंच ज्ञानशक्तिविण नाहीं सहावी शक्ति । अक्षपादींहि तेचि गति ।
यालागीं स्वाभाविक वेदजगत् द्योति परमेश्वरू ॥३१३॥ (य११पू.२५६)
वेदजगत् अनादि अनंत आहे । परमेश्वराविण द्योतन नोहे । जैसा घट शब्दार्थसंबंध
अनादि आहे । परी सजीवाविण उच्चारण नोहे प्रेतमुखें ॥३१४॥

आतां ईश्वरेच्छा शक्तिहि घेऊनी । समाधान सांगूं दुर्जनतोषन्यायें करूनी ।
माता पुत्रास सांगे पितृव्यास काका म्हणावे इत्यादि वाणी ।
समान समर्थ वेद निर्माणीं परमात्मा ॥३१५॥
वादी म्हणे येणें मानें । सकला शब्दा ईशप्रणीतत्व होणें ।
मग वेदातेंचि प्रमाणे । म्हणावे कां ॥३१६॥
सिद्धान्ती म्हणे सकल शब्द । ईश्वरप्रणीत हे तंव सिद्ध ।
परी व्यवस्था नोहे प्रसिद्ध । प्रमाणाविण ॥३१७॥
प्रत्येक पुरुषे एक एक । तुझे नांव ठेविले देख ।
निश्चय नसतां सम्यक । कवणें कवणें उच्चारिजे ॥३१८॥
सकल शब्द ईश्वरप्रणीत म्हणोन । घटाचा अर्थ नोहे पट करण ।
यालागीं वृद्धव्यवहारपरंपरा पूर्ण । व्यवस्था येथ ॥३१९॥
परंपराचि ते प्रमाण । तरी गेले निर्मातृपण ।
स्वनिर्मिती प्रमाण । नोहे म्हणुनी ॥३२०॥
कित्येकांचें ऐसें मत । कीं वेदीं ब्रह्म सांगितलें यथार्थ ।
म्हणवोनिच वेद ईश्वरप्रणीत । परी हे मिथ्या ॥३२१॥
पंचदश्यादि ग्रंथ पाहतां । ब्रह्मनिरूपणसमता ।
परी तयाच्या योगें संस्कारता । नये कदा ॥३२२॥
द्विज करिती संस्कार । तेथ अवश्य पाहिजे वेदमंत्र ।
अर्थमहत्वाविण साचार । शब्दमहत्व असे तेथें ॥३२३॥
''अग्निमीळे'' च्या ठायीं । ''वायुमीळे'' न चले कहीं ।
तरी ईश्वरता पाही । दोन्ही नांवे ॥३२४॥
वादी म्हणे अर्थमहीता । -विण शब्द मानणें वृथा ।
सिद्धान्ती म्हणे येणें सर्वथा । वाचकत्वचि न घडे ॥३२५॥
अर्थ शब्दें कळें कीं पूर्व प्रमाणें उजळे । आणि मग तो शब्दीं रुळें[१९१] ।
आद्यपक्षीं सगळें । शब्दमहत्व साधका ॥३२६॥
अन्त्यपक्ष अप्रमाण । इंद्रियभेद बुद्धिभेद म्हणोन ।
अथवा दृष्टार्थी जाहले पूर्व प्रमाण । परी अदृष्टार्थी नोहे ॥३२७॥
अदृष्टार्थाच्या ठायीं । शब्दप्रमाणाविण नाहीं ।

एवं ज्ञानकांडींहि । शब्दमहत्व ॥३२८॥
आतां उपासनाकांडी पाहतां । घेऊनी लौकिक दृष्टान्ता ।
सांपडे शब्दमहिता । युक्तिसिद्ध ॥३२९॥
पितयाते बाळा म्हणता । तरी न रुचे सर्वथा ।
शिवी ऐकोनी समस्ता । वाईट वाटे ॥३३०॥
हा जरी वृथाध्यास । तरी चेतनीं अवघा वृथाध्यास । (य११पू.२५७)
आणि चोदना विशेष । शब्दाविण घडेना ॥३३१॥
चोदना म्हणजे प्रेरणा । ते त्रिविध असे जाणा ।
आज्ञा आणि प्रार्थना । अनुमति तिसरी ॥३३२॥
वरिष्ठानें सानाप्रति । वाक्य बोलणें आज्ञा म्हणती ।
जेवी बाळा इत्यादि बोलती । व्यवहारीं लोक ॥३३३॥
लहान्यानें वरिष्ठाप्रति । शब्द बोलणें त्या नांव विनंति ।
यावे स्वामी इत्यादि बोलती । व्यवहारीं लोक ॥३३४॥
समानाचें भाषण । या नांव अनुमोदन ।
'करीसना' इत्यादि पूर्ण । बोलती लोक ॥३३५॥
शब्दासी महत्व नाहीं । तरी चोदना मोडेल सर्वहि ।
आज्ञा तेचि लवलाही । विनंती होईल ॥३३६॥
चोदना एक होता । तरी अंतःकरणवृत्तीस येईल समानता ।
मग बालकाते शिक्षा करिता । कर जोडावे लागतील मातेतें ॥३३७॥
अथवा ऐसेचि जरी होवो सुखें । तरी हें जगत् ऐसेंचि करी निके ।
मग मानूं नेटके । चोदनैकत्व ॥३३८॥
शब्दद्वारा अंतःकरणवृत्ति । दुजिया दाखविणें यास चोदना म्हणती ।
ती सकळ प्रांतीं[१९२] । जरी होय एक ॥३३९॥
तरी ते कैसे घडे । अवघे स्वातंत्र्य पारतंत्र्य मोडे ।
चोदनेंत फुडे । सांपडती दोन्हीं ॥३४०॥
आज्ञा चोदनेचा अर्थ । कीं स्वातंत्र्य नाहीं लहान्याप्रत ।
प्रार्थना चोदनेचा अर्थ । स्वातंत्र्य आहे वरिष्ठाते ॥३४१॥
सामान्य स्वातंत्र्य अनुमति । या अवघिया चोदना जरी एक होती ।
तरी संपूर्ण आटेल व्यवहारसंपत्ति । होईल भलते ॥३४२॥
बालक अग्नीकडे जाता । मायेनें इकडे ये म्हणता ।
तयासी पारतंत्र्य न देतां । मरेल बाळ ॥३४३॥
वादी म्हणे शब्दचोदना मानावी एक । आतां भेद पाहिजे व्यवहारार्थ सम्यक ।
तरी खुणा कराव्या निष्टंक । हस्ताच्या कांहीं ॥३४४॥
आज्ञा म्हणजे ठोकणें । प्रार्थना म्हणजे कर जोडणें ।
अनुमति म्हणजे हात उचलणें । वरी एक ॥३४५॥
सिद्धान्ती म्हणे वाहवा । प्रशंसावे तुझिया ज्ञानवैभवा ।
हें प्रतिक्षणाकरितां सर्वा । शब्दाविण शक्य कैसे ॥३४६॥
प्रतिदिनीं ठोकता । प्रतिदिनीं बाळें मारील माता ।
आणि हस्तचिन्हाची आठवण ठेविता । शब्दचिन्ह वाउगे काय ॥३४७॥
केवळ हस्तचिन्हावरी चोदना । तरी पत्रव्यवहार मोडेल लेखना ।
एक होता अवघी चोदना । लेखें काय समजावे ॥३४८॥ (य११पू.२५८)
मोडो पत्रव्यवहार म्हणता गोष्टी । तरी घरींच आणोनी भरावी लागेल गोष्ठीं ।
आणि माय बायकोसी सममैथुनगोष्टी । करिता येईल पैं सुखें ॥३४९॥
वादी म्हणे जीवाचा व्यवहार । असमर्थ म्हणोनी शब्दाधीन समग्र ।
परी समर्थ जो ईश्वर । तयासी कासया पाहिजे हें ॥३५०॥
सिद्धान्ती म्हणे ऐक गोष्टी । ईश्वरें वेद नाहीं निर्मिले आपणासाठीं ।
असमर्थ जीवाची मोडावया दुःखकोटी । बोलिले ओठीं यदुराणा ॥३५१॥
म्हणवोनी शब्दमहत्व विशेष । वादी म्हणे हें चुकले निःशेष ।
अवघ्याचि लौकिक आज्ञेस । वेदत्वापत्ति ये येणें ॥३५२॥
तेव्हां म्हणे सिद्धान्ती । व्यवहारीं लौकिक आज्ञेसहि वेदापत्ति ।
परी धर्माचें ठायीं निश्चिती । तैसे न चाले ॥३५३॥
विषयासी आळा देऊन । धर्म करावा येथ पाहिजे अदृष्ट कारण । ते धर्मआज्ञा
करिता लौकिक जन । तरी तो आपणा समान वाटेल लोका ॥३५४॥
मग तयानें पुसता ऐसें कां करावे । तरी तयासी लागेल प्रमाण सांगावे ।
जीव तंव असमर्थ आघवे । यालागीं ईश्वरपर्यवसाना[१९३] शब्दप्रमाणश्रृंखला ॥३५५॥
वादी म्हणे पशुहून । मनुष्य थोर म्हणून ।

धर्म करावा इत्यादि युक्ति सांगून । लोक प्रवर्तावे धर्मी ।।३५६।।
सिद्धान्ती म्हणे ऐसे करिता । तरी व्यवहारहि न चाले तत्वता ।
मग धर्मव्यवस्था । कासयाची ।।३५७।।
ही युक्ति सामान्य सकळासी । पाठ होता निश्चयेसी ।
प्रत्येक प्रत्येक मनुष्यासी । स्वेष्ट[१९४] धर्म सांगेल ।।३५८।।
एवं यथेष्टाचार यथेष्टविचार । धर्मनामांत मोडतील समग्र ।
आघवेचि युक्तिपर । होतील जरी ।।३५९।।
युक्ति सामान्य दावी । परी विशेष कोण दाखवी ।
वादी म्हणे कोणाची तरी घेऊन चालावी । एक युक्ति प्रमाण ।।३६०।।
सिद्धान्ती म्हणे ऐसे कां करावे । मग कोणाचे शब्दाचि कां न मानावे ।
विशेष अवधारण नोहे । शब्दाविण ।।३६१।।
पशूंत आणि मनुष्यांत पाहता । भेद जो दिसे तत्वतां ।
तोहि धर्मेचि सर्वथा । बोलिला आहे ।।३६२।।
''आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणां ।
धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण हीनः पशुभिः समानः'' ।।
हें उपहासक मात्र नोहे उक्ति । येय आहे प्रबल युक्ति ।
कीं मनुष्यामाजीं धर्म निश्चिती । स्वाभाविक असे ।।३६३।। (य११पू.२५९)
शब्दासी पशु न मानती म्हणोन । दवडावे लागे दंड घेऊन ।
आज्ञा समजणें पहिल्या पासोन । मनुष्यबालकस्वभावचि ।।३६४।।
लहान वय असतां । जैसी आज्ञा करी माता ।
तैसे शब्देंचि जाणता । होय तो आधीं ।।३६५।।
जैसे जैसे खेळते बाळ । तैसी ठोकण्याची वाढे वेळ ।
यालागीं मनुष्यस्वभाव सरळ । आज्ञा मात्र समजणें ।।३६६।।
हाचि मनुष्यांत धर्म विशेष । म्हणोनी तया शब्दमहत्व निःशेष ।
आणिकहि कारण विशेष । शब्द महत्वाचें ।।३६७।।
जैसा नगारीयाचा शब्द कठीण । विणेचा मृदुतर पूर्ण ।
तेवि सत्त्वरजस्तमोधर्म जाण । शब्दाचे असती ।।३६८।।
त्रिगुणापासोन जग आघवे । तरी शब्दासी ते धर्म आले स्वभावे ।
यालागीं सात्त्विक शब्द जपावे । हे शब्दमहत्व ।।३६९।।
सत्त्वहि जडचि म्हणोन । जडाचाचि धर्म पूर्ण ।
यालागीं जड सात्त्विक होय साधन । चेतन ते साध्य ।।३७०।।
म्हणूनी मंत्र मूर्ति आदि जड सात्त्विक । जड तम निवर्तोनि होती चेतनप्रकाशक।
गुण आपसांत साधक बाधक । हें बोलिलेचि आहे ।।३७१।।
एवढें शब्दमहत्व धर्माचें ठायीं । ईश्वराविण जीवांगीं नाहीं ।
यालागीं ''वायुमीळें'' लवलाही । न म्हणवे कवणा ।।३७२।।
एवं वेद विशेष निर्धारिला । तो द्विधा आहे विभागिला ।
ब्राह्मण-मंत्र नामें बोलिला । सर्वकाळ ।।३७३।।
वादी म्हणे भलते वदता । मंत्रासी वेद म्हणूं तत्वतां ।
तद्विवरणरूप ब्राह्मणासी वेद म्हणतां । आश्चर्य वाटे ।।३७४।।
सिद्धान्ती म्हणे तयाते । आश्चर्य कधीं काय प्रमाण असते ।
वेद न म्हणता ब्राह्मणाते । तरी अनर्थ होईल दुसरा ।।३७५।।
मंत्र मात्र ईश्वरें केलें । तयाचें विवरण जीवें बोलिले ।
तरी ईश्वरमतीचे अर्थ समजले । स्पष्ट कैसे जीवातें ।।३७६।।
ईश्वर जीवाची सम मति । तरी एक झाले दोघे निश्चिती ।
मग ईश्वरप्रणीतत्व ब्राह्मणाप्रति । समान पुढती फावले ।।३७७।।
वादी म्हणे सर्वथा ईश्वरशब्द जीवा न कळे । तरी उपदेश कैसा रुळे ।
सिद्धान्ती म्हणे वस्तु कळे । क्रिया न कळे ऐसे मी म्हणे ।।३७८।।
वस्तु आणि जीवबुद्धि । यांचा असतो संन्निधि ।
यालागीं प्रेरिता शब्दीं । आवरणभंगे[१९५] वस्तु कळे ।।३७९।।
परी क्रियाफळसंन्निधि[१९६] नाहीं । फलाते उत्पाद्यता[१९७] पाही । (य११पू.२६०)
यालागीं क्रिया कल्पिता नये कहीं । भलतीच कवणा ।।३८०।।
वादी म्हणे कर्तृतंत्र क्रिया म्हणता । तरी ते कां नये कल्पिता ।
सिद्धान्ती म्हणे कर्तृतंत्र शब्दार्था । न जाणोनी बोललासी ।।३८१।।
कर्ता क्रिया करी तैं होये । न करी तैं नोहे ।
इतुकाचि अर्थ आहे । कर्तृतंत्र शब्दाचा ।।३८२।।
भलत्या फलार्थ भलती क्रिया करणें । तरी योग्य होईल क्षुत्क्षांत्यर्थ डोळे चोळणें।

आतां वस्तुतंत्र म्हणजे अंतःकरणगततत्संस्कार[१९८] धरणें सोडणें ।
हाती नाहीं कर्त्याच्या ॥३८३॥
ब्राह्मणीं क्रियाकांड बोलिले । यालागीं तें जीवें नाहीं कल्पिलें ।
वादी म्हणे तरी कैसे समजले । सांगा जीवातें ॥३८४॥
सिद्धान्ती म्हणे स्पष्ट विनियोग[१९९] शब्दें देवें कथिला ।
आणि अवतार धरूनी करोनी दाविला ।
तो ऋषीनीं ऐकिला पाहिला । मग लिहीला कल्पग्रंथीं ॥३८५॥
वादी म्हणे क्रियाकांडरूप ब्राह्मण । ईश्वरप्रणीत असो कां पूर्ण ।
परी ज्ञानकांडरूप ब्राह्मण । जीवप्रणीत म्हणावा ॥३८६॥
सिद्धान्ती म्हणे कां म्हणावा । त्वत्पिता श्वान कां न गणावा । सादि[२००] शब्द
युक्तिवीण बोलता बरवा । तरी आघवीया जीवा अधिकारू ॥३८७॥
अनादि शब्दाच्या ठायीं । युक्तिप्रवेश विशेष नाहीं ।
हे हा ठाववरी लवलाही । बोलतचि आलो ॥३८८॥
कर्मज्ञानाचा संबंध । हा ज्ञानकांडीं बोलिला विशद ।
जीवप्रणीत असतां उपनिषद । तरी घडेल कैसा ॥३८९॥
वादी म्हणे ईश्वरें कर्म सांगितलें । मग तयाच्या योगें जीवास ज्ञान झाले ।
तैं हें ज्ञानकांड निर्मिले । ऐसें का न म्हणावें ॥३९०॥
सिद्धान्ती म्हणे ईश्वरकर्में झालें ज्ञान । ते अयथार्थ कीं यथार्थ पूर्ण ।
प्रथमपक्षीं ईश्वरोक्त क्रियेचें पर्यवसान । मिथ्या होता प्रयोजन काय ॥३९१॥
द्वितीयपक्ष अंगिकारितां । तरी तुझें प्रयोजन होईल वृथा ।
गौणत्व द्यावे शब्दा समस्ता । यास्तव जीवप्रणीत म्हणसी वेद ॥३९२॥
चार्वाकादि मते जीवकल्पित ।
ते ईश्वरोक्त कर्माचे फळ नाही म्हणावया कवण हेत ।
ज्ञानकांड जीवप्रणीत । जाहले जरी ॥३९३॥
देहापरते[२०२] अदृष्ट आात्मज्ञान । याालागी चार्वाकसम ते नोहे जााण ।
तरी अदृष्ट आत्मबोधक वचन । ईश्वर प्रणीत कां न म्हणसी ॥३९४॥
देहात्मवादें[२०३] अध्यासीं समस्त । शब्दाविण अध्यास[२०४] न निवर्ते हे यथार्थ ।
युक्तीनें अध्यास नोहे निवृत्त । प्रथमक्षणीं ॥३९५॥ (य११पू.२६१)



ब्रह्मवेत्ता आणि अज्ञानी यासी । युक्ति समान स्फुरती विशेषी ।
म्हणोनी शब्दाविण अध्यासी । नाश्यता नोहे ॥३९६॥
किंवा क्रियाकांड ईश्वरप्रणीत । त्वां मानिलेचि आहे समस्त ।
तरी कर्तृत्वाद्यध्यास[२०५] तेथ । शब्दामुळें पातला ॥३९७॥
तो ज्ञानकांडीं निरसिला आहे । जरी ज्ञानकांड ईश्वरप्रणीत नोहे ।
तरी ईश्वरशब्दमूलक[२०६] अध्यासनाशीं सामर्थ्य आहे । जीवासी काय ॥३९८॥
ईश्वरशब्दमूलक अध्यास जीवे युक्तीनें नासता ।
तरी काय हानि चार्वाक होवोनि वैदिक कर्म सोडिता ।
यालागीं भगवंत निर्मिता । ज्ञानकांडाचाहि ॥३९९॥
आत्मा संन्निहित म्हणोनी । सकळासी अधिकार असावा ज्ञानकांड निर्माणीं ।
परी तो अज्ञानें झाकला म्हणोनी । उपनिषन्निर्माणीं पाहिजे ईश्वर सद्गुरु
॥४००॥ द्योतनपक्षीं[२०७] तंव कांहीं । सर्वथा संशय नाहीं ।
म्हणोनी दोन्ही कांड ब्राह्मण* फणीशाई । निर्मिता होय ॥४०१॥
वादी म्हणे इतिहास देख । *ब्राह्मणामाजी असती अनेक । (*वेदाचा विभाग)
श्वेतकेतु उद्दालक । संवाद असे छांदोग्यीं ॥४०२॥
ब्राह्मणामाजीं संक्षिप्त । ते पुराणीं सांपडती विस्तृत ।
कामशास्त्र विख्यात । श्वेतकेतु उद्दालकपुत्र ॥४०३॥
म्हणोनी ब्राह्मण अनंतर जाहले । ऐसें मानणें अति भले ।
सिद्धान्ती म्हणे हें सर्वथा चुकले । मंत्रहि आले येणें मानें ॥४०४॥
ऋग्वेदसंहिता प्रथमाष्टकीं । आठवे अध्यायीं वर्ग आठवा कीं ।
तेथ तुग्र भुज्यूची कथा कीं । दिधली आहे ॥४०५॥
''तुग्रो ह भुज्युमश्विनोदमेघे रयिं न कश्चिन्ममृवाँ अवाहाः ।
तमूहथुर्नौभिरात्मना त्रिभिरन्तरिक्षप्रद्भिरपोदकाभिः ॥(ऋग्वेद अ.१ अ.८ व.८)
सायणभाष्य :- अत्रेयमाख्यायिका तुग्रो नामाश्विनोः प्रियः कश्चिद्राजर्षिः ।
स च द्विपान्तर्वर्तिभिः शसुभिरत्यंतमुपद्रुतः संस्तेषां जयाय स्वपुत्रं भुज्युं सेनयासह
- नावां प्राहैषीत् ।
सा च नौर्मध्येसमुद्रमतिदूरं गता वायुवशेन भिन्नासीत् ।
तदानीं स भुज्युः शिघ्रमश्विनौ तुष्टाव ।

**स्तुतौ च तौ सेनया सहितमात्मीयासु नौध्वारोप्य पितुस्तुग्रस्य समीपं त्रिभिरहोरात्रैः प्रापयामासतुरिति''॥** (य११पू.२६२)

मंत्रभावार्थः- हे अश्विनिकुमारहो ! द्रव्याचा त्याग करणाऱ्या एकाद्या मुमुर्षुप्रमाणें तुग्रानें समुद्रामध्यें भुज्यूला सोडून दिले, आणि त्या भुज्यूला दृढ व उदक आंत न येऊं देता केवल उदकावरूनच चालणाऱ्या नौकांच्या योगानें तुम्ही पोंहचवून दिले.

भाष्यभावार्थः- तुग्र नावांचा एक राजर्षि अश्विनिकुमाराला प्रिय होता. द्विपांतरामध्यें असलेल्या शत्रूनीं त्याला अतिशय उपद्रव दिला असतां त्यांच्या पराजयाकरितां सेना बरोबर देऊन त्यानें आपला पुत्र भुज्यु नावेनें पाठविला. ती नौका समुद्रामध्यें अतिशय दूर गेल्यावर वाऱ्याच्या तडाक्यांत सांपडून फुटली. तेव्हां त्या भुज्यूनें अश्विनीकुमारांची सत्वर स्तुति केली, व स्तुति झालेल्या त्या अश्विनीकुमारांनीं त्या भुज्यूला सेनेसह आपल्या नावेमध्यें बसवून पित्या तुग्राचे समीप तीन अहोरात्रांत पोंहचून दिले, अशी आख्यायिका आहे.

**या मंत्रीं इतिहास । तुग्र भुज्यूचा दिसे विशेष ।**
**म्हणोनी पूर्वपक्ष निःशेष । न चले तुझा ॥४०६॥**
**वादी म्हणे बरवे झाले । मंत्र ब्राह्मण दोन्ही बुडाले ।**
**इतिहास आहेत म्हणुनी गेले । अवघे वाया ॥४०७॥**
**सिद्धान्ती म्हणे ऐक उत्तर । शब्द नित्य हे परिकर ।**
**ध्वनिरूप साचार । जडीं नित्य शब्दू ॥४०८॥**
**वर्णरूप नित्य चेतनांत । मानसामाजीं लीन राहत । सांगितलेंच आहे हें यथार्थ।**
**मध्यस्थ म्हणे वादीचें मत सर्वथा अयोग्य नोहे ॥४०९॥**
**''बबरः प्रावाहणिरकामयत'' इति । आणिकहि इतिहास असती ।**
**पुरुष झालियाविण कथनोक्ति । नघडेचि हे ॥४१०॥**
**सिद्धान्ती म्हणे ययाचें । समाधान केलें आहे साचे ।**
**जैमिनीसूत्र जे विश्वाचे । धर्म सांगे ॥४११॥**
**आद्याध्यायीं आद्यपादीं अष्टमाधिकरणीं । क्रमें एकतिसावे सूत्र हे गुणीं ।**
**परंतु ''श्रुतिसामान्यं'' म्हणोनी । समाधान सांगे ॥४१२॥**
**''बबरः प्रावाहणिरकामयत'' इत्यादि वाक्ये ।**



**व्याकरणें अन्यार्थाहि[२०८] करिती सख्य ।**
**यालागीं सामान्यमात्र ऐक्य । वेदशब्दार्थ करावा ॥४१३॥**
**वायु असतां अतिगतिमंत । बर्बर शब्द त्याहूनि उठत । मध्यस्थ म्हणे हा असो सूत्रार्थ । परी अकामयत या पदाचा अर्थ नलगे ॥४१४॥**
**सिद्धान्ती म्हणे वायु देवता । येथ बोलिली हो कां तत्वतां ।**
**ब्रह्मसूत्रीं याचि अर्था । सुचविले ॥४१५॥** (य११पू.२६३)

**''समाननामरूपत्वाच्चावृत्तावप्यविरोधो दर्शनात् स्मृतेश्च'' ॥३०॥**(ब्र.सू.अ.१पा.३)

**भूतार्थवाद[२०९] स्वार्थी प्रमाण । सकल देवता होती प्रलयीं लीन ।**
**म्हणोनी देवताबोधक अनित्य वचन । म्हणावे कीरू ॥४१६॥**
**ऐसा पूर्वपक्ष जाहलीया । उत्तर बोलिले सूत्रीं इया ।**
**कीं वेदशब्दें आघवीया । अधिकारजाति[२१०] दाखविल्या ॥४१७॥**
**अनंत कल्पीं वायु देवता । जितुक्या होती तत्वता ।**
**त्या व्यक्ति मिळूनिया समस्ता । एक वायु देवता वेदशब्द सांगे ॥४१८॥**
**म्हणोनीं वेदीं जे इतिहास । ते जातिवाचक शब्दाचे विशेष ।**
**एवं पूर्वोत्तरमीमांसासमन्वय शेष । अर्थ जाहला ॥४१९॥**
**मंडणादिकांचें मतीं । सकल शब्दार्थ होय जाति ।**
**परी आक्षेपें सांपडे व्यक्ति । अर्थभूतीं पुरुषातें ॥४२०॥**

याचा आशय असा कीं, घट पट शब्द उच्चारले कीं जगांत जेवढे घट पट आहेत तेवढ्यांचा बोध होतो; आणि 'आण कर' इत्यादि शब्द उच्चारले कीं, त्या सर्व क्रिया जातीचा बोध होतो. एकाद्यानें 'घट आण' असें वाक्य उच्चारलें कीं, सर्व सृष्टींत मागें झालेले, पुढें होणारे, आतां असलेले घट आण असा त्या शब्दाचा अर्थ झाला; परंतु जीवास तसे सामर्थ्य नाहीं, म्हणून व्यक्तीचा बोध त्याला घ्यावा लागतो. एवढ्याकरितां जीवानें उच्चारलेल्या शब्दाचें ठिकाणीं व्यक्तीची शक्ति व परमेश्वरानी उच्चारलेल्या शब्दाचे ठिकाणी जातीची शक्ती मानल्यास विरोध येत नाहीं; कारण परमेश्वराचें ज्ञान जातिव्यक्तीस युगपत् विषय करणारे आहे, म्हणून सर्वच व्यक्तिहि त्याला वर्तमान झाल्या. एवढ्याकरितां वेदामध्यें व्यक्तीचा इतिहास मानला असतांहि दोष नाही. मग जैमिनी व व्यास यांनीं आपल्या सूत्रांत समाधान केलेल्या जातिइतिहासाविषयीं दोष कसा येऊं शकेल?

शिष्य उवाचः- भगवन्! ईश्वराचें ठायीं जातिज्ञानाचा अंगिकार केल्यास जातिव्यक्तीच्या सत्यत्वानें वेदान्तांत न्यायवादाचा प्रवेश होईल, आणि दृष्टिसृष्टिवादान्वयें जीवालाहि तें असले पाहिजे असा अर्थ होऊं लागेल, कारण ईश्वराप्रमाणें जीवहि स्वप्नसृष्टीचा कर्ता आहे. (य११पू.२६४)

श्रीगुरुरुवाचः- वत्सा! उत्तम प्रश्न विचारलास. जाति, व्यक्ति आणि त्रिपुटी कल्पित मानल्यास तूं सांगितलेला दोष येत नाहीं; म्हणून त्यांच्या सत्यत्वाची अपेक्षा नाही. जीवाचें स्वप्न निद्रादोषजन्य असतें, तसें परमेश्वराच्या ज्ञानांत अविद्यादिक दोष नाहींत, म्हणून तूं आणलेल्या द्वितीय दोषाचा परिहार होतो.

वादी उवाचः- पण या वेदांतील कांहीं पुरुष त्रेतायुगांत, कांही द्वापारांत झाले आहेत. तेव्हां तत्प्रतिपादक वाक्यें अनादि कशी? व त्या जाति अनादि कशा?

सिद्धान्ती उवाचः- तुझें शास्त्रानें समाधान व्हावयाचें नाहीं हें मला पहिलेंच ठाऊक आहे. अरे गवत पावसाळ्यांत उगवत असतें, आणि धान्य हिवाळ्यांत उगवत असते, एवढ्यानें गवताचें किंवा धान्याचें अनादित्व नष्ट होते काय? प्रत्येक पावसाळ्यांत व हिवाळ्यांत त्यांचा क्रम तसाच असतो; त्याप्रमाणें त्रेतायुगांत होणाऱ्या पुरुषाचा इतिहास जरी वेदानें सांगितला असला, तरी प्रत्येक त्रेतायुगांत व्हावयाचाच.

वादी उवाचः- पण यावरून त्रेताच्या पूर्वी वेद नव्हते एवढें तर सिद्ध झालें?

सिद्धान्ती उवाचः- भलतेच. धान्याचा उदय हिवाळ्यांत होतो, म्हणून सर्व धान्यवाचक शब्द (धान्य) लोक हिंवाळ्यांतच उच्चारित असतात काय?

शब्दाचा जातिरूप अर्थासी सर्वदा संबंध असून व्यक्तिरूप अर्थासी तात्कालिक संबंध आहे, अशी नवीन उपपत्ति सांगून तुझें मी समाधान करितो. गहू आण असें जर एकाद्यानें उच्चारिलें, तर लीन असलेल्या व उत्पन्न झालेल्या, वाळल्या व ओल्या सर्व गव्हाच्या ठिकाणीं त्या वाक्याचा संबंध आहे. ओल्या गव्हांच्या ठिकाणीं मात्र हिंवाळ्यांतच संबंध असतो, तथापि तो प्रत्येक हिंवाळ्यांत असतो हें लक्षांत ठेव. म्हणून तात्कालिक व्यक्तिसंबंधहि जात्यवच्छिन्न आहे. एवढ्याकरितां त्रेताच काय पण कलियुगांतील जरी नांवें वेदांत असली तरी सर्व कल्पांतील कलीस घेऊन तीं आहेत असें समज.



वादी उवाचः- अहो! ''स भूरित्युक्त्वा भुवनसृजत्'' असें वेदवाक्य आहे, आणि भूमि हें उच्चारून तो भूमीला उत्पन्न करिता झाला असा त्याचा अर्थ आहे. यावरून भूमिउत्पत्तिकालींच भूमिशब्दाची उत्पत्ति झाली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. (य११पू.२६५)

सिद्धान्ती उवाचः- अरे! तुला अष्टाध्यायीहि माहित नाहीं तर कातंत्र्यहि माहित नाहीं असे वाटते; कारण मूळांतील वाक्यांत 'उक्त्वा' असें पद आहे, आणि उच्चार करून असा त्याचा अर्थ आहे. अनंतर भूमीची उत्पत्ति असा सबंध वाक्याचा अर्थ आहे. यामुळेंच भूम्युत्पत्तिपूर्वीच वेदांतील भूमि शब्द होता असें सिद्ध होत आहे. पुनः हें वाक्य उच्चारून तूं आपल्या पायांत बलानें शृंखला घालून घेतली आहेस; कारण भूमि शब्दाला उच्चारणारा व भूमीला उत्पन्न करणारा जीव असणें शक्य नाही, तेव्हां तुझ्या उदाहरणानेंच वेद परमेश्वरप्रणीत आहेत हें सिद्ध झालें.

शिष्य उवाचः- भगवन्! मीमांसकाप्रमाणें वेद नित्य आहेत असें म्हणतां, कीं नैय्यायिकाप्रमाणें ईश्वरप्रणीत मानून अनित्य आहे असें म्हणतां?

श्रीगुरु उवाचः- तूंहि वादीच्या म्हणण्याला अद्यापि अनुमोदन देत आहेस याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. तथापि मी आपलें मत स्पष्ट सांगतो. – जेवढें कार्य आहे तेवढें असत् आहे असें नैय्यायिक समजतात. कांही नैय्यायिक वेदाला जीवकृत मानतात, परंतु त्यांचें मत मला मान्य नाहीं. कारण नैय्यायिक असत्कार्यवादी आहेत. वेदहि ईश्वराचें कार्य असल्यामुळें असत् होतील, व त्यामुळें प्रतिकल्पीं पूर्वीचेच वेद राहणार नाहींत व मग प्रतिकल्पीं भिन्न भिन्न धर्मस्थापक होतील, त्यामुळें कदाचित् ज्ञानावांचूनहि मोक्ष मानण्याचा प्रसंग येईल. किंबहुना शशशृंगादिक असदर्थ देखील वेदामध्यें प्रतीत होऊं लागतील. असद्वस्तु सद्वस्तूची प्राप्ति करून देत नसते, म्हणून हें नैय्यायिकांचें मत कोणत्याहि दृष्टीनें सम्यक् नाहीं.

वादी उवाचः- अहो! शब्द अनित्य आहे हें आपण स्पष्ट पहात असतो.

सिद्धान्ती उवाचः- मुळींच पहात नाहीं. जड पदार्थावर केलेला आघात दुसऱ्या कांहीं पदार्थांच्या नादांत मिसळून जातो; परंतु तो नाश पावत नाहीं.

याला[२११] जीवाची अशक्ति कारण आहे. (य११पू.२६६) मनुष्याच्या तोंडांतून निघालेला षड्ज फारच थोडा काल ऐकूं येतो, विणेतून निघालेला गांधारापर्यंत गेला तरी ऐकूं येतो. प्रत्येक स्वरामध्ये जीं आरोहावरोहस्थानें आहेत त्यांला श्रुति म्हटले आहे. या श्रुति अनंत आहेत असें संगीतरत्नाकरांत शार्ङ्गदेवाचार्यानीं सांगितले आहे. – शिवाय नैय्यायिकांचें मत अत्यंत चुकीचें म्हणण्याला आणखी दुसरें एक कारण आहे. शब्द त्रिक्षणस्थायी[२१२] आहे असें नैय्यायिकांचें म्हणणें आहे, पण रुद्रवीणा (बिन) वाजवितांना वाटेल तितका वेळ आपल्याला शब्द स्थीर करता येतो; आणि गाणाराहि आपल्या शब्दाला तीन क्षणापेक्षां अधिक वेळ स्थीर करूं शकतो.

वादी उवाचः- हें म्हणणें सम्यक् नाहीं, कारण गाणारा प्रत्येक वेळ आपल्या प्रयत्नानें शब्द उत्पन्न करीत असतो.

सिद्धान्ती उवाचः- भलतेच बोललास समज. आपल्या गौतमसूत्रांचें चांगलें अध्ययन कर. अरे! गाणाऱ्यांचा षड्ज तर एक सारखा ऐकूं येत असतो. त्याचप्रमाणें वेणूच्या छिद्रांतून निघालेला वायूहि पुष्कळ वेळ एकसारखा शब्द करीत असतो. आतां गाणाऱ्याचा प्रयत्न जितका वेळ षड्ज काढूं शकतो तितक्या वेळेला आम्ही षड्ज म्हणतो असें म्हणशील, तरीहि दृष्टान्ताकरितां देखील घेतलेली जीवाची गोष्ट राहूं दे; पण ईश्वराचें इच्छा प्रयत्नादिक न्याय मतांत नित्य मानले आहेत इकडे लक्ष दे, व नित्य प्रयत्नानें उच्चारलेला वेद नित्यच असला पाहिजे हें समजून ऐस. याप्रमाणें मी न्यायमताचें खंडण केलें.

आतां मीमांसामतांत वेदशब्द नित्य मानले आहेत, परंतु तेहि मला इष्ट नाहीं; कारण तसें मानल्यास वेद सर्वदा प्रगट राहतील, आणि त्यामुळें ब्राह्मणाला मलमूत्र विसर्गाकरितां काळच मिळणार नाहीं; कारण त्यावेळींहि गायित्रीजपादिकांची प्राप्ति होऊन पाप होऊं लागेल.

मध्यस्थ उवाचः- बरें तर सांख्याचें मत मान्य आहे कीं नाही; कारण त्यांच्या मतांत वेद लीन होत असतात, व प्रगट होत असतात. शिवाय ते सत्कार्यवादी आहेत, म्हणून वेद सत्यहि ठरतात.

सिद्धान्ती उवाचः- सांख्याच्या मतांत परमेश्वराचा अंगिकार नसल्यामुळें चेतन कर्त्यावांचून वेदाचें क्रमद्योतनादिक योग्य होणार नाहींत.(य११पू.२६७)



शिष्य उवाचः- तर योगाचें मत मान्य आहे. म्हणावयाचें, कारण त्यांत सांख्याच्या सत्कार्यवादाप्रमाणें वेद सत्यहि आहेत व चेतनपरमेश्वर द्योतकहि आहे.

श्रीगुरुरुवाचः- हें मत आम्हाला मान्य आहे, पण सर्वांशीं नाहीं. जोपर्यंत अविद्या आहे तोपर्यंत सत्कार्यवादाचा आम्ही अंगिकार करीत आहो, म्हणजे यावन्निद्रा तावत्स्वप्नसत्यता आम्हाला इष्ट आहे. परंतु सर्वथा वेद सत्य मानल्यास एक वेद सत्य व दुसरें ब्रह्म सत्य, असें द्वैत होईल, म्हणून ''वेद व्यावहारिक सत्य आहेत'' असा आमचा सिद्धांत आहे.

वादी उवाचः- वैय्याकरणाचें मत असें आहे की, शब्द वर्णात्मक नाहीं स्फोटात्मक आहे; कारण वर्णानें बोध होतो म्हटल्यास प्रत्येक वर्णानें होतो की वर्णसमुच्चयानें होतो ? पैकीं प्रथम पक्ष योग्य नाही, कारण घ वर्ण उच्चारल्यानें घट या अर्थाचा बोध होत नाहीं; आणि द्वितीय पक्षहि योग्य नाहीं, कारण घ प्रथम उच्चारल्या जातो, व ट नंतर उच्चारल्या जातो; म्हणून वर्णाचा समुदाय होणें शक्य नाहीं. एवढ्याकरितांच स्फोट नांवाचा एक अदृश्य शब्द आहे, तो शब्द वर्णाच्या योगानें बुद्धींत व्यक्त होत असतो. ज्या शब्दांत ज्या क्रमानें जितके शब्द असतील, तितक्या अंशानें तो उच्चाराच्या क्रमानें व्यक्त होत असतो. जसें घ एवढ्या उच्चारानें अर्धा स्फोट व्यक्त होतो, व ट या उच्चारानें पूर्ण स्फोट व्यक्त होतो, व कंबुग्रीवादिमान् घटत्व जातीचा किंवा व्यक्तीचा बोध होत असतो; म्हणून स्फोटरूप शब्दच वेद मानणें बरें.

सिद्धान्ती उवाचः- वर्णरूप शब्दानें बोध होत असतां, स्फोटरूप अदृश्य शब्दानें बोध होतो असें मानण्यांत गौरव दोष आहे. पणाच्या[२१३] ठिकाणीं होन[२१४] खर्चण्यास गौरव म्हणतात. पुनः स्फोटरूपच जर वेद मानले तर वर्णरूप गायत्री जपाचा कांहीं उपयोग होणार नाही. जप ही क्रिया आहे अर्थ नव्हे. वैय्याकरणांनीं स्फोट अर्थासाठीं अंगिकारिला आहे, क्रियेसाठीं अंगिकारिला नाहीं, म्हणून वैय्याकरणाच्या मतानें गायत्रीजप अनर्थक होईल. इतकेंच नाहीं, तर (य११पू.२६८)

**''एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सम्यक् प्रयुक्तश्च स्वर्गे लोके कामधुक् भवति ॥''**

एक शब्द सम्यक् जाणून सम्यक् प्रयुक्त केला असतां स्वर्गांत व इहलोकांत

इच्छित फल देणारा होतो, हें महाभाष्यकारादिकांस मान्य असलेलें वाक्यच व्यर्थ होईल. सर्वच वेदपाठकांस वेदाचा अर्थ समजत नसतो, म्हणून त्यांनी मलविसर्गकालीं वेद म्हटल्यास प्रत्यवाय येणार नाहीं; कारण त्याच्या जवळ स्फोटरूप वेद विद्यमान नाहीं. तसाच शूद्राला वेद ऐकण्याचा जो निषेध आहे तोहि व्यर्थ होऊं लागेल; कारण वर्ण ऐकूं येत असतात स्फोट ऐकूं येत नसतो. मौंजबंधनांचें पूर्वी वेद उच्चारण्यास जो प्रत्यवाय आहे तोहि व्यर्थ होईल. तात्पर्य श्रुति युक्ति व सदाचार या तिहीशीं विरुद्ध असलेल्या पांचहि मतांला तुच्छ करून तूं वेदान्तमताचा अवलंब कर. ''वर्णा एव शब्दः'' असें उपवर्शाचार्यांनी म्हटलें आहे. मीमांसकांचा सत्यत्वांश सोडून यावद्व्यवहार वर्णरूपच वेद आम्हा वेदान्त्यांना भगवत्पूज्यपाद-भाष्यान्वयें मान्य आहे.

वादी उवाचः- तें कांहीं असले तरी एवढ्यानें आमचे समाधान होत नाहीं; कारण -

**''इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् । बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रतरिष्यति''**

इतिहासपुराणानें वेदाचें उपबृंहण करावे. ज्यानें फार थोडेंसे श्रवण केलें आहे त्याला वेद भीतो, कारण नुस्त्या व्याकरणादिकांच्या योगानें तो माझा भलता अर्थ करील असे त्याला वाटते, असें महाभारतांत म्हटलें आहे.

आतां पुराणाकडे पाहिले तर वेदाविषयीं भिन्न भिन्न प्रकारची उत्पत्ति सांगितली आहे. श्रीमद्भागवत एकादशस्कंधांत अध्याय १७ श्लोक ११/१२ मध्यें असें म्हटले आहे कीं, कृतयुगीं एक प्रणवरूपीच वेद होता. नंतर त्रेतायुगाचें आरंभीं तीन वेद उत्पन्न झाले. पुनः भागवतांतच तृतीय स्कंधाच्या बाराव्या अध्यायाच्या ३७ व्या श्लोकांत पूर्वादि चार मुखानीं चार वेद ब्रह्मदेवांनीं उत्पन्न केलें असें म्हटलें असून विष्णुपुराणांत (अंश.३ अध्याय श्लो. ५) असें म्हटले आहे कीं, प्रतिद्वापारांत विष्णु हे व्यास होऊन वेदाचे विभाग करितात, आणि त्याच अध्यायांत निरनिराळ्या कल्पांत निरनिराळे २८ व्यास सांगितले आहेत. (य११पू.२६९) तसेंच महाभारतांतील वनपर्वाच्या १४९ अध्यायांतील २० ते २३ श्लोकांतहि कृतयुगीं एक वेद असून त्रेतायुगामध्यें त्याचे भेद झाले असें स्पष्ट सांगितले आहे. तेव्हां वेद प्रथम पासून चारहि होते कीं एकच होता? वेदाचें विभाग ब्रह्मदेवानीं केले, ईश्वरानीं केले कीं व्यासांनीं केले? आणि त्रेतायुगांत केले



कीं द्वापारांत केले? श्वेताश्वतर श्रुति तर अशी आहे कीं, ज्या देवानीं ब्रह्मदेवाला उत्पन्न केले, व त्याला वेद दिले त्या देवाला मी मुमुक्षु नमस्कार करितो. या श्रुतींतील मूळांत 'वेदांश्च' असें बहुवचन आहे, म्हणून वेद पहिले पासूनच पुष्कळ होते असा सिद्धान्त निघत असून पुराणांची वाक्यें निष्फळ होतात. सारांश वेदाविषयीं अवघा घोंटाळा आहे म्हणून ते प्रमाण नाहींत; आणि वनस्पतीनें सत्र केलें इत्यादिक अनर्थक प्रयोगहि वेदात आहेत म्हणून वेद ही शुद्ध वेड्याची बडबड आहे असें मी म्हणतो.

सिद्धान्ती उवाचः- तूं तोंडानें म्हणत असला, तर आमच्या हातांत वेत्र आहे हें लक्षांत असूं दे. आतां उत्तर श्रवण कर. नाना कल्पस्थ हिंवाळ्यांतील धान्याप्रमाणें त्रेतारंभीं मानल्यास विरोध घेत नाहीं. भागवतांत 'प्राणान्मे हृदयात्त्रयी' असे पद आहे, म्हणून त्रेतारंभींहि वेदाचा कर्ता ईश्वरच आहे असें सिद्ध होते. मग ब्रह्मदेवाला वेद दिले असें जे श्रुतींत बहुवचन आहे तें, ज्या ज्या वेळीं ज्या ज्या वेदाची जरूर लागली तसें तसें देवानीं दिले अशा अभिप्रायानें असल्यामुळें पुराणांतील एकवेद वाक्याच्या विरोधी नाही.

शिष्य उवाचः- पण भूमि हा शब्द उच्चारण करून भूमीला उत्पन्न केले अशी श्रुति असल्यामुळे भूआदि सर्व शब्दात्मक वेद पृथ्वीच्या पूर्वी होते असें म्हटलें पाहिजे, आणि कृतयुगांतील सृष्टि झाल्यावर एक वेद होता असें पुराणवाक्य आहे, म्हणून हा श्रुतिविरोध अपरिहार्य आहे.

श्रीगुरुरुवाचः- 'स भूरित्युक्त्वा' इत्यादि वाक्यांतील स शब्द ईश्वराचें द्योतन करितो, ब्रह्मदेवाचें करीत नाहीं. कारण आकाशादि सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं ब्रह्मदेव हिरण्यगर्भ असल्यामुळें त्यास अज्ञान आहे. म्हणून अपंचीकृत पृथिव्युत्पत्तिविषयीं ही श्रुति मानणें योग्य आहे, (य११पू.२७०) आणि वेदांतील सर्व शब्द अनादि आहेत हें मीं आतांच सांगितले आहे. भागवतांतील वाक्यांचा वादीनीं दिलेल्या भारतवाक्यानुसारच निर्णय असा होतो की, वेद जरी त्यावेळी होते तरी लोक केवळ प्रणवउपासकच होते. इतर कर्माच्या किटकिटींत ते पडत नसत. कर्माचा आरंभ त्रेतारंभीं झाला. वेद नसते तर त्रेतारंभीं पुरुरव्यानें यज्ञाची प्रवृत्ति करणें शक्य नव्हते, व तशानें यज्ञ हा कल्पित ठरला असता. ब्रह्मदेवाचें ठिकाणीं जीवत्व व ईश्वरत्व दोन्ही आम्ही मानत असल्यामुळें त्यांनीं

उच्चारल्यासहि कोणताच विरोध येत नाही.

शिष्य उवाचः- भगवन्! माझें समाधान झाले. आतां वादीचें समाधान करावे. मी तें श्रुतार्थसाधक[२१५] समजून मननार्थ ऐकतो; कारण वाद हे केव्हांहि मननार्थच असतात, श्रवणार्थ नसतात.

श्रीगुरुरुवाचः- तुझा योग्य बोध पाहून आनंद वाटतो. तुझें समाधान केल्यानें बहुधा वादीची शंकाहि आम्ही निराकरण केलीच आहे. आतां वादीचें म्हणणें कीं, ब्रह्मदेवाच्या मुखापासून चार वेद झाले असें भागवतांत सांगितले आहे, व व्यास प्रत्येक द्वापारांत वेदाचे विभाग करितात असें विष्णुपुराणांत सांगितले आहे, यावरून कोणते खरें? या प्रश्नांत कांहीं तथ्य नाहीं; कारण व्यास जे वेदाचे विभाग करितात ते स्वतंत्र होऊन करितात, कीं परतंत्र होऊन करितात हे वादीनें सांगावे.

वादी उवाचः- अगदीं स्वतंत्र होऊन करितात.

सिद्धान्ती उवाचः- तर मग गायत्री मंत्राचे तीन तुकडे करण्यास त्यांना कोणता प्रत्यवाय होता. प्रत्येक वेदांत गायत्री मंत्र जशाचा तसाच कां ठेवला? शिवाय याज्ञवल्क्य सूर्यापासून मध्यंदिन शाखा पढल्याची कथा आहे; तिची वाट काय होईल? म्हणून व्यास जे विभाग करितात त्याचा अर्थ पूर्वी कोणत्याहि वेदानें कोणत्याहि वेदाची जी कर्में चालत होती त्याचा अर्थ शाखानियमाची व पठनपाठनक्रमाची व्यवस्था करितात असाच आहे. प्रतिशाखेला श्रेय देण्याचे कर्तव्य भगवान् व्यासांकडेच आहे; किंवा ब्रह्मलोकहृत्पुण्डरिकोपासनाफलत्वें करून छांदोग्याच्या ८ व्या अध्यायांत निर्दिष्ट असल्यामुळें (य११पू.२७१) समष्टिदहरस्थ[२१६] असतांनाच पूर्वादि मुखानीं वेदाचा उच्चार केला असा तृतीयस्कंधवाक्याचा अर्थ होत असून, त्या वेदाच्या संकराचे, ब्रह्मदेवाच्या उच्चारानुसार, मंदबुद्धि लोकांच्या ग्रहणार्थ पुनः प्रगट विभाग केले असा विष्णुपुराणाच्या वाक्याचा अर्थ होत आहे; किंवा -

आपल्याच दहराकाशामध्यें ब्रह्मदेवाच्या पूर्वादि मुखानीं वेदाचा विभाग ऐकून तो व्यासांनीं प्रगट केला असाहि अर्थ होतो.

शिष्य उवाचः- भगवन्! ''क्रिया हि विकल्प्यते न वस्तु'' क्रियेविषयींच विकल्प संभवतो, वस्तुविषयीं संभवत नाहीं असा न्याय असल्यामुळें वेदशाखाविषयक तीन तीन प्रकारचे विकल्प आपण कसें सांगता? यद्यपि सर्व व्यावहारिक वस्तु मायाकल्पित आहेत, तथापि त्यांना व्यावहारिक वस्तुत्व आहे; अन्यथा भाट्टनयाप्रमाणें सप्तभंगनय[२१७] व्यवहारातः वेदान्तियास इष्ट होईल.

**वत्सा तुवा पुसिले जैसे । पुरा कोणी न पुसिले ऐसे ।**
**तथापि कल्पादि काल आभासे । जीवबुद्धिस्तव[२१८] ॥४२१॥**
**स्वप्नीं आपुली माय देखे । तो आपण उपजवी परी आपणाहूनि पूर्वील लेखे ।**
**कालप्रतीति विशेखे । जीवबुद्धिस्तव ॥४२२॥**
**एरवी सृष्ट्युत्पत्तीस कांहीं । देश काल सर्वथा नाहीं ।**
**एवं सिद्धान्ती व्यास आणि ब्रह्मदेवहि । एकाचि समयीं उत्पन्न ॥४२३॥**
**उपासनार्थ महिमा भिन्न । एरवी आघवेचि उपपन्न ।**
**शिष्य म्हणे येणें प्रमाण । होईल भलते ॥४२४॥**
**आम्हीहि कृतयुगीं होतो ऐसे । कोणीहि म्हणेल आपैसे ।**
**श्रीगुरु म्हणती तरी हे नसे । अन्यथा कांहीं ॥४२५॥**
**प्रतिपुरुषभिन्न सृष्टि । ऐसी सांगे दृष्टिसृष्टि ।**
**तरी प्रतिपुरुष व्यष्टि समष्टि । सहज झाला यास्तव ॥४२६॥**
**बह्मसमसत्ते भासे समता । जीवबुद्धिस्तव विषमता ।**
**जैसा कां स्वप्न निर्माता । समष्टि व्यष्टि स्वप्नविषयीं ॥४२७॥**
**म्हणोनीच व्यासास विष्णु म्हटले । उपासनार्थ सांगितले ।**
**एरवी आघवे निर्मिले । भगवंतेंचि ॥४२८॥**
**यद्यपि येणें मानें । अविद्येते मायात्व येणें ।**
**तरी आम्हा एकजीववादिया कारणें । इष्टचि ते ॥४२९॥**
**आणि प्रतिबिम्बापेक्षिक[२१९] बिम्बत्वारोपावच्छिन्न बिम्बभूता ।**
**ईश्वरा कलंक न लगे सर्वथा । यालागीं वादीस्तव वाक्यसमन्वयव्यवस्था ।**
**आणि तूं तंव जाणता वाक्यबळें ॥४३०॥ (य११पू.२७२)**
**विषयाची जयासी चट । तयासाठीं शाखा अचाट ।**
**जो दुःखी अमृते नीट[२२०] । तयासी सर्व रस तृप्तीमाजीं ॥४३१॥**
**तेवि वाक्यसमन्वय वादीसाठीं । तुझ्यास्तव वृत्तिव्यवस्था गोमटी ।**
**निकी सांगितली ते कंठीं । आवडी धरी ॥४३२॥**

हृदयात वेदांची उत्पत्ति

आणिकहि रहस्य एक । जो परमेश्वर हृदयनायक ।
तो अनाहतनादीं सम्यक्। उपजवी श्रुति ॥४३३॥
तो प्रणव एक वेदू । तत्पर त्वद्गतसमष्टिस्वप्नलोकसंबंधू[२२१] ।
स्वाधिष्ठानचक्रीं ब्रह्मा विनोदू । चारी वेद जे सांगे ॥४३४॥
तेचि ब्रह्मदेवाच्या मुखेंकरून । बोलिजे चतुर्वेद निर्माण ।
किंवा कुंभक करिताक्षणीं ब्रह्मयाचे ध्यान । हृदयीं बोलिले योगशास्त्रीं ॥२३५॥
तेथ जे अनाहत नादाची स्थीति । सहावे अध्यायी तात सांगती ।
तेथ जी होय शब्दोपपत्ति । त्या जाण श्रुति तव हृदयीं ॥४३६॥
तूंचि तयांचा वक्ता व्यास । परी हा अवघा त्वत्समष्ट्यंश ।
तूं एक आपणास । देह मानिसी म्हणोनी ॥४३७॥
म्हणोनी तूं ईश्वर तूं कमलास्य[२२२] । तूं मनु तूं व्यास ।
परी भुललास आपणास । यालागीं प्रमाण तुजला तूं ॥४३८॥
आपणा वेगळे आपणासी । प्रमाण होता लाज नये कैसी ।
म्हणोनी वेदप्रामाण्यविशेषीं । प्रामाण्य तुझे ॥४३९॥
आपणा आपण विसरणें । मग दुजियानें दाखवून देणें ।
तरी धिक् धिक् तयाचें जिणें । कवण न म्हणे पैं ऐसे ॥४४०॥
यालागीं तुज तूं प्रमाण । तुज तूं प्रमेय पूर्ण ।
तुज तूं ओळखावया प्रमेय प्रमाण । निःशेष जाण आटती ॥४४१॥
''प्रमेय परिच्छेदें । प्रमाणत्व नांदे ।
ते कायी स्वतः सिद्धे । वस्तूच्या ठायीं ॥१७॥'' अमृतानुभव प्र.५
म्हणोनी मेयाधीन[२२३] मान[२२४] । हे संक्षेपशारीरककारांचें वचन ।
जाहले आहे प्रमाण । त्वत्प्रमाणें ॥४४२॥
परी केवल देहात्मविवेके । जैनासम आपणा न देखे ।
येणें व्यष्टि अहंकारचि वेगळा लेखे । यालागी तया निरखे मानबद्ध ॥४४३॥
समष्टिप्रकृतिविवेक[२२५] करूनी । जरी सांख्यपुरुष[२२६] ये व्यापकस्थानीं[२२७] ।
तरी अन्यपुरुषापेक्षें[२२८] करूनी । व्यष्टित्व पावे ॥४४४॥
म्हणोनी वाक्यमात्रें होय जागा । तरी प्रपंचस्वप्ना तूंचि जागा*[२२९] । (*अधिष्ठान)



''चिरसुप्तानां जागर्यायै श्रुतिरंबावत्''
या व्याससूत्रानुगा । बुद्धीते करी ॥४४५॥ (य११पू.२७३)
यद्यपि अद्वैतसिद्धींत मधुसूदन ।
बोलिले कीं दृष्टिसृष्टिवादींहि वेद न होती स्वप्नासमान ।
तरी ते अर्थाविषयींच जाण । शतश्लोकी आणि आत्मपुराणसमन्वयें ॥४४६॥
असत्योपदेशेंहि सत्यप्राप्ति । ऐसी शतश्लोकींत आचार्योक्ति ।
जीवापासूनी दाविल्या श्रुति । आत्मपुराणीं ॥४४७॥
नास्तिकांच्या मता । अर्थाविषयीं असत्यता ।
म्हणवोनी अविरोधव्यवस्था । केली तयांची ॥४४८॥
म्हणोनी येणें व्यष्टिता फिटेल । समष्टिताहि तुटेल ।
चुकल्यासारखे होते ते भेटेल । तुझे तुज रूप ॥४४९॥
हें न साधे तरी ध्यानबळें । आपले समष्टित्व उजळे[२३०] ।
छांदोग्यीं अष्टमाध्यायीं सगळे । सांगितले तैसें ॥४५०॥
येणेंहि कळे सकळ कांहीं । परि परिशेष तूं शेषशाई ।
हें वेदवाक्यादिक पाही । सेवक तुझे ॥४५१॥
जें वेदवाक्य एक । तुज प्रमाण म्हणोनी प्रवर्तक ।
ते तूं सांपडलिया स्तावक । भाट तुझे ॥४५२॥
येणें मानें गुरुवाक्य आघवे । वेद झाले स्वभावे ।
तातहि बोलिले बरवे । आम्हाचि साठीं ॥४५३॥
तयाचे बिसाट शब्द । सुखें म्हणो येती वेद ।
सदेह सच्चिदानंद । कां नोहावे ते ॥१६३३॥ ज्ञानेश्वरी अ.१८
जाहली स्वेच्छाचि विधि । सैरचि झाला समाधि ।
एवं अमृतानुभवीं प्रसिद्धि । तातोक्तिचि ॥४५४॥
म्हणोनी तुझी इच्छा इतरा विधि । ही स्वप्नीची आघवी आधी[२३१] ।
जाण गा अवधि[२३२] । जागृती ये तों ॥४५५॥
हे असो दीपें सूर्य ओवाळिला । तेवि वेद तूं दाविला ।
इतुकियानें शिष्य जाहला । गुरुसहित आपणचि ॥४५६॥
शिष्यासी समाधि मध्यस्था तंद्रा । वादीस येवो पाहे निद्रा ।

दृढ देखोनी वेदान्तमुद्रा । श्रीगुरुनाथांची ॥४५७॥
पुढती श्रीगुरु सावधानें । म्हणती वादी पुढें काय पुसणें ।
समन्वय झाला तो मानें । किंवा नाही ॥४५८॥
वादी म्हणे गुरुशिष्यांचे । गारुड बोलणें न कळे साचे ।
सिद्धान्ती म्हणे ज्वरिता न रुचे । षड्रस अन्न जया परी ॥४५९॥
जयासी पाहिजे जुती । तया काय पाजळणें ज्योति ।
शंका बोलावया प्रति । कवणे त्वन्मुखा दिधली खीळ ॥४६०॥
वादी म्हणे आप्तवचन । जरी आहे प्रमाण ।
परी युक्तिविरुद्ध असतां जाण । न मानावे ऐसी श्रुति ॥४६१॥(य११पू.२७४)
न ह्याप्तवादान्नभसो निपतन्ति महासुराः ।
युक्तिमद्वचनं ग्राह्यं मयान्यैश्च भवद्विधैः ॥
केवळ आप्तवचनें करून । गगनांतूनि नव्हे दैत्यपतन ।
यालागीं युक्तियुक्त मानावे वचन । मी तुम्हीं आणि सर्वांनीं ॥४६२॥
ऐक म्हणे सिद्धान्ती । वचन प्रमाण अनिरुद्धवृत्ति ।
ते योग्य आहे सांख्याप्रति । परि आम्हासी नाहीं ॥४६३॥
आप्तवाद म्हणावा । आणि गगनांतूनि देवपतनाचा आरोप करावा ।
तो दोषाभासचि आघवा । दोष नाहीं ॥४६४॥
आप्त म्हणजे यथार्थ वक्ता । तो कासया बोलेल गगनांतूनि देवपतनता ।
लक्षण न समजुनी दोष देतां । तरी मूर्खता वादीची ॥४६५॥
अथवा यथार्थ वक्ता असोन । जरी बोलेल देवपतन ।
तरी ते झालियाविण । न राहील सर्वथा ॥४६६॥
नहुष आणि ययाती । स्वर्गांतूनि पडले क्षितीं ।
क्षुब्धाप्तवचनेंचि निश्चिती । पुराणीं भारतीं या कथा ॥४६७॥
अवघी युक्तीच प्रमाण । तरी युक्तिमद्वचन कां करावे ग्रहण ।
म्हणोनि आप्तवचनासी साधक पूर्ण । युक्ति होवावी हा स्मृत्यर्थ ॥४६८॥
वादी म्हणे ऋषी आप्त । होते काय प्रमाण येथ ।
सिद्धान्ती म्हणे मातृवचनहि निश्चित । ऐसेचि होईल सर्वथा ॥४६९॥
सकळचि अनाप्त होतील जरी । शंका केवि त्वां करावी तरी ।


सामान्य लक्षण न धरितां अंतरीं । विशेष शंका घडेना ॥४७०॥
सामान्य मानलिया आप्त । तरी तल्लक्षणपरीक्षा देवऋषीहुनि कोठें राहत ।
प्रत्यक्ष वस्तु दाविल तो आप्त । तरी मग शब्दप्रमाणचि नाहीं ॥४७१॥
आपण पहातो ज्या घटाते । कोणी 'हा घट' म्हणता तयाते ।
तरी तयाच्या शब्दातें । प्रमाणता काय ॥४७२॥
म्हणोनी आप्तवचनाची परोक्षप्रमा । आतां आप्तवचन न पावे भ्रमा ।
येथहि सांगतो अनुगमा[२३३] । येईल ऐसे ॥४७३॥
इंद्रियविकारे करोन । प्रत्यक्ष पदार्थ दिसती भिन्न ।
जैसे काविळें डोळा पिवळे उष्ण । अवघे दिसे ॥४७४॥
वादी म्हणे काविळ होय एकाद्यासी । परी जे प्रत्यक्ष सकळासी ।
तयाचा बाध निःशेषीं । सर्वथा न होय ॥४७५॥
सिद्धान्ती म्हणे जे प्रत्यक्ष सर्व लोका । त्याचाहि अनुमानें बाध निका ।
देह मी आहे हें प्रत्यक्ष सर्व लोका । परी सुषुप्त्याद्यनुमानें बाध त्याचा ॥४७६॥
(य११पू.२७५) ममत्वाध्यासें अहं भिन्न । स्वप्नांत आपणा मानी अन्य ।
सुषुप्तींत न स्मरे देहमीपण । म्हणोनी आत्मा भिन्न देहाहूनि ॥४७७॥
देह जड आत्मा चेतन । देह ज्ञेय आत्मा ज्ञान ।
देह आत्मा एक होता जाण । सकळ होतील मरणरहित ॥४७८॥
इत्यादि अनुमानें करोनी । सर्व लोकप्रत्यक्षहि होय अस्थानीं[२३४] ।
आतां प्रत्यक्षेंहि करोनी । प्रत्यक्षबाध होतसे ॥४७९॥
इंद्रियगोलकरचनाविशेषें[२२५] । वस्तु जना भिन्न भिन्न भासे ।
एक वस्तु कवणाते मोठी दिसे । कवणाते लहान दिसे तेचि ॥४८०॥
एकासी अंतर दिसे बहुत । एकासी दिसे किंचित् ।
निंब कडु नाहीं लागत । ऐसेहि असती अभ्यासी ॥४८१॥
म्हणोनिया प्रत्यक्ष प्रमाण । सर्वथा बाध्यचि जाण ।
आणि ते आगमबाध्यहि पूर्ण । आहेचि कीं ॥४८२॥
पिण्ड[२३६] पाळिला जाय जेथ । अकस्मात् जाति भेटता तेथ ।
तरी पालकगोत्राध्यास[२३७] निवृत्त । सहज होय ॥४८३॥
माता जाणे पिता । बाळ पावे शब्दार्था ।

येणें शब्दबाध्य प्रत्यक्षता । सहजचि आहे ॥४८४॥
जागा हो म्हणता जननी । बाळ उठे खडबडोनी ।
स्वप्न प्रत्यक्ष तेचि क्षणीं । समूळ नाशे ॥४८५॥
तेवि पदार्थ दिसती ते सत्य असती । अद्वैतागमे नाशे ही मति ।
वादी म्हणे आगमबाध्य निश्चिती । प्रत्यक्ष मज वाटेना ॥४८६॥
असतां दृष्टविरोध[२३८] । जैमिनी सांगती गुणार्थवाद ।
'यजमानः प्रस्तरः' आहे वाक्य प्रसिद्ध । यांत यजमान पाषाण न होय ॥४८७॥
सिद्धान्ती म्हणे ऐक गोष्टी । शब्दें न बाधे व्यावहारिक दृष्टि ।
'यजमानः प्रस्तरः' येथेंहि पुष्टि । अद्वैतागमाची ॥४८८॥
जे गौणार्थचि बोलणें । तरी तात्विक बोध होय तेणें ।
आतां प्रत्यक्ष सत्य मानणें । येथ प्रमाणचि नाहीं ॥४८९॥
प्रत्यक्षचि सत्य होईल । तरी अनुमान आघवे उडेल ।
पुत्र मेलिया न रडेल । कोणीहि केव्हां ॥४९०॥
प्रत्यक्ष होता यथार्थ । पुत्र त्रिकालाबाधित ।
मग शोकाचें कारण तेथ । काय उरे ॥४९१॥
अन्न न सरेल खाता । क्षुधा न हारपेल सर्वथा ।
जरी प्रत्यक्षासी सत्ता । होईल दृढ ॥४९२॥
म्हणाल प्रत्यक्ष होते लीन । तरी तेथ लागेल अनुमान ।
वादी म्हणे हेहि बोलण । करूं कां आम्हीं ॥४९३॥
सिद्धान्ती म्हणे तेहि न साधे । 'पर्वतो वन्हिमान् धूमत्वात्' या शब्दें ।
पर्वताशी अनुबंधे[२३९] । प्रत्यक्षता ॥४९४॥ (य११पू.२७६)
नातरी पक्षाप्रति[२४०] । हेतु विशेष[२४१] लागेल पुढती ।
तेणें साध्यपक्षव्यावृत्ति[२४२] । होणार नाहीं ॥४९५॥
प्रमाणांतरानपेक्षें[२४३] करून । प्रमेय साधी तेचि प्रमाण ।
परी हें अनुमान । तैसें नोहे ॥४९६॥
स्वयंपाकशाळेंत अग्नि देखिला । तो धूमसहित अवलोकिला ।
मग व्याप्ति म्हणोनी निर्धारिला । बुद्धिमाजीं ॥४९७॥
मग उपमान प्रमाणें धूमसादृश्य केले । अथवा प्रत्यक्ष धूमा ओळखिले ।
तेव्हां अनला अनुमानिले । पर्वतावरी ॥४९८॥
परंतु अग्नि प्रत्यक्ष झाला जेव्हां । अलौकिक[२४४]प्रत्यक्षें सकलाग्नि प्रत्यक्ष तेव्हां ।
मग अनुमानाचा गोवा[२४५] । पाहिजे किमर्थ ॥४९९॥
अग्निभय चुकवावया व्यवहार । अलौकिक प्रत्यक्षा लौकिक हेतुमात्र ।
प्रसंगविशेषे स्वतंत्र । अनुमान दावी ॥५००॥
तरी प्रत्यक्षाहून । अल्प होईल अनुमान ।
आणि लौकिक व्यक्ति बोधें करून । अलौकिक जात्यादिबोध होय ॥५०१॥
तो बोध भंगावया कांहीं । प्रत्यक्षानुमानीं भेद नाहीं ।
म्हणोनी अलौकिक अनुमानहि । अलौकिक प्रत्यक्ष होईल ॥५०२॥
ऐसे जाहले तरी तत्वतां । तरी प्रमाणलक्षण गेले वृथा ।
केवळ आली लौकिकता । दोही प्रमाणाते ॥५०३॥
जगद्व्यवस्था कोणतीहि । विशेष प्रत्यक्षानुमानें नाहीं ।
नातरी राजन्याय कांहीं । प्रवर्तेल ना ॥५०४॥
आपसांत अवघीयांचे होवो मरण । परी चोरा दंडावया कवण कारण ।
येथ लोकनाश होय म्हणून । चोर जरी दंडावे ॥५०५॥
तरी दंड सर्वथा प्रत्यक्ष नाहीं । मग चोरें भय मानावे कायी ।
शब्दें भय मानता लवलाही । तरी आगमप्रामाण्य ॥५०६॥
जीवराजन्यायांत[२४६] दोष असती । यास्तव अनुमानें चोर पळती ।
अगाध भगवद्व्यवस्थीती । तेथ चाळे न चालती कवणाचे ॥५०७॥
प्रसंगीं अधर्मा धर्मता । कां धर्मासी अधर्मता ।
ये परी ते आगमार्था । अनुसरोनिचि ॥५०८॥
प्रत्यक्ष आणि अनुमान । धर्मी[२४७] होता प्रमाण ।
तरी क्रिया आणि भोगस्थान । होईल एक ॥५०९॥
म्हणोनी शब्दावांचुनी कांहीं । धर्मामाजीं प्रमाण नाहीं ।
विरोधी अधिकारियाहि । तो तो शब्दू प्रमाण ॥५१०॥
वादी म्हणे आप्तवचन । अपेक्षा आहे असे मानू क्षण ।
तरी रागद्वेषरहित आप्तलक्षण । ऐसा केवि ओळखिजे ॥५११॥
सिद्धान्ती म्हणे काय त्वद्वचनार्थ । कोणींच नाहीं रागद्वेषरहित ।

कीं तुज भेटती ते ते समस्त । रागद्वेषरहित नसती ॥५१२॥ (य११पू.२७७)
प्रथमपक्षीं आप्तलक्षण । न घटे म्हणुनी त्वद्वचनापेक्षा[२४८] खंडण ।
परी अपेक्षा तंव त्वां आपण । मानिली आतां ॥५१३॥
तुज भेटती ते अवघे सदोष । तरी तुझें दुर्दैवचि विशेष ।
हें विवेचन बहुवस । अनेक ठायीं आलेसे ॥५१४॥
परी वारंवार तेचि पुससी । तरी द्वैतेचि उत्तर देवो तुजसी ।
तुज मागें भेटले ते अवघे दोषी । कीं पुढें भेटतील तेहि दुष्ट ॥५१५॥
प्रथमपक्षीं तुझें दुर्दैव पूर्ण । आणि द्वितीयपक्षीं तुज म्हणावया काय प्रमाण ।
पुढें दोषीच भेटतील संपूर्ण । हें सर्वज्ञाविण घडेना ॥५१६॥
तूं सर्वज्ञ हें आम्हासी । मान्य नाहीं व्यवहारदृशी[२४९] ।
पूर्वी जरी त्वां कवणासी । फसविले नसेल ॥५१७॥
तरीच कोणी मज न फसवावे । ऐसे तुवा मनीं धरावे ।
जो पूर्वीचा चोर तयासी  वागावे । विश्वासोनी कोणी कैसे ॥५१८॥
पूर्वी झाले ते गेले । क्षमेसाठीं देवा पाहिजे प्रार्थिले ।
आतां तरी सोडी वहिले । फसविणें आणिका ॥५१९॥
जरी रागद्वेषयुक्त । तरी सर्वासी न होय अनाप्त ।
जो वैरियासी अपकार करीत । तो होय आप्त कुटुंबाचा ॥५२०॥
सकळासीचि फसविता । तरी तयासीहि फसावे लागेल तत्वता ।
मग होईल अव्यवस्था । मातासुतादिकांचीहि ॥५२१॥
म्हणोनी तूं आग्रह सोडी । धरी ईश्वरचरणी गोडी ।
हृदयाचा सोयरा जोडी । मनुष्य जन्म पावोनी ॥५२२॥
मग तुज ईश्वरानुग्रहें करून । सद्गुरु मिळेल करुणाघन ।
जो न फसविता ज्ञानांजन । घालोनी नयन उघडील तुझे ॥५२३॥
परी ईश्वराराधन तेहि । आप्तवचनाविण न कळे कांहीं ।
म्हणोनी जे तुज पोशिती ठायीं । मातापिता ॥५२४॥
तयांची सेवा करी । एवं पतिसेवा करिता नारी ।
उमटे थोड्या बहुत परी । ईश्वरानुग्रहो ॥५२५॥
जो जो हिताची सांगेल गोष्टी । तो तो ईश्वर भावोनि पोटीं ।



ऐसा सातिशयाप्त[२५०] भजता शेवटीं । निरतिशयाप्त[२५१] भेटेल ॥५२६॥
पूर्ण लक्षण भेटलियाविण । जरी संशयीं राहे तुझें मन ।
तरी आप्तपरंपरा पाहोन । निर्णय करी ॥५२७॥
परी उगाचि संशयीं न पडे । आलिया जन्माचे सार्थक घडे ।
ऐसे पुण्य करी रोकडे । उचलोनी जोडे संतांचे ॥५२८॥
अवघेचि तुज फसविती । तरी एवढा तुझा द्वेष कां त्याप्रति ।
तूंचि असशील द्वेषमूर्ति । म्हणोनिया ॥५२९॥ (य११पू.२७८)
जरी जाहले स्वार्थी । तरी सर्वांस फसविता स्वार्थहानि पुरती ।
हेहि अवघेचि जाणती । म्हणोनी चोरहि वाहती आपसांत आणा ॥५३०॥
तूं जैसा तैसा आणिकाते । पाहतां समाधान नोहे पुरते ।
आपुले दोष टाकावयातें । गुण पहावे लागती अन्यत्र ॥५३१॥
एवं आप्तवाक्य प्रमाण । परमेश्वर निरतिशयाप्त म्हणोन ।
तद्योत्य[२५२] शब्द परम प्रमाण । निगमपुराण संज्ञ जो ॥५३२॥
नैय्यायिक वेदाची मानिती उत्पत्ति । मीमांसक वेद नित्य मानिती ।
आम्ही म्हणतो सर्गादौ श्रीपति । वेद उत्पन्न करीतु ॥५३३॥
असत्कार्यवादी नैय्यायिक । ते वेद मानिती अति क्षणिक ।
तरी तेणें नूतन विधायक[२५३] । श्रुत्युत्पत्ति होवावी ॥५३४॥
म्हणाल वेदाचा प्रागभाव[२५४] । तो नियत उपजवी भाव ।
तरी क्षणिकाचें ठायीं हें सर्व । वृथा होय ॥५३५॥
त्रिक्षणावस्थायी शब्द[२५५] । यालागीं नोहे प्रागभावनियतिबद्ध[२५६] ।
अथवा प्रागभावनियति मानता प्रसिद्ध । तरी सत्कार्यवाद गळा पडे ॥५३६॥
सर्गापासोनी प्रलयापर्यंत । वेद स्थायी[२५७] सांगती भाष्यादि ग्रंथ ।
परी नवे नवे उपजवी भगवंत । कल्पी कल्पी हे न घडे ॥५३७॥
स्वेच्छेनें नवे उपजविता । तरी 'स्वर्गकामो न यजेत' ऐसाहि विधि तत्वतां ।
उपजविणें लागेल उन्मत्ता । प्रमाणें तया ॥५३८॥
म्हणोनी तेचि पुढतो पुढती । निर्मिता होय विश्वपति ।
ऐसी वेदाची उत्पत्ति । आणि नित्यता प्रतीति दोन्ही योग्य ॥५३९॥
येथ पूर्वमीमांसक देती उत्तर । कीं वेद उत्पन्न करील ईश्वर ।

तरी भक्तपक्षीत्वास्तव भलता प्रकार । वर्णील तो तयामाजीं ॥५४०॥
परी हें मीमांसकांचें मत । सर्वथा आहे अयथार्थ ।
ईश्वर करी भक्तपक्षपात । हे मीमांसक म्हणे कीं वेदान्ती म्हणे ॥५४१॥
मीमांसका मान्य नाहीं धर्मी ईश्वर । तरी आक्षेपिता येईल कैसा भक्तपक्षपातादि
प्रकार । वेदान्ती तंव म्हणे ईश्वर । पक्षपातरहित ॥५४२॥
जरी पूर्वमीमांसक । ईश्वरा म्हणेल परपारिभाषिक(२५८) ।
तरी मग तया साशंक । होताचि नये ॥५४३॥
जरी ईश्वर पारिभाषिक नाहीं । तरी मीमांसका मान्य तोहि ।
म्हणोनी ईश्वरनिर्दोषत्वहि । मानणें लागेल तयाते ॥५४४॥
मीमांसक वदेल पुढती । येणें बौद्धशास्त्रासम होईल श्रुति ।
तैं आम्ही म्हणो हे चित्तीं । शंकाचि नये ॥५४५॥
सामानाधिकरण्यविरुद्ध(२५९) । बोलेल परमात्मा जरी प्रसिद्ध । (य११पू.२७९)
तरी कासयाचा बाध । लागेल करणें ॥५४६॥
वेदाचा बाध(२६०) करावा । तरी धर्मू अवघा हरावा ।
तरी अन्यशास्त्रबाध न करावा । येणेंचि न्याये जरी ॥५४७॥
तरी पुरुषबुद्धीच्या ठायीं । तया दर्शनीं स्वातंत्र्य पाही ।
जे प्रत्यक्षानुमानग्रथित(२६१) अर्थहि । प्रधान केले त्यामाजी ॥५४८॥
शब्दप्रमाण नेणती बुद्ध । जैनशब्दीं अनुमाना विरोध ।
मानिती येविषयीं प्रसिद्ध । देवागमस्तोत्र पहावे ॥५४९॥
म्हणोनी जीवबुद्धीं आकलन । जो अर्थ तेथ काय शब्दप्रमाण ।
आतां म्लेच्छशास्त्रहि अप्रमाण । पुनर्जन्मादि सदर्थ नेणें म्हणोनी ॥५५०॥
वेदासम शास्त्र काढितां । तरी वेदासमचि प्रमाणता ।
मग उगेंचि शास्त्र काढिता । काज काय ॥५५१॥
वेदविषम शास्त्र काढिता । तरी वेदनिंदा करावी लागेल तत्वता ।
परी निषेधापूर्वी सिद्धता । प्रसक्तिची न्यायसिद्ध ॥५५२॥
म्हणोनी पूर्वीचे होतील वेद । येणें परास्त अन्य वाद ।
निंदावचन आदिसिद्ध(२६२) । सर्वथाहि घडेना ॥५५३॥
यद्यपि स्तुतिवचनासी । आनंतर्यत्व विशेषी ।
तरी समकालीन(२६३) स्थितीसी । तुके स्तुति ॥५५४॥
परी बाहुल्य(२६४) झाल्याविण । तिरस्कार न होय उत्पन्न ।
आणि तिरस्काराविण । निषेधवचन घडेना ॥५५५॥
म्हणोनी निषेधवचनाप्रति । आली वेदानंतर्य स्थीति ।
तंव वादी म्हणे सिद्धान्ती । भलते वदती निश्चये ॥५५६॥
वेदातहि निंदा अर्थवाद । आणि अधर्माचा निषेध ।
आहे म्हणोनी प्रसिद्ध । अनंतर होतील ते वाक्य ॥५५७॥
तेव्हां म्हणे सिद्धान्ती । अनादि संसाराची स्थीति ।
शब्दाचा अर्थ निश्चय जाती । म्हणोनी पूर्वकल्पसम अधर्म श्रीपति निषेधी ॥५५८॥
परी बौद्धासी अनार्य शास्त्र निषेधिती ।
ते असली पुस्तकें या कल्पींच जाळिती ।
म्हणोनी आनंतर्य तयाप्रति । युक्तिसिद्ध ॥५५९॥
आतां वेद आणि अन्य शास्त्र । जरी निर्मिता परमेश्वर ।
तरी प्रयोजन काय समग्र । कळेना कीं ॥५६०॥
प्रथम उच्चारिला वेद । त्यांत काय पाहिला भेद ।
म्हणोनी धर्म निर्मिला अशुद्ध । दुसरा आणिक ॥५६१॥
ईश्वरें प्रथम उच्चारावें । मग चुकले म्हणोनी अन्य शास्त्र करावे ।
तरी तो ईश्वर नोहे । जीवचि झाला ॥५६२॥
पाहोनिया अधिकारीं । शास्त्र निर्मितो म्हणावे हरी ।
तरी मग वेदाचेहि असती अधिकारी । म्हणोनि वेदावरी आक्षेपचि नये ॥५६३॥
(य११पू.२८०) वादी म्हणे पुढती । 'न म्लेच्छितव्यम्' इत्यादि' श्रुति ।
म्लेच्छमत निषेधिती । जरी येथ शब्दार्थ जाति प्रमाण ॥५६४॥
तरी म्लेच्छ वेद निषेधिती । तच्छब्दार्थ कां नव्हे जाति ।
प्रशंसोनी म्हणे सिद्धान्ती । उत्तर ऐक ॥५६५॥
वेद ग्रंथाचें घेवोनि वचन । अनार्य लोकीं केले खंडण ।
तैसे अनार्य ग्रंथाचें घेवोनि वचन । नाहीं खंडण केले वेदें ॥५६६॥
म्हणोनी वेदशब्दार्थ जाती । पूर्वकल्पानुसार उक्ति ।
तैं वादी म्हणे पुढती । टवाळ हे ॥५६७॥

आतां जरी एकाद्यान । घेवोनी अनार्य ग्रंथवचन ।
वेदीं घालोनी केले खंडण । तरी तें नित्य होईल कीं अनित्य ॥५६८॥
सिद्धान्ती म्हणे तेवढा भाग । अनित्य होईलचि चांग ।
वादी म्हणे परी जग । रूढ मानतील नित्य तो ॥५६९॥
सिद्धान्ती म्हणे अनार्य शास्त्र पाहतील जेव्हां ।
त्यांच्या ग्रंथीं वेदभागखंडण दिसेल तेव्हां ।
तेणें कोणता जुना कोणता नवा । कळेल वेद जगाते ॥५७०॥
यद्यपि शून्यवादादि निर्देश । पुराणीं सांपडती विशेष ।
तथापि पूर्व कल्पान्वयें तयास । जात्यर्थचि आहे ॥५७१॥
आणि अनार्यांचें ग्रंथीं । आनुपूर्वी[२६५] लिहोनी खंडिल्या श्रुति ।
अथवा वेदधर्मानंतर उत्तम धर्म हा निश्चिती ।
काढला आहे अनार्यचि म्हणती स्वयें ॥५७२॥
म्हणोनी वेद अनादि इतर सादि । वेद ईश्वरप्रणीत अन्य जीवबुद्धि ।
जरी म्हणावे अन्य धर्म वेदाचे आधीं ।
तरी प्रमाणत्वें उल्लेख वेदीं व्हावा त्याचा ॥५७३॥
बळेंचि न केला म्हणावा उल्लेख । तरी विशेष निंदा असावी देख ।
तेहि न म्हणता निर्दोख । रागद्वेषरहित वेदवेत्ते ॥५७४॥
रागद्वेषावांचोनि कांहीं । असत्य बोलावया ठावो नाहीं । म्हणाल वेद अनादि लवलाही । हे सिद्ध करावया तिही पूर्व प्रमाण चोरिले ॥५७५॥
तरी नैय्यायिकादि बहुत । वेदाते सादि म्हणत ।
तिही काढिले असते निश्चित । पूर्व प्रमाण शोधोनी ॥५७६॥
आप्तम्लेच्छाचेहि मानावे वचन । ऐसें न्यायसूत्रभाष्यांत बोलिले वात्सायन ।
मग पूर्व ग्रंथ असतां तरी शोधून । वेद भीड न धरून केवि न काढते ते ॥५७७॥
म्हणावे ठाऊके न तयासी । तरी ठाऊक जाहले केवि तुजसी ।
तूं विशेषबुद्धि म्हणावा तरी मजसी । पुससी कैसा ॥५७८॥
कल्पना केली कीं एकाद्यान । वेद पुढें होईल म्हणोन भविष्य वचन ।
आपुल्या ग्रंथांत ठेविले लिहून । (य११पू.२८१)
तरी मानतील पुरातन जन तया ॥५७९॥

तरी तो लिहिणार । जीव राहील कीं ईश्वर ।
प्रथमपक्षीं खोटा प्रकार । उघड होईल ॥५८०॥
द्वितीयपक्षीं परमेश्वरू । कां सांगेल भविष्य प्रकारू ।
सामान्य सांगोनिया निर्धारू । काय कळेल जनाते ॥५८१॥
जरी विशेष सांगेल । तरी मत कीं आनुपूर्वी बोलेल ।
मत सांगतां तदंश होईल । ईश्वरप्रणीतचि ॥५८२॥
दोन्ही धर्म ईश्वरप्रणीत झाले । तरी विरुद्ध उगीच कां निर्मिले ।
हें सांगावे लागेल वहिले । त्याचि ग्रंथाते ॥५८३॥
आनुपूर्वी जरी बोलेल । तरी ईश्वर अनार्यासम जीव होईल ।
म्हणोनि आम्ही म्हणो केवळ । ईश्वरोत्पन्न वेदू ॥५८४॥
वादी म्हणे पुढती । जरी ईश्वरप्रणीत श्रुति ।
तथापि पौरुषेयत्व निश्चितीं । न चुके त्याचे ॥५८५॥
सिद्धान्ती म्हणे अपौरुषेयता । नोहे पुरुषानुच्चार मात्रता ।
किंतु आनुपूर्वीरहितता । अपौरुषेयता बोलिजे ॥५८६॥
न राहेचि अवधान । यालागी आनुपूर्वी विलक्षण ।
आनुपूर्वी जरी होय समान । तरी म्हणा ईश्वरीं लीन सत्कार्य वेद ॥५८७॥
पुरुषोच्चारमात्रेचि पौरुषेयता । वेदासी बळेंचि म्हणता ।
तरी अध्यापकोच्चारेचि पौरुषेयता । मानावी लागेल मीमांसका ॥५८८॥
गुरुमतीं दोष हाचि । म्हणोनी आम्ही म्हणो तेचि ।
कीं वेदवाणी ईश्वराची । सर्वत्र समान ॥५८९ ॥
येथ धर्मराजाध्वरिंद्रपुत्र । वेदान्तपरिभाषेचा टीकाकार ।
म्हणे कीं संकल्प करी ईश्वर । मी पूर्वसदृश वेद रचीन ॥५९०॥
परी या टीकाकाराविषींचे । आधींच बोलणें निश्चलदासाचें ।
कीं यासी अधिक संस्कार झाले न्यायाचे । वेदान्ताचे तितुके नसती ॥५९१॥
मजला साच तेचि वाटे । वेद असत्कार्य नोहे गोमटे ।
यालागीं सर्गाआधीं विश्ववरिष्ठे । द्योतिजे वेदू ॥५९२॥
वर्णपरतंत्रता[२६६] तंव लोकीं प्रसिद्ध । अर्थपरतंत्रता तैसीच सिद्ध ।
स्वतंत्र जोडता ये संबंध । परी तेथहि करणें पडे निषेध पूर्व संबंधाचा ॥५९३॥

पूर्व शक्तिसंबंधनिषेधिता । तरी शब्दासी ये न्यूनव्यापकता ।
मग परिभाषार्थता[२६७] । सहज होय ॥५९४॥
नदीशब्द जलप्रवाहीं रूढ । व्याकरणीं ते संज्ञा गूढ ।
यालागी बोलिजे अवघड । आन संबंधु ॥५९५॥
व्याकरण शास्त्रा जे पढती । तेहि नदी संज्ञेस नदी न म्हणती ।
परिभाषा ज्या होती । त्या तितुक्याचि पुरत्या ॥५९६॥ (य११पू.२८२)
म्हणोनी संबंधहि । स्वतंत्र जोडता न येती कांहीं ।
नववस्तुसंकेत[२६८] जन ठेविती तोहि । बहुधा योगिक[२६९] ॥५९७॥
रूढ नव संकेत[२७०] करतील जरी । वर्णसमप्रत्ययें पर्याय तरी ।
होवोनी नाना शब्द निर्धारी । अकुशल होती घोटाळुनी ॥५९८॥
अनर्थक खंड[२७१] उच्चारिता । ऐसा सकळींच क्रम धरिता ।
तरी शतकोटिपर्यायता । प्रतिदिनी निपजेल ॥५९९॥
म्हणवोनी सकल शब्द तोहि । ईश्वरप्रणीत लवलाही ।
येथ आनुपूर्वी समता पाही । साक्षींत ईश्वरप्रणीतत्व द्योती ॥६००॥
आनुपूर्वीचे भजन[२७२] । द्योतीं पौरुषेयपण ।
यालागीं वेद करुणानिधान । नारायण द्योति स्वयें ॥६०१॥
वादी म्हणे वेदनिरूपण । जरी जाहले सप्रमाण ।
तरी ऐकल्याविण लक्षण । समाधान न वाटे ॥६०२॥
मध्यस्थ उवाच:-
ऋषयोऽपि पदार्थानां नान्त यान्ति पृथक्त्वशः ।
लक्षणेन तु सिद्धानामन्तं यान्ति विपश्चितः ॥
प्रत्येक पदार्थ भिन्न करिता । तरी ईश्वराविण ऋषीसहि नाहीं सत्ता[२७३]।
यालागीं लक्षणें सिद्ध पदार्था । जाणती विवेकी ॥६०३॥
म्हणोनी वादी म्हणे ते साचे । भिन्न लक्षण पाहिजे मंत्र ब्राह्मणाचे ।
वादी म्हणे परी ते व्हावयाचे । केव्हांहि नव्हे ॥६०४॥
हेतु, निर्वचन, निंदा, स्तुति । संशय, विधि, परकृति । पुराकल्प आणि विशेषावधारणकल्पना निश्चिती । सम असती ब्राह्मणीं मंत्रीं ॥६०५॥
''तेन ह्यन्नं क्रियते'' हा हेतु* । ''तद्दध्नो दधित्वं'' निर्वचन* जाण हे तूं ।
'अमेध्या वै माषा'' हे उघड दिसतु । *निंदावचन ॥६०६॥
''वायुर्वै क्षेपिष्ठा देवता'' ही *स्तुति ।
*संशय बोलिजे ''तद्व्यचिकित्स जुहुवानी ३ माहौषा ३'' मिति ।
''यजमानेन संमितौदुम्बरी भवति'' । *विधि बोलिजती इत्यादि ॥६०७॥
''माषामेव मह्यं पचति'' । इत्यादि वाक्यीं *परकृति ।
''यज्ञेन यज्ञमयजन्त देवा'' इति । *पुराकल्प म्हणती श्रुतिवेत्ते ॥६०८॥
''यावतोऽश्वान् प्रतिगृह्णीयात्तावतो वारुणांश्चतुष्कपालान्निर्वपेदित्यादि'' वचना ।
बोलिजे *विशेषावधारणकल्पना ।
वचनार्थ सांगेन पंडित जना । पुसतील तेव्हां ॥६०९॥ (य११पू.२८३)
परी ग्रंथीं विस्तरभयेंकरून । लिहिण्याचें नाहीं कारण ।
तात्पर्य यांतील एक एक घेऊन । मंत्रब्राह्मणनिर्धार नोहे ॥६१०॥
सिद्धान्ती म्हणे अध्ययन केलियाविण । उगाचि वादी करितो प्रश्न ।
हेतु आदि मंत्रब्राह्मणीं समान । तथापि *समाख्या लक्षण मंत्राचें ॥६११॥
समाख्या म्हणजे प्रसिद्धि । तें प्रमाण सांगे जैमिनीबुद्धि ।
आणि तैत्तिरीयब्राह्मणामध्येंहि । मंत्रसमाख्या बोलिली ॥६१२॥
''अहे बुध्नीय मंत्रं मे गोपाय । यमृषयस्त्रयीविदा विदुः ।
ऋचः सामानि यजूंषि सा हि श्रीरमृता सताम्''॥ (१।२।१।२६)

स्वकृत भाष्य :-

अग्न्युपहित परमेश्वर ।
मे मंत्रं मां मननात् त्रायते इति तथाविधं गोपाय रक्षस्व ।
विघ्नैर्माभिभावय इत्यर्थः ।
कथंभूतं मंत्रं यं ऋषयः विदुः ।
के ते ऋषयः त्रयीविदाः ।
का सा त्रयी ऋचः सामानि यजूंषि सा एव त्रयी सताम् सज्जनानाम् ।
अमृता श्रीः मोक्षैश्वर्यमस्तीत्यर्थः ।

अर्थ:- हे अग्न्युपहित परमेश्वर! तूं माझ्या मंत्राचें रक्षण कर. सर्व सज्जनांचें मोक्षैश्वर्यरूप ऋग्यजु:साम हे जे तीन वेद त्यांना जाणणारे ऋषि या मंत्राचें माहात्म्य जाणतात.

समाख्या लक्षणावरी कांहीं । दोष सर्वथा येत नाहीं ।
बोलिले जैमिनीहि । येणेंचि मानें ॥६१३॥
''तच्चोदकेषु मंत्राख्याः'' (२।१।३०)
अभिधायक वचनें कांहीं । संप्रदायवेत्ते तया पाही ।
मंत्र म्हणती जेवि येथहि । आम्ही मंत्र पैं पढतो ॥६१४॥
एवं याज्ञिक समाख्यान । मुख्य मंत्रांचें लक्षण ।
आणि परिशेष सिद्धलक्षण । ब्राह्मणाचें ॥६१५॥
शेषे ब्राह्मणशब्दः (२।१।३१)
मंत्रभाग वेगळा करिता । शेषभाग ब्राह्मणाचा तत्वतां ।
एवं द्वितीयाध्याय प्रथमपादीय सप्तमाष्टमाधिकरणार्था ।
जैमिनीय प्रामाण्यें तत्वता अवधारी ॥६१६॥
कंबुग्रीवादिमान् घट । याचें लक्षण प्रत्यक्ष होय नीट ।
परी वेद नोहे घट पट । यालागीं दृष्ट लक्षण अनुपपन्न ॥६१७॥
वेद नोहे अनुमान । म्हणोनी न लागे लिंगत्व लक्षण ।
शब्दाचें जें लक्षण । शाब्द समाख्यानचि योग्य ॥६१८॥ (य११पू.२८४)
सकळ शब्दहि ईश्वरप्रणीत । परी व्युत्क्रमें[२७४] म्हणता न होय अनर्थ ।
वैदिक म्हणता क्रमवर्जित । होय अनर्थ हा विशेषु ॥६१९॥
उच्चारिता पाणी आणी । म्हणता ये आणि पाणी ।
परी ईळेऽग्निमित्यादि वाणि । आनर्थक ॥६२०॥
वादी म्हणे मंत्र ब्राह्मण । जरी सप्रमाण सलक्षण ।
तरी वेदचतुष्टयलक्षण । पाहिजे पुनः॥६२१॥
सिद्धान्ती म्हणे छंदबद्ध तो ऋग्वेद । गीतिबद्ध सामवेद ।
उभयविलक्षण यजुर्वेद । अथर्व विशिष्ट कर्मप्रकाशें ॥६२२॥
मंत्रीं ब्राह्मणीं समता । असावयाचें कारण तत्वता ।
कीं वेदासी स्वतःप्रमाणता । अन्यापेक्षता कदा नव्हे ॥६२३॥
वादी म्हणे वेदाचें ठायीं । आम्हाते व्यवस्था न दिसे कांहीं ।
म्हणोनी पाठमात्रचि लवलाही । प्रयोजन तयांचें ॥६२४॥

सिद्धान्ती उवाचः- कां? व्यवस्था आहे. कर्मकांड आणि ब्रह्मकांड असे वेदाचे भाग, व तसेंच मंत्र व ब्राह्मण असे वेदांचें भाग आम्ही मानत असतो. तसेंच विधि, अर्थवाद, व उभयविलक्षण असे वेदवाक्यांचेहि विभाग आम्ही मानले आहेत. प्रेरणा करणाऱ्या वाक्याला विधि म्हटले आहे; किंवा ठाऊक नसणाऱ्या अर्थाला सांगणाऱ्या वाक्याला विधि म्हटले आहे. ज्याला स्वर्गाची इच्छा आहे त्यानें यजन करावे याला विधि म्हणतात. शब्दभावना[२७५] विधि होय असे भाट्ट म्हणतात. नियोग[२७६] हाच विधि होय असे प्राभाकर म्हणतात; आणि इष्टसाधनताबोधक[२७७] वाक्याला नैय्यायिकादि विधि म्हणतात. या सर्व मतांचें मुख्य तात्पर्य एकच आहे, म्हणून वाद करीत बसण्यांत अर्थ नाहीं. हा सर्व विधि चार प्रकारचा आहे. प्रेरणावाक्य ऐकून हा मला प्रवृत्त करितो अशा प्रकारची मनुष्याला भावना होत असते. लौकिक वाक्यामध्यें प्रेरणा करणाऱ्या पुरुषाचा अभिप्राय स्पष्ट होत असतो, म्हणूनच लौकिक वाक्याचें अनेकार्थ होणें योग्य आहे असें अपय्यादीक्षिताचार्यांनी म्हणून ठेवले आहे; तथापि ते अलंकारमूलक आहे. चोदनाप्रसंगीं तर लौकिक वाक्यांना देखील नियतार्थत्वच आहे. नाहीपेक्षां गाय आण या वाक्याचा अर्थ महिषी आण असाहि होऊं लागेल. आतां वेदामध्यें उच्चारणारा पुरुष कोणी अभिमत नाहीं, कारण गुरुपरंपरेनेंच अनादि अध्ययन चालले आहे. जगत् अनादि आहे व अध्ययन परंपराहि अनादि आहे. (य११पू.२८५) जगताचा विच्छेद नाहीं व परंपरेचाहि विच्छेद नाही; म्हणून वेद अपौरुषेय आहेत असें निरीश्वर मीमांसक म्हणतात. सेश्वर मीमांसकांचें म्हणणें कीं, पूर्वकल्पांतील वेदाचें परमेश्वर स्मरण करून या कल्पांत त्याचे उच्चार करितो. याविषयीं विशेष विस्तार सेश्वरमीमांसा व मीमांसान्यायप्रकाशादि ग्रंथांत पहावा. परमेश्वरानें उच्चारलेल्या लिङ्लकाराच्या योगानें चारहि प्रकारचा विधि उपपन्न होत असतो. उत्पत्तिविधि[२७८], अधिकारविधि, विनियोगविधि आणि प्रयोगविधि. ''अग्निहोत्रं जुहोति'' हा उत्पत्तिविधि होय. या ठिकाणीं कर्माचा करणत्वेंकरून अन्वय आहे. अग्निहोत्र होमानें इष्ट भाव्य आहे हा वाक्याचा अर्थ आहे.

मध्यस्थ उवाचः- अहो द्रव्य आणि देवता ह्या यज्ञाच्या दोन देवता आहेत. ''अग्निहोत्रं जुहोति'' या वाक्यांत त्यांचें स्पष्ट श्रवण होत नाहीं, म्हणून हा उत्पत्तिविधि होत नाहीं; तर अग्निहोत्र या नामधेयालाच तो पात्र होतो.

सिद्धान्ती उवाचः- असें म्हटलें तर ''दध्ना जुहूयात्'' हाच उत्पत्तिविधि

होऊं लागेल, आणि ''अग्निहोत्रं जुहोति'' हें वाक्यहि निरर्थक होऊं लागेल.

वादी उवाचः- तें अनर्थकच आहे, कारण लिङ् लकाराचा विधीचें ठिकाणी योजण्याचा वैय्याकरणाचा नियम आहे, आणि येथें लट् लकार आहे; म्हणूनच आम्हीं म्हणतो कीं, वेद पौरुषेय आहेत.

सिद्धान्ती उवाचः- चांगलें अवधान देऊन ऐक. नाद, वर्ण, पद व वाक्य अशी शब्दाची चार रूपें जगत्प्रसिद्ध आहेत. त्यांत नादशास्त्र गानवादनादिरूप आहे. तें पौरुषेय आहे असें तुला म्हणतां येणार नाहीं; कारण एकानें उच्चारलेला स्वर दुसऱ्याला गोडच वाटला पाहिजे असा पुरुषबुद्धीला नियम घालतां येत नाहीं; म्हणून ते भगवत्प्रणीतच असले पाहिजे. उदात्तादिस्वररूपानें वेदाचें ठायीं त्याचा समावेश आहे. मंत्रशास्त्र हें वर्णशास्त्र आहे, म्हणूनच त्याच्यांतील वर्णक्रम बदलवितां येत नाहीं. पौरुषेय असले तर एका पुरुषानें ठेवलेला क्रम दुसऱ्या पुरुषाला बदलवितां आला असता. आतां ज्याचा मंत्रावर विश्वास नसेल त्यानी मंत्र खोटे आहेत असें खुशाल म्हणावे, (य११पू.२८६) परंतु ते पौरुषेय आहेत असें म्हणतां येणार नाहीं; कारण अविश्वास हा फल दिसत नाहीं तोपर्यंतच असतो. हे मंत्र वेदामध्यें सर्वत्र आढळतात; म्हणूनच ''अग्निमीळे''च्या ठिकाणीं ''वन्हिमीळे'' कोणी म्हणत नाही. व्याकरण शब्दशास्त्र आहे, तेहि अनादि आहे असें मी म्हणतो, पौरुषेय नाहीं; कारण पौरुषेय असते तर दध्यानय या वाक्यामध्यें इ व आ चा संधिहि कोणाला करितां आला असता; परंतु इ व आ चा संधि उच्चारतांच येत नाहीं, आणि तो सदृशहि नाहीं. हे व्याकरणहि वैदिक आहे असें महाभाष्यकारानीं दाखविले आहे. जरी पाणिनीनें त्याचें ग्रथन केलें आहे तरी ''वृद्धिरादैच्'' या पाणिनीसूत्राचा क्रम बदलून ''आदैच् वृद्धिः'' असें म्हणता येईल, परंतु इ व आ चा संधि करिता येत नाहीं. तेव्हां पाणिनीहि या ठिकाणी परतंत्र आहेत असें म्हणण्यास हरकत नाही. दोनहि प्रकारच्या मीमांसा ह्या वाक्यशास्त्र होत. शब्दप्रधान वाक्यांचा पूर्वमीमांसेंत विचार असून अर्थप्रधान वाक्यांचा वेदान्तांत विचार आहे. त्याहि अपौरुषेय आहेत, कारण सर्व पुरुष आकांक्षापरतंत्र दिसतात; म्हणून जैमिनीसूत्रांचीं पदें बदलवितां येतील, परंतु आकांक्षा बदलविता येत नाहीं. यद्यपि लौकिक वाक्येंहि आकांक्षामूलक आहेत, तथापि त्यांना अलंकारिक आकांक्षा आहेत; तशी वैदिक वाक्यांना नाहीं. वैदिक वाक्यांना आलंकारिक आकांक्षा मानल्यास धर्माचें स्वरूप मनोरंजक मात्र होऊन कर्ममूलक जगाच्या सुखदुःखाची उपपत्ति लागणार नाहीं. याप्रमाणें सर्व शाब्दशास्त्रांचा क्रम आहे. पुनः क्रियाप्रेरणा[२७१] स्पष्ट असून ज्यांत इतिहास नाहीं असा लट् लकार जर वेदांत असेल तर त्याला लिङसाम्यता सर्वांनीं घेतली आहे; व ती घेतल्यावाचून गत्यंतर नाहीं. 'अग्निहोत्रं जुहोति' हें वाक्य तसेंच आहे. (अपूर्ण)

**वादी म्हणे बरवे झाले । ईश्वरवचन प्रमाण मज कळले ।**
**आतां गुरुवचनप्रमाणहि सिद्ध केले । पाहिजे ऐसेचि ॥६२५॥**
**सिद्धान्ती म्हणे करी श्रवण । अद्वैतमतें श्रीगुरुवचन ।**
**सर्वथाचि आहे प्रमाण । गुरु नारायणचि म्हणोनी ॥६२६॥**
**जाहलिया ब्रह्मप्राप्ती । तयाचे शब्दचि श्रुति ।**
**ऐसे तात बोलती । तें प्रमाण चित्तीं वसो दे ॥६२७॥** (य११पू.२८७)
**''तयाचे बिसाट शब्द । सुखें म्हणो येती वेद ।**
**सदेह सच्चिदानंद । कां नोहावे ते ॥१६४६॥** (ज्ञानेश्वरी अ. १८)
**''गुरुवाक्यांवाचोनि शास्त्र हातीं न शिवे'' । ऐसेहि बोलिले श्रीगुरुदेवे ।**
**म्हणोनी आमुचा सिद्धान्त स्वभावे । कीं सद्गुरुवाक्य तोचि वेदू ॥६२८॥**
**एवं गुरूचे सार्थवचन प्रमाण । आज्ञासिद्ध मंत्रासी नाहीं सिद्धारिशोधन । ऐसेहि मंत्रशास्त्रीं निरूपण । यालागीं निरर्थकहि गुरुवचन सुसिद्ध मी म्हणे ॥६२९॥**
**परी ज्ञानाविषयीं प्रमाण सार्थ । हा गुरुवचनींहि निश्चय यथार्थ ।**
**आणि ईश्वरवचनेंहि वेदान्त । पहावे ज्ञानार्थ सिद्धान्त हा ॥६३०॥**
**एवं अद्वैतीं गुरुवचन रीति । द्वैती स्वयेंचि आपण अल्पज्ञ भाविती । आपुलें वचन आपणचि अप्रमाण करिती । म्हणोनी त्यांची रीति आम्हासी पुसो नये ॥६३१॥**
**एवं आप्तवचन सर्वथा प्रमाण । हा सिद्धान्त अविचल पूर्ण ।**
**जो आळंदीवल्लभ कृपाघन । वारंवार उपदेशी मज ॥६३२॥**
**त्या श्रीगुरुजननीचें चरणीं । कविताकमळमाळ प्रेमें अर्पुनी ।**
**ज्ञानदेव हे नाम वाणी । गात छंदानीं सुखे खेळो ॥६३३॥**
**॥ हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे आप्तवचननिर्णयो नाम अष्टमं कुसुमम् ॥**

**॥ श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥**

ooo

## तळटीपा

(१)सर्वत्र (२)ज्ञान (३)प्रत्यक्ष किंवा अनुमान याने जे कळत नाही (४)आप्ताच्या शब्दात मंत्रशक्ति असो (५)प्रत्यक्षाच्शा विरुद्ध (६)मेल्यावर (७)त्याचा अर्थ भावरूप ठरतो (८)शब्दावरून एखादा अर्थ; पदार्थबोध (९)अवैदिक शास्त्र (१०)सर्व पृथ्वीवरील लोक संख्येच्या मानाने (११)अनुमान (१२)वाक्यामध्ये जी पदे असतात त्या पदावरून कळलेल्या अर्थाच्या परस्पर अन्वयाला अनुसरून असतात (१३)उच्चारिलेल्या वाक्याचा एक अन्वयात्मक बोध होण्याकरिता त्या वाक्यातील जे अर्थ असतात ते परस्पर जिज्ञासेचे विषय असणे (१४)इच्छित जो अर्थ त्याचे ज्ञान करून देण्याचे सामर्थ्य (१५)वाक्यबोध करून देण्याकरिता उच्चारलेल्या वाक्यातील पदांचा वेळ न लावता उच्चार केलेला असणे (१६)अज्ञ पुरुषांना (१७)एकदम (१८)पदार्थज्ञानानंतर मी पदार्थ जाणला असे होणारे मानसिक ज्ञान (१९)ज्याचा कधी बाध होत नाही म्हणजे जो पुन्हा खोटा ठरत नाही त्या विषयासंबंधाने असल्यामुळे (२०)अर्थाचा नियम नसणे (२१)अर्थच नसणे (२२)विरुद्धार्थ (२३)अर्थ बदलत राहणे (२४)असंख्य अर्थ (२५)सामर्थ्याचा प्रवाह (२६)शब्दाचा अर्थ जाति आहे असे मानणारे. उदा. घट या शब्दाचा अर्थ घटत्व जाति आहे (२७)शब्दाने व्यक्तीचा बोध घेणे. उदा. घट शबचा अर्थ घट ही व्यक्ती होय असे समजणे (२८)नेत्रदोषाने तज्जूच सर्पाकार होते किंवा बिळादि स्थानी पाहिलेला सर्पच रज्जुवर नेत्रदोशाने भासतो असे मानणे (२९)रज्जुचे इदंत्वे करून सामान्य ज्ञान व कोठे पाहिलेल्या सर्पाची स्मृति या दोहोंचा भयादि दोषांमुळे अविवेक होऊन एकत्र भासणे (३०)शब्दाचे सामान्य ज्ञान (३१)भिन्नार्थबोधक (३२)स्त्रीलिंगपुल्लिंग व्यवस्था (३३)उपपत्ती लागत नसल्यामुळे (३४)शाब्दप्रमाण (३५)ज्ञानत (३६)ध्वनिरूप अलंकारात (३७)अलंकारिक स्वारस्य (३८)ईश्वरसंकल्पाचे वेळीच (३९)वाटेल तसा (४०)शिक्षणावाचून, मुळचीच (४१)वाक्यरचना व व्यवहार (४२)आमच्यापेक्षा श्रेष्ठ (४३)योग्यपणा (४४)अर्थव्यवस्था नीट जुळते म्हणून (४५)अर्थबोध करून देण्यास समर्थ असलेल्या पदाला (४६)शास्त्राचा आधार न घेता बोलणऱ्यांना, शास्त्र मान्य नसणाऱ्यांना (४७)एकसारखेच (४८)शबब्दार्थ-क्रमांक १३-१४-१५ पहा (४९)जुन्या (५०)जगाचा उद्धार करणारे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे वचन (५१)घटत्वादि (५२)शक्तिवृत्तीने `घट या पदार्थाचा अर्थ घटव्यक्ति असा केला तरी (५३)आप्ताचे वचन आहे या हेतूवरून (५४)पदार्थ





(५४अ)तुझ्या वृत्तीने (५५)सिद्ध असलेले किंवा सिद्ध करावयाचे असे. सिद्ध असलेल्याची सिद्धी करणे हा दोष येतो (५६)प्रत्यक्षाच्या विरुद्ध (५७)सर्व लोकांना दिसण्याजोगे आहे असे सिद्ध करावयाचे (५८)दुसऱ्या ब्रह्माण्डातील लोकांना दिसण्याजोगे (५९)योग्याच्या संकल्पाने दिसण्याजोगे (६०)अस्तितावाचक (६१)अभाव वाचक शब्दांना (६२)एक स्वभाव बदलून त्याचे ठिकाणी दुसरा स्वभाव उत्पन्न होणे (६३)अवस्थान्तर (६४)संशयाला आधार (६५)शशशृंग वाचक (६६)फसविणारा (६७)प्रकार (६८)परंपरेने (६९)शास्त्रप्रामाण्याविषयी (७०)फसवणुक (७१)रितीने (७२)प्रार्थना करून (७३)भलताच धर्म (७४)प्राप्त होत नाहीत (७५)अवलंबून राहणे (७६)विषयभोगरूप (७७)दुर्गुणाने (७८)अपेक्षा नसताना उगीच दोषारोप करणे (७९)आक्रमण (८०)आप्त ओळखता आला नाही तर (८१)आप्तासारखा आप्त म्हणता येत नाही (८२)आप्ताच्या विरुद्ध (८३)शंकिता (८४)अनाप्त म्हटल्याबरोबर आप्त सिद्ध होतो (८५)आपल्याला कळली नाही म्हणून वस्तूच नाही असे शहाणे पुरुष म्हणत नाहीत (८६)यथार्थ वक्तृत्व इ. गुणांचा आश्रय तो आप्त (८७)जाति स्वीकारून त्या जातीचा आश्रय व्यक्ति नाही म्हणणे शक्य नाही (८८)अनाप्त नाही तो असे (८९)जबाबदारी (९०)सर्व शब्द (९१)शक्यार्थाहून निराळे (९२)मोजक्या (९३)शब्दाचे ठिकाणी (९४)शब्दार्थाला धरून (९५)निरर्थक (९६)निराधार (९७)क्रियापद (९८)तिङादि प्रत्यय (९९)कारण (१००)आप्तवाक्याचे तात्पर्य सांगणे (१०१)आप्ताच्या म्हणण्याचा यथार्थ बोध (१०२)वाच्यांशाने (१०३)अविद्यासंबंधाने (१०४)शक्तिवृत्तीनेच (१०५)स्थूल दृष्टीने (१०६)शक्यार्थता (१०७)भिन्नपणा (१०८)मानलेल्या अर्थाहून निराळा (१०९)सर्व शास्त्रांचा कर्ता (११०)दूषण (१११)निश्चयाने (११२)सर्वत्त्व हा धर्मी घेऊन त्याचे ठिकाणी विशिष्ट प्रकारचे ज्ञत्व सिद्ध करावयाचे असल्यास (११३)विशेषपणा गुप्त राहून म्हणजे न कळून , काहीतरी विशेषपणा आहे येवढेच कळणे हाच 'सर्व' शब्दाचा अर्थ आहे, असे म्हणशील तर (११४)सत्ता (११५)गुणत्व द्रव्यत्व इत्यादि जाती अपरसामान्य होत (११६)अनिश्चत (११७)याविषयी (११८)तदनुसार (११९)मजकरता अनुमान करून (१२०)शब्दप्रमाणाने जे कळले ते यथार्थ आहे असा जर दुसऱ्या प्रमाणावरून निश्चय झाला तर त्या यथार्थ निश्चयाला 'परतःप्रामाण्य' येईल, पण ते अनुमानप्रमाण होणार नाही. ज्ञानाच्या प्रामाण्याविषयी म्हणजे यथार्थते विषयी दोन वाद आहेत. – कित्येक पदार्थज्ञानाचे परतःप्रामाण्य मानतात व कित्येक स्वतःप्रामाण्य मानतात. कोणत्याही पदार्थाचे ज्ञान झाल्यावर तें ज्ञान यथार्थ आहे भ्रमरूप नाही असा जो निश्चय होतो, त्याची सामग्री. ज्या सामग्रीने पदार्थाचे ज्ञान झाले

त्या सामग्रीहून निराळे आहे- असे नैय्यासिक व वैशेषिक म्हणतात, व ह्यालाच 'परतःप्रामाण्य' म्हणतात. – दुसरे मीमांसक वगैरे 'ज्या सामग्रीने पदार्थज्ञान होते त्याच सामग्रीने त्या ज्ञानाच्या यथार्थतेचा निश्चय होतो असे म्हणतात. ह्यालाच 'स्वतःप्रामाण्य' म्हणतात. ह्याचा विशेष उलगडा वेदान्तावरील किंवा मीमांसेवरील ग्रंथ वाचूनच जिज्ञासूने करून घेतला पाहिजे. (१२१)नं१२१चुकून विसरला गेला त्यावर शब्दार्थाची टीप नाही. (१२२)वाक्यार्थाला बाध न येणे (१२३)अनुमानाचा हेतु (१२४)वाक्यार्थाला (१२५)अनुमानात साध्य हेतु निराळे असतात. ते वाक्यार्थात दिसत नाहीत. (१२६)आकांक्षा, संन्निधि व योग्यता यापैकी प्रत्येक (१२७)कारण अशा रीतीने वाक्यातील शब्दांचा परस्पर अन्वय राहणार नाही (१२८)आकांक्षादि मिळूनही अनुमानाला साधक-हेतु होत नाही. (१२९)मी अनुमान करितो, असा अनुव्यवसाय दिसत नाही म्हणून पदार्थज्ञान झाल्यावर - मी पदार्थ जाणला, असे जे ज्ञान होते त्याला न्याय शास्त्रांत 'अनुव्यवसाय' म्हणतात. उदा.-घटज्ञानानंतर- मी घट जाणला असे (१३०)विधीचे विशेष ज्ञान (१३१)दुसरा कोणी नियंता (१३२)धरावा (१३३)शब्दघोटाळ्यात (१३४)नवीन (१३५)पदार्थातील जे गुण किंवा क्रिया त्यांचे वाचक जे शब्द त्यांचा आश्रय करून (१३६)परलोकगतीचा खटाटोप (१३७)शक्तचर्थ जुळत नसल्यास (१३८)विद्वान (१३९)पदार्थांचा लाभ (१४०)व्यावहारिक (१४१)ऐक्य (१४२)जाणलेल्या (१४३)साधनरूपाने (१४४)ईश्वराची इच्छा व शब्द यांचा संन्निहितपणा नाही म्हणून (१४५)नित्यसंबंध (१४६)अर्थाचा बोध करून देण्याचे सामर्थ्य ज्यात आहे (१४७)आपण आपल्या ठिकाणी प्रवृत्ती उत्पन्न न करू शकणे (१४८)शक्त्यर्थाच्या संबंधी पदार्थाच्या ठिकाणी (१४९)सृष्टि आहे तोपर्यंत (१५०)स्थयित्वबोधक (१५१)भिन्न होऊ शकत असल्यामुळे (१५२)त्याचा शब्द (१५३)दृष्ट पदार्थ व अदृष्ट पदार्थ जिच्या योगाने कळतात ती शक्ति पदाचे ठिकाण स्थापन करणारी (१५४)अन्तर्यामी परमात्म्याचे वाचकत्व (१५५)खोटा (१५६)कल्पित धर्माच्या संबंधाने कळण्याजोगे (१५७)शक्यार्थ संबंधच (१५८)अपभ्रष्ट (१५९)नास्तिकांच्या शब्दप्रयोगाच्या दृष्टीने वैदिक शब्द व वैदिक शब्दांच्या दृष्टीने नास्तिकांचे शब्द अपभ्रष्ट होतात (१६०)योग्यायोग्य (१६१)कालाने (१६२)बिनचुक अदृष्ट उत्पन्न करणारे (१६३)अबाधित (१६४)एका विवक्षित पदार्थाचे ठिकाणी (१६५)अर्थवादाला सिद्ध न होऊ देणारे (१६६)यज्ञीय द्रव्य न होणारे (१६७)सांगितल्याप्रमाणे (१६८)गुरूच्या आज्ञेने घेतलेल्या मंत्राचे (१६९)तो मंत्र जपणाऱ्याला सिद्धिकारक होईल किंवा हानिकारक होईल हे पाहण्याचा मार्ग (१७०)ठराविक प्रकार (१७१)वाक्याचा तात्पर्यार्थ



न जुळणे (१७२)शक्तचर्थ (१७३)महावाक्याचे ठिकाणी (१७४)औपरोधिक भाषण (१७५)गुप्तार्थ (१७६)जारास (१७७)श्रीमहाराजांचा अपूर्ण ग्रंथ (१७८)त्या नांवाची लक्षणा (१७९)हा प्रमाण आहे किंवा ह्याचे म्हणणे प्रमाण आहे असे म्हणण्याकरिता तो इतराहून विशिष्टगुणाने युक्त असायला पाहिजे (१८०)शास्त्रावरून कळणारी / शास्त्रानुसार घडली जाणारी (१८१)ज्या ज्या लोकांनी जो जो धर्म स्वीकारला त्या त्या धर्मात तो तो धर्म त्या लोकांपेक्षा श्रेष्ठ अशा पुरुषाने निर्माण केला असेच मानले आहे (१८२)भूमी केव्हा अस्तित्वात आली, या काळाचा उल्लेख (१८३)बुद्धाचे गुरु वैदिक होते असे अश्वघोषचरित्रात आहे (१८४)वेदांवरजगणारा / वेदानंतरचा (१८५)सर्वात जुना (१८६)न्यायासनापुढे साक्ष देणे वगैरे (१८७)श्रुतिपूर्वी (१८७अ)अर्थबोध करून देणारा अव्यक्त शब्द (१८८)एकवाक्यता (१८९)चित्प्रकाश्यत्व (१९०)चाललेले असते (१९१)भासे ,/ प्रकटतो (१९२)ठिकाणी (१९३) शब्दप्रमाणाची शृंखला शेवटी ईश्वरात पर्यवसान पावते (१९४)आपल्याला आवडणारा (१९५)त्या विषयीचे अज्ञान नाहिसे झाल्याबरोबर (१९६)कर्म व फळ यांचे सान्निध्य (१९७)उत्पत्ति (१९८)मनात असलेले वस्तूंचे संस्कार (१९९)कोणत्या मंत्राने कोणते कर्म करावयाचे व कसे करावयाचे (२००)शब्दार्थ अनादि मानले नाही तर (२०१)चित्तशुद्धि द्वारा (२०२)देहाहून निराळे (२०३)देह म्हणजेच आत्मा (२०४)वस्तु एक प्रकारची असून तिला भलत्याच प्रकारची समजणे / भ्रम (२०५)मी कर्ता हा समज (२०६)ईश्वराच्या शब्दाने मानलेल्या (२०७)ईश्वर प्रकाशक आहे ह्या पक्षात (२०८)व्याकरणाने दुसराहि अर्थ होऊ शकतो (२०९)इतिहासबोधक वाक्य त्या ऐतिह्य कथनापुरते प्रमाण आहे (२१०)वेदातील ऐतिहासिक शब्द व्यक्तिवाचक नसून जातिवाचक आहेत (२११)असून न कळण्याला (२१२)तीन क्षणापर्यंत टिकणारा (२१३)एक नाणे (२१४)सुवर्ण नाणे (२१५)श्रवण केलेला अर्थ दृढ करण्याकरिता (२१६)समष्टिहृदयस्थ (२१७)जैन मत (२१८)जीवबुद्धीने (२१९)प्रतिबिंबरूपी जीवाच्या अपेक्षेने ब्रह्मावर आलेला बिंबत्वाचा आरोप, त्या योगाने ब्रह्मच बिंबरूप ईश्वर म्हटले जाते (२२०) निरोगी (२२१)तुझ्या ठिकाणी भासणाऱ्या समष्टि स्वप्रभूत अशा जगाचा संबंध (२२२)ब्रह्मदेव (२२३)साक्षीच्या आधीन (२२४)प्रमाण (२२५)मूळ प्रकृतीहून आपल्याला निराळा (२२६)सांख्यातील पुरुष (२२७)व्यापक होतो (२२८)पुरुषबहुत्व मानल्यामुळे (२२९)अधिष्ठान (२३०)प्रकाशित होईल (२३१)पीडा (२३२)स्थिर (२३३)अनुभवास (२३४)बाधित (२३५)इंद्रियांची जी स्थाने त्याची रचना निराळी असल्यामुळे (२३६)देह (२३७)ज्याने देहाचे पोषण केले त्याच्या गोत्रातील मी आहे, असा जो खोटा

समज झाला होता तो (२३८)प्रत्यक्षाच्या विरुद्ध (२३९)संबंध ठेवते (२४०)पक्ष सिद्ध करण्याकरता (२४१)निराळा हेतु (२४२)ज्या पर्वतावर वह्नी सिद्ध करावयाचा आहे तो पर्वत इतर पर्वताहून निराळा करता येणार नाही (२४३)दुसऱ्या प्रमाणाचे साह्य न घेता (२४४)अग्नी प्रत्यक्ष पाहून त्याचे ठिकाणी जे अग्नित्व लक्षण असते ते आपण जाणतो व त्यावरून सर्व अग्नी ह्याच लक्षणाचे असतात, असे आपल्याला सर्व अग्नींचे ज्ञान होते, ते अलौकिक प्रत्यक्ष होय (२४५)अथक ??? खटाटोप (२४६)मानवी राजाच्या न्यायात (२४७)धर्मांत (२४८)आप्त वचनाची आवश्यकता आहे हे तुझे म्हणणे (२४९)व्यवहारदृष्टीने (२५०)ज्याच्या ठिकाणी अपूर्णता आहे असा आप्त (२५१)परिपूर्ण आप्त (२५२)त्यांनी प्रगट केलेले (२५३)प्रत्येक वेळी नवीन धर्म विहित करणारी (२५४)उत्पत्तिपूर्वी नसणे (२५५)तीन क्षण असणे (२५६)ज्या वस्तूचा जेथे प्रभाव असतो तेथून तो पदार्थ उत्पन्न होतो ह्या नियमाने बांधला (२५७)स्थिर (२५८)वेदांना मान्य नसणाऱ्या वेगळ्या शास्त्रातील ईश्वरसंकल्पना (२५९)जीवब्रह्मैक्याच्या विरुद्ध (२६०)निरसन (२६१)प्रत्यक्षाने व अनुमानाने कळणाऱ्या गोष्टीही त्यात महत्वाच्या म्हणून सांगितल्या (२६२)प्रथम असल्याचे (२६३)स्तुति व ज्याची स्तुति केली ती वस्तु एकाच काळी राहू शकतात (२६४)पुष्कळ (२६५)पूर्वक्रम (२६६)अक्षराच्या स्वाधीन असणे प वर्ग ओठानेच उच्चारावा लागतो इ. (२६७)परिभाषा होणे / संज्ञा होणे (२६८)नवीन वस्तूचे नांव (२६९)साधित (२७०)संज्ञा (२७१)शब्दाचा तुकडा (२७२)अंगीकार (२७३)सामर्थ्य (२७४)उलटे (२७५)शब्द ऐकल्याबरोबर मला काही करावयास सांगतो असा बोध होणे (२७६)आज्ञा यांचा अर्थ स्पष्ट होण्याकरिता पूर्व मीमांसाच पहावी (२७७)इष्ट अशा स्वर्गाच्या प्राप्तीचे साधन सांगणारे वाक्य (२७८)कर्माच्या स्वरूपाचा बोध करून देणारा (२७९)क्रियेची प्रेरणा





॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय ९ वा.

# गुरुदोष : आक्षेप व परिहार

**जय जय सद्गुरु पूर्णचंद्रा । जय जय जद्गुरु विश्वंभरा ।**
**जयजय सद्गुरु करुणाकरा । सर्वेश्वरा आळंदीपते ॥१॥**
**जय जय सद्गुरु दीव्य मूर्ति । श्रुति गाती तुझी कीर्ती ।**
**पुढें प्रसादे ग्रंथस्फूर्ति । स्फुरेल ती पुरती[१] ऐकोत श्रोते ॥२॥**
**मागील ऐकोनी आप्तवचन । शिष्य पुढती करी प्रश्न ।**
**म्हणे महाराज कृपा करून । मज गुरुलक्षण सांगावे ॥३॥ (य११पू.२८८)**
**श्रीगुरु म्हणती भलारे भला । तुवा उचित प्रश्न केला ।**
**तरी सावध होवोनि वहिला । श्रवण करी ॥४॥**
**सद्गुरूचें मुख्य लक्षण । बोधूं जाणे शिष्याचें मन ।**
**आपुलिये अंगीं गुरुपण । आठवचि नाहीं ॥५॥**
**ना तरी गंगा जगा तृप्त करी । परी जगीं पुजावे हें मनीं न धरी ।**
**तेवि सबाह्य अभ्यंतरीं । निववी जो जगा ॥६॥**
**चंद्राचें शीतल लक्षण । क्षीराब्धीचें निर्मळपण ।**
**मिळोनी ओतले जयाचें मन । श्रीगुरु तो ॥७॥**
**जयाचिया तेजापुढें । इंद्रादिक लाजती बापुडे ।**
**ज्ञानी परी जगदाचरण न मोडे । तोचि श्रीगुरु ॥८॥**
**पुत्राहूनि गाढे । शिष्यावरी प्रेम चढे ।**
**तथापि समत्व न मोडे । तोचि श्रीगुरु ॥९॥**
**माझे शिष्य आहेत कोणी । हा आठवचि नाहीं अंतःकरणीं ।**
**अवघा सद्गुरुचि देखे लोचनीं । श्रीगुरु तो ॥१०॥**
**उपदेश मेघवृष्टि ऐसा । शिष्यभूमि पाड ये ब्रह्मरसा ।**
**तथापि नेणे गुरुत्ववळसा[२] । श्रीगुरु तो ॥११॥**
**प्रपंच झाला किंवा नाहीं । हें आठवेंचि ना कहीं ।**
**परब्रह्म देखे सर्वाठायीं । श्रीगुरु तो ॥१२॥**

परधन ते आघवी विष्ठा । सूकरवमन प्रतिष्ठा ।
परनारींचरणीं बाळचेष्टा । करी श्रीगुरु तो ॥१३॥
शिष्यहिता इच्छी अंतरीं । परि भीतचि आज्ञा करी ।
झणी गुरुत्वगर्व जडेल अंतरीं । साच निर्धारी श्रीगुरु तो ॥१४॥
गुरुत्वाची नसतां गोडी । गुरुत्व बळेंचि पाय न सोडी ।
निगमार्थगंगा यद्वाणी रोकडी । श्रीगुरु तो ॥१५॥
एवं सद्गुरुचें लक्षण । शेष शिणला करिता वर्णन ।
तें किंचित् केलें निरूपण । तुजलागीं बाळा ॥१६॥
तुझिया बुद्धीस आवडे तैसे । मिया लक्षण वर्णिले शांत रसे ।
येऱ्हवि लक्षणारहित असे । अलक्ष्य श्रीगुरु ॥१७॥
गगनाते गंवसणी । कीं वरुणा पाजिजे पाणी ।
श्रीगुरुराया लक्षणीं । तेणें मानें आकळिजे ॥१८॥
जें जें तुझी वृत्ति । तें तें लक्षण श्रीगुरुप्रति ।
तंव वादी म्हणे सिद्धान्ती । बोलती तें समूळ मिथ्या ॥१९॥
त्याज्य गुरूचें लक्षण । शास्त्रीं केले निरूपण ।
''दोषा वाच्या गुरोरपि'' हें वचन । प्रमाणहि आहे ॥२०॥
आणि सिद्धान्तीचिया दृष्टीं । गुरुगुणदोष नाणावे पोटीं ।
हें जन भोंदावयासाठीं । युक्ति मी म्हणे ॥२१॥
तंव सिद्धान्ती म्हणे आम्हीं भोंदितां । भोंदवुनी कां घेणें समस्ता ।
आणि तुजसी हा वाद करिता । उपयोगू नाहीं ॥२२॥ (य११पू.२८९)
आतां गुरूचें दोषदर्शन । करावे या वाक्या अर्थ कवण ।
दोष तरी तो किंलक्षण । तूं वादी संपूर्ण निरोपी ॥२३॥
शारीरिक कीं स्वाभाविक । किंवा दोष त्यागावें म्हणसी दैविक ।
हें तिन्ही न घडे देख । श्रीगुरुचरणीं ॥२४॥
रोगादि दोष शारीरिक । ते त्यागावे म्हणसी सकळिक ।
तरी अष्टावक्राचा शिष्य जनक । हें दृढ अंतरीं असो दे ॥२५॥
आतां तृतीय पक्ष जे दैविक दोष । दारिद्यादि विशेष ।
ते तंव होते द्रोणादिकांस । परी शिष्य तयास बहु झाले ॥२६॥


आतां दोष जे स्वाभाविक । ते प्रारब्धे असती देख ।
म्हणोनी काय सम्यक् । त्यागिती शिष्य तयाते ॥२७॥
स्मशानीं बैसला शूलपाणि । तो काय त्यागिला मत्स्येन्द्रनाथांनी ॥
की व्रजस्त्रिया भोगी चक्रपाणी । परी तो अर्जुने त्यजिला काय ॥२८॥
रैक्वानें कन्या मागोन । जानश्रुतीतें सांगितलें ज्ञान ।
हा वेदीं इतिहास पूर्ण । ध्यानीं आणी ॥२९॥
सदा क्रोधी दुर्वास । परी कोण शिष्य त्यागिती त्यास ।
बहुस्त्रीकामी च्यवनास । त्यागिले कोणें ॥३०॥
सद्गुरु ज्ञानाची मूर्ति । शिष्य तया ब्रह्म भाविती ।
अपरोक्ष[३] दोष न करिती । भावनेलागीं प्रतिषेधू ॥३१॥
शालिग्रामाचिया ठायीं । जे भाविती शेषशाई ।
तयालागीं शिळा कायी । प्रतिबंध करी ॥३२॥
सर्वथा दोषरहित । गुरु असावे हें तुझें मत ।
तरी तयाते नसावे गुद उपस्थ । शौच लघवी विवर्जित असावा तो ॥३३॥
वादी म्हणे हें भलतेचि वदता । आम्ही शरीर दोषादि न पाहूं तत्वता ।
परी अधर्मदोषाची वार्ता । उपसाहवेना ॥३४॥
सिद्धान्ती म्हणे लवलाही । अधर्म दोष दृष्ट वा अनुमेय नाहीं ।
तो आगमींच बोलिला पाही । आगमचि म्हणे नाहीं श्रीगुरूस दोष ॥३५॥
विष मारक वैद्यशास्त्रीं । अपवाद होये महौषधतंत्रीं ।
कीं श्रुतिकटुतादि[४] दोष साहित्यशास्त्रीं । त्यांचा अपवाद रसभेदें[५] ॥३६॥
कीं व्याकरणशास्त्रीं संधिविधीचा । पृषोदरादौ अपवाद साचा ।
तेवि श्रीगुरुचरणीं सकळ दोषांचा । धर्मशाखीं अपवादू ॥३७॥
''दोषा वाच्या गुरोरपीत्यादि'' उक्ति । असोत अन्यविद्यादायकाप्रति ।
परी ब्रह्मविद्यादाता कृपामूर्ति । सर्वथा दोषविवर्जित ॥३८॥
किंवा दोषा वाच्या गुरोरपीति । अर्थवाद सांगे ही उक्ति । की गुरूचेहि दोष टाकावे निश्चिती । तरी स्वदोष टाकावे हें सांगणे काय ॥३९॥
(य११पू.२९०)मत्स्येंद्र प्रमिलासंगीं असतां । गोरक्षें दोघांसहि रिझवोनी तत्वतां ।
प्रेमें आणिले सद्गुरुनाथा । परी नाहीं सर्वथा परित्यजिले ॥४०॥

नवल आहे दैवाची गति । प्रारब्ध न चुके ज्ञानियाप्रति ।
म्हणवोनी आचार नानारीति । तेथ शिष्यकृतविधिप्राप्ति[६] घडेना ॥४१॥
तैं वादी म्हणे काय वदतां । श्रीगुरूते प्रारब्ध म्हणता ।
तरी जीवबुद्धि होईल तत्वतां । यालागीं ईश्वरता सद्गुरूते ॥४२॥
आणि तुमच्या दृष्टिसृष्टिमतीं । शिष्य कल्पित श्रीगुरुमूर्ति ।
मग प्रारब्धाच्या सांगोनि उक्ति । उगीच आम्हां कां ठकविता ॥४३॥
तैं सिद्धान्ती म्हणे भलारे भला । तुझ्याचि तोंडें निवाडा झाला ।
जरी स्वकल्पित मानिसी सद्गुरूला । तरी दोष आपुल्या कल्पनेस पुसे ॥४४॥
स्वप्नामाजीं सर्प दिसती । तेथ स्वप्नदृष्ट्याची कारण भीति ।
तैसे दोष लाविता श्रीगुरुमूर्ति । तरी तुझीच वृत्ति कारण ॥४५॥
आम्ही प्रारब्धवृत्ति सांगोन । थोडा अवकाश देत होतो तव शंकेकारण ।
तो त्वांचि टाकिला खंडोन । आतां सांगावयाचे कारण नाहीं आम्हा ॥४६॥
तैं शिष्य म्हणे भगवंता । आपुलें वचनामृत पान करितां ।
तृप्ति न वाटे माझिया चित्ता । तरी कृपें समर्था रक्षावें ॥४७॥
श्रीगुरु म्हणती सुखें ऐक । वादीस ग्राह्य एक त्याज्य एक ।
आम्हा दोन्हीहि सम्यक । वाटती पक्ष ॥४८॥
जैं प्रारब्ध सांगोन । आम्ही गुरुक्रियेचें दाविता कारण ।
तेव्हां सामान्यचेतन । प्रारब्धाधिष्ठान श्रीगुरु म्हणतो आम्ही ॥४९॥
जेव्हां दृष्टिसृष्टिवादें शिष्यकल्पित । म्हणतो श्रीगुरु कृपावंत ।
तेव्हां तयाचें आचरण समस्त । लीला निश्चित आम्ही म्हणतो ॥५०॥
आमची इच्छा जया रीति । प्रारब्ध न करी तैसी कृति ।
यालागीं आम्ही इच्छू तैसीच गुरुमूर्ति । वागेल हे अनुपपन्न ॥५१॥
किंवा लीला म्हणो तरी इच्छा गेली । परेच्छेसारिखी जरी इच्छा झाली ।
तरी लीलावंतास आली । परतंत्रता ॥५२॥
जरी परतंत्र ईश्वर भक्तरक्षणीं । तरी भक्ति आवडे ही लीलाचि म्हणोनी ।
परी भक्तशक्तीच्या भयेंकरूनी । परतंत्र चक्रपाणि कदा नोहे ॥५३॥
जरी नायकतां भक्तवचन । तरी तो मज नरकीं घालेल नेवोन ।
ऐसा भिऊनी भगवान । कवणा कदा वश झाला ॥५४॥

आतां प्रारब्धमतें कीं लीलामतें । शिष्यप्रीति समान असते ।
याविषयीं दोन तूतें । इतिहास सांगूं ॥५५॥ (य११पू.२९१)

संदीपकाची कथा

गुरुचरित्रीं ऐसी कथा । कोणी संदीपक सच्छिष्य होता ।
गुरु तयासी झाला बोलतां । कीं मज प्रारब्धें होईल रोग ॥५६॥
तैं त्वा माते रक्षावे । तेव्हां संदीपक म्हणे बरवे ।
मग वाराणसींत जाऊनी स्वभावे । राहिला तो ॥५७॥
आधींच रोगी क्रूर असती । वरी परीक्षा पाहणें होते चित्तीं ।
तेणें उसंत सच्छिष्याप्रति । दिवसराती घेवो नेदी ॥५८॥
सेवितां श्रीगुरूचें चरण । उसंत नसे एकहि क्षण ।
तेणे वाराणसींत असोन । विश्वेश्वरमाधवदर्शने नाहीं झाली ॥५९॥
ऐसे लोटले दिवस कीति । विधिहरिहर भाविती चित्तीं ।
म्हणती आमुच्या दर्शनाप्रति । भक्त संदीपक कां नये ॥६०॥
आम्हांसी तयावांचुनी । गोड न लागे अन्नपाणी ।
चला जाऊं तयाचें सदनीं । मग आले मिळोनी अवघे जण ॥६१॥
संदीपकास गाठोनी एकान्तीं । आपुली ओळख स्पष्ट सांगती ।
कांहीं वर माग म्हणती । तंव तो चित्ती न मानी ॥६२॥
अत्यंत आग्रह करिती देव । तदा म्हणे उद्या सांगेन सर्व ।
मग गृहीं जावोनी स्वयमेव । सांगे अनुभव श्रीगुरूते ॥६३॥
म्हणे आजी मज एकान्तीं । हरिहर भेटले वर माग म्हणती ।
आज्ञा असेल तरी विनंति । स्वामीच्या आरोग्यार्थ करितो तया ॥६४॥
तदा संतोष निरोधून । श्रीगुरु म्हणती आपण ।
माझा रोग निवारावया कारण । ईश्वरालागून प्रार्थू नको ॥६५॥
प्रारब्धभोग चुकविता । जगीं कवणा नाहीं सत्ता ।
बळे करोनी राखोनी ठेविता । तरी विघ्न करिती मुक्तीते ॥६६॥
ऐसें ऐकोनिया वचन । शिष्य धरोनी राहिला मौन ।
तंव दुसरे दिवशीं हरिहर येऊन । तयाकारण भेटले पुनः ॥६७॥
म्हणती वर माग कांहीं । तो म्हणे मज कामना नाहीं ।

ऐसें लोटले दिवस कांहीं । परी आग्रह लवलाही न सोडती ॥६८॥
नवल सिद्धींची रीति । न मागता दासी होती ।
तैसें हरिहर तोषोनी सद्गुरुभक्ति । वर माग म्हणती संदीपका ॥६९॥
शेवटीं आग्रहकिटकिटी कंटाळोन । म्हणे सद्गुरुसेवेसी उल्हास पूर्ण ।
क्षुधादि विसरोन रात्रंदिन । असावे हें वरदान द्यावे ॥७०॥
तथास्तु म्हणोन हरिहर । अंतर्धान पावले सत्वर ।
संदीपक पावला गुरुद्वार । लाजेनें अंतर मौनावले ॥७१॥
म्हणे न विचारितां सद्गुरुराया । वर मागितला मी कासया ।
तिही नाहीं म्हणता वाया । आज्ञाभंग मी केली ॥७२॥ (य११पू.२९२)
संदीपक कां नये म्हणोनी । हें श्रीगुरु चिंतोनी मनीं ।
मग स्वमुखें हांक मारोनी । म्हणती नवल नयनीं देखिले तें सांग ॥७३॥
तैं संदीपकें वर्तमान । आघवें केलें निरूपण ।
म्हणे हरिहराग्रहा कंटाळोन । घडला मजकडोन प्रमाद हा ॥७४॥
तैं संतोष न मावे सद्गुरुहृदयीं । उठोनी आलिंगन देती लवलाही ।
म्हणती तुज ऐसा आन नाहीं । गुरुभक्त देखिला म्यां ॥७५॥
मज वाटे तुझ्याचि तपेंकरून । माझें अंग निर्मळ जाहलें पूर्ण ।
मग आपुला प्रारब्धभोग संपूर्ण । स्वयोगबळेंकरून अभिभविला ॥७६॥
एवं गुरुप्रारब्ध । सेवेंत न करी प्रतिबंध ।
आतां गुरुलीलाहि प्रसिद्ध । प्रतिबंध न करी ऐशा बहुत कथा ॥७७॥

शिष्य व सापाची कथा

कोणी एक सच्छिष्य होता । तो श्रीगुरुजवळी शयीत असतां ।
तेथ सर्प आला अवचिता । शिष्यालागीं डंखावया ॥७८॥
तैं श्रीगुरु म्हणती तूं कवण । सर्प म्हणे मी यांचा पूर्व शत्रु दारूण ।
याचें कंठरक्त प्यावया कारण । पावलो येथ महाराजा ॥७९॥
तंव श्रीगुरु म्हणती येणें तुज । ब्रह्महत्या लागेल सहज ।
मी रक्त काढोनि देतां आज । कार्य भागेल कीं नाहीं तुझे ॥८०॥
संतदर्शनसंप्राप्तसन्मति । सर्प बरवे म्हणे श्रीगुरुप्रति ।
मग शिष्याचिया उरावरुती । बैसोनी कंठ चिरती श्रीगुरु ॥८१॥
तदा शिष्य कासाविस । होवोनि उघडी नयनास ।
हृदयीं पाहतां श्रीगुरूस । नयन लावोन निजला सुखें ॥८२॥
पुढें रक्त दिधलिया सर्पाप्रति । तो निघोनी गेला शिघ्रगति ।
सकाळीं श्रीगुरु शिष्यास म्हणती । तूं रात्री दचकलासी कां ॥८३॥
म्हणे मी कासाविस जाहलो म्हणून । नेत्र पाहिले उघडोन ।
श्रीगुरु म्हणती नेत्र लावोन । निजलासी कैसा सुखें मग ॥८४॥
तैं शिष्य म्हणे हृदयावरुती । मिया पाहिले तुम्हाप्रति ।
आपण सर्वथा निरत माझिया हितीं । हें जाणोनी सुषप्ति सेविली म्यां ॥८५॥
आपुली लीला माझें हित । हे माझिया अंतरीं जागे नित ।
आणिक कथा असती बहुत । त्या न संग्रही ग्रंथविस्तरभयें ॥८६॥

ooo

तैं वादी म्हणे गुरु जरी । उगीच आणील प्राणावरी ।
तेव्हां मानावे तया निर्धारी । काय म्हणुनी ॥८७॥
तैं स्वयें बोले सिद्धान्ती । संसारास्तव सैन्यांत चाकर होती ।
धनार्थी युद्धी प्राण देती । आणि परमार्थी मात्र पाहती प्राणआशा ॥८८॥
ऐसिया मूढाकारण । नाहीं माझें निरूपण ।
गुरुभक्ताप्रति हे प्रश्न । सर्वथाहि उद्भवतीना ॥८९॥ (य११पू.२९३)

॥ श्रीमहाराजांचे गुरु : गोपाालदास ॥

तैं वादी म्हणे एक गुरु सांडोनी । दुसरा न करावा हें निघे तुमच्या मतांतुनी ।
परी बहुती दुसरा गुरु भजोनी । कार्य केलें आपुलें ॥९०॥
तुम्हीहि टाकोनी गुरु दोन । स्वयेचि वागता स्वमनान ।
ऐसें आम्हीं ऐकिलें वचन । बहुतांच्या मुखें ॥९१॥
सिद्धान्ती म्हणे ऐक उत्तर । येथ दैवश्रद्धाचि कारण समग्र ।
परी चंचल जयाचें अंतर । तेणें दुसरा गुरु करूंचि नये ॥९२॥
मुमुक्षा वाढली अत्यंत चित्तीं । आणि समाधान गुरु करूं न शकती ।
तदा आज्ञेनें वा समावेशानें दुजियाप्रति । शरण जावे ॥९३॥
तीव्र श्रद्धा जयाची आहे । तयास पाषाणी ईश्वर लाहे ।
परी मंद श्रद्धावंता पाहे । अल्प नियमू हा ॥९४॥

आतां माझे त्वां पुसिले वृत्त । परी मी नीच ठाउक सकळाप्रत ।
मिया कपटें विद्या मिळविली समस्त । वाचोनिया ग्रंथ आन करवीं ॥९५॥
पूर्वी मानभाव गुरु केला । चंचल मनेंचि सोडिले तयाला ।
परी किंचित् त्यांत असेल तर असला । पूर्व शिवादिदेवप्रेमू ॥९६॥
मग दुसरा गुरु गोपालदास । श्रयिला परी चंचल चित्तास ।
शांति न वाटे मज नीचास । करणें काय कठिण होते ॥९७॥
तैं माझी आवडी होती कृष्णी । तिहीं दत्तमंत्र दिधला मजलागुनी ।
योगाची आशा होती मनीं । तेहि पूर्ण न झाली ॥९८॥
सत् म्हणजे शुक्र चित् म्हणजे नेत्र । आनंद म्हणजे श्वास पवित्र ।
ऐसें निरूपण सांगितले स्वतंत्र । तेहि मजला पटेना ॥९९॥
परी सत्य सांगतो वाणी । श्रद्धा असती तरी गेलो असतो तरोनी ।
काय करावे चंचल अंतःकरणीं । चुकविले मज ॥१००॥
त्यांत चित्तास ओढी कृष्णप्रीति । रामनवमी आवडत नव्हती ।
तोहि त्रास वाटला चित्तीं । म्हणोनी घडला प्रमाद हा ॥१०१॥
परी त्यासी अत्यंत सोडिले । ऐसे चित्ते नाहीं केले ।
तेथें जाणेंचि मात्र वर्जिले । तें मी कारण न सांगे ॥१०२॥
आणखी झाला एक प्रमाद । कात्यायनी मंत्र एकाकडुनी घेतला विशद ।
पुनः दुजियावरी मन जाऊनी प्रसिद्ध । त्याकडोनिहि घेतला ॥१०३॥
या सकळांचें कारण । मुख्य अविश्वासीं अंतःकरण ।
त्यांचे फळ संपूर्ण । याचि जन्मीं भोगितो मी ॥१०४॥
मी स्वयें बुडालो म्हणून । न बुडवावे आना कारण ।
एवढें तरी मोठेपण । आंगी घेवोन म्हणतो ठेविजे श्रद्धा ॥१०५॥(य११पू.२९४)

## ज्ञानेश्वरांचा मंत्रोपदेश

मजकरवीं घडली जी जी कृति । त्याचें फळ न चुकेल मजप्रति । परी एक विश्वास आहे चित्तीं । हें सर्व झाल्यावरुती अंगिकारिले मज तातें ॥१०६॥
तिहीं घेवोनी मांडीवरी । मज मंत्र उपदेशिला चतुराक्षरी ।
बुडत असतां महापुरीं । नेले परतीरी धरोनी कर ॥१०७॥
आतां तया मंत्राचिया श्रद्धा । मिळो आपदा अथवा संपदा ।
माझी चिंता सच्चिदानंदा । श्रीगुरुनाथा सकळ असे ॥१०८॥
हें आपुली वार्ता । लिहीली असे साच तत्वतां ।
येथ किंचिन्नाही असत्यता । साक्ष ताता करोनी सांगे ॥१०९॥
लिहावया हेंचि कारण । कीं कोण्या पूर्व पुण्येंकरून ।
अंगिकारिता करुणानिधान । मग मागील सर्व वाय ॥११०॥
कृपा प्रभूची जेवढी । त्याच्या कोटि वा अंशहि सेवा न घडी ।
हें असो मज हांडा मिळाला म्हणोनी परवडी । इतरें तैसें करूं नये ॥१११॥
प्रसंग आलिया समावेश(७) । करोनी घ्यावा निःशेष ।
एवं श्रीगुरूचे दोष । न पाहणें सिद्धान्तु हा ॥११२॥
गुरूस शासितां दोष नाहीं । इत्यादि ज्या उक्ति कांहीं ।
त्या अर्थशास्त्रें निर्मिल्या पाही । धर्मशास्त्रीं नाहीं विचार त्यांचा ॥११३॥
वादी म्हणे मजप्रति । मानले प्रमाण श्रीगुरुमूर्ति ।
तैं बरवे म्हणे सिद्धान्ती । झटिति अलकावति पति भजे ॥११४॥
माझी ज्ञानेश्वर माऊली । भवतप्ता करुणासुरतरुसाऊली ।
करी तियेच्या सम पाऊलीं । वाहिली कविताकमळमाळा ॥११५॥
हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे गुरुदोषदर्शनाक्षेपपरिहरणं नाम नवमं कुसुमम् ॥
॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

टीपा :-

(१)पूर्ण (२)गुरूत्वाचा अभिमान (३)दृष्टीस दिसत असलेले (४)कानास कर्कश लागणारे, गोड न वाटणारे (५)रौद्र रसाच्या दृष्टीने तेंच गोड वाटतात (६)शिष्याच्या इच्छेप्रमाणेच वर्तन असले पाहिजे, असे म्हणता येत नाही (७)नव्या गुरूस जुन्या गुरूची भावना (८)

०००

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय १० वा

# ॥ गुरु-शिष्य लक्षण ॥

जय जय सद्गुरु आनंदकंदा । जय जय सद्गुरु सच्चिदानंदा ।
जय जय सद्गुरु अभेदा । आळंदीपते ॥१॥
जय जय सद्गुरु माय बहिणी । जय जय सद्गुरु कैवल्यदानी ।
पुढें ग्रंथ कृपा करोनी । निज स्फूर्तिदानी चालवी ॥२॥ (य११पू.२९५)
श्रोतीं असो द्यावे अनुसंधान । मागा बोलिले सद्गुरुलक्षण ।
आणि गुरुदोषदर्शननिराकरण । ते ऐकोनी शिष्य प्रश्न करी ॥३॥
म्हणे महाराज मजप्रति । आघवी सांगितली सद्गुरु पद्धती ।
तैसें शिष्यलक्षण कृपामूर्ति । स्वामी मजप्रति उपदेशतील ॥४॥
तैं गुरु म्हणती हें काय पुसता । आघवी लक्षणें शिष्यमाथा ।
जेवढी जेवढी सात्त्विकता । तें तें लक्षण शिष्याचें ॥५॥
सदेह शुद्धसत्त्वावच्छिन्न । निर्गुणचेतन गुरुलक्षण ।
सदेह मिश्रसत्त्वावच्छिन्न । चेतन शिष्य बोलिजे ॥६॥
तंव वादी म्हणे हें नाहीं । मिश्रशुद्धाचें लक्षण कायी ।
मिश्र म्हणजे मलिनसत्त्व लवलाही । रजस्तमोगुण तिरस्कृत[१] ॥७॥
शुद्ध म्हणजे सत्त्वप्रधान । रजस्तम होती गौण ।
अत्यंत शुद्धसत्त्व अप्रमाण । जें प्रधानगुण मिश्र म्हणोनी ॥८॥
सिद्धान्ती म्हणे तूं बोलिलासी । ते साच वाटे मम मानसीं ।
परी आप्तकृत वचनासी । नोल्लंघवे ॥९॥
विवेकचूडामणींत विषद । स्वयें बोलती भगवत्पाद ।
तीं वचनें प्रमाण सिद्ध । ऐक आधीं ॥१०॥
''मिश्रस्य सत्त्वस्य भवन्ति धर्मास्त्वमानिताद्या नियमायमाद्याः ।
श्रद्धा च भक्तिश्च मुमुक्षुता च दैवी च संपत्तिरसन्निवृत्तिः ॥१२०॥''वि.चूडा.
येथ मिश्रसत्त्वाचें लक्षण । ते आघवेंचि ओळखे शिष्याचे गुण ।
आणि जे शुद्धसत्त्वाचें लक्षण । तें सद्गुरुगुण ओळखे ॥११॥





मज मोठें संसारदुःख चित्तीं । याचें कारण देहवृत्ती ।
तो देह पोसणें आनाप्रति । पीडा देऊनी ॥१२॥
तरी मी तैसे दुःखी आघवे जन । ऐसा विचार दृढ करून ।
अहिंसेचें अधिष्ठान । जाहले मन जयाचें ॥१३॥
आघव्या निवाल्या संसारवृत्ति । कापट्य नेणे सर्वथा चित्तीं ।
म्हणोनी जैसी हृदयीं रीति । वाणी वदती सत्य तैसी ॥१४॥
ईश्वरें आच्छादिले सकळ । माझे काहींच नाहीं केवळ ।
येणें बोधें प्रबळ । अचौर्य साधी ॥१५॥
वनिता आघवीया जननी । भावितां रागनिवृत्ति जाहली मनी ।
की म्हणे आलो जिचिया उदरांतूनि । तिज समान कामिनी अवघ्याचि ॥१६॥
मग एकीचें ठायीं मातृवत् वर्तन । दुसरीचें ठायीं कीजे मैथुन ।
तरी समान असोनी असमानपण । बळेंचि भावन पैं लागे ॥१७॥
सव्य हस्त चंदनें लिंपावा । वाम हस्त दंते खंडावा ।
समत्व असोनी कां न करावा । विधी ऐसा ॥१८॥ (य११पू.२९६)
सम असोनी अवघ्या कामिनी । एक भार्या एक जननी ।
ऐसा भेद अंतःकरणीं । नसोनि उगीच कल्पावा कां ॥१९॥
आतां पाहोनिया कामिनी समान । स्त्रीगमनासारखें करावे मातृगमन ।
तरी ते प्रतिषेधी संपूर्ण । आगमरावो ॥२०॥
म्हणोनि ऐसा अभेद तंव न घडे । परी विपरीत अभेद सांपडे ।
कीं समत्व मातेसमान जोडे । सर्व योषित्समुदावो ॥२१॥
पद्मपादादि म्हणती । स्त्रीमात्र माय भाविता रागनिवृत्ति ।
ही पंचपादिकादि ग्रंथीं । असती वचनें ॥२२॥
किंवा स्त्रीमात्र भावावी भगवती । तेणें दोन कार्ये साधिती ।
रागनिवृत्ति आणि भगवद्भक्ति । अमृतराजोक्ति प्रमाण येथ ॥२३॥
अमृतराजांचे पद -
निज पद पावूं । जगदंबा वदनीं गाऊं ॥धृ.॥
पदतळभाळीं कुंकुम लाऊं । नेसऊ जरतारी पाटाऊ ।
मूर्ति चतुर्भुज हृदयीं ध्याऊं ।

जे जे स्त्रीमात्र ते ते जननि जाणुनी ब्रह्मभावना भावूं ॥१॥
दैवें मिळेल तेंचि खाऊ । लटिका संसार बहकावू ।
नामस्मरणें मन समजावूं । सर्वहि आत्मा मानुनि कोठें येऊन कोठें जाऊं ॥२॥
धूप दीप नैवेद्या दावूं । सच्चित्सुखरूपीं लय लावूं ।
आई बाई हे बोलावू । पदिच्या प्रेमजलानें नयन तनू ओलावू ॥३॥
गुणदोषाच्या मार्गे न जाऊं । लोकीं समतेनें समजावूं ।
भवभयगाठी समूळहि डावू ।
शीतल अमृतचरणतरुछायेमाजी बसुनि विसावूं ॥४॥ अमृतराय.
साधक आणि सिद्धस्थीति । रायजी इये पदीं बोलती । साधका जीवन्मुक्ति सिद्धा
विदेहमुक्ति । मिळे या विश्वासे म्हणती 'निज पद पावूं' ॥२४॥
साधकाची झाली कर्मनिवृत्ति । मुमुक्षु झालिया कर्म सुटती ।
रामगीतेची ऐसी उक्ति । कीं उपात्तसाधनें[२] समाप्ति कर्माची कीजे ॥२५॥
परी ज्ञानोत्तर भक्तीचा संस्कार । पुढें रहावा निर्धार ।
यालागीं उपासनात्याग साचार । सुंदर कदा घडेना ॥२६॥
यद्यपि पूर्व कर्मे अपूर्वप्राप्ति[३] । तेणेंचि होय विघ्ननिवृत्ति ।
तथापि कर्मार्पणें उपास्तिवृत्ति । अवशिष्ट म्हणोनी चित्तीं त्याग न घडे ॥२७॥
कर्म करावे ब्रह्मार्पण । ऐसा विधि शास्त्रीं उपपन्न ।
परी ईश्वरोपासना करावी समर्पण । हा विधि कोठेंहि नसे ॥२८॥
वचन नसोनि त्याग करिता । तरी बळेंचि येईल अविश्वासता ।
यद्यपि पंचाग्न्युपासनादींचा तत्वता । त्यागू घडे मुमुक्षेमाजीं ॥२९॥ (य११पू.२९७)
तथापि त्या उपासना समस्त । असती कर्म समुच्चित ।
त्या उपासनासहित । ईश्वरार्पण कर्म करणें ॥३०॥
ऐसिये जागृच्छ्रुति । स्वयें हृदयप्रिय वदती ।
तोहि साभिप्राय चित्तीं । धरावा श्लोकू ॥३१॥
''यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥२७॥'' (गीता अ.९)
सामान्य कर्माचें समर्पण । स्वयें सांगे नारायण ।
कीं ''यत्करोषि'' म्हणोनि वचन । श्लोकामाजीं ॥३२॥



आतां तें कर्म कवण कवण । तरी स्नान आणि दान ।
तें आघवेंचि मदर्पण । करित जाई ॥३३॥
या अर्पणाचा विचार । असें पैं विचित्र ।
तो कर्मार्पण अध्यायीं समग्र । निरूपिजेल ॥३४॥
एवं ''यज्जुहोषि'' या वचनें । यज्ञहि सारिजें ब्रह्मार्पणें ।
आतां ''यत्तपस्यसि'' येणें वचनें । उपासनाहि ब्रह्मार्पण ॥३५॥
परी ब्रह्म अलिप्त निर्गुण । म्हणोनी येथ जें बोलिलें मदर्पण ।
सगुणींच कर्म समर्पण । कृष्णार्पण निज मंत्रें ॥३६॥
''कृष्णार्पणाविण नसे फळनाश तोही ।
ब्रह्मार्पण श्रुति म्हणे सगुणींच तेही ।
नाशील रज्जुचि कसा लटिक्या भुजंगा ।
तेवी कसा अगुण नाशिल कर्मसंगा ॥'' (वामन पंडित)
एवं वदले वामन । म्हणोनी कर्मसमुच्चित उपासना ईश्वरार्पण ।
परी शेष राहे भगवदुपासन । मुमुक्षेंत हेंहि वामनचि वदती ॥३७॥
''जो ईश्वरार्पण करी निज सर्व कर्मे ।
संतुष्ट होय हरि त्यावरि दास्यधर्मे ।
आम्हीच विष्णु भजणें कवणासि आतां ।
हा ज्ञानगर्व उपजे न कदापि संता ॥ वामन पंडित
किंवा बाळाची मातृभक्ति । जैं जाहली दुग्धपान निवृत्ति ।
तैं नष्ट होता तयाप्रति । नीचता न सोडी ॥३८॥
तेंवि ईश्वराचे सकळ । येथ स्वतःचें कांहीं नाहीं बळ ।
यद्यपि जीवकल्पित केवळ । दृष्टिसृष्टि वादें विश्व ॥३९॥(य११पू.२९८)
तथापि जीवाचें कल्पन । तें जीवातेंचि करावया बंधन ।
कैवल्योपायप्रदर्शन । नारायणाविण न घडे ॥४०॥
ईश्वर गुरु शास्त्र जीवकल्पित । ऐसा जरी दृष्टिसृष्टिसिद्धान्त ।
तरी अनादिअपेक्षें[४] कल्पित । न होती कामिनीध्यानसम[५] ॥४१॥
श्रौतमात्र[६] निरसावया । गुरु वेदा यादवराया ।
कल्पित म्हणणें तया । एऱ्हवि नाहीं ॥४२॥

अहो सुवर्णावरी अलंकार । बाळ्या बुगड्या कुंडल साचार ।
असती भोक्त्रेच्छानुसार । परी मनोरथमात्र ते न होती ॥४३॥
तैसे जीवाचिया मुक्ति(७) । ब्रह्म अनध्यस्तविवर्ती ।
तथापि जीवकल्पित तयाप्रति । तुच्छ मात्र म्हणो नये ॥४४॥
म्हणवोनी मुक्त्युपायार्थ । जे जे सामग्री जीवगृहीत ।
ते आघवीच ईश्वरकृत । जीव अशक्त सर्वथा ॥४५॥
मी कर्ता ही अहंकृति । वेगळी करोनी जीवाच्या हातीं ।
आन नाहीं नाहीं त्रिजगतीं । येथ श्रीपति आण वाहे ॥४६॥
दुजियाचे घेवोनि धन । म्हणावे त्यासचि म्यां केलें अर्पण । आणि त्याचा उपकारहि न करावा स्मरण । तरी याहून कृतघ्नपण आन नाहीं ॥४७॥
तैसे आघवेचि परमेश्वरकृत । मिया अर्पिले म्हणता येथ ।
अभिमानें भक्ति त्यागिता निश्चित । क्षोभती सर्व देवता ॥४८॥
यद्यपि जीवाचिया कर्मांसाठीं । ईश्वरें निर्मिली आघवी सृष्टि ।
तरी मोक्षोपाय सांगणें पोटीं । दयालुताचि ॥४९॥
म्हणोनि मोक्षोपायार्थ जे जे कांहीं । केलें तें अर्पोनि हरिपायीं ।
दासपणा शेष देहीं । उमटावा तरीच सार्थकता ॥५०॥
म्हणावे कर्मसिद्ध(८) अपूर्वेकरून । सर्व निवृत्त होतील विघ्न ।
तरी कर्म झाले असेल पूर्ण । हें जीवाकडून न म्हणवे ॥५१॥
यालागीं सर्वथा शरण । एक श्रीहरीचें चरण ।
तेणें अशक्य तें सुशक्य पूर्ण । होय हें मधुसूदन बोलती ॥५२॥
''पूर्वभूमौ कृतां भक्तिमुत्तरां भूमिमानयेत् ।
अन्यथा विघ्नबाहुल्यात् फलसिद्धिस्तु दुर्लभा'' ॥(मधुसूदन गीतोपोद्घात)
एवं मुमुक्षेंत अवशिष्ट उपासन । या अभिप्रायें राय आपण । आणि सिद्धाहि ज्ञानोत्तर भगवत्प्रेम घेऊन । म्हणती कीं 'जगदंबा वदनीं गाऊं' ॥५३॥
सद्गुरु तेचि विष्णु शिव । आघव्या स्त्रियाचि माता सर्व । (य११पू.२९९)
मूर्तीत जैसे पाषाणादि भाव । प्रतिबंध न करिती ईशबुद्धीते ॥५४॥
प्रथम आघवीया जननी जाणुनी । म्हणजे प्रत्यक्षप्रमाणें जननी सजातीय पाहोनी।
ब्रह्मभावना स्थापावी मनीं । म्हणजे सगुण जगदंबाभावना ॥५५॥
निर्गुण भावना सर्वत्र सामान्य । यास्तव येथ विशेष बोलिली सगुण ।
जेथ जेथ विशेष ब्रह्मभावन । तें तें सगुणोपासन ओळखावे ॥५६॥
सामान्य ब्रह्मत्वें अहंग्रहोपास्ति । म्हणोनी तेथ नाहीं अतिव्याप्ति । हे पद सिद्धा साधकाप्रति । सर्वहि आत्मा मानुनि इत्यादि पदीं दर्शविती अमृतराय ॥५७॥
येर पदार्थ आघवा स्पष्ट । ते महात्मे जाणती ज्ञाननिष्ठ ।
असो या विचारे शिष्य वरिष्ठ । ब्रह्मचर्य दृढ करी ॥५८॥
हें निरूपण करिता । आनुषंगिक आली सिद्धवार्ता ।
परी शिष्याचें आंगीं तत्वतां । साधकताचि होय पहिली ॥५९॥
आतां क्षुधा तृषा निवृत्तिसाठीं । करावी जंव आटाआटी ।
तरी प्रतिपदीं क्षोभ पोटीं । उमटतु राहे ॥६०॥
क्षुधेसाठीं पाहिजे अन्न । अन्नासाठीं पाहिजे धन ।
धनाचें करावया रक्षण । सेवक जन आणि गृह ॥६१॥
गृहाची सर्वस्व शोभा । कामिनी एक रंभा ।
एवं वासनेचा गाभा । वाढतू जाय ॥६२॥
यालागी दैवें मिळेल तेचि खाऊं । ऐसें वदती अमृतरावू ।
आणिक श्रीगुरुरावू । ऐसेचि म्हणती ॥६३॥
''एऱ्हवी तरी अर्जुना । या शरीरा पराधीना ।
कां नाना भोगरचना । मेळवावी ॥२०॥'' (ज्ञानेश्वरी अ.३)
आणखीहि महंतवचनें । बहुत असती येणें मानें ।
त्यांतुनि अल्प प्रमाणें । सांगूं तूंते ॥६४॥
ईश्वर निर्मित वृत्ति(९) । सर्वत्र सुलभ हें श्रीधर वदती ।
''योगक्षेमं वहाम्यहम्'' इति । स्वयें श्रीपति वदले कीरू ॥६५॥
एकनाथांचा अभंग -
आवडीनें भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥१॥
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥२॥
सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसे नाहीं ॥३॥
जैशी स्थीति आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहे संचिताचें ॥४॥
एकाजनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश झाला ॥५॥गाथा.११४३

सुंदरदास -

''होइ निचिंत करै मत चिंतहि । चांच दई वइ चिंत करैगो । (य११पू.३००)
पाउ पसार पर्‍यो कि न सोवत । पेट दियो वइ पेट भरैगो ।
जीव जिते जलके थलके पुनि । पाहनमें पहुचाय धरैगो ।
भूखहि भूख पुकारत है नर । सुंदर तूं कह भूख मरैगो ॥''

दोहा -

''अजगर करे न चाकरी पंछी करे न काम ।
दास मलूका यौं कहे सबके दाता राम ॥''

एवं करोनी विचार । परिग्रह वर्जी समग्र ।
ऐसें यमें पाळी अंतर । नियमें पाळी बाह्यशुद्धि ॥६६॥
आणिक ईश्वराराधनादिक । ते नियमचि अंतर्बाह्य शोधक ।
तेहि पाळी आवश्यक । मानोनिया ॥६७॥
मग म्हणे व्यवहारीं वर्तलो जेव्हां । म्या सर्वथा विचार वर्जिला तेव्हां ।
कोठोनि आलो या भावा । स्मरलेंचि नाहीं ॥६८॥
सर्वथा दुःखासी कारण । तया जडाते मानिले कांचन ।
आणि कामिनी नित्य चंचल मन । तियेतें विश्वाससदन केलें ॥६९॥
आतां परमार्थी प्रगटता । उगीच श्रद्धा कां दवडूं वृथा ।
जें करणें असेल भगवंता । तें होईल मज तत्वता हरिचिंतनें ॥७०॥
ऐसी दृढ श्रद्धा धरी । भक्ति म्हणजे प्रीति करी ।
पुढती न घाली संसारीं । हेचि मुरारीलागीं प्रार्थी ॥७१॥
या नांव गा मुमुक्षुता । दुष्टसंगाची नेणेचि वार्ता ।
एवं हे धर्म सर्वथा । मिश्रसत्त्वाचे ॥७२॥
या निरूपणांतील आनुषंगिक सिद्धलक्षण । वेगळे करोनी मिश्रसत्त्वाचे गुण ।
ज्याच्या आंगीं सच्छिष्यपण । तोचि पावे ॥७३॥
सद्गुरुसेवेची आवडी मोठी । हें लक्षण नसतां पोटीं ।
दांभिक वरी वरी करिती गोष्टी । ते तंव शिष्य त्यजावे ॥७४॥
या लक्षणाहूनि विपरीत । किंवा अंतरी कपटी वरी या लक्षणें युक्त ।
ते शिष्य त्यजावे समस्त । परीक्षुनी गुरुरायें ॥७५॥

सुंदरदास -

''ज्यूं कपडा दरजी गहि व्योंतत । काष्ठहिकूं बढई कसियानै ।
कंचनकूं जु सुनार कसै पुनि । लोहको घाट लुहारहि जानै ।
पाहानकूं कसि लेत सिलावट । पात्र कुंभारकें हाथ निपानै ।
तैसहि शिष्य कसै गुरुदेव जु । सुंदरदास तबै मन मानै ॥''(य११पू.३०१)

एवं तीव्र लक्षणी जे शिष्य होती । तिहीं सर्वभावें सेवावे श्रीगुरुप्रति ।
या लक्षणीं जे मंद होती । तिहीं यथाशक्ति सेवावे धनादिकीं ॥७६॥
''ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् ।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मंत्रमूलं गुरोः कृपा ॥
इत्यादि ज्या स्मृति । आणि ''यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्था प्रकाशन्ते महात्मनः'' इत्यादि श्रुति ।
बोधिती तेणेंचि रीति । सद्गुरुचरणीं विनटती शिष्य ॥७७॥
तंव वादी म्हणे येणें रीति । उपास्ति वा लालनभक्ति ।
घडो शके शिष्याप्रति । येर संपत्ति मिळेना ॥७८॥
सिद्धान्ती म्हणे ऐक वचन । जोंवरी नाहीं जाहलें ज्ञान ।
तोवरी उत्तम लालन । जें गुरुवचन न विसरती ॥७९॥
आन संबंध असतां । तरी गुरुआज्ञा विसरे तत्वता ।
जेवि अर्जुन विसरला गीता । अनुशासनपर्वी कथा ही ॥८०॥
क्रोधार्पणादि प्रीतिनर्तनीं । जे प्रकार दाखविले सुगुणीं ।
तें करावे सर्व सांभाळूनी । नातरी पतनीं कारण ॥८१॥
एवं सांगितले शिष्य लक्षण । आतां ऐके गुरुलक्षण ।
आचार्य वदती आपण । कीं शुद्धसात्त्विक अंतःकरणें संतांचीं ॥८२॥
''विशुद्धसत्त्वस्य गुणाः प्रसादः स्वात्मानुभूतिः परमा प्रशान्तिः ।
तृप्तिः प्रहर्षः परमात्मनिष्ठा यया सदानंदरसं समृच्छति ॥१२१॥''(विवेकचूडामणी)
आतां शुद्धसत्त्वाचे गुण । सदा असणें प्रसन्न ।
द्वेष अंतःकरणांतून । निवटला ज्याच्या ॥८३॥
कोणी न मानिता क्षोभ नाही । वंदिता हर्ष नये कांहीं ।
गंभीर समुद्र हृदयीं । होवोनि लवलाही विचरतु ॥८४॥

आपुले व्यतिरेकीं[१०] असंगपण । आणि अन्वयीं[११] अविरोध शुद्ध असोन ।
हें आघवेचि प्रत्यया आणोन । विचरतु जो ॥८५॥
नवल जयाची शांति । ज्या भयें आजवरी बद्धस्थीति ।
त्या संसारासीहि अविरोध वृत्ति । परमा प्रशांति म्हणणें हें ॥८६॥
'''अंतरीं शुद्ध नाहीं बोधू । दांत चावोनि साहता द्वंद्वू ।
ते क्षमा नोहे शुद्धु । ऐक विनोदू क्षमेचा ॥१॥
अंतरी ठसावले परब्रह्म । बाह्य सर्व भूतां झाला सम ।
तेचि क्षमा म्हणे पुरुषोत्तम । द्वंद्वाराम बाधीना ॥२॥'' (एकनाथी भागवत.)
(य११पू.३०२) एवं बोलिले एकनाथ । आतां श्रीगुरु कैसे तृप्त ।
जया अपेक्षा नाहीं किंचित । कवणेहि परी ॥८७॥
सिद्धि जयाच्या चरणदासी । मुक्ति धर्मपत्नि ये बळेंचि पार्शी ।
पहुडला भक्तिमातेपाशीं । बाळवृत्तींसी[१२] उचित चर्ये ॥८८॥
आतां जयाची परमात्मनिष्ठा । भूतीं जाहली भगवत्प्रतिष्ठा ।
शिष्यहि पूज्य एवढी काष्ठा । जयाचिया भक्ति ॥८९॥
''शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवा सारिखे ॥१॥
त्याचा फळे उपदेश । आणिका दोष उफराटे ॥२॥
त्याचे खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभाव ॥३॥
तुका म्हणे सत्य सांगें । योत रागे येती ते ॥४॥'' (तुकाराम महाराज)
भूतीं नाहीं भगवंताविण । तेथ शिष्य तरी दुसरा कोण ।
शिष्य ओळखीं श्रीगुरुचरण । परी गुरूस शिष्यपणीं अनोळख ॥९०॥
शिष्य प्रश्न करी जेव्हां । भगवदाज्ञाचि सेवा मानीं तेव्हां ।
तोचि निस्पृह तया सद्भावा । उपदेश फळे ॥९१॥
गुरुत्व गुण देहाच्या माथा । तो देह सकारण[१३] झाला वृथा ।
तैं गुरुशिष्यपणाची वार्ता । अंतरी सर्वथा आपण नेणे ॥९२॥
ऐसी परमात्मनिष्ठा जीवन्मुक्ति । जिये नांव ज्ञानोत्तर भक्ति ।
तिणेंचि तद्भावापत्ति । एवं श्रीगुरुमूर्ति सलक्षण जाणे ॥९३॥
तंव वादी म्हणे पूर्वील प्रश्न । कीं वेगळा न राहे शुद्धसत्त्वपण ।
तयाचे करावे समाधान । तंव सिद्धान्ती म्हणे येथ प्रमाण आधीं ऐके ॥९४॥

भाष्य - ''तस्यात्मानुग्रहाभावेऽपि भूतानुग्रहः प्रयोजनम् ।
ज्ञानधर्मोपदेशेन कल्पप्रलयमहाप्रलयेषु संसारिणः पुरुषानुद्धरिष्यामीति ।
तथा चोक्तम् -
''आदिविद्वान् निर्माणचित्तमधिष्ठाय कारुण्याद्भगवान् परमर्षिरासुरये
जिज्ञासमानाय तंत्रं प्रोवाचेति'' (भाष्य- योगसूत्रसमाधिपाद सू.२५)
अहंब्रह्मास्मि हें ज्ञान । ईश्वरासी मायावृत्तीनें उत्पन्न ।
आणि मुक्तासी प्रारब्धपर्यंत जाण । उत्पन्नचि ते ॥९५॥
ईश्वरासी अज्ञान नाही । म्हणोनी अनुपयोग त्या वृत्तीचाहि ।
मुक्ताचे एकवेळ अज्ञान गेलिया पाही । त्यासहि उपयोग नाहीं तद्वृत्तीचा ॥९६॥
यालागीं त्या वृत्तीचे प्रयोजन । लोकानुग्रहचि प्रमाण ।
म्हणजे त्या वृत्तीचा उपयोग आपण । शिष्य स्वप्रश्नें करून घेताती ॥९७॥
(य११पू.३०३)ज्ञानें झालिया अविद्यानिवृत्ति । ही म्हणता नये मलिन सत्त्ववृत्ति ।
यालागीं सत्त्वशुद्धवृत्ति । एक ही मानिजे ॥९८॥
दृष्टिसृष्टिवादाची रीति । अनध्यस्तविवर्त श्रीपति ।
शुद्धसत्त्वाचरणें श्रीगुरुमूर्ति । शिष्याप्रति बोधितूं ॥९९॥
दूध सर्पितक्रमिश्रित । परी मंथने वेगळे होय निश्चित ।
तेवि उपयोगापुरते भगवंत । शुद्धसत्त्व निवडितु ॥१००॥
भगवत्प्रयत्नेंकरून । गुणवैषम्य[१४] सांगे पुराण ।
यालागीं लोकानुग्रहाकारण । शुद्धसत्त्व ग्रहण हरिलीला ॥१०१॥
याचा विशेष विचार । प्रसंगे कळेल समग्र ।
येथ श्रीगुरु करुणाकर । शुद्धसत्त्वावच्छिन्न जाणविला ॥१०२॥
तंव वादी म्हणे पूर्वील भगवद्वचन । कीं श्रीगुरुतें नाहीं लक्षण ।
आतां सांगतां शुद्धसत्त्वगुण । तरी प्रमाण कोणते मानावे ॥१०३॥
सिद्धान्ती म्हणे ऐक उत्तर । आम्हीं आत्मवृत्तीचे धर्म बोलिलो समग्र ।
तें उपदेशकाळीं प्रगटती साचार ।
आणि देहवृत्ति तंव दैवानुसार वा लीलानुसारिणी ॥१०४॥
किंवा गुरु शुद्ध असावा निर्गुणी । ऐसी भावना यदन्तःकरणीं ।
तयाकारण शुद्धसत्त्वगुणी । आह्मी श्रीगुरु सांगितला ॥१०५॥

किंवा जाणीवेचा धरूनी अभिमान । करूं नये दुराचरण ।
यास्तव अर्थवादें गुरुलक्षण । बोलिलो कीं ते आंगीं आपुल्या आणावे ॥१०६॥
एरवी तुका म्हणे जे जे बोला । ते ते साजे या विठ्ठला ।
ऐसिया प्रमाणें श्रीगुरूला । कवणें लक्षणें लक्षिजे ॥१०७॥
बाळासाठीं माय । एरवी स्वरूपचि होय ।
ऐसिया आळंदीस्वामिणीचे पाय । वंदिले स्वभावें ॥१०८॥
तेथ कविताकमळमाळा । अर्पोनी अभिमान हारविला ।
ज्ञानदेव नावाचा नित्य लागला । वाणीस छंद ॥१०९॥

॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे पुनर्गुरुशिष्यलक्षणन्नाम दशमं कुसुमम् ॥

॥ श्रीराधाकृष्णार्पणमस्तु ॥

०००

### अध्याय १० टीपा

(१)क्षीण, उपेक्षिलेले (२)शमादि साधने प्राप्त झाल्यावर (३)पुण्यप्रप्ति (४)जीवकल्पित याचा अर्थ जीव व ईश्वर अनादि असून जीवाने आपले ठिकाणी जीवत्व घेतले म्हणून ब्रह्माचे ठिकाणी ईश्वरत्व आले (५)स्त्रीध्यानाप्रमाणे (६)केवल श्रुतीनेच सांगितलेले हे पदार्थ नसून जीवत्वकल्पनेनेही त्याची सिद्धि होते, हे सांण्याकरिता (७)मुक्तिसाठी (८)धर्माचरणाच्या पुण्याने (९)उपजीविकेचे साधन (१०)सर्व दृश्याहून निराळा (११)सर्वांमध्ये मीच व्यापून आहे (१२)बालवृत्तीस साजेसे वर्तन ठेवून (१३)अज्ञानासह (१४)सत्वादि तीन गुणांचा विषम भाव

०००





॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

## अध्याय ११ वा

## ॥ गुरूपदेशप्रकार-शिष्याधिकार-संप्रदाय-निर्णय ॥

जय जय सद्गुरु जगदंबे । उन्मनीरूपे पूर्णकदंबे ।
जननी तुझिया चरणावलंबे । नाहींच अविलंबे[१] भव[२] होय ॥१॥
(य११पू.३०४) शुंभ निशुंभ क्रोध काम । त्या मारोनी दाखवी यमधाम ।
दंभ रक्तबीज मातला परम । त्याच जीवानाराम[३]* हरी[४]** ॥२॥ (*आयुष्य बाग. **हरण कर.) या अविद्येच्या पोटीं जन्मला । अहं महिषासुर मातला ।
माते तुवा पाहिजे नेला । क्षणमात्रें लयातें ॥३॥
मद मत्सर चंड मुंड । त्यातें देऊनी प्राणदंड ।
माझिया शृंखला तोडोनी प्रचंड । मोकळे करी जननीये ॥४॥
तान्हियाची शुद्धि अशुद्धि । आघवी जाणे मायेची बुद्धि ।
मी तुजविण त्रिशुद्धि । आन नेणें ॥५॥
ब्रह्मा विष्णु शूलपाणि । अंबें हीं तुझी बाळें तिन्ही ।
यास एकही क्षण स्वरूपापासुनी । वेगळे निर्वाणी होवो न देसी ॥६॥
तुझा नखवायु जेथ पडे । होती पद्मराग तेथीचे खडे ।
तूं सहज निरखिसी[५] जयाकडे । कैवल्य पाया पडे त्याच्या ॥७॥
तुज न जाणता किति दुर्भग[६] । जगीं पावले याम्यभोग[७] ।
मी लेकरूं तुझें अज्ञान चांग । फेडी पांग[८] सकळ माझा ॥८॥
प्रेमाचें करोनी मद्यपान । मनो मेषाचे मांस भक्षोन ।
विकल्प रांधोनिया मीन । खादले सकळ ॥९॥
बळी दिधल्या वासना गायी । मग नवरसे रांधिली रससोई ।
मुद्रा करोनी लवलाही । नैवेद्य तुज दाविला ॥१०॥
आघवा संसार बाह्य करून । अंतरी ठेविले तुझें स्थान ।
मग भेदाभेद आघवा निवटोन । भैरवीचक्र मांडिलें हें ॥११॥
कन्या माता कीं कामिनी । नेणवे कोण संबंध मनीं ।
ती शांति शक्ति पीठीं बैसवोनी । आनंदें करून रमतसे ॥१२॥

जगाचा मार्ग सोडिला । ऐसा वामपंथ अवलंबिला ।
तयाते नको म्हणता मिळाला । परम पुरुषार्थू ॥१३॥
मी नेणें एवढी गति । तुझिया स्तनपानाची प्रीति ।
तूं आपुले म्हणोनी मजप्रति । स्नेह चित्तीं वाढवी ॥१४॥
कुळार्णवाचे बीज । तो सोहं मंत्र उपदेशी निज ।
अनाहत गाणें गावोनी सहज । रिझवी मज लेकुराते ॥१५॥
आतां सोडोनी सकळ विचार । हृदयीं धरोनी अक्षरें चार ।
मौनें तुझिया चरणावर । केला नमस्कार जननीयें ॥१६॥
तुझिया स्तन्यपानपुष्टि । स्फूर्ति न सामावे पोटीं ।
यालागीं चावळे ग्रंथगोठी । ते बाळ कौतुक भेटी सुख घेई ॥१७॥
मागा केलें निरूपण । सद्गुरु शिष्याचें लक्षण । (य११पू.३०५)
ते ऐकोनी कर जोडून । विनवी आपण सच्छिष्यू ॥१८॥
लडिवाळें[९] लागोनिया पायीं । म्हणे भगवति सद्गुरु आई ।
उपदेश प्रकार कांहीं । तो मज लवलाहीं निरोपी ॥१९॥
आगमांच्या नाना रीति । नाना ज्ञानप्रक्रिया वेदान्ती ।
त्यांतील साच निवडोनी मजप्रति । कृपा मूर्ति वदतील कीं ॥२०॥
तैं श्रीगुरु म्हणतीं सावध । होवावया पूर्ण बोध ।
आघवा चितव्यवहार[१०] प्रसिद्ध । श्रोत्रसागरीं[११] मेळवी ॥२१॥
कां बाळाचिया खेळणीं । कल्पूं जाणे जननी ।
तेवि उपदेशाची काहाणीं । श्रीगुरुचरणी सकळ विदित ॥२२॥
एकाचि मेघापासोनि सैरा । सुटती अनंत जलधारा ।
तैं पीक पीके चौबारा[१२] । कुंभिनी हे ॥२३॥
मग आंबियामाजीं मधुर । मिरियामाजीं तीव्र ।
निंबामाजीं समग्र । कटु रसु वळे ॥२४॥
परी शहाणे जे होती । ते आर्तिपुरते उदक घेती ।
माय तेचि बाळाप्रति । कैसे रीति पाजितु ॥२५॥
तेवि तारणिया अनंत जनांप्रति । निगमघनपीयूष वर्षती क्षितीं ।
ते निष्कामांचिया चित्तीं । आम्ररस होय ॥२६॥



सकामामाजीं तिख । तामसांत होय विख ।
सद्गुरु जननीचिया स्तनीं सुरेख । ज्ञानदुग्ध होय ॥२७॥
तें ज्ञानपय पियावया । जो जो प्रतिबंध बाळा जया ।
तो तो दूर करावया । सद्गुरु आई समर्थ ॥२८॥
कोणी बाळ खेळे फुडे । तेथोनि वळवी माय रोकडे ।
कोणी बाळ झडे पडे । तयातें सुरवाडे धरी करी ॥२९॥
कोणी बाळ पाळणा पहुडे । तयातें थापडोनी चेववी कोडे ।
कोणी बाळ नुसुधेचि रडे । तया घेवोनी कडे पयःपाजी ॥३०॥
एवं जया जेथ आनंद । ते ते पुरवी आघवे छंद ।
प्रेम पूर्ण अभेद । ब्रह्मबोध सनातनू ॥३१॥
उपाधीचिया पोटीं । वासनेचिया कोटी ।
म्हणवोनी प्रक्रिया[१३] पेटीं । अनंत वस्तु ॥३२॥
कर्म देऊनी खेळणें । भातुके चारी उपासनें ।
ब्रह्मबोधपयःपानें । तृप्त करी सर्वदा ॥३३॥
वाच्यांशाची कंचुकी[१४] गाठी । सोडोनी उघडी स्तन्यपेटी ।
लक्ष्यांशे तृप्ती भरी पोटीं । अलक्ष्य गोमटी आपण ॥३४॥
नवल बाळपोषण प्रेम । आघवीया अवयवांचे धर्म ।
करो लागती स्तनाचे कर्म । पयःपान परम पाजिती ॥३५॥
जे आनंद दुग्धस्तनीं । तेचि चरणीं गांगपाणी ।
सर्वांगस्वेद भीमा म्हणोनी । पंढरींस्थानीं तेचि नांदे ॥३६॥
यालागीं बाळाचिया भेटीं । आघवीया वस्तूची उघडी पेटी । (य११पू.३०६)
मग भलतिया मिषे पोटीं । पयचि घाली ॥३७॥
कोणी एक बाळ रिझवाया । आकाशरूप होऊनी तया ।
म्हणे मी ब्रह्म तुझिया । सबाह्य अंतर व्यापुनी ॥३८॥
कोणी एकाचे अल्प मन । कवळूं न शके एवढे गगन ।
मग हृदयगाभारीं राहोन । म्हणे मी दहरस्वरूपिणी ॥३९॥
कोणी एकासी ऐसे वाटे । कीं क्षणभर न विसंबावे नेटे ।
त्याचिया दक्षिण नेत्रीं गोमटे । अंगुष्ठमात्र रूप धरी ॥४०॥

अपेक्षारहित पूर्णकामा । बाळपाळणीं अत्यंत प्रेमा ।
म्हणोनी लाडके नाम भूमा । बोबडिया आगमा बाळा शिकवी ॥४१॥
केव्हा लेकरूं मारिता हांक । उगेंचि म्हणे काय 'क' 'ख' ।
कीं 'कं' तेचि व्यापिले सुख । 'खं'ब्रह्म सुरेख निज नाम सांगे ॥४२॥
केव्हां बाळाचें ऐकोनी रोदन । म्हणे पुत्रा मी तुझा प्राण ।
न विसंबे एक क्षण । वाहते आण, रडूं नको ॥४३॥
मी ज्येष्ठ मी श्रेष्ठ । तूं पुत्र माझा कैसा कनिष्ठ ।
यालागीं आपुले कुळीचा स्पष्ट । धरी अचाट अभिमानू ॥४४॥
नातरी माझे बाळ अवचिती । शमनशयी(१५) न जावें अंतीं ।
यालागीं पुढती । आपुलिये पोटीं ठेविती सुखें ॥४५॥
नवल गुरु माता गुरु अत्ता । चराचराची गुरूस चिंता ।
स्वभिन्न कवणिया वस्तुजाता । राहुंचि नेदी ॥४६॥
पोरें आणिकांची उनाड किती । तूं न धरे तयाची संगति ।
मी मागसी ते देईन तुजप्रति । योग्यविवक्षागुणोपपत्ति(१६) मजमाजीं ॥४७॥
म्हणे बाळा तुझिया विण । मज न गमे एकहि क्षण ।
मज कांचनाचें तूं भूषण । तुझेनि प्रगटपण मजलागीं ॥४८॥
''ये यथा मां प्रपद्यन्ते'' । वत्सा मी तया तैसीच होते ।
यास्तव तूं आणिकातें । शरण न करी ॥४९॥
मज नाहीं कोणी पति । जो सत्ता करील तुज वरुती ।
मी पिता मी पति । असो दे चित्तीं भावना ही ॥५०॥
तुज समान बाळे अनेक । त्या सर्वावरी माझे प्रेम एक ।
घडींत म्हणे तूं एकुलता एक । माझा आणिक दुजा नाहीं ॥५१॥
घडींत म्हणे तूं म्हणसी माय । त्या शब्दाचा जेथ अंत होय ।
तेथ येवोनिया पाहे । मग घेईन लवलाहे कडे तुज ॥५२॥
एकासी म्हणे अविद्या सवती । तुज गांजित आहे नाना रीती ।
यास्तव मज पराविद्येप्रति । शरण येई सांडुनी अपरा गडिणी(१७) ॥५३॥
एखादी समोर पाहोनी खेळणी । म्हणे या आंत मी तुझी जननी । (य११पू.३०७)
विद्यारण्यें म्हैसाब्रह्मज्ञानी । बोधिती शिष्य मम सत्ता ॥५४॥

मज विसरसी ते खेळणें सोडी । खेळे चेंडू किंवा वावडी ।
परी संसारसारिपाट परवडी । समजोनि खेळे ॥५५॥
मौनें चालवी बुद्धिबळ । आघवे निर्दाळी प्रवृत्तिदळ ।
मन प्रधान बांधी तुंबळ । जीव नृपाळ अधीन करी ॥५६॥
तैं मज भेटता येवोनी । मी कौतुक करीन हांसोनी ।
जे रुचेल तुज खेळणी । तेचि खेळे ॥५७॥
अथवा बैसे कडेवरी । किंवा बैसे खांद्यावरी ।
किंवा आडवे अंकावरी । शयन कीजे ॥५८॥
कर्मखेळ खेळे विकल्पें । यथारुचि उपासी येऊनी समीपे ।
ज्ञानपयःपान सोपे । येणेंचि तुज ॥५९॥
तूं माझा होवोनि स्तन मागे । किंवा मीचि आपण देईन आंगे ।
परी माझेपणाविण उगे । निमिष न दवडी ॥६०॥
मज नेणता गडी जोडसी । पराभव पावता माय म्हणोनि रडसी ।
दिसे तोचि खेळ खेळसी । माझिया अंकासी उपेक्षुनी ॥६१॥
एवं सांडी हे दृष्टिमाया । तूं माझीच अंतर्ज्योति तनया ।
प्रीतिसाठीं भिन्न काया । परी अभेदाश्रया सांडू नको ॥६२॥
दिवसेंदिवस होई लहान । निमिखहि नको तव स्वतंत्र चळण ।
मी आघवा अंगे करीन । योगक्षेम वत्सा तुझा ॥६३॥
एवं ज्ञानदेव जननी शिष्याप्रति । अनादिच बोधी अनंत रीति ।
हें आले कीं नाहीं तुझें चित्तीं । कथानुसंधानें म्हणती श्रीगुरु ॥६४॥
तैं मध्यस्था पडले मौन । शिष्य जाहला प्रसन्न ।
प्रतिवादी चावळी वचन । श्रीगुरु पूर्ण डोलती सुखें ॥६५॥
मायेचिया वचनासाठीं । जो तात्काळ धांवोनि ये पाठीं ।
तो जननीस न विसंबे एकघटी । हे म्हणो ये कीरू ॥६६॥
बहु मारोनिया हांका । धावोनि ये गेलिया घटिका ।
तो तनुज गुंतला म्हणावा निका । खेळामाजीं ॥६७॥
दूध पियावे म्हणे आई । लेकरूं म्हणे मज क्षुधाचि नाहीं ।
मी उद्या येईन लवलाही । आज खेळेन गडिया संगे ॥६८॥

मग लांच दाखवूनि नाना रीति । माय धरोनी आणी हाती । परी दृष्टि चुकवोनि
जाय खेळावया प्रति । तो उनाड निश्चिती म्हणावा तनय ॥६९॥
तेवि यतमान वैराग्यें देहसंबंध तुटला । ऐकेंद्रिय वैराग्यें इंद्रियापासोन सुटला ।
व्यतिरेक वैराग्यें मनाते विटला । वशिकार वैराग्यें थाटला विवेकसंगे ॥७०॥
तेथ कवणे पंथीं । तर्क रिघो पाहे प्रांतीं ।
पुढें परवैराग्य असंप्रज्ञातस्थिति । गेला मातेप्रति शरण ॥७१॥ (य११पू.३०८)
संप्रज्ञात पांडित्य सोडिले । असंप्रज्ञात बाल्य जोडिले ।
मुग्ध होवोनि वंदिले । श्रीगुरुचरण ॥७२॥
तेव्हां पिशाचें झडपला बाळ । हें ओळखोंनि उतावेळ ।
वचनमंत्रजळ निर्मळ । शिंपी जननी ॥७३॥
तेणें वचनमात्रें करोनी । समान समाधि-व्युत्थानीं ।
कीं जननीचिया प्रसादें करोनी । जननीच आपण ॥७४॥
माय ज्या ज्या पदार्थाचे । नांव सांगे तें मानी साचे ।
तियेनेंचि खोटे म्हणतां तयाचें । नांवहि सांडी ॥७५॥
तेवि शब्दें जें जाणितलें खरें । तें वाचारंभण मात्र सारें ।
ऐसें जो ओळखे वचनमात्रें । तो उत्तम अधिकारी म्हणावा ॥७६॥
''कानावचनाचिये भेटीं । सरिसाचि जो किरीटी ।
वस्तु होवोनि उठी । कवणियेक जो'' ॥९९१॥ (ज्ञानेश्वरी अ. १८)
एवं परमपूज्यपादवाणी । आतां मध्यमादिकांचें लक्षण कानीं ।
सावधान अंतःकरणीं । होऊनी ऐके ॥७७॥
नायकता कोपेल जननी । म्हणोनी आठवण ठेवी मनीं ।
तेवि विनटे प्रणवादिध्यानीं । मध्यम अधिकारी तो ॥७८॥
माय रिझवी एकरीति । तंव आपण आळ घे भलती ।
तेवि कुतर्कें विचारी दिवसराती । तया अधिकृति कनिष्ठता ॥७९॥
परी आघवीयाचिप्रति । पाहिजे साधनचतुष्कसंपत्ति ।
तें नसतां दास म्हणविती । लेकरे न होती सर्वथा ॥८०॥
जैसे प्रथम लावोनि मायेचें नाते । तरी पुढील जन्मीं भेटेचि ते ।
तेवि विषयीं असतां जे दास्य होते । मुमुक्षेमाजीं बालपण ॥८१॥

ऐसें ऐकोनी उत्तर । शिष्य मध्यस्थ वादी समग्र ।
म्हणती हें कळले समग्र । परी एक करुणाकर सांगतील ॥८२॥
''संप्रदायाची वाट । न धरोनी करसील प्रगट ।
गुज घेवोनि चावट । होतील बहु ॥''
ऐसे मुकुंदराज बोलती । आणि भगवंताचीहि उक्ति ।
ते साच वाटे आम्हाप्रति । कळती ते उपपत्तिहि सांगतो आम्ही ॥८३॥
ज्ञान झालियावरी । परंपराकर्तव्य शिष्य करी ।
संप्रदाय नसतां करी । परी भोग भिकारीसम याची[१८] ॥८४॥
पावोनिया ब्रह्मप्रतिष्ठा । बळें श्वान होवोनि घे भोगविष्ठा । (य११पू.३०९)
ह्या निवटाया नीच चेष्टा । पाहिजे पोटा श्रीगुरुधाक ॥८५॥
तो नव्हे संप्रदायाविण । गुरुसंप्रदायधर्माचि आश्रमवर्ण ।
ऐसे निवृत्तिकल्पद्रुमफलवचन[१९] । तुम्हींच आम्हाकारण सांगितले ॥८६॥
यालागीं संप्रदायाची रीति । कवण नाम कैसी गति ।
विशेष सांगावी आम्हाप्रति । कैसे रीति वर्तावे ॥८७॥
तंव श्रीगुरु म्हणती हें बरवे पुसता । सांगितले सांगतो सांगेनहि तत्वता ।
याचिया[२०] नामा मधुराद्वैता । ओळखावे ॥८८॥
येथ आदिनाथ ते मूळ । आळंदीश्वर तें फळ ।
किंवा आघवाचि कल्लोळ । मधुररसमंदाकिनीचा ॥८९॥
म्हणोनि याते नाथसंप्रदाय म्हणती । श्रीकृष्णोपासना वैष्णवपद्धती ।
परी ज्ञानसिद्धान्त केवलाद्वैती । निश्चित असे ॥९०॥
आळंदी मूळपीठ देख । प्रतिनिधि ते सेवक ।
आणि प्रतिनिधिवर रूपें अनेक । तातविग्रह[२१] ॥९१॥
उपास्यत्वें पाहतां साची । शाखा वारकरी संप्रदायाची ।
जे फळीं पुष्पीं सुखाची । दुमदुमिली आहे ॥९२॥
द्रुमधर्म सनातन । मूळ तंव ते नारायण ।
येथ शिवआदि गुरु देव कृष्ण । शैववैष्णवमिश्र म्हणोनि संप्रदायु हा ॥९३॥
दोहींचा समावेश पुरता । श्रीगुरु आळंदीश्वरांत होता ।
वाढता आनंद मंत्र जपतां । चतुराक्षरी वा सप्ताक्षरी ॥९४॥

सेवक शिष्य आणि भक्त । हें त्रिविध जन मानिले येथ ।
सेवकाचें प्रकार दोन होत । अप्रविष्ट आणि प्रविष्ट ऐसे ॥९५॥
जे पतित वा नीच पूर्ण । बळेंचि करिती अधर्माचरण ।
तयातें तंत्रें संकोचून । आणावें धन त्याज पासुनी ॥९६॥
आतां गृहकार्यासक्त । परी यथाशक्ति प्रतिनिधिवचन मानित ।
तो जनसमुदाय समस्त । प्रविष्ट सेवक म्हणावा ॥९७॥
तयाचे चतुर्थांश धन । सुखें घ्यावे याचना करून ।
नाहीं तरी अप्रविष्टपण । देयावें तयातें ॥९८॥
साधनचतुष्टयसंपन्न । मुमुक्षु शिष्य म्हणविती पूर्ण ।
तिहीं करावे कार्य तीन । प्रातःकाळीं जप योग ध्यान संप्रदायानुसार ॥९९॥
माध्यानकालीं ज्ञानचर्चा पूर्ण । अथवा करावे ग्रंथलेखन ।
सायंसमयीं हरिकीर्तन । प्रेमें करोनी करावे ॥१००॥
कीर्तनाचे न घेयावे धन । यति तरी खावे भिक्षा मागोन ।
नाहीं तरी थोडीशी निश्चिंती पूर्ण । मी केली तेवी करावी ॥१०१॥
बहुशा ऐसी समयरीति(२२) । अविरोध न येतां संप्रदायाप्रति ।
मध्यें संप्रदायकार्य येती । (य११पू.३१०) तेही कीजती उल्हासे ॥१०२॥
शरीरापुरते स्वकार्य पाही । त्याचा उपदेश न लगे कांही ।
सेवकापासुनी जे आणिले लवलाही । ते धन स्वकार्या लावूं नये ॥१०३॥
तया धनेंकरून । नवे करावेत शिवकृष्णालयें जीर्ण ।
पुस्तकालयें बांधोन । करावे पूजन तयाचें ॥१०४॥
दीन रोगियासाठीं । उघडावी औषधांची पोटी ।
इतुकेंहि करोनी **धन उरता शेवटीं । भेसंडी(१)(२३) करावी ॥१०५॥**
**पेसंडीते(२)(२४) गाळावे । सेसंडीते(३)(२५) पाळावे ।**
**मेसंडीते(४) वळावे । बळें करोनी ॥१०६॥**

---

(टीप :-१)**भेसंडी** = कूटार्ध प्राणायाम म्हणजे अन्तर्वृत्तीचे आकर्षण करून बाह्यवृत्ति समष्ट्यवच्छिन्नाधिष्ठानपुत्तलाकर्षण. २) **पेसंडी** = परान्तःकरणवृत्ति. ३) **सेसंडी**= जितान्तःकरणवृत्ति / पण हे सर्व तीव्र संवित्ताधिष्ठानपुत्तलिकावच्छिन्न समजावे.) (या तीनही टीपा मूळातील आहेत.)

संडी म्हणजे वृत्ति । उपसर्गें अर्थ चतुर जाणती ।
**परिभाषा अध्यात्मवृत्ति । नवीन मी रचिली हे ॥१०७॥**
एवं करावी अनंत कामे । परी बैसूं नये रिकामे ।
जेणें लोके पुरुषोत्तमे । पाविजे तोषू ॥१०८॥
प्रतिनिधि असावा सद्गुणी । तो चळता काढावा सर्वांनी ।
आतां भक्त म्हणीजे कवणालागुनी । तेहि ऐकावे ॥१०९॥
जयाते गुरुवाक्यें होवोनि ज्ञान । प्रेमें भजे गुरु शिव कृष्ण ।
तनु वाणी आणि मन । वाहिले तेथेंचि ॥११०॥
जो स्वरूपीं तरी मिळाला । परी आळंदीशा पूजावया पृथगिव(२६) राहिला ।
तो भक्त ऐसा बोलिला । इये शास्त्रीं ॥१११॥
आतां या चतुर्विध जना भिन्न(२७) वर्ग । परी सद्गुणी ऐसा संघ ।
तो मित्र म्हणोनी प्रेमप्रसंग । भावना कीजे ॥११२॥
सद्गुणी पुरुषीं मैत्री धरावी । प्रविष्टावरी करुणा करावी ।
सद्गुरुचरणी प्रीति धरावी । मुदिता धरावी भक्तसंतसंगीं ॥११३॥
समयापुरत्या(२८) करोनी गोष्ठी । उपेक्ष असावे अप्रविष्टी ।
शिष्याविषयींहि धरावी पोटीं । तीव्र करुणा ॥११४॥
हा सात्त्विक जनाप्रति विध्युपदेशभाव(२९) । ज्ञानियासी तव समान सर्व ।
भक्ता आवडती गुरुदेव । हें स्वयेंचि कळे ॥११५॥
सेवकापासोनि आणिलिया धन । जरी अत्यंत असली अडचण ।
तरी करावे तीर्थाटन । किंवा वाचक लेखक पाळावे ॥११६॥
परी व्यय न करावा स्वकार्यार्थ । करील तो प्रतिनिधि बहिष्कृत ।
(य११पू.३११) समविग्रह संज्ञा येथ । नाना पादुकाप्रति असे ॥११७॥
आळंदी मूळपीठ दृष्टि । प्रतिनिधि शब्द व्यवस्थेसाठीं ।
एरवी शिष्यें भाविजे पोटीं । श्रीगुरुदेवचि ॥११८॥
परी संप्रदायनियम उल्लंघिता । प्रतिनिधि बहिष्कृत होता ।
परी तच्छिष्या गुरुश्रद्धावंता । नियमा नुल्लंघनी सांप्रदायिक म्हणीजे ॥११९॥
आणि गुरुविश्वासें उल्लंघी नियम । तरी तोहि बहिष्कृत होय परम ।
तो ज्ञानें पावे परंधाम । तरी सुखे पावो ॥१२०॥

पतीचिया मागें जातां । काय न पावे पतिव्रता ।
परी तियेकरी कुटुंबव्यवस्था । देवो नये ॥१२१॥
आणि माझी जया चाड । कीं माझिया रक्षणीं कोड ।
तेणें नियम सुगड । पाळिजे ऐसे ॥१२२॥
जो सांप्रदायिक नियम उल्लंघील । तो अज्ञानी तरी राजसता पावेल ।
ज्ञानी केवळ बहिष्कृत होईल । परी न परतेल परंधामापासोनी ॥१२३॥
अथवा आमुचिये संप्रदायीं । ब्रह्मज्ञान झालियाही ।
श्रीगुरु क्षोभता उपयोगू नाहीं । हें वदली आई अमृतानुभवीं ॥१२४॥
''जयाचेनि सावाये । जिवु ब्रह्मउपरू लाहे ।
बह्महि हातातळील जाये । उदासे जेणें ॥१६॥'' (अनुभवामृत प्र. २)
एवं हा विशेष । परी यथाबल गुरु शिव कृष्ण सकळा उपास्य ।
एवं हा धर्म निःशेष । सांप्रदायिक बोलिला ॥१२५॥
धर्म तव सनातन । आणि संप्रदाय इष्टनिष्ठाद्योतन ।
जेवि पातिव्रत्य एक असोन । भिन्न भिन्न पतिव्यक्ति आणि पतिव्रता ॥१२६॥
इष्टनिष्ठा सुटतां चुके । विश्वासाभावें तीव्र संवेगा मुके ।
हे दृष्टविघ्न आणि अदृष्टहि अनेके । विघ्ने येती ॥१२७॥
''यो वै स्वां देवतामतियजते । प्रस्वायै देवतायै च्यवते ।
न परां प्राप्नोति पापियान् भवति'' येथें । साक्ष देते श्रुति जननी ॥१२८॥
म्हणोनि माझे कुळ इष्ट । माझा ज्ञानेश्वर वरिष्ठ ।
परी त्यास आणि प्रिय जनास स्पष्ट । एक मी याची ॥१२९॥
एवं मी बोलिलो सांप्रदायिक नियमा । परी एका विषयीं सकळीं मज कीजे क्षमा।
माझिया पुरती दया सीमा । असो द्यावी एवढी ॥१३०॥
अनंत जन्मला जिये क्षणीं । तो वाहिला की नाहीं तातचरणीं ।
हा अत्यंत संशय माझिया मनीं । नाहीं अझोनी निवटिला ॥१३१॥
तरी तो वयांत येईल जेव्हां । (य११पू.३१२) त्याचे मिळविले न खावे तेव्हां ।
ऐसी वासना माझिया जीवा । हें कृपा करोनी पुरवावी ॥१३२॥
जरी तो असेल समर्पित । तरी तल्लब्ध न घेणें मज उचित ।
याहीवरी जैसे तात । करतील तैसे घडोनि येवो ॥१३३॥





तातांचेहि चरणीं । मी बहुवेळ केली प्रतिज्ञाहानि । परी मज सांभाळी आळंदीश
जननी । असदाचाराचेंहि करोनी बाळकौतुक ॥१३४॥
ते उपकार आठविता । मृदु कां हो परी हे वाटे चित्ता ।
नको अपवर्ग परी राहीन तत्वतां । पायातळीं पायरी होवोनी ॥१३५॥
हैबतिरायाचिया समोर । मज पायरी करितील कीं आळंदीश्वर ।
माझी माय करुणासागर । प्रसाद मजवर सदाचि करी ॥१३६॥
श्रीज्ञानेश्वर माय माऊली । तियेची वंदोनी पाऊली ।
कविता कमळमाळ अर्पोनि लाविली । वाणी ज्ञानदेवनामछंदीं ॥१३७॥
॥ हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे संप्रदायसुरतरौ
पूर्वविहारे सद्गुरूपदेशप्रकारशिष्याधिकारसंप्रदायविशेषविचारनिर्णयो
नाम एकादशमम् कुसुमम् ॥
॥ श्रीवृंदावनविहारिणे नमः। श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

०००

## अध्याय ११ वा टीपा

(१)क्षणात तात्काळ (२)संसार (३)आयुष्यबाग (४)हरण कर (५)पाहसी (६)हतभागी (७)यमलोकातील (८)पाश (९)प्रेमाने (१०)मनोव्यापार (११)श्रवणरूपी सागरात (१२)भरभराटून (१३)साधनरूपी पेटीत (१४)चोळीची गांठ (१५)यमलोकी, मृत्यूचे स्वाधीन (१६)बोलण्यास योग्यअशा सद्गुणांची स्थिती (१७)सखी (१८)याचना करितो (१९) निवृत्तिनाथरूपी कल्पवृक्षास आलेले श्रीज्ञानेश्वररूपी फळ त्याचे वचन (२०)संप्रदायाच्या (२१)श्रीज्ञानेश्वरमहाराजांची रूपे (२२)निर्बंध;मर्यादा (२३)भेसंडी = कूटार्धप्राणायाम म्हणजे अन्तर्वृत्तीचे आकर्षण करून बाह्यवृत्ती समष्टिअवच्छिन्न अधिष्ठान पुत्तल आकर्षण
(२४)पेसंडी = परान्तःकरणवृत्ति. (२५)सेसंडी = जितान्तःकरणवृत्ति. पण हे सर्व तीव्र संवित्तअधिष्ठानपुत्तलिका अवच्छिन्न समजावे. (२६)भिन्नासारिखा (२७)जनांहून निराळा (२८)सांप्रदायिक मर्यादेपुरता (२९)कर्तव्य म्हणून उपदेश.................................

*((१- भेसंडी = भारतान्तःकरणवृत्ति = भारतावर पूर्ण निष्ठा असलेली वृत्ति ज्यांची आहे ते.*
*२- पेसंडी = पारकीयान्तःकरणवृत्ति / परकीयांवर पूर्ण निष्ठा असलेली वृत्ति ज्यांची आहे ते.*
*३- मेसंडी = म्हणजे मध्यान्तःकरणवृत्ति / भारतावर आणि परकीयांवर दोन्हीकडे निष्ठा असलेली डळमळीत वृत्ति ज्यांची आहे ते. ४- सेसंडी = जितान्तःकरणवृत्ति = ज्यांचे अंतःकरण प्रेमामुळे जिंकले गेलेले आहे म्हणजे आपल्या व ज्यांच्या अंतःकरणाची वृत्ति समान आहे ते. – श्रीबाबाजीमहाराजांनी स्पष्ट करून सांगितलेला अर्थ - कृ.मा.घटाटे))*

..........................................................................................

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

अध्याय १२ वा.

# ॥ यथार्थ वर्णनिर्णयपूर्वक संप्रदायविवेक ॥

जय जय सद्गुरु श्रीविठ्ठला । भावपुंडलिक भेटि पातला ।
हृदयविटे उभा राहिला । शुद्धान्तःकरण पंढरीये ॥१॥
महाकारण दिंडिर वनीं । रुसोनी जातां रुक्मिणी उन्मनी ।
भेटावया तिजलागुनी । आलासी मौनी जगद्गुरो ॥२॥
सत्रावी चंद्रभागेचे नीर । खळखळ वाहे समोर ।
तूं भक्तवत्सल करुणासागर । पुरविसी आर्त बहुतांची ॥३॥
जीवन्मुक्ति वाळवंटी । सोहंभावाची सोडोनि पेटी ।
कीर्तन करिती उल्हास पोटी । सद्भक्त तुझे ॥४॥
अनाहत टाळवींणा मृदंग । दश नादें कोंदले अंतरंग ।
सन्मुख खगेंद्र धरोनी अनुराग । विवेकरूप उभा असे ॥५॥
प्रेमसुखाचा काला । महाद्वारी मिळे गोपाळा ।
तेथील उच्छिष्ट भाग लाधला । अवचिता माते ॥६॥
मग आघवेची भूवैकुंठ । ऐसा अनुभव कळला स्पष्ट ।
तेणेंचि अचाट । जाहली स्फूर्ति ॥७॥ (य११पू.३१३)
आतां तया स्फूर्तीचेनि गुणें । जे पुढील निकें निरूपणें ।
जें न्यून तें पूर्ण करणें । प्राणवल्लभे आळंदीशे ॥८॥
सावधान असावे श्रोता । शिष्य प्रश्न करी श्रीगुरुनाथा ।
म्हणे मागा निरूपिला होता । संप्रदाय विशेषु ॥९॥
तरी इये संप्रदायीं कवण । येवो शकती वर्ण ।
आश्रमादि संपूर्ण । कृपा करोनी कळवावे ॥१०॥
पुरुष स्त्रियांचें धर्म कवण । हेंहि सांगावे संपूर्ण ।
श्रीगुरु म्हणती सावधान । करी श्रवण शिष्यराया ॥११॥
मी तंव सांगेन समस्त । त्वा वर्णवादादि पुसिले व्यर्थ ।
एथ सांगेन जैसे माझें मत । मग संप्रदायांत कोणी येवो न येवो ॥१२॥



वर्णवाद विचारिता । संशय आहे माझिया चित्ता ।
तयामाजीं पक्ष पाहता । दिसती दोन ॥१३॥
कोणी जन्मानें मानिती जाति । कोणी गुणकर्मेचि म्हणती ।
निर्णय नाहीं जाहला चित्तीं । आजवरी हें चित्तीं माझ्या ॥१४॥
वेदीं सत्यकामाची कथा । जाबाला तयाची माता ।
गौतमें व्रतबंध केला तत्वतां । तो सत्य बोलिला म्हणोनी ॥१५॥
आचार्यभाष्य आहे त्यावरी । कीं पतिसेवेंत गुंतली नारी ।
म्हणोनी गोत्रादि निर्धारी । न जाणिले तिनें ॥१६॥
परि इष्ट करिता निर्धार । क्षणोक्षणीं गोत्रोच्चार ।
गोत्र न कळेल हा विचार । कैसा जाहला कळेना ॥१७॥
असो आचार्य भाष्यात्मक ही कथा । वज्रसूची उपनिषत् पाहतां ।
जात्यादिकीं ब्राह्मण सर्वथा । न होय हें सांगितलें ॥१८॥
पुरुषसूक्तांत चारी वर्ण । झाले मुखादि अवयवापासोन ।
यालागीं जन्मानेंचि जाण । कोणी वर्णसिद्ध म्हणती ॥१९॥
आतां पाहतां महाभारती । युधिष्ठिर म्हणे नहुषाप्रति ।
गुणकर्मेचि वर्ण होती । जाती सर्वथा अप्रमाण ॥२०॥

श्लोक :-

''सत्यं दानं क्षमा शीलमानृंशस्य तपो घृणा ।
दृश्यन्ते यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥२१॥''

भावार्थ :- युधिष्ठिर नहुषाला म्हणतात ज्याचे ठिकाणी सत्य, दया, क्षमा, शील, निष्ठुर नसणें, तप हे गुण दृष्टीस पडतात तोच ब्राह्मण होय.

''चातुर्वर्ण्यं प्रमाणं वा सत्यं च ब्रह्म चैव हि ।
शूद्रेष्वपि च सत्यं च दानमक्रोध एव च ।
आनृशंसमहिंसा च घृणा चैव युधिष्ठिर ॥२३॥'' (य११पू.३१४)

सर्परूपी नहुष म्हणतो - राजा चातुर्वर्ण्य प्रमाण असून तूं सांगितलेले वेद व सत्यादिक गुण शूद्रांचेंहि ठिकाणीं असतात. श्लोकांत बहुवचन आहे यावरून एकाद्याच्याच ठिकाणीं असतात असा आशय नाहीं. नीलकंठानीं वेद शब्दानें याठिकाणीं शूद्राचारस्मृति घेतली आहे, पण शूद्राचारस्मृतीचा प्रश्न करण्याची

नहुषाला आवश्यकता काय? कारण शूद्राचारस्मृति शूद्राला पाठ असण्यांत कांहीं आश्चर्य नाहीं, म्हणून श्लोकांतील ब्रह्म शब्दानें येथें वेदच विवक्षित आहे. शिवाय नीलकंठाची टीका पुढच्या वाक्याशीं विरुद्ध आहे, कारण शूद्राचारस्मृति घेतल्यास जन्मना जाति मानण्याचा भाव उत्पन्न होतो. तो तर युधिष्ठिराच्या वाक्यांत स्पष्ट नाहीं, व टीकाकारहि तसेंच लिहितात. बाकीचा अर्थ स्पष्ट आहे.

**''शूद्रे तु यद्भवेल्लक्ष्म द्विजे तच्च न विद्यते ।**
**न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः ॥२५॥**
**यत्रैतल्लक्ष्यते सर्प वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः ॥**
**यत्रैतन्न भवेत्सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत् ॥२६॥''**

युधिष्ठिर म्हणतात, सर्पश्रेष्ठा शूद्राचें ठिकाणीं मी सांगितलेलें गुण असतील तर तो शूद्र नाही, व ब्राह्मणाचें ठिकाणीं हें गुण नसतील तर तो ब्राह्मण नाहीं. म्हणजे ज्याचे ठिकाणीं हे गुण असतील तो ब्राह्मण व ज्याचें ठिकाणीं हे गुण नसतील तो शूद्र. टीकाकारांचा आशय असा आहे की, ब्रह्मवेत्ता शूद्रहि असला तर ब्राह्मणच होतो. ब्राह्मणाची शमादिक लक्षणें शूद्राचे ठिकाणीं नसतात, व शूद्राची कामादिक लक्षणें ब्राह्मणाचें ठिकाणी नसतात. अर्थातच कामादिक लक्षणयुक्त शूद्र व शमादिलक्षणयुक्त ब्राह्मण म्हणावा.

**''यदि ते वृत्ततो राजन् ब्राह्मणः प्रसमीक्षितः ।**
**वृथा जातिस्तदाऽऽयुष्मन् कृतिर्यावन्न विद्यते ॥३०॥''**

नहुष म्हणतात, राजा जर तूं गुणकर्मावरूनच ब्राह्मण म्हणतोस तर जाति व्यर्थ होतील.

**''जातिरत्र महासर्प मनुष्यत्वे महामते ।**
**संकरात्सर्ववर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः ॥३१॥'' (य११पू.३१५)**

युधिष्ठिर म्हणतात हे सर्पश्रेष्ठा, सर्व मनुष्यांचा संकर संभवनीय असल्यामुळें व तो होत असल्यामुळें ह्या ठिकाणीं जातीची परीक्षाच होणें कठीण आहे.

**''सर्वे सर्वास्वपत्यानि जनयन्ति सदा नराः ।**
**वाङ्मैथुनमयो जन्म मरणं च समं नृणाम् ॥३२॥**

कारण जसें कोणीहि कोणाशी बोलूं शकतो त्याप्रमाणें कोणीहि पुरुष कोण्याहि स्त्रीचें ठिकाणीं अपत्य उत्पन्न करूं शकतो व तसे नेहमीं चाललेहि आहे; आणि जन्ममरण हेहि सर्वांना सारखेंच आहे. या श्लोकाच्या टीकेंत ''न चैतद्विद्मो ब्राह्मणा स्मो वयमब्राह्मणा वा'' ही श्रुति देऊन जातीविषयीं संशय व्यक्त केला आहे. या श्रुतीचा अर्थ असा आहे कीं – आम्ही ब्राह्मण आहो किंवा ब्राह्मणेतर आहो हे जाणत नाहीं.

**''इदमार्षं प्रमाणं च ये यजामह इत्यपि ।**
**तस्माच्छीलं प्रधानेष्टं विदुर्ये तत्त्वदर्शिनः ॥३३॥''**

**टीका :- ननु जात्यनिश्चयें कथं ब्राह्मणोऽहमित्याद्यभिमानपुरःसरं यागादौ प्रवर्ततेत्याशंक्याह इदमार्षमिति ।**

**अत्र ये यजामह इत्यनेन च ये वयं स्मो ब्राह्मणा अन्ये वा ते वयं यजामह इति ब्राह्मणेऽनवधारणं दर्शितं मंत्रलिंगमपि ।**

**य एवास्मि स सन् यजे इति ।**

**नन्वेवं स्वस्याब्राह्मणत्वपक्षे यज्ञस्यानिष्टकरत्वमापततीत्याशंक्य तत्परिहाराय यागे यजमानस्य प्रवरवरणं क्रियते याज्ञिकैः तच्चाग्निर्होतेति मंत्रे गौतमवद् अयास्यवद् अंगिरोवद् ब्राह्मणवदिति कुर्वन्ति च तस्य च प्रयोजनम् अब्राह्मणस्यापि यजमानस्य ब्राह्मणत्वसंपादनं तस्मादाचार एव ब्राह्मण्यनिश्चये हेतुर्वेदप्रामाण्याद् इत्युपसंहरति। तस्मादिति प्रधानं च तदिष्टं चेति कर्मधारयः ॥३३॥**

श्लोकार्थः- ''जे कोणी आम्ही आहो ते यजन करितो'' असें वेदाचें प्रमाण असल्यामुळें गुणकर्मावरूनच वर्णव्यवस्था तत्त्वदर्शी पुरुष करीत असतात.

टीकार्थः- पूर्वपक्षीं म्हणतो अहो जर जातीचा निश्चयच नाहीं, तर मी ब्राह्मण आहे असा अभिमान कसा उत्पन्न होतो बरें, अशी शंका असल्यास सांगतात, इदमार्षं ऐसे ब्राह्मण किंवा आणखी कोणी जे आम्ही (य११पू.३१६) आहो ते यजन करितो असा अर्थ ''ये यजामह'' या पदाचा आहे; व त्यावरून जातीदृष्टीनें ब्राह्मण्याचा निश्चय सिद्ध होत नाहीं. ''य एवास्मि स सन् यजे'' जो कोणी मी असेन तोच मी यजन करीतो असे मंत्रलिंगहि आहे.

पूर्वपक्षी म्हणतो अहो ब्राह्मण नसून जर यज्ञ करील तर अनर्थ प्राप्ति झाली पाहिजे.

उत्तरपक्षी म्हणतो ह्याचें उत्तर असे कीं याज्ञिक यज्ञामध्यें यजमानाचे प्रवरवर्णन करीत असतात, ते अग्निर्होता या मंत्राचें ठिकाणीं गौतमवत्, अयास्यवत्,

अंगिरोवत्, ब्राह्मणवत् असें करितात त्याचा उपयोग हा आहे कीं, यजमान जरी ब्राह्मण नसला तरी तो प्रवरवर्णनानें ब्राह्मण होतो. म्हणून गुणकर्मच ब्राह्मणाला हेतु आहेत.

मागील २५ व्या श्लोकाच्या टीकेंत ''इतरस्तु ब्राह्मणपदेन ब्रह्मविदं विवक्षित्वा'' असें म्हटलें आहे व त्याचा अर्थ शूद्र ब्रह्मवेत्ता असल्यास ब्राह्मण आहे असा त्याचा अर्थ आहे. म्हणजे जातिपक्षानें याच्याशीं ब्राह्मणाप्रमाणें वर्तन करण्याची अपेक्षा नाहीं असा भाव निघतो. परंतु या ३३ व्या श्लोकाच्या टीकेंत ह्याच टीकाकारानीं सद्गुणी शूद्राला देखील प्रवरवर्णन करून ब्राह्मण करून त्याच्या हातानें यज्ञ करवावा असा भाव दाखविला आहे. ब्रह्मनिष्ठाला यज्ञ कशाला पाहिजे म्हणून २५ व्या श्लोकाचा अर्थ थोड्या जात्याग्रहानें टीकाकारानीं करून आपल्या बोलण्याशींच या ३३ व्या श्लोकाची टीका करितांना विरोध आणिला आहे. याप्रमाणें गुणकर्मानें वर्णव्यवस्था महाभारतांत मानिली आहे, व तशीच जन्मानेंहि मानिली आहे, असें मी पुढें दाखवितो.

उद्योगपर्वातील सनत्सुजातपर्वात विदुराला ब्रह्मज्ञान धृतराष्ट्रानें विचारलें असतां ''शूद्रयोनावहं जातो नातोऽन्यद्वक्तुमुत्सहे'' असें विदुर म्हणतात व त्याचा अर्थ मी शूद्र योनीत उत्पन्न झाल्यामुळें दुसरें कांही मी सांगण्यास इच्छित नाहीं. असा आहे. ह्याप्रमाणें भारतांत जन्मानें वर्णव्यवस्था मानली आहे व पुनः मोक्षधर्मात भृगु म्हणतात -

**''न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् ।**
**ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ॥१०॥''**

अर्थ :- चार वर्णांमध्ये कांहीं विशेष नाहीं कारण सर्व जगत् (य११पू.३१७) हें ब्रह्मदेवानेंच केलें आहे; म्हणून तें सर्वच ब्राह्मण असून आपआपल्या कर्मानेंच निरनिराळ्या जातीचे झाले आहे. ह्या श्लोकाच्या टीकेवरून असा भाव निघतो कीं, व्यक्ति आपापल्या गुणानें व धंद्यानेंच त्या त्या जातीच्या होतात. देवानें कांहीं त्यांच्यामध्यें जाति उत्पन्न केली नाहीं.

**''कामभोगप्रियास्तीक्ष्णाः क्रोधनाः प्रियसाहसाः ।**
**त्यक्तस्वधर्मा रक्तांगास्ते द्विजाः क्षत्रतां गताः ॥११॥''**

अर्थ :- कामभोगप्रिय, कडवे, रागीट आणि साहस करण्याची इच्छा बाळगणारे व आपला पूर्वीचा ब्राह्मणधर्म सोडून दिला असून रजोगुणी असे झालेले ब्राह्मणच क्षत्रिय जाती झाले.

**''गोभ्यो वृत्तिः समास्थाय पीता कृष्युपजीविनः ।**
**स्वधर्मान्नानुतिष्ठन्ति ते द्विजा वैश्यतां गताः ॥१२॥''**

अर्थ :- रजस्तमोगुणी व गायीवर वेतन चालवून शेतीवर उपजीविका करणारे आपला पूर्वीचा ब्राह्मणधर्म ज्यांनी सोडून दिला आहे तेच ब्राह्मण वैश्य झाले.

**हिंसानृतप्रियालुब्धाः सर्वकर्मोपजीविनः ।**
**कृष्णाः शौचपरिभ्रष्टास्ते द्विजाः शूद्रतां गताः ॥१३॥**

अर्थ :- हिंसा व खोटें भाषण हेंच ज्यांना प्रिय असून कोणताहि प्रतिबंध न बाळगल्यामुळें सर्व कांही करणारें तमोगुणी असें ब्राह्मणच शूद्र झाले.

**इत्येतैः कर्मभिर्व्यस्ता द्विजा वर्णान्तर गताः ।**
**धर्मो यज्ञक्रिया तेषां नित्यं न प्रतिषिध्यते ॥१४॥**

अर्थ :- याप्रमाणें आपआपल्या कर्मानें पृथक् झालेले ब्राह्मणच चार वर्णाचे झाले. त्या सर्वांनाहि धर्मक्रिया व नित्ययज्ञक्रिया ह्यांचा प्रतिषेध नाहीं.

**इत्येते चतुरो वर्णा येषां ब्राह्मी सरस्वती ।**
**विहिता ब्रह्मणा पूर्वं लोभात्त्वज्ञानतां गताः ॥१५॥**

अर्थ :- हे चार वर्ण जेव्हां निराळे झाले तेव्हां ब्रह्मदेवानें त्यांना वेद दिलेच; परंतु ते पुनः लोभानें अज्ञानी झालेत. किंवा असा अर्थ– हे चारी वर्ण जेव्हां ब्राह्मण होते तेव्हां त्यांना वेदविद्या ब्रह्मदेवानीं दिलीच होती परंतु लोभानें हे अज्ञानी झालेत. (य११पू.३१८)

**ब्राह्मणा ब्रह्मतंत्रस्थास्तपस्तेषां न नश्यति ।**
**ब्रह्म धारयतां नित्यं व्रतानि नियमांस्तथा ॥१६॥**

अर्थ :- पैकीं ज्यानीं कोणी धर्म सोडला नाही, व जे वेदोक्त अनुष्ठानादि करून करीत राहिलेत त्यांच्या तपाचा नाश झाला नाहीं व होत नाही.

**शूद्रे चैतद्भवेल्लक्ष्यं द्विजे तच्च न विद्यते ।**
**न वै शूद्रो भवेच्छूद्रो बाह्मणो न च ब्राह्मणः ॥८॥** (भारत शांतिपर्व अ.१८९)

शूद्राच्या ठिकाणीं हें लक्षण असेल तर तो शूद्र नाहीं व ब्राह्मणाच्या ठिकाणीं तें नसेल तर तो ब्राह्मण नाहीं.

या सर्व वाक्यांवरून गुणकर्मानेंच वर्णव्यवस्था सिद्ध होत आहे. आतां पुनः जन्माचें जातीचें प्रमाण सांगतो. महाभारत अनुशासनपर्वाच्या २७ ते २९ या तीन अध्यायांत अशी कथा वर्णिली आहे की, युधिष्ठिरानें भीष्माला क्षत्रियादि तीन वर्णांनां ब्राह्मण्य कशानें प्राप्त होते असा प्रश्न केला असतां - *चांडालीपुत्र मतंगाला सद्गुणानें तप करूनहि ब्राह्मण्य इंद्रानें न देतां देवत्व दिले असा इतिहास सांगून जन्मानेंच ब्राह्मण्य येते असें भीष्मानें उत्तर सांगितले आहे व त्याच्याच पुढच्या म्हणजे ३० व्या अध्यायांत – *कोणी वीतहव्य राजा काशीराज प्रतर्दनाच्या भयानें भृगुमुनींच्या आश्रमांत पळून गेला असतां प्रतर्दन तेथें येऊन भृगुमुनीला तो वीतहव्य कोठें आहे मला त्याचा वध करावयाचा आहे असें विचारू लागला तेव्हां भृगुमुनींनी दयाविष्ट होऊन येथें क्षत्रिय कोणी नसून सर्व ब्राह्मण आहेत असे सांगितल्यामुळे या राजानीं ज्या अर्थी आपली जात सोडली आहे त्या अर्थी याला मी आतां मारीत नाही म्हणून प्रतर्दन निघून गेला; व तो वीतहव्यही त्या भृगूच्या नुसत्या वचनानेंच ब्राह्मण झाला. या ठिकाणीं जन्म व गुणकर्माचाहि संबंध दिसत नाहीं, कारण वीतहव्य जन्माचा क्षत्रिय व भयाने पळून गेला म्हणजे अधर्म केला, कांहीं सत्त्वानें पळाला नाहीं म्हणजे गुणकर्महि त्याचे आंगीं नव्हते, आणि भृगुमुनींहि सर्व ब्राह्मण आहेत म्हणून खोटेंच बोलले. (य११पू.३१९) दयागुणाचें रक्षण करून सत्यगुणाची त्यांनीं त्या वेळेला पर्वा केली नाहीं; तरी वीतहव्य त्यांच्या वचनानें ब्राह्मण झाला हें कसें झाले असेल तें होवो. - *याच पर्वाच्या तिसऱ्या व चवथ्या अध्यायांत बीज संस्कारानें काहींशी जन्माला व कांहींशी गुणकर्माला अनुसरून विश्वामित्रांच्या ब्राह्मण्यप्राप्तीची कथा वर्णिली आहे. व - *याच पर्वाच्या ४८ व्या अध्यायांत संकरजातीची उत्पत्ति जन्मानेंच वर्णिली आहे. याप्रमाणें महाभारतातं गुणकर्मानें व जन्मानें वर्णव्यवस्था दाखविणारी, अशा दोनही प्रकारचें वाक्य असून त्यांचा जन्म व गुणकर्म दोन्हीहि पाहिजेत असा समुच्चयात्मक अर्थहि होऊ शकत नाहीं, कारण शूद्राला देखील ब्राह्मण म्हणावे असा स्पष्ट अर्थ आहे. *मतंगमुनीला चांडाल योनींत उत्पन्न झाल्यामुळें ब्राह्मण्य मिळाले नाहीं ही भारतांत कथा आहे, तर त्याच्या विरुद्ध *कैवर्तकन्येचें ठिकाणीं व्यास उत्पन्न



होऊन ब्राह्मण झाले हीहि कथा आहेच. याप्रमाणें महाभारतांतील वर्णासंबंधानें माझ्या मनानें निर्णय न होणारा असा संशयात्मक विचार सांगितला.

आतां आश्रमासंबंधानें महाभारतांत काय विचार आहे तो पाहूं. अनुशासनपर्वाच्या दहाव्या अध्यायांत अशी कथा वर्णिली आहे कीं, हीन पुरुषाला उपदेश केला, असतां कांहीं दोष आहे काय? असा युधिष्ठिरानें भीष्माला प्रश्न केला असतां दोष आहे असें भीष्मानें उत्तर देऊन, एक कथा सांगितली.

कथा

कोणी एक शूद्र एका मुनीच्या आश्रमांत येऊन संन्यासदीक्षा मागूं लागला असतां संन्यासधर्माचें आचरण तुझ्याच्यानें होणार नाहीं, व संन्यासाचा तुला अधिकार नाहीं म्हणून तूं सेवाच कर असें सांगितलें; परंतु त्या मुनीचें त्यानें न ऐकून त्या मुनीप्रमाणें होम हवन व अतिथिसत्कार करूं लागला. तेव्हां त्याच्या त्या सद्वर्तनाला पाहून कोणी एक ऋषी तेथें येऊन तो शूद्र आपल्या कर्मांत चुकला असतांना त्याला त्या ऋषीनीं उपदेश केला. त्यामुळें त्या कर्मदोषानें शूद्र राजा झाला व ऋषी त्या कर्मदोषानें पुरोहित झाला. या कथेंत संन्यासाश्रमाचा शूद्रास अधिकार नाहीं असे स्पष्ट सांगितलें आहे, परंतु शूद्रानें विपरीत असें ब्राह्मणकर्म केले असतांहि अनर्थ प्राप्ति न होतां तो राजा कां झाला. (य११पू.३२०) ह्या कथेचा टीकाकारानें कांही निर्णय केला नाहीं. याप्रमाणें भारतांत संन्यासाचा शूद्रास अधिकार नसण्याची गोष्ट आहे. आतां शूद्रानीं संन्यास घ्यावा असें जें भारतांत वचन आहे तें सांगतो.

**शुश्रूषोः कृतकार्यस्य कृतसंतानकर्मणः ।**
**अभ्यनुज्ञातराजस्य शूद्रस्य जगतीपते ॥१२॥**

**टीका :- शुश्रूषोः वेदान्तेष्वनधिकारात्पुराणद्वारा आत्मानं श्रोतुमिच्छोः कृतकार्यस्य यावच्छरीरसामर्थ्यं सेवितत्रैवर्णिकस्य जातपुत्रस्य अभ्यनुज्ञातो राज्ञा इत्यभ्यनुज्ञातराजस्तस्य ॥१२॥**

**अल्पांतरगतस्यापि दशधर्मगतस्य वा ।**
**आश्रमाः विहिताः सर्वे वर्जयित्वा निराशिषम् ॥१३॥**

**टीका :- अल्पान्तरगतस्य आचारनिष्ठया त्रैवर्णिकसमस्य दशधर्मगतस्येति मत्तप्रमत्तादीन् प्रकृत्य दशधर्मं न जानंतीत्युक्तेरत्र योगधर्मानभिज्ञस्य ग्रहणं तस्यापि**

**आश्रमाः सर्वे विहिताः शूद्रोऽपि नैष्ठिकं ब्रह्मचर्यं वानप्रस्थं वा सकलविक्षेप-कर्मत्यागरूपं संन्यासं वाऽनुतिष्ठेदेव । निराशिषं शान्तदान्ते इत्यादि कल्याणगुणरहितम् ॥१३॥**

**भैक्षचर्यां ततः प्राहुस्तस्य तद्धर्मचारिणः ।**
**तथा वैश्यस्य राजेन्द्र राजपुत्रस्य चैव हि ॥१४॥**

**टीका :- भैक्ष्यचर्यां परिव्राज्यं तस्य शूद्रस्य तद्धर्मचारिणः तान् पूर्वोक्तान् स्वधर्मान् चरतीति तथा भूतस्य । तथा वैश्यस्य राजपुत्रस्य च भैक्ष्यचर्यां प्राहुरित्यन्वयः ॥१४॥** (भारत शांतिपर्व अ. ६३)

भावार्थ :- सेवा करणारा व गृहस्थाश्रम ज्याचा निपटला आहे व त्रैवर्णिकाप्रमाणें जो सदाचरणी आहे. मात्र थोडेंसेंच त्याच्यामध्यें अंतर राहिलें आहे (हें अंतर वेदाधिकाराचें विवक्षित असावें, परंतु टीकाकारानें दिलें नाही) अशा शूद्राला ब्रह्मचर्य गृहस्थाश्रम वानप्रस्थ संन्यास हे सर्व आश्रम विहित आहेत किंवा सेवादिक धर्म आंगीं नसूनहि मत्तप्रमत्तादिक दशधर्म ज्याचे गेले आहेत त्याहि शूद्राला सर्व आश्रम विहित आहेत असा श्लोकांत विकल्प सांगितला असून टीकाकारानींहि असाच विकल्प सांगितला आहे. याप्रमाणें भारतामध्यें अधिकार व अनधिकार असा दोन्ही प्रकारचा आश्रमाविषयीं विचार आहे. (य११पू.३२१) भारतामध्यें शूद्राला संन्यासाधिकार जो सांगितला तो श्रुत्यनुसार आहे. त्या विषयीं ही श्रुति प्रमाण आहे.

**''वैराग्यमासाद्य तु पापयोनिः शूद्रोऽपि संन्यासमुपेत्य मोक्षम् ।**
**प्राप्नोति पापं तु विधूय विप्रः संन्यासमेत्य ननु मुच्यते वै ॥** (वैराग्यभास्कर पा. ३४)

**खैर तरु जाहला । आणि अग्निसंगें आला ।**
**तरी जळितया चंदनासवें तयाला । वाळिजे कायी ॥२१॥**
**तैसा पापाचेनि बळें । जन्म जाहला शूद्रमेळें ।**
**परी संसारदुःखें डोळे । उघडले ज्याचे ॥२२॥**
**तो पापयोनिहि शूद्र । परी विरक्त जेवि महारुद्र ।**
**तरी संन्यास घेवोनि निर्मुद्र । मोक्षहि पावे ॥२३॥**
**एवं संन्यासाचिया महती । अगतिकांहि[२] होय गति ।**
**तेथ सांगणे ब्राह्मणाप्रति । घडे केवि ॥२४॥**
**जन्मजातिपक्ष घेऊन । शूद्रे संन्यास घ्यावा अचिन्ह ।**
**ऐसा या श्रुतीचा अर्थ आपण । वैराग्यभास्करकार करिती ॥२५॥**
**सचिन्ह संन्यास घेतां । चिन्हधारणीं वेदमंत्रावश्यकता ।**
**वेदाधिकार तत्वता । शूद्रास नाहीं ॥२६॥**
**म्हणोनी जें वाक्य शूद्राप्रति । संन्यास सांगे तें अचिन्हरीति ।**
**सचिन्ह संन्यासाधिकृति । वेदाधिकाराभावास्तव शूद्रास नसे ॥२७॥**
**एवं जन्मजातिपक्षीं श्रुत्यर्थु । आतां गुणकर्मपक्षाचा सिद्धान्तु ।**
**तोहि ऐकावा यथार्थु । संशय द्दढ होवावया ॥२८॥**

श्रुतींत ''वैराग्यमासाद्य'' आणि ''संन्यासमुपेत्य'' अशीं दोन पदें आहेत. वैराग्य मिळवून आणि संन्यास घेऊन असा त्या पदांचा अर्थ आहे. अचिन्हसंन्यास जर पदांत विवक्षित असेल तर ''वैराग्यमासाद्य'' एवढ्याच पदानें निर्वाह होतो; कारण वैराग्य झालें म्हणजे संन्यास झालाच. मग पुनः संन्यास पद उच्चारण्याची श्रुतीला आवश्यकता काय? कारण अचिन्हसंन्यास वैराग्यापेक्षां दुसरा काय असावयाचा आहे. शूद्रास कांहीं यज्ञोपवितादि चिन्हें नाहींत कीं त्यांचा त्याग करण्याकरितां पुनरुच्चारलेलें संन्यास पद सार्थ होईल. म्हणून तें संन्यास पद विधिपर तरी मानलें पाहिजे किंवा वेदांत पुनरुक्तिदोष तरी मानला पाहिजे. दुसरा पक्ष जर संमत नसेल तर प्रथमपक्षीं (य११पू.३२२) सचिन्हसंन्यासाचीच शूद्राला प्राप्ति होते.

आतां अवैदिकत्व जे कारण सांगितलें त्याचा ''एषा ब्राह्मी सरस्वती'' इत्यादि भारतवचनानें परिहार होतो. जन्मपक्षांतहि वेदमंत्रावांचून तूष्णीम्[३] किंवा पुराणमंत्रानें तुलापुरुषदानादिवत् संन्यासचिन्हधारणहि शूद्राला करविणें शक्य आहे. पुनः विदुराच्या संन्यासाविषयीं महाभारतांत अशी कथा आहे. ज्यावेळी विदुरानें आपल्यामध्यें प्रवेश केलेला धर्मराजानें पाहिला त्या समयींचे हे दोन श्लोक आहेत.

**''धर्मराजा च तत्रैनं संचिस्कारयिषुस्तदा ।**
**दग्धुकामोऽभवद्विद्वानथ वागभ्यभाषत ॥**
**भो भो राजन् न दग्धव्यमेतद्विदुरसंज्ञकम् ।**
**कलेवरमिहैवंते धर्म एष सनातनः ॥**

**लोकाः सांतानिका नाम भविष्यन्त्यस्य भारत ।**
**यतिधर्ममवाप्तोसौ नैव शोच्यः परंतप ॥३३॥''** (भारत आश्रमपर्व अ.२६)

भावार्थः- धर्मराजाला त्या विदुराच्या प्रेताचा दाह करण्याची इच्छा करणारा पाहून देववाणी म्हणाली कीं, वत्सा तूं या विदुरांच्या देहाचा दाह करूं नकोस; कारण यांना शाश्वत लोक मिळणारे असून यतिधर्म यांच्या पदरीं पडला आहे. या श्लोकांत वर्णन केलेला विदुरांचा संन्यास अचिन्हच असला पाहिजे; कारण सचिन्हयतीचा दाह करूं नये असें युधिष्ठिराला देववाणीनें सांगितलें पाहिजे असें नाहीं. याप्रमाणे जन्मपक्षी म्हणतात. गुणकर्मपक्षीं परमहंस जसा अचिन्ह असतो तसा विदुर आहे कीं नाहीं, असा संशय युधिष्ठिराचे ठिकाणींहि संभवतो म्हणून देववाणीनें सांगितलेलें तें योग्यच होय. पुनः जन्मपक्षी म्हणतात ''लोकाः सांतनिका नाम'' या पदावरून विदुराला गतिलिंग आहे, परमहंसाला गतिलिंग नाही. त्यावर गुणकर्मपक्षी प्रतिबद्ध ज्ञानी परमहंसालाहि गतिलिंग सांगून समाधान करितात. तथापि विद्वानावांचून परमहंसाचा अधिकार नसल्यामुळें याठिकाणीं जन्मपक्षाचाच अर्थ बरोबर आहे असें वाटतें; आणि उदाहृत श्रुतिसंबंधानें गुणकर्मपक्षाचा अर्थ बरोबर वाटतो. (य११पू.३२३)

पुनः भारतांतच चारी वर्णांला तपाचा अधिकार आहे, असा एक श्लोक आहे; तोहि येथें प्रमाण देतों.

**तपः सर्वगतं तात हीनस्यापि विधीयते ।**
**जितेंद्रियस्य दांतस्य स्वर्गमार्गप्रवर्तकम् ॥१४॥ (भारत शांतिपर्व अ. २९५)**

भावार्थः- तप हें सर्वसाधारण असून, जितेंद्रिय व दममान अशा नीचांनाहि तें करितां येत असून, तें स्वर्गाला देणारें आहे.

टीकाकारांनीं तप शब्दाचा अर्थ दम, दया, दानहि असा केला आहे. तो जितेंद्रिय इत्यादि श्लोकांतील विशेषणांच्या मानानें पुनरुक्त असल्यामुळें बरोबर नाहीं; कारण तपाधिकारियाचीं हीं विशेषणें सांगितलीं आहेत. अर्थांतच त्याहून तप म्हणून निराळेंच करावयाचें श्लोकांत विवक्षित असलें पाहिजे. श्लोकांतील ''हीनस्य'' या पदाचा अर्थ टीकाकारानीं ''शूद्रादेरपि'' म्हणजे शूद्र चांडाल इत्यादिकांनां देखील असा केला आहे. ह्याप्रमाणें भारतांत तपाचा विचार असून आतां जपाचा विचार महाभारतांत कसा आहे तो पाहूं.

**यदस्मिन्नियतं लोके सर्वं गायत्रिरुच्यते ।**

असें महाभारताच्या अश्वमेधपर्वांतर्गत अनुगीतापर्वाच्या ४४ व्या अध्यायांतील ६ व्या श्लोकाच्या उत्तरार्धानें म्हटलें आहे, व जें कांहीं ह्या लोकांत जप्य आहे तें गायत्रिच आहे असा त्याचा अर्थ आहे. या श्लोकाच्या टीकेंतहि ब्राह्मणापासून म्लेच्छापर्यंत जें म्हणून कांहीं सांगितलें आहे तें सर्व गायत्रिपदाचा अर्थ आहे असें म्हटलें आहे. एवं महाभारतांतील सर्व संशयात्मक वाक्यांचा निर्णय विकल्पानें होतो; कारण मनु असेंच म्हणतात.

**श्रुतिद्वैधं तु यत्रस्यात्तत्र धर्मावुभौ स्मृतौ ॥**
**उभावपि हि तौ धर्मौ सम्यगुक्तौ मनीषिभिः ॥''**

दोन श्रुति सांगत असल्यास दोन्ही धर्मच आहेत, असा या श्लोकाचा अर्थ आहे. यावरून जसें ज्याला वाटेल तसें त्यानें करावें. याज्ञवल्क्यांनीं याविषयीं असेंच म्हटलें आहे तें पहा. (य११पू.३२४)

**''श्रुतिस्मृती सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।**
**सम्यक् संकल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम् ॥''**

**मिताक्षरा :-**

**इदानीं धर्मस्य ज्ञापकहेतूनाह ।**
**श्रुतिर्वेदः स्मृतिधर्मशास्त्रं तथा च मनुः ।**
**श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिरिति ।**
**सदाचारः शिष्ठानामाचारः अनुष्ठानं नाशिष्ठानां स्वस्य चात्मनः प्रियं वैकल्पिके विषये यथा गर्भाष्टमेऽष्टमे वाब्दे इत्यादिष्वात्मेच्छैव नियामिका सम्यक्संकल्पाज्ज्ञातः शास्त्राविरुद्धः कामः ।**
**यथा मया भोजनव्यतिरेकेणोदकं न पातव्यमिति एते धर्मस्य मूलं प्रमाणं ।**
**एतेषां विरोधेन पूर्वपूर्वबलियस्त्वम् ।**

भावार्थः- (१) वेद (२) धर्मशास्त्रें, (३) शिष्टांचा आचार, (४) ज्याच्या विषयीं विकल्प असेल अशा धर्मानुष्ठानांत आपणास प्रिय वाटेल तें, (५) उत्तम संकल्पापासून उत्पन्न झालेला व शास्त्राच्या विरुद्ध नसलेला काम; अशीं पांच धर्माचीं प्रमाणें आहेत, पण यांच्यामध्यें परस्पर विरोध आला असतां त्यांतले पूर्व पूर्व प्रमाण बलवान् आहे असें जाणावें.

म्हणूनच दोन्ही वाक्यांतील व्यवस्था विकल्पानें गुणपर किंवा जन्मपर मानणें फारसें दुर्घट नाहीं. **''वर्णवादांत संशय आहे म्हणण्यापेक्षां विकल्प आहे म्हणणें अधिक शोभेल.''** यावर असा एक संशय येतो कीं, अहिंसा सत्य अस्तेय इत्यादि धर्म सर्ववर्णसाधारण आहेत; पण असें म्हणणें म्हणजे विशेषवर्णाचे धर्म निराळे आहेत असें होतें, परंतु जाबालाच्या सत्य बोलण्यावरून ज्या अर्थी गौतमानें ब्राह्मण ठरविलें त्या अर्थी सत्य हा गुण साधारणच धर्म नसून विशेष धर्महि ठरतो. हा विचार पुढें गीताश्लोकविचारप्रसंगी येणारच आहे. शिवाय,

**''अनृतं चातिवादश्च पैशून्यमतिलोभता ।**
**नैकृतिश्चाभिमानश्च जातितः शूद्रमाविशत् ।।**

या स्मृतीवरूनहि अहिंसादिक सर्वसाधारणधर्म संभवत नाहींत. सर्व कांहीं शूद्राला दिलेल्या शिव्या व त्याच्या विषयीं अनधिकार सांगणाऱ्या स्मृति गुणकर्मजातिपक्षीं नियत ठरतात, आणि जन्मजातिपक्षीं अनियत ठरतात. पुनः याज्ञवल्क्य स्मृतींतच असें म्हटलें आहे कीं,

**''जात्युत्कर्षे युगे ज्ञेयः पंचमे सप्तमेऽपि वा ।**
**व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चाधरोत्तरम् ।।९६।।''**

परश्वादिवर्णांच्या कन्यांशीं लग्न लावून त्यांच्या पोटीं कन्याच होत गेल्या तर (य११पू.३२५) त्यांच्याशी लग्न लावून सातव्या पिढीला लग्न लावणाऱ्या ब्राह्मणापासून झालेला पुत्र ब्राह्मण होतो. वैश्यापासून सहाव्या पिढीला होतो आणि क्षत्रियापासून पांचव्या पिढीला होतो. याचप्रमाणें दुसरें कारण सांगतात. ब्राह्मणवर्ण शूद्रकर्म करूं लागला व करीत राहिला तर तोहि सातव्या पिढीला शूद्र होतो. याप्रमाणें जाति खालवर जात असतात म्हणजे खालच्या जातिहि चांगलें कर्म करूं लागल्यास सातव्या पिढीला ब्राह्मण होतील, पण हा श्लोकाचा सरळ अर्थ आहे. हा अर्थ सोडून देऊन चवथ्या चरणासाठींच मुद्दाम ओढून संकर जातीचें प्रकरण मध्येंच घातलें आहे तें चिंत्य आहे. याप्रमाणें वैकल्पिक निर्णय करावाच लागतो. किंवा महाभारतांतच याचा निर्णय करून ठेविला आहे तो असा--

**''सर्वोपायैस्तु लोभस्य क्रोधस्य च विनिग्रहः ।**
**एतत्पवित्रं ज्ञानानां तथा चैवात्मसंयमः ।।९।।''**



**वार्यौ सर्वात्मना तौ हि श्रेयोघातार्थमुच्छ्रितौ ।।१०।।**
**नित्यं क्रोधाच्छ्रियं रक्षेत्तपो रक्षेच्च मत्सरात् ।**
**विद्या मानापमानाभ्यामात्मानं च प्रमादतः ।।११।।**

भावार्थः - सर्व उपायांनीं लोभाचा व क्रोधाचा निग्रह करावा, इंद्रियनिग्रह करावा, हेंच सर्व पवित्रांतील पवित्र ज्ञान आहे. क्रोधापासून कल्याणाचें रक्षण करावें, मत्सरापासून तपाचें रक्षण करावें, मान आणि अपमान यांपासून विद्येचें रक्षण करावें आणि प्रमादापासून स्वतःचें रक्षण करावें.

ह्या श्लोकांचा भाव असा आहे कीं, जन्मानें किंवा गुणकर्मानें वर्ण आहेत ह्या वादांत कांहीं अर्थ नाहीं; सद्गुण मिळवून घ्यावेत; व हाच भारतांतील परस्परविरुद्ध वाक्यांसंबंधीं निर्णय मला मूर्खाला पटण्यासारखा आहे. गीता सोडून हा महाभारताचा विचार केला आहे.

आतां गीता व भागवत ह्याचा विचार करूं. गीतेंत ''चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः'' मी गुणकर्मानें चार वर्ण निर्माण केले असें भगवानानें म्हटलें असून ह्या श्लोकावर टीका करतांना भाष्यकारांनीं व तातांनीं[(४)] उदासीनपर, (य११पू.३२६) कांहीं टीकाकारांनीं जन्मपर व समन्वयभाष्यकारादि टीकाकारानीं गुणकर्मपर अर्थ केला आहे. तो संपूर्ण त्या त्या टीकेंत पहावा. ग्रंथविस्तरभयास्तव येथें देत नाहीं. ''मया सृष्टं'' या पदाचा अर्थ जन्मपक्षीं तर लावतातच पण त्या त्या गुणकर्मी व्यक्ति देखील परमेश्वरच उत्पन्न करितो असा गुणकर्मपक्षींहि अर्थ होतो. गीतेच्या १८व्या अध्यायांत भगवान् म्हणतात -

**''ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।।४१।।**
**शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।।४२।।**
**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।।४३।।**
**कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।।४४।।''**

भावार्थ :- ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र ह्या चाऱ्ही वर्णांची कर्मे स्वभावापासून उत्पन्न झालेल्या गुणामुळें निरनिराळीं झालीं आहेत. मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह, सात्त्विक तप किंवा स्वधर्मानुष्ठान, शुद्धता, क्षमा, सरळपणा, शास्त्राचें ज्ञान, व अनुभव किंवा अनुभवापर्यंत झालेलें साधन, वेदावर आणि परमार्थावर श्रद्धा हें ब्राह्मणाचें स्वाभाविक लक्षण आहे. इतर श्लोकांचा अर्थ स्पष्ट आहे किंवा एकाद्या गीतेच्या टीकेवरून समजून घ्यावा.

ह्या ठिकाणीं भाष्यकारांनीं जन्मजातिवादच मानला असून एक वाक्य गुणकर्माला लागूं पडेल असें म्हटलें आहे तें येथें देतों.-

**ननु शास्त्रप्रविभक्तानि शास्त्रेण विहितानि ब्राह्मणादीनां शमादीनि कर्माणि ।**
**कथमुच्यते सत्त्वादिगुणप्रविभक्तानीति ।**
**नैष दोषः । शास्त्रेणापि ब्राह्मणादीनां सत्त्वादिगुणविशेषापेक्षयैव शमादीनि कर्माणि प्रविभक्तानि । न गुणानपेक्षयेति ।**

भाष्यार्थ :- पूर्वपक्षी म्हणतो शास्त्रानें वर्णाचा भेद सांगितला असून शास्त्रानींच ते मानले पाहिजेत तेव्हा सत्त्वादि गुणांच्या भेदाने वर्णभेद कसा सांगतां? – यावर उत्तरपक्षी म्हणतो, ही शंका घडत नाही. (य११पू.३२७) सत्त्वादि गुणांच्या भेदाची अपेक्षा करूनच शास्त्रांनीं वर्णकर्मांचा भेद साांगितला आहे. गुणांची अपेक्षा न करून स्वतंत्र सांगितला नाहीं ऐसें.

असा भाष्यार्थ आहे व हें भाष्य शंकराचार्यांनींच सूत्रभाष्यांत सर्वथा मानलेल्या जन्मजातिवादाशीं असें विरुद्ध आहे कीं, गुणांच्या अपेक्षेनेंच जर शास्त्र वर्णव्यवस्था सांगतें तर ती वैय्यक्तिक झालीच पाहिजे. याप्रमाणें शमदमादिक जीं ब्राह्मणाची लक्षणें गीतेंत सांगितलीं आहेत, ती भागवतांत सर्वच वर्णांची सांगितलीं आहेत तो श्लोक असाः-

**''अहिंसा सत्यमस्तेयमकामक्रोधलोभता ।**
**भूतप्रियहितेहा च वर्णोऽयं सार्ववर्णिकः ॥२१॥''**

(भागवत स्कं. ११ अ. १७)

भावार्थः- कोणाचा प्राण न घेणें, खरें बोलणें, चोरी न करणें, इच्छा न करणें, द्वेष न करणें, परिग्रह न करणें, प्राण्यांचें प्रिय करणें व त्यांच्या हिताची इच्छा करणें हा सर्व वर्णांचा धर्म आहे.



हीं दोन्ही भगवंताचींच वाक्यें आहेत. एक अर्जुनाला सांगितलें आहे, दुसरें उद्धवाला सांगितलें आहे; दोहोंचा अर्थ परस्पराला विरुद्ध आहे. किंवा भागवतांतल्या भागवतांतच विरोध आहे तो असा कीं, जे या २१ व्या श्लोकांत सर्व वर्णांचें धर्म सांगितलें आहेत तेच धर्म याच अध्यायाच्या १६ व्या श्लोकांत बाह्मणांचेच विशेष सांगितले आहेत, व त्या श्लोकांचा अर्थ गीतेंतील १८ व्या अध्यायाच्या ४२ व्या श्लोकाप्रमाणेंच आहे. ह्याचा निर्णय – ''सर्व वर्णानें शुद्ध रहावे व सर्व वर्णांला एकच गति होते, हें होणार नाहीं तर ब्राह्मणानें तरी निदान हे धर्म पाळिलेच पाहिजेत'' असा माझ्या बुद्धीनें होतो; किंवा वर जो भारताचा निर्णय केला आहे तसाच ह्या वाक्यांचा निर्णय होतो. आतां वर्णव्यवस्थेसंबंधानें भागवतांत आणखी काय म्हटलें आहे तेंहि सांगतों.

**''आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इति स्मृतः**
**कृतकृत्याः प्रजा जात्या तस्मात्कृतयुगं विदुः ॥१०॥''**(भागवत स्कं.११ अ.१७)

भावार्थः- पूर्वी कृतयुगामध्यें हंस नांवाचा एकच वर्ण होता. इतर अर्थ स्पष्ट आहे. हें वाक्य भारतांतील - ''न विशेषोऽस्ति वर्णानाम्'' या वाक्याप्रमाणेंच आहे, (य११पू.३२८) व त्याचा अर्थ सामान्यतः गुणकर्मपर लावतां येतो, व जन्मजातिपरहि लावतां येतो. याच अध्यायाचा १३ वा श्लोक असा आहे.

**''विप्रक्षत्रियविट्शूद्रा मुखबाहूरुपादजाः ।**
**वैराजात् पुरुषाज्जाता य आत्माचारलक्षणाः ॥१३॥''**

भावार्थः- विराट्पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रिय, उरुपासून वैश्य आणि पायांपासून शूद्र झाले. हा श्लोक पुरुषसूक्ताप्रमाणें सांगत असून याचा अर्थ जन्मजातिपर आहे. पुनः भागवत सप्तम स्कंधाच्या ११ व्या अध्यायांतील ३५ व्या श्लोकांत असें म्हटलें आहे.

**यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यंजकम् ।**
**यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत् ॥३५॥**
**श्रीधरी :- शमादिभिरेव ब्राह्मणादि व्यवहारो मुख्यो न जातिमात्रादित्याह ।**
**यस्येति । यद्यदि अन्यत्र वर्णान्तरेऽपि दृश्येत तद्वर्णान्तरं तेनैव लक्षणनिमित्तेनैव वर्णेन विनिर्दिशेत् ।**
**न तज्जातिनिमित्तेनेत्यर्थः ॥३५॥**

भावार्थः- ''शमादिकानेंच मुख्यतः ब्राह्मणादि व्यवहार होतो, केवळ जातीनें नाहीं'' असें सांगतात. ज्या मनुष्याचें जें वर्णचिन्ह सांगितलें आहे तें जर दुसऱ्या ठिकाणी म्हणजे अन्य वर्णाच्या ठिकाणी दृष्टीस पडेल तर तेवढ्या त्या लक्षणामुळेंच त्याला दुसऱ्याचा न समजून ज्या वर्णाचें तें लक्षण असेल त्याच वर्णाचा समजावें व त्याच्याशीं तसाच व्यवहार करावा.

आतां या श्लोकावर वल्लभाचार्यमति कोणी गिरिधर त्यांनीं बालप्रबोधिनी नांवाची टीका केली आहे तेहि येथें लिहितो.

**ननु ब्राह्मणादिकुले जाते एव ब्राह्मणादिव्यवहारदर्शनात् कथं शमादीनां तल्लक्षणत्वमित्याशंक्य शमादिभिरेव ब्राह्मणादिव्यवहारो मुख्यस्तत्तकुलजातत्वेन तु तत्तव्द्यवहारो भ्रांतिमूलत्वाद्गौण एवेत्याह ।**

**यस्य पुंसो ब्राह्मणादेर्ब्राह्मणत्वादिवर्णाभिव्यंजकं यच्छमादिरूपं लक्षणं प्रोक्तं तत्तत् यदि वर्णान्तरेऽपि दृश्येत तर्हि तद्वर्णान्तरं तेनैव लक्षणनिमित्तेनैव वर्णेनैव विनिर्दिशेत् व्यवहरेत् न कुलमात्रेणेत्यर्थः ।**

**अत्रेदं बोध्यम् ब्राह्मणत्वादि न जातिः तल्लक्षणाभावात् एकत्वे नित्यत्वे च सत्यनेकानुगतत्वं हि तल्लक्षणम् ।** (य११पू.३२९)

**''शूद्रीं शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् ।**
**तस्यां तनयमुत्पाद्य ब्राह्मण्यादेव हीयते ॥१॥**
**शूद्रीहस्तेन यो भुंक्ते मासमेकं निरंतरम् ।**
**जीवमानो भवेच्छूद्रो मृते श्वानश्च जायते ॥२॥**
**वेदाक्षरविचारेण ब्राह्मणीगमनेन च ।**
**कपिलाक्षीरपानेन शूद्रश्चांडालतां व्रजेत् ॥३॥**

**इत्यादौ ब्राह्मणत्वादिहान्यादि श्रूयते ।**

**तच्च हान्यादिगमनागमनरूप नाशो वा नित्यस्य व्यापकस्य च जातिपदार्थस्य न संभवति ।**

**मनुष्यत्वगोत्वाश्वत्वादौ व्यक्तौ सत्यां हानाद्यदर्शनात् ।**

**जातिव्यक्त्योः सर्वत्र सहचारनियमदर्शनाच्च ।**

**तस्मात्काचिद्देवतैव ब्राह्मणादिः ।**

**तदुक्तं द्वितीयस्कंधे ''ब्रह्माननं क्षत्रभुज'' इत्यस्य व्याख्यायां सुबोधिन्यां तदभिव्यंजकं**



**न शरीरं मनुष्यशरीरस्यैकाकारत्वेन मनुष्यमात्रस्यैकवर्णत्वापत्तेः ।**

**नच ब्राह्मणाद्ब्राह्मण्यां जातत्वं ब्राह्मणत्वस्याभिव्यंजकमित्याशंक्यं चतुर्मुखे ब्रह्मणि नाभिकमलजातत्वेन व्यभिचारात् ।**

**तत्पुत्रेषु मानसेषु व्यभिचारात् ।**

**मरिच्यादिषु तद्देहजातत्वेन व्यभिचारात् ऋषभपुत्रा एकाशीतिर्ब्राह्मणा बभुवुरिति पंचमे उक्तत्वात् ।**

**तेषां क्षत्रियपुत्रत्वेन तेषु तदभावाच्च ।**

**न च तद्वर्णसंकरस्यैव तत्तद्वर्णाभिव्यंजकमिति शंकनीयम् ।**

**तत्तत्संस्कारस्य तत्तद्वर्णनिश्चयपूर्वकत्वात् ।**

**अन्यथा संस्काराद्वर्णनिर्णयो वर्णनिर्णयाच्च संस्कार इत्यन्योन्याश्रयापत्तेः अन्यवर्णस्य अन्यवर्णसंस्कारे कृते तद्वर्णत्वापत्तेश्च ।**

**अतः सुष्टूक्तं शमादिनैव ब्राह्मणत्वादिनिर्णय इति वैशंपायनेनापि युधिष्ठिरं प्रत्येवमेवोक्तम् -**

**''सर्वे वै योनिजा मर्त्याः सर्वे मूत्रपुरीषिणः ।**
**एकेन्द्रियेन्द्रियार्थाश्च तस्माच्छीलगुणैर्द्विजाः ॥१॥**
**शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणो भवेत् ।**
**ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात्प्रत्यवरो भवेत् ॥२॥**
**पंचेन्द्रियार्णवं घोरं यदि शूद्रोऽपि तीर्णवान् ।**
**तस्मै दानं प्रदातव्यमप्रमेयं युधिष्ठिरेति ॥३॥**

भावार्थः- अहो! ब्राह्मणादि कुलांतच उत्पन्न झाल्यामुळें ब्राह्मणादि व्यवहार होतो, शमादिकानें होतो असें कसें म्हणतां ? म्हणून सांगतात – शमादिकानें ब्राह्मणादि व्यवहार मुख्य असून जाति मात्र भ्रांतिमूलक व गौण आहे. कारण ब्राह्मणादि जाति मुळीं सिद्धच होत नाहीं. कां म्हणाल तर जातीचें लक्षणच ब्राह्मणादिकांचे ठिकाणीं नाहीं. कारण एकत्व, नित्यत्व आणि अनेकानुगतत्व हें जातीचें लक्षण आहे. अर्थातच ती (य११पू.३३०) व्यापक असल्यामुळें तिचा नाश व उत्पत्ति होणें संभवनीय नाही. कांहीं व्यक्ति नष्ट झाल्या तरी मनुष्यपणा, गायपणा इत्यादि जाति नष्ट झाल्यासारख्या दिसत नाहींत, आणि ब्राह्मणादि जातींचा नाश तर स्मृति सांगतात. शूद्रस्त्रीला मंचकावर घेऊन जो निजतो तो

ब्राह्मण अधोगतीला जातो. तिच्या ठिकाणीं जो पुत्र उत्पन्न करितो तो तर याच जन्मीं ब्राह्मण्यापासून भ्रष्ट होतो. जो शूद्रस्त्रियेच्या हातचा पाक करून एक महिनाभर खातो तो जीवंत असतांनाच शूद्र होतो व मेल्यानंतर श्वान होतो. वेदाच्या अक्षराचा विचार केला असतां, ब्राह्मणस्त्रीशीं गमन केलें असतां व काळ्या गाईचें दूध प्याला असतां शूद्र चांडाल होतो. इत्यादि स्मृतीमध्यें ब्राह्मणपणादिकांचा नाश सांगितला आहे. सुबोधिनीमध्यें देखील ब्राह्मणत्वादि शरीर नाहीं, सर्व मनुष्य एकाकार दिसत असल्यामुळें एकाच वर्णाचे होतील असें म्हटलें आहे. आतां ब्राह्मणापासून ब्राह्मणीच्या पोटीं उत्पन्न झालेलाच ब्राह्मण म्हणावा हें म्हणणेंहि बरोबर होणार नाहीं. कारण ब्रह्मदेव ब्राह्मण असून तो नाभीकमलापासून झाला आहे, त्याचे पुत्रहि ब्राह्मण असून ते मनापासून झाले आहेत व मरिच्यादिक ब्राह्मण नुसते ब्रह्मदेवाच्या देहापासूनच झाले आहेत. याप्रमाणें देवसृष्टींतील विचार असून मनुष्यसृष्टींत देखील ८१ ऋषभदेवाचे पुत्र ब्राह्मण झाले अशी कथा पंचम स्कंधांत आहे. ते पुत्र अर्थातच क्षत्रिय होते.

आता त्या त्या वर्णाचा जो संकर आहे त्या संबंधींच ही सर्व वाक्यें आहेत असें कोणी म्हणूं नये; कारण तसें झाल्यास संस्कारानें वर्णनिश्चय करावा कीं वर्णनिश्चयानें संस्कार करावा हा अन्योन्याश्रय होतो. किंवा कोणत्याहि वर्णाचा संस्कार केला असतांना त्याला दुसऱ्या वर्णाची प्राप्ति होते म्हणून शमादिगुणच वर्णाचे द्योतक आहेत हेंच सांगणें उत्तम आहे व तसेंच वैशंपायनानीं युधिष्ठिराला सांगितलेंहि आहे तें येणें प्रमाणें :-

सर्व मृत्युलोकांतील पुरुष योनीपासूनच उत्पन्न होतात. मल व मूत्र सर्व लोकांच्या शरीरांत समानच असतें. इंद्रिय व विषय सर्वाचे समानच असतात. म्हणून गुण व शीलानेंच ब्राह्मण होतो, जन्मानें होत नाहीं. शूद्र जर गुण संपन्न असेल तर तोहि ब्राह्मण होतो आणि ब्राह्मण जर क्रियारहित असेल तर तो शूद्रापेक्षांहि नीच होतो. पांच इंद्रियरूपी (य११पू.३३१) भयंकर समुद्र जो तरून गेला आहे तो शूद्र असला तरी हे युधिष्ठिरा! त्याला पुष्कळ दान द्यावें.

याप्रमाणें भागवतांत गुणकर्मानें वर्णव्यवस्थेसंबंधानें वाक्य असून ''जन्मना ब्राह्मणो गुरुः'' इत्यादि जन्मजातीचींहि वाक्यें आहेत. पुनः -

**''ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहूराजन्यः कृतः**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत''**

मुख हें याचें ब्राह्मण असून बाहू क्षत्रिय, मांड्या वैश्य आणि पायांपासून शूद्र झाले अशी पुरुषसूक्तांत १२ वी ऋचा आहे. तिचें भाष्य सायणाचार्यांनीं असें केलें आहे:-

**''इदानीं पूर्वोक्तप्रश्नानामुत्तराणि दर्शयति अस्य प्रजापतेर्ब्राह्मणो**
**ब्राह्मणत्वजातिविशिष्टः पुरुषो मुखमासीन्मुखादुत्पन्न इत्यर्थः ।**
**सोऽयं राजन्यः क्षत्रियत्वजातिविशिष्टः स बाहुकृतो बाहुत्वेन निष्पादितो बाहुभ्यामुत्पादित इत्यर्थः ।**
**तत्तदानीमस्य प्रजापतेर्यद्यावूरू तद्रूपो वैश्यः संपन्न ऊरूभ्यामुत्पादित इत्यर्थः ।**
**तथाऽस्य पद्भ्यां पादाभ्यां शूद्रः शूद्रत्वजातिमान्पुरुषोऽजायत इयं च मुखादिभ्यो ब्राह्मणादीनामुत्पत्तिर्यजुःसंहितायां सप्तमकांडे ''स मुखतस्त्रिवृतं निरमिमीत'' इत्यादौ विस्पष्टमाम्नाता ।**
**अतः प्रश्नोत्तरे उभे अपि तत्परत्वेनैव योजनीये'' ॥१२॥**

भावार्थः- ही ऋचा पूर्वीच्या प्रश्नाचीं उत्तरें देते. ब्राह्मणत्वजातिमान् पुरुष या प्रजापतीच्या मुखापासून उत्पन्न झाला. क्षत्रियत्वजातिमान् बाहूपासून, वैश्यत्वजातिमान् मांड्यांपासून आणि शूद्रत्वजातिमान् पायांपासून उत्पन्न झाला. अशीच उत्पत्ति यजुर्वेदाच्या सातव्या कांडांत स्पष्ट आहे. म्हणून या श्रुतीचाहि जन्मजातिपरच अर्थ घ्यावा.

याप्रमाणें वैदिकलिंगानें जन्मानेंच जाति सिद्ध होतें; परंतु या मंत्राचें उपबृंहण,

**ब्रह्माननं क्षत्रभुजो महात्मा विड्रूरुरंघ्रिश्रितकृष्णवर्णः ।**
**नानाभिधाभिज्यगणोपपन्नो द्रव्यात्मकः कर्मवितानयोगः॥३८॥**(भागवत स्कं.२अ.१)

या श्लोकानें केलें आहे; व ब्राह्मण ज्याचें मुख, क्षत्रिय बाहू, ऊरू वैश्य,आणि पाय शूद्र आहेत अशा प्रकारचा हा परमात्मा यज्ञस्वरूप आहे असा या श्लोकाचा भावार्थ आहे. अन्य श्लोकपदार्थ मला संस्कृताच्या अभावामुळें समजला नाहीं (य११पू.३३२) परंतु न समजलेल्या पदावरूनच कोणी दुसऱ्या प्रकारच्या अर्थाचा आग्रह करील तर तो मी मानणार नाहीं. असो, या श्लोकावर

जी वल्लभाचार्यांची सुबोधिनी नामक टीका आहे. ती उपबृंहणाची स्पष्ट करणारी म्हणूनच उदाहरण घेतलेल्या पुरुषसूक्तमंत्राचीहि स्पष्ट करणारी आहे आणि थोडीशी न्यायानुग्रहीत आहे; एवढ्याकरितां ती येथें देतों.

**ब्रह्मभावः कश्चित् धर्मः यस्मिन्विद्यमाने ब्राह्मणशब्दवाच्यो भवति पुरुषः ।**
**ब्राह्मण्यापरनाम ब्राह्मण्यं न जातिः व्यक्तिसद्भावेऽपि तस्यापगमात् ।**
**ब्राह्मण्यादेव हीयत इति वाक्यानुरोधात् वृत्त्यन्तरकल्पनायां प्रमाणाभावात् नियतव्यंजकाभावाच्च ।**
**ब्राह्मण्यां ब्राह्मण्यजातत्वं चतुर्मुखे तत्पुत्रेषु च अव्यापकं ऋषभपुत्रेषु एकाशीतिर्ब्राह्मणा बभूवुरिति वाक्याच्च ।**
**तस्माच्छास्त्रं बहुवाक्यविरोधात् ।**
**ब्राह्मण्यं काचिद्देवता सा यस्मिन् देहे अभिव्यक्ता भवति स ब्राह्मण इत्युच्यते ।**
**अत एव शापादिना शूद्रत्वं चांडालत्वं अनुग्रहेण ब्रह्मत्वमिति सापोधतयनेन(?) देहं समायाति ।**
**तदा बहूनि वाक्यानि संगच्छन्ते ।**
**एवं क्षत्रं । अत एव परशुरामे तूभयनिवेशः ।**
**ब्रह्म आननं यस्य ।**
**क्षत्र भुजो यस्य पूर्वसिद्धाग्निमुखत्वेनोक्तः वाक्प्रकाशार्थम् ।**
**अतो वागिन्द्रियदेवताग्निः इंद्रादयश्च भोक्तारः बहवः पूर्वमुक्ताः ।**
**अत्र रसाधिष्ठात्री देवता वरुणः रसभोक्तृ ब्राह्मण्यम् ।**
**तथा रणाकर्तृक्षत्रमिति विट् ऊरू यस्य वितलातलरूपस्यापि गुरुद्वयस्य विश्यत्वस्थितिसाधकत्वेन पूर्ववद्विशेषः ।**
**वृत्तेश्चतुर्विधत्वाद् बहुवचनं ।**
**विशः ऊरू यस्येति ।**
**एवमंघ्रिश्रितकृष्णवर्णः अंघ्रिश्रितः कृष्णवर्णोऽयं कृष्णवर्णः शूद्रत्वं.''**

भावार्थः- ब्राह्मणत्व कोणी एक विशेष आहे जो असतांना मनुष्य ब्राह्मण आहे असें म्हटल्या जातें. ब्राह्मणत्वं कांहीं जाति नाहीं; कारण जातिव्यक्तीचा नित्य संबंध असतो. आणि ब्राह्मणत्वादिक तर व्यक्ति असतांहि नष्ट होतात. ब्राह्मण्यापासूनच भ्रष्ट होतो इत्यादिक स्मृति आहेत. शिवाय ब्राह्मण जातीचें दर्शक एकादें लिंगहि नाहीं. बरें ब्राह्मणापासून ब्राह्मणीचे ठिकाणीं उत्पन्न होणें असें ब्राह्मणाचें लक्षण करावें तर नाभीकमलापासून झालेल्या ब्रह्मदेवाचे ठिकाणीं, व त्याच्या मनापासून झालेल्या मानसपुत्रांचे ठिकाणीं अव्याप्ति[५] होते. पुनः एक्याऐंशी ऋषभपुत्र ब्राह्मण झाले (य११पू.३३३) असें भागवतांतच वाक्य असल्यामुळें मैथुनसृष्टींतहि हें लक्षण बऱ्याच ठिकाणीं लागूं पडत नाहीं. – तात्पर्य जन्मानें जाति मानली असतां पुष्कळ वाक्यांचा विरोध येतो, म्हणून ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र नांवांच्या कांही देवता मानल्या पाहिजेत व त्यांचीच मुख आदिक अवयवांपासून उत्पत्ति होणें संभवनीय आहे, मनुष्यांची नाहीं. तपाच्या योगानें ती देवता ज्याच्या शरीरांत प्रविष्ट होते त्या पुरुषाला ब्राह्मण व ज्याच्या शरीरांत अन्य देवता प्रविष्ट होते त्याला अन्य वर्णसंज्ञा प्राप्त होते. म्हणूनच कित्येक शापानें शूद्र व चांडाल झाले व कित्येक वरानें ब्राह्मण झाले अशा कथा पुराणांत आहेत. परशुरामाचे ठिकाणीं ब्राह्मणत्व आणि क्षत्रियत्व दोन देवतांच्या अभिनिवेशामुळेंच होतें. त्याचप्रमाणें अग्नि मुख इंद्र बाहु इत्यादि पूर्वी सांगितलेच आहेत. वरुण ही रसनेची देवता म्हणून मुखत्वें करून निर्दिष्ट होते. रसभोक्ता ब्राह्मण व रणकर्ता क्षत्रिय इत्यादि प्रसिद्ध आहे. हा भावार्थ झाला.

अन्य टीकेचा पदार्थ मी स्वतः वल्लभमति नसल्यामुळें मला समजला नाहीं; परंतु जेवढा समजला तेवढा माझ्या सिद्धान्तास पुरे आहे त्यावर दुसऱ्याचा आग्रह चालणार नाही. कारण व्याकरणादिकांनीं मीहि त्याच्या उलट अर्थ करूं शकेन. तात्पर्य उदाहरण घेतलेल्या पुरुषसूक्तादि स्थानीय मंत्रांचाहि ब्राह्मणादि देवतापरच अर्थ घेतला पाहिजे. आतां देवता तर यष्टव्य नसल्यामुळें कर्माधिकार नष्ट होतो आणि ब्राह्मणादि जातींना तर कर्माधिकार आहे म्हणून जन्मपरच पुरुषसूक्तादिस्थानीय मंत्रांचा अर्थ घ्यावा. पुनः देवतांना स्वतःचें कर्म करण्याचें सामर्थ्य नसलें तरी मनुष्यशरीराविष्ट होऊन तें कर्म करतां येतें . अथवा अनुग्रहाद्यर्थ प्रविष्ट होऊन त्या मनुष्यावर उपकार किंवा नाश करतां येतों. म्हणून उदाहरण घेतलेल्या मंत्रांचा अर्थ गुणकर्मविशेषानें देवताप्रवेशपर करावा. तरी पण भूतावेशाहून हा देवताप्रवेश थोडासा भिन्न आहे. भूतावेश केवळ शरीरचेच ठिकाणीं होत असतो; आणि देवतावेश तर अहंकाराचेही ठिकाणीं अनुगत असतो. भूताविष्ट पुरुषाचें व्यवहारवैपरित्य दृष्ट असते; तसें देवताविष्ट

पुरुषाचें नसतें याविषयीं आणखीही पुष्कळ उदाहरणें देतां येतील परंतु ती ग्रंथविस्तरभयास्तव देत नाहीं. (य११पू.३३४)

वादी :- पुराणावरून व वल्लभाचार्यांच्या टीकेवरून वेदमंत्रांचा अर्थ करणें ठीक नाहीं. आम्हाला सायणाचार्यांचा अर्थच मान्य आहे. वल्लभाचार्यांचा मान्य नाहीं. आाणि वल्लभमती सत्सिद्धांतमार्तंडकारानें जन्मजातीच मानली आहे. शिवाय गुणकर्मतः जातीला कांहीं वैदिक लिंगहि नाही.

सिद्धान्ती :- पुराणानें वेदाचें उपबृंहण करावें याविषयी ''इतिहास पुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्'' ही स्मृति स्पष्ट प्रमाण आहे. तुला वल्लभाचार्यांची टीका मान्य नसेल तर शांकरमती सायणाचार्यांचीहि वल्लभमतियांना टीका मान्य नाहीं. सत्सिद्धान्तमार्तंडकार वल्लभमतीच असल्यामुळें वल्लभाचार्यांचें वचन त्यांच्यापेक्षां अधिक बलवान् आहे. म्हणून सत्सिद्धान्तमार्तंडकारांचा देवतापरच कसा तरी अर्थ केला पाहिजे.

आतां गुणकर्मजातीला वैदिकलिंगच नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण वज्रसूचीउपनिषदांत जातीचा स्पष्ट निषेध केला आहे. आतां वज्रसूची उपनिषदाचें वैदिकत्व मान्य नसेल तर पुरुषसूक्ताचेंहि वैदिकत्व मान्य नाहीं. कारण एका अंशावर केलेली शंका दुसऱ्या अंशावर आल्यावांचून रहात नाहीं.

आम्हाला तर पुरुषसूक्त व वज्रसूचीउपनीषत् दोन्ही वैदिकत्वें करून मान्य आहेत. आणखी वर्णाविषयींचा संशयच आम्ही दाखवीत आहोंत. गुणकर्मजातिपक्ष किंवा जन्मजातिपक्ष स्थापन करीत नाहीं. केवळ इतकेंच म्हणतो कीं हा वर्णसंशय तिन्हीकालीं कोणी दूर करूं शकत नाहीं. याप्रमाणें तुझी प्रतिबंधक जिज्ञासा दूर करून आतां वज्रसूचीचें निरूपण करितों.

## वज्रसूचिकोपनिषत्

**अथ वज्रसूचिकोपनिषत् ।**
**यज्ज्ञानाद्यान्ति मुनयो ब्राह्मण्यं परमाद्भुतम् ।**
**तं त्रैपदब्रह्मतत्त्वमहमस्मीति चिन्तये ॥**
**ॐ आप्यायन्त्विति शान्तिः ॥**
**चित्सदानंदरूपाय सर्वधीवृत्तिसाक्षिणे ॥**
**नमो वेदान्तवेद्याय ब्रह्मणेऽनन्तरूपिणे ॥**
**ॐ वज्रसूचीं प्रवक्ष्यामि शास्त्रमज्ञानभेदनम् ॥**
**दूषणं ज्ञानहीनानां भूषणं ज्ञानचक्षुषाम् ॥** (य११पू.३३५)

**ब्रह्मक्षत्रियवैश्यशूद्रा इति चत्वारो वर्णास्तेषां वर्णानां ब्राह्मण एव प्रधान इति वेदवचनानुरूपं स्मृतिभिरप्युक्तम् ।**

**तत्र चोद्यमस्ति को वा ब्राह्मणो नाम, किं जीवः किं देहः, किं जातिः, किं ज्ञानं, किं कर्म, किं धार्मिक इति ।**

**तत्र प्रथमो जीवो ब्राह्मण इति चेत्तन्न अतीतानागतानेकदेहानां जीवस्यैकरूपत्वात् एकस्यापि कर्मवशादनेकदेहसंभवात् सर्वशरीराणां जीवस्यैकरूपत्वाच्च, तस्मान्न जीवो ब्राह्मण इति ॥**

**तर्हि देहो ब्राह्मण इति चेत्तन्न आचाण्डालादिपर्यन्तानां मनुष्याणां पांचभौतिकत्वेन देहस्यैकरूपत्वात् जरामरणधर्माधर्मादि-साम्यदर्शनाद् ब्राह्मणः श्वेतवर्णः क्षत्रियो रक्तवर्णो वैश्यः पीतवर्णः शूद्रः कृष्णवर्ण इति नियमाभावात् ।**
**पित्रादिशरीरदहने पुत्रादीनां ब्रह्महत्यादिदोषसंभवाच्च ।**
**तस्मान्न देहो ब्राह्मण इति ॥**

**तर्हि जातिर्ब्राह्मण इति चेत्तन्न तत्र जात्यन्तरजन्तुष्वनेकजातिसंभवा महर्षयो बहवः सन्ति ।**
**ऋष्यशृंगो मृग्यः ।**
**कौशिकः कुशात् ।**
**जांबूको जंबूकात् ।**
**वाल्मीको वल्मीकात् ।**
**व्यासः कैवर्तकन्यकायाम् ।**
**शशपृष्ठात् गौतमः ।**
**वशिष्ठ उर्वश्याम ।**
**अगस्त्यः कलशे जात इति श्रुतत्वात् ।**
**एतेषां जात्याविनाप्यग्रे ज्ञानप्रतिपादिता ऋषयो बहवः सन्ति ।**
**तस्मान्नजातिर्ब्राह्मणइति ॥**

**तर्हि ज्ञानं ब्राह्मण इतचेत्तन्न क्षत्रियादयोऽपि परमार्थदर्शिनोऽभिज्ञा बहवःसन्ति ।**

**तस्मान्नज्ञानं ब्राह्मण इति ॥**

**तर्हि कर्मब्राह्मण इतिचेत्तन्न सर्वेषां प्राणिनां प्रारब्धसंचितागामिक-कर्मसाधर्म्यदर्शनात् कर्माभिप्रेरिताः सन्तो जनाः क्रियाः कुर्वन्तीति ।**

**तस्मान्न कर्म ब्राह्मण इति ॥**

**तर्हि धार्मिको ब्राह्मण इति चेत्तन्नक्षत्रियादयो हिरण्यदातारो बहवः सन्ति ।**

**तस्मान्न धार्मिको ब्राह्मण इति ॥**

**तर्हि को वा ब्राह्मणो नाम ।**

**यः कश्चिदात्मानमद्वितीयं जातिगुणक्रियाहीनं षड्रूर्मिषड्भाव-इत्यादिसर्वदोषरहितं सत्यज्ञानानंदानंतस्वरूपं स्वयं निर्विकल्पम् अशेषकल्पाधारम्-अशेषभूतान्तर्यामित्वेन वर्तमानमन्तर्बहिश्च–आकाशवदनुस्यूतम्-अखंडानंदस्वभावम्-अप्रमेयमनुभवैकवेद्यम्-अपरोक्षतया भासमानं करतलामलकवत् साक्षादपरोक्षीकृत्य कृतार्थतया कामरागादि-दोषरहितः शमदमादिसंपन्नो भावमात्सर्यतृष्णाशामोहादिरहितो दंभाहंकारादिभिः असंस्पृष्टचेता वर्तते ॥**

**एवमुक्तलक्षणो यः स एव ब्राह्मण इति श्रुतिस्मृतिपुराणेतिहासानामभिप्रायः ॥**

**अन्यथाहि ब्राह्मणत्वसिद्धिर्नास्त्येव ॥**

**सच्चिदानंदम् आत्मानम् अद्वितीयं ब्रह्मभावयेद् आत्मानं सच्चिदानंदं ब्रह्म भावयेद् इत्युपनिषत् ॥**

**ॐ आप्यायन्त्विति शान्तिः ॥**

**- इति वज्रसूच्युपनिषत्समाप्ता ॥** (य११पू.३३६)

भावार्थः- सर्व जन्मांत व सर्व देहांत जीव एक आहे म्हणून जीव ब्राह्मण होऊं शकत नाही व चांडालापर्यंत पांच भूतांचा देह समान आहे म्हणून देहही ब्राह्मण होऊं शकत नाहीं. देहाला ब्राह्मण मानल्यास त्याला मेल्यानंतर जाळतांनां पुत्राला ब्रह्महत्या होईल. हरिणीपासून शृंगऋषीची उत्पत्ति आहे. व्यासादिकांची धीवरकन्यादिकांपासून उत्पत्ति आहे म्हणून जाती ब्राह्मण होऊं शकत नाहीं. धर्म करणारे, कर्म करणारे, किंवा सुवर्णदान करणारे क्षत्रियादिकही पुष्कळ आहेत म्हणून धार्मिकही ब्राह्मण होऊं शकत नाहीं. क्षत्रियादिक परमार्थदर्शी आहेत म्हणून ज्ञानीही ब्राह्मण होऊं शकत नाही. जे ब्रह्मवित्पर केवळ या उपनिषदाचा अर्थ करितात त्यांनी ''क्षत्रियादयोपि परमार्थदर्शिनो बहवःसन्ति'' हें वाक्य खाद्य आहे. म्हणजे ज्ञान जरी झालें तरी तें अंतःकरणाच्या शमदमादि गुणांवाचून विदेहमुक्तीचें साधन होत असलें तरी ब्राह्मणाचें साधन होत नाहीं. अंतःकरणाचे सात्त्विक गुण कर्माधिकाराविषयीं व ज्ञानाधिकाराविषयीं सहकारी आहेत. मानसिक आचारावांचून बाह्य आचार श्रेयःसाधन नाहीं. याविषयीं ''यमान्सेवेत सततं न नित्यं नियमान् बुधः'' या स्मृति स्पष्ट प्रमाण आहेत. या उपनिषदावर श्रीनिवासभाष्य आहे. आणि त्यांत बलेंकरून जन्मानें जाति स्थापण्याचा यत्न केला आहे. तथापि तें भाष्य आधुनिक असल्यामुळें त्याच्या उलट भाष्यही मला किंवा कोणालाही करतां येणें शक्य आहे. ह्या श्रीनिवासभाष्यांत केवळ पितृवीर्यापासूनच ते शृंगादिक ऋषि उत्पन्न झाले आहेत; असा आशय दाखविला आहे. परंतु तसें मानणें मनुष्यशरीराविषयीं दुर्घट आहे. कारण शरीरामध्यें मातृज गुण अवश्य असतात. याविषयीं सुश्रुतादि वैद्यशास्त्रें प्रमाण आहे. केवळ वीर्यापासून उत्पन्न झालेल्या पुरुषाचे ठिकाणीं मांसादिकांची संप्राप्तीच होणार नाहीं. जसा केवळ स्वाप्नगर्भ किंवा परस्पर स्त्रीमैथुनाचा गर्भ अनस्थि असतो,

**''यदा नार्यावुपेयातां वृषस्यन्त्यौ कथंचन ॥**
**मुंचन्त्यौ शुक्रमन्योन्यमनस्थिस्तत्र जायते ॥** (य११पू.३३७)
**ऋतुस्नाता तु या नारी स्वप्ने मैथुनमावहेत् ॥**
**आर्तवं वायुरादाय कुक्षौ गर्भं करोतिहि ॥**
**मासि मासि विवर्धेत गर्भिण्या गर्भलक्षणम् ॥**
**कललं जायते तस्या वर्जितं पैतृकैर्गुणैः ॥**

(शारीरस्थान अध्या. २ / सुश्रुत.)

तसा केवळ पितृवीर्याचाही गर्भ अमांस अरक्त असा होईल. आणि कोणत्याही अमोघवीर्यवान् ऋषीला कन्या उत्पन्नच होणार नाहीं. कारण कन्येमध्यें मातृज गुण अधिक असतात; हें अन्य गर्भशास्त्रावरून स्पष्ट आहे. शकुंतलेला आकाशगमनादि आप्सरसगुण इतिहास व काव्यप्रसिद्ध आहेतच. मातृअपेक्षेवांचून नुसत्या पितृवीर्यापासून देह उत्पन्न होतो अशी जर कांही उदाहरणें असतील तर नुसत्या मातृवीर्यापासूनच देह उत्पन्न होतो अशींहीं कांही उदाहरणें आहेत. याविषयीं कथासरित्सागरांत अशी कथा आहे :-

विनयवतीची कथा

**उपाविशच्च विश्रान्त्यै भृंगीरूपं विधायसा ॥**
**वृक्षे तस्मिन्नथैकस्मिन्कुसुमं मधुपायिनी ॥९६॥**
**क्षणाद्दैवात्तमत्रैव प्राप्तं दृष्ट्वा चिरात्पतिम् ॥**
**हर्षच्युतेन वीर्येण सिक्तं पुष्पं तयाशु तत् ॥९७॥**
**त्यक्त्वा भृंगी वपुर्गत्वा संगताभूच्च तेन सा ॥**
**ज्योत्स्नेव शशिना भर्त्रा चिन्वतारं कुमालिना ॥९८॥**
**ततस्तेन समं तस्यां गतायां स्वनिकेतनम् ॥**
**तद्वीर्यसिक्तात्तत्राभूज्जम्बुपुष्पात्ततः फलम् ॥९९॥**
**तस्यचान्तः फलस्यात्र कालयोगेन कन्यका ॥**
**समभून्नहि दिव्यानां वीर्यं भजति मोघताम् ॥१००॥**

(कथासरित्सागर तरंग २.विनयवतीचें जन्मादिवृत्त. शशांकवति नाम द्वादशो लंबकः)

चुडालाराणीनें आपल्या संकल्पानें दुसरा पुरुष उत्पन्न केला अशी कथा योगवासिष्ठांत आहे या दोन्ही कथांवरून संशयच दृढ होत नाहीं काय?

आतां कुशादिकांपासून झालेल्या कौशिकादिकांनां रक्तमांस कसें होतें अशी शंका सम्यक् होणार नाहीं. (य११पू.३३८) कारण केवळ पितृवीर्याचा आग्रह करणारांनाच मातृज गुण असतात असें आम्ही उत्तर दिले आहे. एरव्हीं स्वेदजप्राण्यांनांही अस्थिरक्तमांसादिक उत्पन्न होतात, तसें कौशिकादिकांनां अदृष्टविशेषानें उत्पन्न झाले असल्यास आश्चर्य नाहीं. अदृष्ट ज्याचें त्याच्याच ठिकाणीं रहात असते. वंशाच्याठिकाणीं तें अनुगत होत नाही. कारण अनुगत होतें असें मानल्यास, त्या वंशांत कोणी पतित किंवा रोगग्रस्त होऊं नये.

वादी :- वंशांत अनुगत होणारें अदृष्ट निराळें असतें; आणि त्याचें उपमर्दन करणारें किंवा त्याला अनुकूल होणारें पूर्वकर्मानुसार स्वतःचें अदृष्ट निराळें असतें. म्हणून वंशांत कोणी रोगग्रस्त किंवा पतित उत्पन्न होऊं शकतो.

सिद्धान्ती :- शास्त्राचा प्रश्न तर्कानें सोडविण्याची तूं कशाला खटपट केलीस? कारण तर्कासमोर तर जन्मजातिवादाचा नुसता संशय देखील काढतां येत नाहीं. अदृष्टाला तूं अकृतक मानतोस कीं कृतक[६] मानतोस ? पहिल्यापक्षीं कर्मबंधन कधींही सुटणार नाहीं. अथवा कर्मानेंच मोक्ष मानावा लागेल. आणि त्यामुळेंच ज्ञानानेंच मोक्ष होतो या श्रुतीला बाध येईल. दुसऱ्यापक्षीं ''यत्कृतकं तदनित्यं अव्यापकं च'' जें जें केलेलें असतें तें तें व्यापक नसतें आणि नाशिवंत असतें. या न्यायानें वंशांत मूळ पुरुषापासून जितक्या पिढ्या अधिक होत जातील. त्या मानानें तें अदृष्टही क्षीण क्षीण होत जाऊन शेवटीं नष्ट झालेंच पाहिजे.

वादीः- नष्ट होईल तेव्हां होवो परंतु आतांच नष्ट झालें आहे ह्याचें प्रमाण आमच्या जवळ काय आहे?

सिद्धान्तीः- तें आहे ह्याचें तरी प्रमाण काय आहे ?

वादी :- नसो, पण संशयानें तरी जन्मजाति सिद्ध होते किंवा नाहीं ?

सिद्धान्ती :- संशयानें गुणकर्मजातिही सिद्ध होते.

वादी :- कौशिकादिकांच्या शरीरास अदृष्टविशेष निमित्त असलें तरी अमोघपुत्रवीर्य त्यास उपादान आहे. (य११पू.३३९)

सिद्धान्ती :- पितृवीर्यावांचून केवळ अदृष्टविशेषानें विलक्षण शरीरोत्पत्ति दृष्ट आहे. कित्येक स्त्रियांना गर्भातून मनुष्येतर प्राण्यांचा जन्म आतांपर्यंत प्रसिद्ध आहे. आणि पुराणांतही अशा प्रकारचे जन्म प्रसिद्ध आहेत. तेव्हां येथें पितृवीर्यरूप उपादानाची कांही महती नाहीं. अथवा अमोघ पितृवीर्य मानलें तरी ते ब्राह्मण्य त्यांच्या पुरतेंच होईल. ज्यांच्यामध्यें मातृज गुण अधिक आहेत अशा आतांच्या लोकांमध्यें ते अनुगत होणार नाही. किंवा पितृवीर्याच्या सामर्थ्यानें ब्राह्मण्य मानलें तर विदुरांलाही ब्राह्मणत्व येईल, कारण ते व्यासांपासून झाले होते पण त्यांना कोणी ब्राह्मण म्हटलें नाहीं. ते नियोगविधीनें झाले होते म्हणून ब्राह्मण्य नाहीं असें जर कोणी म्हणेल तर कैवर्तककन्येच्या ठिकाणीं तर नियोगविधिही नव्हता व विवाहविधिही नव्हता तेव्हां तिच्या पोटीं झालेले व्यास ब्राह्मण कसे ?

वादी :- केलेल्या अदृष्टाचा नाश होतो हें खरें आहे परंतु गर्भाधानादि संस्कारांची अविच्छिन्न परंपरा त्या अदृष्टाला उत्तेजित करीत असते.

सिद्धान्ती :- हें म्हणणें स्त्री कधींही व्यभिचार करणार नाहीं तरच बरोबर होईल. परंतु श्रुति व वनपर्वांत वर्णसंकरामुळें जातिनिर्णय करणें दुर्घट आहे अशी युधिष्ठिराचीं वचनें प्रसिद्ध आहेत. बीजसंकरपुरुषाला[७] संस्कारानें ब्राह्मण्य येईल तर तें पतितालाही आलें पाहिजे व त्यामुळें पातित्यशास्त्र व्यर्थ होईल. अथवा अन्यवर्णालाही संस्कार केला असतां ब्राह्मण्य उत्पन्न होऊं लागेल. म्हणून

वर्णाविषयीं संशय आहे.

आतां ईश्वरादिस्थानीं जशी संशयानें प्रवृत्ति ग्राह्य आहे तशी येथेही ती होईल असें म्हणतां येणार नाहीं. कारण ईश्वरादिकांच्या संशयाचा हेतु तर्क आहे शास्त्र नाहीं. आणि येथे संशयाचा हेतु शास्त्र आहे म्हणून आम्ही वैकल्पिक वर्णव्यवस्था म्हणतों.

आतां ब्राह्मण कोण ते श्रुति सांगते. जो सर्वव्यापक सच्चिदानंदघन अखंड एकरस ब्रह्म जाणतो, आणि अंतःकरणाच्या शमदमादिकांनीं युक्त असून काम राग मत्सर इत्यादि राजस तामस गुणानीं रहित असतो तोच ब्राह्मण होय. असा श्रुतिस्मृतिपुराणेतिहासादिकांचा अभिप्राय आहे.

**''ज्ञानविशिष्टसात्त्विकान्तःकरणगुणवान् ब्राह्मणः''**

असें या उपनिषदेंतील ब्राह्मणाचें लक्षण आहे.(य११पू.३४०)

वादी :- हें उपनिषत् स्मृतिपुराणादिकांचें प्रामाण्य दर्शवीत आहे. म्हणून ते वैदिक नाहीं.

सिद्धान्ती :- ''यन्मनुरवदत् तत्सर्वमेव भेषजं'' जें मनु बोलला तें सर्व औषध आहे; इत्यादि वेदवाक्यें मनुस्मृतीचें प्रामाण्य सांगत असून ''इतिहासपुराणं पंचमं वेदानां वेद'' इत्यादि छांदोग्य उपनिषदांत वाक्यें आहेत आणि इतिहास शब्दाचा अर्थ महाभारत असा शंकराचार्य करीत आहेत तेव्हां याही वेदवाक्यांना तुझ्या मताप्रमाणें वैदिकत्व सुखें न येवो. याप्रमाणें वेदभागवतांतील वर्णसंशय सांगून आतां इतर पुराणें काय म्हणतात तें पाहूं.

सूतसंहितेंत असें म्हटलं आहे कीं :-

**सर्वेषां जन्मना जातिर्नान्यथा कर्मकोटिभिः ।**
**पश्वादीनां यथा जातिर्जन्मनैव न चान्यथा ॥५१॥** (सूतसंहिता शिवमाहात्म्यखंड)

गोत्व, पशुत्व, वृक्षत्व इत्यादि जाति जशा जन्मानेंच आहेत त्याप्रमाणें ब्राह्मणत्वादिहि जाति जन्मानेंच होतात. कर्म कोटी जरी केले तरी जाति उत्पन्न होत नाहींत. आणि भविष्योत्तरपुराणाच्या ब्राह्मपर्वाच्या षष्टिकल्पांत पहिल्यापासून ग्रंथक्रमानें ४०/४१/४२/४३/४४ या पांच अध्यायांत तर्कपूर्वक जन्मजातीचें खंडण करून गुणकर्मानें वर्णव्यवस्थेचें स्थापन केलें आहे. व पुढच्या ४५ व्या अध्यायांत गुणकर्म व जन्म दोन्हीही एका व्यक्तीचे ठिकाणीं असल्यास सिद्धि होते असा



निर्णय केला आहे. परंतु शूद्राचे ठिकाणीं ब्राह्मणाचें लक्षण असल्यास त्याला ब्राह्मण म्हणावें अशा अर्थाचीं भारत-भागवतांतील वाक्यें ह्या निर्णयाच्या विरुद्ध आहेतच.

याप्रमाणें ब्रह्मपुराणांतील (२२३ वा अध्याय) जन्मवादाचा अर्धांगिकार करून गुणकर्मवादानेंच वर्णव्यवस्था सांगतो. शुक्रनीतींतही गुणकर्मानेंच वर्णव्यवस्था मानली आहे. याप्रमाणें आणखी पुराण-रामायणादिकांत गुणकर्मपर व जन्मजातीपर वाक्यें अनंत आहेत. त्या सर्वांचा निर्णय भारताच्या निर्णयाप्रमाणेंच करावा असें मला वाटतें.

आतां कलींतील मनुष्यांचें वर्णव्यवस्थेसंबंधी काय मतें आहेत तींही थोडक्यांत सांगतों. शंकराचार्य, श्रीधर, नीलकंठ आणि गिरिधर यांचीं मतें पूर्वी सांगितलींच आहेत. (य११पू.३४१) अपय्यादिक्षित सिद्धान्तलेशसंग्रहांत जन्मानेंच जाति मानतात. आणि स्वतःच शिवार्कमणिदीपिकेंत जो शिव असें तोंडानें म्हणतो तो चांडाल जरी असला तरी त्याचेबरोबर जेवावें अशा अर्थाची श्रुति प्रमाण देतात. ही श्रुति या ग्रंथांत नाममाहात्म्यअध्यायांत आली आहे. समर्थ रामदास व त्यांचे शिष्यांचीं वचनें जन्मानें जाति होते अशीं आहेत; दासबोध, भक्तिरहस्य, स्वानुभवदिनकरादि ग्रंथांतून तीं पाहून घ्यावींत. आतां तुकाराममहाराजांचें मत सांगतोंः-

**ब्राह्मण तो एक चोखामेळा खरा । ब्रह्मीचे पितरां जेवविलें ॥**
**ब्राह्मण तो एक सज्जनकसाई । शालीग्राम आई मांऊस विकी ॥**
**ब्राह्मण तो एक नरहरी सोनार । ज्यासाठीं शंकर माथा वाहे ॥**
**तुका म्हणे ब्रह्म जाणें तो ब्राह्मण । वर्णांसी कारण पूजावया ॥**

असें एका अभंगांत वर्णन करून दुसऱ्या एका अभंगांत ते म्हणतात-

**''अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड । काय त्यास रांड प्रसवली ॥१॥**
**वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळयाती ॥२॥**
**ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं । नव्हें माझी वाणी पदरींची ॥३॥**
**तुका म्हणे आगी लागों थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझीं'' ॥४॥**

(तुकाराम महाराज अभंग २४०६)

इत्यादि वाक्यें गुणकर्मपर असूनः-

**''गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ । म्हणती यातीकूळ नाहीं ब्रह्मीं ।।१।।**
**पवित्राला म्हणती नको हा कंटक । मानिती आत्मिक अनामिका ।।२।।**
**डोहारे दासी बलुती बारा । उपदेशिती फारा रांडां पोरां ।।३।।**
**कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती । उघडी फजीती स्वधर्माची ।।४।।**
**नसता करुनि होम खाती एके ठायीं । म्हणती पाप नाहीं मोक्ष येणें ।।५।।**
**इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती माफ केली ।।६।।**
**नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणे । उपदेशून घेणे द्रव्य कांहीं ।।७।।**
**तुका म्हणे ऐसे गुरुशिष्य पूर्ण । विठोबाची आण नरका जाती ।।८।।तु.२३७१**

- इत्यादि वाक्यें जन्मजातीपर आहेत. (य११पू.३४२)

एकनाथांनींही :-

**''कां रे महारा बदमस्ता । कांहो ब्राह्मणबावा भलतेंच बोलतां ।।**
**तुझें बापाचें भय काय । मायबाप तुमचे आमचे एकच हाय ।।**
**ऐक ऐसें बोलूं नको । निर्गुणापासून अवघे झालों ।।**
**निर्गुण तुला काय ठावें । आत्मस्वरूपीं शोधून पहावें ।।**
**आत्मस्वरूप आम्हा कळेना । नाहीं तरी संतांसी शरण जा ना ।।**
**संतांशीं शरण गेल्यानें काय होतें । चौऱ्यांयशींचा फेरा चुकतो ।।**
**हें ज्ञान तुला कोणापासून प्राप्त झालें । एकाजनार्दनप्रसादें कळूं आलें ।।३८६३**

इत्यादि वाक्यांनीं जातीचा उपहास केला असून ''जाणीवपणें बळेंचि भ्रष्टे'' इत्यादि वाक्यानीं जाति मोडणाऱ्यांचा उपहास केला आहे. व्रजांतील कांहीं पंथी लोक ''जातजातका पावणा सांई जात अजात है'' इत्यादि वाक्यांत परमेश्वर कोणाच्याही हातचें खातो, म्हणून त्याचा प्रसाद घेऊं नये असें सांगतात, तर व्रजांतच झालेले कोणी व्यासदास ह्याच्या विरुद्ध म्हणतात -

**''ब्यास बिबेकी भक्तजन ब्रज तज अनत न जाय ।।**
**वृंदाबनके श्वपच पैं जूठन मांगे खाय ।।१।।''**

कबीरपंथी, नानकपंथी, व दादूपंथी जाती मुळींच मानीत नाहींत, तर बैरागीपंथी मानतात. तैलंगणातील लिंगाइत शूद्रजाती मानीत नाहीत. तर लिंगाइत आराध्य जाती मानतात. आतां मी जीवंत आहे या कालांतही वासुदेवानंद



सरस्वती वर्णाश्रमाचे अत्यंत पुरस्कर्ते असून ज्याच्या डोक्यावर पुढें केस आहेत, अशांचें तोंड देखील पहात नाहींत, तर नाटेकरमहाराज पाश्चात्य कंपनीचें खेरसनी[८] खाऊन मानसरोवराच्या दर्शनास गेले होते असें त्यांनीं आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे व मला त्यांनीं स्वतः सांगितलेंही आहे. मोतीबाबामहाराज व वणीचे आप्पाजीमहाराज जाती उत्तम मानतात, तर केजाजी महाराज व शेगांवकर महाराज आपल्या समोर जातीचा घोटाळा सहन करितात आणि आश्चर्य हेंच कीं सर्वच आपणाला कृतकृत्य समजतात.

वादी :- अहो! येवढें मोठें विवेचन आपण केलें कशाला? कारण यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. भोजनाचा वेळ गेला. बरें, जाति भेद असला किंवा नसला तरी धर्मासंबंधानें तो विचार आहे. आपण तर भक्तिवादी आहानां? मग या जातीच्या पक्षांत आपण शिरले कशाला? भक्तीच कलीमध्यें तारणारी असून तीच स्थापन करावयाची होती.(य११पू.३४३)

सिद्धान्ती :- अरे पण तेथें देखील सुखानें भाकर खातां येईल, अशी आमची कोठें स्थिती आहे? भक्तिमार्गांत देखील जातिभेद व त्याचें खंडण हीं दोन्ही आहेत. पद्मपुराणांत काय म्हटलें आहे तें पहा :- पद्मपुराण उत्तरखंड अध्याय ८४ यामध्यें अशी कथा आहे कीं उमा शंकराला म्हणाली ''महाराज, दास कोणाला म्हणावें वैष्णव कोणाला म्हणावें आणि भक्त कोणाला म्हणावें?''

तेव्हां शंकर सांगतात ''हरिभक्तिरत शूद्राला दास म्हणावे; वेदवेदांग पठण करण्याचा ज्यांनां अधिकार आहे असे ब्राह्मण आणि नारदादिक यांनां वैष्णव म्हणावें व पांचावर्षा पासूनच ज्यांनी प्रभूचा आश्रय केला अशा प्रऱ्हादादिकांनां भक्त म्हणावें. कलीमध्यें शूद्र धन्य आहेत, जे विष्णुध्यानपरायण होऊन विष्णुत्वाला प्राप्त होतात.''

या अध्यायामध्यें जातीवर विशेष आग्रह जरी दिसत नाहीं, अधिकाराग्रह दिसतो, तथापि शूद्राला दासच म्हणावें, वैष्णव म्हणूं नये या वाक्यावरून जन्मजातीवादी भक्तींतही जन्मजाती श्रेष्ठ आहे असा अर्थ घेऊं शकतात. परंतु पद्मपुराणांतच पुन्हा असें म्हटलें आहे. (पान १८०४)

**''न लक्षणैर्दहेदंगं नान्यदग्धोऽर्हति क्रियाम् ।।**
**अचक्रधारिणं विप्रं दूरतः परिवर्जयेत् ।।५१।।** (पद्मपुराण,उत्तरखंड,अ.२५२)

अवैष्णव ब्राह्मण असल्यास महाराप्रमाणें त्याचें तोंड पाहूं नये आणि वैष्णव, वर्णबाह्य जरी आहे तरी तो तिन्ही लोकांनां पावन करितो. याचप्रमाणें भागवतांतही ''सर्ववेदमयो विप्रः'' असें म्हटलें असून, -

**विप्राद्विशद्गुणयुतादरविन्दनाभपादारविन्दविमुखात् श्वपचं वरिष्ठम् ॥**
**मन्ये तदर्पितमनोवचने हितार्थं प्राणं पुनाति सकुलं न तु भूरिमाणः ॥ भाग.**

असेंही म्हटलें आहे. गीतेंतही नवव्या अध्यायांत स्त्री, वैश्य, शूद्र व पतित हे देखील मला भक्तीनें प्राप्त होतात, तर पुण्यपावन असे ब्राह्मण व राजर्षी कां होणार नाहींत? असें म्हटलें आहे. ह्या वाक्याचा अर्थ जन्मवादी जन्मजातीपर करतात तो प्रसिद्धच आहे. – गुणकर्मवादी असा करितात - ''ब्राह्मणाः पुण्याः'' ह्यावरून गुणकर्मानें झालेले ब्राह्मणच ह्या ठिकाणीं कैमुतकीन्यायाप्रमाणें घेतले आहेत. (य११पू.३४४) गुणकर्मानें असलेले शूद्रही भगवद्भक्तीनें तरून जातातच; ज्याप्रमाणें ब्राह्मणमांस खाणारा घंटाकर्णही गुणकर्मानें उच्च नसून भगवत्पदवीला प्राप्त झाला. ही कथा हरिवंशांत आहे.

आतां संप्रदायांकडे दृष्टी दिली तरी वर्णवादाचा मोठा घोटाळाच असतो. प्रत्येक सांप्रदायिकानें आपल्या संप्रदायांतील शूद्राला इतर संप्रदायांतील ब्राह्मणापेक्षां मान अधिकच दिला आहे. साधारणतः वैदिक धर्मात पंचरात्र, कुंडगोलक व इतर शूद्रांकरितां केलें आहे असें सांगितलें असून तदनुगामींनां ब्राह्मण्य नाहीं असें सांगितलें आहे. पण ''शूद्राणां न तच्छ्रोत्रपदवीमुपयास्यति'' इत्यादि वचनांनीं आगमप्रामाण्यांत पंचरात्रश्रवणाविषयीं शूद्राचा निषेध केला आहे. आणि पांचरात्रिकांनां ब्राह्मण्य स्थापन केलें आहे. आगमप्रामाण्यांत असें म्हटलें आहे कीं एकायन नांवाची एक शाखा असून तन्मूलक पांचरात्रिकांनां ब्राह्मण्य आहे. पण या म्हणण्याचें, शांकरभाष्याच्या भामतीवरील कल्पतरूच्या परिमल नामक आपल्या टीकेंत ''उत्पत्त्यसंभवात्''२।२।४२ या सूत्राचें विवरण करतानां अपय्या दीक्षितानी एकायनशाखा पठण करणारे कोणीच दिसत नाहीं म्हणून ती शाखाच नाहीं असें म्हटलें आहे. तरीपण आगमप्रामाण्य मानणाऱ्या रामानुजादिकांनीं आपलें ब्राह्मण्य सोडून दिलें आहे काय? शिवतत्त्वविवेकांत पांचरात्राचा आश्रय करणारे कुंडगोलकच असतात असें अपय्यादीक्षितानीं स्पष्ट म्हटलें आहे. तात्पर्य शैवानें वैष्णवाला व वैष्णवानें शैवाला शूद्र म्हणण्याचा सांप्रदायिक प्रचार आहे. ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्यांत पहिल्या अध्यायाच्या तिसऱ्या पादांतील ३८ व्या सूत्राची टीका करतानां शूद्राला पुराणद्वारा ज्ञान होतें असें श्रीमच्छंकराचार्यांनीं कृपेनें तरी म्हटलें आहे. परंतु रामानुजानें याच सूत्राचें विवरण करतानां त्याचें उलटें खंडण केलें आहे. आणि शूद्रांनां पुराणादिकांनीं देखील ज्ञानच होत नाहीं असें प्रतिपादिलें आहे. शैवमतांत श्रीकंठभाष्य आहे त्यात देखील शूद्रांना पुराणादिकानीं ज्ञानच होत नाहीं असें स्पष्ट म्हटलें असून, अपय्यादीक्षितानीं त्या भाष्यावर टीका करतानां या गोष्टीचें समर्थनच केलें आहे. आणि (य११पू.३४५) याच सूत्रावर टीका करतानां न्यायरक्षामणींत शूद्रास पुराणपठणाचा अधिकार दिला आहे. शिवार्कमणिदीपिका व न्यायरक्षामणि या दोन्ही अपय्यादीक्षितांच्या ग्रंथांचा असा आशय आहे की, श्रीकंठशैवमतानें शूद्रास कोणत्याच रीतीनें ज्ञानोत्पत्ति नाहीं व शांकरमतानें ती पुराणद्वारा आहे. वैष्णवानीं शूद्रानां ज्ञानोत्पत्ति नाहीं असें जरी कबूल केलें आहे; तरी वैष्णवदीक्षायुक्त शूद्र असला तरी त्याला ज्ञानोत्पत्ति होतेच असें सहाही संप्रदायांतील वैष्णव कबूल करितात. याकरितां माध्व, रामानुज, निंबार्क, चैतन्य व राधावल्लभ या सर्वांचे ग्रंथ वाचून पहावे. ग्रंथविस्तरभयास्तव त्यांतील वचनें मी येथें लिहीत नाहीं. कोणी नाहीं म्हटल्यास मी दाखवून देईन.

आतां शैवधर्माकडे पाहिलें तर, सर्व शैव, आम्ही ब्राह्मणच आहोंत असें म्हणत असून शूद्रांच्या ज्ञानोत्पत्तीचा ते कंठरवानें निषेध करितात. त्यांत श्रीकंठाचें उदाहरण दिलेंच आहे. शैवांत वीरशैव नांवाचा एक पंथ असून त्यांत कोणी नीळकंठाचार्य झाले आहेत. त्यांनी क्रियासार नांवाचा संस्कृत श्लोकबद्ध मोठा एक ग्रंथ केला असून निर्णयसिंधुकारानें त्या ग्रंथाचें प्रामाण्य स्वीकारलें आहे. या क्रियासाराच्या पहिल्या चार उपदेशांत ब्रह्मसूत्राच्या चारही अध्यायांचें सार असून, त्यांतील पहिल्या उपदेशांत, मूळब्रह्मसूत्राच्या पहिल्या अध्यायांतील तिसऱ्या पादांतील ३८ व्या सूत्रांचें विवरण करतानां, शूद्रास ज्ञान होतच नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे. पण याच मताच्या मुख्य बस्वपुराणांत परीट जातीच्या एका श्रेष्ठाचें वर्णन आहे. पुनः या मतांत एक दुसरी विलक्षण कल्पना केली आहे ती ही कीं, ऋषिवंशामध्यें उत्पन्न झालेले ब्राह्मण निराळे आहेत आणि त्यांत आर्षापेक्षां गणवंशीय श्रेष्ठ आहेत असें म्हटलें आहे. याविषयीं चन्नबसवाचार्यविरचित

वीरशैवोत्कर्षदीपिका पहावी. यज्ञोपवीत घालणें हें जें ब्राह्मणाचें मुख्य चिन्ह, यास देखील या मतांत दोष सांगितला आहे. यज्ञोपवीत व लिंगधारण करणाऱ्यांनां वैदिकत्वच नाहीं असें वीरशैवोत्कर्षदीपिकेंत म्हटलें आहे. शांकरमतांत ज्ञानाच्या बलानें वर्णाश्रम उल्लंघून जातो म्हणून त्याला अतिवर्णाश्रमी म्हणावें, असें जें म्हटलें आहे, त्याचाही अर्थ या ग्रंथकारानें भलताच केला आहे. अतिवर्णाश्रमी म्हणजे ब्रह्मदेवानें सांगितलेला वर्णाश्रमाचार न पाळणारें, परंतु (य११पू.३४६) हेही लोक आपलें ब्राह्मण्य जन्मानेंच समर्थन करितात. गुणकर्मानें करीत नाहींत. कारण आह्मी वीरशैवलिंगी ब्राह्मण प्रमथादि गणाच्या वंशांत उत्पन्न झालों म्हणून ब्राह्मण आहों असें ते स्पष्ट म्हणतात. इतर लिंगाइतव्यतिरिक्त मात्र ब्राह्मण नाहींत व वैदिक नाहींत एवढेंच त्यांचें म्हणणें आहे. गुणकर्माच्या योगानें ब्राह्मण्य जरी सर्वांनां आंतून आवडत असलें, तरी एकसारखें मन आवरतां येत नसल्यामुळें, उच्च मानाकरितां जन्मानेंच ब्राह्मण्य बहुतेक मानतात. व त्या जन्मानें मानणाऱ्यांतही अशा प्रकारचें विवाद आहेत. गुणकर्माची व जन्माची गोष्ट बाजूस ठेवली तरी, नुसत्या भक्तीवर देखील बाह्मण्य-अब्राह्मण्यवाद शैव-वैष्णव सांप्रदयिकांत दिसतो. उदाहरणार्थ :- शांकरसंप्रदायांत आनंदगिरीनें रचलेला शांकरविजय प्रसिद्ध असून त्याच्या द्वितीय प्रकरणांत,

**''विप्राणां दैवतं शंभुः क्षत्रियाणां च माधवः ।**
**वैश्यानां तु भवेद् ब्रह्मा शूद्राणां गणनायकः'' ॥१॥**

असा एक मनूचा श्लोक घेऊन यावांचून इतर भक्ति करणें योग्य नाहीं असें म्हटलें आहे. हा श्लोक सध्या उपलब्ध असलेल्या मनुस्मृतींत दिसत नाहीं. शिवाय हारितादि स्मृतींत शूद्रादिकांनांही वैष्णव धर्म सांगितलें आहेत. तसेंच शूद्रादिकांस शैवधर्म शिवपुराणांदिकांत सांगितलें आहेत. आणि कलिसंतरण उपनिषदांत ब्राह्मणास हरिनामाचें पठणही सांगितलें आहे. तेव्हां हा मनूनीं नेमून दिलेला देवताविभाग सम्यक् आहे काय, असा कधीं न निवृत्त होण्याजोगा संशय उत्पन्न होतो.

वादी :- अहो वैष्णवत्व व शैवत्व जरी शूद्रांनां असलें तरी तें तांत्रिक आहे वैदिक नव्हे.

सिद्धान्ती :- तर मग तुझें म्हणणें, गाणपत्य जें मनूनें सांगितलें आहे तें वैदिक आहे होय? तसें असेल तर गणपतीची पूजा वेदमंत्रानें शूद्रानें करावी असें होतें; पण शूद्राला जेथें श्रवणाचाच अधिकार नाहीं तेथें वेदमंत्रानीं गणपतीची पूजा करण्यास शूद्रांनां अधिकार देण्यास तुझी जिव्हा कशी पुढें सरते ? बरें हा श्लोक मनूचाच आहे असें घटकाभर धरलें, तर याचा अर्थ काय वर्णानुकूल भक्तिपर करावा कीं भकत्त्यनुकूल वर्णपर करावा, असे दोन पक्ष उत्पन्न होतात. (य११पू.३४७) त्यांत प्रथम पक्षाचें निराकरण आतांच आम्हीं सांगितलें आहे. दुसऱ्या पक्षाविषयीं प्रभूलिंगलीला नांवाचा जो वीरशैवांचा ग्रंथ आहे त्यांत निर्णय केला आहे.तो येणेंप्रमाणें :-

**''न शूद्रता स्यात् भगवत्यधीशे भक्तस्य दीक्षाविधिमाश्रितस्य ।**
**अदीक्षितः शांभवभक्तिमार्गे शिवापराधात् श्वपचत्वमेति ॥१२१॥**
**शिवः स्वयं ब्राह्मणदैवतं स्यात् जनार्दनः क्षत्रियवंशसेव्यः ।**
**चतुर्मुखो वैश्यकुलैरुपास्यो गणेशश्वरोपास्तिपरोहि शूद्रः ॥१२२॥**
**इति स्मृतिः प्राह मनोस्तदस्य वाक्यस्य तात्पर्यमिदं हि बोध्यम् ।**
**भजेत यो योऽधिपमेव यं यं स एव तत्तत्प्रकृतिः किलेति ॥१२३॥**
**अतः शिवं पुण्यवशादुपास्ते समस्तजातीय नरो विशेषात् ।**
**स ईष्यते ब्राह्मणवद्गुणाप्यो विशेषदीक्षावशतश्चरोसौ ॥१२४॥** अध्याय २५

**भावार्थ :-**

**ओव्या - शिवदीक्षा घेतली जिहीं । शूद्रता तयास नाहीं ।**
**जे दीक्षाविरहित देही । ते चांडाल पाहीं शिवापराधें ॥२९॥**
**ब्राह्मणाचें शिव दैवत । क्षत्रियाचें रमाकान्त ।**
**वैश्याचें ब्रह्मा दैवत । गणनाथ शूद्राचें ॥३०॥**
**ऐसी सांगे मनुस्मृति । याचें तात्पर्य हें धरावें चित्तीं ।**
**कीं ज्या ज्या देवास जे जे भजती । ते ते जाती तयांची ॥३१॥**
**म्हणोनि जे शिवास भजती । ते ते बाह्मणसम पहिलेचि असती ।**
**दीक्षाविशेषें विशेष होती । ब्राह्मणचि आणि जंगम ते ॥३२॥**
**म्हणाल कर्मानुसार जन्मजाती । तरी पूर्वपुण्येंचि लाभे शिवभक्ति ॥**
**येणें कोणत्याही जाती । जन्मतां शैव ब्राह्मणचि ॥३३॥**
**नाहीं तरी शूद्रासी । शिवभक्ति लागतां विशेषी ॥**

तें पापकर्माचें फळ तयासी । म्हणावें काय ॥३४॥
शूद्र शैव किंवा वैष्णव । महापापी होय हा सर्व धर्मग्रंथीं वचनाभाव ॥
यास्तव पूर्वपुण्यवशें जो शिव । भजे तो सावेव ब्राह्मण ॥३५॥
एवं शिवभक्तीनेंचि होय वर्ण । अपय्यादीक्षितही आपण ।
कैसें बोलती तेंही प्रमाण । ऐकावें येथ ॥३६॥
सिद्धांतलेशसंग्रहांत । स्वयें बोलिले दीक्षित ।
कीं ब्राह्मणजन्म जयासी होत ॥ तेचि वेदज्ञानार्थ अधिकारी ॥३७॥
तरी शिवार्कमणिदीपिकेंत ॥
**यश्चांडाल शिव इति वाचं वदेत्**
**तेन सह संवसेत् तेन सह संवदेत् तेनसह भुंजीथ ॥** (य११पू.३४८)
या श्रुति प्रमाणार्थ । देती हेंही तेथ आश्चर्य ॥३८॥
आतां वैष्णवांचें मत । पाहतां हाचि लाभे अर्थ ।
विचारतां भागवत । विष्णुभक्त ते ब्राह्मणचि ॥३९॥
**"भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवादिति" ।**
एकादशस्कंधीं चतुर्दशीं उक्ती । आणि दुसरीही स्मृति । असे एक ॥४०॥
**"न शूद्रा भगवद्भक्ता विप्रा भागवता स्मृताः ॥**
**सर्वे वर्णास्थिता शूद्रा अभक्ता ये जनार्दने" ॥**
विप्राहूनि श्रेष्ठ । भक्ति चांडाळासही करी वरिष्ठ ।
भगवद्भक्तासी शूद्रत्वकष्ट । कदा न होती ॥४१॥
भगवद्भक्त स्वयेंचि ब्राह्मण । अवैष्णव शूद्र अवघेचि जन ।
एवं वैष्णव म्हणती आम्ही ब्राह्मण । शैव म्हणती आम्ही ॥४२॥
येर येरांसी म्हणती शूद्र । येथ निर्णय चपेटा मात्र ।
उपायचि नाहीं साचार । निर्णयासी सर्वथा ॥४३॥
ऐसे अवघेचि ब्राह्मण होतां । तरी शूद्राधिकार कवणास आतां ।
किंवा अवघेचि शूद्र होतां । ब्राह्मणाधिकार कवणा ४४॥
प्रायः नेणोनि इतर जाती । स्वयें ब्राह्मण क्षत्रिय होवावया प्रति ।
गळ्यांत यज्ञोपवीत घालिती । बळें करूनी ॥४५॥
सुतार सोनार रंगारी । कहार कुळंबी भिंगारी[*] ॥ (*)विदुर



देखील यज्ञोपवीतश्रृंगारी । या पांच वर्षांतचि बहू ॥४६॥
ऐसे अवघेचि जरी यज्ञोपविती जाहले । तरी तयांसीही वाद करावया वहिले ।
लिंगी ब्राह्मण आहेतचि निर्मिले । देवरायें ॥४७॥
यज्ञोपवितावीण लिंगधारण । हेंचि ब्राह्मणाचें मुख्य चिन्ह ।
पुण्यवशें तेचि लोक होतां अधिक उत्पन्न ।
तरी जानवें सोडून लिंग घालावें लागेल या लोकां ॥४८॥
धर्मे वेद जरी पढावा ॥ तरी पुराणीं प्रमाद कोणें मानावा ॥
विश्वास धरितां आघवा ॥ विचारावा अधिकार ॥४९॥
अविश्वासें पढतां वेद ॥ तरी फळ काय होय प्रसिद्ध ॥
शिल्पशास्त्रादि तंव शुद्ध ॥ शूद्रादिकींचि पढावें ॥५०॥
म्हणोनि इह वा परत्र दृष्टि ॥ वेदार्थ भांडणें व्यर्थ गोष्टी ॥
उगेचि कां व्हावें कष्टी । द्वेष उपजवोनि ॥५१॥
अवघेचि तुह्मी उपवीत घालितां । तरी द्विजत्व काय गुणकर्मे कीं जन्में मानितां।
प्रथम पक्षीं सर्वांसीं सर्वथा । यज्ञोपवीत घालितां न ये ॥५२॥ (य११पू.३४९)
द्वितीय पक्षी जन्म शूद्र । कोणता तरी वर्ण धरावा लागेल स्वतंत्र ।
तयासी भेद मात्र । राहीलचि पुनः ॥५३॥
द्वेषेंचि करावा खटाटोप । तरी तो प्रमाण नोहे साक्षेप ॥
यालागीं यदुकुलदीप । शरण कीजे ॥५४॥
हें मी लिहिलें अन्यत्र पत्रीं ॥ तें वाचोनि पहावें सर्वत्रीं ॥
स्वस्वागमीं[१०] पवित्री ॥ धरावी निष्ठा ॥५५॥
परस्परांसी नीच म्हणणें सोडावें । भगवंतासी शरण जावें ॥
याहूनि निर्णय बरवे । आन न देती कालत्रयीं ॥५६॥
मियां बहुत विचार केला । परि वर्णसंशय कोणास नाहीं फिटला ॥
आणि निष्ठाफळही सकळांला । सकळांचें आहे ॥५७॥
हा असो प्रसंगू । पुढती वर्णसंशय सांगू ॥
आणिकही सांगू । राहिला जो ॥५८॥
तांत्रिकासी ब्राह्मणभक्ति । ऐसीं कांही वचनें सांगती ।
तरी नमस्कार करूं नये वैदिकाप्रति । हें मेरुतंत्र सांगे ॥५९॥

वादी म्हणे कलीमाजीं । । वर्ण संकर होईल जी ।
तुमचिया मना माजीं । कलीनें केला प्रवेशू ॥६०॥
सिद्धान्ती म्हणे तुझे ठायीं ॥ जातिसंकर असो पाहीं ॥
परि वर्णसंकरविचारींही ॥ संशयो भला ॥६१॥
ऐसे बोलिलें भागवतीं ॥ कीं हंस नामक एकचि वर्ण होता कृतीं ॥
आणि ऐसें बोलिलें महाभारतीं ॥ कीं ब्राह्मणचि एक पूर्वी वर्ण होता ॥६२॥
तेव्हां हा एक वर्णसंकर । म्हणावया तूं असलास तयार ॥
तरी संकराचें फळ निर्धार । नरक होवावा ॥६३॥
''संकरो नरकायैव इति''। भीष्मपर्वी अर्जुनोक्ति ॥
श्रीकृष्णें खंडिलें नाहीं ययाप्रति ॥ प्रमाण म्हणोनी ॥६४॥
परि भागवतींचा हंसवर्ण ॥ कीं भारतोक्त पूर्व ब्राह्मणैक वर्ण ॥
नरकीं गेले हे वेद कां पुराण ॥ कोणी न सांगे ॥६५॥
कित्येक पुराणीं वचनें असती ॥ कीं चारही वर्ण होते कृतीं ॥
परि त्यांची ही संगती । महाभारतीं वनपर्वीं ॥ ६६॥
कीं चार होते वर्ण ॥ परि ते करीत होते प्रणवजप आणि वैदिक आचरण ॥
भीमासीं सांगे अंजनीनंदन । ते श्लोक प्रमाण ऐकावे ॥६७॥
''ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्च कृतलक्षणाः ।
कृते युगे समभवन् स्वकर्मानिरताः प्रजाः ॥१८॥
टीका :- कृत लक्षणाः कृतानि स्वतःसिद्धानि लक्षणानि शमो दमस्तप इत्यादीनि येषां ते ॥१८॥ (य११पू.३५०)
सामश्रयं समाचारः समज्ञानं च केवलम् ।
तदाहि समकर्माणो वर्णा धर्मा न वाप्नुवम् ॥१९॥
टीका :- समं ब्रह्म तदेव आश्रयादिर्यस्य तत्तथा ब्रह्मैव फलप्राप्तये श्रयेत् ।
तत्प्राप्त्यर्थं एव आचारो यस्य ।
तस्यैव च ज्ञानं केवलं निरुपाधिविषयम् ।
ब्रह्मैव कर्माणि गत्यागत्यादीनि येषां ते अहमग्निरहं हुतमित्यादि वचनात् ॥१९॥
एकदेवसदायुक्त एकमंत्रविधिक्रियाः॥
पृथग्धर्मास्त्वेकवेदा धर्ममेकमनुव्रताः॥२०॥



टीका :- एको देवः प्रत्यगात्मा तत्रैव सदायुक्ता योगवन्तः ।
एको मंत्रः प्रणवः ।
एको विधिर्वेदान्तश्रवणादिः ।
एका क्रिया ध्यानादिः ।
एक एव तत्त्वप्रतिपादको वेदो येषां सर्वेऽपि ज्ञाननिष्ठा एव ।
न तु केवलं कर्मठा व्यसनिनो वा ॥२०॥

चतुराश्रम्ययुक्तेन कर्मणा कालयोगिना ॥
अकामफलसंयोगात्प्राप्नुवन्ति परां गतिम् ॥२१॥

टीका :- कालो दर्शादिस्तद्युक्तेन कर्मणा कामफलेनेच्छितफलेन स्त्र्यादिना स्वर्णादिना वा संयोगस्तदभावात् ॥२१॥
आत्मयोगसमायुक्तो धर्मोऽयं कृतलक्षणः ॥
कृते युगे चतुष्पादश्चातुर्वर्ण्यस्य शाश्वतः ॥२२॥
टीका :- आत्मनि ब्रह्मणि योग ऐक्यं तेन समायुक्तोऽयं धर्मो योगाख्यः कृतलक्षणः कृतयुगसूचकः ॥
यदैव यत्रैव पुंसि ईदृक् धर्मो वर्तते तदेव कृतयुगमित्यर्थः चतुष्पादोऽविकलः॥२२॥
भावार्थ ओव्याः-
या सटिक श्लोकांचा भावार्थ ॥ कीं चार वर्ण होते कृतयुगांत ॥
परि ते ब्रह्मपरायण समस्त ॥ आत्मध्यानीं ॥६८॥
वेद एकचि होता ॥ देव एकचि अंतर्यामिता ।
प्रणवजप सकळांसी तत्वता ॥ सारिखाचि ॥६९॥
चारही वर्णीं हाचि धर्म । कृतयुगीं होता परम । टीकाकार म्हणती कीं ज्या पुरुषाचें ठिकाणीं जेथ जैसा धर्म । तेथ तैसा कृतयुग जाणावा ॥७०॥
कलींत जरी हा धर्म वाढेल ॥ तरी तितुकाचि कृतयुग होईल ॥
कलावपि कृताचार हे बोल ॥ योगवासिष्ठांतही असती ॥७१॥(य११पू.३५१)
आतां येथ संशयो ऐसा ॥ कीं या श्लोके कृतीं शूद्रासहीं वैदिकधर्म आपैसा ।
आणि मोक्षधर्मी तंव बोलिलें सहसा । कीं घोरकर्मनिरतद्विजचि शूद्र झाले ७२॥
कृतयुगीं घोरकर्म नव्हतें म्हणोन । ये अध्यायीं आणि सर्वत्रही निरूपण ॥
तरी शूद्र तेव्हां काय म्हणोन ॥ होते तें कळेना ॥ ७३॥

होते ते गुणलक्षणें कीं कुललक्षणें । प्रथम पक्षीं कृतस्थ शूद्रास ध्यान कैसे घडेल
तमोगुणें । आणि ध्यानीं रत चारही वर्णे ॥ हें श्लोकींच बोलिले ॥७४॥
आतां एकाद्या मन्वंतरांतील हें कृतयुग असेल । ऐसें म्हणतां अनादि वर्णव्यवस्था
मोडेल ॥ द्वितीयपक्ष तंव कुल-। संशये संशयी ॥७५॥
एवं कृतींचा वर्णसंकर बोलिला ॥ तो अनायासें मोक्षा उपेगीं गेला ॥
आतां मध्येहीं वहिला ॥ वर्णसंकर सदाचि ॥७६॥
द्वापरी नहुष-युधिष्ठिराची भेटी ॥ त्याचि वनपर्वी केली गोठी ॥
धर्म बोलिला कीं संकरापोटीं । अवघी प्रजा ॥७७॥
याचिलागीं ओळखतां नये जाति । म्हणवोनि गुणचि म्हणावे ज्याचे तयाप्रति ।
इया श्लोकांचीही पंक्ति ॥ याच कुसुमीं उदाहरिली ॥७८॥
आतां कलिमाजीं पाहतां ॥ तरी कृतयुगासारिखी होईल व्यवस्था ।
ब्राह्मणवर्ण सर्वथा ॥ करील एक राव ॥७९॥
आणि ते न जातां अधोगती । देवदैत्यांची सारखींच होईल सुगति ॥
तेही श्लोक प्रमाणार्थीं ॥ ऐकावे सकळ ॥८०॥
भविष्यपुराण : श्लोक.–
सहस्राब्दं तु तत्पश्चात् क्षुद्रभूपा महीह्यभूत् ॥
सुरार्चनं वेदमार्गं श्रुतमात्रं च दृश्यते ॥७४॥
पुष्यमित्रगते राज्ये चैकत्रिंशच्छते कलौ ।
द्वात्रिंशदुत्तरे चैव तदा देवाश्च दुःखिताः ॥७५॥
कृष्णचैतन्यमागम्य नत्वोचुर्वचनं प्रियम् ॥
भगवन् कलिकालेऽद्य वर्णाश्चत्वारि भूतले ॥७६॥
भ्रष्टाचाराः प्रेतमयाः शतार्धाब्दप्रजीविनः ॥
देवान् पितृंस्तिरस्कृत्य पिशाचान्पूजयन्ति वै ॥७७॥
ग्रामे ग्रामे च भूघ्नानि पूजितानि नरैर्भूवि ॥
दृश्यन्ते ऽस्माभिरद्यैव दुःखिताश्च नरा भृशम् ॥७८॥
भूतप्रेतपिशाचाश्च डाकिनीशाकिनीगणाः ॥ (य११पू.३५२)
स्वपूजाभिर्मदान्धाश्च निन्दयन्ति सुरान् पितृन् ॥७९॥
अतोऽस्मान्दुर्बलान् विद्धि सबलान् भूतनायकान् ॥
कृपया पाहि नः स्वामिन् शरणागतवत्सल ॥८०॥
इति श्रुत्वा स यज्ञांशो नदीहोपवने स्थितः॥
नम्रभूतान् सुरान् प्राह मागधे तु महीपतिः ॥८१॥
पुरंजयो ब्रह्मपरस्तस्य पत्नी पुरंजनी ॥
मदाज्ञया तयोः पुत्रो भविष्यति महाबलः ॥८२॥
विश्वस्फूर्जिरितिख्यातो ब्रह्ममार्गपरो गुणी
इत्युक्तवचने तस्मिन् गर्भं धत्ते पुरंजनी ॥८३॥
दशमासान्तरे जातो विश्वस्फूर्जिर्महाबलः ॥
जातमात्रे सुते तस्मिन् वागुवाचाशरीरिणी ॥८४॥
पुण्यमित्रो यथाचासीद् वर्णधर्मप्रवर्तकः ॥
तथायं बालको जातो ब्रह्ममार्गपरो बली ॥८५॥
करिष्यति परो वर्णान् कलिंद-यदु-मद्रकान् ॥
प्रजाश्च ब्रह्मभूयिष्ठाः स्थापयिष्यति दुर्मतिः ॥८६॥
वीर्यवान् क्षत्रमुत्साद्य पद्मवत्यः स वै पुरम् ॥
इत्याकाशवचः श्रुत्वा स नृपस्तु पुरंजयः ॥८७॥
ददौ दानं क्षुधार्तेभ्योऽतिथिभ्यः सपरिच्छदः ॥
अष्टौ वर्षसहस्राणि चाष्टवर्षशतानि च ॥८८॥
कर्मभ्यूम्यां कलौ प्राप्ते व्यतीतानि तदा मुने ॥
विश्वस्फूर्जिर्नृपश्चासीन्महाबुद्धो महाबलः ॥८९॥
क्षुद्रभूपान् वशीकृत्य सर्ववर्णान्नरांस्तदा ॥
स्थापयामास वै ब्राह्मे वर्णे ब्रह्मपरायणे ॥९०॥
क्षत्रविट्शूद्रका वर्णाः पिशाचा वर्णसंकराः ॥
गुरुण्डाद्यास्तथा म्लेच्छा ब्राह्मणास्ते बभूविरे ॥९१॥
संध्यातर्पणदेवानां पूजादिविविधाः क्रियाः ॥
चक्रुस्ते वेदविधिना तुल्यभोजनशीलिनः ॥९२॥
षष्टिवर्षं कृतं राज्यं तेन सम्यक्कृता मुने ॥
तदन्वये नृपाश्चासन् सहस्रा भुवि विश्रुताः ॥९३॥ (य११पू.३५३)
अयुताब्दान्तरे जाता ब्रह्ममार्गपरायणाः ॥

**तैश्च दत्तानि भागानि यज्ञमध्ये विधानतः ॥९४॥**
**दैत्येभ्यश्च सुरेभ्यश्च तुल्यरूपाणि चागमन् ॥**
**विस्मिताश्च सुराऽसर्गे यज्ञांशं शरणं ययुः ॥९५॥**
**तदुक्तं कारणं ज्ञात्वा शक्रपुत्र उवाच तान् ॥**
**वेदो नारायणः साक्षाद्विवेकी हंसरूपवान् ॥९६॥**
**नृणां च गुणभेदेन वर्णभेदं चकार ह ॥**
**सद्गुणो ब्राह्मणो वर्णः क्षत्रियस्तु रजोगुणः ॥९७॥**
**तमोगुणस्तथा वैश्यो गुणसाम्यात्तु शूद्रकः ॥**
**तृप्तिं यान्ति पितृवृंदाः ब्राह्मणैः क्षत्रियैः सुराः ॥९८॥**
**वैश्यैश्च यक्षरक्षांसि शूद्रैर्दैत्याश्च दानवाः ॥**
**एकवर्णे च चत्वारो वर्णाः कायस्थ एव सः ॥९९॥**
**भूतप्रेतपिशाचाद्याः कायस्थैस्तर्पितास्सदा ॥**
**ब्रह्मवर्णे तु वर्णाश्च स्थित श्चत्वारि सांप्रतम् ॥१००॥**
**ब्रह्मसंकरवर्णोऽयं तेभ्यः पूर्वं हि दानवाः ॥**
**अर्धतृप्ता भविष्यन्ति तत्पश्चात्स्वर्गवासिनः ॥१०१॥ भविष्यपुराण**

भावार्थः- त्यानंतर सहस्त्रवर्षेपर्यंत पृथ्वीवर क्षुद्र राजे झाले. व क्वचित् देवपूजा, वेदमार्ग व सामान्य विद्वत्ता दिसूं लागली ॥७४॥ पुण्यमित्राचें राज्य होऊन कलियुगांतील एकतीसशे बत्तीस वर्षे झाली असतां त्यावेळीं देव अतिशय दुःखित होऊन कृष्णचैतन्याकडे आले व त्यांस नमस्कार करून असें प्रियवचन बोलले :- हे भगवन्, आज या कलिकालामध्यें भूलोकीं जे चार वर्ण होते ते आचारापासून भ्रष्ट होऊन प्रेतासारखे झाले आहेत. त्यांचें आयुष्य पन्नास वर्षे झालें आहे. ते देवांचा व पितरांचा तिरस्कार करून पिशाचांची पूजा करितात ॥७५.७७॥ गांवोगांव भूलोकच्या मनुष्यांनी त्या हिंसकांचीं पूजा चालविली आहे. आम्हांस सांप्रतकालीं मनुष्यें अतिशय दुःखित झालेलीं दिसतात ॥७८॥ भूत, प्रेत, पिशाच, डाकिनी, शाकिनी इत्यादिकांचे गण आपल्या पूजेच्या योगानें मदांध होऊन देव व पितर यांची निंदा करितात. त्यामुळें आम्ही दुर्बल झालों आहों व भूतनायक सबळ झाले आहेत असें जाण. (य११पू.३५४) हे शरणागतवत्सल स्वामिन्, कृपा करून आमचें रक्षण कर. ॥७९-८०॥ हें ऐकून नद्योपवनामध्यें राहिलेला तो यज्ञांश, नम्र झालेल्या त्या देवांस म्हणतो; ''मागध देशामध्यें पुरंजय या नांवाचा ब्रह्मनारायण राजा आहे. पुरंजनी म्हणून त्याची पत्नी आहे. माझ्या आज्ञेनें त्या दोघांपासून महाबलाढ्य पुत्र होईल. ॥८१-८२॥ तो विश्वस्फूर्जि नांवानें प्रसिद्ध होऊन ब्रह्ममार्गामध्यें परायण व गुणवान् होईल.'' असें वचन तो बोलला असतां, पुरंजनी लागलीच गरोदर झाली. ॥८३॥ दहाव्या महिन्यांत तिला महाबलाढ्य विश्वस्फूर्जि झाला. तो पुत्र उत्पन्न होतांच आकाशवाणी झाली. ॥८४॥ ज्याप्रमाणें पुण्यमित्र वर्णधर्माचा प्रवर्तक होता तसाच हा बालक ब्रह्ममार्गपरायण व बलाढ्य झाला आहे. व तो श्रेष्ठ कलिंद, यदु, मद्रक या नांवाचे वर्ण करील. तो मूर्ख प्रजेस बह्मभूयिष्ठ करून सोडील. तो वीर्यवान् क्षत्रियांचा उच्छेद करून पद्मावतीपुर वसवील. अशी आकाशवाणी ऐकून तो पुरंजयराजा क्षुधार्तांस व अतिथींस दानें व वस्त्रें देता झाला. बा मुने! या वेळीं कर्मभूमीमध्यें कली लागून आठ हजार आठशें वर्षे झाली असता हा महाबलाढ्य विश्वस्फूर्जि राजा झाला. सर्व क्षुद्र राजांस आपल्या वश करून, त्या वेळीं त्यानें सर्व वर्णांच्या लोकांस ब्रह्मपरायण ब्राह्मणवर्णामध्यें स्थापिलें. ॥८२-९०॥ क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे तीन वर्ण, पैशाचधर्मी लोक, वर्णसंकर पावलेले लोक, गुरुंडादिक जातीचे लोक व त्याच प्रमाणें म्लेच्छही ब्राह्मण झाले. ॥९१॥ संध्या, तर्पण, देवाची पूजा व अशाच आणखी नाना प्रकारच्या क्रिया, ते वेदविधीनें करूं लागले. त्या सर्वांचें भोजन एके ठिकाणीं होऊं लागलें. ॥९२॥ बा मुने! या प्रमाणें उत्तम सुधारणा करणाऱ्या त्या राजानें शंभर वर्षे राज्य केले. त्याच्या वंशामध्यें भूलोकीं प्रसिद्ध असे सहस्त्र राजे झाले. ॥९३॥ दहा हजार वर्षांच्या अवकाशामध्यें झालेले ते सर्व ब्रह्ममार्गामध्यें परायण होते. यज्ञामध्यें त्यांनीं विधानपूर्वक दिलेले भाग दैत्य व देव यांच्याकडे सारखेच येऊं लागले. तें पाहून आश्चर्यचकित झालेले सर्व देव यज्ञांशास शरण गेले. ॥९४-९५॥ त्यांनी सांगितलेलें कारण ऐकून, तो शक्रपुत्र त्यास म्हणाला :- ''वेद हा साक्षात् नारायण असून विवेकी व हंसरूपी आहे. ॥९६॥ त्यानें गुणांच्या भेदावरून पुरुषांच्या वर्णाचे भेद केले. ज्याचा सत्त्व हा गुण आहे (य११पू.३५५) तो ब्राह्मण, ज्याचा रजोगुण आहे तो क्षत्रिय, ज्याचा तमोगुण आहे तो वैश्य व ज्याच्यामध्यें तिन्ही गुण समान आहेत तो शूद्र होय. हे देव हो, पितरांचे समूह ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या द्वारा तृप्त होतात.

वैश्यांकडून यक्ष-राक्षसांची तृप्ति होते व शूद्र दैत्य व दानव यांस तृप्त करितात. एका वर्णामध्यें चारही वर्ण अंतर्भूत झालें म्हणजे तो कायस्थ वर्ण होतो; व त्या कायस्थाकडून भूत, प्रेत, पिशाच इत्यादि सर्वदा तृप्त होत असतात. साप्रंतकालीं चाऱ्ही वर्ण ब्रह्मवर्णामध्यें राहिले आहेत. ।।९७-१००।। हा ब्रह्मसंकररूप वर्ण आहे. त्यामुळें हे देवहो ! त्याच्याकडून पूर्वी दानव तृप्त होतात ।।१०१।।

ओव्याः- येथवरी सकळ जाहलें । जरी या वर्णास ब्रह्मसंकर म्हणितलें ।।
तरी अधोगतीस नाहीं गेले ।। कोणीही यांत ।।८१।।
म्हणोनि हा नाममात्र संकर ।। आतां ऐसें म्हणावें जर ।
कीं हा ब्रह्ममार्ग निर्गुणब्रह्मपर । कृतयुगासम ज्ञाननिष्ठारूप ।।८२।।
तरी ऐसें न ये बोलतां । या ब्रह्मवर्णी प्रजा समस्ता ।
यज्ञ करोनि देवदनुसूतां । तृप्त करीत होत्या कीं ।।८३।।
आणि ज्ञाननिष्ठापर कृतयुगीं । देवदानवभेद नव्हता आंगी ।
हें बोलिलें आहे प्रसंगीं । महाभारतीं वनपर्वीच ।। ८४।।
''देवदानवगंधर्वयक्षराक्षसपन्नगाः ।।
नासन् कृतयुगे तात तदा न क्रयविक्रयः ।।१३।।'' (अध्याय १४९)
देवदानवगंधर्वादि जाती । सर्वथाचि नव्हत्या कृतीं ।
क्रयविक्रयादि लोभवृत्ति । नव्हत्याचि तेव्हां ।।८५।।
म्हणोनि विश्वस्फूर्जिकृत ब्रह्मवर्ण । ज्ञाननिष्ठापर न म्हणावा कोण । जे गुणवर्ण-वाक्यांचें ब्रह्मनिष्ठापर करिती योजन । तयाकारण खाद्य हे श्लोक ।।८६।।
आतां चारी वर्णांची वेदीं उत्पत्ति । तरी वेदविभागही कृतभिन्न युगांतीं ।
पुराणीं जैसी प्रमाण श्रुति । तैसीं श्रुतींत प्रमाण पुराणें ।।८७।।
पुनः कलीचे शेवटीं वर्णसंकर । होईल तेव्हां धर्म बुडेल समग्र ।
ऐसें म्हणतांचि आमचा धर्म निर्धार । सर्वथा न बुडे ।।८८।।
जे वर्णसंकर करतील । ते किन्नरभक्षक लोक दुसरेचि उपजतील ।
विष्णुभक्तादि सर्व विमानांतून स्वर्गी जातील । हे बोल भविष्यपुराणीं ।।८९।।
म्हणोनि घडेल तें वर्णकर्म करावें । (य११पू.३५६)
किंवा न घडेल तरी नारायणा हृदयीं धरावें ।
जातिभंगार्थ भांडण ना करावें । किंवा गर्व न धरावें अति जातिभेदीं ।। ९०।।

आतां ऐसें म्हणतील कोणी । कीं विश्वस्फूर्जीस ब्रह्मवर्ण करण्याविषयीं होती आकाशवाणी । सद्यस्तैसा अर्थ कोणी । नाहीं म्हणोनि भांडावें ।।९१।।
तरी रामानंदवैष्णवपंथी । चारी वर्ण एके ठायीं खाती ।
ते अधोगति जाती । हें सर्वथा न घडे ।।९२।।
कारण त्यांच्या परंपरेंत । पुरुष जे जाहले विख्यात ।
तेही वर्णिले भक्तमालेंत । हरिभक्त म्हणोनियां ।।९३।।
एवं वैष्णवांची हे रीति । प्रसिद्ध भोजन-ऐक्य जगन्नाथीं ।
शैवाविषयीं तंव उदाहरिली श्रुति । अपय्यादीक्षित ग्रंथींच ।।९४।।
आतां शाक्तमताची व्यवस्था । भैरवीचक्रीं सर्व वर्णांसी ब्राह्मणता ।
तोही श्लोक प्रमाणार्था । ऐकावा सकळीं ।।९५।।
''प्रवृत्ता भैरवेश्चक्रे सर्वे वर्णा द्विजातयः ।
निवृत्ता भैरवेश्चक्रात् सर्वे वर्णाः पृथक् पृथक् ।।१।।''
भैरवीचक्रीं सर्व वर्ण ब्राह्मण । आतां महानिर्वाणतंत्राचें वचन । कीं शक्तिरहित जरी ब्रह्मोपासन । तरी नैवेद्यभोजन सर्व वर्णी एक करावें ।।९६।।
''यदि स्यान्नीचजातीयमन्नं ब्रह्मणि भावितम् ।
तदन्नं ब्राह्मणैर्ग्राह्यमपि वेदान्तपारगैः ।।'' उल्लास ३ श्लोक ९१
नीच जातींनीं जरी नैवेद्य आणिला । तरी ब्राह्मणीं घेतां दोष नाहीं बोलिला ।
हा श्लोकाचा भावार्थ वहिला । येथ ऐसें जरी म्हणेल कोणी ।।९७।।
कीं ब्रह्मनिष्ठासाठीं हें निरूपण । तरी हें व्यर्थ होईल बोलणं ।
कारण याचि उल्हासीं ब्रह्ममंत्रग्रहण । सांगितलें आहे ।।९८।।
वेदान्तिक ब्रह्मज्ञानियासी कहीं । ब्रह्ममंत्राची अपेक्षा नाहीं । म्हणोनि हा ब्रह्ममार्गही वेदान्तिक परी बाह्य क्रियाही । ब्रह्मभावनेनें अद्वैत सांगे ।।९९।।
आतां संतांचें मत । रामानंदादिकांचे कळले समस्त ।
तुकारामांचेही यथार्थ । उद्गार ऐसे ।।१००।।
''आनंदे कवळ देती एकामुखीं एक । न म्हणती लहानथोर अवघे सकळिक ।।''
इत्यादि अभंगीं काला करितां निःशंक । जातिविषयीं रहावें ।।१०१।। (य११पू.३५७)
तंव वादी म्हणे तुह्मी पत्रांत । गवळीच होते म्हणूनि समस्त ।
कृष्णकालीन कालियांत । वर्णविचारप्रसंगचि नव्हता ।।१०२।।

**ऐसें सांगितलें आहे । हें तुकारामवचनही तैसेंचि होय ।**
**सिद्धान्ती म्हणे ऐसें नोहे । हा काला नोहे कृष्णकालीन ॥१०३॥**
**''पंढरीच्या लोकां नाहीं अभिमान'' । इत्यादि पुढती वचन ।**
**आणि पंढरीचा काला म्हणोन । निवृत्तिनाथें वर्णियेला ॥१०४॥**
**'आतां नसता करूनि होम खाती एके ठायीं' । इत्यादि तुकारामउक्ति पाहीं ।**
**त्या शाक्तचक्रनिंदापर लवलाहीं । स्पष्ट असती ॥१०५॥**
**आपआपल्या मतपेठे । झाला संकर सर्वांसी गोड वाटे ।**
**म्हणोनि वर्णसंशय नेटें । न निवर्तेचि हा ॥१०६॥**
**आतां ऐसें म्हणेल कोणी । कीं संकर करणें पापखाणी ।**
**दैत्यांचिये मनीं । वसे हें ऐसें ॥१०७॥**
**परि दैत्यांचाही वंश वाढवावया । जन्मणें लागलें देवराया ।**
**भविष्यपुराणीं कथा इया । प्रतिसर्गपर्वणि चोविसाव्या अध्यायीं ॥१०८॥**
**''इति श्रुत्वा बलेर्वाक्यं भगवान् वामनो हरिः ॥**
**स्वांशान् महीतले प्राप्तो दैत्यपक्षविवर्धनः'' ॥४९॥**
**बलीचें वाक्य ऐकून । पृथ्वीवरी आला नारायण ।**
**दैत्यपक्षविवर्धन । करावया ॥१०९॥**
**आतां जरी ते लोक नरकीं गेले । तरी तें अवघें देवेंचि केलें ।**
**म्हणावें कर्मानुसार झालें । परि देव अनुमंता ॥११०॥**
**यालागीं अशक्य सुशक्य पापपुण्य । सोडोनि हरीस रिघावें शरण ।**
**जपावें शिव नारायण । गोविंद माधव गोपाळ ॥१११॥**
**नामें नरक दूर करूनि । इहपर भोग भोगिजे आनंदानीं ।**
**नीतिधर्म पाळावा याचिलागुनी ।**
**कीं सर्वभूतीं परमेश्वर म्हणोनि नोल्लंघावें कवणा ॥११२॥**
**आपुला देहाभिमान जोंवरी । सनीति नामें तम तरावें लवकरी ।**
**ब्रह्मनिष्ठासी तंव निर्धारीं । विधीचि नाहीं ॥११३॥**

गद्य :- वैदिक धर्म व त्याच्या पोटभेदशाखांचा विचार केला असतां, ब्राह्मण्याकरितां हपापलेल्या लोकांची जन्म व गुणकर्मवादाच्या योगानें स्पष्ट संशयापन्ना स्थिति दृग्गोचर होते. तथापि एवढा एक वादांत निर्णय सांपडतो कीं, आपल्या कर्मानें महात्मा देखील वाईट योनींत जन्म घेतो तरी तो चांगला राहूं शकतो. (य११पू.३५८) आतां अवैदिक मताकडे दृष्टि देऊं.–

जैन धर्मात जन्मजातिवाद प्रधान असून तो वैदिक वर्णवादापेक्षांही कडक आहे; आणि त्यांत वैश्य व शूद्र जातींत तीर्थंकर व महात्मे उत्पन्नच होत नाहींत असें स्पष्ट म्हटलें आहे. कर्माच्या योगानें उत्तम उत्तम जन्म घेणाऱ्याला शेवटी तीर्थकराचें उत्तम शरीर मिळतें. तात्पर्य ब्राह्मणादि जाति जन्मावरच अवलंबून आहेत असें जैन स्पष्ट मानतात.

पण जैनसहचारी जो बौद्धधर्म त्यांत गुणकर्मानेंच जाति मानली आहे. ते वाक्य येणें प्रमाणें:-

**''न जच्चा बसलो होती न जच्चा होति बाम्मणो ।**
**कम्मणा वसलो होती कम्मणा होति बाम्मणो'' ॥**

हें वाक्य पालीप्राकृत असल्यामुळें त्याची छाया सांगतों:-

**''न जात्या वृषलो भवति न जात्या भवति ब्राह्मणः ।**
**कर्मणा वृषलो भवति कर्मणा भवति ब्राह्मणः ॥१॥''**

ब्राह्मण, शूद्र, जन्मानें होत नाहींत तर कर्मानें होतात हा या वाक्याचा भावार्थ आहे. या सर्व विचारांवरून असेहि तात्पर्य काढणे शक्य आहे कीं, वर्णनिर्णय जर होतच नाहीं तर भगवद्भक्ति व सत्कर्म करावें.

वैदिकधर्मरक्षण

होईल तितकें वैदिकधर्माचें रक्षण करावें. कोणी त्याला बुडवूं लागल्यास कोणत्याही जातीनें त्याचें अध्ययन करून त्याचा खुशाल उद्धार करावा व नंतर पाप लागल्यास भगवन्नाम घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें.

किंवा स्कंदपुराणांत सांगितलेल्या दृढमति शूद्राप्रमाणें घटकाभर नरक भोगून मुक्त व्हावें पण धर्म बुडूं देऊं नये;

किंवा कूपखनन न्यायानें ज्ञान मिळवून एकदम मुक्त व्हावें; पण वैदिक ग्रंथांचा नाश होऊं देऊं नये.

जोपर्यंत कोणी आपल्या शिरावर त्याचें रक्षण घेत आहे तोंपर्यंत कसेंही आपलें कार्य करून घ्यावें. उगीच अध्ययनाकरितां कलह माजवूं नये.

भगवन्नाम वैदिक अवैदिक सर्वांनां मुक्ति देणारें आहेच, असें तात्पर्य काढणाऱ्यांनां नको म्हणणारा सृष्टींत कोणीच भेटणार नाहीं असें मला वाटतें. याप्रमाणें वर्णाश्रमाविषयीं दोन्ही प्रकारचें वाद आहेत.

गुणकर्मजातिवादाचे समर्थन

आतां थोडीशी युक्ति सांगतो – **जन्मानें जाती मानणें कठिण आहे; कारण देहाला जाती असूं शकत नाहीं. सर्व देह समान आहेत म्हणून आणि **पश्वादिकाप्रमाणें प्रत्यक्ष दिसत नाहीं म्हणून. अंतःकरणाचाही धर्म जाति होऊं शकत नाहीं, (य११पू.३५९) कारण अंतःकरण यावन्मोक्ष रहात असल्यामुळें कोणत्याही जन्मांत त्याची जाती बदलली न पाहिजे. परंतु एका जातीला मेल्यानंतर दुसऱ्या जातीची प्राप्ति शास्त्रात लिहिली आहे. **आत्म्यालाही जाती होऊं शकत नाहीं; त्याचे ठिकाणीं भेद नाहीं म्हणून. आतां असदृश[११] अध्यासाचें तें उदाहरण झालें असल्यामुळें अध्यास सिद्ध आहे असें म्हणावें तर, सत्त्वगुणाच्या अध्यासानें होत असल्यामुळें गुणकर्मरूपच होईल जन्मरूप होणार नाहीं. असदृश अध्यास तर दास्यत्व-स्वामित्वादिकांचाही आहे. याप्रमाणें गुणकर्मसमर्थन करणारी एक युक्ति सांगितली.

जन्मजातिवादाचे समर्थन

आतां जन्मसमर्थन करणारी सांगतों. शास्त्रांत संस्कार प्रत्येक वर्णाचे सांगितले आहेत. गुण जर अध्याससिद्ध मानले तर संस्कारही अध्याससिद्ध मानणें आवश्यक आहे.

गुणकर्मानें जाती मानल्यास ते संस्कार करितां येणार नाहींत; कारण क्षणोक्षणीं मनुष्याचे गुण बदलत राहतात. आणि एखाद्या वेळेला बदलले तरी त्याला त्या वर्णांतून काढून टाकावें लागेल. परंतु शाप देणारे ऋषि अन्यवर्णत्वाला प्राप्त झाले आहेत असा कोठें लेख नाहीं.

बरें गुणकर्म बदलणार नाहींत असें म्हणावें तर तेंही शक्य नाहीं. कारण शंकर कामवश झाल्यामुळें त्याचें लिंग गळून पडलें; नारदांनीं बायको मागितल्यामुळें ते बायको झाले; ब्रह्मदेव आपल्या कन्येच्या मागें धावले, इंद्राला अहल्याभोगामुळें सहस्त्र भगें पडलीं, विश्वामित्र तप सोडून मेनकेच्या मागें पळाले, हनुमान ब्रह्मचारी असून त्यांनां मकरध्वज पुत्र झाला, पराशर नौकेत धीवरस्त्रीवर आसक्त झाले; अशी जर मोठमोठ्यांची स्थिती आहे तर आमच्या सारख्यांचे गुणकर्म बदलणार नाहींत असें कसें म्हणतां येईल? आणि तसें मानलें म्हणजे सकाळीं ब्राह्मण, माध्यान्हीं क्षत्रिय आणि संध्याकाळीं शूद्र सुद्धा मनुष्य होऊं शकेल. तसें झालें म्हणजे प्रत्येक वेळा संस्कार करावे कसे, व विवाहा करितां स्त्रिया आणाव्या कोठल्या? एका कवीनें म्हटलें आहे :-

''विश्वामित्रपराशरप्रभृतयो वातांबुपर्णाशनाः ।
तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ॥
शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुंजन्ति ये मानवाः ।
तेषां इंद्रियनिग्रहो यदि भवद्विन्ध्यस्तरेत्सागरम्'' ॥१॥ भर्तृहरी (य११पू.३६०)

अर्थ स्पष्टः- तेव्हां गुणकर्मानें जाति मानणें शक्यच नाहीं. आतां गुणकर्मानें किंवा जन्मानें वर्णभेद मानण्याची आवश्यकताच नाहीं असें म्हटलें तर शास्त्रामध्ये वर्णवाचक शब्द आहेत. शास्त्राचा परित्याग करून कोणाला कांहींही करिता येते. व त्यामुळें फळ होणें किंवा न होणें दोन्हीही समानच राहतात. बरें, सत्त्वशुद्धि नसली तर संस्काराचा तरी काय उपयोग? आणखी सत्त्वशुद्धि असल्यास ती सद्गति देण्यास समर्थ आहे. मग संस्कार पाहिजेत कशाला?

महात्मे म्हणतात कीं- **''भजनबिन जनेऊ जमफास''**

तुकाराम महाराज म्हणतातः-

**''अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥१॥**
**आत्मअनुभवें चोखाळल्या वाटा । त्याचे माथां जटा असो नसो ॥२॥**
**परस्त्रीचें ठायीं जो कां नपुंसक । त्याचे आंगा राख असो नसो ॥३॥**
**परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे''** ॥४॥

आतां यद्यपि मोक्षधर्माला संस्काराची अपेक्षा नाहीं तरी स्वर्गप्राप्तीची ज्याला इच्छा आहे, त्याला संस्काराची अपेक्षा आहे. कारण नुसत्या सत्त्वानें तो मिळतो असें नाहीं. - हेंही म्हणणें सम्यक् नाहीं. गंगास्नानादि साधारणकर्म व सत्यादि साधारण गुण ह्याच्या योगानें स्वर्ग मिळाले असे इतिहास आहेत.

तात्पर्य ह्या वर्णवादांत आजपर्यंत कोणत्याच प्रकारचा निर्णय झाला नाहीं व पुढें होईल असें माझें मत नाहीं.

मागें केलेल्या भारतवाक्यनिर्णयाकडेच माझ्या मनाची धांव जाते.

स्पर्शास्पर्शनिर्णयही अशाच प्रकारानें संशयाचा आहे. कारण मद्यमांसादिकांच्याच योगानें चांडालादिकांनां स्पर्श करूं नये, असे निश्चित आहे. सौत्रामणि यज्ञांत मद्यग्रहणाचा इतिहास आहे. आणि गाईच्या मांसाच्या यज्ञाचाही चरकांत इतिहास आहे. तेव्हां तो सहन करणारे त्रैवर्णिक अस्पर्श नाहींत काय? सुतिकावस्त्राचें अस्पर्शत्व शास्त्रगम्य आहे म्हणून स्पर्शास्पर्श सत्य आहेत. किंवा गुणकर्मवादांतही गुणरक्षणार्थ स्पर्शास्पर्श सत्य आहेत.

या प्रमाणें आगमांविचार केला असतां, वर्णाविषयीं संशय दृढ होतो.

**परंतु ब्राह्मणांनीं द्वेषांनीं आम्हाला शूद्र म्हणून गुलाम केलें व आमच्यापासून विद्या चोरून ठेवली आहे असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे तें बरोबर नाहीं.** (य११पू.३६१) कारण जन्मजातिवाद आर्यधर्मांतच नसून जैन धर्मांतही आहे. प्रत्युत आर्यधर्मापेक्षां जैनधर्मांत कडक आहे. श्वेतांबर व दिगंबर हे दोन्ही जैनपंथ जन्मजातिवादाचा मोकळ्या मनानें स्वीकार करितात.

या विषयीं जैनधर्मांतील कांही उदाहरणें देतों.

**तत्त्वनिर्णयप्रासाद, आरंभ२४, पान ३५१, प्राकृत गाथा :-**

**''देवाणुप्पिआ, न एअं भूअं, न एअं भव्वं, न एवं भविस्सं, जन्नं अरहंता वा, चक्कवट्टी वा, बलदेवा वा, वासुदेवा वा,ए अंतकुलेसु वा, पंतकुलेसु वा , किविणकुलेसु वा, तुच्छकुलेसु वा, दरिद्दकुलेसु वा, भिरकागकुलेसु वा, माहणकुलेसु वा, आयाइंसु वा आयाइंति वा, आयाइस्संति वा, एवं खलु अरहंता वा, चक्कबल वासुदेवा वा, उग्रकुलेसु वा, भागकुलेसु वा, रायन्नकुलेसु वा, खत्तियकुलेसु वा, इरकागकुलेसु वा, हरिबंसकुलेसु वा, अन्नयरेसु वा, तहप्पगारेसु विसुद्धजाइकुलवंसेसु आयाइंसु वा, आयाईति वा, आयाइस्संति वा, अच्छिपुण एसेविभावे । लोगच्छेयभूए, अणंताहिं उसप्पिणि ऊसप्पिणीहि बइक्कंताहि, समुपद्यइ, नामगुतत्तस्स वा, कम्मस्स, अरकीणस्स, अवेइयस्स, अणिद्दिणस्स, उदण्णं जन्नं, अरहंता वा, चेक्कबल वासुदेवा वा, अंतकुलेसु वा, पंणम तुच्छदकिविरिद भिरकागमाहणकुलेसु वा, आयाइंसुं वा, आयाइंति वा, आयाइस्संति वा, नोचेवणं जोणीजम्मण निरकमणेणं निरकभिंसुवा, निक्खमंति वा निक्ख भिस्संति वा, तंजीअमेअं, तीअपच्चुप्पन्नमणागयाणं सक्काणं, देविंदाणं देवराईणं, अरहंते भगवते तहप्प गारेहिंतो, अंतकुले हिंतो, पंतकुले हिंतो,**



**तुच्छदहद्दकिविणभिक्खागमाहणकुलहिंतो, तहप्पगारेसु उग्रभोगरायन्नखत्तियइरकागहरिबंसकुलेसु वा, अन्नयरेसु वा, तहप्पगारेसु विसुद्धजाइकुलवंसेसु साहरा वित्तए.''**

भावार्थः- या प्राकृत गाथेचा भावार्थ असा आहे कीं, अंतादि कुलामध्यें अर्हन्त भगवान् उत्पन्न होत नाहींत; तर उपनयन झालेल्या उग्रादिकुलामध्येंच उत्पन्न होतात. तीं कुलें शुद्ध नसल्यामुळें दरिद्रकुळांतही अर्हतादि उत्पन्न होत नाहींत. जैनब्राह्मणाविषयीं प्रत्यक्ष श्लोक आहेत ते येणेंप्रमाणें :- (य११पू.३६२)

जैनव्रतादेश, स्तंभ २४ पान ३६५.

''परिमेष्ठि महामंत्रो विधेयो हृदये सदा ।<br>
**निर्ग्रंथानां मुनींद्राणां कार्य नित्यं उपासनम् ॥१॥<br>
त्रिकालमर्हत्पूजा च सामायिकमपि त्रिधा ।<br>
शक्रस्तवैस्सप्तवेलं वंदनीया जिनोत्तमाः ॥२॥<br>
त्रिकालमेककालं वा स्नानं पूतजलैरपि ॥<br>
मद्यं मांसं तथा क्षौद्रं तथोदुंबरपंचकं ॥३॥<br>
आमगोरससंपृक्तं द्विदलं पुष्पितौदनम् ।<br>
संधानमपि संसक्तं तथा वै निशि भोजनम् ॥४॥<br>
शूद्रान्नं चैव नैवेद्यं नाश्नीयान्मरणेऽपिहि ।<br>
प्रजार्थं गृहवासेऽपि संभोगो न तु कामतः ॥५॥<br>
आयुर्वेदचतुष्कं च पठनीयं यथाविधि ।<br>
कर्षणं पाशुपाल्यं च सेवावृत्तिं विवर्जयेः ॥६॥<br>
सत्यं वचः प्राणिरक्षामन्यस्त्रीधनवर्जनम् ।<br>
कषायविषयत्यागं विदध्याः शौचभागपि ॥७॥<br>
प्रायः क्षत्रियवैश्यानां न भोक्तव्यं गृहे त्वया ।<br>
ब्राह्मणानामार्हतानां भोजनं युज्यते गृहे ॥८॥<br>
स्वज्ञातेरपि मिथ्यात्वनासितस्य पलाशिनः ॥<br>
न भोक्तव्यं गृहे प्रायः स्वयं पाकेन भोजनम् ॥९॥<br>
आमान्नमपि नीचानां न ग्राह्यं दानमंजसा ॥<br>
भ्रमता नगरे प्रायः कार्यः स्पर्शो न केनचित् ॥१०॥**

**उपवीतं स्वर्णमुद्रां नांतरीयमपि त्यजेः ॥**
**कारणांतरमुत्सृज्य नोष्णीशं शिरसि व्यधाः ॥११॥**
**धर्मोपदेशः प्रायेण दातव्यः सर्वदेहिनाम् ॥**
**व्रतारोपं परित्यज्य संस्कारान् गृहमेधिनाम् ॥१२॥**
**निर्ग्रंथगुर्वनुज्ञातः कुर्याः पंचदशापिहि ॥**
**शांतिकं पौष्टिकं चैव प्रतिष्ठामर्हदादिषु ॥१३॥**
**निर्ग्रंथानुज्ञया कुर्याः प्रत्याख्यानं चकारयेः ॥**
**धार्यं च दृढसम्यक्त्वं मिथ्याशास्त्रं विवर्जयेः ॥१४॥** (य११पू.३६३)
**नानार्यदेशे गंतव्यं त्रिशुद्धया शौचमाचरेः ॥**
**पालनीयास्त्वया वत्स व्रतादेशो भवावधिः ॥१५॥**

भावार्थ :- जैनगुरूनीं जैन ब्राह्मणशिष्यानां दीक्षा देण्याचे वेळचे हे श्लोक आहेत. त्यांतील बहुतेक नियम सगळ्यानां समजण्यासारखे सोपेच आहेत. परंतु जीनानां नेहमी वंदन करावें, शूद्रांचें अन्न प्राणांती देखील भक्षण करूं नये; नीचापासून तर आमान्न देखील घेऊ नये; क्षत्रिय व वैश्याचे घरी जेऊं नयें, आर्हत ब्राह्मणांच्याच घरीं जेवावें, हे जे या श्लोकांत नियम सांगितले आहेत ते लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. आणि यावरून जैनांमध्यें कसा कडक निर्बंध आहे हें सहज दिसून येण्यासारखें आहे. आतां आपले वेद जर ब्राह्मणांनीं चोरून ठेवलें म्हणावे, तर जैनमतांतही मुख्य जैनशास्त्र ब्राह्मणानेंच पढावें असें लिहिलें असून, शूद्रानें केवळ नीतिशास्त्र व जीविकाशास्त्रच पढावें असें लिहिलें आहे. जैन धर्मांत चारही वर्ण सध्या कसे तरी चालू आहेत. ब्राह्मणधर्मांत शूद्रांना पुराणाध्ययनविधि कोणत्या तरी रीतीनें दाखविला आहे, पण जैनधर्मांत तर तो मुळींच नाही. ब्राह्मणधर्मांतील योगवासिष्ठादिकांत पशु असो, म्लेच्छ असो, कीं कोणत्याही जातींत असो, ज्ञान झालें कीं मुक्त होतो असें स्पष्ट म्हटलें आहे; पण जैनधर्मांत तर अर्हंत या कुलांतच उत्पन्न होत नाहीं असें स्पष्ट म्हटलें आहे. याविषयीं विस्तार पाहण्याची अपेक्षा असल्यास जैन प्राचीन संस्कृत प्राकृत ग्रंथ पहावेत. त्याचें ज्याला सामर्थ्य नसेल त्यानें गुजराथी भाषेंतील ''जैनतत्वादर्श'' व हिंदी भाषेंतील ''तत्वनिर्णय प्रासाद'' हे दोन ग्रंथ तरी अवश्य अवलोकन करावे. याच प्रमाणें पुरुषांनी आम्हाला अगदीं प्रतिबंधांत ठेवलें आहे अशी आर्यस्त्रियांची अलिकडे ओरड ऐकूं येते; पण जैनधर्मांत याहीपेक्षां स्त्रियांनां अधिक प्रतिबंध आहेत. आर्यधर्मांत स्त्रियांनां पतिबरोबर मोक्ष सर्व शास्त्रांत सांगितला आहे. भारतांत नवऱ्याला सोडून एका ऋषिपत्नीनें शंकराचें तप केलें असे प्रसिद्ध आहे. वेदांतील मैत्रेयी, महाभारतांतील सुलभा, योगवासिष्ठांतील लीला व चूडाला आणि त्रिपुरारहस्यांतील हेमलेखा या प्राचीन स्त्रिया मुक्त झाल्या असून, अर्वाचीन जनाबाई, मीराबाई, वेणूबाई, आकाबाई इत्यादि मुक्तस्त्रियांचीं उदाहरणें स्पष्ट आहेत; (य११पू.३६४) पण दिगंबर जैनधर्मांत स्त्रियांनां मोक्षच होत नाहीं असें स्पष्ट प्रतिपादन केलें आहे. भोजदेव राजाचे वेळीं कोणी प्रभाचंद्र देवसूरि म्हणून जैनपंडितवर होऊन गेलेत. त्यांनीं ''प्रमेयकमलमार्तंड'' नांवाचा बाराहजार अनुष्टुप् श्लोक होऊं शकतील एवढा संस्कृतांत ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ जैनमतांत मोठा न्यायसिद्ध मानल्या जातो. याच्या द्वितीय परिच्छेदांत असें म्हटलें आहे:-

**''इति सिद्धं अनन्तज्ञानादि चैतन्यविशेषेऽवस्थानं पुंसो मोक्ष इति''**

अनंतज्ञानादिचैतन्यविशेषाचे ठायीं अवस्थानरूप मोक्ष पुरुषालाच होतो असें म्हटलें असून, याच परिच्छेदांत स्त्रियांनां मोक्ष कां होत नाहीं याविषयीं आक्षेप घेऊन समाधान केलें आहे:

**ननु पुंस एवानंतज्ञानादिस्वरूपलाभलक्षणो मोक्ष इत्युक्तं स्त्रीणामप्यस्योपपत्तेः ।**
**तथाहि अस्ति स्त्रीणां मोक्षोऽविकलकारणत्वात्पुरुषवत् ।**
**तदसिद्धेतोरासिद्धेः ।**
**तथाहि मोक्षहेतुर्ज्ञानादिपरमप्रकर्षः स्त्रीषु नास्ति परमप्रकर्षत्वात् सप्तमपृथ्वीगमन-कारणापुण्यपरमप्रकर्षवत् ।**
**यदि नाम तत्र तत्कारणापुण्यपरमप्रकर्षाभावो मोक्षहेतोः परमप्रकर्षाभावे किमायातम्?**
**कार्यकारणव्याप्यव्यापकभावाभावेहि तयोः कथमन्यस्याभावेऽन्यस्याभावोऽतिप्रसंगात् ।**
**इति चेत् सत्यम् ।**
**अयं हि तावन्नियमोऽस्ति ।**
**यद्वेदस्य मोक्षहेतुपरमप्रकर्षस्तद्वेदस्य तत्कारणापुण्यपरमप्रकर्षोप्यस्त्येव ।**
**यथा पुंवेदस्य ।**

न च चरमशरीरेण व्यभिचारः पुंवेदसामान्यापेक्षयोक्तेः ।

विपरीतस्तु नियमो न संभवत्येव नपुंसकवेदे तत्कारणापुण्यपरमप्रकर्षे सत्यप्यन्यस्यानभ्युपगमात् पुंस्यभ्युपगमाच्च, अनित्यत्वस्य प्रयत्नानन्तरीयकत्वेतरत्ववत् ।

ततश्च स्त्रीवेदस्यापि यदि मोक्षहेतुः परमप्रकर्षः स्यात्तदा तदभ्युपगमाद् एवापरोप्यनिष्ठोऽ वश्यमापद्यते ।

अन्यथा पुंस्यपि न स्यात् ।

सिद्धे च प्रतिबंधद्वयाभावेऽपि कृतिकोदयादिवदुक्तप्रकर्षयोरविनाभावे स्त्रीणां तत्कारणापुण्यपरमप्रकर्षप्रतिषेधेन मोक्षहेतुपरमप्रकर्षो निषिध्यते ।

न च नपुंसकस्यमोक्षहेतुपरमप्रकर्षोऽस्ति तत्कारणापुण्यपरमप्रकर्षसद्भावात्पुंवत्।

पुंसो वा नास्त्यत एव नपुंसकवत् ।

तत्कारणाऽपुण्यपरमप्रकर्षो वा नपुंसके नास्ति ।

परमप्रकर्षत्वात् स्त्रीवदित्यप्यनिष्ठापत्तिरुभयप्रसिद्धाद्धेतोरुभयप्रसिद्धस्य निषेधेनोभयोस्तुल्यत्वात् इत्यभिधातव्यम् ।

उभयाभिप्रेतागमेन बाधनात् । (य११पू.३६५)

स्त्रीणां तु तत्कारणापुण्यपरमप्रकर्ष पराभ्युपगतेनैव मोक्षहेतुपरमप्रकर्षेणापाद्य तत्प्रतिषेधेन तद्धेतुरेव प्रतिविध्यत इत्यस्ति विशेषः ।

यद्वानोक्तानुमाने तत्कारणापुण्य परमप्रकर्षाभावाद्धेतोर्मोक्षहेतुपरमप्रकर्षः स्त्रीषु निषिध्यतेऽपि तु परमप्रकर्षत्वात् दृष्टान्ते दृष्टसाध्यव्याप्तिकात् न चात्र केनचिद् व्यभिचारः स्त्री संबंधिनः कस्यांचित्परमप्रकर्षस्यासंभवात् ।

मायापरमप्रकर्षोस्तीतिचेन्न स्त्रीणां मायाबाहुल्यमात्रस्यैवागमे प्रसिद्धेः ।

अन्यथा पुंवत्सप्तमपृथिवीगमनानुषंगः ।

मायापरमप्रकर्षादन्यत्वे सतीति विशेषणाद्वा न दोषः ।

तन्न ज्ञानादिपरमप्रकर्षो मोक्षहेतुस्तत्रास्तीत्यसिद्धो हेतुः ।

न खलु ज्ञानादयो यथा पुरुषे प्रकृष्यमाणाः प्रमाणतः प्रतीयन्ते तथा स्त्रीष्वपि ।

अन्यथा नपुंसके ते तथा स्युः ।

तथा चास्याप्यपवर्गप्रसंगः ।

संयमस्तु तद्धेतुस्तत्रासंभाव्य एव ।

तथाहि । स्त्रीणां संयमो न मोक्षहेतुः ।

नियमेनर्द्धिविशेषाहेतुत्वान्यथानुपपत्तेः यत्र हि संयमः सांसारिकलब्धीन मन्यहेतुस्तत्रासौ कथं निःशेषं कर्म विप्रमोक्षलक्षणमोक्षहेतुः स्यात्?

नियमेन च स्त्रीणामेव ऋद्धिविशेषहेतुः संयमो नेष्यते, न तु पुरुषाणाम् ।

यदिहि नियमेन लब्धिविशेषस्या जनकः संयमः क्वचिदन्यत्राविवादास्पदीभूते मोक्षहेतुः प्रसिद्ध्येत् तदा तद्दृष्टान्तावष्टंभेनात्राप्यसौ तया प्रत्येतुं शक्यते, नान्यथातिप्रसंगात्।

संयममात्रं तु सदप्यासां न तद्धेतुस्तीर्यग्गृहस्थादिसंयमवत् ।

सचेलसंयमत्वाच्च नासौ तद्धेतुर्गृहस्थसंयमवत् ।

न चायमसिद्धो हेतुः ।

न हि स्त्रीणां निर्वस्त्राः संयमो दृष्टः प्रवचनप्रतिपादितो वा ।

नच प्रवचनाभावेऽपि मोक्षसुखाकांक्षया तासां वस्त्रत्यागो युक्तोऽर्हप्रणीतागमोलंघनेन मिथ्यात्वाराधनाप्राप्तेः यदि पुनर्नृणामचेलोसौ तद्धेतुः स्त्रीणां तु सचेलस्तर्हि कारणभेदान्मुक्तेरप्यनुषज्येत भेदः स्वर्गादिवत् ।

देशसंयमिनश्चैवं मुक्तिः प्रसज्यते ।

तथा च लिंगग्रहणमनर्थकम् ।

सचेलसंयमश्च मुक्तिहेतुरिति कुतोऽवगतम्?

स्वागमाच्चेन्नास्याम्मान् प्रत्यागमाभासत्वाद्भवतो यज्ञानुष्ठानागमवत् ।

स्त्रियो न मोक्षहेतुसंयमवत्यः साधूनामवन्द्यत्वाद्गृहस्थवत् ।

न चात्रासिद्धो हेतुः

''वरिसस यदि क्खिया ए अज्ञा ए अज्ज दिक्खि ओ साहू ।

अभिगमणवंदणणमंसणविण एण सो पूज्यो'' इत्यभिधानात् ।

बाह्याभ्यन्तर परिग्रहवत्वाच्च न तास्तद्वंत्यस्तद्वत् ।

न चायमसिद्धो हेतुः प्रत्यक्षेणावगतोहि वस्त्रग्रहणादि बाह्यपरिगहोऽभ्यन्तरं स्वशरीरानुरागादिपरिग्रहमनुमापयति । (य११पू.३६६)

न च शरीरोष्मणा वातकायिकादिजन्तूपघातनिवारणार्थं स्वशरीरानुरागादि अभावेप्यसावुपादीयते इत्यभिधेयं पुंसामाचेलक्यव्रतस्य हिंसात्वानुषंगात् ।

तथाचार्हदादयो मुक्तिभाजस्तदुपदेष्टारो वा नस्युः ।

किन्तु सवस्त्रा एव गृहस्था मुक्तिभाजो भवेयुः ।

न चाचेलक्यं नेष्यते ''आचेलक्कुदेसियसेज्ञाहर रायपिंडकिदिकम्म'' इत्यादेः पुरुषंप्रति दशविधस्य स्थिति कल्पस्य मध्ये तदुपदेशात् ।
किं च गृहीतेऽपि वस्त्रे जन्तूपघातस्तदवस्थः ते नानावृतपाणिपादादिप्रदेशोष्मणा तदुपघातस्य परिहर्तुमशक्तेः वस्त्रस्य यूकालिक्षाद्येनेकजन्तुसम्मूर्च्छनाधिकरणत्वाच्च।
तथाविधस्यापि स्वीकरणे मूर्धजानां लुंचनादिक्रिया न स्यात् ।
वस्त्राकुंचनादेर्जातवातेनाकाशप्रदेशावस्थितजन्तूपपीडनाच्चव्यजनादिवातवत् ।
किंचैवमनेकप्राण्युपघातनिवारणार्थमविहारोप्यनुष्टेयो वस्त्रग्रहणवदविशेषात् ।
प्रयत्नेन गच्छतो जन्तूपघातेऽप्यहिंसा निश्चलेऽपि समा ।
यथा च यज्ञानुष्ठानं पशुहिंसांगत्वेनाश्रेयस्करत्वात् त्याज्यं तथा वस्त्रग्रहणम् अप्यविशेषात् ।
एतेनसंयमोमपकरणार्थं तदित्यपिनिरस्तं ।
किं च बाह्याभ्यंतरपरिग्रहपरित्यागः संयमः ।
स च याचनसीवनप्रक्षालनशोाषणनिक्षेपादानचौरहरणादिमनः संक्षोपकारिणि वस्त्रे गृहीते कथं स्यात् ?
प्रत्युत संयमोपघातकमेव तत्स्याद्वाह्याभ्यन्तरनैर्ग्रंथ्यप्रतिपंथित्वात् ।
''हीशीतार्त्तिनिवृत्यर्थं वस्त्रादि यदि गृह्यते ।
कामिन्यादिस्तथाकिन्न कामपीडादिशांतये ॥१॥
येन येन विना पीडा पुंसां समुपजायते ।
तत्तत्सर्वमुपादेयं लावकादिपलादिकम् ॥२॥
वस्त्रखंडे गृहीतेऽपि विरक्तो यदि तत्त्वतः ।
स्त्रीमात्रेऽपि तथा किन्न तुल्याक्षेपसमाधितः ॥३॥
नापि तन्वीमनः क्षोभनिवृत्त्यर्थं तदादृतम् ।
एतद्वांछाऽहेतुकत्वेन तन्निषेधस्य संभवात् ॥४॥
चक्षुरुत्पाटनं पट्टबंधनं च प्रसज्यते ।
लोचनादेस्तदुत्पत्तौ निमित्तत्वाविशेषतः ॥५॥
चलचित्तांगना संयतं च तपस्विनम् ।
यदीच्छति भ्रातृवत्किं दोषस्तस्यमतो नृणां ॥६॥
बीभत्सं मलिनं साधुं दृष्ट्वा शवशरीरवत् ।
अंगना नैव रज्यन्ते विरज्यन्ते तु तत्त्वतः ॥७॥
स्त्रीपरीषह भग्नैश्च बद्धरागैश्च विग्रहे ।
वस्त्रमादीयते यस्मात्सिद्धं ग्रंथद्वयं ततः ॥८॥
न चैवं जन्तुरक्षागंडादिप्रतीकारार्थं पिच्छौषधादौ गृह्यमाणेऽप्ययं दोषः समानस्त्रीचतुरपिच्छग्रहणस्य जन्तुरक्षार्थत्वात् शरीरे ममेदंभावाऽसूचकत्वाच्च औषधस्यापि प्रतिपन्नसामर्थ्यस्य गंडादेर्व्यावृत्तिहेतुत्वान्नाग्न्या विरोधित्वाच्च ।
(य११पू.३६७) वस्त्रे तु विपर्ययात् परमनैर्ग्रंथ्यसिद्ध्यर्थं पिच्छम्याप्यग्रहणाच्चौषधवत् ।
पिण्डौषध्यादयो हि सिद्धान्तानुसारेणोद्गमादिदोषरहिता रत्नत्रयाधरा धनहेतवो गर्ह्यमाणा न कस्यापि मोक्षहेतोर्हन्तारः ।
नहि तत् ग्रहणे रागादयोंतरंगा बहिरंगा वा स्वभूषावेषादयो ग्रंथा जायन्ते ।
अतस्ते मोक्षहेतोरुपकर्तार एव ।
पिंडाग्रहणमंतरेण ह्यपूर्णकालेऽपि विपत्तेरापत्तेरात्मघातित्वं स्यात् ।
न तु वस्त्रे, षष्टाष्टमादिक्रमेण च मुमुक्षुभिः पिण्डेऽपि त्यज्यते ।
न तु स्त्रीभिः कदाचिद्वस्त्रम् ।
अथ वस्त्रादनस्याखिलस्य त्यागात्साकल्येनासां बाह्यं नैर्ग्रंथ्यं तर्हि लोभादन्यकषायत्यागादेवाबाह्यमपि स्यात् ।
न च गृहीतेऽपि वस्त्रे ममेदं भावस्याभावात्तदवतिष्ठतेविरोधात् ।
बुद्धिपूर्वकं हि हस्तेन पतितवस्त्रमादाय परिदधानोऽपि तन्मूर्च्छारहित इति कश्चेतनः श्रद्दधीत तन्वीमाश्लिष्यतोऽपि तद्रहितत्वप्रसंगात् ।
ततो वस्त्रग्रहणे बाह्याभ्यन्तरपरिग्रहप्राप्ते नैर्ग्रंथ्यद्वयासंभवान्न स्त्रीणां मोक्षः ।
स हि बाह्याभ्यन्तरकारणजन्यः कार्यत्वान्माषपाकादिवत् । तच्चबाह्यमाभ्यंतरं च कारणमाकिंचन्यम् । तदभावे कथं स स्यात्?
इति परहेतोरसिद्धेर्नानुमानात्स्त्रीमुक्तिसिद्धिः ।
नाप्यागमात्तन्मुक्तिप्रतिपादकस्यास्याभावात् ।
''पुंवेदंताजेपुरिसाखवगसेडिमारूढा । सेसोदयेण वितहा झाणुवजुत्तायतेदुसिज्झंति'' इत्यादेरप्यागमस्य स्त्रीमुक्तिप्रतिपादकत्वाभावः । स हि पुंवेदोदयवत् शेषवेदोदयेनापि पुंसामेवापवर्गावेदक उभयत्रापि पुरुषा इत्यभिसंबंधात् । उदयश्च भावस्यैव न द्रव्यस्य । स्त्रीत्वान्यथानुपपत्तेश्चासां न मुक्तिः ।

**आगमे हि जधन्येन सप्ताष्टभिर्मवैरुत्कर्षेण द्वित्रैजीवस्य रत्नत्रयाराधकस्य मुक्तिरुक्ता । यदाचास्य सम्यग्दर्शनाराधकत्वं तत्प्रभृतिसर्वासु स्त्रीषूत्पत्तिरेव न संभवतीति कथं स्त्रीमुक्तिसिद्धिः । ननु चानादिमिथ्यादृष्टिरपिजीवः पूर्वभवनिर्जीर्णा शुभकर्मा प्रथमतरमेव रत्नत्रयमाराध्य भरतपुत्रादिवन्मुक्तिमासादयत्यतः स्त्रीत्वे नोत्पन्नस्यापि मुक्तिरविरुद्धेति तदप्ययुक्तं । पूर्वनिर्जीर्णा शुभकर्मणः स्त्रीवेदेनोत्पत्तेरसंभवात्तस्याप्यशुभकर्मत्वेन निर्जीर्णत्वात् । कथं पुनः स्त्रीवेदस्याशुभकर्मत्वमितिचेत् सम्यग्दर्शनोपेतस्य तत्त्वेनोत्पत्तेरयोगात् । ततो नास्ति स्त्रीणां मोक्षः पुरुषादन्यत्वान्नपुंसकवत् । अन्यथाऽस्याप्यसौ स्यात् । न चैत्तद्वाच्यं ''नास्तिपुंसो मोक्षः स्त्रीतोन्यत्वान्नपुंसकवत्''उभयवादिसंमतागमेन बाधितत्वात् । भवदागमस्यचास्मान्प्रति अप्रमाणत्वात् ।**

**तथा स्त्रीणां मोक्षो नास्तुत्कृष्टध्यानफलत्वात्सप्तम-पृथ्वीगमनवत् । (य११पू.३६८) अतोऽपि न तासां मुक्तिसिद्धिः । ततोऽनंत चतुष्टयस्वरूपलाभलक्षणो मोक्षः पुरुषस्यैवेतिप्रेक्षादक्षैः प्रतिपत्तव्यम् ।**

भावार्थः- या दीर्घवर्णसमुच्चयाचा सारांश आहे कीं, पुरुषालाच मोक्ष आहे असें कां म्हणतां ? स्त्रियांनांही मोक्ष झाला पाहिजे असें विचारलें असतां, प्रभाचंद्रसूरिदेव आपला सिद्धान्त सांगतात. ज्या ज्ञानपुण्यानें मोक्ष होतो त्या ज्ञानपुण्याचा उत्कर्ष स्त्रियांमध्यें नाही. स्त्रियां प्रमाणें धर्म तर नपुंसकासही आहे, पण त्याला मोक्ष नाहीं. पुनः स्त्रियांनां संयमही होऊं शकत नाही. कारण अंतर्बाह्य संग्रहाचा त्याग करणें याचें नांव संयम म्हटलें आहे; तसा त्या स्त्रियांनां संभवत नाहीं. स्त्रियांच्या वस्त्रपरिधानादिकांचा त्याग तर पाहिलाही नाहीं. व ऐकिलाही नाहीं, जिनागमांत न सांगितलेला वस्त्रत्याग जर स्त्रियांकडून करविला तर आर्हताच्या उपदेशाचें उल्लंघन झाल्यामुळें मिथ्या आराधन केलें आहे असें होईल. इतर आगम तर आम्हास प्रमाण नाहीं. जिनागमांत स्त्रियांनां कपट पुष्कळ असतें असें म्हटले आहे. आतां सम्यक्दर्शन, सम्यक्ज्ञान, व सम्यक् चारित्र या रत्नत्रयीचा पूर्व जन्मांत अभ्यास करून नंतर स्त्री जन्म पावलेल्या स्त्रियांनां मोक्ष होऊ शकेल, असेही म्हणतां येत नाही; कारण ज्यानें उत्कृष्ट रत्नत्रयीकर्माचा अभ्यास केला आहे त्याला निकृष्ट असा जन्मच होत नाहीं. तात्पर्य नपुंसकाप्रमाणें स्त्रियांनांही मोक्ष नाहीं.

पुनः थोडेसें आर्यधर्माकडे अवलोकन केल्यास नपुंसक देखील तरून गेल्याच्या कथा भक्तमालादि ग्रंथांत आहेत. उत्कृष्ट कर्माचा, निकृष्टजन्मांत येत नाहीं असें जैनमतांत म्हटल्यामुळें, इतर जातींत कधींच साधू उत्पन्न होत नाहींत म्हणून, इतर जातींशीं त्यांचा धार्मिक तिरस्कार निवृत्त होणें कधींच शक्य नाहीं. पण ब्राह्मणधर्माची गोष्ट तशी नाहीं. कर्माचें फल अनंत असल्यामुळें अन्यजातींत आलेलाही प्रारब्धवशाने मुक्त होतो. याविषयीं विदुर, धर्मव्याधादिकांची उदाहरणें स्पष्ट आहेत. तेव्हां मी मराठे जातीस व इतर जातींस विनंति करितों कीं, आपलें ग्रंथ न पाहतां प्राचीन ब्राह्मणांवर दोषारोप करून आपल्या धर्माची आपण हेटाळणी करणें व आपसांत द्वेष धरून आपलाच नाश करून घेणें हितावह नाहीं. (य११पू.३६९)

आर्यावर्तावर दैवयोगानें निरनिराळ्या लोकांचें राज्य झाल्यामुळें निरनिराळ्या लोकांच्या धर्मसमजुती थोड्या प्रमाणानें अविद्वान् आर्यलोकांत मिसळल्या आहेत त्या विद्वानांनीं दूर केल्या पाहिजेत.

आपल्या आगमांत जसा वर्णाविषयीं संशय आहे, तसा जैनागमांत नाहीं. श्वेतांबर जैनधर्मात स्त्रियांनां मोक्ष सांगितला आहे. तो प्राचीन, अर्वाचीन श्वेतांबर ग्रंथांतून पाहून घ्यावा. पण श्वेतांबर व दिगंबर परस्परांनां नवीन म्हणतात. तथापि दोन्ही पंथांत शूद्रांनां मौंजीबंधन सांगितलें नाहीं. उत्तरीय वस्त्रविधि सांगितला आहे. जैनशूद्राला उत्तरीय देण्याचा विधि संक्षेपतः येणें प्रमाणें आहेः जैनागमादिकांत सांगितल्याप्रमाणें स्नानादिक करून, जैनशूद्रानें आपल्या घरच्या गुरूजवळ येऊन, बसून, नमस्कार करून, हात जोडून असें वाक्य उच्चारावें :-

शिष्यः- भगवन् प्राप्तमनुष्यजन्मार्यदेशार्यकुलस्य मम बोधिरूपां जिनाज्ञां देहि।

गुरुरुवाचः- ददामि ।

शूद्र शिष्यः- न योग्योऽहमुपनयनस्य तज्जिनाज्ञां देहि ।

गुरुरुवाचः- ददामि ।

या वाक्यांचा अर्थ स्पष्ट आहे. शूद्र शिष्यानें मी उपनयनाला योग्य नाहीं असें म्हणावें, हीच गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. नंतर शूद्राला कापसाचें किंवा रेशमाचें उत्तरीय द्यावें असें म्हटलें आहे. पुढें शूद्राचा व्रतादेश सांगितला आहे तो येणें प्रमाणें:-

**सम्यक्त्वेनाधिष्ठितानि व्रतानि द्वादशैवहि ।**
**धार्याणि भवतानैव कार्यः कुलमदस्त्वया ॥१॥**
**जैनर्षीणां तथा जैनब्राह्मणानामुपासनम् ॥**
**विधेयं चैव गीतार्थाचीर्णं कार्यं तपस्त्वया ॥२॥**
**न निंद्याःकोऽपि पापात्मा न कार्यं स्वप्रशंसनम् ॥**
**ब्राह्मणेभ्यस्त्वया मानं दातव्यं हितमिच्छता ॥३॥**
**शेषं चतुर्वर्णशिक्षाश्लोकव्याख्यानमाचरेत् ॥**
**उत्तरीयपरिभ्रंशे भंगे वाप्युपवीतवत् ॥४॥** (य११पू.३७०)
**कार्यं व्रतं प्रेतकर्म करणं वृषल त्वया ॥**
**युक्तिरेषोत्तरासंगानुज्ञायां च विधीयते ॥५॥**
**क्षात्राणामथ वैश्यानां देशकालादि योगतः ॥**
**त्यक्तोपवीतानां कार्यमुत्तरासंगयोजनम् ॥६॥**
**धर्मकार्ये गुरोर्दृष्टौ देवगुर्वालयेऽपि च ॥**
**धार्यस्तथोत्तरासंगः सूत्रवत् प्रेतकर्मणि ॥७॥**
**अन्येषामपि कारूणां गुर्वानुज्ञां विनापिहि ॥**
**गुरुधर्मादि कार्येषु उत्तरासंग इष्यते ॥८॥**

याही श्लोकांचा अर्थ स्पष्ट असून वर्णत्रयांची सेवा व उत्तरीयपालन हे शूद्राचे धर्म या श्लोकांत सांगितले आहेत.

आर्यधर्मांत तर मंत्ररहित शूद्रांचें उपनयन करावें असें डल्लनभाष्यांत[१२] व धर्मसिंधूंत सांगितलें आहे. शूद्राला पढवावें असें सुश्रुतांत साांगितलें आहे. स्त्रियांनां नमस्कार करण्याविषयीं जैन धर्मांत जसा निषेध आहे तसा आर्यधर्मांत नाहीं. सारांश जैनागमांत जन्मानेंच जाति सांगितली आहे. ग्रंथ लिहिण्याचा निषेध असल्यामुळें या ग्रंथांचें अनेक तऱ्हेनें परिवर्तन झालें आहे. म्हणून जैनग्रंथांविषयीं निश्चित सांगतां येत नाहीं. परंतु जैन ग्रंथांचें परिवर्तन झालें, तरी जैन समजुती प्राचीनच आहेत असें सर्व जैनांचें मत आहे. जैनांत एवढा जन्मजातिवाद असून त्यांच्यांत भांडण सुरू झालें नाहीं. आणि आमच्या मध्यें इतक्या सवलती असून त्याला आरंभ झाला आहे, तेव्हां याचें मूळ काय, हें कोणाच्या लक्षांत आलें असेल तें असो.



## संप्रदायानुसार वर्ण-निर्णय

आतां संप्रदायाप्रमाणें मला निर्णय करणें भाग असल्यामुळें तातांच्या वाक्यावरूनच मला निर्णय केला पाहिजे. तातांची वाक्यें दोन्ही प्रकारचीं आहेत.

**''सांगें शूद्राघरीं आघवीं । पक्कान्नें आहाति बरवीं ।**
**तीं द्विजें केंविं सेवावीं । दुर्बळ जरी जाहाला ॥**
**एरव्हीं दैत्यकुळ साचोकारें । परि इंद्रही सरी न लाहे उपरे ।**
**म्हणोनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण''** ॥ (ज्ञाने. अ,९ श्लो,३२ओ,४५२)

या दोन वाक्यांत पहिल्या वाक्याचा अर्थ भोजनाविषयीं जाति मानावी असा असून, (य११पू.३७१) दुसऱ्या वाक्याचा अर्थ भजनाविषयीं जाति मानूं नये, असा आहे; व आणखीही जातिपर व जातिनिषेधक वाक्ये सांपडतात, म्हणून ब्राह्मणच एक सत्पुरुष, इतर नाहींत अशा प्रकारचा आग्रह सोडून देऊन, कोणत्याही जातींतील सत्पुरुष समान आहेत अशी दृढ बुद्धि ठेवावी; आणि गुरुप्रसाद व भगवत्प्रसाद ह्या ठिकाणीं ज्ञानी वांचून व इतर सत्पुरुषांनीं विदेही असल्यास अद्वैत व सदेही असल्यास द्वैत मानावें. भक्तीचा उपदेश कोठूनही ग्रहण करावा. आणि भक्तिशास्त्राचे अध्ययनादिक सर्वांनां समान आहेत; हें पुढें सांगेन. आतां,

**''गंगोदक जरी जालें । तरि मद्यभांडा आलें ।**
**तें घेऊं नये कांहीं केलें । विचारीं पां''** ॥ (ज्ञाने, अ,१७. श्लो, २.ओवी, ५२)

ह्या वाक्यावरून भगवत्प्रसाद देखील चांडालादिकांच्या हातचा ग्रहण करूं नये. आतां फळादिकांचा प्रसाद होत असतांनां अन्नाच्या प्रसादाचा जो आग्रह होत असतो, त्यांत सत्त्वगुण नसतो. कारण यदृच्छालाभसंतुष्टता हा सत्त्वाचा धर्म सुटून अन्नाचा राग असा रजोगुण त्या ठिकाणीं प्राप्त होतो. तरी पण,

**''श्रीगुरूचें उशिटें । लाहे जैं अवचटें ।**
**तैं तेणें लाभें विटे । समाधीसी''** (ज्ञाने,अ,१३.श्लो,७.ओ,४५०)

इत्यादि वाक्यांनीं गुरुप्रसाद व भगवत् प्रसादाचा आदर करावा असें होतें, परंतु ते आज्ञारूपानें व अवघ्राणादि रूपानेंही त्याची व्यवस्था लागूं शकते.

आपत्कालीं मात्र अन्नजलादिकांचा निषेध मी मानीत नाहीं.

जगन्नाथ, पंढरी, आणि वृंदावन ह्या ठिकाणीं अन्नाच्याही भगवत्प्रसादाला

निषेध मानीत नाहींत. आतां हीं तातांचीं वाक्यें जन्मपर आहेत किंवा गुणपर आहेत याविषयीं निर्णय करणें अत्यंत कठिण आहे. तरी पण शूद्राला विशेषण देतानां -

**''ते पापयोनि मूढ । मूर्ख जैसे कां दगड ।**
**परि माझ्याठायीं दृढ । सर्वभावें''॥** (ज्ञाने.अ.९.श्लो.३२.ओ.४४४) **(य११पू.३७२)**

असें म्हटलें असून :-

**''तें द्विजासीच ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाममंत्र ।**
**आवर्तणें पवित्र । पावावया तत्व''** ॥ (ज्ञाने,अ.१६.श्लो,१.ओ,१०४)

या वाक्यानें त्यांच्याविषयीं वेदाध्ययनाचा निषेध केला आहे. म्हणून तातांची वाक्यें बहुशः जन्मपरच आहेत. असें म्हणावें लागतें. भक्तीमध्यें मात्र त्यांनां जातीची अगदींच भीड नाहीं. आतां ब्राह्मणच गुरु होऊं शकतो, कीं अन्यवर्णाचाही गुरु होऊं शकतो, या विषयीं तातांचें स्पष्ट वाक्य नाहीं. तथापि रामेश्वरादि ब्राह्मणाला त्यांनी तुकाराम महाराजांकडे पाठविलें, ह्या त्यांच्या चरित्रावरून त्यांना गुरूमध्यें विशेष वर्णभेद संमत नव्हता. आणि विसोबा खेचर ब्राह्मण असून व त्यांनी मौंज वगैरे कांहीं केली नसून व यतिपुत्र असूनहि खेचरांनीं बलेंकरून ताटांतील ग्रास घेतला असतांही, त्याला अनुग्रह दिला. या त्यांच्या चरित्रावरून गुरुप्रसाद व भगवत्प्रसाद कोणाच्याही हातचा ग्रहण करावा असा विधि निष्पन्न होतो. परंतु तो खेचरांसारखे जे अधिकारी आहेत त्यांच्याच करितां आहे. आणि यद्यपि शूद्राला वेदाधिकार नाहीं असें ते म्हणतात. तथापि -

**''तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें ।**
**वेद वेठला भलतेणें । सेव्य होआवया''** ॥ (ज्ञाने,अ,१८.श्लो,६६.ओ,१४५९)

याप्रमाणें भारतपठणाचा अधिकार शूद्राला ते देतात. आणि रेड्याचामुखीं वेद बोलविले ह्या त्यांच्याच चरित्रावरून कृपेनें स्वभक्ताची उपेक्षा करीत नाहींत. ह्या सर्वांचें तात्पर्य एवढेंच कीं - तातप्रसाद मी स्वतः कोठूनही ग्रहण करीन; परंतु ज्ञानी नसल्यास इतर पुरुषांनी तो ग्रहण करूं नये आणि केलाच तर स्वजातींतून वेगळें होऊन तातभजन खुशाल करावें व आपल्या हातचें दुसऱ्या कोणास जेऊं घालूं नये.

अध्ययनाविषयीं विशेष विचार पुढें करीन. आतां संप्रदायांत उपदेशादिकां



करितां मात्र ब्राह्मणापासून म्लेंच्छापर्यंत सर्वच पुरुष अधिकारी आहेत असें मी मानतों. व त्याचप्रमाणें पतिव्रता आणि वेश्या अधिकारी आहेत असें मी म्हणतों. (य११पू.३७३)

आणि भेसंडींत मात्र कोणाच्याही हातचें जेवावे व कांहींही करावें असें मानतों. पण तें भेसंडींत पेसंडी असतानांच.

**ओव्या :- हा ठावोवरी निरूपणीं । आगमाचेनि अनुगुणीं ।**
**आघवेचि नामस्मरणीं । तातभजनीं लावावे ॥११४॥**
**मधुराद्वैतरीति । शिकवावी शिवकृष्णभक्ति ।**
**यावीण वृथा उपद्यापरीति । करूंचि नये ॥११५॥**
**आपण जरी भ्रष्टला । आणि भगवद्भजनीं लागला ।**
**तरी तो तरेल वहिला । संशयो नाहीं ॥११६॥**
**परी दुजिया बळेंचि भ्रष्टवून । जो करील भगवद्भजन ।**
**तो नाममाहात्म्यें जावो तरोन । परि सांप्रदायिक पूर्ण आमुचा नव्हे ॥११७॥**
**आतां अभक्त ब्राह्मणाकरवीं जेवितां । त्या परीस भक्तप्रसादचि योग्य तत्वता ।**
**एवढा अपराध करोनि तत्वतां । क्षमा ताता याचितु असें ॥११८॥**
**श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदूनि पाउली ।**
**अध्यायकुसुममाळ समर्पिली । चरणावरी ॥११९॥ (य११पू.३७४)**

**॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते संप्रदायसुरतरौ पूर्वविहारे यथार्थवर्णनिर्णयपूर्वक संप्रदायविवेको नाम द्वादशं कुसुमम् ॥**

**॥श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. ॥**

॥ पूर्वविहार समाप्त ॥

## अध्याय १२ : टीपा

(१)अचिन्ह (२)ज्यांना गती सांगितली नाही अशांना (३)मुकाट्याने (४)श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी (५)लक्षण लागू पडत नाही (६)कर्म केल्याने उत्पन्न होणारे (७)बीजाचा संकर ज्याचे ठिकाणी झाला आहे (८)बिस्कुटे (९)विदूर (१०)आपापल्या शास्त्रांवर (११)ज्या अध्यासात आरोपित पदार्थ व अधिष्ठान यातील गुणांचे सादृष्य कारण नाही तो (१२)सुश्रुत नांवाच्या वैद्यक ग्रंथावरील टीका. ॥ पूर्वविहार समाप्त ॥

# श्रीगुलाबरावमहाराजांचे साहित्य : विषयानुरूप सूची

अनुक्रम यष्टी

## सूत्रगंथ

१. अन्तर्विज्ञानसंहिता (सं) य १६
२. ईश्वरदर्शनम् (सं) य १६
३. समसूत्री (सं) य १६
४. दुर्गातत्त्वम् (सं) य १६
५. काव्यसूत्रसंहिता (सं) य १६
६. शिशुबोधव्याकरणम् (सं) य १६
७. न्यायसूत्राणि (सं) य १६
८. एकादशीनिर्णयः (सं) य १६
९. पुराणमीमांसा (सं) य १६

## आकर ग्रंथ

१०. संप्रदाय सुरतरु, (भा.१,२) य ११

## भाष्यग्रंथ

११. नारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला
संस्कृतभाष्यं च (सं) य १६
१२. ना.भक्तिसूत्रभाष्य ओवी ५५८ य १४
१३. प्रियलीलामहोत्सव १ (भागवतभाष्य)
आमंत्रणविलास य ३
१४. प्रियलीलामहोत्सव २ (भागवतभाष्य)
आगमनविलास य १४
१५. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः (सं) य १६
१६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः (सं) य १६
१७. ब्रह्मसूत्रव्याख्या य १५
१८. निगमान्तसुभा य १५
१९. ब्रह्मसूत्रांवर निरूपणे य १८
२०. भगवद्गीतासंगति य १
२१. मनोहारिणी (हिन्दी) य १९
२२. गीत निरूपणे (शांताराम) य १७
२३. गीत प्रवचने (अन्नपूर्णाआईस) य १७
२४. ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता) य १५
२५. षट्पदध्वनिः य १५
२६. ईशावास्योपनिषद् य १५
२७. ऋग्वेदटिप्पणी (सं) य १६
२८. चौसष्टी (अमृ.अ१ वर) य १
२९.चिरंजीवपदाभ्यास य २(पू)
३०. बालवासिष्ट (सं) य १६
३१. योगवासिष्ट तत्त्व य १७
३२. योगवासिष्ट निरूपणे
(मातोश्री रंगूताईस) य १८

## शास्त्रग्रंथ

३३. सुखवरसुधा य १३
३४. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका य १३
३५. शास्त्रसमन्वयः (सं) य १६
३६. आगमदीपिका (सं) य १६
३७. युक्तितत्त्वानुशासनम् (सं) य १६
३८. प्रेमनिकुंज य १०
३९. शांतिसुधाकर य २पू
४०. वेदान्तप्रक्रियासमुच्चय य १५
४१. वेदान्तनिरूपण य १५
४२. तत्त्वबोधः (सं) य १६
४३. षड्दर्शनलेशसंग्रहः (सं) य १६

## भक्तिग्रंथ

४४. भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) य १
४५. निगमान्तपथसंदीपक य १
४६. भगवद्भक्तिसौरभ य २उ
४७. प्रीतिनर्तन य २उ
४८. नित्यतीर्थ य २पू
४९. प्रिय पाहुणेर य २पू
५०. भक्तितत्त्वविवेक (सं) य १६
५१. प्रियप्रेमोन्माद (सं) य १६
५२. गोपिकापादपीयूषलहरी य १५
५३. गोविन्दानन्दसुधा (सं) य २उ
५४. कान्तकान्तावाक्यपुष्पम् (सं) य१/य१६

## योग ग्रंथ

५५. निदिध्यासनप्रकाश य १
५६. ध्यानयोगदिवाकर य २उ
५७. सोपानसिद्धि य २पू
५८. हिरण्ययोग (स्वप्नयोग) य १५
५९. योगांगयमलक्षण य १५
६०. योगप्रभाव (पद्य) य १५
६१. योगप्रभाव (गद्य) ४४ सूत्रे य २०
६२. ज्ञाने. कुंडलिनी निरूपण. य १५

## सांख्य ग्रंथ

६३. सांख्यसुरेंद्र : कपिलसूत्रओव्या य १४
६४.सांख्य सुरेन्द्र गद्य य १७
६५. सांख्यतत्त्व सूत्रविचार य १५
६६. सांख्यसार एक निबंध य १५
६७. सांख्यसार य १८ / य १४
६८. सांख्यकारिका निरूपण य १८



## संगीत ग्रंथ

६९. छंद प्रदीप य १५
७०. गानसोपान य १५

## आयुर्वेद ग्रंथ

७१. मानसायुर्वेद (सं) य १६
७२. मानसायुर्वेदावर दोन लेख य १५
७३. भिषगिंद्रशचीप्रभा (सं) य १६
७४. वैद्यवृंदावन य १८
७५. वैद्यनन्दिनी य १८
७६. भिषग्पाटवोपपत्तिः य १८

## प्रकरणग्रंथ

७७. स्वमतनिर्णयः (सं) य १६
७८. संप्रदायकुसुममधु (सं) य १६
७९. सच्चिन्निर्णयः (सं) य १६
८०. चित्तोपदेश य २पू
८१. सद्वैजयंती (आर्या) य २पू
८२. बाराखडी य २पू
८३. त्रिकांडसार य २पू
८४. प्रमाद कल्लोळ य १५

## गाथा

८५. अभंगांची गाथा (२१५७) य ९पू
८६. पदांची गाथा (२२४४पदे) य ९उ

## निबंध

८७. अलौकिक प्रवास य २पू
८८. अमोघनिरूपण य २पू
८९. बौद्ध निबंध य १५
९०. वेदान्तनिरूपण य १५ / य १८
९१. सिद्धिसार य १५
९२. अलौकिक व्याख्यानमाला य ५
९३. युक्त्या य १८
९४. गुरुचरणकौमुदी य १८
९५. स्फुट निरूपण (नीळकंठ) य १८

## संवाद* व बोधवाक्ये

९६. साधुबोध * य ८
९७. मणिमंजुषा य २उ
९८. सुवर्णकण य १८
९९. स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार * य ६
१००. दुर्मतहृदयभंजन * य १५
१०१. प्रश्नोत्तरे * य १५
१०२. वृत्तिक्षीरसागर य १५
१०३. बालबुद्धिविवर्धिनी * य १८
१०४. बोधवाक्ये य १८

## पत्रे ११४

१०५ अकरा पत्रे य १
१०६. वीस पत्रे य २उ
१०७. सदतीस पत्रे य ७
१०८. चवरेचाळीस पत्रे य १२
१०९. एकपत्र (श्री खापरेंना) य १५
११०.एक पत्र (श्री कुर्याभाईना) य १८

## लोकगीते

१११ स्त्रीगीते (५ अध्याय) य २/य ४
११२. स्त्रीगीतसंग्रह (१०९२ गीते) य ४
११३. तुंबडी य २पू
११४. रुक्मिणी स्वयंवर (लावणी) य९उ
११५. रुक्मिणीचे पत्र य ९उ

## स्तोत्रे

११६. ज्ञाने-मातृपितृ-भावनाष्टक य २उ
११७. कृष्णपंचपदी य २पू
११८. गुरुपंचपदी य २उ

## चरित्र - आख्याने

११९. आत्मचरित्र य १५
१२०. सूचना प्रकरण य १
१२१. सूचना प्रकरण य २उ
१२२. सूचना प्रकरण य ३
१२३.अभंगात्मक १९ आख्याने य ९पू
१२४.पदात्मक ७ आख्याने य ९उ
१२५. पतिव्रताचरितामृत य १५

## विविधरचना

१२६. सुखपर्व (भारतावर नाटक)य १५
१२७. मात्रमृतपानम् (सं) य १६
१२८. पत्नीप्रेमपराग चरित्र / य२उ
१२९. नवी भाषा 'नावंग' य १५
१३०. ('') शब्दकोश य १५
१३१ ('') लिपी य १८
१३२. मोक्षपट (श्रौतक्रीडापट) य १८
१३३. हरिपाठाच्या प्रतिज्ञा य १८
१३४. हरिपाठाचा अर्थक्रम य १८
१३५. मायर्सवर टीपा य १८
१३६. शिक्षणरत्नाकर चरित्र / य १८
१३७.ज्ञानपाठ य ९पू.
१३८.गायत्री-अन्वयार्थ य १
१३९.स्व-समाजनियम य १८

# श्रीगुलाबरावमहाराजांचे साहित्य : सूक्तिरत्नावली-यष्टीनुसार सूचि

श्रीमहाराजकृत सांख्य-योग-वेदान्त-भक्तिपर **सूक्ति-रत्नावली** या नांवाने असलेल्या समग्र ग्रंथांची यष्टी-क्रमाने विषयवार माहिती. प्रत्येक भागाला **'यष्टी'** म्हणजे गळ्यातील रत्नांचा कंठा, असे नांव आहे. एकूण २० भाग आहेत.( * ) चिन्ह असलेल्या लहान लहान रचना सार्थ मुद्रित आहेत.

(यष्टि १) रु ४०

(१) भक्तिपदतीर्थामृत *
(२) निगमान्तपथसंदीपक
(३) चौसष्टी (अमृ.अ.१)
(४) ११ पत्रे (योग) *
(५) भगवद्गीतासंगति
(६) निदिध्यासनप्रकाश (योग)
(७) कान्तकान्तावाक्यपुष्पम् (संस्कृत)/य१६
(८) सूचनाप्रकरणम् - १
(९) गायत्री-अन्वयार्थ *

(यष्टी २ - पूर्वार्ध) रु.४०

(१०) कृष्णपंचपदी
(११) सद्वैजयंती (आर्या)
(१२) बाराखडी *
(१३) चित्तोपदेश *
(१४) त्रिकांडसार *
(१५) तुंबडी
(१६) चिरंजीवपदाभ्यास *
(१७) शांतिसुधाकर *
(१८) सोपानसिद्धि (योग)
(१९) नित्यतीर्थ (आळंदी-महिमा)*
(२०) मणिमंजुषा (बोधवाक्ये) *
(२१) प्रियपाहुणेर
(२२) अलौकिक प्रवास
(२३) अमोघनिरूपण (ॐकार)
(२४) स्त्रीगीत (५ अध्याय) / य४
(२५) श्रीज्ञानेश्वरक्षमापनस्तोत्र
(२६) रामपंचपदी

(यष्टी २ - उत्तरार्ध) रु.५०

(२७) गुरुपंचपदी
(२८) २० पत्रे
(२९) ध्यानयोगदिवाकर (योग)
(३०) भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणी पत्रिका)*
(३१) प्रीतिनिर्तन *
(३२) गोविन्दानंदसुधा / य१६ *
(३३) मातृपितृभावनाष्टक
(३४) सूचनाप्रकरण - २
(३५) पत्नप्रेमपराग (चरित्र-ले.त्रिपुरवार.)

(यष्टी ३) रु.९०

प्रियलीलामहोत्सव भाग-१
(३६) आमंत्रणविलास.
श्रीभागवत : प्रथम स्कंध-विवरण
~~प्रियलीलामहोत्सव भाग २~~
~~(०) आगमनविलास /~~ य१४
(३७) सूचनाप्रकरण - ३

(यष्टी ४) रु.४०

~~(०) स्त्रीगीते अध्याय ५ / य२~~
(३८) स्त्रीगीतसंग्रह / ओव्या १०९२

(यष्टी ५) रु.४०

(३९) अलौकिक व्याख्यानमाला
(मानसशास्त्र,आधु.विज्ञानादींचा परामर्श)

(यष्टी ६) रु.२०

(४०) स्वमन्तव्यांश सिद्धान्त-तुषार (व्रजभाषा)
प्रश्नोत्तर रूपाने स्व-अवताराचे प्रयोजन

(यष्टी ७) रु. ३०

(४१) सदतीस पत्रे
(बुवाबाजी, धर्म-सुधारक, धर्म, तत्त्वज्ञान समीक्षा, योग, भौतिक विज्ञान, स्वजाति बांधवांना विनंती इ.विषय)

(यष्टी ८) रु.६०

(४२) साधुबोध- ९३६ प्रश्नोत्तरे
धार्मिक, नैतिक, सामाजिक, कौटुंबिक, पारकीय व आर्यसंबंधी प्रश्नोत्तरे.

(यष्टी ९ पूर्वार्ध) रु.१००

(४३) अभंगांची गाथा (२१५७)
कीर्तनोपयोगी १९ आख्यानासहित



(यष्टी ९ उत्तरार्ध) रु.१००

(४४) पदांची गाथा (२२४४ पदे)
कीर्तनोपयोगी ७ आख्यानासहित. तसेच स्तोत्रे, स्तुति, आरत्या, पाळणे, लावण्या, तुमडी व स्त्रीगीतादि अनेक प्रकारची लोकगीते

(यष्टी १०) रु.७५

(४५) प्रेमनिकुंज
मधुराद्वैत दर्शनाचे अद्भुत खंडन-मंडनपूर्वक उत्थाप्य शंका निरसनपूर्वक, ज्ञानोत्तर भक्तीच्या 'अनध्यस्त विवर्त' सिद्धान्ताची शास्त्रीय सिद्धी. श्रीभाऊसाहेब खापर्डेंच्या अप्रतीम विवरणासह.

(यष्टी ११) रु.१६०

(४६) संप्रदायसुरतरू
(पूर्व व उत्तरविहार) ८०० पृष्ठे

(यष्टी १२) रु.५०

(४७) पत्रे व समीक्षा ४४
संस्कृत-काव्य-गद्य पत्रे व आधु. विषयांवरील समीक्षा.

(यष्टी १३) रु.५०

(४८) सुखवरसुधा.
स्वकृत ग्रंथ तारतम्ये करून कसे प्रमाण मानावे? याचे विवेचन
(४९) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका
वेदान्तातील जुन्या आणि स्वनिर्मित पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण व श्रीभाऊसाहेब खापर्डेंचे 'अध्ययन-भाष्य'.

(यष्टी १४) रु.८०

(५०) नारदीयभक्तिसूत्रभाष्य
(ओवीबद्ध मराठी)
(५१) 'आगमनविलास'
प्रियलीलामहोत्सव २ रा खंड.
भाग. स्कंध २ वर ओवी-भाष्य
(५२) *सांख्य-सुरेन्द्र
(कपिलांच्या ५७ सूत्रांवर ओवीभाष्य)
(५३) *सांख्य सुरेन्द्र ~~(य १७)~~ गद्य
(५४) सांख्यसार भाष्य ~~(य १८)~~ गद्य
(५५) सांख्यसूत्रांवरील विचार (य १५)
(५६) सांख्यावरील एक निबंध (य १५)
(५७) सांख्यकारिका निरूपण (य१८)

(यष्टी १५) रु.

३० अपूर्ण ग्रंथ

(५८) ईशावास्योपनिषद्
(५९) ज्ञानेश्वरी निरूपण
(६०) निगमान्तसुभा
(६१) ऐश्वर्यार्थदीपिका
(६२) ब्रह्मसूत्रव्याख्या
(६३) छंदप्रदीप
(६४) प्रमाद-कल्लोळ
(६५) योगप्रभाव - पद्य
(६६) हिरण्ययोग (स्वप्न योग)
(६७) पतिव्रता चरितामृत *
(६८) षट्पदध्वनि
(६९) गोपिकापादपीयूषलहरी
(७०) वेदान्त निरूपण / य१६
(७१) गान सोपान *
(७२) योगांगयमलक्षण (योग)
(७३) दुर्मत हृदयभंजन
(७४) सिद्धिसार
(७५) ईशावास्योपनिषद् गद्य
(७६) वेदान्तप्रक्रियासमुच्चय
(७७) वृत्तिक्षीरसागर
(७८) सुखपर्व (नाटक)
(....) सांख्य सूत्रावर विचार य१४
(....) एक निबंध (सांख्य) य१४
(७९) बौद्ध निबंध
(८०) आत्मचरित्र
(८१) नवीन भाषा - नावंग / लिपी
(८२) प्रश्नोत्तरे
(८३) श्री खापर्डेंना पत्र....
(८४) मानसायुर्वेद २ लेख *

(यष्टी १६) रु.१२०

संस्कृत रचना
(८५). अन्तर्विज्ञानसंहिता
(८६).ईश्वरदर्शनम्
(८७) समसूत्री
(८८) दुर्गातत्त्वम्

(८९) काव्यसूत्रसंहिता
(९०) शिशुबोधव्याकरणम्
(९१) न्यायसूत्राणि
(००) न्यायसूत्रविवरणम्
(९२) एकादशीनिर्णयः
(९३) पुराणमीमांसा
० पुराणमीमांसासूत्रविषयाः
० पुराणपुरुषमीमांसाभाष्यम्
(९४) आगमदीपिका
(९५) शास्त्रसमन्वयः (वृत्तिसमेतः)
(९६) युक्तितत्त्वानुशासनम्
(९७) षड्दर्शनलेशसंग्रहः
(९८) तत्त्वबोधः
(९९) स्वमतनिर्णयः
(१००) संप्रदायकुसुममधु
(१०१) ऋग्वेद टिप्पणी
(१०२) सच्चिन्निर्णयः
(१०३) गंगामात्रमृतपानम्
(१०४) भक्तितत्त्वविवेकः
(१०५) प्रियप्रेमोन्मादः
(०००) गोविन्दानन्दसुधा
(१०६) उच्छिष्टपुष्टिलेशः
(१०७) श्रीधरोच्छिष्टपुष्टिः
(१०८) नारदीयभक्तिसूत्रभाष्यम्
(१०९) बालवासिष्ठम्
(११०) मानसायुर्वेदः
(१११) भिषगिन्द्रशचीप्रभा
(११२) संस्कृत-पदानि ४१
(११३)एकादश-पत्राणि

(यष्टी १७)

समयोपदेश (सुबोध हिंदुधर्म)
(११४) सर्वमान्य धर्माची कल्पना
(शांतारामबापूंना निरूपणे)
(११५) गीतेवरील निरूपणे
(अन्नपूर्णाबाईंना)
(११६) योगवासिष्ठ (मराठी)
(रंगुताईना)

५

(यष्टी १८) रु.५०

समयोपदेश - स्फुट निरूपणे
(०) सांख्यसार य१४
(११७) युक्त्या
(११८) ब्रह्मसूत्र निरूपणे
(११९) बोधवाक्ये
(१२०) सुवर्णकण
(१२१) गुरुचरणकौमुदी
(१२२) बालबुद्धिविवर्धिनी
(१२३) वैद्यवृन्दावन *
(१२४) वैद्यनन्दिनी *
(१२५) भिषग्पाटवोपपत्तिः *
(१२६) नावंग-लिपी.
सांकेतिक लघुलिपी
(१२७) हरिपाठ-अर्थक्रम *
(१२८) हरिपाठ-प्रतिज्ञा *
(१२९) श्रौतक्रीडाविशेष *
मोक्षपट व खेळण्याचे नियम
(१३०) स्वसमाज-नियम
(१३१) मायर्सची समीक्षा *(अमे. तत्त्वज्ञ)*
(१३२) कुर्याभाईंचे पत्र
(१३३) शिक्षण रत्नाकर
(१३४) जयविजय कथा
(१३५) नागपुरातील चर्चा (चरित्र.ले.त्रि.)
(१३६) वेदांत निरूपणे मराठी
(१३७) स्फुट निरूपणे
(१३८) ११ अभंग

(यष्टी १९) रु.६०

(१३९) मनोहरिणी (हिंदी)
हिंदीव्रजभाषेत गीताप्रवचने

(यष्टी २०) रु.१२०

(१४०) योगप्रभाव (गद्य)
पतंजलींच्या ४४ सूत्रांवर संवादरूपाने निरूपणे.

(०) अदृश्यदीपिका

**महाराजांचें आज्ञेवरून** त्रिपुरवारांनी **केलेले** संकलन

---

**श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचे ग्रंथ**

१. आर्यधर्मोपपत्ति (रु.५०)
वैदिक हिंदुधर्माचे विस्ताराने विश्लेषण करणारा अपूर्व ग्रंथ.
२. हरिपाठ-रहस्य (रु.६०)
श्रुति- स्मृति- पुराणे व संत वचनांच्या आधारे भक्तीचे अपूर्व विवरण.
३.अमृतानुभवकौमुदी (रु.१००)
(म/हिं) शंकराचार्यांच्या अद्वैतावर उभारलेले पराभक्तिपर अनुपम विस्तृत भाष्य.
४. ज्ञाने.गूढार्थदीपिका (३००)
अर्थासह विवरण.१००० पृष्ठे
('') गीताप्रेस (रु.१५०)
('') हिंदी प्रत (रु.५००)
५. अभंगगाथा (रु.५०)
६. विविध लेखसंग्रह (रु.१००)
७. संतकथा (रु.१५)
८. पंचदशी प्रवचने
९. भागवत प्रवचने (रु.५०)

---

**श्री बाबाजीमहाराजांनी अनुवादित केलेले ग्रंथ**

१. भगवद्भक्तिसौरभ
(रुक्मिणीपत्रिका)
२. प्रीतिनर्तन
३. स्वमतनिर्णयः (रु.१०)
३. भक्तिपदतीर्थामृत (रु.१०)
४. निगमान्तपथसंदीपक
५. चित्तोपदेश (रु.५)
६. गोविंदानंद सुधा
७. कान्त-कान्ता वाक्यपुष्पम्
८. हरिपाठ अर्थक्रमासह (रु.३)
९. नारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला

६

कै त्रिपुरवार लिखित
''श्रीज्ञानेश्वकन्यापदपांसु'' (रु.१५०)
**श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र**
मूळ अधिकृत चरित्र (पृ.४३२)

०

कै. भाऊसाहेब खापरे निर्मित
माधुर्य मधुकोश (रु.३००)
**१ ते १५ यष्टीतील** सुमारे
२५००० नोंदी असलेली विषयसूचीं

०

डॉ.वा.ना.पंडित कृत ग्रंथ
**०.** शांकरतत्त्वज्ञानात भक्तीचे स्थान
(पहिला पीएच.डी.प्रबंध) म./हिं.

०

डॉ.कृष्ण माधव घटाटे कृत
**०.** श्री गुलाबराव महाराजांची
विचार संपदा (पीएच.डी .प्रबंध) (रु.७५)
०. १३० ग्रंथांचा सारांश (रु.२०)
(११८पत्रांसह) म./हिं.

०

डॉ.राम पंडित कृत
०. श्रीबाबाजीमहाराजांचे चरित्र

०

डॉ. अंजली खरे कृत
०. श्रीबाबाजीमहाराजांची विचारसंपदा
(पीएच.डी प्रबंध)

०

०

००००००००००००००००००००००

**संपर्क :**
**ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहीसाथ, अमरावती,विदर्भ**
**टेली.०७२१.२६७६३०७**

००००००००००००००००००००००



# श्रीगुलाबरावमहाराजांचा परिचय

*(इ. स. १८८१ ते १९१५)*

**''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''**

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीनत्व, माधानसारख्या खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे. त्यांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

१ श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

**२.** संताची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

**३.** भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून **शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.**

**४.** डार्विन, स्पेन्सर, बेझंट वगैरे पाश्चात्य तत्त्वेत्यांच्या विचारसरणी किंवा इलेक्ट्रॉनिक थियरीज सारख्या अत्याधुनिक मीमांसा देखील युक्तिपरिपूत आर्य-सिद्धान्तांपुढे कां टिकत नाहीत, याचे सडेतोड युक्तिवादाने प्रतिपादन केले.

**५.** न्यायदर्शनातील प्रत्यक्षखंडातून आर्यांच्या पुरातन भौतिक शास्त्रांचे पुनरुज्जीवन कसे करावे, याचेही उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

**६.** भारतीयांच्या उज्वल इतिहासाची आणि अक्षुण्ण शिक्षणपरंपरेची खिस्ती इंग्रजांनी बुद्धिपूर्वक केलेली विकृती उघडकीस आणली.

**७.** आर्य हा वंश नाही. आर्य बाहेरून भारतात आले नाहीत. आर्य म्हणजे सुसंस्कृत मनुष्य हाच अर्थ आहे. ३००० वर्षापूर्वी सर्व जगात सनातन आर्य संस्कृतीच पसरलेली होती. हे प्राचीन ऐतिहासिक सत्य अनेक प्रमाणे देऊन नव्याने प्रस्थापित केले.

**८.** भक्ती, वेदान्त, सांख्य, योग, न्याय, आयुर्वेद, संगीत, साहित्य, नाटक, व्याकरण, कोश, क्रीडा, लिपी वगैरे अनेक विषयांवर 'सूत्र' आणि भाष्य रचनेपासून प्रकरण ग्रंथांपर्यंत विविध प्रकारची ग्रंथनिर्मिती निरनिराळ्या भाषाशैलीत करून त्या त्या शास्त्रात महाराजांनी नवेनवे मौलिक योगदान दिले.

त्याचे सर्व लिखाण प्रखर तर्कवादाच्या चौकटीत आहे. त्यांच्या सर्व लेखनात वेद, पुराणे, रामायण, महाभारत, स्मृती वगैरेंची संतवचनांच्या आधाराने समन्वय केलेली शास्त्रीय मांडणी आहे. आधुनिक काळात सहसा न सांपडणारा हा फार मोठा विशेष महाराजांच्या ठिकाणी स्पष्टपणे जाणवतो.

**९.** जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा **सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त** सर्वांपुढे मांडला. आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्याचे समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

अशा मौलिक विचारांनी भरलेल्या महाराजांच्या वाङ्मयाचा विस्तार बराच मोठा आहे. ग्रंथसंख्या १३३, पत्रे व समीक्षा ११९, अभंग २५००, पदे २५००, गीते १२५०, श्लोकादि कवित्व १०००, ओवीसंख्या २३००० असून अंदाजे ६००० पृष्ठे आहेत. ही सर्व रचना संस्कृत, मराठी, हिन्दी, व्रजभाषा व वऱ्हाडी इ. भाषांतून झाली आहे. साहित्यिक दृष्टीनेही प्रस्तुत वाङ्मयाचा कस ज्ञानेशांच्या कन्येला शोभणाराच आहे.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात



झालेल्या या सर्व ज्ञानशाखांना कवेत घेणारा मूलभूत वैचारिक योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते.

# जीवन-आलेख



* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ शु. १०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथे जन्म.
* चवथ्या महिन्यात अंधत्व / अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ. स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यानंतरचा इ. स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ. स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ. स. १८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ. स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ. स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ. स. १९०२ - ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रीमत जठार यांना पत्र. त्यात
* मानभावमत समीक्षा, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा.
* स्त्रीगीते या झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना.
* पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन.
* हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ. स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ. देउरवाडा
* इ. स. १९०४ -
* पूर्वजन्माचे संस्मरण - गुजरातेतील झुंझुवाडा येथील सत्पुरुष बेचरानंदस्वामी.
* आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट.
* ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ-
* ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली.
* माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे,
* बालसवंगडी व पहिला शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी दिलेल्या सूचना.
* आळंदीवारीचा आरंभ.
* स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* इ. स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह.
* श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची प्राप्ति. * नित्यपूजा.
* प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांची भेट.
* मुलगा-अनंत यांचा जन्म.
* ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.
* इ. स. १९०७ - * नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ.
* मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा.

* वैज्ञानिक जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा.
* कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.
* जगन्नाथपुरीयात्रा. * योगप्रभाव निरूपणे, चित्तोपदेश व सद्वैजयंतीची रचना.
* शिवाच्या पार्थिवपूजनाचा आरंभ.
* प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ. स. १९०९ - * अंतर्विज्ञानसंहिता या यासूत्रग्रंथाची रचना व त्यातील सात सूत्रावर अलौकिक व्याख्याने.
* वृन्दावनाची यात्रा.
* इ. स. १९१० - * डॉ. मुंजेना पत्र,
* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन.
* पुण्याच्या साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकरांशी भेट.
* इ. स. १९११ ते १९१३- विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ. स. १९१४ - * श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत,
* देवासच्या श्रीमंत तुकोबाराजे पवारांशी पत्रव्यवहार व देवासभेट.
* संगीतकार पं. भातखंडेशी पत्रद्वारे चर्चा व गानसोपानाची रचना.
* धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५ - **भाद्रपद शु. १२ वामनद्वादशी** रोजी पुणे मुक्कामी, चाकण ऑइलमिलच्या परिसरातील वास्तूत, शेवटच्या क्षणीं देखील, स्वतःच्या अनुभवाचा दाखला देऊन, शास्त्रनिष्ठेचा नारायण पंडितांना उपदेश केला आणि सूर्योदयाचे समयीं **ब्रह्मस्थानी प्रस्थान** केले.

## कार्याचा आलेख



* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ. स. १८८१ ते १९१५.
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्‌विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्‌दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने



समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तौलनिक मीमांसा आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* **इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा** आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्‌दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा ? याचे मार्गदर्शन.
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : लो. टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासकि सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्‌मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना. * नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि ब्रजभाषेत एकूण १३४ ग्रंथांची रचना.
* पत्रे ११८ *अभंग - २०९९, *पदे - २२५२, *गीत - १२५०, *श्लोक – १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

०००

## श्रीगुलाबराव महाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

# श्री बाबाजीमहाराज पंडित

''गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी''

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्‌गार काढले -

''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही. माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं'. पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल !

000





## श्रीगुलाबरावमहाराजांच्या सूक्तिरत्नावली-यष्टीनुसार

## मूल्यसूचि

| | |
|---|---|
| **(यष्टि १)** | रु ४० |
| **(यष्टी २)** पूर्वार्ध | रु.४० |
| ( " ) उत्तरार्ध | रु.५० |
| **(यष्टी ३)** प्रियलीलामहोत्सव आमंत्रणविलास | रु.८० |
| **(यष्टी ४)** स्त्रीगीत संग्रह | रु.४० |
| **(यष्टी ५)** अलौ.व्याख्याने | रु.५० |
| **(यष्टी ६)** स्वमन्तव्यांश-सिद्धान्त-तुषार (हिंदी) | रु.५० |
| **(यष्टी ७)** ३८ पत्रे | रु.६० |
| **(यष्टी ८)** साधुबोध | रु.६० |
| **(यष्टी ९)** पूर्वार्ध अभंगांची गाथा | रु.१०० |
| ( " ) उत्तरार्ध पदांची गाथा | रु.१०० |
| **(यष्टी १०)** प्रेमनिकुंज | रु. ७५ |
| **(यष्टी ११)** संप्रदायसुरतरू पूर्वविहार | रु.१२५ |
| **(यष्टी ११)** उत्तरविहार | रु.१२५ |
| **(यष्टी १२)** पत्रे ४६ | रु.६० |
| **(यष्टी १३)** सुखवरसुधा.व वेदान्तपदार्थोद्देशदीपिका | रु.५० |
| **(यष्टी १४)** | रु.८० |
| **(यष्टी १५)** | रु.१२० |
| **(यष्टी १६)** संस्कृत ३० रचना | रु.१२० |
| **(यष्टी १७)** समयोपदेश : सुबोध हिंदुधर्म | रु.८० |
| **(यष्टी १८)** समयोपदेश - स्फुट निरूपणे | रु.५० |
| **(यष्टी १९)** मनोहरिणी गीता (हिंदी) (य.६सहित) | रु.५० |
| **(यष्टी २०)** योगप्रभाव (गद्य) | रु.१२० |

**'श्रीमहाराजांचे चरित्र'** त्रिपुरवारकृत (मूळ अधिकृत) रु.१५०
**'माधुर्यमधुकोश'** महाराजांच्या ग्रंथांतील विषयसूचि रु.३००
**१३० ग्रंथांचा सारांश** (११४ पत्रांसह) रु.२०

संपर्क : ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहीसाथ, अमरावती